TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192746
UNIVERSAL LIBRARY

पारिजात
प्रकाशन

# उपकारी माणसें

[ महाराष्ट्रसमाज व त्याच्या भावभावना ]
यांचा प्रदीर्घ चित्रपट

[ खंड १ ला ]

# प्रवासांतील सोबती

मूल्य २ रु.

—श्री. रघनाथ ज. सामंत. ठाणें.

श्री. प्रभाकर शांताराम वर्टी, बी.ए. (ऑ.)
यांनीं
'पारिजात प्रकाशनसंस्थे' साठीं
प्रसिद्ध केलें.
कोल्हापूर, मार्च १९३८.

—सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन—

× × × × ×

CHECKED 1955

कव्हरचें स्प्रे पेंटिंगचें अभिनव चित्र,
सिमला प्रदर्शन १९३७ मधील
पोस्टर पेंटिंग विभागात बक्षिस मिळविणारे,
श्री. गोविंद भडसावळे, मुंबई
याचे आहे.

× × × ×

—सोल एजन्ट्स् व डिस्ट्रिब्यूटर्स—
श्री. दा. ना. मोघे, बी. ए.,
स्कूल ॲंड कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.

× × ×

—मूल्य—

ॲंटिक प्रत रु. ३।

श्री. वा. ना. ठकार
यांनीं
कोल्हापूर येथें श्रीसिद्धेश्वर छापखान्यांत
मुद्रित केलें.

याच लेखकाचीं

इतर पुस्तकें

**हृदय**- हा शब्दचित्रें व लघुकथा याचा संग्रह रसिकमान्य झाला आहे. महाराष्ट्रातील दलित वर्गातील व्यक्तींचीं हुबेहूब कलात्मक अशीं मार्मिक शब्दचित्रें यातील प्रत्येक पानांत सांपडतील. शब्द-चित्र हा अभिनव प्रकार या पुस्तकां-पासूनच प्रामुख्यानें रूढ झाला आहे. त्यामुळे त्या दृष्टीनेंही अभ्यासू वाचकाला हे पुस्तक संग्रहणीय वाटेल. पृष्ठें २५०.

किंमत १ रुपये.

**सुरंगीची वेणी**- रशियन लेखक रॅमेनॉव्ह, याच्या 'विदाऊट चेरी ब्लॉसम' या पुस्तकातील, निवडक लघु-कथाचे हें रूपातर, इतकें सुंदर झालें आहे कीं, मराठी रूपातरित वाङ्मयात याला बरेच प्रमुख स्थान दिले जाते. पृष्ठे १६०

किंमत ८ आणे.

मिळण्याचे ठिकाण—
भारत गौरव ग्रंथमाला,
चिराबझार मुंबई २.

**वाळूंतील पाउलें**

हा दुसरा लघुकथासंग्रह विविधता, कलात्मकता, भावनाविष्कार या सर्व गुणांनीं सुंदर झाला. किंमत १। रु. पृष्ठें १७५. (अन्यत्र कूपन पहा)

**-पारिजात-**

या रसिकमान्य व महाराष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ लेखकांच्या लेखांनीं नटलेल्या मासिकांचे, जानेवारी १९३४ ते फेब्रुवारी १९३५ अखेरपर्यंतचे संग्राह्य चौदा अंक. एकत्रित कापडी बांय-डिंग, पृष्ठें ११०० रॉयल साइज.

किंमत ६॥ रुपये.

स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल
कोल्हापूर.

# श्री. रघुनाथ ज. सामंत बी. ए.

[ जन्म २४ डिसेंबर १९०९ ]

महाराष्ट्रीय वाचकवर्गास, कुमार रघुवीर या नावानें, हे १९३० सालीं, विशेष परिचित झाले. 'शब्दचित्र' हा नवीन वाङ्मयप्रकार, महाराष्ट्रात त्यानींच विशेष रूढ केला. १९३२ सालीं, त्यानीं 'हृदय' हा आपला शब्दचित्रे व लघुकथा याचा संग्रह प्रसिद्ध केला. यांतील अनेक चित्रे शालोपयोगी पुस्तकातूनहि आता मुलापुढे येत आहेत.

१९३३ डिसेंबरपासून त्यानीं आपले 'पारिजात' मासिक सुरू केले व ते थोड्याच महिन्यात आपल्या गुणानीं रसिकप्रिय झाले; तरी शेवटीं, ते अल्पजीवीच ठरलें.

१९३४ सालीं 'वाळूतील पाउलें' हा दुसरा विविधता व कलात्मकता यानीं नटलेला लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९३५ डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झालेले, 'सुरंगीची वेणी' हे रूपातरात्मक पुस्तकहि वाचकवर्गाच्या मनाची पकड घेण्यासारखे ठरले.

याच्या लेखनाचे विशेष, म्हणजे मूलगामी पण कलात्मक दृष्टि, साधी सुटसुटीत ओघवती भाषा, व व्यापक मानवी भावभावनाचा पाया, असें थोडक्यात सागता येतील.

त्याचे 'पारिजात' मासिक १९३५ सालीं बंद झाल्यावर, आतापर्यंत दरम्यान दोन तीन वर्षे, त्याचे स्वतंत्र लिखाण फारसे प्रसिद्ध झालेच नाही. प्रस्तुत कादंबरी १९३६ मध्ये लिहून तयार होती, तरी ती प्रकाशात आली नाहीं.

हा प्रदीर्घकथा प्रयत्न, महाराष्ट्रसमाजाच्या पार्श्वभूमीवर व्यापक स्वरूपाने चित्रित केला असल्यामुळे, त्याला अभिनव व महत्वाचे स्थान आहे. यातील विविधता, जिव्हाळा, परिचित भावभावनाचा आविष्कार, व्यापकता, महाराष्ट्राच्या प्रत्येक रसिक वाचकाला चटका लावल्यावाचून रहाणार नाहीं.

---

# खुलासा

माझीं ' वाळूंतील पाउलें ', गेल्या तीन साडेतीन वर्षांत अस्पष्ट होत आल्यावर, आता पुन्हा नव्यानें, प्रस्तुत सूत्रबद्ध कादंबरीरूपाने, मी माझे स्वतंत्र लिखाण महाराष्ट्र-रसिकास सादर करीत आहे.

कादंबरी लिहून झाल्यावर देखील दोन वर्षें ती पडून राहिली; या दृष्टीनेच या खुलाशाची जरूरी वाटली. माझ्या ' हृदया ' चे रसिकानीं १९३२ सालीं स्वागत केले. त्यानंतर चार पाच महिन्यातच प्रस्तुत कादबरी मी कल्पिली. पण जानेवारी १९३४ पर्यंत, कथानकाच्या रूपरेखेहून कादबरीला काहींच स्वरूप आले नाहीं. माझ्या ' पारिजात ' मासिकात ती क्रमशः प्रसिद्ध करावी या हेतूने, मी प्रस्तुत प्रथम खंडाचे जवळ जवळ पहिले दोन जुडगे, नोव्हेंबर १९३४ पर्यंत तयार केले. पण संपूर्ण तयार झाल्याशिवाय ती खडशः प्रसिद्ध करणें मला प्रशस्त वाटेना. शिवाय, दोन तीन महिन्यात, ' पारिजाता ' वरच आपत्ति आली, इतर अनेक अडचणी आल्या, व एकंदरींतच जरूर तें मनःस्वास्थ्य मला न लाभल्यामुळे, पुढे लिखाण होईना. शेवटीं, जानेवारी १९३६ अखेर, या लेखनास, मी पुन्हा नव्या उत्साहाने लागलों, व प्रथम खंडाचा राहिलेला भाग, द्वितीय खंड व तृतीय खंड, मार्च १९३६ अखेरपर्यंत सारखे लिहून, कादबरी हातावेगळी केली.

तीन वर्षे मनात बाळगलेले हे विस्तृत चित्र, त्यावेळीं असें हातावेगळे झालें, तेव्हा समाधान वाटले, पण भीतिही वाटली. लघुलघुवाङ्मयप्रकाराच्या या त्रोटक जमान्यात, व प्रकाशनधद्याची प्रतिकूल परिस्थिति स्वानुभवानेही स्पष्ट दिसत असतां, प्रस्तुतसारखी, कलात्मक अभ्यासू वृत्तीची प्रदीर्घ कादंबरी लिहावयास घेणे हें साहसच होते. पण, मग त्यावेळीं मनाचे समाधान करण्यासाठीं, मी ब्राउनिंगच्या दोन ओळी आठवी—

> " A man's reach should exceed his grasp,
> Or what's a heaven for ? .. "

आणि या विचारानेंच, पात्रे, कालखंड, सारे हेतुपुरस्सर विस्तृत ठरवून, कल्पिलेली ही कादबरी, मी लिहून सपविल्यावर मला जे समाधान लाभले, तीच मी माझी बिदागी समजतो. शिवाय, आजपर्यंतच्या तुटपुंज्या अनुभवानंतरहि, महाराष्ट्रीय लेखकाला लेखनावर मिळणाऱ्या फायद्याविषयीं, मी अंधारात नाहीं. कादंबरी लिहून झाल्यावर, गेली दोन वर्षे तिच्या प्रसिद्धीसाठीच, अनेक कोलाट्या उड्या खाव्या लागल्या, हे येथे नमूद करण्यास मला मुळींच संकोच किंवा कमीपणा वाटत नाही. वाङ्मयाच्या 'विस्तृतपणा' या अंगाला आमचे वाचकच घाबरतात, तर प्रकाशकानी काय करावे ? . . पण याविषयी जास्त न लिहिता, मला येथे एवढेच सुचवावेसे वाटते, की, आमच्या वाचवर्गाच्या सर्वसाधारण उदासीन वृत्तीमुळे, मराठी वाङ्मयप्रकाशन दिवसेदिवस जास्त जास्त खरटणार आहे. डोक्याला फारसा शीण पडणार नाही, बिछान्यावर पडल्यापडल्या सहजासहजी हातावेगळे करता येईल, असले त्रोटक सुटसुटीत 'छोटे वाङ्मय' असावे, एवढीच आमच्या साधारण वाचकाची उडी ! वाङ्मयासाठी पदरमोड करण्यापेक्षा, शेजाऱ्याच्या किंवा विसारपद्धतीच्या वाचनालयातील प्रतीकडेच साधारणतः दृष्टि ! अशा परिस्थितीत, एकादा असला विस्तृत लेखनाचा प्रयत्न करणारा लेखक, महाराष्ट्रात तरी, तसला प्रयत्न फिरून कधीच करणार नाही. वाचकानी माझ्या या स्पष्टोक्तीबद्दल मला क्षमा करावी. पण ही वस्तुस्थिति आहे खरी.

माझ्या या पहिल्याच विस्तृत कादबरीच्या अतरगाविषयी, योग्य वाटतात ते चार शब्द, यापुढे जोडतो. त्यापूर्वी, येथे एक स्पष्ट लिहावेसे वाटते. 'उपकारी माणसा' ची रचना, पात्रे, कालखड सारेच मी, विस्तृत कल्पिले आहे. सबध तीन खडात सपणाऱ्या या कथासूत्राला पोषक अशी अनेक नवीजुनी कल्पनिक पात्रे या कादंबरीत प्रवास करणाऱ्या वाचकाला पदोपदी आढळतील. त्याला पोषक असे, क्षुद्र श्रेष्ठ प्रसग मी योजीत गेलो आहे. ते ते प्रसग त्यावेळी कदाचित् 'उगीच' वाटतील, पण एकदर कादबरीच्या सूत्रबद्धतेला ते पोषक असेच आहेत. अशा दृष्टीने पाहिल्यास, वाचकालाही आपली कल्पनाशक्ति वाचताना नेहमी जागृत ठेवावयास लावील अशी प्रस्तुत कादबरी आहे. तेव्हा केवळ 'त्रिकोणबद्ध' कादंबऱ्याची आवड असलेल्या वाचकाची ती निराशाच करील. त्यानी ती हातीं न घेणेच बरे !

आता, प्रस्तुत 'उपकारी माणसा' च्या अंतरंगाविषयी रसिकासाठी थोडेसें लिहितो. काटकसरीचा आटोकाट प्रयत्न करूनहि, प्रस्तुत कादंबरीतील मनोमय दृश्याच्या चित्रणास, चित्रफलक मोठा लागला. पण त्या त्या पात्राशी समरस होऊन, वेळोवेळीं, हसत खेळत, अश्रू ढाळीत, श्रम घेऊन लिहिलेली ही कादंबरी, सहृदय व सुसंस्कृत वाचकास सात्त्विक समाधानच देईल, अशी मला

पूर्ण उमेद वाटते. हें विस्तृन चित्र विस्तृत स्वरूपांतच रसिकांसमोर जावें, ही माझी पहिली इच्छा होती. पण प्रसिद्धीच्या सोयीसाटीं, मला ती बाजूस सारावी लागली. आता, ' प्रवासातील सोबती ' ' अभ्र–पटल ' व ' आकाशगंगा ' अशा तीन स्वयंपूर्ण खंडांत ती प्रसिद्ध होत आहे. राहिलेले दोन्ही खंड, एकामागून एक लौकरच प्रसिद्ध होणार असल्यामुळे, रसिकानीं कादंबरी सपूर्ण वाचूनच तिचें कायते स्वारस्य ठरवावें.

' मध्यम स्थितींतील, एक भावनाशील ध्येयवादी महाराष्ट्रीय चित्रकार कलावंत ! त्याच्या आयुष्याच्या पूर्वार्धातील प्रसंग व पात्रें आणि त्याच्या मनाची त्या त्या वेळचीं मानसिक आदोलने, यथार्थपणें चित्रित करावयाचीं ही कल्पना ठरविली ; आणि मी निरनिराळ्या काल्पनिक पात्राची प्रसंगाची त्याप्रमाणें उभारणी केली. त्या अनुषंगानें, त्या काळांतील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक घडामोडींची त्या ओघानेच त्यावर स्पष्ट-पुसट छाया पडलेली आहे. तीस सालचा राष्ट्रीय संग्राम, दिवसेंदिवस नष्ट होत चाललेली एकत्र कुटुंबसंस्था, आणि भिन्न परिस्थिति, भिन्न दृष्टिकोण, यांमुळें, जुन्या नव्या पिढीचा अव्याहत चालू असताना दिसत असलेला झगडा, याचीच मुख्यतः कादंबरीला पार्श्वभूमि आहे. ती ती परिस्थिति अगर तो तो विषय यावरील त्याहून अधिकारी चर्चा अथवा मतें कादंबरींतून हुडकून काढणे फोल ठरेल. तो माझा अधिकार नाहीं व तशी माझी इच्छाहि नाहीं.

अरुण ठाकूर या एका महाराष्ट्रीय ध्येयवादी तरुणाच्या, जीवनप्रवासांत यदृच्छया आलेले सोबती, या खंडात आले आहेत. त्याच्या एकाकीपणे जगाशीं झगडतानाच्या जीवन–पथावर पसरलेले ' अभ्र–पटल ', पुढील खंडात येणार आहे. त्यानंतर, निवळत जाणाऱ्या आकाशात, त्याला उपकारी माणसाची ' आकाश–गंगा ' दिसते. याच व्यापक कथासूत्राचें चित्रण, महाराष्ट्रीय रसिकांस सादर करण्याचा, माझा हा नम्र प्रयत्न आहे. तेव्हां, नायकाच्या आयुष्यांत, ही क्षणभर दृश्यमान होणारी अगर काहीं काळ स्थिरपणे त्याच्याशीं संबंद्ध असणारीं विविध पात्रें, त्यामुळें त्याच्या आयुष्यात व मनात उत्पन्न झालेलीं वादळें व त्यातील आदोलनें, त्याचा व इतराचा त्या त्या वेळचा दृष्टिकोण व भावना, याची, .. संपूर्ण कादंबरी वाचून ओळख करून घेतल्याशिवाय, रसिकांनीं, ' उपकारी माणसें ' कोणतीं, कोणत्या अर्थानें व कां, तें ठरविणें, योग्य होणार नाहीं, असें मला वाटतें.

कोल्हापूर महाशिवरात्र
१८५९.

रसिकांचा नम्र,
**रघुनाथ ज. सामंत.**

# विनंति.

वाचकाच्या सोयीसाठीं पात्रांचा तक्ता घातला आहे. काने मात्रा उडून क्वचित् अशुद्धें राहिलीं असतील. याशिवाय खालील चार पाच ढोबळ अशुद्धें शुद्ध करावीत. पत्र नं. २७ 'ता. २९ एप्रिल १९२९' पाहिजे. पत्र नं. २८ 'ता. २२ एप्रिल १९२९' पाहिजे. पत्र नं. २९ 'ता. १४ जून १९२९' पाहिजे. पत्र नं. ३० 'ता. १६ जून १९२९' पाहिजे. पत्र नं. ४८ पत्राचें शीर्षक 'प्रिय मंजुळा' वाचावे. आंकडा ५७ मधील दुसरा प्यारा 'गेल्या वर्षी' हे शब्द काढून टाकणे. पृष्ठ २२४ शेवटच्या दोन ओळी उलट्या सुलट्या पडल्या आहेत. तो वाक्यार्थ—'समाधानाचा सुस्कारा सोडील व नवीन कल्पिलेल्या माझ्या आयुष्याकडे आशावंतपणें पाहूं लागेल ! . . जास्त काय लिहूं ?' असा पाहिजे. आकडा ३१० मध्ये 'हसत' आहे तेथें 'हलत' पाहिजे.


याच लेखकाचीं

—आगामी पुस्तकें—

**तांडा**

[ लघुकथा संग्रह ]

**तारांगण**

[ चिमुकल्या चांदण्याचा संग्रह

**हिरकण्या**

[ लघुनिबंधरत्नें ]

# अर्पण

प्रिय ताई,—

[ सौ. लक्ष्मी वालावलकर ]

कोणत्याही एखाद्या मोठ्या शाळेंत
तूं शिक्षण घेतलेलें नाहींस.
तरी देखील
सुसंस्कृत व आदर्श गृहिणी
या दृष्टीनें तूं पात्र ठरतेस.
अशा
माझ्या प्रेमळ ज्येष्ठ भगिनीला
ही माझी आनंददायी अल्प कलाकृति
सप्रेम समर्पण करतों.

*" Life is too short*
*For a cynic peep or critic bark,*
*——For it will soon be dark !"*

— ?...

*" But why not do as well as say—paint these*
*Just as they are !... Careless what comes of it !*
*God's works—paint anyone ! And count it crime,*
*To let a truth slip !—"*

—**R. Browning.**

*" In tragic life, God wot,*
*No villain need be ! Passions spin the plot,*
*We are betrayed by what is false within !"*

—**G. Meredith.**

# —प्रवासांतील सोबती—

[ ही सर्व पात्रें काल्पनिक आहेत ]




याशिवायः— मिरा पाटील, मंजुळा देसाई, जाई पै, होप काइंड.

काळ्या, मुरारी, सदू वगैरे नोकर.

# उपकारी माणसें

[ खंड १ ला ]

## —प्रवासांतील सोबती—

### उपोद्घात

: १ :

मावळतीच्या बाजूस सूर्य खालीं उतरलेला पहातांच, इकडे तिकडे रेंगाळत रहाणाऱ्या एखाद्या चुकार वासराला, गोवाऱ्याने बाकीच्या ताड्याकडे वळविलें. चौफेर पसरलेली सारीं गुरें भराभर एकत्र झालीं. आणि सुकीं बुडकेच राहिलेल्या, मधल्या भातशेताना तुडवीत तुडवीत, तीं शेवटीं गाडी-रस्त्याला लागलीं.

गुरें गर्दी गर्दी करून चालत होतीं. रस्ता दोन्हीं कडापर्यंत सगळा भरला होता. त्याचीं पावलें सरपटून, धूळ वर उडत होती. त्याच्या चालण्याच्या त्या एकाच मंद सळसळाटात, वासराच्या आठवणीनें अस्वस्थ झालेल्या एखाद्या गाईच्या हंबरण्याचा, एकाद्या रेड्यावर किंवा म्हशीवर हाणलेल्या गोवाऱ्याच्या काठीचा, किंवा त्यानें हाकण्यासाठीं केलेला " हॅऽऽट्" "च्यक् च्यक्" असा तोंडातून काढलेला आवाज, एकदम मोठ्यानें निनादे. याशिवाय, त्या वातावरणात नांदणारें गांभीर्य... तेथील शातता, भेसूर भासूं नये म्हणूनच जणूं काय... डोक्यावरून उडणारा, किंवा लाबच्या झाडावर बसून ओरडणारा, एखादा पक्षी "कुहू कुहू" असा खेळकर शब्द करी! अगर लाबच्या एखाद्या शेतांतून जा—ये करणाऱ्या शेतकऱ्यांच्या बोलण्यांतील अस्पष्ट ध्वनी, मधूनच कर्णपथावर आदळे!

निस्तेज झालेला सूर्य आतां अगदीं पश्चिमेला टेकला होता; त्याच्या सान्निध्यामुळे आकाशाचा तेवढाच पट्टा पिवळाधमक झाला होता. गुरांच्या पावलांनीं उडणारे धूलिकण, किंचित् हतबल झालेल्या त्या सूर्यकिरणात मधून मधून प्रकाशित होत. जागोजाग, रस्त्याच्या दुतर्फा, वडाचीं झाडें वाढलीं होतीं. त्याच्या गर्द सावलींत, सूर्यबिंब, छाया व धूलीकण यानीं चालविलेला तो मनोरम खेळ! धुळीने माखलेल्या वटवृक्षाच्या पानातील असंख्य लहान लहान फटी, पलीकडील बुडत्या सूर्यबिंबामुळे चक् चक् करीत होत्या!

किती साधेसुधें, पण किती मोहक... आकर्षक दृश्य होतें ते सारे!

लांबपर्यंत पसरलेले पूर्वेकडील धुरकट डोंगर, क्षणाक्षणाला जास्तच काळवंडत होते. शेंडे हालविणारे उंच उंच ताड, लहान लहान झुडपातून डोकावून पहात होते. आणि झोके घेणाऱ्या, आकाशात चढलेल्या, त्यातील एखाद्या एकाकी ताडावर, 'शेव करून' बाडी बांधण्यात, अगर पार्तीतून उतरलेली ताडी आपल्या कमरेच्या मोठ्या मडक्यामध्ये ओतण्यात, गढलेल्या, एखाद्या भंडाऱ्याची चिमुकली आकृति दृष्टीस पडत होती.

सभोंवारच्या प्रदेशावर दूरपर्यंत दृष्टि फिरविणारे ते एकाकी ताड, त्याच्याजवळ विखुरलेल्या करदीच्या जाळी, बैलगाड्याना आत आत नेणाऱ्या शेतातील नागमोडी गाडी.... सर्व मागे टाकीत टाकीत, गुरे शेवटीं वस्तीमध्ये शिरलीं. केव्हा एकदा गोठ्यात शिरून आपल्या वासरा-रेडकाना चाटूं, या कल्पनेने गाई-म्हशींनीं तर हंबरत हंबरत आपल्या ओट्या सोडल्या होत्या. आणि यथेच्छ पाणी पिण्यासाठीं बैल कुंडीकडे वळत होते.

क्वचित्, एखादा वाटमरू जातां येताना दिसत होता, पण बाकी, त्यावेळीं त्या रस्त्याला माणसाची कसलीच जाग नव्हती! सगळीकडे सामसूम! कसली वर्दळ म्हणून नव्हती!

केवळ मानवी वस्तीनेच गजबजलेल्या शहरापासून अगदी दूर दूर असलेले, एक लहानसे खेडे होते ते!

: २ :

रेल्वेस्टेशनापासून तीन साडेतीन मैल असलेलें सोनगांव, म्हणजे सारी पंधरा वीस घराची वस्ती. त्यातले मामासाहेब नाईकाचे सर्वांत मोठे घर! इतर लहान लहान खोपट्यांत, ते मंगलोरी कौलाचे दुमजली घर अगदीं उठून दिसे.

चारी बाजूस ऐसपैस खुली जागा सोडून केलेले तारेचें कुंपण, त्याला लागू-

नच तांबड्या जासवंदीची गर्द वई ! त्यामुळें, सगळीकडे अगदी हिरवे गार दिसे. झाप्याच्या आत, माडवानें आच्छादून स्वच्छ सारवलेले अंगण; त्यानंतर घराचा विस्तार संपला, कीं, मागील बाजूस पाण्याने नेहमी तुडुंब भरलेली विहीर; आणि त्यापलीकडे पाणरहाट व कुंडी ! विहीर व कुंडी याच्या लगतचे माड आपले शेंडे, व केळी आपल्या काळसर हिरव्या पानाच्या चौऱ्या, त्या पाण्याच्या सान्निध्यानेच, जणूं काय, डौलदारपणे हलवीत!

गावातील आसपासची सारीं गुरें परतल्यावर, प्रथम मामाच्या आवारापुढील झाप्यातून आत शिरत; मागल्या विहीरीजवळच्या कुडीवर पाणी प्यावयास थबकत; तुडुंब भरलेली कुडी सगळी रिकामी झाली, की, त्याचे समाधान होऊन तीं परत फिरत; आणि मग तेथील गोवाऱ्याने त्याना आपापल्या गोठ्याकडे शेपाटावयाचे.

स्वतः मामाची गुरे वाड्यात शिरली, कीं त्याच्या घराच्या डाव्या बाजूस असलेल्या गोठ्यातील वासरा-रेडकाच्या, अन् पान्हा सोडलेल्या गाई-म्हशींच्या हंबरण्याचा एकच गोंधळ होई. त्यानतर त्याचे खाणे, त्याची वासरे लुचणे !....

आणि मग गोवारी पिळत असलेल्या धाराचा, " चळ् चळ् " आवाज सुरूं होईपर्यंत, हा हा म्हणता काळोखहि पसरूं लागे !

: ३ :

मामासाहेबाच्या त्या दुमजली बगल्यामागील स्वयंपाकघराच्या पायऱ्या उतरून, एक सुस्वरूप प्रौढ बाई, कमरेवर रिकामी घागर घेऊन विहिरीजवळच्या किंचित् निसरड्या गचीवर जपून पावले टाकीत, कुडीकडे वळली. तिच्या केसाचा अंबाडा तिने सैलसा बाधला होता. किंचित् गौरवर्ण रुंद कपाळावरील मोठेसे कुकू, काळे डोळे, यावरून तिच्या खानदानीपणाचे तेज दिसत असले, तरी पापण्याखालचीं काळसर वलये व चेहऱ्यावरील काहीसा करुण भाव, तिच्या मनात सतत वसत असलेली उदासीनताच स्पष्ट दाखवीत होता.

घागरीखालचा पाण्याने ओलाचिंब झालेला जुन्या इरकली लुगड्याचा पदर, डाव्या हाताने थोडा पिळून पाणी झटकताना, तिच्या हातातील बिलवरी तासाच्या सोन्याच्या बागड्या खळखळल्या. आणि तसल्याच किंचित् मंजुळ शब्दात, ती पाणरहाटाचा टोणगा हाकीत असलेल्या म्हाताऱ्या गड्याला म्हणाली, " धर्माऽ, बाबाऽ, एवढ्या दोन घागरी भरून घेते, अन् मग टोणगा सोड हो ! —मेला कितीतरी वेळ फिरतोय् रेऽ, कुंडी भरूनसुद्धा चालली—"

"आता जकलीं ढोरां येन्, टाकत्याल् समदं पानी पिवून!" आपली वाढलेली पांढरी हजामत खाजवीत, टोणग्याला उद्देशून धर्मा म्हणाला, "याला काय धाड भरली हा वैनी!"

"बरं रे डोक्र्या" ती प्रेमळपणें हसून, पण गरगर फिरणाऱ्या त्या टोणग्याकडे कळवळ्याने पहात, धर्माला म्हणाली, "तुझ्यासारखाच म्हातारा झालाय् आता तो टोणगा, धर्मा! त्याची काळजी घे हो. नाहीं तर पुढल्या महिन्याला पावसाळ्यात करील बिचारा तंगड्या वर!"

"कमळा मावशीऽ" शेजाऱ्याची लहानगी मुलगी, स्वयंपाकघराच्या दारातून हांक मारीत होती. भरलेली घागर कडेवर चढवीत तिच्याकडे प्रेमभरल्या दृष्टीनें हंसून पहात, कमळा मावशी तिकडेच चालूं लागली.

"का ग माले? बाबूसाठीं दुधाला आली असशील गाईच्या, हो ना?" तांब्याच्या संचात पाणी ओतून, व त्यावर झाकण ठेवून, कमळामावशी पाणेऱ्यावरची रिकामी घागर कमरेवर पुन्हा चढवीत म्हणाली, "थाब हं. आता गोवारी येईल धार काढून!...तूं नाहीं का गेलीस आमच्या कुंदा, सुधीर, वासंतीबरोबर गाडींतून स्टेशनावर?"

आणि तिच्याच बरोबर पुढे गोड गोड बोलत, कमळामावशी विहिरीजवळ परत आली!

टोणगा रहाटाच्या फेऱ्या करीतच होता. त्याच्या डोळ्याना टोपडे बाधले होतें; त्याला सभोवारच काहीच दिसत नव्हते. गेल्या अनेक वर्षांच्या सरावाप्रमाणें, तो मानेवर ठेवलेले रहाटाचे जोखड घेऊन, निमूटपणें सारख्या एकाच प्रकारच्या वाटोळ्या फेऱ्या घालीत होता. मधूनच पाठींत बसणारा काठीचा रपाटा खाणें, हें त्याच्या इतके अगदीं अंगवळणींच पडले होते, कीं, तेवढ्यापुरतीं फार तर दोन पावले भरभर टाकल्यावर पुन्हां त्याची ठरलेली धिमी चाल सुरूं होई.

असे ठराविक चाकोरींतून जाणे त्याच्या अंगी चागले मुरलेलेंच होतें, जणू काय!

: ४ :

वाटोळे फिरण्याच्या या उंच जागेवरून विहिरीकडे गेलेल्या त्या गरगर फिरणाऱ्या चाताला, एक मोठा वर्तुळाकार रहाट जोडला होता. त्यावरून सुटून पाण्यांत बुडणारी माळ विहिरीच्या तळापयत जाऊन, हळूं हळूं एकएक बांडी भरून

वर आणीत होती. भरलेली बांडी रहाटाच्या वरच्या बाजूस आली, कीं, आतील पाणी लांकडाच्या पेटींत तुंबून तेथून ताडाच्या चोपेत पडे. रिकामी बांडी पुन्हां तोंड खालीं करून पाण्याच्या आशेनेंच, जणूं काय, माळेबरोबर विहिरींत उतरूं लागे. मधेंच एखाद्या वेळीं टोणगा थांबला, कीं, माळेच्या डाव्या बाजूच्या भरलेल्या बाड्या, आपल्या तळाच्या छिद्रांतून, पाण्याच्या धारा खालीं विहिरींत सोडीत. आणि त्या निस्तब्ध वातावरणातील विहिरीच्या पोकळींत, त्यांचा आवाज काहीं काळ घुमत राही!

जीवनक्रम चाकोरींतून ओढून नेणाऱ्या त्या समोरील दुबळ्या जीवाकडे, कमळावहिनी सहानुभूतीनें पहात होती; चोपेंतून खळखळत येणारे पाणी तिच्या हातातील घागरींत पडत होते. आणि त्यामुळे अगदी क्षणभरच तिच्या सुन्न मनांत एकदम कल्पना आली! ... 'तो टोणगा, तें रहाटगाडगे, त्या रित्या व पुन्हां भरणाऱ्या माळेतील बाड्या, हें चोपेंतून खळखळ वहात येणारे पाणी, भरत असलेली ही आपल्या हातातील रिकामी घागर, आपण स्वतः... या सर्वांत एक प्रकारचे अदृश्य संबंधच आहेत जणूं काय!'....

असल्या कल्पनेच्या ओघानें भरणाऱ्या मनाप्रमाणेच, हातांतील घागर भरून बाहर वाहूं लागताच, कमळामावशी एकदम भानावर आली; आणि भरलेली घागर कमरेवर घेऊन, ती निमूटपणें स्वयंपाकघराकडे वळली!

: ५ :

साजा हळूंहळूं जास्तच सांवळ्या झाल्या; गुरे पाणी पिऊन परतूं लागलीं. गोठ्यांतून धारांचा आवाज येऊं लागला. आणि तिकडे गुराची, समोर ठेवलेल्या घमेल्यातील खाण्यासाठीं, मारामारी सुरूं झाली!

आकाशांत एकाददुसरी चमकणारी चादणी, हळूहळूं पसरणारा एकाकी ढग,—पहाता पहातां तो पुढेंहि निघून जाई.

कडेवरील घागर पाणेऱ्यावर ठेवून, कमळामावशीनें चुलींतील लांकडें चाळवलीं. काच काढून, तिनें चुलीजवळच्या खिडकीवरील चिमणी पेटवली. काच पुन्हा लावताच, त्या धुरकट ज्योतींतून एकदम प्रकाश पडला व तिनें अभावितपणें दिव्याला नमस्कार केला.

तशीच मुग्धपणें मंदमंद पावलें टाकीत, ती माजघरांतील जिन्याखालीं गेली. तेथें ठेवलेल्या समईत, जवळच्या बाटलींतील दिवेल तेल घालून वात पेटवतांच, त्या मंद ज्योतीचा प्रकाश तिच्या सौम्य चेहऱ्यावर पडला; पण त्यामुळें भोंवतीं

हळूं हळूं दाटत चाललेल्या साजेचा अंधार मात्र तिला जास्तच उग्र वाटला! आणि म्हणून ती तशीच देवघराकडे वळली.

इतक्यात, घरातील सगळे पेटवलेले कंदील ठिकठिकाणीं ठेवून सदू, स्वयंपाक-घरात आला आणि हातातील कंदील खालीं उंबऱ्याजवळ ठेवता ठेवतां, तो एकदम थबकून कमळामावशीकडे पहात म्हणाला, "वनी, ह्ये बघा पत्र पडलं व्हत, सोप्यात बैठकीवर!"

कमळामावशीने देवाजवळ पेटवलेल्या समईची वात पुढे सारता सारतां, चमकून मागें वळून, त्याच्याकडे एकदा प्रश्नार्थक दृष्टीने पाहिलें. व घाईघाईने आपल्या हाती घेतलेल्या पत्राकडे, समईच्या थरथरत्या उजेडात, गागरलेल्या नजरेनें पाहून ती पुटपुटली, "कोणाचें पत्र रे हे?"

कमळामावशीला, आपल्या पतीच्या आजच्या साऱ्या दुपारच्या मुग्ध हाल-चालीचे कारण, आता मात्र चटकन समजून आलें.

वासुदेवरावभाऊंच्या असल्या वागणुकीची, तिला गेलीं अनेक वर्षे संवय झाली होती. तरी आज दुपारच्या डाकेला आलेल्या त्या शरदच्या पत्रातील बाबांच्या आजारीपणाची हकीगत, आतापर्यंत त्यांनीं आपल्याला कळवूं नये, व शेवटीं एकाएकीं समाचारासाठी समक्षच तिकडे निघून जावें, याबद्दल तिच्या मनाला अतिशय टोंचणी लागल्यावाचून मात्र राहिली नाहीं.

—आणि सदूनें तें पत्र आतां आणून दिलें नसते तर? कदाचित् वासुदेवराव भाऊ परत येईपर्यंतहि ही बातमी तिला समजली नसती.

पत्र वाचून झाल्यावर, याच विचाराने, तिनें आपली प्रेमळ नजर सदूकडे फिरविली; तोही पत्रातील बातमी ऐकण्यासाठीं थाबला होता. तेव्हां त्याला उद्देशून ती अगदीं सौम्यपणे म्हणाली, 'दुसरे काहीं नाहीं रे! मुंबईला बाबा थोडे आजारी आहेत' आणि देवासमोरील समईची वात पुन्हां सारखी करून ती तुळशीकडे जाण्यासाठीं विहिरीवरील गच्चीकडे वळली.

: ६ :

रहाटाबरोबरच त्याची करकर थाबली होती. भरलेल्या बाड्यातील धारांचें पाणी विहिरीत गळून, त्या साजेच्या शात वेळीं, आंतील काळोख्या पोकळींतून एक प्रकारचा घुमणारा आवाज बाहेर येत होता.

डोळ्याचे टोपडे सोडून धर्मानें रेड्याला कुंडीवर आणलें होतें व धर्मा, त्यानेंच काढलेल्या पाण्यानें त्याला धूत होता. तें मुकें हतबल जनावर, आपले

वाटोळे वाटोळे फिरून लाल झालेले डोळे, कावरेबावरें, गरगर फिरवीत होतें!

"स्टेशनावरून गाडी परतली नाहीं कारे अजून, सदू?" कमळामावशीनें तुळशीला प्रदक्षिणा घातल्या व ती डोळे मिटून नमस्कार करता करता म्हणाली.

वास्तविक मुलाच्या वाटेकडेच तिची सारी दृष्टि लागून राहिली होती!

"घुंगर वाजताहेत वैनी! गाडी पहिल्या पाणेरीजवळ आली असेल!" जागच्याजागीं थोडा थबकून, सदू कानोसा घेऊन म्हणाला, व निजावयाच्या खोलींत बिछाने घालावयास निघून गेला.

गोवाऱ्यानें दूध काढून चरव्या आणताच, त्यातील गाईचें अर्धा शेर दूध, कमळामावशीने मालेनें आणलेल्या भाड्यात ओतले व तिला हाक मारली.

ती घरात कामासाठीं म्हणून वावरत होती खरी, पण तिचं सारं लक्ष मात्र, घुंगुराच्या हळूहळू मोठ्या होणाऱ्या आवाजाकडेच होतें.

जवळ जवळ येणाऱ्या त्या सारवट गाडींतच, गेल्या अठरा वीस वर्षांचा, तिचा सारा संसार साठला होता. हो, तिच्या मातृहृदयाच्या, भविष्यकाळच्या सगळ्या आशा, त्याभोंवतींच घोंटाळत होत्या!

: ७ :

झाप्यांत स्वारीची गाडी शिरूं लागली. कमळामावशी अगदीं लगबगीनें पुढील दारी आली. सुगंधाहि तेवढ्यातच शेजारून घरीं येत होती. बैल थाबले. विनायक, कुंदा, सुधीर खालीं उतरलीं.

जरा घाबरल्या घाबरल्याच, मावशीनें कुंदेला प्रश्न केला, "अन् वासंती गऽ?"

"अग बडबड करून करून शेवटीं गाडींतच झोपलीय् ती, आई!" कुंदा, विनायक, एकदमच म्हणालीं.

"लबाड आहे हं पोर, पक्की! झोपायला जाते वाटतं गाडींतून? बरं चला पाहूं!" कमळामावशी मुलाना सूचना देत देत स्वयंपाकघराकडे वळून म्हणाली, "झोपलीय् ना ती?-- हळूं आण रे विनू, तिला उचलून. चागलं मानेखालीं धर तिच्या! नाहीं तर मान लचकवशील तिची."

"एऽ आईऽगऽ!" इतक्यांत, वासंतीला उचलून घरांत शिरतां शिरतां, विनायक म्हणाला.

मुलें संध्याकाळीं खेळून बागडून घरीं सुखरूप आल्यावरचा, मातृहृदयाचा आनंद, कमळामावशीलाही वाटत होता. पण तरीदेखील, त्या दिवशीच्या वासुदेवरावभाऊंच्या एकाएकी जाण्याबद्दलचे ते मघाचे विचार, तिच्या मनाला सुन्न केल्यावांचून रहात नव्हते!...

आणि म्हणूनच, कमळामावशी विनूला कांहींशा त्रासिक स्वरानें घरांतूनच उत्तर देत म्हणाली, " अंऽऽ? आई ऐऽकतेय् !—पुढें बोल ! "

" भाऊंनीं आज येणार नाहीं म्हणून सांगायला सांगितलं आहे तुला. मुंबईला गेले आहेत. " विनायकानें, वासंतीला बिछान्यावर ठेवून, स्वयंपाकघरांत येतां येतां म्हटलें.

" उद्यां रातच्या गाडीवर स्वारीची गाडी बोलावलीय्, वनी. " केळीं, बटाटी, साखरेची पुडी, वगैरे स्टेशनावरून आणलेलें सामान देवाजवळ ठेवीत, शंभू गडी हळूंच म्हणाला.

" बराय्! समजलं! त्यात कांहीं नवीन नाहीं ! " कमळामावशी आधणांत तांदूळ वैरत, आपलें दुःख, राग सारे आंतल्या आत दडपून, किंचित त्राग्यानें म्हणाली, " आतां हातपाय धुवून या बघूं सारीं!—अन गंधा, अंगणांतला कंदील बारीक करून पुढलं दार लावून ये बरं ! "

आईच्या स्वरातील काहींशी कठोरता जाणवून, मुलामध्यें क्षणभरच शांततेचें वातावरण पसरलें.

इतक्यांत, ... " ए, आईऽ आईऽ! आज आमीं इंज्यन पायलं ग! कश्य ज्यातं ठाऊक आहे ?—झक्–झक्–झक्–झ्यक्! " सुधीरची हातवाऱ्यासकट चर्पटपंजरी सुरूं झाली होती.

कमळामावशीहि पटकन् भानावर आली. व आपण मुलांबरोबर उगीच कठोर वागलों असें वाटून, तें पुन्हां सांवरण्यासाठीं, भाकरीकरितां पीठ मळतां मळतां, सौम्यपणें हंसून त्याच्याकडे पहात, किंचित कौतुकानेंच ती म्हणाली, " खल्लंऽच ! "

तिच्या चेहेऱ्यावरील सौम्य हास्य व तिच्या त्या उद्गारांतील लाडिक प्रेमळपणा जाणवतांच, पूर्वीचें वातावरण बदललें...विनायक येऊन आईशेजारींच चुलीजवळ बसला. कुंदा केळीच्या पानाच्या शिरा काढूं लागली. गंधा केर काढूं लागली.

" मालूच्या आईकडे, आज मी मोराच्या पिसाऱ्याचे पुढले टाके शिकलें गऽ आई ! " पाटपाणी ठेवतां ठेवतां सुगंधा आईला सांगूं लागली. आणि विनायक, कुंदा...

प्रत्येकाकडे, आपल्या आईला सांगावयाचें असें, कांहीं तरी होतेंच. आणि सर्व ऐकून घेऊन, त्यांना उत्तरें देण्यांत, कमळामावशी वरवर जरी गढली होती, तरी तिचें सारें लक्ष मात्र, त्या दिवशीं झालेल्या एकाच प्रकाराकडे होतें.

त्याक्षणीं, तिलाहि आपल्या मनांतलें पुष्कळसें कोणाला तरी सांगावेसें वाटत होतें.
पण त्या मुलासारखी तिला आई नव्हती!—

: ८ :

मुलें जेवल्यावर स्वतः चार घास खाऊन, कमळामावशीनें धर्मा म्हाताऱ्याला राहिलेली भाजीआमटी दिली. कुत्र्याचा भात त्याच्या स्वाधीन केला. सकाळच्या विस्तवासाठीं, मातीच्या शेगडींतील तुसांत तिने चार निखारे टाकले. व दूध दह्याची सारी झाकापाक केल्यावर, पोतेऱ्याचे भाडे पुढे घेऊन, चुलीजवळ बसल्या बसल्याच, ती पोतेरें काढू लागली.

सर्वत्र शातता पसरली होती. त्यामुळे पोतेरे काढता काढता तिच्या मनांत इतका वेळ सारखा सलत असलेला एकच एक विचार पुन्हां डोकावला, "आपली तरी या घरात अगदीं या पोतेऱ्याइतकीच किमत आहे जणूं! नाहीं का?"

: ९ :

पण कमळामावशीला तसें पाहतां काय कमी होतें? त्या खेडेगांवांतील सर्वात श्रीमंत घराची ती मालकीण होती. घरात कपडालत्ता, धान्य विपुल होतें. लहान मोठ्या मुलांमुलींनीं घर सगळें गजबजलेले होतें!... आणखी सुख सुख तें दुसरें काय असते?

आणि खरोखरच! त्या घरांत कमळामावशीला प्रिय अशीं जितकीं माणसें, तिला प्रिय अशा जितक्या वस्तु होत्या, तितक्या, तिला जगांत दुसऱ्या कोठेंही नव्हत्या! हो, त्याबद्दल तिलाही संशय वाटत नव्हता. तिचें आपल्या मुलांवर अत्यंत प्रेम होतें. आपले पतिही तिला प्रिय नव्हते असें नव्हे...

लग्नानंतर, वासुदेवरावभाऊबरोबर तिनें घालविलेल्या, गेल्या वीस वर्षांतील त्याचा संसार! तो तिनेंच वाढविला होता. त्याच्या सुखानें आपण आनंदावें, त्याच्या दुःखांत आपण वाटेकरी व्हावें, त्यांची लहान मोठीं संकटें आपलीं मानावींत!... अगदीं प्राणांतिक वेदना सहन करून, तिनें एक एका मुलाला जन्म दिला होता; त्यांचें संगोपन करतांना, तिनें अनेक खस्ता खाल्ल्या होत्या.

आणि तींच आपलीं मुल, आतां मोठीं झालीं... आपल्याला समजत नाहींत अशा शहाणपणाच्या चार गोष्टी आपल्याला शिकवूं लागलीं, हें पाहिलें, म्हणजे तिला खरोखरच कौतुक वाटे. आपल्या मुलांकडे बोट दाखवून 'हीं वासुदेवरावभाऊंचीं मुलें,' असा त्यांच्या एकट्याच्या नांवाचाच कोणी उल्लेख करून जरी म्हटलें, तरी तिला आनंदाच्या गुदगुल्या होत!

आपण कोणावर कसले उपकार केले आहेत, अशी तिला कधीं भावनाच .. जाणीवच्च होत नसे!—

: १० :

पण तरी—

तरीही प्रत्येक माणसाला स्वतःच्या अशा आकांक्षा, अपेक्षा, असतातच्च कं नाहीं? तशा त्या कमळामावशीलाहि होत्या.

ज्या जबाबदारीनें आपण संसार चालवीत आहों, त्या जबाबदारीनेच्च वासुदेवरावभाऊंनीहि घरात आपली किमत ठेवावी, ही तिची साधीसुधी आकांक्षा. आपल्या प्रत्येक सुखदुःखातून वाट काढताना, त्यानीं तिला विश्वासांत घ्यावे. तिचा सल्ला विचारावा, निदान तिला आपण काय करीत आहों तें सुचवावे; हीच तिची अपेक्षा!...

पण वासुदेवरावभाऊंची वागण्याची पद्धती कांहीं न्यारीच! कोणत्याही बाबतींत, आपल्या पत्नीचा सल्ला घेणे, भाऊच्या मनाला कमीपणाचें वाटे; आणि या त्याच्या स्वभावाला अनुसरून त्यानीं निर्माण केलेली एखादी परिस्थिति, अकल्पित व अचानकपणे कमळामावशीसमोर उभी राहिली, कीं, त्याच्यावरील प्रेमामुळें व दोन्हीं कुलाविषयींच्या अभिमानामुळें, तिनें स्वतःची मानखंडणा सोसूनहि, ती निस्तरण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.

हेंच ... असलेच ... तिचें आजपर्यंतचें वैवाहिक जीवन झालें होतें!

: ११ :

महिन्यापूर्वीचीच गोष्ट! त्याच्या रहात्या घराशेजारची त्याची मोकळी जागा... केव्हां विकली, कांय, तिला पत्ताही नव्हता! तेथें एके दिवशीं खोदकाम सुरू झालें. दगड चुना पडूं लागला, विटाची भिंत रचली; तेव्हा तिचा विनूच्च का कोणीसें तिला म्हणाले, "आपली जागा कनी आई, चागली रक्कम आली म्हणून, स्टेशनावरच्या त्या खोजाशेटला विकली. तो आता, तिथे लहानसें घर बांधणार आहे." त्याने बोलतां बोलता सहज म्हणून हें तिला सागितलें; पण तो निघून गेल्यावर, कमळामावशीनें मात्र, मान बाजूला फिरवून, आपले डोळे पुसले.

एखादा नवा गडी घरांत काम करूं लागावा, आणि मग त्याच्याचकडे चवकशी करिता तिला समजावें, कीं, त्याच्या लग्नाला वासुदेवरावभाऊंनीं पैसे दिले आहेत!...आणि आतां तो परतफेडीसाठीं नोकरीला आपल्याकडेच राहिला आहे!! आहेत त्या निरुपयोगी गड्यात अशी एखादी अचानक भर पडल्याचें,

कमळामावशीनें त्या गड्याकडूनच प्रथम ऐकलें, म्हणजे तिला अतिशय दुःख होई!

इतर कौटुंबिक गोष्टीविषयीं तर काय? प्रत्यक्ष पहिल्या मुलाच्या—तिच्या विनूच्या मुंजीचाच प्रसंग! पण छापलेल्या कुंकुमपत्रिका, एके दिवशीं चुकून हातात पडेपर्यंत, तिला ठरल्या मुहूर्ताची दादहि नव्हती. आणि मग त्याच दिवशीं, लाडू, चिवडा, चकल्याचें फर्मान सुटले. तुपाचे डबे, कणीक, रवा, बेसन, सारे सामान भराभर एका खोलीत जमूं लागले.

इतराना क्षुल्लक, क्वचित असंभवनीय दिसणारे, हे असले अनेक प्रसंग कमळामावशीच्या आयुष्यात प्रत्यक्ष घडले होते. आणि तेच तिच्या मनाला नेहमीं विशेष जाचणी करीत.

पण मग, सर्व अपमान पोटांतल्या पोटांत गिळून, आपल्यावर नवीन नवीन पडलेल्या या साऱ्या जबाबदारींतून हंसतमुखाने पार पडण्याचा, ती बिचारी मोठ्या दक्षतेनें आटोकाट प्रयत्न करी.

: १२ :

पण मग, तसें म्हटलें तर, वासुदेवरावभाऊहि वाईट नव्हते! निदान त्याच्या बाबतींत तरी, वडिलार्जित इस्टेटीची केवळ चैनींत उधळपट्टी होणें शक्य नव्हते. घरात पाहुण्यासाठीं दोन तीन धोतरजोड्या पडलेल्या असत, पण त्याचा स्वतःचा वेश साधा बावळाच! एकदा दोन कोट केले आणि एक टोपी घेतली, कीं, त्यांना दोन तीन वर्षे बघावे लागत नसे. एका छत्रीवर ते चार पाच पावसाळे सहज काढीत. मलमलीच्या साध्या सैल सदऱ्यावर, दोहोंपैकीं एखादा कोट चढवून आपल्या जाड्याभरड्या धोतराचा ते कधीं वाकडातिकडा काचा मारीत, तर कधीं ब्राह्मणी पद्धतीचा सोगा सोडीत. घरात मोटर नाहीं, तरी बैलाच्या दोन सारवट गाड्या होत्या. पण, त्यांचाहि ते स्वतःसाठीं क्वचित् उपयोग करीत. घरापासून स्टेशन तीन साडेतीन मैल होतें आणि तितके ते संध्याकाळला सहज चालून परत येत. बरें, नाव घेण्यासारखें त्यांना एखादें व्यसन म्हणावें, तर तेंहि नव्हतें!

स्वभाव तर अत्यंत प्रेमळ. रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या एखाद्या वाटसरूला जरी ठेंच लागली, तरी त्यानीं, पाण्याचा तांब्या, कापूस आणि आयोडीनची बाटली घेऊन धावावें. आल्या गेल्या भिकाऱ्याला भिक्षा घालण्यासाठीं, मामासाहेबांच्या वेळेपासून ओटीवरील कोंपऱ्यांत ठेवलेलें तांदळाचें मोठें पिप, अजूनहि आठवड्यातून दोनदां भरावें लागे. एखादा तरी पाहुणा त्यांच्या घरीं पडलेला नाहीं असा एक दिवसहि जात नसे.

वडिलांपासूनच, सावकारींसाठीं, वारल्याकोळयांत त्यांच्या इतक्या लहान लहान रकमा पडलेल्या; पण भाऊकडून कधीं कोणाला शिवीगाळ नाहीं, कीं, माराहाण नाहीं! आणि त्यामुळें, तेहि, पैसे नसले तरी आपण होऊन, शेटला तसें सांगावयास येत. कधीं फारच प्रसंग आला, तर आपसांत तडजोड व्हावी, हीच भाऊंची इच्छा असे; कारण कोर्ट–कचेरीला ते स्वतःच घाबरत, तर दुसऱ्याना तरी कोठून त्यांत खेंचणार ?

घरच्या गड्यांशींहि त्याची तसलीच वागणूक ! पांच सहा गडी होते; पण साऱ्यांना काम कमी पडावे म्हणून, केर काढणें, मुलामाणसाचे कपडे स्वच्छ धुणें, असलीं वरकामे, ते स्वतःच आपण होऊन करीत. त्याचा तो तर आघोळी-पूर्वीचा नेहमींचाच उद्योग होऊन बसला होता ! आपण खातों तें गड्याना मिळावें, हीहि त्यांची मोठी इच्छा ! त्याना तसला भेदभाव नको होता. पण त्याच्या असल्या सौजन्याच्या दुरुपयोगामुळेंच, गड्यांपकीं बहुतेक उघड उघड निरु-द्योगी, आळशी व थोडेफार चढेल दिसत; पण त्याना दुखवूं नये म्हणून, भाऊ उलट तिकडे दुर्लक्षच करीत.

आणि या साऱ्या गोष्टींच्या मुळाशीं, त्याची दुसऱ्याला सुखी करण्याचीच उत्कट इच्छा असे ! मात्र तसें करतांना, आपल्या अगदीं निकटच्या व्यक्तींना त्रास होतो,...दुःख होतें, यांकडे किंवा काटकसरीच्या अगर इतर श्रेष्ठ उद्योगांकडे त्यांचे मुळींच लक्ष नसे ! किंबहुना त्यांना त्या गोष्टीचे महत्वहि वाटत नसे !

: १३ :

आतां, आपल्या घरीं पाहुणे येऊं नयेत, अशी कमळामावशीचीहि इच्छा नसे. कोणी आला, तर वेळांत वेळ काढून, आपल्याला साधतील तितके चार चांगले जिन्नस, हंसतमुखानें पोटभर वाढण्यांत, तिलाहि आनंदच वाटे. पण कधीं आयत्यावेळीं चार पाहुणे येऊन ताटावर बसावेत, तर कधीं सर्व जेवण तयार करून ताटें मांडल्यावर, आयत्या वेळीं सर्व निघून गेल्याचे समजावें!...म्हणजे तिला किती दुःख होई ?...आणि विशेषतः, भाऊंची गप्पाकुचाळ्यांनीं हीन कर-मणूक करणारे हे कर्तृत्वशून्य पाहुणे, आठवडेच्या आठवडे तळ देऊन असं करतांना पाहिले, म्हणजे तर तिची तिडीक अगदीं मस्तकाला जाई !

आपल्या घराला शोभतील असे गृहस्थाश्रमधर्म किंवा आतिथ्यधर्म, आपल्या-कडे पाळले जाऊं नयेत, याचें शल्यच मावशीला नेहमीं बोंचत असे. त्रास सोसा-वयास घरांतील मंडळी; त्यापासून मिळणारा कर्तृत्वशून्य आनंद, सुख, मोठेपणा,

यांचें मात्र मालक आपण, ही वासुदेवरावभाऊंची, व त्यांच्याकडे येणाऱ्या बऱ्याचशा पाहुण्याची, अगीं मुरलेली वृत्ति पाहिली, भाऊंच्या दुबळ्या सौजन्यामुळे त्याच्या कुळापैकीं बरेच बुडवे निघाले, प्रेमळपणाच्या नावाखालीं गड्याच्या निरुपयोगी, निरुद्योगी फौजेचा कामचुकारपणा हाच फक्त धंदा होऊन बसला, म्हणजे मात्र कमळामावशीच्या जीवाचा मनस्वी संताप होई. आपल्याला झालेल्या सगळ्या नाहक त्रासाची तिला आठवण होई व ऊर दुःखाने अगदीं भरून येऊन, तिला शेवटी वाटे, आपले आयुष्य असेंच...अगदीं व्यर्थ !

हो,...आपल्या कुटुंबासाठीं—आपल्या माणसासाठीं सारें करावयाचें म्हटलें... तरी माणसाला स्वतःच्या अशा काही तरी इच्छा आकांक्षा असतातच ना? ... आणि त्याच्या प्राप्तीचा अभाव पाहूनच मनुष्य जास्त असुखी होतो.

कमळामावशीचेंहि तसेंच होतें. ती, शक्य तों स्वतः सुखी असल्याचें लोकाना वरवर दाखवी, सभोंवर आनंदी व प्रेमळ वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करी. त्यामुळे अनेकाच्या हृदयाच्या अगदीं खोल कप्प्यातही तिला मोठे जिव्हाळ्याचे स्थान होतें.

पण तरीहि, तिच्या चेहेऱ्यावरची ही उदासीनतेची स्पष्ट छटा, काहीं केल्या पुसली मात्र जात नसे !

: १४ :

असलेच आपल्या आयुष्यातील लहानमोठे प्रसंग, तिला चुलीजवळ पोतेरे काढता काढता, आज आठवत होते.

शेवटीं, एक दीर्घ निःश्वास सोडून ती उठली. काहींशा थरथरल्या हातानें तिने स्वयंपाकघराची कडी लाविली. माजघरातील जिन्याखालच्या समईची वात, तिनें हिराच्या काडीनें मागें सारून, रात्रभर पेटत ठेवण्यासाठीं बारीक केली व ती दिवाणखान्यात आली.

भितीवर लटकलेल्या घड्याळाची टकटक नेहमीप्रमाणेच चालू होती. तिनें ताब्याभाडें व दुधाची पातेली कोपऱ्यात ठेविली आणि झोपावयाच्या खोलींत वाकून पाहिले, तोच, घड्याळानें नवाचे ठोके दिले.

दारातील कंदील थोडा मोठा करून, ती हळूच खोलींत शिरली. सगळीं मुलें गाढ झोपल्यामुळे, तेथें अगदीं सामसूम झाली होती.

एका कोपऱ्यांत, तिजोरीजवळ उसें करून, विनायक झोंपला होता. वाऱ्यानें उडालेला त्याचा सदरा नीट करीत, तिनें त्याच्या अंगावर दुलई सारली. त्याच्या

निद्रित चेहेऱ्याकड पाहतां पाहतां, तिचें हृदय भरून आलें. यंदांच तो मॅट्रिकला बसल्या पासून, त्याच्या भवितव्यावर तिच्या साऱ्या आशा-आकांक्षा खिळून राहिल्या होत्या.

थेट दुसऱ्या कोपऱ्यात, खिडकीजवळ छोट्या वासंतीच्या पाटीवर हात ठेवून, सुगंधा निजली होती. लोकाना ती मोठी दिसत असली, तरी मातेच्या हृदयाला ती तेरा वर्षाची पोरदेखील अगदीं लहानच वाटे. झोपेत बाजूला झालेला तिचा पदर नीट करून, कपाळावर आलेले तिचे केस मागे सारण्यासाटीं, कमळा-मावशीं खालीं वाकली.

दिवसभर पुंडाई करणारा, व शहाणपणाच्या गोष्टी शिकविणारा, सुधीर, ढुगण वर करून, गुढघ्यावरच झोपला होता. त्याचे पाय सरळ करून, त्याला तिने पुन्हां झोपविले, व त्याचे फुगीर गाल अगदीं हलक्या हाताने कुस्करून, त्याच्या व गाढ झोपलेल्या वासंतीच्या अंगावर, प्रेमाने हळूच शाल ओढली.

तिथे कोठे कुंदा झोपलेली दिसेना, म्हणून ती क्षणभरच एकदम चमकली व चटकन् बसल्या जागेवरून उठली.

पलीकडच्या खोलींत दिव्याचा उजेड दिसत होता. पाट वाकवून दाराजवळच, कुंदा काहींतरी लिहित, पाठमोरी बसली होती. कमळामावशी हळूहळू पावले टाकीत, तिच्यामागे जाऊन उभी राहिली. समोरचा पुस्तकाचा पसारा व लिहि-ण्यात गुंतलेल्या कुंदेचा गंभीर चेहरा पाहून, कमळामावशीचे हृदय कौतुकाने अगदीं गहिवरले. ती हळूच खाली वाकली, व कुंदेच्या पाटीवरून हात फिरवीत, मृदु आवाजाने, ती तिच्या कानाशीं कुजबुजली " रात्र झाली ऽ बाळ !...... झोपायचे नाही का तुला ? "

आपल्या पाटीवरील आईच्या त्या प्रेमळ हाताने, कुंदेचा चेहरा फुलून आला. कमळामावशीकडे, झोपेने भरलेल्या डोळ्यानीं पहात, ती पुन्हा लिहूं लागून, हसत म्हणाली, " अग, सकाळची शाळा ऽ आई उद्या !...एवढ्या धड्याचा शब्दार्थ लिहून काढावयाचा होता !...झालंच आता ! "

आणि मग, राहिलेल्या तीनचार ओळी लिहून झाल्यावर, कुंदानें वही बॅगेत घातली; व ती उचलून कोपऱ्यात ठेवल्यावर, आपल्या बिछान्याकडे जाता-जातां ती कमळामावशीला म्हणाली, " ए आईग, सकाळी मला जरा लवकर उठव हां. आणखी थोडा अभ्यास राहिलाऽय."

" हो, जा झोप आता. " कमळामावशी आपला प्रेमळ कटाक्ष तिच्यावर टाकून, तिच्याबरोबर चालत चालत तिच्या बिछान्यापर्यंत जाऊन म्हणाली.

तिची हीं मुलें म्हणजे तिला आपलें सारें सर्वस्व वाटे. हीं एकाहून एक मुलें, सुखानें शांत झोंपीं गेलेलीं समोर दिसत होतीं, तरी, विनायकापूर्वीच्या तिच्या मुलाच्या अकालीं मृत्युमुळे, तिच्या अंतःकरणावर झालेला तीव्र व्रण मात्र, काही केल्या भरून निघाला नव्हता !

: १५ :

त्या लहानग्या खेडेगांवात, इतक्यातच, सगळीकडे, सारी सामसूमहि झाली होती! घराबाहेर पसरलेला काळोख, कुत्र्याचे भुकणे व त्याला लाबून मिळ णारा अस्पष्ट प्रतिशब्द, झाडाच्या पानाचे सळसळणे,.. गोठ्यातील एखाद्या ढोराने, आपले डोके खाजविताना केलेला शिंगाचा खाटखाट आवाज ... ...

आजूबाजूच्या शांत वातावरणाला ते सगळे जास्तच स्तब्धता ... गांभीर्य आणीत होते. मधूनच लांबच्या कोल्हेकुईचा अस्पष्ट आवाज मात्र वाऱ्याबरोबर कानावर येऊन आदळे.

इतक्यात, पुढील दाराची कडी वाजली. बसल्याबसल्या घड्याळाच्या डुल णाऱ्या लोलकाकडे अशी शून्य दृष्टीने कमळामावशी पहात होती; ती एकदम दचकून बसल्या ठिकाणी उभी राहिली व दाराकडे वळून म्हणाली "कोण?"

" मी ऽ वैनी! झोपलात का?" सदूनें बाहेरून ओ दिली.

" नाही रे; थांब आले हं." बाहेरच्या दाराची कडी काढून, तिने सदूला सोप्यात घेतले व आपण पुन्हा आत येऊन दिवाणखान्याचे दार लावले.

भाऊ घरी नाहींत हे जाणून, आपले घरचे सगळे काम आटोपल्यावर, बाकीच्या गड्याची बेफिकीरी लक्षात न घेता, आपण होऊनच, वहिनीच्या सोब तीला येण्याचा सदूचा नेहमीचा सराव होता. त्याने बरोबर आणलेली आपली घोंगडी झटकून लादीवर पसरली, व त्यावर आपले अंग टाकले. ...

" गौरी बाळंतपणाला गेली, ती आली नाही कारे अजून, सदू?" कमळामावशीने, त्याला जिव्हाळ्याच्या वाटतील अशा त्याच्या घरगुती गोष्टींना, काही वेळानें आपण होऊनच, सहानुभूतीपूर्वक सुरवात केली.

" नाहीं! येईल आता पंधरवड्यानें." वळलेली वावली चकमकीने शिलगा- वीत, पडल्या-पडल्याच, सदूनें उत्तर दिले.

आणि ती संपेपर्यंत, सदू आपल्याच बायकामुलांच्या सुखदुःखाच्या गोष्टी, वहिनीला मोकळेपणे सांगत होता. मावशीही, तितक्याच तत्परतेने तें ऐकून, त्याला नवे नवे प्रश्न विचारीत होती.

शेवटीं, बोलतां बोलता सदूचा केव्हा डोळा लागला, हें त्यालासुद्धां समजलें नाहीं.

थोड्या वेळानें कमळामावशीने उठून मधल्या खिडकींतून पाहिलें, तो सदू स्वस्थ झोपलेला होता. त्याच्या दमल्याभागल्या चेहेऱ्यावरील करुण भाव, तिला काळोखात दिसत नसला, तरी त्याची कल्पना मात्र करतां येत होती.

: १६ :

सदू त्यांचा इमानी गडी! भाऊ व वहिनी या सर्वांच्या अगदीं विश्वासातला व निकटवर्ती. जणूं काय, त्याच्या घरांतला एखादा नातलग मनुष्यच!

आणि घरातलेंच मनुष्य म्हटले, कीं वासुदेवरावभाऊंच्या राज्यात त्याची आबाळ सर्वांत जास्त! सदू, दारातल्या साऱ्या गड्यांत चलाख, कामसू आणि विश्वासातला; पण म्हणूनच त्याच्यावर साऱ्या कामाचा बोजा पडावयाचा. इतर गडी कामचुकार, निरुद्योगी असलेले भाऊंना पत्करे!

स्वस्थ झोंपलेल्या सदूच्या श्रमित चेहऱ्यावर, तसा प्रेमळ मातेचा कटाक्ष टाकताना, त्याच्या कष्टाळू दिवसाच्या साऱ्या धडपडींचे चित्र, कमळामावशीसमोर उभ राहिलें. आणि त्यामुळे, त्याच्या अंतरात्म्याला त्यावेळीं जणूं काय वाटत असलेला, 'चला, एका दिवसातून तर पार पडलों एकदांचा!' हा भाव, तिला त्याच्या निद्रित चेहऱ्यावर प्रत्यक्ष दिसू लागला!

तिला वाटले,...आपलीहि स्थिति अशीच नाही कां? आपला काय, सदूचा काय, मोठा गुन्हा असेल, तर तो हाच कीं, आपण आपल्या पतीवर किंवा सदू आपल्या धन्यावर अतिशय प्रेम करतो.

पण त्याचे त्याना काहींच नाहीं!

त्याची आपल्याविषयीची किंवा सदूविषयींची बेफिकिरी, त्यामुळेंच जास्त वाढलेली!

: १७ :

पण दुसऱ्याच क्षणीं, कमळामावशीचें मन तिला म्हणूं लागलें,... 'कसेंही असलें तरी आपले पति मनाचे दुष्ट नव्हेत, नीच नव्हेत, तर दुबळे आहेत. भोंवतालच्या साऱ्याच लोकांना सुखी करावेसें त्यांना वाटतें; आणि म्हणूनच, ते ज्याना आपले समजतात त्याच्याविषयीं ते जास्तच बेफिकीर होतात. आपल्या भावना त्याना सवश्रेष्ठ वाटल्या, कीं, ते दुसऱ्याचे मन साफ विसरतात'....

त्यावरून तिला आठवलें. एखाद्यानें रक्कम मागितली तर ती देण्याची मनांत इच्छा नसतांहि, त्याला वाईट वाटेल म्हणून, प्रथम भाऊंनीं थापा माराव्यात. व त्याला

दुखविण्याचें आजचे उद्यांवर ढकलावें. शेवटीं, ' पैसे द्या ' म्हणून एखाद्याला हुंडी देऊन एखाद्या ओळखीच्या सावकाराकडे पाठवावें, आणि लागलीच, ' देऊं नका ' अशी, मुद्दाम मनुष्य पाठवून मागाहून चिठी पाठवावी. अशा प्रसंगीं, शेवटी त्याना स्वतःलाच हास्यास्पद होण्याची पाळी येई, त्याची वाट काय ?

असलें काहीं कमळामावशीला समजले, कीं, तिला अत्यंत वाईट वाटे. भाऊंची कींवहि येई. पण नंतर तिला वाटे, त्याला ते तरी काय करणार ? स्वभावधर्मच पडला त्याचा तसा ! —

चुकारपणा, आळस करणारे त्याचे दुसरे सगळेच गडी; पण केवळ त्याना वाईट वाटू नये, म्हणून सर्वांची हजेरी घेण्याचे धैर्य भाऊंना होत नसे. आणि त्यामुळे सदूला मात्र जास्त कामाचा बोजा पडला, तरी त्याना चाले! का ? ' तो आपलाच आहे ! '

येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांच्या सुखसोयी पहाव्यात, त्यानी आपल्याला मोठे म्हणावे, ही भाऊंची इच्छा; पण त्यापासून घरात कमळामावशीला उघड उघड त्रास होत असला तरी त्याना वाटे, ' झालं काय मोटंसं ? आपलीच बायको आहे ती ! '

असले विचार मनात आले, कीं मग मात्र मावशीला वाटे, माणसाने असे नेहमीच साफ दुबळे राहाणे चागले का ?

: १८ :

आजचीच गोष्ट! बाबा मुंबईला आजारी आहेत, म्हणून भाऊचे हळवें मन-येथे किती तळमळले. शेवटी, त्याना समक्षच पाहून यावे या विचारानें, त्याना संध्याकाळपर्यंत घरींहि राहवेना!

कमळामावशीनें एक निराशेचा निःश्वास टाकला. तिच्या मनात विचार येत होते, " पण माझी आठवण मात्र, त्याच्या दुबळ्या स्वयंपूर्ण मनाला झाली नाही; मला जरासुद्धा न कळविता, ते आपले तडख एकाएकी तिकडे निघून गेले. आपल्या भावनाना शब्दात व्यक्त करणे, त्यात दुसऱ्याला—आपल्या बायकोलाहि—वाटेकरी करणें, त्याच्या भीरु मनाला साधूं नये ना ? आणि मागून मुलाबरोबर, गड्या-बरोबर निरोप पाठवितात! ...... हं ऽ ऽ "

आपले पति मनानें दुष्ट नाहींत, पण त्याच्या हळव्या व घाबऱ्या मनाला थोडा देखील कठोरपणा नाहीं; आणि म्हणूनच, आपल्या आयुष्यात असें स्वतःला दुःखद वाटणारे लहानसहान प्रसंग येतात... या विचाराने कमळामावशीला शेवटीं

त्यांतल्या त्यांत क्षणभर समाधानच वाटलें, व तिनें एक मोठा निःश्वास टाकला त्यांच्या असल्या तुसड्या वाटणाऱ्या वर्तनाच्या बुडाशीं, त्यांच्या दुबळ्या प्रेमळ पणाचा अतिरेकच आहे, या विचाराने थरथरल्यासारखें होऊन, तिला मागील काहीं प्रसंग सहजासहजींच आठवले.

भाऊ एकदा आजारी असतानाचा तो प्रसंग! ...... गृहिणीचीं नेहमींचीं सारीं कामे संभाळून, पुन्हा त्यांच्याजवळ त्याची शुश्रूषा करीत बसावयाचें नवें कर्तव्य तिजकडे आलें होतें; भाऊ तर आपल्याजवळच सारखें बसून राहावयास तिला सांगत असत. ती कामाला म्हणून क्षणभर उठून बाजूस सरूं लागली, तरी त्याचे डोळे पाण्यानें भरून येत, ते कावरेबावरे होत! आणि याच त्याच्या किंचित् दीन चेहऱ्याकडे पाहिलें, कीं, पुढला घरकामांत राबून जावयाचा सारा दिवस उजाडायाचा असूनही, रात्री मागून रात्री ..... शेकण्यासाठीं किंवा जवळ बसून जाग्रण करण्यासाठीं, मावशी तत्परतेनें तयार असे.

पण उलट, दुसऱ्या एका वेळीं ती आजारी होती; तोहि प्रसंग तिला आठवला! त्यावेळीं भाऊंनी दोन तीन डॉक्टर आणले होते; अरविंदभावोजींना मुद्दाम मुंबई-हून बोलाविलें होतें. ते स्वतःही तिच्या जवळच दिवसभर बसून असत. डॉक्टर तपासूं लागले, कीं, त्यांचा चेहेरा भांबावल्यासारखा होई; शेवटीं "तिला मोसंब्या-वर ठेवा" असे त्यानीं म्हणताच, मुद्दाम मुंबईस मनुष्य पाठवून, करंडेच्या करंडे आणले होते. पण रात्रीं स्वतःलाच जागरणाचा प्रसंग आला, की, त्याचें धाबें दणाणे! काहीं वेळ शिकस्तीचा प्रयत्न केल्यावर, त्यानीं भिंतीला ओडगूनच डुलक्या खाव्यात.

आणि एखाद्या चाहुलीने मध्येंच दचकून ते जागे झाले, कीं, गोंधळलेल्या मुद्रेने तिच्याजवळ येऊन म्हणावें, "काऽय? कोऽण? काय पाहिजे?"

असले हे घाबरलेले प्रश्न करून, जणूं काय, तें स्वतःच आपल्या दुर्बलतेची निर्भर्त्सना करीत!

हो, असल्या प्रसंगांच्या आठवणींनीं, मावशीला भाऊंचा राग येई; पण मग लागलीच त्याच्याविषयीं तिला कींवहि वाटे! आपुलकी...जिव्हाळा...ममता मनांत स्थिर होई...!

: १९ :

बाबासाहेबांच्या आजच्या आजारीपणाच्या बातमीवरून, कमळामावशीला आपल्या लहानपणींच्या माहेरवासांतील, एकएक आठवण होऊं लागली.

अगदीं लहानपणींच आईबापांच्या मृत्यूनंतर, तिचें खरें माहेर तिला अंतरलें होतें. आणि त्यानंतर, तिच्या मेव्हण्यानेंच तिचे पालनपोषण केलें होतें. त्यामुळें तीहि बाबासाहेबांना आपल्या वडिलाप्रमाणेंच समजे.

ती वाढली, त्यावेळच्या मानानें थोडी फार शिकली. त्यानंतर बाबासाहेबांच्या प्रेमळ छत्राखालींच, तिचें आयुष्य चाललें होतें, ..नव्या आशा उत्पन्न होत होत्या; इतक्यांतच, तिच्या आयुष्यात एक चमत्कारिक घटना झाली. त्यावेळीं, काहीं काळच कां होईना, मनांतल्या मनांत सारखें तिला वाटलें होते, आपण निराशामय खोल दरीच्या तोंडाशीं आहों.

पण बऱ्याच खटपटीनंतर, बाबासाहेबांनीं तिचें वासुदेवरावभाऊंशीं लग्न लावून दिलें. आणि तिच्या वैवाहिक जीवनाला तेथूनच सुरवात झाली होती.

प्रथमच सासरीं येतांना, ती, तिची बहीण व बाबासाहेब, एके ठिकाणीं बसून, कितीतरी वेळ प्रेमानें अश्रू ढाळीत होते. तिला आजहि तो प्रसंग आठवला व तिचा ऊर भरून आला.

आपल्या बहिणीची—सीतामाईची—आठवण होतांच, कमळामावशीच्या डोळ्यात टचकन् अश्रू उभे राहिले. ती किती प्रेमळ, किती सोशीक! आपल्या बहिणीला, तिच्या साऱ्या आयुष्यात फारसे सुख मिळालेंच नाहीं, असे मावशीला अजूनहि वाटत होते.

माईच शेवटचें दुखणें, त्यावेळचे तिचे भरून आलेले डोळे! ... ‘ कमळे, माझा अरुण लहान आहे ग; त्याला कधीं अंतर देऊं नकोस, ’ हे तिचे शेवटचे उद्गार, ... त्या रात्रीच्या स्तब्धतेंत, कमळामावशीच्या कानात आताहि निनादूं लागले. कितीतरी वेळ, त्यांचाच सारखा प्रतिध्वनि होऊन, मावशी, भान अगदीं विसरल्याप्रमाणें, शून्यपणें सभोंवार पाहूं लागली!

: २० :

आणि बहिणीच्या मृत्यूनंतर, तिने अरुणला स्वतःच अत्यंत प्रेमानें लहानाचा मोठा केला होता.

आपल्या आईसारखाच तो प्रेमळ भावनाप्रधान पोरगा!

त्याच्या लहानपणचे, तिच्या घरीं व त्यापूर्वी घडलेले सारे प्रसंग, तिच्या डोळ्यापुढें गर्दी करूं लागले. आणि ते आठवतांच, मावशीच्या चेहऱ्यावर आनंददुःखाच्या अनेक मिश्र छटा येऊन गेल्या.

कमळामावशीला आज तें सारें आठवून, ती किंचित् हंसली. मातृहृदयाची खरी जाणीव त्याच प्रसंगीं तिला प्रथम झाली होती!

सासरी आल्यावर, कमळामावशीला, त्या खेडेगावीं अरुणशिवाय एकटें एकटेंच अगदीं करमेना. त्याचे एकमेकावरील प्रेमच तसें होते. शेवटीं, अरुणला आपल्याकडे ठेवण्याबद्दल, तिनें बाबांना विनंति केली. घरातील आपापसांत चाललेल्या भाऊबंदकीच्या कायम धुसपुशीमुळे, पत्नीच्या मृत्यूनंतर बाबासाहेबाच्याहि मनाला स्वास्थ्य नव्हते; तेव्हा त्यानीहि अरुणला लागलीच कमळामावशीच्या खेडेगावीं पाठवून दिले होते.

अरुण मोठा होत गेला, शिकत गेला; पण दिवसेदिवस बापलेकांमध्ये मतभेदाचीं मोठमोठी वादळे उठूं लागली; आणि शेवटीं...

त्या साऱ्या प्रसंगाच्या आठवणीने, कमळामावशीचें हृदय हादरलें.

तिला अजूनहि वाटत होतें,...बाबानीं अरुणच्या इच्छाआकांक्षा साफ दुर्लक्षिल्या, त्याना त्या समजल्याच नाहीत. त्याच्या उज्वल भवितव्याविषयीच्या, केवळ आपल्याच कल्पनामागे लागून, दिवसेदिवस ते जास्त कठोर बनत गेले. आणि पुढे पुढे तर, अरुणच्या आकांक्षा, भवितव्य ... सारे त्याच्या व्यवहारी कठोरपणाखालींच दडपत गेले.

पण मग तिला वाटले, तसे पाहिले तर जगात जिकडे तिकडे व्यक्तिविशेषात लहानमोठे झगडेच चालू असतात नाहीं का?... व म्हणूनच बाबाना किंवा त्याप्रमाणेच आपल्या पतीला, ती दुष्ट म्हणण्यास तयार नव्हती... पण इतके असूनहि, सभोवार सुखी घटनापेक्षा दुःखीच जास्त का असतात, हे कोडे सोडविता सोडविता मात्र, तिचे मन विचाराने सुन्न होई!

: २१ :

रात्रीच्या बाराच्या गाडीचे केळव्यावरून येणारे टांगे, स्टेशनच्या बाजूकडून, खडखडत येत असल्याचा आवाज मावशीला ऐकूं आला; व ती आपल्या तंद्रींतून एकदम दचकून उठली. बिछान्यावरून उठून तिने कंदील मोठा केला. असल्या आठवणीमुळेच तिच्या मनात कसलीशी कल्पना आली होती.

ती आपल्या खोलींत गेली. गळ्यातील चाव्याचा घोस काढून, त्यातील एका चावीने तिने आपली ट्रंक उघडली; व कपड्याच्या घड्याच्या अगदीं खालचे, रेशमी रुमालात व्यवस्थित बांधून ठेविलेले, कागदाचे तीन जुडगे तिने बाहेर काढले. तीं तिच्या सग्रहींचीं सारीं पत्रे होती!

आणि त्यावरून, ज्या दिवशीं अरुण मावशीकडून गेला, त्याच्या आयुष्याला कांहींसे निराळे वळण लागले, तोच शेवटचा महत्त्वाचा प्रसंग, त्यावेळीं प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणें, मावशीच्या दृष्टीसमोर उभा राहिला.

हो, तो प्रसंग! त्यानतर दोनच दिवसात काहीं चमत्कारिक घडेल, असे त्या-वेळीं मावशीच्या ध्यानींमनीहि नव्हते.

मिरा!......भाबडी प्रेमळ पोर बिचारी! आज किती दिवस ती भेटली नाहीं! .....त्यानंतर तिसऱ्याच दिवशीं कोठ ती गेली ती गेलीच! त्यावेळच्या मिरेच्या व अरुणच्या पत्रावरून, समोरील पत्राच्या जुडग्याची, तिला पुन्हा आठवण झाली.

स्नेहपूर्ण दृष्टीनें तिकडे पहात, व मनात खळबळणाऱ्या आठवणींना, प्रयत्नानें बाध घालीत, तिनें ते तीन्ही जुडगे सोडले.

तिला प्रिय वाटणाऱ्या साऱ्या व्यक्तींची व साऱ्या व्यक्तींविषयीचीं, तीं तिला आलेलीं तिचीं खाजगीं पत्रे होतीं. पत्र न लिहिण्याबद्दल नेहमी स्वतःचे समर्थन करणाऱ्या त्याच तिच्या अरुणचीं वेळोवेळीं आलेलीं लाबलाब पत्रे त्यात होतीं; याशिवाय बाबा, मिरा, अरविंदभावोजी याच्या पत्राबरोबरच, अरुण व मजुळा यानीं परस्पराला पाठविलेलीं पत्रेही, त्यानीं तिजकडे ठेवावयास दिल्यानंतर, तिने त्यातच ठेवलीं होतीं.

कालानुक्रमानें लावलेलीं तिच्या संग्रहीचीं तीं सारीं पत्रे, म्हणजे, तिच्या रंजीस व कष्टी मनाला, एक मोठा विसावाच वाटे. आजच्या सुन्न मनःस्थितींत तर तीं सारीं पत्रे, मनःशातीसाठीं, पुन्हा एकदा वाचण्याची तिला उत्कट इच्छा झाली.

मंदमंद पावलें टाकीत ती पुन्हा दिवाणखान्यात आली. झोंपी गेलेल्या साऱ्या मुलांकडे एकदा दृष्टिक्षेप टाकून, तिने एक निःश्वास सोडला.... दिवा चागला मोठा करून, ती टक्टक् करणाऱ्या डुलत्या लोलकाकडे एकदा उगीचच पाहून, घड्याळाखालीं बसली.

आणि सारीं पत्रे—ते तीन्ही जुडगे—भरकन् एकदा चाळून, तिने सभोवार आपली दृष्टी फिरविली. घड्याळाखालीं टागलेल्या कॅलेंडरात, '१० मे १९३१' दिसतांच, तिला वाटलें... काळ काय भर भर धावत आहे! पण. आपला—व इतरहि साऱ्याचा—हा जीवन-प्रवास, असा पुढे पुढें चालूच आहे!...तो लांबच लाब प्रवास—त्यातील विविध सोबती....परस्पर संबंधामुळे घडून आलेले प्रसंग.. हो... त्यांपैकी कांहीं क्षणचित्रेंच.....तिच्यासमोरील त्या तीन्ही जुडग्यात धरलेलीं होतीं.

आणि या विचारामुळें क्षणभर थबकून, तिनें त्यातील पहिला जुडगा हातीं घेतला; व एका नव्याच उत्साहाने, एकएक पत्र चाळत, तिने उत्कंठित मनानें वाचावयास सुरवात केली!

---

# प्रवासांतील सोबती

## — पत्रें —

## जुडगा १ ला.

!.... ४ जानेवारी १९२४.

प्रिय मावशी,

मी गेल्यानंतर, शिनवार हें पत्र तुझ्या हातीं देईल. तेव्हां, मला जितक्या मोकळेपणें सगळें सागता येईल तितकं सागण्याचा प्रयत्न करते. आतां मला शब्दच तोकडे पडले, तर त्याला माझा तरी काय इलाज?

अरुण सकाळच्या गाडीनें मुंबईस जाणार या कल्पनेनें, त्या दिवशीं माझी सारी रात्र तळमळूनच गेली होती.

जवळजवळ तीन वर्षांनी परत आल्यावर, ते पंधरा दिवसच राहिले होते. या मधल्या काळात; त्याना पत्र पाठविण्याचेंहि मी अगदीं टाळलेंच होतें.

त्यानंतर इतक्या दिवसानीं का होईना त्यांची भेट व सहवास मला लाभला. त्यावेळीं, माझे आतापर्यंतचे सारे मूकभाव वर उसळून बोलके होत होते.

आणि त्यापुढले ते पंधरा दिवस कसे गेले? ते पूर्वीप्रमाणेंच मजबरोबर मनमोकळेपणे बोलत. पण माझ्या मनावर मात्र लाजेचें दडपण आलें होतें. काहीं काहीं वेळा, काय बोलावें व काय नाहीं, हेही न समजून, मी त्यांना "हो नाहीं" काही उत्तरच देत नसे.

त्याना काहीं तरी सागावेसें मला प्रत्येक क्षणाला किती वाटे म्हणून सांगू, मावशी? पण शब्दच सापडतना मेले! आणि सकोच होताच ना, सारखा मागें मागे खेचायला!

: २४ :

तो शेवटचा प्रसंग! मनाचा मोठा हिय्या करून मी तुमच्याकडे आलें होतें. अरुण कोठे बाहेर गेले होते, म्हणून मी तुझ्याकडे त्यांची चौकशी केली. तूं थट्टेनें हंसत म्हणालीस, "तुला अंगदीं वेड लागलंय बरं अरुणचं, मिरे!"

खरोखरच तुझ्या त्या शब्दानीं मला किती आनंद झाला! आणि म्हणूनच मी हंसून तुला म्हणालें, 'होय बरं मावशी, लागलंय् वेड! मग?'

तूं हंसलीस, मीहि हंसले! तुझ्या सहानुभूतीनें मला किती आनंद झाला! क्षणभर मला वाटलें, तोपर्यंत कोणाकडेहि न सांगितलेलें आपलें गुपित्, मावशीला एकदम सांगून टाकावें.

पण काय सांगूं मावशी, माझ्या मनाची धडधड तुला? मला तें बोलून दाखवतांच येईना!

अरुण जाणार म्हणून माझें मन हेलकावे घेत होतें. माझ्या मनांत सारखीं आंदोलनें चाललीं होतीं! ... विचारावर विचार ...

जणूं काय, मी अरुणांना मनाशींच सांगत होतें,... "अरुण, मला अजूनहि तुमच्याकडे मोकळेपणें विनंति करायची छाती होत नाही हो. तुमचं स्थान केवढं तरी वरचं. मी काय आपली सदा पाटलासारख्या एका वाडवळाची, ओबडधोबड खेडवळ मुलगी...

पण म्हणून काय झालं? मी त्याच्यातच कायमची मोडली जाऊं नये म्हणून, माझ्यामध्यें तुम्हीच नानातऱ्हेनें खटपट करून शिक्षणाची कल्पना उत्पन्न केलीत ना? मला वाचायची आवड कोणी लावली? खूप खूप शिकून, मी कोणीतरी मोठी होणार, विदुषी होणार, अशीं सुखस्वप्नें मला कोणामुळें पडलीं? एकाद्या केवळ साध्या खेडवळ मुलीच्या, आपल्या भावी आयुष्याविषयींच्या आकांक्षांहून, माझी कल्पनाचित्रें काहींतरी निराळीं झाली, तीं कां बरं?

हो अरुण, मला मनापासून वाटतें, तुम्हीं माझे बालसोबती, मित्र, गुरु,... सारे सारें कांही आहा!"

मग सांग मावशी, माझें आयुष्य त्यानांच वाहण्याचा, मी थोडासा धाडसी प्रयत्न करण्याचें ठरविलें, तर त्यांत गुन्हा ग कसला?

: २५ :

दुसऱ्या दिवशीं, पहाटेच्या कोंबड्यानीं कदाचित् मलाच प्रथम जागें केलें असेल. बिछान्यावर पडल्या पडल्या, काळोखातच आढ्याकडे पहातांना, माझ्या मनाची अगदीं तरळ चलबिचल होत होती.

मला माझ्या छोट्याशा आयुष्यांतील सारे सारे प्रसंग आठवून वाटत होते, मी एवढी पंधरा सोळा वर्षांपर्यंत वाढलें, खेडेगावच्या मानाने इंग्रजी चौथ्या इयत्तेत पास होण्याच्या मार्गावर आले; घरात, गावात, सगळीकडे, मी धीटपणें वागावयास धजतें!.....

पण अरुणांपुढें? ...त्यांच्यापुढें मी गोगलगाय बने!

माझा बाबा, जीवनकाकाकडे अलीकडे माझ्या लग्नाच्या गोष्टी बोलूं लागला; आणि तेव्हांपासून मात्र, माझा धीर जास्तच खचल्यासारखा झाला होता.

तूंच सांग मावशी, एखाद्या अनोळखी अक्षरशत्रू मूर्खाशीं जन्मगांठ बांधली जाणे, हेंच कां माझें सुख? ...

अरुणासारख्या प्रेमळ मित्राचा सहवास मला किती हवाहवासा वाटे. उंच उंच भराऱ्या मारणाऱ्या अरुणांनीं, मजवर खरोखरच कसली गारुडी विद्या केली होती. माझ्या मनाची त्यानीं नकळत घेतलेली ही पकड, कांहीं केल्या सैल होत नसे. मला सारखें वाटे, केळीच्या बनात वांग्यामिरच्याचे रोप वाढवीत, केवळ मुलामाणसाचे संगोपन करून, एखाद्या माळ्याचा संसार साजरा करणें, हेंच माझें आयुष्य नाहीं!... हो तेंहि पाहिजे तर करीन; पण माझ्या अरुणांबरोबर!

: २६ :

अरुणासाठीं जुंपलेल्या गाडीला वंगण घालून, धर्मा गड्याने चाक हलविल्याचा 'खड् खड्' आवाज ऐकताच मात्र, मी त्या साऱ्या विचारातून एकदम दचकून अंथरुणात उठून बसलें. माझ्या मनात विरोधी विचाराचा वणवा पेटला होता. मला वाटलें 'अरुण आता चालले!'... शेवटीं, माझ्या मनाची हूरहूर जास्त जास्त वाढूं लागली, तशी मागील दार हळूच उघडून मी चटकन बाहेर पडले!

तुमच्या पुढल्या अंगणाजवळ, बैलांच्या गळ्यात, धर्मा घुंगूर बांधित होता. मी क्षणभरच जागच्याजागीं थबकलें! एकदां वाटलें, लोक काय म्हणतील? पण मला अरुणाना तर ते जाण्यापूर्वी भेटावयाचें होते. शेवटीं, एकदाचा मनाचा ठाम विचार ठरवला, व मी फाटकातून बाहेर पडलें.

तशीच झपझप पावले टाकीत, मी पुढें चालले असताना, मला तुमच्या सवादाचे अस्पष्ट शब्द ऐकूं येत होते. 'येतो ग ऽ मावशी' 'पत्र पाठव बरं का'?

... पण तिकडे लक्ष न देता, मी पुढला मार्ग काटीत होतें. मला माझ्या अरुणाना भेटायचं होतं! माझ्या पुढील आयुष्याविषयीं, काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावयाचा होता! ......

सभोंवतीं मधून मधून कोंबडे आरवत होते; पक्षी किलबिलत होते. पण तिकडे माझे जरा देखील लक्ष नव्हतें. माझ्या मनांत, एकच विचार सारखा बळावत होता... "आज अरुण मला सोडून जात आहेत. आजच त्यांच्याकडे मी माझे मन मोकळें केले नाही, तर कदाचित् ते मला कायमचेच अंतरतील!..."

आणि त्या नव्या विचाराने माझी छाती धडधडली, तरी अननुभूत आनंद-उत्साहानें, माझे हृदय उचंबळूनहि येत होतें!

झाप्यांतून गाडी बाहेर पडून रस्त्याला लागली. तशी माझ्या हृदयांतील चलबिचल वाढूं लागली. मला त्यावेळीं आशा वाटत होती, कीं, ज्या सुखी क्षणाची आकांक्षा मी गेलीं कित्येक वर्षे करीत होतें, तोच माझ्यासमोर चालून येत आहे!

हौशा आणि डौल्या बैल दुडक्या चालीत चालून, अरुण बसलेली गाडी, माझ्या जवळ जवळ घेऊन येत होते!

पहिल्या पाणेरीजवळच मी थबकले; गाडी अगदीं जवळ पोचताच मात्र, माझें आतांपर्यंतचें धैर्य मला सोडून जाऊं लागले. तरी पण मी उत्कंठेनें खालीं मान घालून, कडेशीं तशीच गप्प उभी राहिलें!...

: २७ :

अजूनहि फिकें चांदणें होतें. अरुणानीं चटकन मला ओळखले आणि धर्माला पागा ओढावयास सांगितलें; ... किती आनंद वाटला मला त्यावेळीं. ते खालीं उतरले; माझ्या तोंडून शब्दच फुटेना; मी अगदीं अंग चोरून उभी होते. माझ्याजवळ येऊन आश्चर्यचकितपणें मजकडे पाहात अरुण म्हणाले, " कोण गऽ, मिरा ? "

जोराच्या श्वासोच्छ्वासामुळें, माझी छाती खालीं वर होत होती. मी माझ्या अरुणाच्या सहवासात आहे, या एकाच कल्पनेनें माझे हृदय अगदी भरून आलें होते.

" आता कोठून आलीस, तूं मिरेऽ ? अं ऽ ? का आलीस ? " अरुण किंचित् भाबावून प्रश्न विचारीत होते. पण तरीहि मी गप्पच ! शेवटी, त्यानीं खेळकरपणे माझ्या खांद्यास हात लावून, माझा पुढा आपल्या बाजूस फिरवला; तेव्हा मात्र मी एकदम धीर करून काहींतरी म्हणालें. पण शब्द अस्पष्टच बाहेर पडले— " आज जाणार ना तुम्ही अरुण ? तुम्हाला ... स्टेशनापर्यंत पोंचवावयाला आले आहे मी! "

वरवर आनंदी वृत्ति दाखविण्याचा प्रयत्न करूनहि, माझ्या आवाजातील दुःखीपणा मला लपवता येईना; अरुणाना गहिंवरून आले होतें, तरी ते अगदीं साहजिकपणें मला गाडीकडे लोटून म्हणाले, "हातत्येच्या, मग चलऽना गाडीतून ...'

आम्ही गाडीत चढताच, धर्माने बैलाच्या शेपटीस हात घातला; आणि त्याच्या खुराचा खटखट आवाज, घुंगुराचा मंजूळ ध्वनि, त्या सभोवारच्या शांततेत मौठ्याने येऊं लागला. गाडी हळूंहळू पुढें चालली होती. पण, काहीं वेळ कोणीच कोणाशीं बोललें नाहीं. घुंगुरांचा किंवा धर्माच्या इषाऱ्याच्या आवाजाशिवाय सगळी शांतता पसरली होती.

माझ्या अनपेक्षित भेटीनें अरुण भाबावले होते: आणि मलाही मी काय सांगूं तेंच समजत नव्हते. .... शिवाय धर्मा होताच गाडीवर ! मग मोकळेपणें काय बोलणार मी ? थोडा वेळ गेल्यावर, मीच शेवटीं थोड्या धिटाईनें त्याला एकदम म्हणालें, " धर्मा, चालत येरे ! आम्ही नेऊं गाडी स्टेशनापर्यंत ! "

किंचित् चमकून, पागा ओढीत, धर्मा माझ्याकडे व अरुणांकडे पाहूं लागला.

"खरच धर्मा!" अरुणानीं मजकडे पाहातांच माझ्या म्हणण्याचा आशय ओळखून, तेहि म्हणाले, "आण पागा माझ्याकडे! बरेच दिवस मी गाडी हाकलली नाहीं. नेईन आज स्टेशनपर्यंत! हौशा अन् डौल्याच आहेत ना जुंपलेले? आहेत मला माहित त्यांच्या खोडी. स्टेशनवर ठेवतों सोडून! काय? तूं मागून ये झपझप म्हणजे झालं!"

आणि त्याचे उत्तर ऐकण्यापूर्वींच, अरुणानीं त्याच्या हातून पागा काढून घेतल्या. "बैल संबाला बरं शेट!" म्हणत धर्माहि बिचारा खालीं उतरून चालूं लागला.

अरुणानी बैलाना चुचकारलें; आणि पागा सैल सोडताच, तेहि चौखूर धांवूं लागले. गाडी धर्माला मागे टाकून बरीच पुढें आली होती. पण तरीहि आम्ही काहींच बोललो नाहीं.

मी उगीचच बाहेर पाहिले. पहाटेच्या वाऱ्यामुळें झाडाच्या पानाचा सळसळ आवाज होत होता. उगवती थोडीथोडी उजळत असली, तरी अजून अगदीं अंधुकच दिसत होते.

२८ :

अरुण धुराडावर पाय ठेवून, गाडी हांकीत होते. मी त्यांच्या जवळच बसली होते खरी; पण अगदीं मुखस्तंभ! माझें मलाच आश्चर्य वाटलें. दोन तीन फर्लांग टाकून आम्ही पुढे गेलो, तरी नेहमीचा माझा धीट बोलकेपणा, सगळाच मेला कोठच्याकोठे दूर पळाला होता!

धर्माला चालत येण्यास दोनचार मिनिटापूर्वींच धिटाईनें सागणाऱ्या आपल्या मेरेचे धैर्य एकदम कोठें लोपले, त्याचें अरुणानाहि आश्चर्य वाटलें असेल! पण माझें मलाच कारण समजेना!

मी चारी बाजूस सारखें पाही, पुन्हा गाडीच्या छपराला रेलून बसे; पुन्हा बाहेर दृष्टी टाकी... असले अस्वस्थ चाळे पुष्कळ केले! पण काय व कसें बोलावें हें मला समजेना!......

माझ्या अनपेक्षित मौनामुळें, काहींच न सुचून, अरुणांनीं बैलाना पुन्हां गोठ्यानें चुचकारलें. अजून चागलें अडीच मैल जावयाचें होतें. चालींत चालणाऱ्या बैलाच्या घुंगुरांचा आवाज, गाडीचा घुमणारा 'गुडु गुडु' शब्द, रस्त्यांतील एखाद-दुसऱ्या झोपडीच्या दारांतून येणारे कुत्र्यांचें भुकणे अगर कोंबड्याचें आरवणें, असले अरुणाच्या आणि माझ्या अगदीं लहानपणींपासूनचेंच परिचित वातावरण, चोहोबाजूंस पसरलें होतें.

इतक्यांत, स्टेशनच्या दिशेनें मालगाडीच्या इंजनाची शिटी एकदम ऐकूं आली.

बोलणें सुरू करण्यासाठीं, अरुण मजकडे पाहून आपल्या नेहमीच्या गंभीर पद्धतीनें म्हणाले, " ऐकलास मिरे, तो कर्कश शब्द ! तो शहराचा आवाज बरं ! ... आणि हे खुळखुळणारे घुंगुर ? हा खेड्याचा शब्द !... आपल्याला लहानपणीं कल्पनाही नव्हती. पण या दोहोंतहि संबंध आहे हो ! अगदीं निकटचा ! " ...

अरुणांनीं पुन्हा एकदा मजकडे वळून पाहिलें. पण तरीहि मी धडधडत्या अंतःकरणानें चूपचूपच होतें ... माझें मौन शेवटीं त्याना अगदीं असह्य झालें; त्यांनीं डाव्या हातानें माझा खादा किंचित् हलवून म्हटलें, " कसल्या एवढ्या विचारात गढली आहेस मिरे ? ... कोणावर रागावली का आहेस ? अंऽ ? काय ? अग बोलत का नाहींस कांहींच ? "

तरीहि मी न बोलतां, माझी मान पुन्हां एकदा बाजूस वळवलेली पाहताच, गाडीच्या धुराडाखालून मागें धावत जाणाऱ्या अस्पष्ट जमीनीकडे, विमनस्कपणें पहात अरुण गप्प बसले.

पण मला वाटतें, प्रयास करूनहि, पदरानें लपविलेल्या तोडातून एकाएकी बाहेर पडलेल्या माझ्या हुंदक्यांनीं, अरुण दचकून भानावर आले. माझ्या दुःखाचे कारण काय ते त्याना समजेना. मलाहि त्याना शब्दात सागता येईना !... पण हळव्या अरुणाना माझें दुःख मात्र गद्गदित करूं शकलें ! माझें सात्वन करण्याच्या हेतूने, किंचित् माझ्या बाजूस कलून त्यांनीं मला प्रेमानें हाक मारली.... " मिरे ऽ ! "

अरुणानीं माझ्या उजव्या खांद्यावर हात ठेवतांच, माझ्या भरल्या डोळ्यातून अश्रु जास्तच ओघळूं लागले ! मी एकदा त्यांच्याकडे पाहिल व मान त्याच्या खाद्याकडे झुकविली.

माझ्या डोळ्यातून ओसरणारे उष्ण अश्रू , अरुणाच्या हातावर ठिबकत होते. थोडा वेळ असाच गेल्यानंतर, अत्यंत प्रेमानें मला हळूंच हलवून, अस्पष्ट जड शब्दात अरुण मला म्हणाले, 'मिरेऽ, मला नाहीं का सागणार तूं तुझ्या मनातलं सारं ?'

आता मात्र मला माझ्या अंतःकरणांतील आवेग असह्य झाले. मी अरुणाच्या मानेला एकदम मिठी मारून, अगदीं कंपित स्वराने म्हणालें, " मला सोडून नका ना हो जाऊं तुम्ही, अरुण ! "

: २९ :

आणि मावशीं, नंतर अरुणानीं मला धीर दिला... माझा स्वीकार केला, त्यावेळी मला किती किती आनंद झाला !

हें सगळें सगळें तुला आता लिहितें आहे, तसेंच सविस्तर सांगावें, असें त्यावेळींहि मला वाटत होतें ! पण बाई शब्दच सांपडेनात; लाजहि वाटत होती सारखी !

तुला शेवटीं मी भेटलें, त्यावेळीं थोडक्यात ... पाच सात वाक्यातच मी, सागितले हे सारं. वाटलं, तेवढ्यावरूनच सारें समजून, तूं मला धीर देशील; प्रेमानें माझ्या पाठीवरून हात फिरवशील!

पण तूं थोडा वेळ गप्प बसून, मग 'छे!... हे सारेंच अशक्य' असे मला एकदम म्हणालीस! आणि मावशी, त्यावेळीं मी अगदीं हातपाय मोडल्याप्रमाणें होऊन, निमूट घरीं परत आलें. तूं हळूं हळूं सागितलेले त्यावेळचे विचार माझ्या मनात आता गोधळ उडवून देत होते. अरुण सोनगावहून गेल्यापासून मी भांबावले होतेंच; त्यात, तूं मला काल सकाळीं सागितलेल्या त्या गोष्टींनीं भर टाकली. बाबाला कुणकुण लागताच त्यानें मला मारलें, नाहीं नाहीं ते बोलला .... आणि म्हणाला, 'माझ्या कुळाला कोळोखी लावलीस!'

मावशी, अरुणांच्या आणि तुमच्या सर्वांच्या संगतींत, मोठ्या महत्त्वाकांक्षा एकदा मनात रुजल्यावर, आतां मी माझ्या बाबाच्या म्हणण्याप्रमाणे, एखाद्या माळ्याच्या संसारात सुख कसें ग मानूं? घरांतील सगळीच मला बोचत आहेत पण मला अगदीं माझी वाटणारी कमळामावशी,—ती तू सुद्धा मला दूर दूर लोटूं लागली आहेस. हो, असेंच मला प्रथम वाटले.... माझा गुन्हा तरी काय साग? मी अरुणांच्या सहवासासाठीं जीव टाकत आहे. त्याच्यावर मनापासून प्रेम करत आहे! हा!—

: ३० :

पण मावशी, सारा विचार केल्यावर, आता मला वाटतें, की, तूं म्हणालीस तेच सारं खरं आहे. यांत चुकीचें कांहीं नसलं, तरी व्यवहारात गोधळ उत्पन्न करावयास सर्व पुरें आहे!... हो, रडण्यात, विचार करण्यात, कालचा सारा दिवस घालविल्यावरच हें आता मला समजले!

अरुणांवर माझें इतकं प्रेम आहे, कीं, माझ्यासारख्या एका क्षुद्र व्यक्तीच्या सुखासाठी, त्यांच्या पुढील आयुष्याचा, तूं म्हणतेस तसा नाश होणार असला, तर तसलें स्वतःचें सुख मला नको आहे ....

मावशी, म्हणूनच तुला हें शेवटचं पत्र लिहून... अरुणाना, तुला, बाबाला, साऱ्या मंडळीना सोडून, मी आतां—याच जगात...पण—कोठेंतरी दूर दूर जात आहे. तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. वाटलें तर तुला मी मधून मधून पत्रें लिहीन. पण ती तूं तुझ्याशींच ठेवशील ना, मावशी? अरुणानाही मुळीच कळवूं नकोस. अरुण प्रेमळ आहेत, मनाचे थोडे हळवें आहेत. कीर्ति मिळवत ते जगांतली वाट काढताना, ... त्यांची काळजी घेत त्याना मदत करण्यात, मला फार आनंद झाला असता! तेंच माझे भावी आयुष्य, असें मी ठरविलें होते; पण ते माझ्या नशीबीं नाहीं! त्याची काळजी आतां तूं घे मावशी.

पण मी हे वेड्यासारखं तुला काय सांगत सुटले आहे ? तुझी जबाबदारी तुला कळत नसेल का ?

बस्स, आतां येथेंच एकदम थांबतें. नाही तर असेंच भरकटण्याचा हा मोह आवरणें मला शक्य नाहीं . . . अरुणाना मी लिहिलें आहे कीं,...मला साफ विसरून जा. पण, मावशी, तूं माझी रोज आठवण काढतेस, असे कधी मला असेन तेथे कळले, तर मला मूठभर मांस चढल्यासारखे वाटेल ! . . . (तुम्हा दोघांशिवाय मला विशेष आठवण कोणाची होईल ते सांगता येत नाहीं ) मावशी, माझी आठवण जपून ठेव बरं ! . . .

आता पुन्हा भेट होईपर्यंत तुझ्या प्रेमाची अपेक्षा करणारी एक खेडवळ वेडी मुलगी... .. —मिरा—

( २ )

"मला, माझ्या अरुणाना सोडून जाणें जिवावर येईल,...नव्हे ते शक्यच नाही.

पण मावशीहि माझ्यावर प्रेम करते. माझ्या इतकेंच माझ्या अरुणावर तिचे प्रेम आहे ! ती म्हणाली..."मिरे, अरुणच्याच पुढील आयुष्याच्या दृष्टीने विचार कर ! त्याला सुखी करायचे असेल, तर तूं त्याच्या आयुष्यातून या क्षणीच दूर हो !...... "

आणि खरच, मावशीचे खरं आहे. अरुण ! तुमचे आणि माझं स्थान सारख नाही !

ठरलच; मी तुम्हाला, माझ्या बाबाला—(तो म्हणे मला माझं लग्न शक्य तितक्या लवकर जुळेपर्यंत मी 'उनाडक्या' करूं नये म्हणून माझ्या दुसऱ्या चुलत्याकडे, त्याच्या गावीं ठेवण्याचा विचार करीत आहे.) साऱ्याना सोडून कुठं तरी लांब लांब निघून जाते एकदाची !

जीव नाहीं देत काही मी ! माझा जीव वर आलेला नाही. तुम्हीच नाहीं का म्हणाला होता, अरुण, मागे ? 'जगात आपण येतो त्यावेळच्यापेक्षा, जगातून आपण जाताना त्यात काही तरी जास्त सुधारलेली स्थिति दिसावी ! आणि असे काही करण्यापूर्वी मरणे ही माणुसकी नव्हेच मुळीं !'—म्हणूनच, नेहमी कोत्या व्यवहारी दृष्टीनें आपल्या भोंवती पाहणाऱ्या या माणसाच्या सहवासापासून, सध्या तरी, लांब कोठेतरी अज्ञात ठिकाणी, मी निघून जातें आहे !—

पण अरुण, एक करा हं... त्रास पडला तरी आतां मला कायमची विसरा. तुम्हाला आपलें आयुष्य माझ्याशिवाय, जास्त सुलभपणें घालवितां येईल, असें मलाहि विचारांतीं वाटतें! त्यांतच मलाहि सुख आहे. माझ्यासाठीं तुम्ही आपल्या उज्वल भवितव्याचा नाश करूं नका!...तेवढी माझी मुळींच योग्यता नाहीं!...

माझ्या आजपर्यंतच्या चिमकुल्या आयुष्याकडे पाहिलें, कीं, मी आपल्यालाच विचारते ' मिरे, तूं आलीस कोठून ? अन् चाललीस कुठे ?'

पण आतां, मी कोठेंतरी अशा ठिकाणीं जात आहें, कीं, तेथें दुसरें कोणी संशयित मुद्रेनें मला विचारणार नाही, कीं, " मिरे, आली कोठून? चाललीस कुठें ?"

पुन्हां कधीं तरी, . . . कोठेंतरी, . . . आयुष्यांत आपण होऊनच गाठ पडली तर पडेल; पण तोंपर्यंत मला साफ विसरून जा, अशीच विनति करतें. "

—मिरा—

५ जानेवारी १९२४.

( ३ )

मुंबई : ता. २५ एप्रिल १९२४.

प्रिय मावशी,

आतांपर्यंत, तुझीं लागोपाठ तीन चार पत्रें आल्यानंतर मात्र, तुला पत्रच पाठवावयाचें नाहीं, हा मी केलेला निश्चय मला मोडावा लागत आहे. दोन महिन्यांपूर्वीं तुला रागानें मी दुष्ट म्हटलें होतें. पण आता उलट तुझ्याकडे मन मोकळें केल्यावाचून मला राहवेना.

मी तरी काय करूं ग ? इतरांपेक्षां मिरेची तुलाच जास्त माहिती होती. ती तुला फार आवडतहि होती. मजबद्दलच्या तिच्या भाबड्या प्रेमाची तूं थट्टेनें कां होईना, मधून मधून जोपासनाही केली होतीस. मला त्या दिवशीं पोहोंचवावयाला ती स्टेशनवर आली आणि परतल्यावर तिनें तुला सारें कांही सांगितलें. त्यावेळीं ती किती आनंदीत झाली होती असेल. सोबतच्या तिच्या पत्रांवरूनच, त्या पोरीच्या मजबद्दलच्या प्रेमाची उत्कटता दिसून येते!... आणि, मला सुखी करण्यासाठीं, त्या भाबड्या पोरीला तूं वेड्यासारखा त्याग करावयास लावलास! चांगला न्याय !

पण मावशी, थोडा विचार केल्यावर आतां वाटतें, मी उगीच तुजवर रागावलों. तूं अंशतः कारण असलीस तरी . . . निश्चय करणारी मिराच!. . . आणि

पुन्हां, भोंवतालच्या या चमत्कारिक परिस्थितींतालच तूं एक संसारी व्यक्ति आहेस, तुझ्यावरील माझ्या प्रेमामुळें, तुझ्यावर मी रागाच्या भरांत संतापणें, हें साहजिक असलें तरी योग्य नाहीं!

पण मी तरी काय करणार त्याला? .... मिरा! ... तिचें नुसतें नांव निघालें कीं माझें हृदय सध्यां उचंबळून येतें आहे!... तुला एकदां आतां मी या बाबतींत शेवटचें सांगून घेतों! तुला ठाऊक असलें तरी पुनः माझ्यासाठीं ऐक सारें!...

: ३३ :

ती माझी बालमैत्रीण! लहानपणचे ते खेळ! अनेक वेळां, आम्हीं दोघानीं कसलं तरी कारण काढावे, अन् हळूंच करंदीच्या जाळीमध्ये जाऊन हिरवीं कच्चीं करंदें काढून चरचरां चावावींत. घरापासून लांबलांब ... आत आत कोठल्या तरी शेतांतून भटकत फिरावें. आणि मग काळोख झाल्यावर परतल्या-बद्दल, तुझी किंवा मिरेच्या आईचीं बोलणीं निमूटपणें ऐकावींत. तुला आठव-तच असेल तें सारं!...

मिरेचे पहिले धडे, तिची पहिलीं वाचनाचीं पुस्तकें ... सारीं माझ्याकडून तिला मिळालेली. त्यावेळीं, मी एखाद्या विषयावर, आपल्या तुटपुंज्या ज्ञानाच्या भांडवलावर, अनेक वेळां मोठमोठीं लेक्चरें द्यावींत. त्यावेळची ती माझ्याकडे अनन्यभावनेनें लक्ष देण्याची तिची वृत्ति...... तिचा तो सात्विक चेहरा, सारे अजूनहि माझ्या डोळ्यासमोर उभे रहाते! जणूं काय, मी कोणी जाडा विद्वान् आहे, ... असेंच तिला वाटे! तिच्या असल्या कांहींशा माझ्यावरील वेडगळ प्रेमामुळेंच, तिचें वाचन वगैरे वाढत गेलें. वास्तविक, इंग्रजी चौथींतील एक खेडवळ मुलगी ती! पण तरीहि, तिला इतकी विविध स्वरूपाची दृष्टि असण्याचें कारण कदाचित् तिची माझ्या मैत्रीमुळें वाढलेली जिज्ञासा!...

: ३४ :

आपल्या तेथल्या घरामागल्या वाडींत, गवताच्या गंजीमागें एक पायरी आंब्याचें मोठें झाड आहेना? कधींमधीं त्याच्या छायेंत बसून, आम्ही दोघांनीं मिळून पुस्तकें वाचावींत. त्या पुस्तकांतील व्यक्तींच्या चरित्रांशीं ती भाबडी पोर किती लौकर एकरूप होई! हंसण्यासारख्या प्रसंगीं ती जितकी हंसे, तितकीच दुःखाच्या प्रसंगीं ती पटकन् अश्रू ढाळत रडूं लागे.

'इंदू बिंदू' च्या काळ्या समुद्रामुळें तिनें थोडा वेळ हंसावें. पण मग म्हणावें, 'शीः, मनुष्याच्या कुरूपपणाचें किती हिडिस वर्णन? यापेक्षां चागला विनोद नाहीं कां हो, अरुण?' हरीभाऊंच्या प्रत्येक कादंबरातील दोन चार प्रसंगीं तरी, ती ओक्सा-

बोक्शीं रडावयाची ! 'यमुना' 'पद्मा' 'सुंदरी',...याच्या आयुष्याच्या करुण कहाणींनीं तिला कळवळून येई. 'भाऊ' विषयी निर्माण झालेला तिच्या मनातील आदर, 'सुंदरी' विषयी तिला वाटणाऱ्या उत्कट सहानुभूतीमुळें, क्षणभर दोलायमान होई. पण मग पुन्हा, ' भाऊ किती हो श्रेष्ठ ' म्हणूनहि, आपले पाणिदार डोळे मोठे करून तिने मला सांगावे !

ते सारे प्रसंग, प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणें, मला अजूनहि आठवतात !

तीन साडेतीन वर्षापूर्वीची गोष्ट ! तुला आठवत असेल, मिरेची मराठी सहावी झाल्यावर, तिचे नाव शाळेतून काढावयाचे सदा पाटलाने ठरविले ! त्यावेळीं रडकुंडीस येऊन, ती मला म्हणाली होती, 'मी पुढं इंग्रजी शिकलं पाहिजे की नको हो, अरुण ? तुम्हाला आवडेल ना मी शिकले तर ? बाबाची समजूत घालाना तुम्ही ? '...डोळ्यात अश्रू आणून ती मला तसें सांगत असताना तिची कावरी बावरी झालेली चर्या, किती अकृत्रिम होती ?

मावशी, ' मिरा ' म्हटले, की, असले किती तरी प्रसंग मला आठवतात. मी मॅट्रिक व कॉलेज शिक्षणासाठी, सोनगाव सोडून बाहेर गेल्यामुळे, गेली दोन वर्षेच काय तो, तिच्या माझ्या सहवासात खंड पडला होता. पण या अवधीतच तेवढा, तिच्यामध्ये अंतर्बाह्य काय फरक पडला होता ? त्या दिवशीं ती मला पोहोचवावयास आली, त्यावेळच्या तिच्या सुरवातीच्या मौनातहि, जणूं हा मागला सारा इतिहास दडला आहे, असेच मला वाटले.

तरी मी तिला इतके भावनावश झालेले कधींच पाहिले नव्हते... आणि खरंच मावशी, तिच्या दुःखामुळं, माझं हृदयहि पूर्वी कधीच इतकं उचंबळून आल्याच मला आठवत नाही. हो, तो शेवटचा प्रसंग, तुझ्यासाठीं एकदा पुन्हा सविस्तर लिहितो.

हरकत नाही लांब झालं पत्र तर ! . . . माझ्या मनाचे तरी समाधान होऊ दे ! . . .

: ३५ :

आम्ही दोघेच गाडींत...आणि चोहोबाजूस अगदी शांत होते. उजव्या हातात पागा घेऊन, माझा डावा हात तिच्या पाठीवर ठेवीत, मी हळूच स्तब्धता मोडली, ' मिरे ऽ ! अग झालं काय ? मला सांग ना ? '

" काय सांगू अरुण ? " मिरा अस्पष्टपणे पुटपुटली. बराच वेळ ती तशीच आपल्याशी स्फुदून मग एकदम म्हणाली, " एनॉक आर्डेनच्या कवितेतील गोष्ट तुम्ही मला मागे किती गोड हळुवार शब्दात सांगितली होतीत ? आठवते ? हंः !...आपणहि तसेच ! फक्त लहानपणीं तेवढे खेळलों ! आणि आता ?......"

मला एकदम आठवलें ! आम्ही किती तरी इंग्रजी मराठी कविता, अशा मजे-मजेंत मिळून वाचल्या होत्या. पण मिरेला आज ती एकच कविता आठवली ! आमच्या गतायुष्यातील त्याच व तसल्याच आनंदाच्या प्रसंगानीं, मिरेला जास्त दुःख होत होतें. त्यामुळें तिला बराच वेळ हुंदकाच आवरेना.

" अरुण, मला तुम्ही पाहिजे आहा ! " शेवटीं ती स्फुदून स्फुंदून, अस्पष्ट शब्दात मला सांगू लागली, " तुम्ही मला आज सोडून जाणार, ही कल्पनाच मला मुळीं असह्य वाटते ! "

मिरा माझ्याकडे भरल्या डोळ्यानीं सारखी पहात राहिली ! आणि माझ्या गहिवरल्या हृदयातून शब्दच फुटेना.

" मी तुम्हाला आवडत नाहीं का अरुण ? अं ऽ ? सांगा ना ? तुमच्या मिरेने पुढे काय करायचे आतां ? तुम्ही गेल्यावर माझे काय होणार आहे हो ? " मिरा आज तिचे सारे सत्वच प्रगट करीत होती जणूं काय ?......

बोलता बोलता तिच्याने राहवेना. तिने मला एकदम घट्ट मिठी मारली. तिच्या अगदीं निकट आलेल्या चेहऱ्यावरील करुण भाव तर, मला क्षणाक्षणाला जास्तच अस्वस्थ करीत होता... तिजकडे खेंचीत होता...मला काहींच सुचेना. सात्वना-साठीं जवळ घेऊन कुरवाळीत असलेल्या तिच्या चेहऱ्याची, अश्रूनी डबडबलेली ती दृष्टि, मला जास्तच आकर्षू लागली,... आणि मावशी, तिच्याकडे स्थिर नजरेने व मुग्धपणे पहाता पहाता, मी प्रेमभराने तिच्या मुखाचे एकदम चुंबन घेतले.

: ३६ :

माझ्या खांद्यावर आपली मान तशीच ठेवून, मिरानें तुटक शब्दात शेवटीं मला हळूं हळूं सारी हकीकत सांगितली.

गेल्या वर्षापासून, सदा पाटील आपल्या मुलीच्या लग्नाची तयारी करीत होता. आधीच मिरा इतकी पंधरा वर्षानंतरही वाढलेली; आणि मुलगी अशीच मोठी होत गेली, तर मागाहून जातींत योग्य मुलगाहि मिळणे शक्य नाहीं; म्हणून, त्याने शेवटीं आपल्या शेजारच्या नावली गावचा, एक वाडवळ तरुणसाच बिजवर माळी, निश्चित करण्याचें ठरविले होते.

माझ्या बालमैत्रिणीच्या दुःखी मनःस्थितीचे हें कारण मला समजताच, मला वाटलें, ती आपल्यावर इतक्या अनन्यभावे प्रेम करीत आहे, तर आपण...!

: ३७ :

तिची मान वर करून तिच्याकडे मी पाहिलें, तिचे अश्रू पुसले व तिला म्हणालों, " हं ! हास बघूं मिरे, आता एकदां नेहमीसारखी ! तुला जर खरोखरच तसे वाटत असेल तर मी तुझाच......अगदी तुझाच आहे. झालं आता ? "

माझ्या या वाक्यांनीं मिरेचा चेहरा एकदम किती फुलला ? तिनें झटकन् आपले अश्रू साफ पुसले व ती माझ्याकडे प्रेमानें पहात, खुदकन् अगदीं गोड हंसली. अन् मग पुन्हां नेहमींसारखीच हंसूं, खेळूं, बोलूं लागली.

मला अगदीं आश्चर्यच वाटलें. तिचा माझा इतका सहवास झालेला; पण आजपर्यंत मिरेने तिच्या माझ्याविषयींच्या भावना इतक्या उघडपणें, उत्कटतेनें कधींच व्यक्त केल्या नव्हत्या ? आणि मी स्वत: तरी ! आयत्या वेळीं मला इतका मोह कसा झाला, हें माझें मलाहि समजेना.

त्या क्षणापूर्वींच्याच आनंदी प्रसंगाविषयीं असा मुग्धपणें विचार करतां करतां, माझें लक्ष एकदम समोर बैलाकडे गेलें. त्यांनीं हळूं हळूं चालून, आमची गाडी तोंपर्यंत तिसऱ्या पाणेरीजवळ आणली होती. अजून दीड मैल वाट चालावयाची होती, म्हणून मी बैलांना पुन्हां एकदा चुचकारलें.

मिरेला तर आता अगदीं नव्या उत्साहानें भरतेच आलें होतें. तिनें माझ्या कडून पागा व काठी एकदम घेऊन म्हटलें, "द्या माझ्याकडे पागा, मी हाकतें गाडी ! "

लहानपणीं, तिनें अनेक वेळा गाडी चांगली हाकल्याचें मला आठवत होतें. तरी मी तिला मुद्दामच हिणविण्यासाठीं म्हणालो, " गाडी खड्ड्यात घालूं नको हो ...नाहीं तर हिच्याबरोबरच माझी पुढली गाडी..."

" त्याची नको बरं काळजी ! " आपले हंसरे पाणिदार डोळे माझ्याकडे वळ-वीत, मिरा म्हणाली, " चालती गाडी खड्ड्यात घालतात ती पुरुषच ! आम्हीं बायका सावध असतों. उलट ती नीट रस्त्यावर ठेवण्याचाच जास्त प्रयत्न करतों ! बरं ऽ ! "

तिच्या या एकदम आलेल्या टोमण्याची, मला अगदीं मौज वाटली व मी तिजकडे मुग्धपणेंच हंसून पाहिलें.

" पहाच हं ! " असे म्हणत तिनें पागा सैल सोडल्या व बैलाना चुचकारलें. त्या इशाऱ्याने बैल जोरानें धांवूं लागताच, तिनें मान वर करून व गाल अभि-मानाने किंचित फुगवून, माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला.

: ३८ :

दिशा उजळूं लागल्या होत्या. बाजूला शेतांत ठिकठिकाणी कापलेल्या गव-तांच्या राशी अस्पष्ट दिसत होत्या. मी थोडा मागल्या बाजूस कललों आणि तेथून मिरकडे हंसत पाहूं लागलों ! पुढील उजळलेल्या दिशेच्या पटावर, मिरेचा चेहरा किती मोहक दिसत होता. रुंद कपाळ, सरळ नाक, अर्धवट मिटलेले ओंठ, बांकदार हनुवटी...या तिच्या साऱ्या अवयवांवरून आकाशपटावर वेडी वांकडीं वळणें घेत जाणारी रेषा, मजसारख्या चित्रकाराला आकर्षक कां वाटूं नये ?......

‘ मिरे, किती गोड मुलगी आहेस ग ? ’ मी पटकन म्हणालों; मिरा नुसती मान वळवून हंसली.

मागें धांवणाऱ्या झाडांकडे व भोंवतालच्या त्या देखाव्याकडे, मी अगदी उत्साही मनानें पहात होतों. आमच्या लहानपणच्या किती तरी आठवणी, माझ्या मनांत सारख्या येत होत्या. मिरेलाहि आठवत असेल का तें सर्व ? या कल्पनेनें मी तिजकडे पाहिलें; तों तिचा चेहराहि आनंदोत्साहानें प्रफुल्ल दिसत होता.

“ तुम्हाला त्या दसऱ्याच्या दिवसाचा प्रसंग आठवतो का अरुण ? ” मिरा हंसत हंसत माझ्याकडे वळून एकदम म्हणाली, “ जावळ्या आणि काळ्यांना आपण झेंडूच्या गोंड्यांनीं सजवलें होते. शिगांना गेरूचा तांबडा रंग अन् बेगडी ... गळ्यात नुसत्या माळाच माळा ! अन् मग किती पिटाळली होती आपण गाडी ? चौखूर दौड अन् घुंगुराचा खुळखुळ आवाज ! आठवतं ? ... शिनवार झाला होता दुसऱ्या गाडीचा खेळ्या ! त्यानें बैलाना रक्तबंबाळ केलें होतें, पराणीचे गोदे मारून मारून ! ... पण काय उपयोग ? ... गाड्यांच्या काढाकाढींत आपणच शेवटीं पुढें गेलों ! नाही ? .... आणि तो मग किती पण चिडला ... त्याची आपण खूप टर केली होती त्यावेळीं ! ” ...

“ हो ... हो ” मलाहि सर्व आठवून मी एकदम म्हणालो, “ आता अलीकडे शिनवार काय करतो ग ? ”

“अगदीं वाईट झालाय” मिरा तोंड वेडेवाकडे करून मजकडे पहात म्हणाली, “ कुठं तरी भटकतो, ताडी पितो, विड्या ओढतो—सारं काहीं .... परवाच रस्त्यात पडला होता तर्र होऊन!... ”

मिरानें जातां जातां सांगितलेली आमच्या त्या बालसोबत्याची हकीकत ऐकून मला वाईट वाटलें. त्यावेळीं माझ्या मनांत आलें, कोणाचा आयुष्यक्रम कसा बदलेल ते सांगणे कठीण आहे. आणि खरेंच, आता तर मला तें जास्तच वाटते आहे !

मिरा बोलत होती खरी, पण तिचा चेहरा मात्र श्रमानें आरक्त झाला. मी पटकन् तिच्या हातातील पागा काढून घेऊन तिला म्हणालो, “ पुरे बरं का बाईसाहेब, बायकाचें नव्हे हें काम ! ”

“ हो हो तरं ! दमलें नाहीं काय मीऽ ” तसें मिरा म्हणाली खरी; पण मी पागा माझ्या हातीं घेत असतांना तिनें फारसे आढेवेढे घेतले नाहींत. तरी देतां देता तिनें म्हटलेंच, “ बायका म्हणजे दुबळ्याच जणूं !! ”...

: ३९ :

थोडा वेळ आम्हीं दोघेही स्तब्ध होतों. रस्त्यानें उजवें वळण घेतलें, तेव्हां आम्हाला उजव्या बाजूस आपल्या घराजवळील चिमणाजीअप्पाचा पडका वाडा

लाबवर दिसूं लागला; आणि त्याच्या ढासळलेल्या बुरुजाजवळचें जुनाट देऊळ मला पटकन् आठवलें.

मी त्याविषयीं काहीं तरी बोलणार इतक्यात तिकडे बोट करून, मिराच म्हणाली, " तें देऊळ अन् त्याच्या जवळचा हिरव्या पाण्याचा छोटा तलाव ! आठवतो तुम्हाला, अरुण ? ... "

तो प्रश्न ती का विचारीत होती, तें मला लागलीच समजले.

लहानपणी, एकदा असेच आम्ही दोघे बालिश गप्पा मारीत, त्या तलावा-जवळच्या एका कुडीवर बसलो होतो. बोलण्याच्या भरात, मिरेचा एकदम तोल जाऊन ती पाण्यात पडली. कुंडीतले पाणी ते केवढेसे? पण ती त्यावेळीं फार घाबरली. विजार न काढताच, मी एकदम आत उडी मारली व मिरेच्या बावळयांना धरून, तिला वर ओढली. आपला भिजलेला परकर पिळत, तिनें केवढ्या कृतज्ञतेने, त्यावेळी माझ्याकडे पाहिले होते ? मी तेथे होतो म्हणूनच, जणूं काय, ती जिवंत राहिली, असे तिला त्यावेळी तिच्या बालिश समजुतीप्रमाणें वाटले होते. ' आजची मिरा काहीं तितकी पोरकट, घाबरट, बावळट नाहीं, ' असे सागण्यासाठींच, तिने तो प्रश्न विचारला असेल, असे मला प्रथम वाटलें.

पण माझा तो कयास चुकीचा होता. ती एकदम पुढे म्हणाली " गेल्या वर्षी उन्हाळयात एक मिशनरी मडम बाई आली होती इकडे अरुण! .... म्हातारीच होती .... काय बाई तिचे नाव ? होय काइड वाटतं ! ती म्हणत होती, त्या तलावाच्या तळाशीं चिमणाजीआप्पानीं स्वतः सागितलेला कसलासा संदेश खोदला आहे. किती फरडं मराठी बोलत होती ती, अरुण? बरोबर कोणी एक युरोपियन म्हातारा होता; तो तर असले शोधच करीत फिरत असतो म्हणे. किती प्रेमळ होती म्हातारी ती! अन् कित्ती कित्ती गोष्टी सागितल्यान् तिने मला ! अन् मग शेवटी जाताना म्हणत होती, मला माझ्याबरोबर चल म्हणून "

" अस्सं ! अन् मडम व्हायला नव्हती का सागत ती तुला ? " मी तिची थट्टा केली.

" इश्श !" मिरा त्यावर काहीं तरी म्हणाली.

: ४० :

बैल अगदींच मंदावले होते. मनगटावरील घड्याळ पाहिलें, तों गाडीला अवघीं वीस मिनिटे राहिलीं होती. स्टेशन अजून पाऊण मैलावर होतें. जवळून जाणाऱ्या गराडीला गाडी लावून मी पराणी मारताच बैल जोराने धांवूं लागले. पण मिरेचे तिकडे लक्ष होते.

'पुरुष एकंदरींत निर्दयच हो!' ती एकदम मला म्हणाली. 'तुम्हाला त्यांना दुखवतं तरी कसं बाई? आमचा बाबा तर रक्तच काढतो जोडीचं, रोज! अयाई ऽ! कविता मात्र कराल, अऽ! आपलं काव्य अन् आपलं वागणं निराळं असतं तर?...'

तिच्या तसल्या कोवळ्या मनाच्या उद्गारामुळे मला एकदम लाज वाटली. किंचित् हसूहि आले! आणि मी लागलीच काठीचें साधे टोंक पुढे केले.

पण तेवढ्या घाईत, माझ्या पागा धरलेल्या डाव्या हाताच्या मनगटाला, ती पराणी, चाटून गेलीच! मिरेचे लक्ष तिकडे झरकन् गेलें! भळकन् रक्त येऊन ओझरत होते.

"अगबाईऽ!" म्हणत तिने माझा हात झटकन् आपल्या माडीवर ठेवला व आपल्या पदराने ती ते रक्त पुसूं लागली.

"काय झालं? अंऽ? अग थांब, मिरे! इतका काहीं नाजूक नाहीं मी!" हात मागे ओढीत मी म्हणालो; पण तिच्या धडपडीची गमत वाटून मी पुढें म्हणालो, "पण काय ग, आता बैलाना पराणी लागली, तेव्हा नाही धावलीस कुठे कळवळून?"

मिराला उत्तर आठवेना. निदान सांगवेना!

: ४१ :

पण माझा हात तसाच हातात धरून ठेवून, माझ्याकडे पहात ती स्मित करून सौम्यपणे म्हणाली, "थाबा ना, रुमालाने बाधतें तरी तेवढा!"

तिने त्यावर तोंडाची वाफ घातली; आपल्या पोलक्यातील बारका रुमाल काढून फाडला व त्यानें माझे मनगट घट्ट बाधले. मग माझ्या हाताकडे ती अगदीं प्रेमपूर्ण नजरेने पाहूं लागली. तसे पहातां पहाता तिचे डोळे ओले झाले होते!

"मिरे, किती प्रेमळ पोरगी आहेस ग तूं!" मला राहवेना, म्हणून मी प्रेमानें तिजकडे पाहून म्हणालों आणि मनातील भाव दाखविण्यासाठी, तिचा हात हातीं घेऊन थोड्या प्रेमाने दाबला.

थोडा वेळ अगदीं शांत होते! मी बोललो नाही, मिराही गप्पच होती. पण मग एकदम माझ्याकडे वळून कंपित स्वरानें मिरा म्हणाली, "हो अरुण, मी वेडी भोळी आहे. आजपर्यंत, माझें काय होणार याची मला कल्पनाच नव्हती. पण आता मला तशी हुरहूर वाटायची थाबली! तुम्ही मला आपली म्हटल्यावर ... अरुण ... आता माझ्या आयुष्यातील एकटेपणा ...."

ती बोलता बोलतां जड आवाज होऊन एकदम थांबली.

आणि मावशी, किती प्रबल ग तिच्या भावना? तिने अगदीं विश्वासानें, प्रेमाने, उत्कंठतेनें मला एकदम घट्ट मिठी मारली.

माझें हृदयहि भरून आलें होतें. शरीर कांपत होतें. पण तिच्या खांद्यावर हात ठेवून, किंचित् संयमानेंच मी तिला शात केलें.

: ४२ :

गराडीचे शेवटलें वळण आलें होते. मऊ मातींतून गाडी सरपटत होती. चाकाचा 'सरसर' आवाजच काय तो ऐकूं येत होता. दोन्ही बाजूच्या शेतांतून उभे असलेलें गवत सळसळत होतें. कापलेल्या गवताच्या राशी व गसड्या करावयाचे प्रेस पडले होते.

आम्ही स्टेशनवरील वस्तींत शिरूं लागलेले दिसतांच, मी दचकून घड्याळाकडे पाहिलें. गाडीला पांच मिनिटें राहिली होतीं! उजाडले होतें तरी बरीच घरें अजून उघडलीहि नव्हती. एखादंदुसरें माणूस रस्त्यावरून जात येत होतें तेवढेच.

मिरानें आता स्वतःचा भावनावेग स्वतःच आंवरला आणि ती सारखें बोलूं लागली. 'माझी आठवण राहील ना नेहमीं? पत्राने माझ्याशीं बोला हं अरुण! सागा मला मी काय काय करूं तें! ....'

जणूं काय, तिला वाटत असावे आता वेळ पुरायचा नाहीं. एकेका तुटक वाक्याने, ती मला सूचना करीत होती. इतक्यात स्टेशनात शिरत असलेल्या गाडीच्या "घोऽऽ... आवाजानें मी भानावर आलों; सारवट गाडी चटकन् स्टेशनच्या आवारात वळवून, मी पागा धुरांडावर टाकल्या, व आपली बॅग हातात घेऊन खालीं उतरलो.

क्षणभरच थबकलों, मिरेचा हात हातीं घेऊन तिच्याकडे पहात, मीं तो प्रेमाने हळूच दाबला.

'त्यावेळी तिचे डोळे अश्रूंनीं अगदीं भरून आले होते.

आणि माझा गळा.....? तोहि दाटला होता!

: ४३ :

'तूं खाली उतरूं नकोस, मिरा!' तिचा उतरण्याचा प्रयत्न पाहून, मी म्हणालों. तेव्हा उतरता उतरतां, ती नाइलाज म्हणून पुन्हां मुग्धपणें आंत बसली. तिला बोलणेंहि शक्य होत नव्हते.

"गराड आहे हो, पुढे! संभाळून नेशील ना गाडी? नाही तर वर चढवून उलटवशील!" मी कांहीं तरी विचारायचे म्हणून विचारलें. मिरेनें पुन्हां "हो—नाहीं" अशी मान हालविली.

"मैलभरात धर्मा भेटेलच म्हणा तुला!" मी जातां जातां वळून तिला म्हणालों, "पण घरीं तुला रागावतील ते ग?"

पण ती निश्चयी पोर, त्यावेळीं एकदम अवसान आणून म्हणाली, "कांहीं नाहीं

आणि मी नाहींच घाबरणार कोणाला! कां म्हणून घाबरूं? जाऊन कमळा-मावशीलाच सांगतें सगळं कांहीं! अरुण माझेच आहेत म्हणून सांगेन!" ...

तिच्या डोळ्यांत खरोखरच प्रेम भरलेलें दिसत होतें. आनंद दाटला होता!...

मी तिचा हात सोडला व पुढें म्हटलें,– "हं आतां फिरव पाहूं जोडी..., पुन्हा तूं केव्हां भेटणार?"

"तुम्ही भेट द्याल तेव्हां!" तिनें हंसूनच, अडखळत म्हटले व काहींशा प्रयासाने गाडी वळविली.

लांब जातां जातां, तिचे डोळे पाण्यानें डबडबले होते. मिरा हात वर करून, शेवटीं अगदीं अस्पष्ट शब्दात मला म्हणाली, "अरुण, नेहमीं माझी आठवण ठेवा हं... !"

: ४४ :

दोघानाही त्या वियोगांत त्यावेळीं दुःख वाटत होतें. पण नवा आनंदहि वाटत होता.

त्यावेळीं तो असा चिरवियोग ठरेल, सारें इतकें विपरीत होईल, अशी आम्हाला कल्पनाहि नव्हती.

पण आज ... काहीं का कारण असेना. माझी मिरा मला सोडून गेली आहे! ... झालें ते झालें ...

पण कुठे गेली असेल ग ती, मावशी! काय करीत असेल?

असले विचार मनात आले, कीं माझा जीव बेचैन होतो. डोकें सुन्न होतें.

आणि याचा एकंदर परिणाम म्हणजेच माझे दुखणे! ... माझा निरुत्साही-पणा! ... माझें अभ्यासक्रमातील अपयश! ...

माझ्या आजाराच्यावेळीं बाबाच्या जीवाची कोण धडपड?... मला आतां बरें वाटत असलें, तरी घरांतल्या घरांतच आहे अजून. एक पंधरवडा तरी साफ बरें व्हावयाला पाहिजे.

आता जास्त काय लिहूं?

तुझा – अरु.

(४)

ता. २ मे १९२४.

चि. सौ. कमळीस, अनेक आशीर्वाद विशेष......

तुझ्या पत्रावरून, चि. विनायक आजारी होता, तें समजलें. जीवन पाटील मुंबईस आला होता; तों सहज, मध्यें एक रात्र मजकडे वस्तीस राहिला तो म्हणाला, आता तुझ्या मुलाची प्रकृति सुधारली असून तो पुन्हां खेळूं वगैरे लागला आहे. त्यामुळें मनाला बरें वाटलें. मुलाच्या प्रकृतीविषयीं, असेंच वरचेवर लिहीत जावें.

जीवन पाटलाबरोबरच, चि. भाऊहि मुंबईस आले होते, असें समजले. ते मजला का भेटून गेले नाहींत, तें समजत नाहीं. कधीं आले तर ते मला, भेटतात म्हणा, तर आजच भेटतील ! पण आपलीं माणसें म्हणून विचारावेसें वाटतें, एवढेंच. .कोठूनहि तुम्ही सुखी असलात म्हणजे झाले !

चि. अरुण मध्यें थोडा आजारी होता. आता बरा आहे.

त्याच्या भवितव्याविषयीं मात्र मला अलीकडे फार काळजी वाटते. तुला ठाऊक झाले असेलच, कीं, यंदा तो परीक्षा नापास झाला.

: ४६ :

तूं आजपर्यंत लपवून ठेवलें होतेंस; पण मला आता सर्व हकीकत सहज समजली आहे.

केवळ तुझ्या आग्रहामुळेंच, मी अरुणला तुझ्याकडे ठेवला होता. आणि तो तसा जात्या हुशार असल्यामुळे, मी थोडा फार निश्चितहि होतों. पण, मला आज ज्या गोष्टी जीवन पाटलाकडून समजल्या, त्यावरून आतां तर तो माझ्या विश्वासास मुळींच पात्र नाहीं अशी माझी खात्री झाली.

त्याची आई वारली त्या वेळी तो केवळ पाच वर्षांचा ! तरी, आपल्याला ज्या सोयी मिळाल्या नाहींत, त्या त्याला पुरवून तो कोणी तरी मोठा व्हावा, ही माझी त्यावेळीं फार महत्त्वाकांक्षा होती. पण, गेल्या तेरा चौदा वर्षात, त्याच्या-विषयींच्या माझ्या आकांक्षा, दिवसेंदिवस मावळतच चालल्या आहेत.

तो तुझ्याकडे असतांनाच्या काळात, मजकडे मधून मधून सुट्टींत येऊन जाई, तेवढाच काय तो त्याचा माझा सहवास ! त्यामुळे त्यावेळीं मला त्याचें विशेष असें कांहींच समजत नसे. तुमच्या गावची शाळा संपल्यावर, तुझ्या जवळच्याच बोर्डीला तो राहूं लागला. वास्तविक तेव्हांपासूनच, मी त्याला मजकडे ठेवण्याच्या विचारात होतों. पण त्या सुमारासच, मला हुजूर डेप्युटीची जागा मिळाल्यामुळें व वारंवार माझी बदली होत राहिल्यामुळें, शेवटीं, त्याला मी तेथील बोर्डीला ठेवण्यास कबूल झालों.

त्याने आय. सी. एस्. ला जावें, ही माझी प्रथमपासूनची खरी मोठी इच्छा होती. पण आता तर तें त्याला जमणें मुळींच शक्य नाहीं. त्याच्या इच्छा

आमच्याहून साफ निराळ्या. बराचसा वेळ तो चित्रकला, कविता वगैरेंत घालवितो.

आणि याचा परिणाम व्हायचा तोच होतो. मॅट्रिकमध्यें तो नुसता पास झाला. प्रीव्हियसमध्यें दोन वर्षांनी त्याला जेमतेम पुढील वर्गात बसण्याची परवानगी मिळाली होती. गणित विषय मागे राहिलाच होता. आतां माझ्या कल्पनेप्रमाणें डॉक्टरीसाठी सायन्स घेतलन्, पण त्यातही या वर्षी गोता खाल्ला.

अशा स्थितीत माझे मन अस्वस्थ होतें. निराश होतें.

: ४७ :

पण सदा पाटलाच्या मिरेचा व त्याचा कांही संबंध आहे हें मला आजपर्यंत माहीत नव्हतें. आपल्यापुढे असलेल्या महत्वाच्या गोष्टी सोडून, तो असल्या अवातर गोष्टींत लक्ष घालील, ही मला कल्पनाहि नव्हती. एका साध्या वाड-वळच्या मुलीकडे त्याचें लक्ष जातें, याचा अर्थच तो अत्यंत चंचल, क्षणिक क्षुद्र भावनाना बळी पडणारा आहे.

जीवन पाटलानें सांगितलेली त्यापुढील हकीकत खरी असेल, तर मी मोठ्या आपत्तींतूनच सुटलो म्हणावयाचे. मिरा घरातून एकदम कोठें नाहींशी झाली, ते त्याला किंवा कोणाला माहीत नाही असें दिसतें. त्या मुलीलाहि मागाहून लाज वाटली असेल. आपल्या पुतणीबद्दल जीवन पाटील मजजवळ हळहळत होता; आणि तें सहाजीक आहे.

अर्धवट शिक्षणामुळें असल्या गोष्टी घडतात, असे मी म्हटलें असतें; पण त्याबाबत तूं व भाऊ दोघेहि दोषार्ह आहा, असे मला वाटतें. त्याला वाटेल तसें स्वातंत्र्य मिळत गेलें; आणि आपल्या कर्तव्याकडे त्याचें जितकें लक्ष पाहिजे होतें, तितके त्यानें दिले नाहीं, या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणूनच तो यंदा परीक्षेंत नापास झाला. मला वाईट वाटेल, राग येईल, म्हणून तुम्हीं हें सर्व आतांपर्यंत गुप्त ठेवलेंत खरें. पण ते चुकीचें व मूर्खपणाचेच होतें.

अरुणविषयीच्या माझ्या बऱ्याच अपेक्षा, आधीच नाहींशा झाल्या होत्या. त्याच्याविषयींचा, पूर्वी वाटणारा उरला, सुरला विश्वासहि आता नष्ट झाला आहे.

आता माझ्या नशीबीं त्याच्यापासून सुखच नसेल, तर त्याला तुम्हीं सारीं किंवा तो तरी काय करणार?

: ४८ :

एवढें बरीक खरें कीं, त्याला मिळत असलेल्या साऱ्या संधींचा तो मुळींच उपयोग करून घेत नाही. त्याच्या वयांत आम्ही असतांनाची, आमची अन्नान्न व हलाखीची दशा आठवली, आणि त्यांतून आम्ही ईश्वरावर हवाला ठेवून, कोणाचें साह्य नसता, कोणत्या प्रकारें कसेबसे वर आलों, याचें स्मरण झाल,

म्हणजे मन अत्यंत कष्टी होतें; व मग वाटतें कीं, या मुलाचें भवितव्य अत्यंत दुःखी आहे!

पण जे होणार असेल ते, माझ्या बोलण्यानें किंवा काळजी करण्यानें थांबणार आहे थोडेच?

काहीं म्हटले तरा मला माझ्याकडून शक्य तो प्रयत्न करण भाग आहे. चि. अरुणचे चित्रकलेचे वेड तर फारच बळावत चालले आहे. त्या नादात तो आपला अभ्यास वगैरे सर्व विसरतो. त्यात तुम्ही मजपासून आतापर्यंत गुप्त ठेवलेल्या, मनाला धक्का देणाऱ्या या प्रकरणाची भर पडली असावी.

त्याच्या बाबतींत, आता मी ठरविलें आहे तें एवढेंच. त्यानें, यापुढें माझ्या जवळच शिकावयास राहिलें पाहिजे ... स्वातंत्र्यास तो नालायक आहे.

पण मी तरी हल्लीं एके ठिकाणी स्थिर कोठें आहे? वारंवार बदली व्हायचे हे दिवस. तेव्हा सध्यां, मी त्याला यशवंतदादांजवळ दादरला राहावयास नाइ-लाजानें सांगितलें आहे. तेथून तो रोज मुंबईस कॉलेजांत जात जाईल. तसा तो आता मोठा झाला असल्यामुळे, त्याच्यावर थोडा विश्वास टाकलाच पाहिजे. नाही तरी त्याच्यावर, आपण दुसरें लक्ष तें काय व कसें ठेवणार?

आणि तसा तो मुलगा वाईटहि नाहीं. एकदां वाटतें, आपल्याच मार्गानें जाऊन, एखाद्या वेळीं आमच्या घराण्याचें तो नाव काढील. पण त्याचीं तीं वेडें! त्याचा परिणाम त्याच्या मुख्य अभ्यासक्रमावर होतो. त्याला आतां मी उपाय तरी काय करूं?

गेल्या महिन्यांतील त्याच्या आजारांत, मला बरीच धास्ती वाटत होती. पण शेवटीं, तो दुखण्यांतून शिरसलामत सुटला एकदाचा! मध्ये बराच अशक्त झाला होता. त्याचा आधींचाच रोगटपणा दुखण्यामुळें जास्त वाढला होता.

ती एक नवीनच काळजी होती! पण आतां तो बरा आहे.

माझे आयुष्य एकामागून एक येणाऱ्या काळजींना तोंड देण्यासाठींच आहे. त्याला कोणाचाच इलाज नाहीं.

तुझी प्रकृति ठीक असेलच. धाकटी कुंदा आतां कशी आहे? खूप बडबड करते असे जीवन पाटील म्हणत होता. असो. त्या सर्वांना माझे अनेक आशीर्वाद. कळावें.

तुझा—बाबा ठाकूर.

(५)

ता. २६ आक्टोबर १९२४.

चिरंजीव सौ. कमळीस अनेक आशीर्वाद विशेष.

परवां मी व अरुण तुजकडून परत आल्यानंतर मला सारखें अस्वस्थच वाटत आहे.

माझ्या या वयांत, माझ्यादेखत लहान लहान मुलें जातांना पाहून, मन अगदीं व्याकूळ होतें. चार महिन्यांपूर्वीच, चि. गंगूचा तरणाताठा नवरा, एकाएकीं न्युमोनियानें गेल्यामुळें, ती उघड्या कपाळानें घरीं आली होती. बिचारीच्या त्या तरुणपणांतील करुण स्थितीनें माझें हृदय पिळवटून गेलें होतें! त्या नंतर तीहि विषमज्वरानें एकाएकीं निघून गेली! सुटली बिचारी. तें दुःख मनाला होत होतें, त्यातच तुझा मनोहर आजारी असल्याचें ऐकून, मी गडबडीनें माझें काम टाकून तुझ्याकडे धांवत गेलों.

तेथें गेल्यावर, तुझा लहानगा मुलगा एकाएकीं नाहींसा होईल, ही मला त्यावेळीं कल्पनाही नव्हती. पण झालें ते सारें विपरीतच. तो आठ नऊ दिवस आजारी पडतो काय आणि चुटकीसारखा निघून जातो काय!

: ५० :

तथापि आमच्यापेक्षाही तुलाच अत्यंत दुःख झालें असेल. बोलायला कुणी नाहीं, तेव्हां त्या सोनगावसारख्या खेडेगांवांत एकटी एकटी बसून तर तूं काय करत असशील कुणास ठाऊक?

पण कमळे, होणाऱ्या गोष्टींपुढें कोणाचाच इलाज नाहीं. तुझ्या इतर मुलांकडे पाहून आपलें दुःख गिळावयास नको कां? हा अनुभव तुला अगदीं नवीनच आहे. माझ्या आयुष्यांत दुःखाचे असले अनेक प्रसंग येऊन गेले. पण सुरवातीपासूनच माझा थोडा कठीण आयुष्यक्रम गेला असल्या कारणानें, प्रत्येक वेळीं मी मनावर लौकरच ताबा मिळवूं शकलों. संसारांत असलीं दुःखें यावयाचींच. त्याना धैर्यानें तोंड देणें यांतच सर्व असतें!

माझे वडील अगदी लहानपणीं वारले. आणि त्यानतर झालेली आमची असहाय्य स्थिति! किती खडतर प्रसंग! आमच्या आईच्या पुण्याईनें म्हणूनच आम्ही आमचा पुढचा मार्ग काढीत येथवर आलों. कसाबसा शिक्षणक्रम संपला व थोडे स्थिरस्थावर होतों तोंच आमचे मामी व मामा एकामागून एक गेली. चांगले स्थिर होतों, तेवढ्यांत धाकटा भाऊ श्रीनिवास एकाएकी घरातून नाहींसा झाला. आमच्या कुटुंबाला बसलेले असले हे पहिले महत्वाचे धक्के तुलाहि ठाऊक आहेत. त्यानंतर तुझी बहीण आपल्या लहान लहान मुलांना

माझ्या हवालीं करून अगदी अकालीं मरण पावली. त्यावेळीं माझ्या मनाला झालेलें दुःख मी तरी कुणाला सागितलें बरें ? आणि तिच्या मागूनच माझी एका-मागून एक गेलेली लहान लहान मुलें; त्याचे अनपेक्षित मृत्यू माझ्या मनाला काहीच पीळ पाडून गेले नसतील का ? हो, गेल्या काहीं वर्षांतील असल्य अनेक लहान मोठ्या धक्यांना मी तोंड देत आलों.....

: ५१ :

दुःखाची असली मोठी झळ अजून तुला लागली नव्हती, पण या असल्या प्रसंगीं कठोर मनानें सर्व दुःख तूं विसरलें पाहिजेस. तूं तशी सूज्ञ आहेस. तेव्हा त्या बाबतींत, मी आता आणखी जास्त लिहून, तुला पुन्हा पुन्हा कष्टी करूं इच्छित नाहीं.

चारपांच दिवसापूर्वीच, यशवंतदादाच्या विठोबाआण्णांची बायको बाळंत-रोगाने मरण पावली. रोग्याची नीट काळजी घेतली गेली नाहीं, हेच त्याचें कारण असावे असें मला वाटले. एक भाऊ जाणार सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत नोकरीवर; दुसरा अण्णा; त्याची सारखी धडपड चालून असते. तो आपला आपल्या निरनिराळ्या प्रकारच्या व्यापारामागें बायको मात्र बिचारी कंटाळलीच होती. झालेलीं मुले तशी निरोगी खरीं, पण अगदी थोडथोड्या अंतराने पाचसहा बाळंतपणें म्हटलें म्हणजे तिची प्रकृती ठीक रहावयाची कशी? घरात तिची व्यवस्था पहाणार म्हणजे यशोदावहिनी व दादा. आणि त्याचे तऱ्हेवाईक स्वभाव तुला माहीत आहेतच ! आता झालें ते बोलून येत नाहीं. पण देखत देखत लहान लहान पोरें, सध्या उघडीं पडलेलीं पाहिलीं, म्हणजे वाईट वाटते !

: ५२ :

कमळे, तुला हे सारे असे मुद्दाम लिहिण्याचे कारण म्हणजे जगात सगळी-कडेच दुःख पसरलेलें आहे !

परवा वसंता मजकडे आला होता. नानांचा व्यवहार हल्ली तोच पहातो. पण त्याचे मन मला कधीं आनंदीं दिसत नाहीं. त्याची बायको चि. सुधा आहे तशीच बिछान्यावर आहे. त्याचें लग्न झालें आहे एवढेंच. पण त्यानंतर क्षयाने ती जी नबळी झाली, ती तीनचार वर्षे झालीं तरी अजून काहीं गूण नाहीं. वसंत मात्र तिची मनापासून शुश्रूषा करीत असतो. तोही असाच कांहींसा ध्येयामागे लागलेला मुलगा आहे !

ठिकठिकाणीं मधून मधून आपल्या अरुणचीं चित्रे वगैरे येतात, त्यांचीं त्या-दिवशीं, तो मजकडे अगदी मनापासून स्तुति करीत होता. जणू काय, भावी काळांत,

अरुण कोणी बडा चित्रकारच होणार आहे. पण काहीं असलें तरी, अरुणचा बराचसा वेळ या असल्या भानगडींतच जात असावा असें दिसतें. एकंदरींत, हीं चिन्हे मला तरी समाधानकारक वाटत नाहींत.

त्याची परीक्षा, आता दोन तीन महिन्यावर आली असेल. तरीही त्याचे अभ्यासाकडे दुर्लक्षच दिसते. पुन्हा यंदाही नापास झाला नाहीं म्हणजे मिळविली. तुला ठाऊकच आहे, हल्लीं दुसऱ्या सहामाहीपासून तो दादरला यशवंतदादाकडे रहात नाही. अभ्यासासाठीं वसतिगृहातच असतो.

दिवाळीच्या सुट्टीत तो घरीं आला होता. त्यावेळीं, अभ्यासासाठीं काळजी घेण्याबद्दल मी त्याला बजावले. तूंही, त्याला पत्र लिहून कांहीं उपदेश कर. एकदा शिक्षणक्रम बाजूला पडला, म्हणजे तो कायमचाच बाजूला पडेल, अशी भीति वाटते.

त्याच्याविषयीं मला किती काळजी वाटते, ते शब्दात सांगणे कठीण आहे. असो काय होईल ते ते पहावे.

मुलास आशीर्वाद. स्वतःच्या प्रकृतीस जपून इतर मुलांकडे पहात, आलेला प्रसंग विसरण्याचा प्रयत्न करावा.

कळावे, हे अनेक आशीर्वाद, जास्त काय लिहूं?

तुझा—**बाबा ठाकूर**

( ६ )

ता. ६ नोव्हेंबर १९२४.

प्रिय मावशी,

माझ्याबद्दल बाबाना काळजी वाटते, म्हणून मी माझ्या सर्व आवडीनिवडी बाजूस ठेवून, त्याना समाधान वाटेल असलें यश मिळवण्याच्या खटपटीस लागावे, असे तूं तुझ्या गेल्या पत्रात लिहिले आहेस. पण मावशी, माझ्या मनाची तुला किंवा बाबाना कल्पनाच नाहीं का ग अगदीं? चार माणसे ज्या चाकोरीतून जातात, तसेच मी सुद्धा डोळे बांधून जावें, असा तुम्हां साऱ्यांचा अट्टहास! पण मला काय आवडते, माझ्या काय महत्त्वाकांक्षा आहेत, यांची कधीं तुम्ही विचारपूस किंवा कल्पना केली आहे का?

मी पुष्कळ प्रयत्न केला, पण मला या ठरीव साच्यातून आतां जावेसेंच वाटत नाहीं. केवळ मी–माझें हीच वृत्ति, सर्वांनीं बाळगून वागावे, असें का असावें ग

मावशी आपल्या गोतावळ्याबाहेर व आपल्या स्वार्थाशिवाय कांहींच करूं नये असें म्हटलें तर मग माणसाचा जन्म तरी कशाला पाहिजे तो ?

तुम्हाला वाटतें अरुणनें पुष्कळ शिकावें. देशा–परदेशाच्या पदव्या मिळवाव्यात; एकादी लठ्ठ अशा पगाराचीच नोकरी करावी. पैसा ... पैसा ... माझ्याकडून त्यापेक्षा दुसऱ्या कशाचीच अपेक्षा नाहीं तुमची! होय ना ? जाणत हें सारें कांहीं मी सुद्धा ... आणि तें माझ्या स्वभावाला धरून असतें, माझ्या आटोक्यांत असतें, तर तुम्हीं सुखी व्हावें या दृष्टीनें मीहि समाधानानें तें साध्य केल असतें ....

पण माझ्या नैसर्गिक आवडीला तुम्ही किंवा मी तरी कोण बाध घालणार ?

मला तर उलट पुष्कळ वाटते, आपण सुंदर सुंदर दृश्यें चित्रित करावींत; हृदय उचंबळून आणणारीं मूर्तिमंत कारुण्यें, दैन्यें, कुंचल्याच्या फटकाऱ्यांत धरावीत. कोणी तरी, मानवी मनाचें, त्याच्या जीविताचें, स्पष्ट आविष्करण करणारा कलावंत व्हावें !....

पण ही माझी मनाला कायमची जाळणारी महत्त्वाकांक्षा, तुमच्या अवाक्यांबाहेरची आहे. तुमची आपली एकच अपेक्षा. तुमच्या व्यवहारी धोरणाला धरून माझी प्रगति व्हावी; हो, मी कोणी ठराविक गोष्टींचा, ठराविक वेळात, ठराविक परिणाम दाखविणारें यंत्रच आहे असें तुम्ही धरून चालतां !... क्षणभर थबकून, हृदयावर हात ठेवावयास लावणारें—अंतःकरणाला आंच लावणारें !... जगात कांहीं तरी आहे, असतें,... तुमच्या ध्यानींमनींही नसेल !...

: ५४ :

परवा सुट्टींत मी घरीं गलों असतांना, एके दिवशीं माझ्या खोलींत, माझे अध राहिलेलें चित्र पुरें करीत मी बसलों होतों.

समुद्राच्या उचंबळणाऱ्या लाटावरील तो हाय लाईट किती सुंदर साधला आहे, असेंच मला सारखे वाटत होतें. त्यावेळीं जवळ उभें राहून, कोणी जरी माझ्या त्या एकाग्रतेच्या प्रयत्नाकडे, कौतुकाची दृष्टी टाकली असती, समाधानी अमर सहानुभूतीचे स्मित करून, आपला आनंद व्यक्त केला असता, तरी मला मूठभर मांस चढल्यासारखें वाटलें असतें. पण.....

माझ्या त्या खोलींत एकाकी कोंडून बसलेलों मी! कौतुक करावयाचें तर माझें मीच !

तरी, आत्मनिष्ठ कां होईना, पण त्या तसल्याच समाधानाच्या आनंदात मा होतों; तोच बाबा सहज म्हणून माझ्या खोलींत आले. आणि पाठीवर हात ठेवून ते थोडा वेळ माझ्या मागे उभे राहिले. मला वाटत होतें, ' चांगलं दिसतंय ! कसल रे चित्र तें ? ' असें कांहीं तरी ते मला विचारतील, आणि त्यांनीं मला तो प्रश्न

वेचारला, म्हणजे आपण त्यांना आपल्या त्या व इतर चित्रकलेविषयीं खूप खूप सांगू!'

पण, मध्येंच मी बाबाकडे सहज वळून पाहिलें, तों काय? त्यांच्या कपाळावर आठ्यांचें जाळें पसरलें होतें. डोळ्यांतून नुसता राग दिसत होता. जणूं काय, मी नाहीं त्या उद्योगांत, आयुष्याचा नाश करणारा कोणी महान् पातकीच त्याच्या समोर उभा आहे!

त्याच्या चेहऱ्यावरील, तो अनपेक्षित भाव, मला असह्य वाटला; व ब्रश तेथें तसाच ठेवून, मी बाहेर गॅलरीत निघून गेलों.

५५:

गॅलरीजवळ थोडा वेळ उभा राहिल्यावर, त्या खिन्न मनःस्थितीतून मी किंचित् भानावर आलों, तों सांखळीनें कोपऱ्यांत बांधलेलें, आमच्या घरातील तें कुलंगी कुत्र्याचें लहानगें रोडकें पिलूं, माझे पाय चाटत होते. सहजच मी खालीं वांकून मोत्याचें कपाळ थापटताच, त्याला कोण आनंद झाला! पहिल्यासारखे वर खालीं उड्या मारून, माझ्या खोटाना लटकच चावून, तो आपले प्रेमळ भावच जणूं व्यक्त करीत होता!

पण त्याची ती लाडीक कुरकूर करीत चाललेली धडपड, मला जास्तच व्याकूळ करीत होती!

मागच्याच खेपेला, तें गुटगुटीत लहानगें कुत्रें, म्हणजे आमच्या घरांतील प्रत्येकाचा कौतुकाचा विषय होता. कोणी त्याला दूध पाजी, कोणी गोंजारी, ....

आणि चार महिन्यांनंतरच... आज?....

सकाळसंध्याकाळ मिळणाऱ्या चार चतकोर कोरड्या तुकड्यांवर, त्यानें गॅलरीच्या कोपऱ्यांत, एकाकी पडून रहावें, असें ठरलें होतें. त्याचे, घरांतील अनिर्बंध बागडणें सर्वांना असह्य होई. दोन वेळेला गिळायला मिळतें आहे, नसते धंदे कोणी सांगितले त्याला, ही विचारसरणी तेथें असे; आणि म्हणूनच त्याच्या गळ्यात आतां साखळी पडली होती.

मला त्याची ती केविलवाणी दृष्टि पाहून, मनस्वी दुःख वाटलें. मी हळूच त्याच्या मानेजवळ थोपटलें व त्याची सांखळी पटकन सोडून दिली.

बऱ्याच दिवसांनीं सुटका होतांच, तें तुरुतुरु धांवत घरभर बागडूं लागलें. त्याची ती उड्या मारण्याची धडपड किती गंमतीदार होती. जणूं काहीं आज भरती आलेल्या त्याच्या जीवनसागरावरील फेसच तो!...

इतक्यांत घरांत एकदम गडबड झाली. बाबांचें लक्ष जातांच ते एकदम ओरडले, 'अरे सुटला कसा मोत्या?...'

५६:

तो आवाज व हातांतील लवंगी काठी पाहून, तें बिचारें मागें मागें तिरकें चालत,

शेपूट पायांत घालून सांखळीजवळ निमूट येऊन बसलें. व मान आपल्या पुढल्या पायांत लपवून हूं चूं न करिता अगदीं स्वस्थ बसलें. पाठींत दोन तडाके बसले. ते क्षणभरच कुरकुरले; त्याच्या तें अंगवळणीच पडले होते. आणि त्याच्या गळ्यात पुन्हा साखळी अडकावून बाबा निघून गेले.

साखळीनें बांधलेल्या मोत्याची मजकडे लागलेली केविलवाणी दृष्टि, व पुन्हा सुटे होण्याची धडपड, मला माझ्या त्यावेळच्या मनःस्थितींत तर, फारच जाचक होत होती. मला वाटले, त्याच्या व माझ्या स्थितींत किती साम्य आहे ?

त्याच्याकडे पाहता पाहता, माझ्या मनात क्षणभरच विचार आले, ‘मोत्या, बाबा, तसल्या केविलवाण्या दृष्टीने मजकडे आणखी किती वेळ पाहणार तूं ? माझ्या आवेगाना प्रयासानीं घातलेला बांध, फुटून बाहेर पडायाला आला आहे. हो, माझ्या माणसात रहावयाचे तर मलाही तुझ्याचसारखे, तशाच दृष्टीने जगाकडे पहावे लागतें ! प्रत्येकाला आपल्या इच्छा आहेत. आणि त्याच्या कल्पनाना, अपेक्षाना जरा धक्का बसला, तरी तीं मला तुझ्याप्रमाणेंच बडगा दाखवितात.

पण शेवटीं मी, त्या साखळी तोडून मजकडे येऊं पाहणाऱ्या मोत्याकडें, निरुपायाने दुर्लक्ष करून तेथून बाहेर गेलों.

मावशी, माझ्या मनाला काय होत होतें, ते माझं मलाच ठाऊक !

: ५७ :

गेल्या वर्षाच्या परीक्षेंतील अपयशानंतर बाबाची मजकडे पाहण्याची वृत्तीच हळूहळू बदलत गेली आहे. त्याना माझ्या चित्रकलेचा, संगीताचा, परीक्षेशिवायच्या इतर सर्व बाबींचा अगदीं तिटकारा वाटतो.

माझें अलीकडे गेल्या वर्षी मेडल मिळालेले एक “ गत स्वप्न ” म्हणून काढलेलें चित्र माझ्या खोलींत टेबलावर पडलें होतें. गंगूआक्काच्या मनःस्थितीशीं एक होऊन ते मी काढण्याचा प्रयत्न केला होता. माझ्या सात आठ रात्री त्यासाठीं खर्च झाल्या होत्या.

पण त्याचें बाबाना काय ? त्यानीं सहज तें पाहिल्यावर, त्याच दिवशीं मला बोलावून सागितले, “ तूं या नाहीं नाहीं त्या फंदात वेळ घालवित असतोस तें मला पसंत नाहीं. त्यामुळें तूं आपल्या आयुष्याचा नाश करीत आहेसच. पण त्याबरोबर माझा पैसाही मोफत जात आहे !....”

प्रत्यक्ष बाबाचे हे शब्द माझ्या मनाला टोचल्यावाचून राहिले नाहींत. आणि म्हणूनच मी दुसऱ्याच दिवशीं वसतिगृहात निघून आलों आहे.

आणि या गोष्टीला आठ दिवसही झाले नाहींत, तों आज तुझेंहि एक उपदेशपर पत्र येऊन थडकले !

साऱ्यांच माझ्यावरील प्रेम म्हणजे काहीं तरी मोठी अपेक्षा !

मावशी, लोकांना फक्त उपदेश करणें, हेच आपलें कर्तव्य वाटतें कां ग, तुम्हा लोकांना ?

आतां तुम्हां कोणालाही भेटूं नये, कोठेंही जाऊं नये, असेच मला वाटतें ! नाहीं तरी तुम्हा कोणाकडून सहानुभूतीचा शब्द नाहीं !

तुमच्या घरापेक्षां, माझी चार भिंतींची लहानगी खोली, मला जास्त बरी वाटते. मनाने तयार केलेलें येथील उच्च वातावरणच, माझ्या एकाकी मनाला जास्त सुख. . . .विरंगुळा देतें.

तेव्हा आता आणखी जास्त ते काय लिहूं ?—

अत्यंत सहानुभूतिशून्य आयुष्य कंठणारा,

तुझा—**अरुण**.

(७)

अहमदाबाद ता. २६ एप्रिल १९२५

चिरंजीव कमळीस अनेक आशीर्वाद विशेष—

तुझ्याकडून पत्र आल्यानंतर, बरेच दिवस, कामामुळें मला लिहिण्यास वेळच मिळाला नाही. आज मनाला जरा स्वास्थ्य आहे, तेव्हा तुला पत्र लिहावयास घेतों.

आज दुपारींच, मुंबईहून अरुणचे पत्र आले. वास्तविक, गेल्या आठवड्यात त्याच्या परीक्षेचा निकाल लागावयाचा. मी त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत, त्याच्या तारेची वाट पाहिली. व शेवटीं तर मला वाटले, त्याने पुन्हा एकदा वर्ष फुकट घालविलें असावें. पण दुसऱ्या दिवशीच्या त्याच्या पत्रावरून, तो परीक्षेंत चांगल्या प्रकारें यशस्वी झाल्याचें समजलें ! त्यामुळें मला थोडेसें समाधानही वाटले !

आता, मी पूर्वी ठरविल्याप्रमाणे, त्याने डॉक्टरीच्या परीक्षेसाठीं मेडिकल कॉलेजांत नांव घालावें, असे मी त्याला कळविलें आहे. तुला मागें केव्हा तरी लिहिलेंच होतें. माझ्या ओळखीचा उपयोग करून घेऊन, त्याने मोठ्या सरकारी नोकरींत शिरावें, अशी माझी इच्छा होती. पण, आता, तें दिवसेंदिवस अशक्यच होत चाललें आहे. तेव्हां, मुंबईतील माझ्या एका इंग्लंडरिटर्न्ड डॉक्टर स्नेह्याच्या सल्ल्याप्रमाणें, त्यानें डॉक्टरीची परीक्षा पास व्हावी, असे मी ठरवित आहे. अरुण पास झाल्यावर, माझा तो स्नेही त्याला हाताशीं घेईल. मला वाटतें, त्याच्या हिताच्या व भवितव्याच्या दृष्टीनें, आता तेंच जास्त योग्य होईल.

कोणीकडूनही, त्याने आयुष्यांत सुखी व्हावें, मानमरातब मिळवावा, हीच माझी इच्छा असणार! त्यानें माझ्या संसाराला आतांपासून किंवा पुढेंहि कधी मदत करावयास लागावे, ही माझी इच्छा नाही. ती जबाबदारी संभाळण्यास, मी देवदयेनें पूर्ण समर्थ आहे. आणखी काहीं वर्षे जगलो वाचलो तर, त्याची व त्याच्या धाकट्या भावाची–शरदची, माझ्यापुढेंही चागली व्यवस्था चालेल, अशी सोय करून ठेवल्याशिवाय मी राहणार नाहीं. तुझ्या बहिणीची आठवण माझ्या मनात जोंपर्यंत जागृत आहे, तोंपर्यंत, अरुणचें भवितव्य शक्य तितकें उज्वल करण्याचे माझें कर्तव्य, मी जबाबदारपणें पार पाडीन, अशी मला फार उमेद वाटते.

थोडीशी काळजी वाटते, ती माझ्या दोघा अज्ञान मुलाची. अरुण मनाचा प्रेमळ आहे, तो शरदला किंवा सुनीतीला अंतर देणार नाही, अशी मला खात्री वाटते हे खरे; तरी मनुष्यस्वभाव आहे. कोणाच्याहि मनांत, असला सूक्ष्म संबंधभेद देखील केव्हां भरेल–उसळी मारेल, सागतां येणार नाही!

हल्ली मी सुनीतीला पुण्यास हुजुरपागेंत ठेवलें आहे. तिला पाहिजे तितकें शिक्षण घेण्याच्या तिच्या इच्छेआड मी येणार नाहीं. पण, माझी प्रकृति सध्या बरी नसते. आणि अरुण हा असा भराऱ्या मारणारा तरुण; त्यामुळें तिचे आपल्या देखतच लग्न झाले, तर बरें, असेहि एकेकदा वाटतें. तसेच शरदचें शिक्षण त्याच्या इच्छेप्रमाणें. व्हावे व त्यालाहि आपल्या डोळ्यादेखत जगात स्थिर झालेलें पहावे, ही इच्छा आणखी मनात सारखी बळावते.

: ५९ :

आणि तसे पाहिलें तर, आमचें कुटुंब अजूनही एकत्र स्वरूपाचें आहे. प्रत्येक जण आपआपल्या कर्तृत्वाने मिळवीत असला, प्रत्येकाचा व्यवहार स्वतंत्र असला, तरी आमचें जेवणखाण, राहणे, एकेच ठिकाणीं, नानाकडे कल्याणास होतें.

माझी नेहमीं नेहमीं,बदली होत गेल्यामुळें, मला नोकरीसाठीं आतापर्यंत, फिरते बिऱ्हाड ठेवावें लागलें आहे. यशवंतदादालाही दादरच्या शाळेंत नोकरी असल्यामुळें, त्यानें तेथे आपले बिऱ्हाड ठेवले आहे. पण तो किंवा मी, वर्षातील मोठ्या सुट्यामध्ये व मध्येही जाऊन येऊन, सणावारीं कल्याणास जात येत असतोंच.

आता, तेथील खर्चाच्या बाबतींत मला बराच त्रास सोसावा लागतो. वर्षातून कुटुंबांतील बहुतेक मंडळी कल्याणासच असते. नाना गावंढ्यावरून–वर्षभर पुरण्याइतकें नाहीं, तरी–थोडें फार भात सडून पाठवतात, व त्यांच्या मालकीच्या घरामुळे घरभाड्याचाहि प्रश्न राहत नाहीं, हें खरें!

पण इतर सर्व वरखर्च बहुतेक मलाच चालवावा लागतो. त्याबद्दल माझी

तरी कुठें कुरकुर आहे म्हणा? कारण, आपल्या कुटुंबासाठी आपण झीज सोसण, हें मी माझें मुख्य कर्तव्यच समजतों. आणि त्याप्रमाणेंच आजपर्यंत मी वागत आलों आहे. तुला ठाऊकच आहे, घरात स्वतःच्या बायकोसाठीं लुगडें घेतलें, तर नाना दादांच्या बायकांना, मुलींना, तशींच घेण्याबद्दल मी आतांपर्यंत दक्षता बाळगली. माझ्या मुलाबरोबर, घरातल्या साऱ्याच्या मुलांची शाळेची फी, पुस्तकांचा खर्च, भरत आलों. तसाच, घरांतल्या समाईक संसाराला लागणाऱ्या प्रत्येक वस्तूसाठीं खर्च करीत गेलों. तेथे मुक्काम असेल तेव्हां, गड्याला घेऊन स्वतः, भाजीपासून तो इतर सर्व बाजारहाट करावयासही, मी कांहीं कमी केलें नाहीं.

मात्र, या सर्व गोष्टींस लागणाऱ्या पैशाविषयीं, कोणी कधीं मजकडे विचारपूस करीत नसे; व नानाही नेहमीं अगदी तटस्थ रहात. मी मात्र कधीं कोणास विचारून, स्वतःला वाईटपणा घेतला नाहीं. माझी एकच कल्पना असे, कीं, ... ज्या घरात आईची सजीव दैवी मूर्ति वावरत आहे, तेथें तिच्या पायाच्या पुण्याईची आठवण ठेवून, मी या सर्व गोष्टी मनांतल्या मनांत गिळल्या पाहिजेत. तेव्हा घरात कुजबुज चालली, तरी तिकडे दुर्लक्ष केले. उलट, घरांत मंडळींना सक्त ताकीद देत आलों, कीं, 'लागतील त्या सर्व जिन्नसाना, माझ्या गैरहजेरींत, आच्याऱ्यानें पैसे मागितले, तर ते न कुरकुरतां द्या '

पण आईचा स्वभाव तुला ठाऊकच आहे. ती जितकी प्रेमळ आहे, तितकीच तापट आहे. तिचा ओढा यशवंतदादाकडे जास्त; आणि त्याचा स्वभाव तर जन्माचा चिरचिऱ्या व स्वार्थी! मी कुटुंबासाठीं काय करतो हें पहाण्यापेक्षा, माझ्या वागणुकींत क्वचित् काय दोष दिसतात, याकडेच त्याची दृष्टि जास्त! आणि त्यानें कधीं तसा त्रागा केला कीं, आईही, मला नाहीं नाहीं तें बोलल्याशिवाय रहावयाची नाहीं. याचा आमच्या मंडळींना राग येतो. पण मी तें सर्व शांतपणें सोसण्यासच, त्याना उपदेश करून सागतों.

तरीहि,....या साऱ्याचें चीज काय झालें?......एके दिवशीं, भरल्या घरांत, माझ्या भाऊबंदांच्या क्षुद्र स्वार्थीपणाचा व बेफिकीरीचा, एक चमत्कारिक मासला अनुभवून, मी एकटाच रडत होतों. तेव्हापासून, माझ्या खर्चाला मी एक प्रकारें आळा घातला. व स्वतःला व्यक्तिशः सांवरण्याचा कसून प्रयत्न केला!

जाऊं देत त्या गोष्टी!......उगीच त्यांची आजत्र वाच्यता नको!......

:६०:

या गोष्टीलाहि कांहीं वर्षें झालीं आहेत, आणि आतां माझी एकंदर आर्थिक परिस्थीति बरीच सांवरली आहे. त्यामुळें, मनास बराच धीर वाटतो. या उन्हाळयाच्या सुटीला, माझी राहिलेली सगळी सुटी जोडून घेऊन, पेन्शन-

पर्यंतचा मधला दीड वर्षांचा काळ भरून काढण्याचा माझा विचार ठरला आहे; आणि त्याप्रमाणे मला रजा मंजूरही झाली आहे. आतां मागें एकदां तुला म्हटल्याप्रमाणे, घर बाधण्याचा माझा विचार मी कदाचित् नक्की करीन म्हणतों.

तसे आमचे आता यापुढे विशेष काय आहे? नवीन घर बाधलें, तर त्यांत रहाणार म्हणजे अरुण आणि शरदच! तेव्हां अरुणच्याच आवडीप्रमाणे घराचा प्लॅन वगैरे ठरविण्याचा मी विचार केला आहे. तो आतां या आठवड्यांत घरीं आल्यावर, मी हें त्याला कळविणार आहे. पण...घर बाधण्याची दगदग आता मला सहन होईलशी वाटत नाहीं. मला वाटते, तुमचा अरविंद नाईक विश्वासू व होतकरू मुलगा आहे. तो दादर माटुंग्याजवळच इंजिनियरिंग कॉंट्रॅक्टर्सची आपली फर्म चालवीत असतो. त्याच बाजूला जागा घेण्याचे ठरलें, तर बहुतेक त्यालाच कॉंट्रॅक्ट देण्याचा माझा विचार आहे. आता, काय काय, व कसे कसे जुळते ते पाहूं!

मी दोन तीन दिवसात चार्ज देऊन, येथून सध्या तरी कल्याणासच कायमचा रहावयास जाईन. बदलीच्या गोंधळामुळें, तूं बरेच दिवस माझ्याकडे आलेली नाहींस. अरुण पुढील आठवड्यात घरीं येईलसे वाटते. तेव्हा, मुलाना घेऊन तूंही जरूर येण्याचे करावे. तसें मी, चि. अरुणला व चि. भाऊंना लिहिले आहे.

कळावे, हे अनेक आशीर्वाद. **बाबा ठाकूर.**

(८)

मुंबई ता. ९ जून. १९२५.

प्रिय मावशी,

बाबाचा आणखी काहीं दिवस राहण्याचा आग्रह असूनही, तूं काहीं घरकामाचें निमित्त सागून लौकरच परत गेलीस, हें एका अर्थी समाधानकारकच झालें. तरी पण, मावशी, तूं किती चमत्कारिक घटनेमुळें सासरीं गेलीस ग? आणि तें आठवले म्हणजे मला फार वाईट वाटते. काकूला तू सहज कांहीं विचारतेस काय, आणि तिच्या स्वभावाप्रमाणे ती तुला टोचकीं उत्तरें देते काय! खरंच जगात किती चमत्कारिक स्वभावाचीं माणसें असतात ग, मावशी?

कितीतरी दिवसानीं बाबानीं इतक्या आग्रहाने तुला घरीं बोलाविले, इतक्या प्रेमळपणे ते तुझी बडदास्त राखीत होते, कीं, त्याच्या प्रेमळपणानें मलाहि हृदय भरून आल्यासारखें ... दडपल्यासारखे वाटे. पण त्याचें काकूला काय?

वरून ती गाडगाड बोलल, पण तो तिचा खरा स्वभाव नाहीं! तिची बुद्धीच इतकी कोती आहे, कीं, तिला जगाकडे विस्तृत दृष्टीने पहाणें कधींच शक्य होणार नाहीं.

'जन्मल्यापासून सुखांत असल्याबद्दल, स्वतःला ती फार भाग्यवान् समजते. पण तिच्या सुखाची कल्पनाच अत्यंत आकुंचित व क्षुद्र आहे. स्वतःच्या अगदीं लहान प्रमाणांतील सुस्थितीचाही तिला फार अभिमान वाटतो; आणि त्या भांडवलावरच ती आपले मनोव्यापार करीत असते. भोंवतालच्या असल्याच निरुंद वातावरणात, तिचें मन पूर्णपणे रंगूं शकते. निरपेक्षतेचें तिच्या स्वभावाला अगदीच वावडे आहे. जगातील मोठमोठ्या घडामोडी, उच्च बंधनें, तिच्या ध्यानींमनींही नसतात. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे आहो, या भावनेंतच तिच्या आनंदाची उत्पत्ति होते. आपण, आपलीं मुलें व आपले पति, आपलें घर, आपली सुस्थिति, याच केवळ विचारात ती नेहमीं गुतलेली असते!

आणि तसे पाहिलें तर, हीं बंधनें कोणत्या संसारी माणसाला नाहीत? पण त्याला इतर श्रेष्ठ बंधनेंही नमवीत असतात! त्याची तर तिला कल्पनाही नाहीं. माझ्या घरातील हीं माणसें व त्यांच्या संगतीत घडलेल्या असल्या अनेक गोष्टी आठवल्या, कीं, आजच्या मनःस्थितींत तर माझी खिन्नता जास्तच दाट होते आहे! ...

एक एक गोष्टी आठवल्या म्हणजे मन रंजीस होते; आणि आठवले म्हणजे सारें सागितल्यावाचून राहवत नाहीं!...

: ६२ :

तुला ठाऊकच आहे आमचा काळ्या गडी! गेलीं कित्येक वर्षे तो आमच्याकडे नोकरीस आहे. ज्या गावचे सावकार म्हणून नाना परवा परवापर्यंत मिरवीत होते, त्यातल्याच, पैसे व शेतजमीन राखून असलेल्या चांगो पाटलाचा तो नातू. ताडाच्या झाडावर, दारूच्या गुत्त्यावर, शेतजमीन कसण्यावर, चांगोनें आपली लहानगी इस्टेट कमावली होती. पण त्याचाच मुलगा दाम्या, चैनी व दारुड्या निघाला; आणि आज त्याची सारी इस्टेट, त्याच्या नाना सावकाराच्या आहारीं जाऊन, त्याचे हे दोघे मुलगे राघ्या व काळ्या—या घटकेला अन्नालाही मोताद झालेले आहेत. काळ्या लहानपणापासूनच बाबाकडे नोकरीला आहे. आणि तो विश्वासू नोकर सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाला सारखा जुंपलेला असतो.

पण तरीही त्याला आमच्या घरांत कसें वागविलें जाते?

वास्तविक त्याचें मूळचें काटक शरीर! तरी तो आज एक म्हातारा तरुण दिसतो. डोळे खोल गेलेले, बरगड्यांचीं हाडे वर आलेलीं! सहानुभूतीसाठीं आपली भिरभिर फिरणारी नजर त्याने कोठें तरी स्थिर केली, म्हणजे त्याच्या

डोळ्याभोंवतालचीं काळीं वलयें पाहून, त्याची कींव आल्यावांचून रहात नाहीं. दुपारीं व रात्रीं काम आटोपल्यावर उशिरां मिळणारें अन्न, साधेंच पण घरच्या इतर मंडळींप्रमाणे असावे, अशी त्याची इच्छा का नसणार? तो स्वतः आपल्या त्या परिस्थितीत रुळला असला, तरी त्याच्या पानात त्याच्याच पुरता केलेला जाड्या तादळाचा भात, मुलानीं पानावर जास्त मागून टाकलेली भाजी, शिळ्या भाकऱ्या, असले जिन्नस, वाढलेले पाहिले, म्हणजे माणुसकी असलेल्या कोणत्या व्यक्तीला दुःख होणार नाहीं?... आणि ही असली संसारी काटकसर चालली असता, अनेक पदार्थ कीड लागून नासत असले तरी त्याची पर्वा नाहीं! याचा हा असला न्यारा संसार पाहिला, म्हणजे संतापानें तिडिख मस्तकाला जाते!

: ६३ :

उलट तो पोटार्थी खपणारा गडी माणूस; पण, आपल्या म्हटलेल्या माणसासाठीं जीव टाकताना त्याला पाहिले, कीं, खरोखर मन कसें प्रसन्न होते!

मी घरीं गेलो, कीं, माझ्या प्रत्येक गोष्टीची तो आनंदानें व आस्थापूर्वक व्यवस्था ठेवील! हा केवळ सेवाधर्मच नव्हे! त्याला, माझ्याविषयीं, मनांत कसला तरी अकारण जिव्हाळाच वाटतो. मी कधी सुपारीचे खाड त्याच्याकडे मागतों हे लागलीच आठवून, गुरुवारचा उपवास म्हणून स्वतःला पान खायचें नसले, तरी तो आपल्या खिशातील दिडकी काढील; धावत धावत पानें घेऊन येईल आणि त्याची काळी मळकट चंची मजपुढे करीत म्हणेल, "घ्याऽदादा!" त्याच्या लहानग्या पगारातून, अशी माझ्यासाठीं एखादी दिडकी खर्चताना त्याला मी पाहिलें, कीं मला किती आनंद होतो! वाटतो. त्याच्याबरोबर तसें गप्पा मारतां मारतां, त्याच्या मळक्या चंचीतील सुकलेलीं पानें चघळायलाही, मला एक प्रकारची मौजच वाटते! ...

त्या दिवशी, काकूने त्याला मजसाठी पानें आणतांना पाहून, त्याच्यापुढें दिडकी केली. त्यावेळीं तो आपल्या नेहमीच्या खोल चेहऱ्यानें पण खिन्न स्वरानें तिला म्हणाला, 'मना नको बाय दिडकी!' त्याला त्यामुळें वाईटच वाटलें असावे. आणि खरोखरच, त्याच्या मनाच्या या असल्या भावना त्यांना कशा कळणार? त्यासाठीं ती सहानुभूतीची दृष्टीच लागते. त्यांच्या दिडकीसाठीं तो मला पान देत नव्हता. आतून ... मनापासूनच त्याला ती इच्छा व्हावयाची.

पण काकू वगैरेंना असल्यावेळीं त्याचा पाच रुपये पगार तेवढाच दिसायचा!

: ६४ :

रात्रीं कामे आटोपून, माझ्या खोलींत, माझ्या बिछान्याशीं तो थपकल मारून बसला, कीं, आमच्या कितीतरी वेळ दुःखाच्या-त्याच्याच दुःखाच्या—गोष्टी चालतात.

तो म्हणेल, ' काय सागूं दादा ... मी हितं नोकरी करतोय ... पण माजं समदं ध्यान तिकूडं घराकूडं हाय् माझ्या शेतजमनींचं काय झालं अस ऽ ल, त्याची काळजी पडलिय् मना. येकली बायको काय करनार ऽ बापुडवानी! आता दीस आले वोढीचे! राब गोला कराया पायजे व्हता ... घरावर औंदा कौला मिलाली तर घालायचीं हात! ... समदा समदा रायलाय्, आन् घरामंदी लेकुरवाळी बायको येकलीच. मीबी मजुरीला इकडे. ... आता सागा ... ... दोन वर्सा खंडान दिली ऽ जमीन, तर बगा चार मनाचा नुकसान " ...

ऐकता ऐकतां, सहज त्याला विचारावें, " अरे, अशी आहे तरी कितीशी जमीन तुझी ? "

" हायना सोला गुंठ; बारा मन भात येतं " त्याची कहाणी पटकन् पुढें सुरूं होईल ... " बायको येकली खाऊन बी मोप उरतं ... आमाला काय दादा, गरीबाना! पोट हातावर आमचं ... कोरड्यास नदींतली भाजी! काय मीठ मिरचीला लागले चारआट आन, तर दोन दीस मजुरी करायची! ... आता माज्या बापाला काशीयात्रेला पाटवला का ऽ ? त्या येळ दोन इसा न् धा रुपय, नाना सावकाराच, आनल; ते फेडायच व्हत!... आन् राघ्या निगला वाईट, तवा मी हितंच नोकरीला रायलों, पाच रुपयांवर! ... आन् मग माजं लगीन क्येलं का ऽ ? तवा दहा कमी शंभर घेतले बाबाकडून. त्येबी फेडत आनले. मंग ती जमीन घ्येतली का ? त्यात ग्येल थोड पैस. आतां ग्येल्या सालीं घर बाधलं कां ? त्यांत सुतार, सामान, करतां करता ग्येले ईस कमी संभर. झाले ... पान तंबाकूला ... बायकोला ... अश्ये बी काय्बाय् ग्येले !... "

असल्या त्याच्या निवातपणच्या गप्पा, एकदां सुरूं झाल्या, कीं, तो आपलं सारं हृदय मजकडे उघडें करतो. आपण पुन्हा पुन्हा तेंच तेंच सागत आहों, त्याचेंही त्याला भान रहात नाहीं. आणि त्यामुळे, त्याला आनंद वाटतो, हें पाहून मलाहि आनंद होतो.

पण असल्या सुखदुःखाच्याच गोष्टी तो मजकडे बोलत असला, तरी काकूला त्याचा राग येतो. त्याच्याबरोबर मी गप्पा मारीत बसावें, याचेच मुळीं तिला वैषम्य वाटतें.

: ६५ :

परवां तूं येण्यापूर्वी दोन दिवस आधीं दोन दिवसाची रजा काढून, तो आपल्या गावंढ्यावर जाण्याची तयारी करूं लागला....त्यावेळीं घरांत कोण गडबड!... .. ' आतां मावशी घरात पाहुण्या येणार आहेत, काळ्या!......घरांत

M. 2259

काम वाढणार ? मग तूं घरांतून गेलास, तर आयत्या वेळीं मोलकरीण कुठून आणायची? आणि तिला पैसे कुठले द्यायचे बाबा? ' असल्या तऱ्हेचे काकूंचे शब्द सुरू झाले.

पण काळ्याही, तितक्याच बेफिकीरीनें, लागलीच म्हणाला, " मग माजा दोन दिसाचा पगार कापून घ्या कीं? बिजां काय? त्याला मी कुटं नाय म्हनतोय? पन बगा, बायको काल आली नवती कां? आता आगोटी जवळ येत चालली, तवा राबाची सोय केली, की पुना येतोंच बगा दोन दिसांन्. तिसरा दीस काय उजूडायचा नाय! नोकरी काय सुटतेय् नशिबाची? पण येवढी सोय बगाच माझी गरीबाची! ... माजं श्येत उगडं पडलं असल. "

आणि त्यानें बाबाकडून दोन रुपये खर्ची घेतले, व जेवणांपूर्वी, भर दुपारीं निघालाही घरातून! त्याची ती घराकडली ओढ पाहून, मला त्याची गमत वाटली; पण त्याचबरोबर, " बरें जा तर " असें सागणाऱ्या काकूच्या नजरेत एक प्रकारची मोठेपणाची भावना दिसत होती, ती मात्र माझ्या मनाला सलल्यावाचून राहिली नाहीं.

आणि इतक्या समारंभानंतर, काळ्याची स्वारी आपल्या खेड्याकडे जावयास जिना उतरूं लागली.

पण, पुन्हा त्याला काय वाटलें कुणास ठाऊक! तो घाईघाईने वर आला व मला म्हणाला, " काय दादा, येता का आमच्या गावंड्याला? दोन दीस मजा!... पन ममईच्या लोकांना आवडेल का खेडेगांव आमचा? " तो हंसत हंसत विचारीत होता.

' काय आहे रे मोठं तुझ्या गावात? ' ... मी गंमतींत विचारलें.

" काय हाय?......वाः दादा ऽ!.... आमच श्येत बघा, आमच घर बगा, गाईचं खोंड हाय,...अवंदा ब्येस गुटगुटीत ... "

" अरे पण जेवायला वाढशील का मला? " मी पुढें पुन्हा विचारलें.

" काय थटा करता गरिबाची दादा? आमच्या शेजारीं बामण हाय, त्याच्याकडे जेवा. नायतर तुमाला चालल तर साठणीच बारक्याचं तादूळ, डाळ समदा शिधा देईन. चूलवासनं असलीं कीं रांधाया किती येळ? ... "

त्याच्या त्या स्पष्टोक्तीची मला, खरोखरच मौज वाटली. क्षणभरच वाटलें, इथलें हें भावनाहीन, शून्य, साजुक अन्न खाण्यापेक्षां, देवाब्राह्मणाना भक्तिपूर्वक मानणाऱ्या, त्या प्रेमळ कष्टाळू वारल्याच्या घरचा शिधा रांधून, मीठभात खाणें बरें!

त्या भोंवतालचें, तें गरीबाऊ पण प्रेमळ वातावरण कुठें. . .आणि आमच्या घरातले काकू भोंवतालचें, ते अपेक्षेनें भरलेलें वातावरण कुठें! ...

: ६६ :

तूं येण्यापूर्वी, आमच्या मुरारी स्वैंपाक्याची तरी कोण धडपड चालली होती!

तोही तसाच एक, कामापेक्षा प्रेमाला मोहणारा, उमद्या मनाचा म्हातारा आहे. इतकीं वर्षें तो आमच्या घरात राबतो आहे! पण त्याच्या प्रेमळपणाचे आमच्या घरात काय चीज व्हायचें?

मी घरांत असलों, तर काकूची ओरड धाब्यावर बसवून, मी न सागताच, तो माझ्या आवडीचे सत्रा जिन्नस तयार करून पानावर वाढील; नाहीं तर, नेहमीं मुलें शाळेंत अर्धवट प्रकार खाऊनच जाणार!

पण त्याला कोण काय करणार? तो तर हातांत राजीनामा घेऊनच काम करत असतो. घरात माणसें टिकविण्यास लागणाऱ्या माणूसकीचाच जेथें अभाव, तेथें, कुठेंही काबाड कष्ट करून दहापाच रुपये मिळविणाऱ्या नोकराची बेफिकीर वृत्ति ही असायचीच!

आणि त्यांना, पैशाशिवाय दुसऱ्या गोड शब्दाची कांहीं तरी अपेक्षा असतेच, नाहीं का?

नुसताच पैसा जगातलीं कामे करीत नाहीं!....

: ६७ :

घरातल्या माणसांशीं वागण्याचीही हीच पद्धत. गेल्या वेळीं तुझ्याकडे आलों, तेव्हा तुझ्या मुलासाठीं खाऊ घ्यावयास तिनें मजकडे आठ आणे दिले होते. घरात फराळाचे जिन्नस नव्हते असें नाहीं. पण म्हणाली, " दोन शेर मेसूर घेऊन जा, " मला तिच्या त्या वृत्तीची खरोखर मौज वाटली. अधेली तशीच निमूटपणें खिशात टाकली व येताना मिळालेली दीडदोन रुपयांची पुष्कळशी फळफळावळ, तुझ्याकडे आल्यावर सोडताना, तूं विचारलेल्या प्रश्नाला त्यावेळीं लाजेनेंच उत्तर दिलें, ' घरून आणलीं आहेत. काकूनें मुलासाठीं पाठविलीं आहेत.'

त्यावर तूं हंसलीस. तुला कदाचित् त्याच्यातली गोम समजलीही असेल. पण त्या अभिमानाच्या लपंडावांतच त्यावेळीं मला मौज वाटत होती!

: ६८ :

पण खरंच मावशी, असले क्षुद्र प्रसंग आठवून सागत बसून आयुष्याचा वेळ कशाला दवडूं?

पण मग क्षुद्र मनोवृत्तींचा आविष्कार, असल्या क्षुद्र प्रसंगांनींच करतां येतों, त्याला मी तरी काय करूं?

पण तूं आलीस त्या दिवशींचें व त्यानंतरचें घरांतील वातावरण किती निराळे... चमत्कारिकच होते. बाबांचा खर्च व्हावचा तोच होत होता; पण प्रत्येक

प्रसंगांतील कृत्रिमता मनाला बोचक होत होती.

त्या दिवशीं, तुझ्या सर्व मुलांना घेऊन आपण सिनेमाला गेलों. त्यावेळीं शेजारची नलू तुझ्याबरोबर आली होती. सर्वांचाच खर्च मनांतून काकूला सहन होत नव्हता. पण नलू व तिच्या मुलासाठीं खर्च झालेला दीड रुपया, बोलतां बोलता तिने मजकडे काढलाच. तुझ्या आगमनामुळें होणारा, नेहमीपेक्षां जादा खर्च, तिला सहन होत नसे; आणि त्याचा राग ती शरदवर, काळ्यावर किंवा मुरारीवर, रागाच्या शब्दांचा वर्षाव करून काढीत असे.

आणि तो शेवटचा प्रसंग मलाही, खरोखरच दुःखदायक व संतापजनक वाटला. सासरीं जाण्यास निघताना, नलू तुमचा निरोप घ्यावयास म्हणून वर येते काय, ती गेल्यावर, तूं सहज म्हणून, "इश्श, किती लवकर घरीं परत चालली बाई ही ?" असें म्हणतेस काय ? आणि त्यावर काकू तिच्या स्वभावाला अनुसरून खोचकपणे, "हो, लवकर कसली ? येऊन पंधरा दिवस झाले ! आणखी किती दिवस राह्यचें माहेरीं ? लोकांच्या मुली अशाच हो !" असें तुला झटकन् हंसत हंसत म्हणून, दुसऱ्या गोष्टी बोलूं लागते काय ?

खरोखर, दुसऱ्या दिवशीं, तुला आपण होऊन, बांधाबांध करतांना पाहून, मला येणारें रडूं, मी मोठ्या प्रयासानें दाबत होतो. तुझ्यापेक्षाही, मला लहानपणींच गमावलेल्या माझ्या आईची जास्त आठवण होत होती.

बाबानीं जाताना तुझ्यासाठी लुगडें कापड आणावयास सांगितलें. त्या वेळींही असलाच गोंधळ ! त्याना कापडवाल्याचें बील पाहून वाटले असेल, आपण कमळीसाठीं साठ सत्तर रुपयाचे कपडे घेतले. पण त्यांतला निम्याहून अधिक माल त्याच्याच घरांत राहणार होता, हें त्याना कुणी सांगावें ?

पण जाऊंदे. असल्या गोष्टी जास्त उगाळण्यातही अर्थ नाहीं, मावशी !

माझ्या आशावंत मनाला अजूनहि वाटतें, याच जगात निरपेक्ष व प्रेमळ व्यक्तीहि इतरत्र सापडतील.

झाल्या गोष्टी मजकडे पाहून तरी विसरशील ना ? अरुण.

( ९ )

११ ता. ८ एप्रिल १९२६.

प्रिय मावशी,

त्या गोष्टीला आता साडेचार वर्षें झालीं ! मिरा नाहींशी झाली, म्हणून बाबानें

प्रथम शोधाशोधीचा थोडाफार प्रयत्न केला असेल; पण माझ्या पत्त्यामागें पुढें कोणी फारसें लागलें नाहीं, ही समाधानाचीच गोष्ट म्हणतें मी!

आज तुला म्हटल्याप्रमाणें बऱ्याच दिवसांनीं पत्र पाठवीत आहे. वर गावाचे नांव नाहीं; तरी कदाचित् तूं पोष्टाच्या छापावरून मला ओळखायचा प्रयत्न करूं पाहाशील. पण त्यांत मात्र तूं फसशील बरं का?.....खरं सांगूं का मावशी, माझ्या शोधाच्या भानगडींत तुम्ही कोणच—रागानें अगर प्रेमानें—कोणत्याच भावनेनें पडूं नये हें बरें!...

अगदी पोरवयात, मला एकदम धक्का बसला. सुरवातीस, त्याने थोडी गोंधळलें खरी मी! पण आतां योग्य मार्गानें, एका ठराविक ध्येयानें, जगात जगण्याचा मी प्रयत्न करीत आहें. म्हणूनच तुला प्रथम सागून ठेवलें पाहिजे, तूं किंवा कोणीहि माझा पत्ता शोधण्याच्या खटपटींत न पडणेंच, मला जास्त हितावह आहे...पाहिजे तर, तुला एक वचन देतें मी आजच; योग्यवेळीं, मी तुला माझ्याविषयीं अगदीं सर्व सर्व कळवीन. पण तोंपर्यंत, माझें तुला कोठून तरी पत्र आले होते असें सुद्धां, कोणालाहि,—अरुणांना देखील,—कळता उपयोगीं नाहीं. आहेना कबूल हे? तूं तसल्या विश्वासास पात्र आहेस, म्हणूनच, तुला एकटीलाच मी हें पत्र लिहीत आहे बरं!

: ७० :

माझ्याविषयीं तुला जास्त काय सांगूं?

एका उदार मनाच्या सुशिक्षित, सुसंस्कृत बाईच्या मदतीनें व तिच्या सहवासात, माझ्या आयुष्याचा हा मधला काळ, एक प्रकारच्या आनंदात काढण्याचे भाग्य मला लाभलें; तिच्याच आश्रयानें व मदतीनें माझें शिक्षण पुढें चाललें आहे.

आणि अशा तऱ्हेनें माझ्या आयुष्याला अनपेक्षितपणे योग्य वळण मिळण्यास कारण झालेली ही साध्वी बाई एक ख्रिश्चन आहे. तिचें नाव—होप काइंड!

ती म्हातारी एखाद्या आईसारखें माझ्यावर प्रेम करते. मला कशाचीहि कमतरता भासूं देत नाहीं. माझ्या मनावर सुरवातीस आलेले निराशेचे वातावरण, तिनेंच आपल्या प्रेमळ उपदेशानें काढून टाकलें आहे.

ती म्हणते, "जगात दुःखें पुष्कळ असतात. पण मिरे, पोरी, माणसाला आपल्या आचरणानें त्यापेक्षांहि जास्त सुखें निर्माण करता येतात. दुष्ट भावना मनांत नेहमीं कल्लोळ करतात; पण त्यांच्यांशीं भाडावयास आपल्या भोंवतीं आपणच प्रेमळ वातावरण निर्माण केलें पाहिजे. व तें तसें निर्माण करावयास, जरूर ती दैवी अतिमानुष शक्ति, आपल्याच हृदयांत सदैव जागृत असते! दुःखात

तीच आपल्याला हात देते; सुखात तीच आपल्याला विनम्र करते! त्या शक्तीला तुम्ही वाटेल तें नाव द्या! तिचें सामर्थ्य कमी जास्त होणार नाहीं."

: ७१ :

ती एके दिवशीं मला असेंच कांहीं सांगता सागता, तिचा कंठ गद्गदित झाला. डोळ्यातून अश्रू ओघळूं लागले. शेवटीं मला अगदीं जवळ कुशींत घेऊन, मला थोपटत थोपटत ती म्हणाली, "मिरे, मी तुझ्यासारखी लहान होतें, तोपर्यंत जगांतलें सुखच तेवढें बरेंचसें माझ्या वाट्यास आलें होतें. पण नंतर एकामागून एक मोठमोठीं दुःखे...संकटे...मला भेवडावूं लागली. मी घाबरलें. डगमगलें. पण नतर मला वाटलें, याला तोंड देतच आपण चागल्या गोष्टीस हात घालावा आणि इतराना आपल्या मर्यादित शक्तीप्रमाणें चागल्या गोष्टींस प्रवृत्त करावे. विश्वात प्रेमाचें साम्राज्य निर्माण करणें हेच आपले कर्तव्य!"....

आणि मावशी, नंतर ती कितीतरी वेळ, मला पोटाशीं घट्ट धरून, अश्रू ढाळीत स्वस्थ बसली होती. तिच्यासमोरून कसल्या तरी तिच्या आयुष्यांतील जुन्या आठवणींचा, चित्रपट जात असावा. मी शेवटीं तिला विचारले, 'ममा तुझ्या डोक्यात काय चालले आहे?.... तें मला सांग ना!...'

तिने आपले भरलेले डोळे माझ्या चेहऱ्याकडे लावले. थोड्या वेळाने ती काहींशी खिन्नपणे हंसली. आणि मला म्हणली, 'तूं ते सारे ऐकावेस, असें आता मला पण वाटतें. मिरे पोरी, माझ्या आयुष्याचे ते प्रसंग मी आता विसरत आले आहे. त्यांत आता मला पूर्वीइतकें दुःख, पूर्वी इतका अन्याय, सापडत नाहीं. पण त्यावेळीं मी दुखाने, संतापाने वेडी पिशी झालें होते.'

तिने थोड्या वेळाने एक आवडा गिळला. डोळे साफ पुसले व सागावयास सुरवात केली. किती तरी वेळ ती तसेच सागत होती; आणि किती तरीवेळ मी तन्मययतेनें ते सर्व ऐकत होते.

मावशी, ज्या तिच्या जीवनवृत्तांतामुळें, माझ्या मनात भयंकर खळबळ उडाली, तें मी तुला सविस्तर आठ दहा दिवसांनीं लिहून पाठवीन.

त्याहून विशेष असें तुला सांगण्यासारखे आज मजकडे दुसरे काहीं नाहीं.

कळावें. लोभ कायम ठेव.

तुझी,
मिरा.

( १० )

? २३ सप्टेंबर १९२६.

प्रिय मावशी,

माझ्या आयुष्याला नवे वळण लावणाऱ्या माझ्या ममाचें चरित्र, तुला लिहून पाठवीन, असें आश्वासन दिल्याला, आतां जवळजवळ सहा महिने झाले. मी काहीं लेखिका नाहीं. ममाने सांगितलेल्या वृत्तातामुळें, माझ्या मनःश्चक्षूपुढे जीं चित्रें उभीं राहिलीं, तीं मी पुढें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तिच्या या सागण्याचा मजवर अतिशय परिणाम झाला; म्हणूनच माझ्या आयुष्यात, पुन्हा नव्या नव्या महत्त्वाकाक्षा निर्माण झाल्या आहेत.

तुला हा होप काइंडचा जीवनवृत्तात कितीसा आवडेल, त्यामुळें तुझ्या अंतःकरणात काय भावना उचंबळतील, मी तरी काय सागूं ?...पण, का कोणास ठाऊक, ही माझी ममा व तिचा हा जीवनवृत्तात, माझ्या जीवननौकेचीं, आज तरी मला सुकाणूं वाटतात ... आणि म्हणूनच त्यानें ह्या पत्राचा पुढील भाग व्यापला आहे ! मला आशा वाटते तूं तरी त्याला भारुड म्हणणार नाहींस !—पुन्हा पत्र लिहीपर्यंत.

तुझीच— **मिरा.**

## माझी ममा~~

पंचावन साठ वर्षांपूर्वीच्या त्या काळींहि, अमेरिकेंतील व्यवहार, हल्लींइतकेच गडबडघाईचे चालत असत. होप काइंड नुकतीच अनाथगृहांतून शिकून बाहेर पडली होती; व स्वतःच्या मेहनतीनें प्रामाणिकपणे आयुष्य जगण्याचा प्रयत्न करीत होती. दोन ठिकाणीं स्वयंपाकाचे काम करून, एकटीला पुरून पुष्कळ उरेल इतके, तिला मिळूं लागलें होते. फावल्या वेळात काहीं तरी आवडीचें वाचावे, शिवण कशिदा करावा, त्यातहि पैसे मिळवावे, लांब लांब फिरायला जावे, अशा तऱ्हेने ती शक्य तो आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करी.

पण तरी, तिला तिच्या आयुष्याला पूर्णत्व वाटत नसे. काहीं तरी चुकल्या-चुकल्यासारखें वाटे, कमतरता भासे !...

: ७३ :

एके दिवशीं रात्रीं आपले काम आटोपल्यावर, ती अशीच आपल्या एकाकी खोलींत टेबलाजवळ बसून जेवली; आणि आतल्या खोलींतून हात धुवून परत

फिरते, तो एक मळक्या पोशाखातील तरुण, इकडे तिकडे साशंकपणें पहात, टेबलावरील बशात तिने खाऊन उरलेले पावाचे तुकडे वगैरे, आधाशासारखे भर-भर बोकणत आहे; शेवटचा मोठासा तुकडा तोंडांत कोंबून, दोन घोट पाणी घशाखालीं लोटल्यावर, हळूंच तो दाराकडे थबकत थबकत वळला. आणि आता तो दार उघडणार, इतक्यांत ती एकदम ओरडली, ' थांबा ! '

तो दचकून वळून तिजकडे पहात, जागच्या जागीं खिळल्या सारखा उभा राहिला. त्याच्या त्या निष्कलंक दिसणाऱ्या चेहऱ्यावरील गोंधळल्याचा भाव पाहून, तिला थोडी गंमत वाटली. आणि ती त्याला खुर्चीकडे बोट दाखवीत म्हणाली, ' या, आणि असे खुर्चीवर बसा ! '

तो निमूटपणे अगदीं एखाद्या यंत्रासारखा तेथें जाऊन बसला. तिनें नवी कॉफी केली. लोणी लावून स्लाइस तयार केले. मुरांबा लावला व सारें त्याच्या पुढें ठेवून, ती त्याला म्हणाली, ' हें सगळें तुमच्यासाठींच आहे बरं ! प्रथम खाऊन शांत व्हा पाहूं ! '

त्याची भूक अजून सपली नव्हती. त्यानें सगळें भराभर घशाखालीं उतर-विलें. कॉफी घटाघट प्याला. आणि मग शांतपणें खुर्चीला ओडगून बसून, त्यानें तिजकडे मोठ्या कृतज्ञतेनें पाहिलें.

' कोण तुम्ही ? ... ' तो शात झाल्यावर, त्याची वरपासून खालपर्यंत पहाणी करीत, होप म्हणाली.

त्याची दाढी बरीच वाढली होती. तरी त्याच्या चेहऱ्यावर व बोलक्या डोळ्यात, आतां पुन्हा हुशारी चमकत होती. कपडे फाटलेले व मळके होते, पण ...

' मी खिस्टोफर काइंड ... माझ्या खेड्याहून मी तुमच्या या न्यूयॉर्कला काम-धंदा करायला आलों आहे ! ' ती असें त्याचें निरीक्षण करीत असतां, तो तिज-कडे हंसून पाहून, एकदम मध्येंच म्हणाला, ' मी शेतकी चांगली शिकलों आहे, कॉलेजमध्येंही दोन वर्षें होतों. पण इथें कोणाचीच ओळख नाहीं माझी !...इकडे येताना जवळ थोडे फार पैसे होते. पण ते सारे संपले. आणि शेवटीं गेले तीन दिवस उपाशीच...रस्त्यांतून भटकतों आहे. आंत डोकावलें, तेव्हां तुम्ही इथें असाल, असें मला वाटलें नव्हतें. टेबलावरचें तें उरलेले खाऊन मी निघून जाणार होतों ! पण ...

' पण काय ! ', तो अडखळलेला पाहून तिनें त्याला हसूंन विचारलें.

' तुम्ही फार चांगल्या आहां ... ' तो थोडें लाजून म्हणाला. त्यावेळीं त्याचा निष्पाप उमदा चेहरा अगदीं गोरामोरा झाला होता.

होपने त्याला त्याविषयीं जास्त बोलूंच दिलें नाहीं; आणि पुढें विचारलें, ' बरें

ं असो. आतां तुम्ही जाणार कुठें ?'
" मी ऽ ? बाहेर !' ... त्यानें दाराबाहेर बोट दाखविलें.
' अशा थंडींत ?' ... होप शहारल्यासारखे करून म्हणाली, ' नको ... तुम्ही माझ्या खोलीच्या त्या गॅलरींत निजा ! हीं दोन ब्लँकेटें व रजई पुरतील तुम्हाला ! ... मग आपण सकाळीं काय ते पुढें सर्व बोलूं. "
तें ऐकून तर, तिजकडे आश्चर्यानें डोळे मोठे करीत, तो वर पाहूं लागला.

७४ :

पण त्याच्या बोलण्याची वाट न पहाता, ती त्याला गॅलरींत ब्लॅकेट पसरून रत होती!.... आणि तिचें सर्व आटोपल्यावर, ती मागे वळून पहाते, तों खिस्टोफर गॅलरीच्या कठड्याला ओडगून, एका कोपऱ्यात उभा राहिला आहे व देव्याच्या लखलखाटानीं गजबजलेलें न्यूयॉर्क शहर डोळे भरून पहात आहे!
" काय पहातां एवढे निरखून ? " तिनें सहज गमतींत त्याला विचारलें.
" अं ऽ ? ..... न्यूयॉर्क ! ..... न्यूयॉर्क ! " एकदम तंद्रींतून जागा झाल्याप्रमाणें दचकून, तो आनंदानें सभोवार पहात, पुढे म्हणाला, " हेंच तुमचें मोठें शहर, इतके दिवस माझ्या स्वप्नात होतें ! "
" अस्सं ऽ ! काय करायचें योजलय् तुम्ही इकडे येऊन ? " त्याचा शहराविषयींचा अंध आदर पाहून, होपनें किंचित् उपहासानेंच त्याला प्रश्न केला.
" इथें ?..." तो निष्पापपणें हंसला व मोठा श्वास घेऊन म्हणाला, " मी पैसे मिळवणार आहे !, श्रीमंत होणार आहे, लक्षाधीश होणार आहे !... "
" भले ऽ महाराज, " त्याचा तसल्या प्रतिकूल परिस्थितींतीलहि तो उत्साह पाहून, होप हसून त्याला म्हणाली, " अर्ध्या तासापूर्वी याच शहरात तुम्हीं भुकेनें व्याकूळ होऊन भटकत होता; कोणी तुमच्यांकडे ढुंकूनहि पहात नव्हतें ! शेवटीं,... रागावूं नका, हं...चोरलेल्या चार शिळ्या तुकड्यावरहि राहायला तुम्ही तयार झाला ! आणि आतां क्षणभरानें, अगदीं बोलता बोलतां, लक्षाधीश होऊं पाहता ... म्हणावं काय तुम्हांला ? ... हें पहा, ... आता कृपा करा, अन् त्या ब्लॅकेटवर लवंडा; प्रथम झोपेची आराधना करा पाहूं ! ... हो ... आणि एक आपली सूचना देऊन ठेवतें हं, मी ! या शहरच्या असल्या नवख्या हवेचे एवढे मोठे श्वास घेऊं नका ! बरं का ? ... तुमच्या प्रकृतीला ते घातुक ठरतील !!.. "
तीं दोघेहि त्यावर मनापासून हंसलीं. होपनें मधला दरवाजा बंद केला. ती बिछान्यावर येऊन पडली ... पण तिला काहीं केल्या झोंपच येईना.
परिस्थितीनें गाजलेल्या, पण मोहक डोळ्याच्या त्या आशावादी उमद्या तरुणाविषयींचे विचारच, तिच्यापुढें सारखे येत होते !....

: ७५ :

दोन महिन्यानंतरचीच गोष्ट ! होपनें केलेल्या थोड्याशा खटपटीनें व स्वतःच्या कर्तबगारीनें, ख्रिस्टोफरला चांगली नोकरी लागली होती. मधल्या अवधींत तो तिच्याकडेच जेवे. त्याच गॅलरींत आपली पथारी सोडी. त्या दोघांची मैत्रीहि बरीच वाढली होती. व दिवसेंदिवस त्याचें सौजन्य, त्याची हुशारी, होपच्या डोळ्यांत जास्तच भरत गेली होती.

शेवटीं, नोकरी लागल्यावर, तो स्वतंत्र बिऱ्हाड करण्याचा विचार करूं लागतांच, मात्र होपला कसेसेंच वाटूं लागलें. पण त्याला तें तिनें सांगितलें मात्र नाहीं. खरंच कसें सांगणार ? . . . असल्या भावना, स्त्रिया मनातच जास्त ठेवतात ! . . .

आणि दुसऱ्या दिवशीं, तो दुसरीकडे राहावयास निघूनहि गेला. त्यानंतर तीन दिवस गेले. का कोणास ठाऊक, तिला त्याचा विरह सहन होत नव्हता. एके दिवशीं, त्याच्याविषयीच सारखे विचार करीत, ती रात्रीं बिछान्यावर पडली होती ! . . . तोंच दारावर कोणाची तरी थाप ऐकू आली ! आणि दार उघडून पहाते, तर ख्रिस्टोफर उभा ! . . .

त्याचे डोळे अश्रूंनीं चमकत होते. तो भावनाप्रधान तरुण, तिला समोर पाहिल्यावर, क्षणभर जागच्याजागीं पुतळ्यासारखा उभा राहिला. त्याच्या तोंडातून काहीं शब्दच फुटेना !

शेवटीं, त्याच्या स्वागतासाठीं, होप प्रेमळपणें त्याच्याजवळ जाऊं लागताच, एकदम धावत येऊन, त्यानें तिला घट्ट मिठी मारली.

आणि मग त्या दिवशीं, किती तरी वेळ, तीं दोघें अगदीं मोकळेपणें प्रेमळपणें बोलत होतीं. शेवटीं, त्या रात्रींच त्याचे ठरलें, की, सकाळीं लागलीच दोघानीं विवाहबद्ध व्हावयाचें !

: ७६ :

लग्न झाल्यानंतरचे त्याचे पहिले काहीं दिवस किती आनंदाचे होते ! त्याना आपल्या सुखामुळे भोंवतालच्या जगाचा विसरच पडला होता. आणि त्याच्या चिमुकल्या जगात, फक्त ती आणि तो ! त्यांच्या आनंदाला अगदीं पारावार नव्हता.

असेच कांहीं महिने गेले; आणि आतां होपला कांहीं महिने गेले होते.

त्या नैसर्गिक दुखण्यात, ख्रिस्टी तिची किती हळुवारपणें काळजी घेई ! ती हल्लीं कामाला जात नसे. घरच्या कामांतहि ख्रिस्टी त्रास घेऊन तिला मदत करी. त्या दिवसांत, त्यानें स्वतःच्या बाबतींतील काटकसरीची तर कमाल केली होती. आणि तीहि त्याच्या पहिल्या भेटींतील त्याच्या लक्षाधीश होण्याच्या

कल्पनेची थट्टेनें त्याला आठवण करून देई.

: ७७ :

प्रसूतीच्या दिवशीं सकाळीं, हॉस्पिटलमध्यें होपची विचारपूस करूनच, तो कामावर गेला होता. दर अर्ध्या तासाने, त्याचा शिपाई तिच्या प्रकृतीविषयीं विचारपूस करून जाई. खिस्टीच, आपल्या ऑफिसच्या कामात जरा देखील लक्ष नव्हते !

योग्यवेळीं होपची सुखरूप सुटका झाली. तिच्या ग्लानींतहि, त्या दिवशीं तिला खिस्टीचा प्रेमळ चेहराच सारखा दिसत होता.

तोंच,..तिला व तिच्या बाळाला पहावयास धावतच खिस्टी घाईघाईनें आला. त्याला पाहातांच तिला किती आनंद झाला ! तिजकडे व त्या नवख्या चिमुकल्याकडे पाहून खिस्टीहि हंसला ! पण त्याच्या चेहऱ्यावरील त्या गोड हास्यामागें, एक प्रकारची दुःखाची काळी छाया पसरलेली दिसत होती.

प्रथम होपला त्याचें कारणच समजेना ! पण त्याला तिनें पुन्हा पुन्हां विचारल्यावर, त्यानें शेवटीं सर्व हकीकत तिला सागितली. साहेबानें मुद्दाम येऊन, खिस्टीची ऑफिसच्या कामातील चूक काढून दाखविली. त्याच दिवशी, मनातील गोधळामुळे, त्याला काही सुचत नव्हते. वास्तविक, नेहमीं तो चोख काम करीत असल्यामुळे, साहेबाने तेवढ्यावरूनच, त्या दिवशीं दिलेला अनाठायी धाकदपटशा त्याला, रुचला नाहीं. तेव्हा त्यांची बोलाचाली झाली आणि शेवटीं खिस्टीनें, आपल्याच विचारात व्यग्र असल्यामुळें, रागाच्या भरात, त्याला उपमर्दकारक बोलून खूप शिव्या दिल्या; व आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन, तो तसाच हॉस्पिटलकडे धावत आला. . . .ती हकीकत ऐकून होपला अतिशय दुःख झालें ! त्याचे तिच्याविषयींचें अत्यंत उत्कट प्रेम त्यात व्यक्त होत होते खरें ! पण आतां पुढें दोघांनाहि नोकरी नव्हती !

: ७८ :

शिलकेवर त्यांचे कसेबसे दोन महिने निघाले. तशातहि, आपल्या बाळाचें कौतुक करीत, ते प्रेमळ जोडपें, आपल्या व त्याच्या आयुष्यांत आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होतें. पण त्याहून दुर्धर प्रसंग त्याच्यावर ओढवावयाचा होता.

एके दिवशीं, बरीच रात्र झाली तरी खिस्टी घरीं परतला नाहीं. होपला काळजी वाटूं लागली, खिस्टी गेला तरी कोठें ? इतक्यांत, एक पोलीस अधिकारी आला व त्यानें खिस्टीला चोरीच्या आरोपावरून पकडल्याचा वृत्तांत, तिला सांगितला. होपच्या आश्चर्यास व दुःखास पारावारच नव्हता ! . . .

वस्तुस्थिति अशी होती, कीं, चार पांच ठिकाणीं नोकरीसाठीं खटपट करूनहि,

अपयश आलेलें पाहून, ख्रिस्टी उदास झाला व शेवटीं एका दारूच्या दुकानांत शिरला! इतक्यात तेथें मारामारी उपस्थित झाली. तेथील एकाच्या हातून पडलेले कसलेसे पुडके ख्रिस्टीच्या पायाला लागले; त्यानें उचलून कुतूहलानें त्यात पाहिले, तों त्यात नोटा व दुसरे काहींतरी होते.

ते पुडकें तसें त्याच्या हातातच आहे, इतक्यांत शिट्या वाजल्या, पोलीस धावले व गराडा घालून त्यानीं सर्वांची झडती घेतली. त्यांतच ख्रिस्टीला त्या पैशाच्या पुडक्यासह पकडून नेण्यात आले होतें.

त्यानंतर खटला झाला. एका वर्तमानपत्राने, खपाच्या आशेनें, ख्रिस्टीला, साळसूदपणे वागणारा अट्टल बदमाश ठरवून, व त्याच्याशीं पूर्वी घडलेल्या अनेक गुन्ह्याचा बादरायण संबंध जोडला होता; शेवटीं, खटला चालल्यावर, ख्रिस्टीला त्या टोळीबरोबरच सहा वर्षांची शिक्षा झाली.

आणि, आपल्या लहानग्या बाळाला व होपला, जगात एकटें सोडून, शेवटपर्यंत, ‘ मी अगदीं निर्दोषी आहे ग ! ’ असें म्हणतच, ख्रिस्टी तुरुगात गेला.

: ७९ :

त्यानंतर, आपल्या बाळाला जवळ घेऊन, बिचारी होप अश्रू ढाळीत बसे ! तिच्या जवळचे पैसे संपत आले होते. शेवटीं, त्या मायलेकराना खायलाहि पोटभर मिळणे अशक्य होऊं लागले !

त्यातच तिचा बाळ, एके दिवशीं आजारी पडला ! त्या दिवशीं ती याची काळरात्रच होती. ते कोवळें मूल तापानें अगदीं फणफणत होतें. होपला डॉक्टर आणणे सुचेना ! आणि पैसे तरी कोठें होते जवळ ? त्याला पोटाशीं घट्ट धरून, ती आपल्या दुर्दैवाबद्दल ओक्साबोक्शी रडत होती.

त्याला अलगद बिछान्यावर ठेवून, ती जरा बाहेर आली; तिचे दुःख तिला आंतून बाहेरून सारखें जाळीत होते.

पण, जगाचे सारे व्यवहार त्याच्यासाठीं थांबतात थोडेच ? ते तसेच चालले होते. आगगाड्या, गाड्या, माणसे . . . साऱ्याची एकच अव्याहत गडबड घाई ! याची ओरड, त्याचा कल्लोळ,...यामुळे आपला बाळ उठेल, त्रास त्याला होईल, असें वाटून, होप एखाद्या पिसाटासारखी रस्त्यावर धांवत गेली. पण तिला काय करावे ते समजेना. शेवटी, अर्धवट वेड्यासारखी तिनें पायरीवरच बसकण घतली; ती आपल्याशींच पुटपुटली, ‘ बाबांनो, थांबा ! हळूं चाला, हळूं बोला; आवाज करूं नका ! माझ्या बाळाला जराशी झोंप लागली आहे, जागा होईल तो ! आजारी आहे ना माझा बाळ ! ’

पण काहीं वेळानें भानावर येऊन, तिनें निराशेचा लांब सुस्कारा टाकला व ती आत येऊन आपल्या बाळाजवळ बसली; अगदीं अनाथपणें, ओक्साबोक्शी

रडूं लागली ... पण रडतां रडता, त्याच्या गार अंगाला तिचा हात लागला. ती दचकून एकदां मोठ्याने ओरडली व तिने अगदीं दुःखानें त्याला घट्ट मिठी मारली !

: ८० :

त्यानंतर सहा महिन्यानंतरची गोष्ट ! एकाकीपणे, कशीबशी मोलमजुरी करून, होप स्वतःचा चरितार्थ चालवीत होती; इतक्यात, ख्रिस्टी तुरुंगातून पळाल्याची बातमी तिने वर्तमानपत्रात वाचली. ते वाचून तिला प्रथम भीति वाटली; पण नंतर आनंदहि झाला. 'ख्रिस्टी मला आज भेटेल, उद्या भेटेल' अशा आशेनें, पुढले किती तरी दिवस, रोज त्याची वाट पहात, त्याच्या भेटीकडेच डोळा लावून, साधी भोळी होप जगत होती.

आणि शेवटीं एके दिवशीं त्याचे तिला पत्र आले. त्यावरून तिला समजलें, दुसऱ्याच एका नावाने ख्रिस्टी चागल्या नोकरीस लागला होता.

तिनें आपल्या एका मैत्रिणीचे कर्ज काढलें व ती त्या गावीं जाऊन पोहोचली. आणि शेवटीं, तिचा ख्रिस्टी कितीतरी दिवसांनीं तिला पुन्हा एकदा भेटला. आता, मोठ्या कल्लेदार मिशा जाऊन, तो श्मश्रू केलेला उमदा तरुण म्हणून तिच्यापुढें उभा होता !

पुन्हा नव्या आयुष्याला सुरवात करून जगात मोठे व्हायचे, मानमान्यता, संपत्ति मिळवायची, वगैरे त्याचे पूर्वीचे मोठे बेत, तो तिजकडे पूर्वीमारखेच, निष्पाप व तितक्याच आशावंत अतःकरणानें, अगदी पहिल्याच भेटीतही, बोलूं लागला.

मनांतलें दुःख आतल्याआत गिळून, त्याला उत्तेजन देण्यावाचून होपच्या हातीं काय होते ?...

: ८१ :

त्याच्या आयुष्यांतील, यापुढील तीन वर्षे पुन्हा सुखात गेलीं. ख्रिस्टी एका खतें तयार करणाऱ्या कंपनीत नोकरीस राहिला होता, आणि आपल्या कर्तबगारीनें तो पुढें येत होता. शेवटीं, त्याच्या काहीं नव्या खताच्या शोधामुळे, त्याचें कंपनींत वजन बरेंच वाढलें व त्याला कंपनींत भागीदार म्हणूनहि घेण्यांत आलें. गावांत त्याची लोकप्रियता वाढली, व तो म्युनिसिपालिटीतही निवडून आला.

मध्यें, ख्रिस्टोफर काइंडला पकडून देणारास, चारशें डॉलरचें बक्षिस लावण्यांत आलें होतें. त्यावेळीं, होपला वर्तमानपत्र दाखवून, ख्रिस्टी तिच्याकडे पाहून मोठमोठ्यानें हंसत असे. तिच्या छातींत मात्र धडधडे; पण मग, त्यानें तिची एखाद्या लहान मुलासारखी समजूत घालावी.

: ८२ :

त्यांच्याच शेजारीं, एक जॉन नावाचा वृद्ध गृहस्थ रहात असे. त्याचें लक्ष हळूंहळूं खिस्टीवर जास्त खिळून राहूं लागले होतें; शेवटीं तर, त्याने त्या जोडप्याची ओळख करून घेऊन, त्याच्याकडे जाणे येणेहि वाढविले! तेव्हां मात्र होपला संशय येऊं लागला. आणि तिला भीतिही वाटूं लागली.

एके दिवशीं, खिस्टी नव्हता अशा वेळीं तो तिजकडे आला व तिला म्हणाला, "तुझा नवरा कोठे आहे?"

भान न राहून होपने एकदम विचारले, "कोण?...खिस्टी?"

"हो तोच!" तो हंसून पुढें येत म्हणाला.

खरे नाव उच्चारण्याची, होपने गडबडींत केलेली चूक, मागाहून लक्षात येऊन ती दचकली, . . . अतिशय घाबरली.

पण तो उदार मनाचा म्हातारा, तिच्याजवळ येऊन म्हणाला, "मुली, घाबरूं नको! खरी काय गोष्ट आहे, मला साग!"

त्याच्या डोळ्यातील सौजन्य पाहून, होपने, त्याला सर्व काहीं उघड उघड सांगितलें; तेव्हा शेवटीं, त्यानें वात्सल्याने तिला थोपटीत म्हटलें, "उठ, घाबरूं नको! गेले कित्येक महिने मला यांतलें बरेचसे ठाऊक होते. सी. आय. डी. अंमलदार या दृष्टीने, याचा हा तलास लावणे तर माझे कर्तव्यच होते! पण, कायदे, कर्तव्य, याच्या हमरस्त्याला फुटणाऱ्या पळवाटा सन्मार्गाकडे जात असल्या, तर त्याचा अवलंब करणारा मनुष्य आहे मी! तुम्ही मुळींच घाबरूं नका. आपल्या समाजाला तुझ्या नवऱ्याची खरोखरच जरूरी आहे. म्हणूनच तो तुरुंगात जाऊं नये अशी माझी स्वतःचीही फार इच्छा आहे. तेव्हां उद्यापासून मी माझी दुसरीकडे बदली करून घेतली आहे! माझ्या म्हाताऱ्याच्या शब्दावर विश्वास ठेव. तुमचा निरोप घेण्यासाठीच मी आज आलो आहे."

हें सर्व बोलणे खिस्टी बाहेर उभा राहून, आडूनच ऐकत होता. जॉनच्या या उद्गारामुळे, तो एकदम पुढे आला, व कृतज्ञतेने गद्गदित होऊन, त्यानें जॉनला घट्ट मिठी मारली.

जॉनचा, तो एकंदर अकारण स्नेह पाहून, होपच्या डोळ्यावाटें अश्रूंचा पूर वहात होता!

: ८३ :

यानंतरहि एक वर्ष सुरळीत गेलें. दबकत दबकत कां होईना, खिस्टी व होप दोघेंहि एकमेकाच्या सहवासांत अतिशय सुखात रहात होतीं. त्यांचें मधलें आयुष्य व त्याबरोबरच सारें दुःखहि ती विसरत चाललीं होतीं!

पण त्या सर्वांचा शेवट... पुन्हा एका काळदिवशीं व्हावयाचा होता!

त्या दिवशीं संध्याकाळीं, नेहमीच्या वेळीं ख्रिस्टी परत आला नाहीं. ख्रिस्टी बाहेर गेला असतां, एकाएकीं पोलिस आले, त्याच्या घराची झडती घेतली, व त्याच्या शोधासाठीं ते पुन्हा बाहेर पडले.

आणि त्याच रात्रीची गोष्ट! काळोख पसरला असताना, ख्रिस्टी दबकत दबकत मागील दाराजवळ आला. त्याची परिचित थाप ऐकून, हळूच दार उघडून होपनें त्याला आत घेतलें.

आपल्या निष्पाप प्रिय पतीला, तसें कावऱ्याबावऱ्या दीन दृष्टीने बघताना पहातांच, होपला दुःखाने रडू कोसळले. थोडा वेळ ती दोघेही काहीच बोलली नाहींत. शेवटी, त्याने तिला घट्ट मिठी मारून प्रयासाने सांगितले, ' होप, पोरी, मी नीच नाहीं; पण तुझ्या दुःखालाच एकंदरीत कारण झालो. पोलिस बहुतेक मला थोड्याच दिवसात, .. कदाचित् एकदोन तासांतहि .. पकडतील. येणाऱ्या संकटाना आतां तुला एकटीलाच तोंड दिल पाहिजे. हा कागद घे! या चारपाच वर्षात मिळविलेली थोडीफार संपत्ति तुझ्याच स्वाधीन करून, मी आता जातों ...'

त्याच्यानें जास्त बोलवचना. त्याला आपल्या हृदयाशीं एकदा घट्ट धरून, काहीं अडखळत बोलायचा होपने प्रयत्न केला. पण एकहि शब्द बाहेर फुटेना!...

शेवटीं, त्यानें नाइलाजाने आपल्याला सोडवून घेतलें, तिजकडे क्षणभर टक लावून पाहिले; व खिडकीतून चटकन बाहेर उडी मारली.

जाताना, ख्रिस्टीने ड्रावरमधील आपलें पिस्तूल घाईघाईनें खिशांत घातलेलें पाहून मात्र, होपच्या छातींत धडकी भरली.

: ८४ :

आणि अपेक्षेप्रमाणे आणखी दोन दिवसानीं, पोलिसानीं ख्रिस्टोफरला पकडल्याची बातमी त्या गावभर पसरली.

गावातील त्याच्या लोकप्रियतेची यावेळीं त्याला थोडीशी मदत झाली. सर्व मोठमोठ्या लोकानी, त्याच्या बचावासाठीं आपलें एक शिष्ट मंडळ सरकारकडे पाठविलें. तो भागीदार असलेल्या त्या प्रसिद्ध कंपनीने, 'हा एक शेतकी विषयाला वाहून घेतलेला मोठा संशोधक आहे. त्याच्यावर गुन्हा ठरत असल्यास त्यास माफी करा, अशा तऱ्हेचा अर्जहि केला.

पण, सर्व प्रयत्न फोल ठरून, ख्रिस्टीचे स्वातंत्र्य पुन्हा हिरावून घेण्यात आले. मानवी कायद्यानें त्याच्या हातात बेड्या ठोकल्या! आणि ते त्याला बाहेरच्या जगांतील सर्वांपासून घेऊन गेले!

येथपर्यंत, जगाच्या न्यायाला मान वाकवून, ख्रिस्टी, होईल तें निमूटपणे सोसत होता. पण कायद्याची निष्ठुरता पाहून, तो शेवटी अगदीं निराशच झाला

असावा, कारण, पुन्हां संधि साधून, तो तुरुंगांत पोहोंचण्यापूर्वी त्यांना हुलकावणी देऊन पळाला. पण...

पण, या खेपेस मारामारी करून सुटून येण्यापूर्वीच, तो एका पोलीसाच्या गोळीला बळी पडला. आणि होपला ख्रिस्टी पुन्हा भेटला, त्यावेळीं, त्याचे बोलके डोळे, त्याचा हंसरा चेहेरा...या सर्वांतून, अजूनहि, त्याचें स्तब्ध झालेलें निष्पाप हृदयच स्पष्ट होत होतें!

त्यावेळीं, त्याचे पहिल्या भेटींतले निष्पाप शब्द होपला सारखे आठवत होते. ‘ तुमचे न्यूयॉर्क शहर फार चागले !...मी पैसे मिळवणार...श्रीमंत होणार... लक्षाधीश होणार ! ’

पण त्या सर्व महत्त्वाकाक्षा त्याच्या मनात तशाच राहिल्या; व त्याच्या होपला अनाथ अशी मागे टाकून, त्याने, या विचित्र जगाचा शेवटचा रामराम घेतला !

आणि मग त्याच्या मृत्यूनंतर, त्याची स्मशानयात्रा मात्र, त्याच गावांत गौरवपूर्वक काढावयास, त्या दुतोंडी कायदेबाज जगाला लाज वाटली नाहीं ! ‘ मरता घेती खाद्यावर ती ! ’...

: ८५ :

यानंतर, होप गरीबीनेच आपले दिवस कठीत होती.

त्या दोघाही निष्पाप व सरळ मार्गानें जाणाऱ्या जीवावर, असली दुःखाची आग पाखडणाऱ्या जगाचा, होपला दिवसेदिवस जास्त जास्तच तिरस्कार वाटूं लागला. ईश्वरावरील तिची श्रद्धा हळूहळू डळमळू लागली. तोहि तिला शेवटीं अगदी अन्यायी दिसू लागला !

आणि असले दुःखी विचार करीत, ती एकामागून एक, आपले दिवस कसेबसे ढकलीत होती !

: ८६ :

हो, दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने,..चालले होते. काळ कोणासाठीं थांबून राहाणार? पण होपच्या दुःखाची उत्कटता, काही केल्या कमी होईना ! तिने पुन्हा पुन्हा विचार करावा ! तिला वाटे, तिचा ख्रिस्टी किती उमदा, हुशार, प्रामाणिक उद्योगी ! आणि मग...बत्तीशीच्या आतच एकाएकी संपुष्टात आलेल्या त्याच्या लहानग्या आयुष्याविषयीं, पुन्हा पुन्हा विचार करून, ती आपल्या मनाम प्रश्न विचारी, “ या साऱ्याचा अर्थ तरी काय ? निसर्ग, ...जगन्नियंता, वाटेल ते म्हणा त्याला, ...त्या शक्तीच्या या मूर्ख विलासाचा हेतू तरी काय ? माझ्या ख्रिस्टीच्या आयुष्याचा खरा उपयोग होण्यापूर्वीच, त्याचा असा नाश का व्हावा ?..आणि तो तसा होण्यात, त्या आदिशक्तीची योजकता तरी कोठे आली ? ”

: ८७ :

ख्रिस्टीच्या थडग्याजवळ बसून, एके दिवशीं कितीतरी वेळ, असा विचार करीत ती रडत होती. बायबलमधील कांहीं धीर वचनें, तिला आठवत होतीं खरीं; पण त्यावर विश्वास ठेवण्याच्या मनःस्थितींतच मुळीं ती नव्हती!...

इतक्यात, तिच्या पाठीवर एक थरथरता हात पडला. तिने मागे वळून पाहिले, तो, तिच्या व ख्रिस्टीच्या चागले परिचयाचे म्हातारे बिशप, तिच्यामागें उभे होते.

त्याची मोठी शुभ्र दाढी, त्याचे तिच्याकडे प्रेमळ दृष्टीने पहाणारे सात्विक डोळे, याचा तिच्या मनावर अतिशय परिणाम झाला. त्यानीं तिला हाताला धरून वर उठविलें, व मंदमंद चालवीत, चर्चच्या टॉवरखालीं असलेल्या आपल्या खोलींत नेलें.

बराच वेळ, काहीं एक न बोलता, तीं दोघे समोरासमोर बसलीं होतीं. शेवटीं, त्यानीं मुग्धपणेच टेबलावरील बायबल उघडलें व होपला त्यांतील एक वाक्य दाखविले, " मातींतून मनुष्य निर्माण होतो व पुन्हा मातीलाच जाऊन मिळतो."

त्यावरून, होपलाही एकदम आठवण झाली. प्रभूने म्हटले होते, ' तुमचीं सुखदुःखे, पापे एकमेकाकडे मोकळेपणे सागा!'

शेवटीं, मनावर ताबा मिळवून, आपल्या लहानग्या आयुष्याचा सर्व थोटका वृत्तात, तिनें दुःखपूर्ण मनानें, अडखळतच, बिशपसाहेबाना निवेदन केला.

जगात, त्याच्यावर अन्यायच झाले होते. ईश्वराने, त्या जोडप्याचें, विटबने-पासून काहीं एक रक्षण केले नव्हते. होपला बिशपसाहेबाना हेच सागावयाचे होते. त्याचे सुख, त्याच्या महत्त्वाकांक्षा, त्या दोघाकडे काहीं एक दोप नसतांही, एका वर्षात रसातळाला गेल्या होत्या.

दुःख असह्य होऊन होप शेवटीं ओक्साबोक्शीं रडू लागली.

: ८८ :

बिशपसाहेब जागेवरून उठले. त्यानी हळू हळू होपचे डोके थोपटून, तिला शात करण्याचा प्रयत्न केला; व थोडा वेळ स्तब्ध राहून, शेवटी आत्मविश्वा-साच्या अधिकारवाणीने, पण सौम्य शब्दात, ते तिला म्हणाले,—

" लहान वयात, तुजवर अनेक दुःखद प्रसंग आले, हे खरे! पण निष्पाप मुली, खुद्द प्रभू येशूलाही जगातील अन्यायापासून, असत् प्रवृत्तींपासून त्रास भोगावा लागला, नाहीं का? त्यावेळीं तो काय म्हणाला? आठवते? 'देवा, त्याना क्षमा कर; ते काय करत आहेत ते त्याना ठाऊक नाहीं!'

चागल्या मनुष्याची आतील शक्ति, आत्मा, दुःखाला तोंड देण्यास नेहमीं तयार असते; पण हाडामासाचे हें शरीरच कमकुवत असते. आणि दुःखानें मनुष्य

पिडला, कीं, मगच त्याच्या कसोटीला खरी सुरवात होते. पण त्याचवेळीं त्यानें हें लक्षांत ठेवावयास पाहिजे, कीं, दुष्ट प्रवृत्ति नेहमींच भोंवतीं पिंगा घालतात, म्हणून त्याच्या मोहाला बळी पडता उपयोगी नाहीं. सत्पुरुषानाच जगांत अनेक दुःखे भोगावीं लागतात. पण त्यानीं त्यामुळें डगमगून जातां उपयोगी नाहीं. दुष्ट प्रवृत्तींना दुष्ट वृत्तींनींच उत्तर देण्याचा आपण प्रयत्न करावयाचा नाहीं. कारण, प्रभू योग्यवेळीं चांगल्याप्रमाणें वाईटाचाही न्याय देतो!'

होप सुन्न मनाने तें सारें ऐकत होती. तिच्या मनात त्यामुळें विचाराचें युद्ध चालले होते! तोंच बिशपसाहेब पुढे बोलूं लागले, "मुली, जगात राहण्याचा मान मिळणे हेच मोठे भाग्य समज! स्वतःचे दुःख विसरून, प्रेमाचें साम्राज्य भोवतीं निर्माण करणें..., सत्प्रवृत्तींचा विकास करणे, रंजल्यागाजलेल्याना हात देत आयुष्य घालविणे..., हेच मानवी कर्तव्य नव्हे का ? मग तें विसरून तुला कसें चालेल ? आणि त्यातूनच आपले सुख निर्माण केलें, तर आपल्याला खास दिसून येतें, कीं, ईश्वर न्यायी आहे. जगांतील एकंदर दुःखाच्या मानानें आपले एकट्या व्यक्तीचे दुःख कोठल्याकोठे नाहींसें होतें. मनुष्याला, फक्त दिसणाऱ्या गोष्टीच खऱ्या भासतात; पण ईश्वराला अदृश्य गोष्टीहि दिसतात. जगाच्या खऱ्या कल्याणाच्या गोष्टी पाहूनच तो तसे वागतो!..म्हणूनच ईश्वराकडे जो आशेनें धांव घेतो,....त्यालाच ईश्वर सत्कृत्यात हात देतो,...तेव्हां म्हणून म्हणतों, या थडग्या-जवळच्या मातींत आपले मन अडकवून, आपल्या आयुष्याचा नाश असा करूं नकोस ! ऊठ... विसर तें सारें आता! ईश्वरावर श्रद्धा ठेव! चांगल्या कृत्यांत नेटानें पुढें जा! त्यातच तुला तुझ्या यापुढील सुखाची उत्पत्ति सापडेल !

तुझें सारे आयुष्य अजून जावयाचे आहे. तुला अजून सत्कृत्याचे डोंगरच्या डोंगर उभे करता येतील ! आणि त्यापुढें, तुझे वैयक्तिक दुःख, कोठल्या कोठें, समुद्राच्या पाण्यातील एखाद्या सूक्ष्म थेंबासारखें...नष्ट होईल !

किती तरी वेळ, बिशपसाहेब होपला असें कळवळ्यानें व प्रेमळपणें सांगत होते. तिच्या मनावर त्याच्या गंभीर आवाजातील गंभीर शब्दाचा, त्या वेळीं अतिशय परिणाम झाला. पण तरीही, अर्धवट साशंकपणें ती घरीं गेली. त्या दिवशीं ती सारखा विचार करीत होती. पुन्हा एकदा तिने मन लावून, नव्या जोमानें बायबलचीं दोन तीन पारायणे केलीं व शेवटीं बिशपसाहेबानी सांगितलेली, जगाकडे पाहण्याची व्यापक दृष्टि तिला लाभली.

या तऱ्हेनें होपच्या आयुष्याला निराळें वळण लागलें, व आतां ती गेलीं चाळीस पंचेचाळीस वर्षे, या उद्योगातच, आपल्या आयुष्याचा व्यय करीत आली आहे.

तिच्या पूर्वायुष्यांतील सर्व, ती आतां जवळ जवळ विसरून गेली आहे. ती आता साऱ्यांची केवळ ममा आहे !

( ११ )

कल्याण, ६ मे १९२७.

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद—

तूं मुद्दाम पाठवून दिलेल्या औषधी मुळ्या मजकडे आल्यावर, मी वसंताकडे तशाच दिल्या. त्यांचा काहींसा गुण असला, तरी त्याच्या बायकोची प्रकृति आहे तशीच आहे. त्या गरीब मुलाच्या जीवाची मात्र, उगीचच ओढाताण चाललेली आहे. त्याचें नशीब, दुसरें काय?

काही दिवसांपूर्वी, असेंच बोलतां बोलतां, तो मोठ्या अभिमानानें मला सांगत होता, कीं, आपल्या अरुणला मुंबईच्या प्रदर्शनांत, चित्राबद्दल कसलींशीं दोन बक्षिसें मिळालीं. तें एक प्रकारें अरुणला भूषण असलें, तरी अशा गोष्टींचा, त्याला आपल्या धकाधकीच्या भावी आयुष्यात, काय उपयोग होणार आहे, मला काहीं समजत नाहीं. वसंत काय, अरुण काय, या तरुण मंडळीच्या साऱ्याच कल्पना आमच्याहून साफ भिन्न!

गेल्या आठवड्यांत, अरुण मुंबईहून दोन दिवस इकडे आला होता. डॉक्टरीच्या पहिल्या परीक्षेत, गेल्यावेळीं त्याला अपयश आलें होतें; तरी दोन महिन्यापूर्वी तो पुन्हा बसल्यावर पास झाला हें तुला ठाऊक आहे. पण आता परवांच्या भेटींत, तो मजकडे बोलतां बोलता, संदिग्धच म्हणाला, कीं, हा कोर्स पुढे चालू करावा कीं नाहीं, हा आपल्यापुढे प्रश्न पडला आहे! असल्या चंचल स्वभावाची मला चीड आहे. पण त्यावर मी कांहींच बोललों नाहीं. दोन दिवस कुढ्या मनानें वागून, अरुण कालच मुंबईस परत गेला.

या असल्या लहानशाच गोष्टी,—पण त्यामुळें मला पुन्हां पुन्हा वाटतें, या मुलाचें पुढलें भवितव्य आहे तरी काय? माझ्या मनाची असली ही काळजी कधीच संपणार नाहींसें दिसते. असो, मुलास आशीर्वाद.

**बाबा ठाकूर.**

( १२ )

मुंबई, ता. ८ जानेवारी १९२८.

ती. सौ. वहिनींस सप्रेम नमस्कार.

तुमचें पत्र पोहोंचलें. हल्लीं बरेच दिवसांत मला तुम्हांस भेटावयास वेळ झाला नाहीं. अलीकडे कामेंहीं हातीं बरींच असतात. अर्देसर भरुच्या

या अनुभवी म्हाताऱ्या कॉंट्रॅक्टरशीं भागिदारी करून, " अरविंद भरूच्या आणि कंपनी, " म्हणून मी हल्लीं एक फर्म चालविली आहे. दोघांना एकमेकांची चांगली मदत होऊन, कामेहीं बरीं मिळतात. त्यामुळें, तिकडे पाहता पाहता फुरसद मुळींच होत नाहीं.

हल्लीं हातीं असलेल्या दोन तीन कामापैकीं, एक बाबासाहेब टाकुराचें माटुंग्याचें घर आहे; तुम्हाला यापूर्वी कदाचित् ते समजलें असेलहि. मध्यें जवळ जवळ दीड वर्षे त्याचा तो बेत लांबत होता. शेवटीं, पेन्शन घेतल्यावर, दोन वर्षांनीं, आता ठरले त्याचे! माझ्या वडिलाना, पूर्वी, अडीअडचणीला त्यानीं शक्य ती मदत केली असल्याची जाणीव, मला पूर्णपणे आहे. आणि म्हणूनच, त्यांच्या बाधकामाकडे पाहाण्याची, माझी दृष्टि केवळ धंद्यापेक्षा निराळी आहे. तेव्हा भरुच्यासारख्या हिशेबी माणसाशीं घासाघीस करून, मी कॉंट्रॅक्टची रक्कम मुद्दाम कमी करविली. त्या घराच्या बाधकामाच्या प्रत्येक बाबतीत देखील, मी सध्या जातीने लक्ष घालतों. मला मनापासून वाटते, ते माझ्याच घराचे बाधकाम आहे, जणू काय! ...

बाबा नेहमीं कल्याणहून येत असतात. अरुणही, सवडीप्रमाणे, आठवड्यातून एकदा तरी, मुंबईहून येतो. त्याची व माझी सौंदर्यदृष्टि जवळजवळ सारख्याच प्रकारची असल्यामुळें, आम्ही करारात ठरलेल्या गोष्टींतही, अनेक सुधारणा करीत आलो आहो. घर एकदाच बाधावयाचे असते; तेव्हा पुन्हा पुन्हां कोणी सुधारणा करीत नाहीं. आणि म्हणूनच पाचपधरा रुपये अलीकडे पलीकडे गेले, तरी सौंदर्याच्या दृष्टीने, मी ते फारसे मनात आणीत नाही!

: ९१ :

पण बाबासाहेबाचा स्वभाव प्रत्येक बाबतींत बराच हिशेबी पडतो. त्यामुळें, बापलेकाचे लहानसहान बाबतींत होणारे मतभेद ... खटके, मला मोटे गमतीचे वाटतात.

बघा वहिनी, प्लॉट घेण्यापासूनच सुरवात झाली. बाबासाहेब व अरुण, माझ्याबरोबर दादरमाटुंग्यास आले होते. सर्व प्लॉट्स पाहून झाल्यावर, चार रस्त्याच्या नाक्यावरील एका कोपऱ्याचा प्लॉट अरुणने पसत केला; पण त्याची किमत बाबाच्या कल्पनेपेक्षा दीडपट जास्त झाल्यामुळे, तो विचार त्यानीं बदलून, तेथून काहीं अंतरावरील, जरा मागल्या बाजूचा, एक जुने घर असलेला प्लॉट, तीन हजाराला घेतला. एका हजाराचाच फरक असल्यामुळे, त्यावेळी, या प्रकाराने अरुण किंचित् नाराज झाला होता.

शिवाय, घेतलेल्या प्लॉटवर असलेल्या जुन्या घराच्या सामानाचा, नवीन बाधकामात काहीं ठिकाणीं तरी उपयोग करता येईल, ही बाबासाहेबांची दृष्टि होतीच

त्यांत! त्यांतील बेढब पण भक्कम दरवाजे, खिडक्या वगैरे त्यानी निवडूनही काढलीं होतीं. पण आमच्या भरुच्यानें, आपल्या पारशी जातीच्या स्वभावाला अनुसरून, त्याची त्यावेळी थोडी टिंगल केल्यामुळेच, बाबांनी तो नाद सोडला.

घर बांधावयाचें ठरल्यावर, त्यानीं मला काहीं प्लॅन आखण्यास सांगितलें; त्यांतून अरुणच्या पसंतीचा प्लॅन ते कायम करणार असें म्हणत होते. अरुणनेही आपली सौंदर्यदृष्टि वापरून, माझ्या आवडीचाच प्लॅन पसंत केला. पण त्यातही, तो आणखी सुधारणेच्या आपल्या सूचना करूं लागताच, बाबासाहेबानीं थोड्याशा रागानेच, आपला बेत एकदम फिरवला व त्यापेक्षा तीन हजार रुपये कमी खर्चाचा प्लॅन शेवटीं पसंत केला.

त्या दिवशीं मला थोडे वाईट वाटलें. पण करणार काय? बाबाच्या म्हणण्या-प्रमाणें, शेवटीं तोच प्लॅन मी कॉर्पोरेशनमध्यें पाठवून, त्याबद्दल मंजूरी मिळविली.

आठवडाभर, अरुण फारच रंजीस झालेला दिसत होता. पण मी तरी काय करणार? शेवटी, 'अरे छोड देवयार, असा काय घाबरतोस? आपण याच प्लॅनमध्यें आपल्या साऱ्या कल्पनांना वाव देऊं!' असे मी थट्टेने त्याला सांगितले. तेव्हा कोठे त्याचे थोडेस समाधान झाले!

: ९२ :

घराची जागा आखून घेण्याच्या दिवशीं, बाबासाहेबाना वेळेवर येता आलें नाहीं, हे एका अर्थी बरेच झालें. त्यामुळे अरुणला, पुढे मागे, दोन्ही बाजूस, बागासाठी जागा तरी सोडतां आली! नाहीं तर, भाड्यासाठीं एखादे गॅरेज बांधण्याकरिता मागे बरीच जागा सोडण्याचा विचार, बाबानी मजकडे आधींच दोनचार दिवस प्रकट केला होता.

पण दुसऱ्या दिवशी, खोदकाम कसें झालें तें पहाण्यासाठीं बाबासाहेब आले; त्यावेळीं ते आम्हा दोघावरही खूप चिडले. तसे होणार हे आम्हीं जाणूनच होतो; तेव्हां, मी अरुणवर व अरुणने मजवर सारें ढकलून, ती गोष्ट तशीच हंसण्यावारी व नकळत झाल्यासारखी घालविली.

मुहूर्तमेढ झाल्यावर, मी पाया भरावयास सुरवात केली होती. त्यावेळीं, बाबासाहेबानी उत्तमात उत्तम माल घाला, असे मला पुन्हा पुन्हा सांगितले. मीही त्याच्या समाधानासाठीं खरोखरच अतिशय महाग मालमसाला वापरला. ते पाहून मात्र, त्याची माझ्या विश्वासूपणाबद्दल पूर्ण खात्री झाली!

पण मी मनात फार कचरत होतों. एक तर मला भरुच्याची भीति होती. आणि दुसरे, अशा तऱ्हेनें प्रत्येक गोष्ट मी बाबाच्या मनाप्रमाणे करू लागलो, तर शेवटी फायद्याची बाब राहील बाजूला, आणि उलट आमच्या कंपनीला तोट्याचा प्रश्नच पुढे येईल!

पण त्या बाबतींत मी एक ठरविलें आहे, वहिनी! मला बाबासाहेबांच्या घरात, माझे टक्के मिळाले नाहींत तरी चालेल; थोडी फार झीज सोसावी लागली तरी त्याची मी चिंता करीत नाहीं! पण मुख्य म्हणजे, त्याचें घर मी उत्तम ...भक्कम बाधून दिल्याचें मला समाधान पाहिजे आहे!

वहिनी, त्याच्या व आमच्या कुटुंबाचा घरोबाच तसा आहे. त्याच्या घराच्या पुढील पिढ्यात माझ्याविषयीं, दोन चागले उद्गार आले, तर मला आनंद कां वाटणार नाहीं? शिवाय, बाबासाहेबाचें, माझ्या वडिलावरील पडत्या काळातील लहान सहान उपकार मी कसा विसरेन बरें? तुम्हाला तें सर्व आठवत असेलच म्हणा!

: १३ :

घराच्या बाधकामाचा पहिला चिरा बसविण्याच्यावेळीं, एक मोठी गंमत झाली.

आमचें मोजमाप चालले होते. काम करतां करता, माझे गवंडी बाबासाहेबांनी मुहूर्ताचे बक्षीस कांहीं दिले नाहीं, म्हणून माझ्याकडे तक्रार करीत होते. आपल्या भाविक स्वभावाप्रमाणें, पहिला दगड बसविण्याच्या नक्की मुहूर्तापूर्वी, बाबा देवपूजेत गुंग होते. इतक्यांत, अरुण मजकडे एक लहानशी काचेची स्मेलिंग सॉल्टसारखी बाटली घेऊन आला.

त्याच्या मनांत काय कल्पना आली होती कोणास ठाऊक? तो म्हणाला, "अरविंद आपण जरा गंमत करूया रे! ही बाटली पाहिलीस का! यात पुढल्या काहीं शतकाची सामुग्री आहे. बाबा येण्यापूर्वी या चिऱ्याखालीं आपण ही बाटली अलगद ठेवून देऊंया!"

मला त्याची गंमत अजून समजली नव्हती; त्यामुळें मी त्याला गोंधळून विचारलें "अरे, आहे तरी काय असें या बाटलींत?"

"भावी काळच्या संशोधकांचे हें खाद्य!" तो मोठ्यानें मला म्हणाला, "त्या संशोधकानाच या बाटलींत पुरावयाचें आहे म्हणेनास!"

बाटली उघडण्यासाठीं मी मेण काढूं लागताच, तो म्हणाला, "थांब...ही आतल्या मजकुराची नक्कलच आहे माझ्याकडे!"

आणि अरुणनें दिलेला कागद उघडून, मी त्याच्याकडे एकदा कुतूहलानें हंसून पाहिले; व वाचूं लागलो ....

: १४ :

"माझ्या भावी कालच्या प्रिय संशोधक मित्रांनो! तुमच्या प्रयत्नाला यश येऊन, कदाचित् ही बाटली तुमच्या हातीं अचानक आली ..... त्यावेळीं, माझी मराठी मायबोली, कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें तुमच्याहि प्रचारात असली, तर तुमच्याचसाठीं हा सारा खटाटोप केला आहे मी! पहा कांहीं उपयोगीं पडलें तर ...

माझा मित्र अरविंद नाईक, हुशार कारागीर व शिल्पकार आहे, यांत संशय नाहीं! आणि तोच हें घर बांधीत आहे म्हटल्यावर, तें भक्कम व टिकाऊ होईल खासच! हो, अनेक वाऱ्या–पावसांचा मार सोसून, तें असेच उभे राहील!

पण कोणी सागावें? ... जगांत असें काय टिकाऊ आहे? आज असलेली कोणती वस्तु चिरकाल राहणार आहे,...तर हें घर तरी राहील?

तेव्हा साहाजिकच, हेही घर एकदा केव्हा तरी निर्जन होईल,–कोलमडेल...आणि खालीं पडेल! कालेकरून तसें होईल, किंवा धरणीकंपासारखी अघटित घटना, त्याला कदाचित् एक क्षणातही जमीनदोस्त करील....खाली आणील!

आणि त्यानंतर....?

अनेक वर्षे ...दशकें..शतकें गेलीं,..मानवी वस्ती येथून कोठे तरी लाब लाब झाली .. आणि माझ्या प्रिय संशोधकांनो, तुम्हाला केवळ काही कारणानें, चुकूनच कधीं आमच्या या विस्मृत भागाची आठवण झाली,... थोडाफार सुगावा लागला, तर तुम्ही काय करणार?

येथले दगड व माती खोदीत बसणार??..–

नका,.... माझ्या प्रेमळ बांधवानों, वेळाचा असा दुरुपयोग करूं नका!

पळ पळ करून आपल्या या पळापळीच्या आयुष्याची भरती होते! त्याचा असा अपव्यय करून, शेवटीं आमच्यासारख्या नष्ट मानवांचीच माहिती करून घेणार ना तुम्हीं? अनादिकालापासून, त्या त्यावेळीं श्रेष्ठ वाटणाऱ्या अशा अनेक घटना, असल्या अनेक व्यक्ती, वस्तू... जगांत झाल्या... गेल्या... त्या काय सर्वच शाश्वत टिकल्या?

मग यावेळींच का बरं तुमचा हा अट्टाहास??

त्यापेक्षा मला तर वाटतें, सारं आयुष्यभर असें इतिहासातच शिरण्यापेक्षां, तुमच्या भोंवतालच्या मानवी हृदयांत तुम्ही अवगाहन करा! त्यांच्यांतून पडत असतील त्या ठिणग्यावरच, आपली जीवनज्योत पेटवा!

पण तीं केवळ समकालीन एवढ्यामुळेंच तुमचें समाधान होत नसेल, त्यांची तुम्हाला खरी किमत कळत नसेल, तर—

तर हें लिहीणारा मी, अरुण ठाकूर, एक साधा नम्र चित्रकार, कलावंत आहे. पण त्यानेंहि आपल्या हृदयाचे अनेक भाग, आतांपर्यंत जगांत इतस्ततः फेंकले आहेत. यापुढें तर, श्रेष्ठतर कलाकृति निर्माण करून, ते तसे याहूनहि दूरवरपर्यंत फेंकण्याची, तो महत्त्वाकांक्षा करीत आहे ...

याच वेळीं, या कालांत, त्याच्याहून शतपटीनें श्रेष्ठ अशा, दुसऱ्याहि अनेक व्यक्ती, जगाला कांहीं तरी देऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत!

तुमच्या कालींहि अशा व्यक्ती असतील! पण तुमचें, तुमच्या काळच्या

असल्या ठिणग्यांनीं समाधान होत नसेल, तर या आमच्या इतिहासकाळांत शिरून, मी म्हणतों त्या सर्वांच्या शोधास लागा...तीं श्रेष्ठ साधनें हस्तगत करा... आणि त्याच्याच प्रसार करा! त्यानेंच आपल्याला खरें समाधान होईल!

नाहीं तर, पूर्ण विचार न करता, तुमच्यातलाच एखादा कसल्यातरी आशेनें, निघेल. आपले सारे आयुष्य, या आमच्या घराच्या दगडमातीची लांबी रुंदी मोजत बसेल. फुटके राजण हंडे गोळा करील, आणि फार फार तर शेवटीं माहिती काढील काय, तर आमच्यासारख्या क्षुद्र व जमीनदोस्त झालेल्या मानवांचा गोतावळा. आणि तोच तुम्हाला पाहिजे असेल तर ... मी थोडक्यात खालीं देतों! त्यानें तुमचे श्रम तरी वाचतील!

घर मालक—बाबासाहेब ठाकूर ( वय वर्षें ५६ )
( इंग्रज सरकारी मोठे अंमलदार )

घर बांधणारा— अरविंद नाईक (स्थापत्यविशारद, व. २६)

अरुण ( हे लिहिणारा; चित्रकार, वय २३)

शरद (वय १२)

पण खरंच...ही बाटली तुमच्या हातीं लागलीं तरच हे सारे पुढलें ?..तेव्हां जास्त कशाला लिहूं मी ? एवढेच तुमच्या हातीं लागले, तरी माझें बहुतेक मनोगत तुम्हाला समजले असेंच समजेन मी !... **अरुण ठाकूर.**

( डिसेंबर १९२७ )

: ९५ :

त्यातील त्या मजकुराची मला खरंच मोठी गंमत वाटली, म्हणून मी ती नक्कल पटकन् खिशात घातली, व बाटली गवंड्याच्या हातीं देत मी अरुणकडे पाहिले.

आमची दृष्टादृष्ट होताच, आम्ही दोघेही अगदीं मनापासून मोठ्यानें हंसलों.

त्याच्या त्या कल्पनेचें, मला खरोखरच कौतुक वाटलें होते; तरी मी शेवटीं लटक्या रागानें त्याला म्हणालो, " कां बिचाऱ्या संशोधकावर घसरलास ? त्याचा समाजाला उपयोगहि आहे, हें केवळ एकांगी दृष्टीनें पाहून तूं विसरलास ? पण तें असो; आणखी एका व्यक्तीचा मात्र, तुझ्या या गोतावळ्यांत उल्लेख करायाचा राहिला आहे, अरुण !".

" कोण ? तुझा भरुच्या म्हातारा वाटतं ? " तोहि हंसून थट्टेनें म्हणाला.

पण मी उलट त्याच्या पाठीवर थाप मारून हंसलों व म्हणालों ' नव्हे, मंजुळा देसाई ' !

माझ्या या अनपेक्षित उल्लेखानें, तोहि थोडासा लाजला व हंसला.

हो, खरंच वहिनी, तुम्हाला ही भानगड ठाऊक नाहीं वाटतं ? ... पुढल्या पत्रात त्याला जरा विचाराच तर मग ! ... मी ? मीं नाही बा त्याचे तें गुपित फोडणार ?

पण फार लाबलें आता हें पत्र !.. आणि आतां हा भरुच्या ..आला पहा आता त्याचे दगडामातीचे हिशेब सुरू होतील !–...अरुणच्या भाषेत म्हणावयाचें म्हणजे तो एक वर्तमानकाळचा संशोधकच आहे !..तेव्हा थाबतोंच आतां !...

तुमचा—**अरविंदभावोजी.**

( १३ )

ता. १५ फेब्रुवारी १९२८

मावशी,

मागे तुम्हीं माहेरीं गेला होता; त्यावेळीं परत जाताना आमच्याकडे दादरला, मुद्दाम एक दिवस उतरला, तेव्हांच मला तुमच्याशीं पुष्कळ बोलावयाचे होते. त्या दिवशी, तुम्हाला माझ्या मनांतील सगळे सागावे, अशी मला हुरहूर वाटत होती !... पण मग, एकदम काय व कसे सागावें, तेंच मला समजेना. आणि तुम्ही मला जाताना म्हणालात, ' पत्र पाठवीत जा मधून मधून, मंजुळाताई ! '

खरंच, त्या एकाच वाक्याने मला किती बरें वाटले त्या वेळीं म्हणून सागू ? कोणाच्या कोण मावशी ! पण त्या माझ्यावर लोभ करतात ! आणि त्याचा फायदा घेऊनच, आता मी गेले चार महिने, तुम्हाला पत्र पाठविण्याचा प्रयत्न करते आहे.

मावशी, खरं खरं जिव्हाळ्याचं जवळचं असं मला म्हणावयाला, कोणीच नाहीं म्हटलं तरी चालेल; आणि म्हणूनच तुमच्याकडे, आज माझं मन मोकळं करावयास धाव घेते आहे मी ! आज तरी, कोणत्या शब्दांत सांगं तुम्हाला मी, माझ्या हृदयातील साऱ्या भावना ?

: ९७ :

तुम्हाला ठाऊकच आहे, मावशी, यशवंतदादाच्या दादरच्या घरात मोठी माणसे, म्हणजे स्वतः दादा, आमची यशोदाआत्या, आणि पांडोबा व विठोबाअण्णा ही मध्यम वयाची पिढी.

त्यातले पांडोबा आपले, आपण बरे कीं आपली नोकरी बरी, अशा वृत्तीचे ! सकाळीं उठले कीं गाडीची गडबड; रात्रीं आले, कीं झोपेची गडबड. कधीं कधीं बसलाच अड्डा, तर जवळपासच्या ऑफिसच्या मंडळींत, पत्ते ! आणि वादविवा-

दाचा विषय निघालाच, तर ऑफिसमध्यें त्या दिवशीं घडलेल्या 'नामजोशी, रामजोशी, साहेब' वगैरेंच्या गोष्टींचा! त्यांच्या लग्नाला इतकीं वर्षें झालीं, पण त्यांच्या आयुष्यात, उत्साह म्हणून सांपडला नसेल कोणाला? उलट, त्यांची सदाची चिरचिर, भोंवतालच्या माणसानाही कधीं कधीं निराश करावयास पुरेशी असते!

विठोबाअण्णांची तर थेट विरुद्ध तऱ्हा! अनोळखी माणसाशींही सत्रा गोष्टी काढून, बोलण्यास तें मागे पुढे पाहणार नाहींत. त्यांत स्वतःच्या लहानसहान मोठेपणाचा बराचसा अंश असला, तरी त्या भांडवलावरच विशेषतः, त्यानीं आजपर्यंतचे अनेक धंदे धरले—हाताळले...सोडले! आणि त्यात थोडेफार यश मिळवल्यावाचूनहि ते राहिले नाहींत! त्याना, जगात एकदम खूप पैसा मिळवा-वयाचा आहे; पण मिळत नाहीं एवढेंच काय तें! त्यासाठीं, ते सकाळीच बाहेर पडतात; रात्री जरा उशीराच घरीं येतात. मेहनतीची कसूर करीत नाहीत. शिवाय, अनपेक्षित लाभासाठी डर्बी, गोवा वगैरे लॉटऱ्या भरून, पहिल्या बक्षिसाची नेहमीं अपेक्षेनें वाट पाहतातच! पण, त्या त्याना मिळण्याऐवजीं, एखादा आधींच श्रीमंत असलेला गृहस्थ मिळवून बसलेला त्यानीं पाहिला, कीं मग "ब्रह्मा—— विभवा देतो अशा गाढवा," अशी घरात बाहेर—सगळीकडे ओरड सुरूं होते!

: १८ :

या दोघांच्या आयुष्यांतील माझ्या पाहण्यातल्याच दोन गोष्टी—

तुम्हाला ठाऊक आहेच, पाडोबांना मूल नाहीं; म्हणून चार वर्षांपूर्वीच, आपल्या बायकोला माहेरीं पाठवून, वयाच्या चाळीशीच्या सुमारास, आपल्या 'आईच्या आग्रहासाठीं, त्यानीं दुसरें लग्न केलें! आतां, अजूनही मुलाचा पत्ता नाहीं, ही गोष्ट निराळी!

विठोबाअण्णाची पहिली बायको, तुमच्या अरविंदभावोजींची बहीणच. तिला एका पाठीवर एक मुलें झालीं. मग ती स्वतः आजारी झाली, शेवटीं ती अत्यवस्थ झाली...आणि मग तशा स्थितींत, डॉक्टर पहावयास धांवले!

पण आमची यशोदाआत्या, तिच्या मृत्यूनंतर, अण्णांच्या दुसऱ्या लग्नापूर्वीपर्यंत डोळ्याला पाणी आणून, चारचौघांत पुन्हा पुन्हा म्हणे, "काय होऽ! शेवटच्या दुखण्यात पाण्यासारखा पैसा खर्चला; पण पोर लाभलीच नाहीं आम्हाला. गुणाची होती बिचारी!"...

पण यापुढें, लवकरच हे पावसाळ्याचे दिवस गेले. पावसाळ्यानंतर हे ढग गेले. पावसाच्या पाण्याबरोबर, आत्याच्या डोळ्यांतलें पाणी पळालें. गावांत ताशे वाजंत्री वाजत, त्यावेळीं, आमच्या यशोदाआत्यानें आपल्या विठोबासाठीं हळहळावें.

शेवटीं, आमच्या घरांतहि पुन्हां वाजंत्री वाजलीं; व एकदांचे, इतक्या मुलामुलींचे वडील—आमचे अण्णा, नव्या बायकोला घेऊन,—ती चागली सुस्वरूप आहे हे तुम्ही पाहिलेच आहे,—नव्या बोहल्यावरून खालीं उतरले.

त्यानंतर, आपल्या जुन्या सुनेच्या गुणानीं डोळयांत पाणी येण्याऐवजीं, माझ्या आत्याला, आपल्या नव्या सुनेच्या डोळयातील पाण्याचाच नवा विषय झाला !

: ११ :

या दोघा भावाच्या आयुष्यातील, हे महत्त्वाचे प्रसग; पण दोघानाहि, त्याची फारशी दाद नाही. एकाला नोकरीमुळें वेळ नाहीं; दुसरा, आपल्या अनेकविध व्यापारांत गढलेला ! नवी विटी नवा दाडू म्हणतात, तसें चार वर्षात, माझ्या पाहण्यापहाण्यांत, आत्याच्या घरात नवीन सुना वावरूं लागल्या.

आमच्या यशवंतदादाचा वेदात अजूनहि कायम आहे. पण असिस्टंट मास्तर झाल्याला सहा वर्षें झालीं, तरी म्युनिसिपालिटी अठ्यात्तराचे नव्वद करीत नाही, म्हणून यशोदाकाकीकडे, ते हल्लीं हल्लीं दादरला रहावयास येईपर्यंत कुरकुरत असत.

आमची यशोदाआत्या म्हणजे खरोखरच अन्नपूर्णा. पक्वान्ने करणारी अगदीं सुग्रण; पण काटकसरीही तेवढीच! त्यामुळे एवढासाच पण रुचकर जिन्नस करील, आणि लहान मोठ्या सर्वांना पुरवील. एखादा नाविन्याचा जिन्नस घरात आला, तर स्वतः चागला पुरेल इतका निवडून काढून ठेवून, राहिलेल्याचे बारके बारके वाटे, पोरांकरवीं शेजाऱ्यास वाटण्यास तिला फार आनंद वाटतो. जवळपासच्या गरीब कुटुंबात, राहिलेले ताक पुरविणें, कोणाला चहासाठीं एवढेसेच दूध देणे, कधीं लोणचें, कधीं भाजी आमटी . . . पण दुसऱ्या कोणी काहीं पाठवलें, तर काहीं तरी कारण काढून ती ते घेणार नाही. या सर्वांच्या बुडाशीं, आपण कोणाचे लहानसहान गोष्टीसाठीं ओशाळे नसावे, पण या आपल्या लहानसहान देण्याघेण्याने लोकांनीं मात्र आपल्याला चागले म्हणावे, मोठे म्हणावें, ही वृत्तीच असते, हें काहीं सागायला नको.

आत्याची देवपूजा चालली, तरी लक्ष मात्र सारे चुलीकडे. देवाशींही, ती अशीच हिशेबाने वागते, म्हणाना ! घरातील लहानशी वस्तु हरवली, तरी देवाला दिडकीच्या साखरेची लाच द्यावयाचे ठरवून, ती लौकर सापडावी, म्हणून आत्या खटपट करील; आणि या बाबतींत तिचीं कोष्टकें आहेत, बरं का ! एकपासून शंभर रुपये किमतीच्या वस्तूंपर्यंत,.. दिडकी, शंभर ते पाचशेंपर्यंत.. दोन दिडक्या, व जास्तींत जास्त.. एक आणा ! आणि वस्तू कर्मधर्मसंयोगानें सांपडली व ठरल्याप्रमाणें दिडकीची साखर आणलीं, कीं, त्याचे बारके बारके खडे, जणूं लेबल लावून, शेजाऱ्यांपाजाऱ्यांपर्यंत न विसरता जायचेच !

: १०० :

सकाळीं दहापर्यंत, प्रत्येकजण आपल्या पद्धतीनें, घरांतील मुलांना वळणें लावण्याचा प्रयत्न करतो. संध्याकाळीं सगळे परत येईपर्यंत, घरात व मुलांवर आत्याचे साम्राज्य चालते. रात्रीं पुन्हा पुरुषमंडळीची सत्ता; पण त्यावेळीं ते स्वतःच्या सुखदुःखातच जास्त रममाण !...

मावशी, असल्या या एकदर वातावरणांत, वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षी, परिस्थितीनें मी येऊन पडलें आहे. तुम्हाला ठाऊकच आहे, माझे वडील नाना ठाकूराचे चुलत मेहुणे ! पण त्याची सारी –आठदहा हजाराची–इस्टेट, कोणत्याही कारणानें असो, त्याच्या मागें, मजकरिता काहीं राहिली नाहीं. एके काळीं, आमच्या मालकीचें असलेलें घर, वाडी वगैरेवर, आता नासासाहेबाची कायदेशीर मालकी आहे. दुर्दैव आणखी ओढवलें, आणि त्यानंतर लौकरच माझी आईहि वारली. मग, मला पोरकीला विचारतो कोण ? पण नानासाहेबानीं, शेवटीं, ‘ उदार ’ मनाने मला आपल्या घरीं आश्रय दिला. कांहीं दिवस, अजाणपणें तेथे काढले. पण, मग माझ्या चुलत आतेला–या तुमच्या यशोदाकाकीला,–माझा एकदम जिव्हाळा वाटूं लागला. आणि नानाच्या घरात बायको माणूस कोणी नाहीं, म्हणून, शेवटीं सर्वांच्या संमतीने, माझी उचलबागडी आमच्या यशोदाआतेकडे झाली.

आणि तेव्हापासूनच, मी यशवतदादाकडे दादरला राहूं लागले आहे. तशी एकदर खाण्यापिण्यात, आत्या मला प्रेमाने वागवते; असली, तरी तिच्या प्रत्येक वागणुकींत, तिची ही चमत्कारिक वृत्ति बोलकी झाल्यावाचून रहात नाही; आणि त्यामुळेंच, तें माझ्या मनाला फार जाचते.

पण तरीहि, अशा तऱ्हेने घरातली मंडळी म्हणतील त्या पद्धतीने, एक प्रकारचे प्रवाहपतित जीवन कंठीत, मी माझ्या आयुष्याचीं गेलीं काहीं वर्षे कशींतरी काढलीं.

:१०१:

तरी मावशी, या वातावरणातील माझ्या असल्या रुक्ष आयुष्यात, अरुण आल्यापासून मात्र, कशी कोणास ठाऊक, पालवी फुटूं लागली आहे.

ना ध्येय ना महत्त्वाकाक्षा ! भोंवतालचे चार करतील व सागतील तसे, मी माझें तारूं, जणू भल्या मोठ्या फोंफावणाऱ्या सागरावर, कसेंतरी व कोठेतरी...हाकलीत होतें. इतक्यात, तीन वर्षापूर्वी, माझ्या अतःकरणाच्या आकाशावर, अरुण आले! आणि या नव्या वाऱ्यासरशीं मी त्याच्या बाजूस वाहात गेले. मी अगदीं उघडपणें, अरुणाना, आपल्याजवळ नकळतच ओढूं लागलें. माझ्या मनाची ती सारीच मुग्ध गुप्त धडपड होती; त्यात प्रथम कोणीच भागीदार नव्हते !

आणि तेव्हांपासून, खरोखरच—मला प्रत्येक गोष्टींत नवीन नवीन उत्साह वाटूं लागला. मला कोणासाठीं तरी, कांहीं तरी, करावयाचें आहे, असें वाटूं लागलें; माझें माझ्या अभ्यासावर जास्त लक्ष लागूं लागलें. माझें गायन, माझ्या भोंवतालच्या लोकांना प्रिय नसतांही, वाढत गेलें. बरेच दिवस दुर्लक्षिलेली, माझी ओबडधोबड चित्रकला, मी पुन्हा माझ्या अंगीं आणूं लागले;..आणि अरुणाना प्रिय तें सारें मलाहि यावें, म्हणून मी प्रयत्न करण्याची शिकस्त केली. त्यानंतर ... अरुणांची सहानुभूति मला लाभली; पण त्याचे प्रेम ?... मी सहा महिने धडपडत होतें.

शेवटीं, एक प्रसंग आला. मनाची मोठी तयारी करून, मी अरुणाना पत्राचें उत्तर लिहिलें. त्यानंतरच्या आठवड्यात ते येणार होते. माझी छाती धडधडत होती. मला वाटलें, ' मी कसली त्याना पात्र? आणि अरुणानाही तसेंच वाटत असलें, तर माझी या आयुष्यात तरी धडगत नाही!'

शेवटीं ते आले. घरात आपल्या नेहमीच्या प्रेमळपणानें सर्वांशीं हंसत बोलत फिरले. माझ्याकडे, हास्यमुखानें एक प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला.

: १०२ :

आणि मावशी, त्या क्षणाला माझ्या आनंदास पारावार नव्हता. त्यानंतर, एका दिवशीं संध्याकाळीं, माझ्या साध्यासुध्या प्रेमाचा त्यानीं स्वीकार केला! त्यांतच, मला माझा स्वर्ग वाटत होता. पण शब्द काहीं सापडेनात. माझ्या डोळ्यातून धारा मात्र वाहात होत्या. हो, आणि त्या आयुष्यातील पहिल्याच खऱ्या आनंदाच्या होत्या.

या प्रसंगाला आता तीन चार महिने झाले आहेत.

मावशी, तुमच्याविषयीं वाटते इतकी आपुलकी, मला कोणाविषयींच वाटत नाहीं. आणि माझ्या अरुणाचे, जवळजवळ तुम्हीच लहानपणीं खरे लालनपालन केले आहे! म्हणून तुम्हालाच, सारें इतकें मोकळेंपणें प्रथम कळविलें. बाबा अरुणाना संमति देतील का? अरुण माझेच आहेत ना हो, मावशी? मी त्याना पात्र आहे का? नसले तर तसा अटोकाट प्रयत्न करीन मी!.. पण अशा वेळीं मी काय करूं? मला सुचत नाहीं... समजत नाही; तुम्ही सागा ना मला!.. अरुणानीं मला आपली म्हटली, पण .. बाबानींहि संमती दिली तर माझ्यासारखी सुखी कोणीच नाहीं! तुम्ही मला मदत कराल का मावशी, या बाबतींत? .. कशी? केव्हां?—

तुमच्या पत्राची उत्कंठेनें वाट पहातें .. **मंजुळा देसाई.**

मुंबई; ता. २६ फेब्रुवारी १९२८

प्रिय मावशी,

तुझे काल आलेले पत्र वाचलें. अरविंद एकंदरींत कळलाव्याच आहे म्हणायचा! घरबाधणीच्यावेळीं गमतीनें केलेली गोष्ट;..ती त्याने तुला कशाला कळवली सविस्तर?

बरें, त्यातहि विशेष नाहीं; पण आणखी मजुळा देसाईविषयीं मला विचारायला त्याने तुला सागितलें आहे, नाहीं का! जशास तसे हाच न्याय पाहिजे, प्रथम जगात. तुझ्याकडे त्याची गोम फोडूं का तसलीच एक! अग, आपली सुनीति त्याला दिवसेदिवस आपल्याकडे आकर्षू लागली आहे. आणि त्याला त्या दिवशीं चागला दम दिला, तेव्हाच त्याने तें माझ्याकडे कबूल केलेन्! त्यानें तुला सविस्तर लिहून जिचे एवढे अवडंबर केले, त्या बाटलींत घातलेल्या कागदातील सारा मजकूर त्याने तुझ्याकडे पाटवला; पण, " अरविंद नाईक–स्थापत्यविशारद (बाबासाहेबांचा भावी जामात )," असा त्यात उल्लेख केला होता तो तुझ्यापासून चोरलान् नाही का?

(पण खरेच, मावशी आमच्या घरात, तीच एक मोकळ्या मनाची लाडुक मुलगी आहे. अरविंदाच्या सहवासात ती खरोखरच सुखी होईल, मला वाटते! आणि त्या बाबतींत, दुसरी गंमत अशी आहे, कीं, बाबासारख्या हिशेबी माणसालाहि, अरविंद हा मिळविता जावई लागलीच पसंत पडेल. कधींतरी मला वाटते, मलाच ही सुखद मध्यस्ती करावी लागेल.)

तुझ्या पत्रावरून, मजुळेचेहि अलिकडेच तुला पत्र आलें आहे, असे दिसतें. अगदीच वेडगळ बुवा ती! माझ्या आधींच तिने त्या बाबतींत, तुझ्याशीं संधान जोडले वाटते? पण मावशी, तुला मी सविस्तर कळवीन कळवीन असे म्हणतच, इतके दिवस गप्प राहिलो होतो. माझ्या या गुपिताचा, तुला राग तर नाहीं ना आला? आला राग तरी तुझ्याकडे थोडा लाडुकपणा केला, कीं, तूं खुदकन हसतेस; मला ठाऊक आहे. त्याबरोबरच, तुझा राग कोठच्याकोठें बेडापार होतो;..आणि मग तुझे सत्रा प्रश्न सुरू होतात. तेव्हा, तूं ते प्रश्न विचारण्यापूर्वीच तुला सगळीं उत्तरें देतों;..मग तर झालें ना?

: १०४ :

मिरेची आठवण मी साफ विसरलों नाहीं, मावशी! पण, असें असूनहि, मी मंजुळेशीं इतक्या लवकर वचनबद्ध कसा होऊं शकलों, तें माझें मलाच समजत नाहीं. आजपर्यंत तुजपासून लपविलेले मधलें सारें, तुला सविस्तर सांगितल्यावाचून, आता तर गत्यंतरच नाहीं.

मी मध्यें दादांकडे दादरला राहून, कांहीं दिवस सायन्स कॉलेजांत जात असेना? त्यावेळीं थोड्याच दिवसांत, मला तेथील वातावरणात, बिचाऱ्या मंजुळेचा अगदीं कोंडमारा होत असलेला दिसून आला. सकाळीं उठलें, की, तिने घरकामाला लागावें. सुनांना प्रेमळपणा दाखविता दाखविता, यशोदाकाकीवर जवळ जवळ सर्व घरकामाचा बोजा पडत असे. तेव्हा तिला शक्य ती मदत करण्यात मंजुळेचाच सकाळचा बहुतेक वेळ जाई. आणि दोन कामात राहिलेल्या वेळात ती शाळेचा अभ्यास करी.

मंजुळा शाळेंत जात असे खरी; पण त्यातील यशापयशावर तिचें सुखदुःख फारसें अवलंबून नाहीं, असेच तिच्या एकदंर वागणुकीवरून वाटे! फारसे कोणात मिसळावयास नको, बोलावयास नको. त्यामुळें तिचा कुढेपणा बराच वाढला होता. बसल्याबसल्या तिचा काही तरी उद्योग मात्र चाले. शिवणकाम, ड्रॉइंग; काकी देवळात गेल्यावर, हळूंच आपली लहानगी जुनी पेटी काढून, ऐकलेल्या निरनिराळ्या रागाचे सूर, चोरट्या आवाजात आळवणे; नाहीं तर एखादे पुस्तक घ्यावें व त्यांत डोकें खुपसून खोलीच्या कोपऱ्यात पाय जवळ करून तिनें वाचत बसावें. मी राहावयास आल्यानतर बरेच दिवस झाले, तरी तिच्या असल्या कार्यक्रमात फारसा फरक पडला नव्हता.

असे पाच सहा महिने गेले होते. एके दिवशीं, मी संध्याकाळीं कॉलेजातून परत आलों, तों घरातील बहुतेक मंडळी बाहेर गेली होती. आणि आतून, मजुळेचें खुल्या आवाजातील गाणें, अगदीं तल्लीनतेनें, पेटीच्या सुराबरोबर ऐकू येत होतें. मी दारातच उभा राहून काही वेळ सारे ऐकलें. इतकी खुल्या अतःकरणानें तिला गाताना मी कधींच पाहिले नव्हतें.

शेवटीं, एक गाणे संपवून ती दुसऱ्याला सुरवात करणार, इतक्यांत माझ्या धक्यानें दाराची कडी वाजली. तिने दचकून मागें वळून पाहिलें. मला पा ताच ती लाजली व उठून उभी राहिली. मलाही तिच्या या अज्ञात कलेचें कौतुक वाटत होतें. “म्हणा कीं आणखी एक!” मी तिला सागितले, “फार चागले न म्हटलेत गाणें!” त्यामुळे ती जास्तच लाजली. पण मग, तिनें फार आढेवेढे घेता, आणखी दोन गाणी म्हणून दाखविली.

हा मी दादरला असताना प्रसंग. नंतर मी दादरहून मुंबईस रहावयास गेलो व या गोष्टी मी जवळ जवळ विसरतही गेलो होतों. पुढें डॉक्टरीसाठी परळला राहूं लागलों. त्यावेळीं, मधून मधून क्वचित् मी दादरला जाई; पण मंजुळेविषयीं माझ्या मनांत, फारसे काहीं विचारही येत नसत त्यावेळीं.

: १०५ :

यानंतर, वर्ष सव्वा एक वर्षानंतरचा दुसरा प्रसंग. डॉक्टरीच्या परीक्षेला

चार पांच महिन्यांनीं मला बसावयाचें होतें; आणि परळहून मी दादांकडे एका आठवड्याच्या शेवटीं दोन दिवस राहावयास म्हणून गेलों होतों, तेव्हांचा!

फिरावयास दारातून बाहेर पडतांना, उडतउडत आलेला एक मळकासा कागद, माझ्या पायाला लागला. त्यावर सुंदर व बारीक अक्षरांनीं लिहिलेला, तो काहींतरी मजकूर होता. मी तो सहज उचलून वाचला! आणि मला किती आश्चर्य वाटलें! माझ्या डोक्यात लागलीच प्रकाश पडला, .. तो मजकूर लिहिणारी मंजुळाच असावी; आणि तो तिच्या लेखनाचा एक अगदी नवखा प्रयत्न असावा! बारीक अक्षरानीं पाठपोट लिहिलेल्या त्या कागदावर, एका गोष्टीचा काहीं भाग घाईघाईत लिहिला होता.

" एक अनाथ पोरकी मुलगी, संकुचित मनाच्या माणसांत परिस्थितीनें येऊन पडलेली आहे. तिचा उत्साह दिवसेंदिवस कमी होत जातो. प्रत्येक गोष्ट ती प्रवाह-पतितासारखी करूं लागते. तिच्या मनात येणारे मोठमोठे विचार, तिच्या महत्त्वाकांक्षा, केवळ वाऱ्यावर उधळल्या जात असतात. कोणतीही गोष्ट करतांना, ' कां? कशाला? कोणासाठीं?' हे प्रश्न तिला सारखे भेडसावतात! तरी ती भोंवतालच्या चारजणांप्रमाणें सुरळीत आयुष्य कंठण्याचा प्रयत्न करते. पण प्रत्येक नवा, दिवस गेल्या दिवसासारखाच जातो; व आशेचे किरण अखेर मंद मंद होत जातात. तिची निराशा दुणावते व निरुत्साहाचे काळे ढग, तिच्या आयुष्याच्या आकाशात, दाटीदाटीनें जमूं लागतात. अशा प्रसंगीं, दुःखानें ती एकांतात पुष्कळ रडते. आपलें भवितव्य काय? व आपण कोणासाठीं व कशासाठीं जगत आहो, याची तिला मोठी भ्रांत पडून, ती असलें स्नेहविहीन आयुष्य कंठीत असते! तिला एक आशा मात्र वाटते. केव्हां तरी याच काळोखात शुक्राचा तारा उगवेल! आणि मग ...... "

या पुढील प्रसंगाचा कागद माझ्या हातीं आला नाहीं. कदाचित् तिने लिहिलेलाही नसेल. हे सारे विचार, तिला पूर्ण स्पष्टपणें मांडतां आले नसले, तरी त्यामुळे, मला मात्र मंजुळेच्या मनःस्थितीची बरीच कल्पना आली.

त्यानंतर दोन दिवस, तिच्या कोंडमारा झालेल्या असल्या मनःस्थितीची सहानुभूतीनें कल्पना करण्यातच, माझा बहुतेक वेळ गेला.

: १०६ :

तिसरा प्रसंग याहून निराळा होता. चार पाच महिनेच झाले होते या गोष्टीला. माझ्या परीक्षेची ऐन धामधूम होती. मी एका मुडद्याची चिरफाड करून, दोन दिवसाकरिता दादाकडे अन्नपालटासाठीं जात होतो. का कोणास ठाऊक, सहजच माझ्या डोक्यात मंजुळेविषयींचे विचार येत होते. जातां जाता,

मला सारखें वाटत होतें, त्या पोरींत गुण पुष्कळ आहेत. पण सहानुभूति, उत्तेजन स्नेह याच्या अभावीं त्यांचा विकास होत नाहीं...ते वाया जात आहेत.

घर जवळ येऊं लागलें, तसें मला सहज वाटलें, बहुतेक नेहमीसारखी काकी देवळात गेली असेल; आणि मंजुळेचा खुला मंजुळ आवाज, वाऱ्यावर तरंगत असेल. आपण हळूंच पूर्वीप्रमाणें जाऊं; तिचीं एक दोन गाणीं ऐकूं आणि...

पण मी घरीं येतों तों—सर्व सामसूम होतें. दरवाजा उघडून आत आलों, तो कोणीच दिसेना. इतक्यात, मुलाच्या खोलीच्या बाजूने एक दोन हुंदके ऐकूं आले. मी आत जाऊन पहातो तों, मंजुळा खिडकीखालीं पाय जवळ करून बसली आहे, व माडीत मान घालून ओक्साबोक्शी रडत आहे.

मी तिच्या अगदीं जवळ गेलों, तरी तिला दादच नव्हती. आपल्या हृदयाच्या आवेगांना, ती अगदीं मनमुराद मुक्तद्वार करून देत होती. माझे हृदय भरून आलें! मी हळूंच, तिच्या गरम झालेल्या कपाळाला हात लावून तिची मान वर केली व सहानुभूतीच्या अगदीं मृदु स्वराने तिला म्हणालों, "काय झालं बरं रडायला तुम्हाला?"...

ती एकदम दचकली, उठली. डोळे पुसून तिनें हंसण्याचा वृथा प्रयत्न केला; पण त्यामुळें तिचें रडें मात्र जास्तच वाढलें.

तिच्या त्या एवढ्या उत्कट दुःखाचें कारण कांहीं मला कळेना. ती पलंगाकडे गेली. त्याला ओडगून उभी राहिली; व मग त्यावर एकदम अंग टाकून, कोपरांत डोकें लपवीत ती पुन्हा मोठ्यानें उसासे टाकूं लागली!

तिची तसली मनःस्थिति पाहून, मला अत्यंत दुःख झाले. मी थोडा वेळ तिला शांत होऊं दिलें व नंतर तिच्याजवळ जाऊन मी तिला म्हणालो, "मंजुळा ताई, झालें तरी काय? ... तुम्ही रडे थाबवा. मग आपण सर्व अगदी मोकळेपणें बोलूं तरी! सागा बर मला, तुम्हाला कसले दुःख होतंय, ते?"

आणि तिनें थोड्या वेळानें नाक डोळे पुसून वर पाहिले. आपला साधासा काळासावळा चेहरा मनापासून हंसरा करून, रडण्यामुळे लाल झालेले आपले डोळे, क्षणभर माझ्यावर रोखले, व माझ्या मनाचा जणूं ती टावच घेऊ लागली.

: १०७ :

त्या दिवसापासून माझ्या मनात मात्र भावनसागर उचंबळून येऊं लागला. मंजुळेविषयीं जास्त आपुलकी वाढूं लागली. आणि याच विचारामुळें मी आणखी तीनचार महिन्यानीं, एके दिवशीं, तिला मुंबईहून सहजच एक साधें स्नेहपूर्वक पत्र पाठविलें. त्याला प्रथम बरेच दिवस तिच्याकडून उत्तर

आले नाहीं. पण जवळजवळ सहा महिन्यांनंतर, मंजुळेचें उत्तर आलें; तें वाचून मात्र, प्रथम मी दचकलों. कारण, त्या अनपेक्षित पत्रात, तिनें आपलें मजविषयींचें उत्कट प्रेम उघड उघड व्यक्त करून, मजकडे माझ्या आजन्म सहवासाचीच मागणी केली होती!

मला प्रथम कांहीं सुचेना. मिरेच्या आयुष्याची वाताहात मला काहीं केल्या स्वस्थता देईना. पण अनेक विचारांमुळें माझ्या मनाला लागलेला हा नवा वणवा, विझवण्याचा प्रयत्न करूनहि, मला त्यांत यश येईना. शेवटीं, आठवडाभर बराच विचार करून, मी तिला पत्र लिहिलें. समक्ष भेटावयासहि गेलों; दोन दिवस दादाकडेच राहिलों, आणि तेवढ्या अवधींत मला वाटूं लागले, मी खरोखरीच सुखी आहे. माझ्या संगतीमुळें, मंजुळाहि अतिशय उत्साही व आनंदी आहे, हें दिसताच, मनाचा पूर्ण निश्चय करून, मी तिला माझ्या मनातील सारे सागितले. त्यावेळीं, माझे हृदय आनंदानें किती भरून आले होतें, मावशी ?

तुला आवडली ना ग मावशी, मंजुळा सून म्हणून ?.. पोरगी आहेच तशी!.. रागावली नाहींस ना, मावशी, आतापर्यंतच्या या साऱ्या मौनाबद्दल? बाबाना काय वाटेल कोणास ठाऊक याविषयीं? तरी पण, आपले मनोव्यापार वडील मंडळींना उघडपणें कळवून टाकावेत, असा मी निश्चय करून टाकला. विशेषत:, आजपर्यंत काहीं चोरून ठेवत आलेलो नाहीं म्हणून!.. पण बाबाना केव्हा व कसे कळवावे, हा माझ्यापुढे प्रश्न आहे!— तुझा—**अरुण.**

(१५)

मुंबई; ता. १० मार्च १९२८.

ती. सौ. वहिनीस सप्रेम नमस्कार,

तुमचे पत्र पोहोंचले; मला लग्न करावयाचा तुम्ही एवढा का आग्रह चालवला आहे समजत नाहीं! तुम्हाला 'बाई' गिरी चालविण्यासाठीं, एखादी लहानशी जाऊ पाहिजे आहे कीं काय, हाताखालीं? कीं, अरुणच्या नादीं लागून, तो तुमच्या मनात काहीं तरी भरवून देतो, त्यावर, सारे इमले उभारता?.. तुम्हाला खरंच सागावयाचें, म्हणजे मला तुमच्या अरुणसारखें प्रेमबीम कांहीं काहीं कळत नाहीं. सुनीतीवर माझं प्रेम बसलं आहे आणि यंव् न् त्यंव् असें तो सागत असला, तर त्यात कांहीं तथ्य नाहीं...बरं कां?...

आतां एवढें खरें, माझ्या आयुष्याचा आतांपर्यंतचा भाग, सारखा शिकण्यां-

तच गेला. त्यावेळीं, शिक्षण हें मजपुढें एकच ध्येय होतें. आता कमाई चागली होत आहे; स्थिरताहि आयुष्यास बरीचशी आली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यामुळें, आता चालू आहे तसेंच एकाकी आयुष्य सारखे पुढे चालवूं नये, असें मलाही, तुम्ही म्हणतां तसे, मधून मधून वाटतं!

पण,..वैवाहिक आयुष्यांत सुख कशाने मिळूं शकतें, तेंच माझें अजून ठरत नाहीं. तुमच्यासारखी मला जिव्हाळ्याची वाटणारी चार मंडळी व त्यांचे वैवाहिक जीवन पाहिलें, म्हणजे उलट प्रश्न पडतो, कीं लग्नांत खरोखरच सुख आहे का? आणि त्यामुळें थोडी दोलायमानच मति झाली आहे खरी.

एक सागायला हरकत नाहीं, तरी पण तुम्हाला. गेल्या चार महिन्यात, घर बाधण्याच्या गडबडींत, अरुणमुळें सुनीतीचा माझा थोडा परिचय झाला. त्याच्या घरात ती मुलगी बरीच प्रेमळ व मोकळ्या मनाची आहे. अरुण आणि ती तिऱ्हाईताला अगदीं सख्खीं भावंडें वाटतील. सुनीति प्रेमळपणात वगैरे अरुणच्याच वळणावर गेली आहे; त्यामुळे, मला त्या मुलीविषयीं थोडासा आपलेपणा वाटतो खरा!

पण नको, दुसऱ्याच्या मुलीविषयीं जास्त लिहिणें बरे नाहीं. विशेषतः, बाबासाहेबासारखा कायदेबाज मनुष्य तर मजवर लागलीच फिर्याद माडायचा!

: १०९ :

थोडा वेळ आहे, तेव्हां आता थोडे बाबासाहेबाच्या कायदेशीरपणाविषयीं लिहितो, तर मग!

त्याच्या घराबाबात, माझी व भरुच्याची बाचाबाची—भाडणाइतकी नसली तरी थोडी फार गंभीर स्वरूपाची—झाली. वास्तविक, आमच्या कंपनीच्या फायद्याच्या दृष्टीनें, त्याचें म्हणणें बरोबर आहे. कारण बाबासाहेबानीं शेवटची मुदत ठरविली आहे. त्यानंतर उशीर झाल्यास, प्रत्येक दिवसाबद्दल ते वीस रुपये दंड घेणार आहेत. दुसरे, रक्कम एकुणतीस हजाराची ठरली आहे. इतकें असून मी व अरुण, काहीं काहीं वेळा सौंदर्याकडे पहात, दिवसाचे दिवस घालवीत बसलो; व बाबाच्या प्रत्येक चिकित्सेला मान देऊन, मी हरएक ठिकाणीं, करारापेक्षा चागला माल वापरीत गेलो आहे. त्यामुळें, कदाचित बाबासाहेबाच्या घराच्या एकदर रकमेंत, शेवटीं वादा येईलसे वाटते. आणि पैशाच्या दृष्टीने असा तोटा कंपनीनें सोसणें, भरुच्याला मुळींच पसंत नाहीं. कारण, त्यानें कॉंट्रॅक्टच्या रकमेंतच, माझ्या आग्रहासाठीं दीड हजार कमी केले आहेत.

शेवटीं दोनतीन वेळा मला रागावून बोलल्यावर, मी त्याला सागितले, कीं, "बाबा रे, तूं घाबरूं नकोस, तोटा झाला तर मी स्वतः सोशीन, आता तरी स्वस्थपणें जाशील घरीं!" तेव्हां एकदम रंगात येऊन, त्यानें तुमच्या सारखेंच

मला विचारलें, " म्हाताऱ्याला खुष करून त्याची काय पोरगी उपटणार आहेस वाटतं ? "
: ११० :
*पण माझा विचार अगदीं सरळच आहे.* आणि तों मी तुम्हांला यापूर्वी एक दोनदा कळविलाच आहे. पण जाऊं द्या; ती गोष्ट सोडून दिलेली बरी. कारण, इतकें सर्व मनापासून करत आहे, तरी बाबाची मधून मधून चालणारी किरकिर अजून थांबत नाहींच !

अरुण गेल्या महिनाभरांत घराकडे एकदाहि वळलेला दिसला नाहीं ! त्याचें हल्लीं तिकडे विशेष लक्षच नाहीं, मला वाटतें. कदाचित्, वसंताच्या 'कलावती' मासिकामुळें असेल, कीं दुसरें कांहीं आहे, कोणास ठाऊक ! असो.

मुलांस आशीर्वाद; ती. भाऊंस नमस्कार. तुमचा–**अरविंदभावोजी.**

( १६ )

मुंबई; ता. १ मार्च १९२८

प्रिय मावशी,

तुझ्या पत्रांतून, दोन तीनदां पुन्हा पुन्हा, मला हल्लीं माझें घराकडे लक्ष नाहीं म्हणून तूं दोष दिला आहेस. तुजकडे यावयास अजून दोन महिने वेळ आहे. तेव्हां तुला समक्ष सांगावयाच्या गोष्टी, आता पत्रात लिहिल्यावाचून गत्यंतरच नाहीं.

बाबाचाहि माझ्यावर तुझ्यासारखाच आरोप असणार, हे मी जाणतों; आणि त्यांच्या पत्रावरूनहि मला तसें वाटते. पण त्याच्याबरोबर कसें वागावयाचें तेंच मला समजत नाहीं ! परिस्थितीने ते आज समाजात स्थिर आहेत; आणि मी त्याचा मुलगा असलो, तरी व्यक्तिशः, अजून मी माझ्या आयुष्याच्या सुरवातीच्या भराऱ्या मारणारा तरुण आहे, अकिञ्चन आहे ! हे मलाहि पण समजते; पण त्याचा अर्थ, त्यानीं क्षणाक्षणाला त्याची जाणीव करून द्यावयाची, असा होतो कीं काय ?

त्याचे आता उतार वय झाले असूनहि, त्याच्यावरच मी साऱ्या व्यवहाराचा भार टाकतों, त्याना मुळींच मदत करीत नाहीं, असा त्याचा आरोप नेहमीं मजवर असतो. म्हणून आपण लक्ष घालून एखादी गोष्ट करायला जावें, तरी बाजू उलट आपल्याच अंगावर शेकल्याचा अनुभव येतो ! ...या सर्व

पण मी हें वेड्यासारखें तुला काय सागत सुटलें आहे ? तुझी जबाबदारी तुला कळत नसेल का?

बस्स, आता येथेंच एकदम थांबतें. नाहीं तर असेंच भरकटण्याचा हा मोह आवरणें मला शक्य नाही . . . अरुणाना मी लिहिलें आहे कीं,...मला साफ विसरून जा. पण, मावशी, तूं माझी रोज आठवण काढतेस, असे कधीं मला असेन तेथे कळलें, तर मला मूठभर मांस चढल्यासारखे वाटेल! . . . (तुम्हा दोघांशिवाय मला विशेष आठवण कोणाची होईल ते सागता येत नाहीं) मावशी, माझी आठवण जपून ठेव बरं! . . .

आतां पुन्हा भेट होईपर्यंत तुझ्या प्रेमाची अपेक्षा करणारी एक खेडवळ वेडी मुलगी... .. —मिरा—

(२)

"मला, माझ्या अरुणाना सोडून जाणे जिवावर येईल,...नव्हे ते शक्यच नाही.

पण मावशीहि माझ्यावर प्रेम करते. माझ्या इतकेंच माझ्या अरुणावर तिचे प्रेम आहे! ती म्हणाली..."मिरे, अरुणच्याच पुढील आयुष्याच्या दृष्टीनें विचार कर! त्याला सुखी करायचें असेल, तर तूं त्याच्या आयुष्यातून या क्षणीच दूर हो!...... "

आणि खरंच, मावशीचें खर आहे. अरुण! तुमचें आणि माझं स्थान सारख नाहीं!

ठरलच; मी तुम्हाला, माझ्या बाबाला—(तो म्हणे मला माझं लग्न शक्य तितक्या लवकर जुळेपर्यंत मी 'उनाडक्या' करूं नये म्हणून माझ्या दुसऱ्या चुलत्याकडे, त्याच्या गावी ठेवण्याचा विचार करीत आहे.) साऱ्याना सोडून कुठ तरी लांब लांब निघून जाते एकदाची!

जीव नाहीं देत काहीं मी! माझा जीव वर आलेला नाही. तुम्हीच नाहीं कां म्हणाला होता, अरुण, मागे? 'जगात आपण येतो त्यावेळच्यापेक्षा, जगातून आपण जाताना त्यात काहीं तरी जास्त सुधारलेली स्थिति दिसावी! आणि असे काही करण्यापूर्वी मरणे ही माणुसकी नव्हेच मुळीं!'—म्हणूनच, नेहमी कोत्या व्यवहारी दृष्टीनें आपल्या भोंवती पाहणाऱ्या या माणसाच्या सहवासापासून, सध्या तरी, लांब कोठेंतरी अज्ञात ठिकाणी, मी निघून जातें आहे!—

नाहीं. आणि हजारांनीं घालविण्यास मात्र तुला एका क्षणाचाहि विचार किंवा दिक्कत वाटत नाहीं. तुझ्यासाठींच ह्या हॉलच्या गोष्टी मला आतां कराव्या लागत आहेत. तुला तो पाहिजे तर पाहिजे म्हण, नको तर नको म्हण! जास्त आचरट उत्तरें कशाला?"

मलाहि त्याच्या या वृत्तीचा संताप आला. मी चटकन् म्हणालों, "पण मी कोण हें सर्व सांगणार? घर तुमचें! मालकी तुमची! पैसाहि तुमचा खर्च होणार! तुम्हाला पाहिजे तर बांधा वरचा हॉल, नाहीं तर नको! मला पुन्हा मात्र, उगीच तोंडापुरतीं माझीं मतें विचारत जाऊं नका!"

:११३:

हा विषय कदाचित् पुढेहि वाढला असता. पण अरविंद मध्यें पडला व मीहि मनावर ताबा आणून तेथून लागलीच निघून गेलों. मला इतका राग येण्याचे कारण, त्या आधीं त्याच प्रकारचे दोन प्रसंग घडले होते!—

पहिल्या मजल्यावरील हॉलमधल्या फरशीचें काम चाललें होतें. त्या आधीं, बाबा दोन दिवस कामावर आले नव्हते. माझ्या मनात, साधी फरशी करण्या-ऐवजीं, हॉलला पेटंट स्टोन अगर भारत टाइल्स वापरावयाचे होते. मी अर-विंदाला खर्चाचा अंदाज विचारला. तो म्हणाला, साधारण सव्वाशे दीडशे रुपये जास्त खर्च येईल. त्यामुळें, लागलीच, त्याला तशा तऱ्हेनें हॉलचें काम करावयास मी सांगितलें. आणि थोड्याच वेळांत, सर्व सामान येऊन, त्या दिवशीं, हॉलचा अर्धाअधिक भाग माझ्या मनाप्रमाणे शृंगारण्यातहि आला.

पण, बाबा दुसऱ्या दिवशीं आले. व गवंडी हॉलचें हे नवेंच काम करीत असतांना पाहून संतापले. मीहि नेहमीप्रमाणें, सकाळींच तेथें आलो होतों. त्यानी गवंड्यांना विचारलें, "हें कोणी सांगितलें तुम्हाला करावयाला?" त्यांनीं सांगितलें, "धाकट्या साहेबांनीं!" ...

इतक्यात, मी व अरविंद, दुसऱ्या खोलींतून, बोलत बोलत तिकडेच येत होतों; तेव्हा, बाबा रागारागानें त्याना सांगत होते,.. "माझे सांगणे न ऐकता, तुम्हाला हें करावयाचा मूर्खपणा कोणी सांगितला? तुम्हाला पैसे कोण देतो,.. मी कीं अरुण? त्याला पैसे घालविण्याची तेवढी अक्कल आहे. दिडकी मिळवि-ण्याची मात्र अंगात कुवत नाहीं. तुमचा अरविंदशेटहि मोठा शहाणा दिसतो. तो देणार आहे का याचे पैसे?"

माझ्याविषयीं बाबांनीं गवंड्याकडे काढलेले शब्द ऐकून, मला राग आला व मी त्याना उत्तर देण्यासाठीं तिकडे जाऊं लागलों; पण अरविंद मला मागें लोटून स्वतःच पुढें झाला.

"काय बाबासाहेब, पसंत आहे ना तुम्हाला हें काम?"...तो आपल्या

गमत्या स्वभावाप्रमाणें बोलूं लागला. पण बाबा त्याला रागारागानेंच, पैशाच्या गोष्टी विचारूं लागले. तो आपल्या नेहमींच्या पद्धतीनेच, त्यांना शांतपणे हंसत म्हणाला, "पैसे नका हो देऊं. पण काम तर छान आहे म्हणून म्हणाल!.. याचा जादा खर्च मी सोशीन; मग तर झालें!"

यावेळीं मात्र मला अरविंदाचा राग आला. मीच पुढे होऊन म्हणालों, "बाबा, पैसा आपलाच खर्च होतो खरा!..पण हॉलचे काम म्हणूनच, मी स्वतः त्यात आपल्या जबाबदारीवर, तसे करण्यास परवानगी दिली होती; तुमच्या गैर-हजेरींत सांगितले, तें त्याचे तुम्हाला विशेष वाटणार नाहीं, असेच मी समजत होतो, म्हणून.... "

त्यावर बाबा लागलीच म्हणाले, "हो, तुला दीडशे रुपयाची किंमत नाहीं. पण प्रत्येक दिडकी मिळविताना, मी माझा घाम सांडला आहे!"

शेवटीं, अरविंदने पुन्हा त्या पैशाची जबाबदारी स्वतःवर घेतली; तेव्हा त्याचे समाधान झाले.

त्यानीं अवघ्या नव्वद रुपयासाठीं, पहिल्या मजल्याला सरळ व उभा जिना करावयाचा हुकूम दिला होता. पण अरविंदने, आपल्या नेहमीच्या स्वभावा-प्रमाणे, त्याचे पंचेचाळीस अंशाचे दोन विभाग पाडले होते. हॉलच्या भिंतींत, अरविंदने आरशाचीं दोन मोठी कपाटे बसविलीं होती. व आपल्या रंगा-ऱ्याला, भिंतींना तेलाचा रंग द्यावयास, हुकूम केला होता.

या सर्वांच्या मुळाशी मीच आहे, असे गृहीत धरून, बाबानी अरविंदला दोन दिवसापूर्वीच, "एक पैहि मी जास्त देणार नाहीं; मागाहून ओरड नको. अरुणचें सर्व ऐकत असता; पण पैसे माझ्या खिशातले जातात!" अशा तऱ्हेची तंबी दिली होती.

: ११४ :

आणि या प्रसंगामुळेच, बाबानीं गवंड्याजवळहि माझी शोभा करतांच, मला राग आला; व महिन्यासव्वामहिन्यापूर्वी, त्याचवेळीं मी ठरविलें, कीं, यापुढें घराच्या बांधकामात आपण उदासीनच राहावयाचे. पण त्यामुळेंहि बाबा मज-वर रागावले आहेत, असे अरविंद काल रस्त्यात भेटला होता तेव्हा म्हणाला. आणि तूंहि आतां पत्रात तेंच लिहितेस!

आतां, या माणसाबरोबर वागावयाचे तरी कसें? हेच मला समजत नाहीं!... मला मात्र राहून राहून आश्चर्य वाटतें ते अरविंदचे. आतापर्यंत, असल्या सौंदर्य-दृष्टीसाठीं व माझ्या आवडीनिवडीसाठीं, कॉंट्रॅक्टच्या रकमेपेक्षा त्याने दोन-हजारांवर जास्त खर्च केला आहे. आणि ते पैसे, शेवटीं, बाबा त्याला देतील कीं नाहीं, याबद्दल मी तरी अजूनहि साशंकच आहे.

पण त्याचें म्हणणें असें, कीं, या किरकोळ गोष्टी, घर एकदा बांधल्यानंतर,. कोणी बदलत नाहीं;.. तेव्हां सध्यां काम चालूं असताच त्या करून घेऊं. नंतर बाबानीं जादा रक्कम दिली तर घेऊंच, नाहीं तर, फायदा फार तर नाहीं मिळणार आपल्याला या कामात!

तेव्हा तूंच पहा, मावशी! बाबांची प्रत्येक गोष्ट पैशाच्या शब्दांत चालते. त्यांच्या प्रत्येक लहान सहान सवलती, अगदीं ठराविक वृत्तीच्या असतात. मग त्यांच्या मुलानें त्याच्याशीं मोकळेपणे वागावे, त्यांच्या व्यवहारात मदत करावी, अशी त्याची अपेक्षा तरी का करावी? आणि केली तरी, मी त्याप्रमाणे का वागावें?

आता तरी, कृपा करून, तूं मला या बाबतींत दोष द्यावयाचा किंवा उपदेश करण्याचा प्रयत्न करूं नकोस! तुझाच—**अरुण.**

(१७)

मुंबई ता. ६ जून. १९२८

ती. सौ. वहिनीस सप्रेम नमस्कार,

तुमचीं लहान लहान दोन पत्रें आलीं, पण बरेच दिवसांत वेळ मिळाला नाही. आज बाबासाहेबाच्या घराच्या बाधकामापासून मोकळा झाल्यामुळें मनाला स्वस्थता वाटत आहे; म्हणूनच तुम्हाला हे पत्र लिहावयास घेतले.

मी बाबासाहेबाचे घर बाधावयास घेतल्यापासूनच, भरुच्याची व माझी, मधून मधून पैशाच्या बाबतींत झटापट होत असे. आता घर बाधून झाल्यावर, त्याने व मी बसून सारा हिशेब केला. कॉंट्रॅक्ट ठरले होतें एकूणतीस हजारांचे व मुदत ठरली होती, पायानतर साडे पाचमहिन्याची. त्या दृष्टीनें पाहतां, जवळ जवळ पंधरा दिवस उशीरच झाला, घर बांधून संपावयास; आणि आमच्या खर्चाची तपासणी करता, एकंदर साडे बत्तीस हजार भरले.

त्यामुळे, मला थोडी चिंता वाटते खरीच; पण, बाबासाहेब थोडा विचार करतील व माझें अगदीच नुकसान करणार नाहींत, असें मला वाटतें. कॉंट्रॅक्टच्या रकमेपैकीं, आतापर्यंत, आम्हाला जवळ जवळ वीस हजार रुपये, बाबासाहेबांकडून मिळाले आहेत. घर बाधून झाल्यावर, पंधरा दिवसांत राहिलेली रक्कम चुकती करावयाची असेही ठरले आहे. नव्या घरांत प्रवेश करावयास बाबाना सव्वा महिना मुहूर्त नाहीं असें दिसतें. तेव्हां त्या आधीं बहुतेक बाबाकडून रक्कम मिळेल असे मी भरुच्याला सागितले. त्यानें तें ऐकून कबूल केले, तरी, 'पंचवीस

दिवसांत वाटेल तें करून तूं रकमेची भरपाई करणें जरूर आहे,' असें मला गेल्या आठवड्यांत त्यानें बजावलें आहे.

अर्थात्, मला कसेंहि करून, तेवढ्या दिवसांत सारी रक्कम उभी करणे, आता जरूर झाले आहे. कारण, व्यवहारी भरूच्यानें त्या तारखाचे व तेवढ्या रकमाचे पुढले चेकहि, मला निरनिराळ्या व्यापाऱ्याना द्यावयास लावले आहेत.

:११६:

एकोणतीस हजारात, आम्हाला फक्त हजार रुपये फायदा झाला असता. भरुच्याने बरीच रक्कम आधींच कमी केलेली असल्यामुळें, या फायद्यात, मी माझा भाग न ठेवण्याचें आनदानें कबूल केलें. पण फायद्यात भाग न घेऊनहि, एकोणतीस हजाराच्या कॉंट्रॅक्टचे साडेबत्तीस हजार झालेच, त्याची वाट काय लावायची?

बाबासाहेबाच्या उडत बोलण्यावरून, ह्या साडेबत्तीस हजारातील फक्त हजार रुपये जास्त द्यावयास, ते तयार आहेत. म्हणजे, अडीच हजार रुपयाची जबाबदारी मजवर येऊन पडेल कीं काय, अशी आता भीति वाटते. माझ्या व अरुणच्या आवडीनिवडीसाठी, या अडीच हजारापैकींहि मी पाचशें रुपये सोसण्यास तयार आहे. म्हणजे राहिलेली रक्कम व ही रक्कम मिळून बारा हजार रुपयांची होते. तरी पुढल्या वीस दिवसांत मला तिची भरती करावयास पाहिजे आहे. बाबानीं आयत्या वेळीं, हे कॉंट्रॅक्टहून जादा साडेतीन हजार रुपये दिले नाहींत, तर मात्र माझ्या फजीतीस पारावार नाहीं. म्हणूनच मी आतापासून पैशाच्या निरवानिरवीस मोठ्या कष्टानें लागलों आहे.

माझ्या अनेक मित्राकडे माझ्या लहान लहान रकमा पडलेल्या आहेत. त्याजकडे गेल्या पांच सहा दिवसात आळीपाळीने मी मागणी केली; पण दूरदूरचीं आश्वासनें, थापेबाजी, व एकंदरीत बेफिकीरी, या गोष्टींनींच माझी ठिकठिकाणीं संभावना झाली. आणि भरुच्या तर मला दर दोन दिवसानीं, आठवण करतो आहे. त्यामुळें मी शेवटीं रागानेंच, त्याला त्या दिवशीं सागितलें, " अर्देसर, मला माझी जबाबदारी समजते. तेव्हां ठरल्या चेकाची मी हमी घेतली आहे; त्याची काळजी आतां तुला नको ! "

पण त्याचे सांगणेहि बरोबर आहे. पैशाच्या बाबतींत कंपनीचें नांव बद्दू होता उपयोगी नाहीं. वेळीं अडचण पडली व भरुच्याला स्वतःच पैशाची भरती करावी लागली, तर त्याचें माझे थोड्यासाठीं वितुष्ट येण्याचा संभव आहे. पण तसें करून, स्वतःच्या पायावर धोंडा टाकण्याइतका मी मूर्ख नाहीं. कारण, आमची कंपनी, एकमेकाच्या सहाय्यानेंच, नुकती कोठें नांवारूपास येत आहे. भरुच्याच्या अनुभवाची मला व माझ्या पुस्तकी ज्ञानाची त्याला, अशी दोघानाही एकमेकाची फार मदत होते.

तव्हा मला माठा प्रश्न पडला आहे, का, बाबासाहेबाना आयत्यावेळा, माझ्या अपेक्षेप्रमाणे, जादा साडेतीन हजार देण्याचें नाकारलें, तर पैसा आणावयाचा कुठून ?

: ११७ :

पैसे उभे करण्याच्या गडबडींत, एक मोठा चमत्कारिक प्रसंग घडून आला. इतरांकडे लहान लहान रकमा होत्या, तशाच प्रकारें, वसंताच्या 'कलावती' मासिकाच्या मधल्या एका लहानशा गंडातरात, मी वसंताच्या न कळत, त्याच्या वतीनें अरुणला दोनशे रुपये दिले. त्याचा माझा संबंध फार जिव्हाळ्याचा; पण यावेळीं मी त्याच्याकडे त्या रकमेची मागणी केली.

त्यानेही, गेल्या आठवड्यातील, एका ठरलेल्या तारखेला, निदान शंभर रुपये तरी देतो, असें कबूल केलें. तेव्हा, मी हातीं येणारा सारा पैसा बॅंकेत भरत सुटलों होतो. त्यामुळे, फक्त अरुणच्या आशेवरच, मी वरखर्चासाठीं एकाकडून पंचवीस रुपये हातउसने उचलले होते.

पण मी ठरल्याप्रमाणे गेलो, तों अरुणचा चेहरा उतरला होता.

" मी आज पळूनच जाणार होतो खोलीवरून, अरविंद !" तो थोडा रंजीस होऊन, हसण्याचा प्रयत्न करीत, शेवटीं म्हणाला, " पण मग म्हटलें, आपल्याकडे पैसे हातीं आले नाहींत खरे आज. मग तेच ..."

" ही प्रस्तावना वाटतं, पैसे न देण्याबद्दलची ?" मी थोडासा नाराज होऊन, खोंचकपणे त्याला म्हणालो, " बरे बाबा, ठरल्याप्रमाणें शंभर नाहींत तर नाहींत–मला खात्रीच होती तुला आठ दिवसात तितकी रक्कम एकदम मिळणार नाही म्हणून–पण आज तीस रुपये तरी देशील कीं नाहीं ?"

माझे हे शब्द ऐकताच तर तो अगदीं कावराबावरा झाला; त्याला काहीं बोलताच येईना. त्याच्या खोलीतील बाल्यानें कॉफी आणून पुढें ठेवली. कप माझ्यापुढे करता करता, त्याचा चेहेरा जास्तच पडला. शेवटीं, मला परिस्थिति समजली; त्यावेळीं तेवढीहि रक्कम त्याच्याकडे नव्हती. तेव्हां मी त्याला मुद्दामच विचारले, " कायरे अरुण, तितकेहि नाहींत कां तुझ्याकडे ?"

त्यानें नुसती नाहीं अशी मान हलविली; व काफीचा रिकामा कप खालीं ठेवला.

पाचचार मिनिटें आम्ही दोघेहि काहीं बोललों नाहीं.

" माझ्याकडे सकाळीं चाळीस रुपये होते." शेवटीं, त्यानेंच दबकत दबकत सुरवात केली, " पण एकाचें वसंताच्या हिशेबांतले, मागचें देणें होतें; तो सारखा खेपा घालीत होता. प्राणी फार फिकीरींत होता; तो गयावया करूं लागला...शेवटीं तर रडूं लागला. तसें मलाहि वाटलें, अरविंदला एरवी तरी सबंध रक्कम आज देणें शक्य

नाहीं. तेव्हां आजच त्याला तीसचाळीस रुपये देण्यांत तरी काय अर्थ आहे? आणखी सहासात दिवसांत, वसंताच्या ' कलावती ' पैकीं जाहिरातवसूलीची रक्कम येईल, त्यांतून देऊं !... म्हणून, माझ्याकडे असलेले सगळे चाळीसचे चाळीस त्याला देऊन टाकले मी!"

"मोठेच हुशार आहां!.." मी एकदम रागाने व काहींशा त्राग्यानेच त्याला म्हटलें, "माझे पैसेही मला वेळेवर मिळूं नयेत ना? स्वतःच्या तीस रुपड्यानाही मी आज महाग झालों? बरं—बाबा!— "

:११८:

अरुण कांहींच बोलला नाहीं; मीहि टेबलावरचें एक मासिक उघडून, पाय ताणून, फुगटून वाचत बसलो. इतक्यात, एकदम कसलातरी विचार डोक्यात येऊन, अरुणनें कोटटोपी घातली. त्याच्या मनातले मला काहीच समजेना; म्हणून मी त्याला विचारले, "कुठें चाललास?"

"तूं पण चल! तुला पैसे मिळवून देण्याची खटपट करतां!" त्याचा चेहरा बराच पडला होता व तो अगदीं खिन्नपणे हळू हळूं बोलत होता.

मी घड्याळात पाहिलें, सहा झाले होते. मीहि हॅट चढविली; पण आम्ही खोलीं-बाहेर पडून तो कुलूप लावूं लागताच, मी त्याला म्हणालो, "कुठले पैसे आणा-णार रे तूं आतां? वसंताच्या जाहिरातदाराकडून वाटते? माझे आई, राहूं देत ते सध्या! आज ' पॅलेस 'ला जेनेट ग्यॅनॉर लागली आहे!...पैसे गेले उडत, आज सिनेमा तर दाखवशील?"..

अरुण खुदकन् हंसला!

"बरं चल!" तो म्हणाला; व आम्ही टर्मिनसपर्यंत येऊन ट्रॅममध्ये चढलो.

एका बाकावर बसूनहि, आम्ही आज फारच थोडें बोलत होतों. शेवटीं आमच्या नेहमीच्या थट्टेखोर वागणुकीप्रमाणें, मीच त्याला पैसे न देण्याबद्दल शिव्या सुरूं केल्या; पण तें सोसण्याच्या मनःस्थितींत आज तो नव्हता.

भायखळ्याजवळ आम्ही खालीं उतरलों. सव्वासहा झाले होते. मी हसतच म्हणालों, "काही चहाकॉफी?"

त्यानें आपल्या खिशांत हात घातला व पुन्हा थोडा कावराबावरा होऊन तो म्हणाला, "सिनेमापुरते आठ तेवढे आणे आहेत!.."

"मी देतों बील!... मग तर झालें?" मी थोड्या हुकमी आवाजानेंच म्हणालो व त्याचें उत्तर येण्यापूर्वीच कॅफेमध्यें शिरलों.

हॉटेलमध्येहि आम्ही फारसे बोललों नाहीं. शेवटीं सहा पंचवीस होताच आम्ही उठलों. मी कॅशरकडे पैसे टाकले व आम्ही बाहेर आलों.

अरुणनें, खिशातून सुट्या दोन दिडक्या काढल्या व मला विचारलें, ' पान? '

" आता दिडकीचं पान तेवढे विचाराल!.. " मी थट्टेनं म्हणालो.

तेव्हा, चेहऱ्यावर काही एक विकार न दाखविता, काही एक न बोलता, त्याने स्वतःपुरते एक पान घेतले व ते तोंडात कोंबून, तो थिएटरकडे चालू लागला. त्याने मुग्धपणेच दोन तिकिटे काढली व आम्ही दाराजवळ आलो. इत-क्यात, काहीं कारण नसता, माझा बेत एकदम फिरला. मला वाटले, आपणहि पान खावे. आणि मी त्याच्याकडे मागे वळून म्हणालो, " थाब! पान खाऊन येतो."

खिजागीच्या खिशातून दिडकी काढून, मी गेटजवळ गेलो.

. ११९ :

अरुण काहींच बोलला नाहीं. पण आमच्या असल्या थट्टा नेहमीच चालत.

मी पान तोंडात कोंबून हसत हसत पुन्हा दाराशीं येतो, तो, तो माझी वाट पहात दारातच उभा होता, " चल लौकर. शो सुरू झाला!" तो म्हणाला. पण त्याचा आवाज अगदी जड येत होता.

आम्ही काळोखातच एक जागा शोधून काढली व जवळ जवळ बसलो. मिकीमाऊसचे व्यंग चित्र आम्ही बसेपर्यंत संपले होते. बातमीपट सुरू झाला होता तरी अरुण काहींच बोलेना. थोड्या वेळाने काळोखातच मी अरुणकडे निरखून पाहिले, तर त्याच्या डोळ्यातून पाणी वहात होते. मला फार वाईट वाटले.

चित्रपटावरचा जार्ज बादशाहा आमच्या बाजूसच पाहून हसत होता. अरुणची काहींतरी थट्टा करून त्याला बोलता करावा म्हणून मी म्हटले, " तो राजा बघ तुझ्याकडे पाहून हसतो आहे, अरुण! जुनी दोस्ती आहे वाटते तुमची?"

" राजाचीन् माझी कुठली बाबा दोस्ती!" ... अरुण माझ्याकडे पाहून हंसण्याचा वृथा प्रयत्न करीत म्हणाला, " आणि असून करायची काय अरविंद, ती दोस्ती? तुला आज दोनशे रुपयाच्याच खड्ड्यात टाकले आहे. त्याला किती हजाराला टाकले असते कोणास ठाऊक मी!"

: १२० :

मला एकदम विजेचा धक्का बसल्यासारखे झाले. मला नकळत मी त्याच्या खांद्यावर प्रेमाने हात टाकला व कळवळ्याने म्हणालो, " अरु, वेड्या, माझ्या-वर रागावला का आहेस? इतकं का लावून घेतोस असं मनाला?"

" तुझ्यावर का रागावूं मी?" अरुण डाव्या हाताने हळूंच डोळ्याच्या कडा पुसत म्हणाला, " तूं मला वेळेवर प्रॉमिसरी नोटहि न घेता पैसे देऊन मदत केलीस म्हणून? कीं तुला जरूर लागली त्यावेळीं मजकडे अत्यंत अदबीनें मागणी केलीस म्हणून? अरविंद, मी तुझा नालायक मित्र आहे, हेच खरें!

वेळेवर तुला तुझ्याच रकमेंतले पस्तीस रुपयेहि मला देववले नाहीत! मी वाईट नाहीं!.. तूहि वाईट नाहीस! . . हा पैसाच वाईट आहे!.. "

त्याच्या या शब्दानी बिचकून, त्या दिवशी सध्याकाळी घडलेल्या सान्या प्रसगाची, मी मनातल्या मनात उजळणी केली; आणि मला आठवूं लागले,.. आपण थट्टेत केलेला प्रत्येक प्रसंग अरुणच्या मनाला लागला आहे!

शेवटचा पान स्वतः विकत घेऊन खाण्याचा प्रसग तर, त्याच्या हृदयाला घरे पाडून गेला असावा. मला अतिशय वाईट वाटले. अरुणचे शातवन आता कसे करावे कसे? मला समजेना. अरुण माझा अत्यत जिवलग मित्र! त्याने वेळेवर लहानशी रक्कम सुद्धां दिली नाहीं म्हणून, मला वाईट वाटले होते थोडे, हे खरे. पण, अरुणचा त्यात खरा दोष कसला? सुधावहिनी मध्ये अत्यत आजारी होती, तेव्हा त्या गडबडीत उगीच पैशाची भानगड वसंताला कशाला कळवा, या विचाराने, त्यावेळीं, त्याला न कळत, मी ती रक्कम अरुणला दिली होती. वास्तविक, अरुणचा हात, तसल्या व्यवहारामुळे व त्याच्या प्रेमळपणामुळेच तसा अडकला होता, हे मी समजत का नव्हतो? .. त्याचे दुःख म्हणजे माझेच दुःख असे वाटण्याइतकी त्याची माझी मैत्री! ... पण..

" अरु! चक्कर आहेस बुवा अगदी.. " मी शेवटी त्याला म्हणालो. माझाहि कठ भावनावेगानी भरून आला होता, " मी चुकलो असलो, तर मला क्षमा कर, दोस्त! आणि हे पहा, तुला शक्य होतील तेव्हा माझे पैसे दे— पण? "

" अरविंद, तूच क्षमा कर मला, " अरुण अजूनहि भरल्या डोळ्याने मजकडे काळोखात पहात म्हणाला, " मी तुझे पैसे तुला वेळेवर परत करूं शकलो नाही! "

मलाहि रहावेना. फिल्मकडे आमचे दोघाचेहि लक्षच नव्हते. मला हळू-हळूं पडद्यावरील चित्र अस्पष्ट दिसूं लागले. आणि शेवटी तर माझ्याहि डोळ्यातून पाणी वाहूं लागले!..

मी अरुणला घट्ट जवळ ओढला. त्यानेहि माझ्या खाद्यावरून गळ्यात हात टाकला.

" मला सागता सागता तूं तेंच करतो आहेस! अरविंद, आता फिटंफाट झाली, हं! " मग एकदम हसून अरुण मला म्हणाला, " ए बाबा, ही रडवेगिरी आता पुरे बरं का? समोरची फिल्म पहा बरं--"

आणि त्यानंतर मात्र, आमची पुन्हा लागलीच दिलजमाई झाली. आमची लहान-शींच आयुष्यें खरीं; पण, त्यांतच अनुभवलेले अनेक सुखदुःखाचे प्रसंग, एक-मेकाना सागून हंसण्यारडण्यांत, त्यादिवशीं आमचा कितीतरी वेळ समाधानपणे गेला!

असले प्रसंग अनुभवावयास मिळाले, म्हणजे वहिनी, जगांतल्या व्यवहारी साहारामध्येंहि दलदलीचे प्रदेश आहेत, असेच वाटूं लागते!..

आता सारे वीस दिवस राहिले आहेत. अरुण बाबासाहेबांकडे रदबदली करावयास जाणार आहे असें म्हणत होता. बाबासाहेब काय करतात तें पाहूं या आता! सध्या इतकेंच पुरें. कळावे, लोभवृद्धि व्हावी.

तुमचा-**अरविंदभावोजी.**

( १८ )

मुंबई; ता. २४ जून १९२८

प्रिय मालशी,

अरविंदच्या हिशेबाविषयीं मला, खरोखरच चिंता उत्पन्न झाली होती. तो माझ्या नादी लागून, घराच्या सौंदर्यासाठीं फेरफार करीत गेला. त्याची जबाबदारी, अर्थात् त्याच्या कंपनीच्या शिरावर घ्यावयास भरूच्या तयार नाहीं. बाबांनीं, वेळोंवेळींच अरविंदला ताकीद दिलेली आहे; त्यामुळे, ते हिशेब चुकता करताना, कॉंट्रॅक्टची राहिलेली रक्कम व मजबुतीच्या दृष्टीने स्वतःच केलेला कांहीं फेरफार याबद्दल फारतर एक हजार रुपये जास्त देतील. पण इतकें झालें, तरी अरविंदवर अडीच हजार रुपयाची जबाबदारी येऊन पडली आहे. त्यानें आतापर्यंत, त्या रकमेपैकी जेमतेम पाचशें रुपये उभे केले आहेत. तेहि पुरे नाहींत! माझ्यासाठीं, त्याने बाबांचा अनेकवेळा राग सहन केला, व वास्तविक, आता, त्यातल्यात्यात, घर खरोखरच फार सुंदर झाले आहे!

पण, कॉन्ट्रॅक्टचा एकदर हिशेब व त्याबरोबर झालेल्या जादा खर्चाचा तक्ता, अरविंदने जेव्हां बाबाकडे अपल्या कंपनीतर्फे पाठविला, तेव्हा, त्यानीं कॉन्ट्रॅक्टची राहिलेली रक्कम व जादा एक हजार, मिळून दहा हजारांचा चेक आणि पंधरा दिवस उशीर झाल्याबद्दल होऊ शकणाऱ्या रु. तीनशे दंडाची पावती, .. इतकें सर्व कंपनीकडे पाठवून दिले; आणि त्याबरोबरच, अरविंद व मी दोघानीं मिळून घरांत केलेल्या फेरफारांबद्दल झालेल्या खर्चाचीं बिलें परत पाठविलीं.

सोबत जोडलेल्या पत्रात, बाबानीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, "हीं जादा पाठविलेलीं बिलें, मजवर विनाकारण लादण्यांत आलेलीं आहेत, व तीं चुकतीं

करण्यास मी मुळींच बांधलेला नाहीं. घरबांधणी चालू असतांनाच, मी तसल्या तऱ्हेच्या फेरफारांना विरोध करीत होतों. पण त्या बाबतींत माझें कोणी ऐकलें नाहीं. तेव्हा त्या रकमेची जबाबदारी, पाहिजे तर कंपनीने घ्यावी. मजकडे तीं बिलें पाठविण्याचा, कंपनीला काहीच अधिकार पोंचत नसल्यामुळे, मी तीं सोबत परत करीत आहे."

: १२३ :

या पत्रानें रागावून, भरुच्याने अरविंदला सक्त ताकीद दिली आहे, कीं, 'या पैशाची जबाबदारी, आता एकट्या तुजवर पडली असली, तरी कंपनीची पत राखण्यासाठीं, दिलेल्या तारखेचे चेक जिवत करण्याची सारी खटपट, तुला करणें भाग आहे. आता तुला आठच दिवस राहिले आहेत.'

तेव्हां, अरविंद दोन हजाराच्या फिकिरीत पडला. त्याने आपल्या इकडे तिकडे विखुरलेल्या, लहानसान रकमा मिळविण्याची खटपट करूनहि, त्याच्या हातीं, वर म्हटल्याप्रमाणे, पाचशेहून जास्त रक्कम येऊ शकली नाहीं. एकदमच तिऱ्हाइताकडे, रक्कम व्याजी मागणे त्याच्या जिवावर आले. मी वसंताकडून व्यवस्था करणार होतों. पण अरविंदनेच नको म्हणून सागितले. शेवटीं, कोठेंच काहीं जुळेना, म्हणून तो अगदीं निराश होऊन, आईचे घरात असलेले अडीच तीन हजार रुपयाचे दागिने विकण्याचा विचार करूं लागला होता. तेव्हा मला फार वाईट वाटून, मी त्याला सागितले, कीं, 'कृपा करून उद्याचा दिवस थांब. मी बाबाकडे रदबदली करून पहातो;' पण त्याने तेहि साफ नाकारलें.

शेवटी, मीच बाबांकडे दादरला नव्या घरी आज सकाळीं गेलों. त्यावेळीं, बाबा खोल्याची लाबी रुंदी मोजण्याच्या कामात गुतले होते. मी तेथे जाताच, त्यानीं थोडी कल्पना केलीच व मजकडे पाहून कपाळाला आठ्या घातल्या. त्यानीं टेप तशीच टाकली; आणि प्रत्येक दाराखिडक्याच्या कड्याचे स्क्रू बरोबर आहेत कीं नाहीत, हे पहात पहात मला विचारले, "कायरे, आज मध्येच का?"

: १२४ :

मला सुरुवात कशी करावी ते समजेना. पण मी शेवटीं त्याना अरविंद कसा पैशाचा पेचांत आहे तें सांगून, त्याला रीतसर झालेला सगळा जादा खर्च द्यावा, अशी विनंति केली.

त्याबरोबर, बाबा मजवर एकदम उसळले. व मला म्हणाले, "तुला मजकडे त्याच्यासाठीं रदबदली करावयाला यायला लाज नाहीं कारे वाटत? माझा पैसा... माझें घर...तें बाधीत असतांना, तुम्हीं मला धाब्यावर बसवून, मी नको नको म्हणत असतां, जादा खर्च करीत गेलात. एवढेच नव्हे, तर तुझा अरविंद त्या प्रत्येकवेळीं 'मीं खर्च सोशीन' असें सारखे तोंडभर म्हणत होता. आता, मला

जास्त खर्चात पाडण्याचा 'अरविंद भरुचा' कंपनीला काय अधिकार ? मी काहीं फेरफार करविले होते, त्याची जादा रक्कम मी त्यांना पाठविली. बांध-काम पुरें करायला पंधरा दिवस ठरल्यापेक्षा जास्त लागले, त्याचा दंड ठरला असूनहि तो न घेता, त्यांना त्याबद्दल पावती पाठविली. यापेक्षा मी जास्त ते काय करणार त्या बाबतींत ? माझ्याकडे काय पैशाची झाडे लागली आहेत ?.. खर्च काहीं तुझ्या अरविंदच्या एकट्याच्याच डोक्यावर पडणार नाही!... आणि पडला तरी तो मी का म्हणून द्यावा ? "

" तेच आपल्याला सांगावयास आज आलों आहे मी!" मी चटकन् म्हणालों. वास्तविक खर्च जास्त झाला तरी तो उघड उघड आमच्या घरासाठीच झाला होता. त्यामुळे बाबांनी तो देण्याचें नाकारणें, ही निव्वळ कायदेबाज पळवाट होती. पण एरवीं, आता बाबा ऐकत नाहीतसें पाहून, त्यांचा स्वभाव ओळखून मी पुढे म्हटले, " बाबा, पैशाच्या दृष्टीने तुम्हाला त्रास झाला हे खरेंच ! आम्ही त्यात आमच्या आवडीनिवडी घुसडूनच तो वाढविला, हेहि खरें ! पण, शेवटीं तो सर्व खर्च कोणाच्या मालकीच्या घरासाठी झाला ? आपल्याच घरासाठीं ना ? तेव्हा त्याच्या कंपनीने आपल्यासाठी पैसे द्यावेत हा कुठला न्याय ?..."

माझ्या या युक्तिबाजीचा काही उपयोग होणार नाही हे मी जाणून होतों. म्हणून, मी त्यांच्या उत्तराची वाट न पहता, तसेंच पुन्हा पुढे म्हणालो, " दुसरें एक आप-ल्याला लक्षात ठेवले पाहिजे! कॉन्ट्रॅक्टमध्येच आगाऊ सूट दिली असल्यामुळे, भरु-च्याने सारी जादा रक्कम अरविंदवर टाकली आहे. परवा त्याच्या नावाचे साडेबारा हजारांचे चेक वटवायला जातील, आणि आजपर्यंत त्याच्याकडे एकंदर जेमतेम साडेदहा हजार जमले आहेत. तो अगदीं निराश होऊन, घरातले आईचे सारे दागिने विकावयास काढावयाचा काल विचार करीत होता!...

आता, यावेळी आपल्याला एक दुसरी गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हा अडीच हजारांचा प्रश्न, अरविंद भरुच्या कंपनीचा नसून, एकट्या अरविंदचा आहे. अरविंद सुशिक्षित आहे. इंग्लंडहून जाऊन आला आहे, तरुण व अवि-वाहित आहे; इतकेंच नव्हे, तर चांगला मिळवता आहे. आज आपल्याला आपल्या जातीत, सुनीतीसाठी असा वर मिळणार नाही. तुम्ही मला सवडीप्रमाणे सुनीती-बद्दल त्याला विचारावयाला मागे सांगितलें होतें ना ?

मग, या प्रकारच्या अडचणीत आपणच त्याला टाकणें, व त्याला समाजात एक प्रकारे बदनाम होण्याचा प्रसंग आणणे, आपल्याला कसे शोभेल ? आणि सुनीतीच्या दृष्टीने तें हितावह तरी कसे ठरेल ?

कदाचित्, हे आपल्या लक्षातून सुटले असल्यास सुचवावें, म्हणूनच मी आज आलो. अजूनहि मजवर आपण रागावणार असला तर मी परत जातो. अरविंद

माझा मित्र असल्यामुळें, त्याला या प्रसंगातून सावरण्यासाठीं मला काही तरी दुसरी खटपट करणे जरूर आहे!"

: १२५ :

माझ्या या साऱ्या बोलण्याने, बाबाचा चेहरा एकदम पालटला. ते माझ्याजवळ येऊन मला हळूच म्हणाले. " तू म्हणतोस ते खरेच अरुण! अरविंदला यातून संभाळणे आपल्याला अपरिहार्य आहे! मी समजत होतो, कीं हा जादा रकमेचा प्रश्न 'अरविंद–भरुच्या कंपनी'चा आहे. आणि पुन्हा तू म्हणतोस तस..."

मी लागलीच समजलो;...माझा हा मात्रेचा वळसा चांगलाच लागू पडला बाबाना! .. आता अरविंदवरचे संकट टळले, मला वाटते...! पण सरळ प्रयत्ना-ऐवजी अशा तऱ्हेच्या गौण उपयामुळेच यश आले, याबद्दल मात्र मला आता राहून राहून वाईट वाटतें. पण कांहीं का असेना, एकंदरीत आज अरविंद यातून सुटला. उद्या, बाबा तेथे पैसे घेऊन गेल्यावर मात्र, त्याला माझी ही कृति समजली नाही म्हणजे मिळविली!

खरोखर मावशी, जगातील प्रत्येक पाऊल टाकतानाची या लोकाची ही अपेक्षा पाहिली, कीं त्याच्याबद्दल राग येण्याऐवजीं कींवच वाटते नाही का?

तुझा—**अरुण.**

( १९ )

मुंबई (२८ जून १९२८.)

ती. वहिनीस सप्रेम नमस्कार,

बाबासाहेब ठाकुराच्या घराच्या भानगडीतून आजच सहीसलामत सुटलो म्हणावयाचे!—

गेल्या सव्वीस तारखेस पैसे मिळतील असे चेक, मी निरनिराळ्या व्यापाऱ्याना आगाऊ दिले होते. अडीच हजाराची खूट पडत होती. पण पचवीस तारखेस सकाळपर्यंत, बॅंकेत माझ्या नावे पाचशे रुपयावर, एक दिडकीहि वाढली नव्हती. माझ्या डोक्यावर, घणाचे ठोके पडल्यासारखे होत होते. मनात सारखे विचार येत होते, कीं, जगात पैशावर किती मोठ्या प्रमाणावर व्यवहार चालला आहे. आपल्या चांगुलपणाला–सद्धेतूला कोणीहि विचारीत नाही!

बाबासाहेबानीं परिस्थितीचा फायदा घेऊन कानावर हात ठेवावेत, हें माझ्या मनाला बरे वाटत नव्हतें; तरी जगाच्या व्यवहारास विरुद्ध त्यात काहींच नव्हते.

भरुच्यानें प्रथमच कॉन्ट्रॅक्टची रक्कम कमी करण्यांत मोठेपणा दाखविला असल्यामुळे, त्यानें शेवटीं एकट्या मजवरच पैशाची जबाबदारी टाकली....त्यांतही मला विचार करता, काहींच वावगे वाटेना!

' बाबांना पैसा जास्त खर्च होऊं नये असे का वाटणार नाहीं? आणि भरुच्या पैसे मिळवावयास धंदा करीत होता. कला, सौदर्य, ध्येय यासारख्या गोष्टींमागें लागून, मजसारखे धोक्यांत. पडण्याची त्या दोघाची इच्छा नव्हती, यात त्यांचा काय दोष?

तरी अर्थात् शेवटीं, माझ्यावर आलेल्या परिस्थितीला मलाच तोंड देणें जरूर होते. त्यामुळे, मी बराच विचार करून, शेवटीं आईचे दागिने विकावयास काढण्याचा बेत कायम केला; व विचलित मनानें, माझ्या एका जवाहिऱ्या मित्राकडे जावयासाठी, मी कोटटोपी घालूं लागलो.

पण दरवाजा उघडणार, इतक्यात दारावर थापा ऐकू आल्या; आणि दार उघडून पाहतों, तों बाबासाहेब पुढे उभे!

: १२७ :

माझ्या आश्चर्यास अगदीं पारावार राहिला नाहीं. यावेळीं बाबासाहेब!.. आणि माझ्याकडे? माझा माझ्या डोळ्यावर प्रथम विश्वासच बसेना!

शेवटीं, बाबाच बोलू लागले, "अरविद, असे बिचकल्यासारखे का दिसता? कुठ बाहेर जावयास निघाला होता का?"

मी काहींच बोललो नाहीं. हॅट खुंटीला अडकविली, व त्याना खुर्चीवर बसावयास सागून मी खिडकीकडे जाऊन उभा राहिलो.

बाबासाहेबांनीं माझे काहींसे मौन पाहून, स्वतःच पुढें बोलावयास सुरुवात केली, "अरविद, मी शेवटी विचार करून पाहिले. मला वाटतें, मी तुम्हाला आणखी अडीच हजार रुपये देणें जरूर आहे..."

मला त्यांच्या या शब्दांचें सुरुवातीला थोडें आश्चर्य वाटलें. पण इतक्यांत बाबाच पुन्हा म्हणाले, "अरुण काल मजकडे आला होता, तो म्हणाला, अरविद पैशाच्या फार फिकीरींत आहेत! तुम्ही पैशाच्या फिकीरींत असताना, आम्ही तुमची अडचण आमचीच समजून न वागण्याइतके आपले संबंध काहीं परके नाहींत!.. तेव्हा अरविद, आज मी तुम्हाला द्यावयास बॅकेतून अडीच हजार रुपये काढून आणले आहेत."

आणि आपल्या आतल्या खिशांतील पाकीटातून, बाबासाहेबानी शंभर शंभराच्या नोटा बाहेर काढल्या, व त्या ते मोजूं लागले.

: १२८ :

ते पहाताच, मी तर विस्मयचकित मनानेंच विचार करूं लागलो. बाबा-

साहेबाच्या वृत्तींत हा इतका एकदम दिसून येणारा फरक का पडला, हें मला प्रथम कांहींच समजेना !...इतक्यांत, मला अरुणनें आधल्या दिवशी जाताना, सहज म्हणून काढलेल्या शब्दाची आठवण झाली. ‘ कसे झाले तरी तूं बाबाचा कधींतरीं जावई होणार आहेस. ते तुझी समाजात थट्टा होईल, असे काही होऊं देणार नाहींत खास, अरविंद ! ’

आणि त्यानंतर लागलीच, अरुण बाबासाहेबांना भेटावयास गेल्याचे वृत्त आतां ऐकताच, हा सगळा कशाचा परिणाम, ते माझ्या चटकन ध्यानीं आले ! ...

बाबासाहेब आज मला केवळ अपेक्षेनेच रक्कम आणून देत आहेत, हा माझ्या डोक्यात प्रकाश पडतांच मात्र, मला अत्यंत संताप आला ! तरी मी शक्य तितक्या शातपणानें, पण रागाच्या तिरमिरींतच, बाबासाहेबाना म्हणालों, “ हें पहा बाबासाहेब, आपण मला आज ही रक्कम का देत आहा, ते मला आत पूर्णपणे समजलें ! कृपा करून आपण ती आणलीत तशीच परत घेऊन जावी आपल्या सुनीतीबरोबर लग्न करण्याविषयीं, अरुणनें मला आपल्यातर्फे मागे विचारले होतें. ती सुशील, प्रेमळ व हुपार मुलगी आहे; अरुणमुळे घडलेल्य तिच्या थोड्याबहुत सहवासावरून, मला ती पसंत असल्याचे व योग्य वेळ तिजबरोबर लग्न करण्याचे, मी अरुणकडे बोललोहि आहे. तेव्हा, आपल्य घराच्या हिशेबात तुमचा माझा किंचित् खटका उडून मने काहीशी कलुषि होण्याचा प्रसंग आला, तरी तेवढ्यावरूनच मी सुनीतीला नापसंत करावयार तयार नाहीं. आपल्याशीं झालेल्या असल्या व्यवहाराच्या भानगडीमुळे, तिज विषयीचे माझे मत बदलले जाण्याचा काय संबंध? पण, आपल्या भावी जांव याला सावरण्यासाठींच, जर आपण ही मदत करूं पहात असला, तर आपण त्यात सपशेल चुकलात !..

हो, मी गरीब आहे. आणि माझ्या सौदर्यदृष्टीमुळे, खुद्द आपल्याविषयीच्य आपुलकीच्या भावनेमुळेंच, परिस्थिति आज मजवर ही अशी काहींशी उलटल आहे, हे सगळें खरें ! पण म्हणून, तुमच्याकडून असली एक प्रकारची लाच म्हणून ठरणारी ही रक्कम मी का घ्यावी? बाबासाहेब, मलाहि स्वाभिमान म्हणून काहीं आहेच ना ?...माझे तेवढे हक्काचे भांडवल तरी हिरावून घेऊं नका ! .. आतां, हीच रक्कम हिशेबानें योग्य ठरून आठ दिवसापूर्वी मिळाली असती, त ती मला पाहिजेच होती; पण ती आता आपल्याकडून मी घेणे शक्य नाहीं! .. सुनीतीच्या भवितव्यासाठीं, मला तुम्ही असे विकत घेऊं नका ! पूर्वी ठरल्य प्रमाणें, तिच्याबरोबर लग्न करण्यास मी यापुढेंही तयार आहे ! ”

त्यावर, बाबासाहेबांनीं मला पुष्कळ सांगून पाहिलें; पण मला त्यांचा हेतू पू समजला असल्यामुळें, मी मात्र त्यांना निक्षून सागितलें, “ आमच्या कंपनील

आलेले आपले पत्र आम्ही फाईल करून, आपल्या घराबाबतचा जमाखर्च आपल्या इच्छेप्रमाणे मिटवूनहि टाकला आहे. आतां आपल्याकडून घरासंबंधाची ही रक्कम आली, तरी आमच्या कंपनीला तिचा स्वीकार करणे शक्य नाहीं ! ”

तेव्हा मात्र बाबासाहेबाचा नाइलाज होऊन ते तसेच मुग्धपणे निघून गेले!... मला तेवढ्या मोठ्या रकमेची त्या क्षणाइतकी कधीच मदत झाली नसती, वहिनी!.. पण ती परत करण्यातच, माझ्या मनाला त्यावेळी अतिशय समाधान वाटले!

: १२९ :

बाबासाहेब निघून गेल्यानंतर मात्र, मला पुन्हा दुसऱ्या दिवसाच्या बँकेच्या पैशाचे वेध लागू लागले. माझी छाती जास्तच धडधडूं लागली. शेवटीं, मनाचा निश्चय करून, कपाटातून पुन्हा आईच्या दागिन्याचा डबा मी बाहेर काढला; हॅट चढविली व दाराला कुलूप लावून मी बाहेर निघालो ! जिना उतरता उतरता, माझ्या डोळ्यात पाणी उभे रहात होते. आयुष्याच्या सुरुवातीसच माझ्या मृत आईचे दागिने विकण्याची मला पाळी यावी, यापेक्षा दुसरें दुर्दैव ते काय, असे मला सारखे वाटत होते.

पण, तरीहि मन अगदीं घट्ट करून, मी एक एक पायरी खाली उतरत होतों! .. इतक्यात, काय आश्चर्य? आमचे वासुदेवरावभाऊ,–तुमचे पतिराज– शेवटच्या जिन्याजवळ उभे राहून, माझ्याकडे वर पहात असलेले मला दिसले!

आज ही एक एक मंडळी, अशी अचानकपणें माझ्या घरी समक्ष येऊन भेटताना पाहून, तशा मन:स्थितीतहि, मला एक प्रकारें गंमतच वाटत होती. क्षणभर माझी अडचण विसरून, मी त्याना जरा आस्थेने विचारले, “ भाऊ, एकदमच कसे येणे झाले? ”

जवळ जाऊन, त्याच्या हातातील बारकी मळकी बॅग मी हातीं घेतली, व पुन्हा पायऱ्या चढत म्हणालो, “ चला, थोडा चहा घेऊ वर ! ”

“ कुठं बाहेर निघाला होतास वाटतं? ” त्यानी आपल्या पद्धतीप्रमाणे, मजकडे वर मान करून न पहाता, पायऱ्याकडेच दृष्टि ठेवून मला प्रश्न केला.

मी कुलूप पुन्हा काढून दरवाजा उघडीत म्हणालो, “ हो, थोडे कामाला बाहेर जात होतो! ”

त्यावेळची माझ्या मनातील तरल चलबिचल लपवण्यास, मला किती त्रास पडत होता, ते माझे मलाच माहीत!..

: १३० :

भाऊ खुर्चीवर बसले. मी झटकन् स्टोव्ह पेटवून, त्यांना व मला चहाचे दोन कप तयार करून बाहेर आलो. चहा पिता पिता भाऊंनीं मला हळूंच प्रश्न केला, “बाबाच्या घराची काय भानगड आहे, अरविंद?”

" काहीं नाहीं !" मी सर्व लपविण्याच्या हेतूनें म्हणालो, "मतभेद थोडासा!. आता झाले सगळे सुरळीत!"..

माझ्या या टाळाटाळीच्या उत्तरानें मात्र, भाऊंना एकदम राग आला असावा. ते मजकडे रागीट डोळ्यानीं पहात म्हणाले, "माझ्याकडे लपवून ठेवण्याचा प्रयत्न करू नकोस, समजलास अरविंद ! मला समजलें आहे, सर्व काहीं !..."

मी चपापलो; पण काहींच बोललो नाहीं.

भाऊनीं थोड्या वेळाने पुन्हा म्हटले, "कोणी सांगितले होते तुला त्याच्या व्यवहारात असें वेड्यासारखे पडायला ? मग.."

त्याना आणखीहि काहीतरी बोलावयाचें होतें; पण मुग्धपणेंच त्यानीं एकदा खिशात हात घातला... आणि पुन्हा बाहेर काढला.

थोडा वेळ त्याची अशीच चलबिचल चालली होती. शेवटीं कसलासा निश्चय करून, त्यानीं एकदम आपल्या खिशातून एक नोटाचे पुडके बाहेर काढले व ते मजपुढे करीत ते म्हणाले, "तुला आज रकमेची जरूर आहे हे मला ठाऊक आहे. ह्या घे. तीस नोटा आहेत शंभराच्या !"...

: १३१ :

वहिनी, माझ्या आयुष्यात, आश्चर्याने एवढ्या मोठ्याने दचकण्याचा असला प्रसंग, यापूर्वी कधींच आला नव्हता !

भाऊ आपण होऊनच, माझी अडचण जाणून, अचानक धावत येतात काय ? एक दोन प्रश्न विचारतात काय ? आणि मी टाळाटाळ करीत असूनहि आपुलकीने रागावून, शेवटीं, एकदम तीन हजारांच्या नोटा माझ्या हातीं कोंबून जाऊं लागतात काय ? खरोखर, त्याच्या या मुक्या मदतीचे व प्रेमळपणाचे मला कौतुक वाटते !...

मी त्यातील एक हजाराच्या नोटा पुन्हा त्याच्या हाती देत म्हणालो, "भाऊ, खरोखर तुम्ही आज मला अगदीं देव भेटलात ! पण हे बाकीचे घ्या परत ! मला एवढेच पुरेत !..."

आणि थोड्या नाखुषीनेंच त्यानीं त्या परत घेतल्या. पण त्यापूर्वी मला तेवढीच मदत पाहिजे आहे याबद्दल मात्र त्यानीं आपली खात्री करून घेतली !

बाबा व भाऊ!.. दोन परस्परविरोधी दृश्यें, मला आज एकाच वेळीं, एकाच प्रसंगी, पहावयास मिळत होतीं! एक नुसत्या माहितीवरून निःस्वार्थी आपुलकीने आपल्या चुलतभावाकडे पैसे घेऊन धावत आला; आणि दुसरा ? प्रथम कायदेशीर त्रास देऊन, नंतर आपल्या मुलीला वर चांगला आहे, या कल्पनेनें...

'बरे मी जातो. आता मला काम आहे!' असें म्हणून बॅग उचलून जाण्या-

करितां भाऊ माझ्या न कळत दाराबाहेर पडले होते, तेव्हा मी असल्याच चमत्कारिक गोंधळलेल्या विचारांत होतों. त्यांच्या शब्दांनीं मी एकदम भानावर येऊन, कृतज्ञतेने त्यांजकडे पाहिलें. पण मला कांहीं बोलताच येईना.

वस्तुस्थितीची नीट कल्पना होईपर्यंत, भाऊ जिना उतरून खालीहि गेले होते. आणि मग मला एकदम आठवण झाली, या एवढ्या मोठ्या रकमेबद्दल त्यांना मी एखादी लहानशी चिठीहि लिहून दिली नव्हती!.. मी अगदी घाई-घाईने जिना उतरून खालीं आलो आणि चौफेर नजर फिरवून त्याना शोधूं लागलों!

पण भाऊ अचानक आले, तसेच अगदी अचानक, एखाद्या देवदूताप्रमाणें, पुन्हा गर्दींत केव्हाच मिसळलेहि होते!

: १३२ :

मला या एकंदर घटनेबद्दल राहून राहून विस्मयच वाटत होता. म्हणून, जणूं विश्वास न वाटून, मी हातातील नोटा पुनःपुन्हा मोजीत दाराजवळ तसाच उभा राहिलों. माझ्या ऐन अडचणीच्या वेळीं, मजवर पूर्ण विश्वास टाकून, एखादी चिठीहि न घेता, आपण होऊन एवढी मोटी रक्कम आणून देणाऱ्या भाऊं-बद्दल, माझ्या मनात पुनःपुन्हा कृतज्ञतेचें भरते येत होते... खरोखर, वहिनी, तुमचे पति दोषपूर्ण असले, तरी एक झाकलेले संसारी महात्माच होत!

आईच्या दागिन्याचा टेबलावरील डबा, मी काहीशा आनंदाने झटकन् उचलून घेतला; भावनावेगाने, तो क्षणभर माझ्या उराशीं धरला व पुन्हा आदरपूर्वक कपाटात ठेवला!..

: १३३ :

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, मी जरा उशिराच उठलो; कोट व हॅट चढवून, मी घाईघाईने प्रथम डेक्कन मर्चंट बॅंकेचा रस्ता धरला. मला भीति वाटत होती, बॅंकेचे ऑफिस बंद होते कीं काय ? पण अजून दहाच वाजत होते. नेह-मीच्या अकौन्टन्टला माझ्या नांवावर किती रक्कम जमा आहे, त्याची खात्री-करण्यासाठीं, मी माझे खाते पहावयास सागितले. एका गंडांतरातून, भाऊंमुळे मी सावरला गेलों, या विचारानें, त्या दिवशीं मला मनातल्या मनात कोण आनंद होत होता! पण तोंच—

" आज सकाळींच जवळ जवळ तेरा हजाराचे पाच चेक वटावून गेले! आता साडेपाचशे रुपये खात्यावर शिल्लक आहेत न्!" असे अकौटन्टनें मला सांगताच, माझें तर एकदम धाबेंच दणाणले.

हा आणखी काय प्रकार तें मला समजेना

माझ्या खात्यावर माझ्या नकळत दोन हजारांची भरती कोणी केली, त्याची

मला कांहीं कल्पनाच करता येईना ! मोठ्या आशेने क्रेडिट स्लिप पाहिली, पण तीवरील नाव तर बनावट होतें. अकौन्टन्ट हंसला; पण खरें नाव काहीं सागेना. हा प्रेमळ लंपडाव करणार आहे तरी कोण ? ... अरुण ? अशक्य गोष्ट !... बाबासाहेब ?... त्याच्या स्वभावाला धरून नाही हे ! मग कोण ?...

मनाला असेच वेड्यासारखे प्रश्न विचारीत, भरावयास काढलेल्या—भाऊंनीं आणून दिलेल्या—नोटा मी तशाच खिशात घातल्या; व भांबावलेल्या मनानें तसाच आमच्या ऑफिसमध्यें गेलो.

: १३४ :

भरुच्या एका गिऱ्हाइकाशीं बोलत बसला होता. मला पहाताच म्हाताऱ्यानें मंदस्मित केले ! येता येता रस्त्यात मला त्याच्याविषयींचा थोडा संशय आलाच होता ! आताच्या त्याच्या हंसण्यावरून तर माझी शंका दृढच झाली.

मी त्याला आंतल्या खोलींत बोलावताच तो आला. आणि माझ्या कावऱ्या बावऱ्या चेहऱ्याकडे पाहात 'खो खो' हंसून, म्हातारा मला विचारूं लागला, " केम सूं दोस्त ? अरे गडबड सूं छे अरविंदभाई ? बोलनी बोलनी लौकर ! अत्यारे घणुं काम छे !..."

मी अर्धवट रागानें व अर्धवट घाबरल्या मनानेच त्याला तो बॅंकेंतील चमत्कार सांगितला !.. त्यावर तर तो पुन्हा एकदां मोठ्यानें हंसून, शेवटी हसूं आंवरीत इंग्रजींत म्हणाला, " अरविंद, .. बेटा, तुला व्यवहाराचा थोडा अनुभव यावा, म्हणूनच मी तुला इतके दिवस त्रास दिला. तूं पैशाची काळजी न करता, नुसत्या भरमसाट भराऱ्या मारीत होतास. म्हटले जगात पोरगा अजून नवखा आहे. त्याला जरा धडा घेऊं द्या. पण काल संध्याकाळीं मी बॅंकेंत चौकशी केली व तुझी रक्कम साडेदहा हजारावर नाही असें दिसताच, मी लागलीच भरती करून टाकली सारी ! "

मी भरुच्याकडे कृतज्ञपणें पहात होतों.

तोहि माझ्याकडे प्रेमळपणें पहात, माझी पाठ स्नेहानें थोपटून पुढें म्हणाला, " नाहीना मिळाली रक्कम अजून ? अरे जाना देव ! पाहूं त्याच काय करायचं तें आपण मागाहून !.. आतां बाहेर त्या गिऱ्हाइकाशीं त्याच्या प्लॅनविषयीं बोलायच आहे. चाल बिगी बिगी ! "

म्हातारपणांतहि दिसून येणाऱ्या भरुच्याच्या या एकंदर खेळकरवृत्तीचें मला फार कौतुक वाटलें ! शेवटी त्याला पुन्हां खुर्चीवर लोटून मी त्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली. व भाऊंच्या नोटा त्याच्यापुढें करीत विचारलें, " आतां यांचं काय करूं ?"

पण त्यानें लागलीच सांगितले, " इन्शुअर करून तुझ्या भावाकडे परत पाठवून दे, आजच ! "

त्यावेळी मात्र माझ्या त्या म्हाताऱ्या भागिदाराला एकदम घट्ट मिठी मारावी असे मला वाटलें !... खरोखर जगात एक एक कशा स्वभावाची माणसे असतात पहा, वहिनी ! .. म्हणूनच, आज मी काहीसा गोंधळलो असलो, तरी जग दुष्ट माणसानींच भरले आहे,...असे म्हणावयास मात्र मुळीच तयार नाहीं !

तुमचाच—**अरविंदभावोजी**

( २० )

मुंबई; ता. २५ जुलै, १९२८

प्रिय मावशी,

इतके दिवस असाच विचार करण्यात निघून गेले. एकदा वाटत होते, बाबाना एवढ्यात मंजुळेविषयी काही कळवू नये. पण त्याच्याकडून ते साफ लपवून ठेवणेंहि शेवटी जिवावर आले. त्याना माझ्या मनाने नक्की ठरविलेली ती गोष्ट आता सात आठ महिन्यानतरहि न सागण्यात, मला विशेष काहीच तथ्य दिसेना. गेल्या पंधरवड्यात, घराची भानगड सपल्यावर माझ्या मनात तेच मारखे सलत मात्र असे. म्हणूनच, शेवटी मी ठरविले, की बाबाना आपल्या मंजुळेच्या निवडीविषयी काय ते एकदा कळवावयाचें.

पण सागावयाचे कसे, सुरुवात कोठून करावयाची ? कशी ? मला काहीच समजेना. शेवटीं धीर करून कसेबसे सर्व कळविलें. त्यानंतर एके दिवशी, धडधडत्या अतःकरणाने मी बाबाना भेटलो. पण त्यावेळी ते त्याविषयीं काहीच बोलले नाहींत. आणि त्यामुळे, मला त्याच्या त्या मौनाचा अर्थ संमती असाच वाटला. पण दुसऱ्या दिवशी मी मुंबईस मेडिकल कॉलेजात निघून गेल्यावर, एकाच डाकेला त्याचीं दोन जाड पाकिटे आली.

बाबाचीं तीं दोन्ही पत्रे बरीच मोठी होतीं. मी शक्य तितकें डोकें शांत ठेवून, ती एकाच बैठकींत वाचून काढलीं. त्यातील मजकूर एकाच प्रकारचा होता, व त्यात सहानुभूतिपर विचार करण्याऐवजी त्यानीं मजवर अथपासून इतिपर्यंत रागच पाखडला होता. अनपेक्षितपणें अशा तऱ्हेचीं उत्तरे, बाबानीं मला पाठविलेलीं पाहून माझी मति सुन्नच झाली.

त्याचा मजवरील पहिला आरोप म्हणजे, त्याना काहीं एक न कळविता, मी

येथपर्यंत मजुळेशीं संबंध ठेवला, तिला आश्वासन दिले. पण यापेक्षाहि मोटा गुन्हा म्हणजे हे सर्व त्याजपासून आतापर्यंत गुप्त ठेवले.

जणू काय, मनुष्याच्या आयुष्यातील हे भावनांचे खेळ आधी ठरवून किंवा सांगूनच होत असतात!

: १३६ :

पण, अशा तऱ्हेने एकदा रागाने बेफाम झाल्यावर, त्यांनी आम्हा दोघांवरहि विनाकारण झोड उठविली आहे. मजुळेविषयीच्या माझ्या आकर्षणात, वैषयिक भावनांचाच जास्त कल्लोळ आहे, असे गृहीत धरून, बाबांनी मला लिहिले आहे,... 'एखाद्या तरुणाची स्त्रीसहवासाची व स्त्रीप्रेमाची इच्छा घरातील आई, बहिण, वगैरे स्त्रियांच्या सान्निध्यात पूर्ण होत नसेल, व तिऱ्हाइत स्त्रीविषयी आपलेपणा वाटून तिच्या सहवासाची इच्छा होत असेल, तर त्यात केवळ तरुण मनाच्या कामुक विषयवासनेचाच पुष्कळ मोठा भाग असतो!' यानंतर, त्यांनी हळूंहळू मंजुळेच्या निराश्रित व एकंदर गरीब सामाजिक परिस्थितीविषयी लिहिले आहे. आणि, त्याशेजारीच माझ्याहि निःष्कांचन व अव्यवहारी भवितव्याचे चित्र उभे करून, एकंदरीत या सर्वांपासून माझा पूर्ण नाश होईल असे दर्शविले आहे. मला पाठविलेल्या पत्राशेवटीं त्यांनी मला लिहिले आहे, "तू मजवर अवलंबून आहेस, तुझ्या पत्नीची निवड, माझ्या संमतीशिवाय तुला करता येत नाही."

या अनपेक्षित निराश प्रकाराने मंजुळा मात्र फारच घाबरून गेली आहे, असे तिच्या पत्रावरून दिसते. पण मी तरी तिला प्रेमळ धीर देण्याशिवाय यावेळीं काय करणार? असो—

स्वतःच्या काल्पनिक अपमानाने चिडून, बाबांनी एकंदरीत सरळ साध्या परिस्थितीचा विनाकारण विपर्यास केला. व शांतपणे विचार न करता, चिडून जाऊन, माझ्या अंतःकरणाला घरे पाडण्यासारखेच शब्द वापरले. बाबांचा व माझा प्रत्येक लहानसान गोष्टीतहि खटका उडावा असेच भवितव्य आहे की काय नकळे!... तुझाच—**अरुण.**

(२१)

दादर; ता. ७ ऑगष्ट १९२८

प्रिय मावशी,

महिन्यापूर्वींच मजवर चोहोबाजूंनें एकदम झालेला गहजब आतांपर्यंत तुमच्या

कानावर आलाच असेल. मी त्यावेळीं अगदीं गोंधळून गेलें होतें. माझें चुकतें, कीं, माझ्या भोवतालच्या साऱ्याचें चुकतें, तेंच मला समजेना!

अरुणाचे पत्र आल्यावर मात्र मला धीर आला!

मीं अरुणाना अनुरूप आहे, असें मलाहि वाटत नाहीं, कधी कधी! पण अरुणांनीं माझा स्वीकार करून, माझ्या आयुष्याच्या बागांतील फुलें फुलविलीं!.. बाबाच्याहि आशीर्वादास मी पात्र झालें असतें, तर मला किती आनंद झाला असता!... पण त्याना माझी निवड पसंत पडली नाही; तरी देखील, आहे त्यातही मी सुखी आहे. अरुणानीं मला आपली म्हटल्यावर, त्यांच्यासाठीं ते म्हणतील तोंपर्यंत, कितीहि काळ मी आशेनें वाट पाहीन! ते मजमुळें सुखी व्हावेत व त्याच्या-बरोबरच त्याच्या सर्व मंडळींनाहि मजपासून सुख व्हावें, हीच एक इच्छा आहे.

तुमची—**मंजुळा देसाई**

( २२ )

कल्याण; ता. १५ ऑगस्ट १९२८

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद,

गृहप्रवेश गेल्या पधरवड्यात झाला. बहुतेक सर्व मंडळी हजर होती. त्या-वेळीं भाऊ आले होते, त्यांच्याकडे तुझी चौकशी केली. पण तूं थोडी आजारी असल्यामुळे स्वतःलाहि लागलींच घरीं परतावें लागेल, असें त्यानीं मला सागितले. आता तुझी प्रकृती कशी आहे?

आमच्या ठाकुरापैकीं बहुतेक मडळी समारंभाला आली होतीच; पण त्या शिवाय माझी इतर जुनी अंमलदार स्नेही मंडळीहि हजर होती. जवळ जवळ दोन अडीचशे रुपये खर्च झाला, पण माझ्या मनाला मात्र अतिशय समाधान वाटले.

चला, घर बाधावयाचें बांधावयाचें असें कितीतरी दिवस मनांत म्हणत होतों. ते एकदाचें बाधून संपलें! बांधलेल्या घराकडे एकदा डोळे भरून पाहिले, म्हणजे अतिशय आनंद होतो. आतां, त्यासाठीं खर्च जरा जास्त झाला खरा; पण त्याला इलाज नव्हता.

येथे मला उघड लिहावेसें वाटते, कीं, घराच्या बाबतींत माझ्या मनाला बराच त्रास झाला. सौदर्याविषयींच्या अरुणच्या स्वतःच्या चमत्कारिक कल्पना व अरविंदची त्याला मिळालेली कांहींशी फूस, यामुळें बऱ्याच गोष्टी माझ्या मनाविरुद्ध होत गेल्या. अरुण प्रत्येक बाबतींत घराचें सौंदर्य पहात होता. आणि

शक्य तेथें, मी त्याच्यासाठीं पाच दहा रुपये अलीकडे पलीकडे खर्च करीतही गेलों; नाहीं असें नाहीं. पण मग मला त्या दोघाचीही वर्तणूक असह्य वाटत गेली. शेवटीं तर मी काहीं बोलल्यामुळें अरुण मजवर जो रागावून गेला, तो इकडे घराकडे बरेच दिवस फिरकलाहि नाहीं. त्यामुळें, म्हातारपणीं साऱ्या गोष्टी मी एकट्यानेंच करावयाचें माझ्या नशिबीं आलें!

अरुणला कदाचित् वाटत असेल, मी गडगंज पैशाचा धनी आहे. पण मी म्हणतों, मजकडे पाचचार हजार अलीकडे पलीकडे असले, म्हणजे ते त्याच्या आवडीनिवडींसाठींच मी खर्च करावेत, असे तरी मला सागण्याचा त्याला कोणत्या प्रकारचा अधिकार पोहोचतों? माझ्या हयातींत तरी, स्वतःच्या धोरणानें व विचारानें, मी माझ्या पैशाचा विनियोग करूंच नये का?

मला ठाऊक आहे, माझ्या या वागण्याच्या पद्धतीनें, अरुणच्या भराऱ्या मारणाऱ्या तरुण मनाला, आजपर्यंत नेहमीं दुःखी कष्टी करण्याचेच मजवर प्रसंग आले. पण त्याच्या असल्या एकप्रकारच्या बेजबाबदार वर्तनानें माझ्या म्हातारपणीं मलाहि बराच त्रास होतो, याची त्यानें कधी कल्पना केली आहे काय? त्यामुळें, मी त्याच्या व तो माझ्या, दुःखास आणि असमाधानास मात्र कारण होतो. रागाच्या भरांत, मी त्याला एखादा कमीजास्त शब्द एखाद्यावेळीं बोलून जातों हेंहि खरें, पण त्याचें मला मागाहून वाईटहि वाटते. कारण तो मजवर रागावला तरी माझ्या दृष्टीने त्याच्या हिताच्याच गोष्टी मला करावयाच्या आहेत.

या गडबडींत मी कॉन्ट्रॅक्टच्या बाबतींत तुमच्या अरविंद नाईकालाहि थोडेसें दुखावलें. आणि शेवटीं विचाराअंतीं, अरविंद नाईकाचे जादा पैसे मी त्याला परत द्यावयास गेलों होतों. पण त्यानें ते घेण्याचे नाकारले. एका अर्थी त्याचेंहि बरोबर होतें. तरी पण, घराच्या बांधकामासंबंधीं, अरुण व अरविंद याजबरोबर मी कांहीं वेळां असा कठोरपणे वागलों, यांत मी चुकलों असे मला अजूनहि वाटत नाहीं. तें असो. तो विषय आता सारा संपलाच आहे म्हणा!

घराच्या पहिल्या मजल्यावरील ब्लॉक्स रिकामे आहेत; बहुतेक येत्या पहिलीपासून ते भाड्यानें सुरूं होतील. गेल्या आठवड्यांत पुष्कळ मद्रासी लोक चौकशी करून गेले. काल दोघाकडून ॲडव्हान्सहि घेतला आहे. म्हणजे आतां तळमजल्याचे व पहिल्या मजल्याचे मिळून एकंदर दोनशे रुपये भाडें यावयास हरकत नाहीं.

माझें कालपर्यंत दादरला बिऱ्हाड ठेवावयाचें नक्की ठरलें होतें. तिसरा मजला व वरच्या मजल्याचा हॉल मी स्वतःसाठीं ठेवणार होतों. परंतु काल इन्कमटॅक्स ऑफिसमधल्या एका मद्रासी ऑफिसरनें, तिसरा मजला व हॉल

मिळून एकंदर दीडशे रुपये मला देऊं केले; रात्रभर विचार करून आज शेवटीं त्याला मी ‘ हो ’ म्हणालों. बांधकामात पैसा बराच खर्च झाल्यामुळें, माझे हात आखडल्यासारखे वाटतात. दुसरे, नोकरीची दगदग मागची गेली तरी त्या मानानें उत्पन्न कमी झालें आहे. तेव्हा, सध्या काहीं दिवस मी कल्याणासच राहीन म्हणतो. मग पुढचे पुढे बघूं! घराचें एवढे भाडे बुडवून नुकसान कशाला सोसा? म्हणून आहे तेथेंच सध्या बरें असे शेवटीं मी ठरविलें. आता, अरुणला कदाचित् माझी ही कल्पना पसत पडणार नाही. पण सर्वानाच मी संतुष्ट कसा करू शकणार? मी माझ्या मताप्रमाणे चागले तेवढे करीत असतोच असो. कळावें हे आशीर्वाद, **बाबा ठाकूर.**

( २३ )

मुंबई, ता. २८ सप्टेंबर १९२८

प्रिय मावशी,

आज मी आहे जरा इतर गडबडींत! तोच, तुला बरेच दिवस पत्र न लिहिल्याची आठवण झाली;. . पण लिहायाला वेळच नाहीं.

वसंताच्या ‘ कलावती ’ मासिकाचे अंक तुजकडे वक्तशीर येत असतीलच. आता पुढील आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या अकात मी एक लेख लिहिला आहे. त्याची शेवटची प्रुफें सध्या माझ्या हाती आहेत. तींच देतो झाले पाठवून सोबत.

हेच आजचे पत्र समज! तुझाच—**अरुण.**

सोबत प्रुफें:—

( २४ )

## “ नव्या घराचें कॉन्ट्रॅक्ट ”

लेखक–“ अरुण ”

निर्जन अरण्यांतील एकाकी व अभेद्यपणें कैक वर्षे पडून राहिलेल्या शिळेंतच, मानवी शहरांतील मजले मजले चढणाऱ्या टोलेजंग घरांचा जन्म होतो!—

त्या कॉन्ट्रॅक्टरच्या हाताखालीं हजारपांचशें वडारी खडी फोडावयास असत;

त्यामुळें जेथें खाण चालू असेल तेथे त्यांच्या मुलाबाळांनीं गजबजलेलें गावच्या गांवच जणूं उभें राही!..

डोक्यावर सूर्य तळपत असावा. एखाद्या लहानशा खेड्याजवळच्या पुलाखालून, सुकलेली नदी आपल्या तुंबलेल्या हिरव्या निळ्या पाण्यातून एखादाच झुळझुळ पाट सोडीत असावी!...अशा ठिकाणीं, कणखर दगडावर प्रहार करून ते खडी फोडीत; व पोटाची न बुजणारी खळगी बुजविण्याचा प्रयत्न करीत.

त्याच्यांतला एखादा धडधाकट, पुढाकार घेई. सतत वर खालीं हलून पिळदार झालेल्या त्याच्या दंडातील बळामुळे, हातातील ती अणकुचीदार पहार कठीण दगडाच्याहि पोटात शिरकाव करी! आणि जरा प्रवेश मिळाला, की, दगडाच्या अंतरंगाचा, सुरुंग खचून ठाव घेई. त्याची सोबत करणारी वात अंतर्भेदी असल्यामुळे, तिच्या अंतःकरणातील महत्त्वाकांक्षेची ज्योत एकदा पेटविली, कीं ती क्षणार्धात फितूर होऊन घरभेदेपणा करी!..

आणि दुसऱ्याच क्षणीं, अनेक वर्षे परिमाणच्या एकीमुळे बळकटपणे स्थिर असलेल्या त्या जुनाट दगडाच्या, निमिषार्धात ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन चोहो बाजूंस उडत!.. मग क्षणभर लाब पळालेले ते वडारी, त्या विखुरलेल्या ठिकऱ्या एके ठिकाणीं करून, त्यावर हातोड्याने आघात करीत. त्यामुळे, एकदा नष्ट झालेला तो पूर्वीचा बळकट दगड पुन्हा पूर्ववत् एक होणे, अर्थात् अशक्य असे. उलट बारीक होऊन पडणाऱ्या तुकड्याच्या राशीवर राशी मात्र चढत!

आणि आता त्यातला प्रत्येक लहानसा खडा, आपल्या शेजाऱ्याला नवखा असे!

तेथील, त्या कडक उन्हांत, मानवी रक्तातून उगम पावून वहाणाऱ्या घामाच्या नद्या...हातोड्यानें ठेचलेलीं रक्तबंबाळ बोटें... सुरुगाने फुटलेली दुर्दैवी डोकीं,.. जायबंद झालेले अर्धपोटी उपाशी जीव!...चार काड्याबरोबर आपल्या आयुष्यालाहि कष्टी अंतःकरणानें चघळणारीं दुःखी गाढवें!...साऱ्याची एकच एक दीन धडपड चाले!...

आणि तरीहि ह्या राशी चढतच असत!..

कारण?...

कारण, त्या उंच राशींतून मोजीव मापाच्या लहान लहान बैठ्या राशी पडत! ... हाडाचे सांपळे झालेले अशक्त म्हातारे बैल त्या लहान राशी वाहून नेत, त्यावेळीं त्यांच्या शहराकडील फेऱ्याचें पुन्हा माप होई!

आणि या मानवी मापांपासूनच, पैशाची लहानशीच पण भयंकर कल्पना उभी रहाते! कारण दगडापेक्षा पैसाच पोटाची खळगी लवकर भरूं शकतो! तेव्हां, म्हणूनच म्हणावयाचें ... त्या निर्जन अरण्यांतील, एकाकी व

अभेद्यपणें कैक वर्षे पडून राहिलेल्या शिळेतच, मानवी शहरातील मजले मजले चढणाऱ्या टोलेजग घरांचा जन्म होतो !

: १४५ :

आणि त्याच्याकडे पैसा होता; तेव्हा त्यांना वाटलें, आपण एक घर बांधावें !

मग काय? कॉन्ट्रॅक्ट ठरवावयाचे आहे असे ऐकतांच, कॉन्ट्रॅक्टरांची त्यांच्या भोंवती एकच गर्दी झाली. प्रत्येक आपली बाजू सांवरीत होता. प्रत्येकाला थोडी फार अपेक्षा होती. ते मालक मात्र, कमींत कमी व जास्तींत जास्त या परस्परविरोधी शब्दाची, खर्च व फायदा या दृष्टीने सागड घालीत होते. आणि यालाच ते कॉन्ट्रॅक्ट म्हणत !

इतराबरोबर त्यानेहि कॉन्ट्रॅक्टची आपली कमींत कमी रक्कम त्यांना सांगितली होती...ती त्याना पटली म्हणून करार एकदांचा कायम ठरला !

आणि घर उभें करण्याची शक्ति असलेला पैसा हळू हळू बॅंकेतून बाहेर येऊं लागला ! ....

हो, आणि त्या दुसऱ्याना जगात जगवायाचें होते !...पण अगातील बळाशिवाय ( तेही अन्नाच्या तुटवड्यामुळें कमी झालेलें )...त्याच्यांजवळ कांहीं नव्हतें !..

तेव्हां, घराच्या जागेची मोजणी मापणी चाललेली पाहताच, त्याचा घोळका तेथें जमा होऊं लागला !.. त्याच्या काळजीनें काळवंडलेल्या डोळ्यात अपेक्षा दिसत होती. वाऱ्याबरोबर, त्यांच्या कानावर घरच्या कारभारणीची आदळआपट व नागड्या उघड्या पोराची रडारड येऊन आदळत होती !.. त्यांचीं सुकलेलीं तोंडें काम मिळणार न मिळणार या आशानिराशेनें, क्षणांत फुलत, क्षणात काळवंडत होतीं. मळक्या फाटक्या कुडत्यातून दिसणारी त्यांची काळी केसाळ छाती, पैशाच्या तहानेनें धापा टाकीत होती ! पुढील श्रमाच्या कल्पनेनें, त्याचे रोडके हात फुरफुरत होते; व पाय परिस्थितीनें थरथर करीत होते !...

तेव्हां, त्याने त्यांजकडे बेफिकीरीनें पाहून प्रश्न केला, 'काय पाहिजे रे तुम्हाला ?' ...त्याच्यांतील पुष्कळाच्या तोंडून, त्यांच्या नकळतच, लाचारीचे नम्र शब्द आले 'मजुरी ! बिजा काय ?' 'थाबा, जागेवर उभे रहा पाहूं ?' तो त्यांजकडे पाहून थोड्या हुकमी आवाजानें म्हणाला, 'हं, सात आणे दिवस ! पंचवीस जण पुरे आहेत आज; उद्यां बघं लागले तर !... पळा आतां, .. पळा !'

न निवडलेल्याची संख्या जास्त होती. एकमेकांकडे कावरेबावरे पहात ते हळूं हळूं चालूं लागले. पण त्याच्या चेहऱ्यावर मात्र दुसऱ्या दिवसाची आशा अजून झळकत होती !...

कुदळी, पावडीं, घमेलीं वाजूं लागलीं! घराची जागा साफ झाली.. पाया हळूं हळूं जमिनींत शिरकाव करीत होता! घामाच्या धाराचा पूर व श्वासोच्छ्वासाबरोबर आंत बाहेर जाणाऱ्या धुरळ्याचे लोळ! ......काळोख शेवटीं त्याच्या मदतीस धांवून आला. काम संपलें, आणि त्या दिवसाची त्याची हजेरी वहीवर लागली.

पाया गुडघ्याइतका खालीं उतरला होता; आणि मातीचा ढीग एका बाजूस वाढत होता!... पण त्यांनीं खणलेल्या त्या मोठ्या खड्ड्यामुळेंच त्याच्या पोटाचा लहानसा खड्डा अर्धामुर्धा तरी भरूं लागला होता!!

नेहमींच्या संवयीप्रमाणें, मुकादम आपल्या डोक्यावर छत्री उघडून, फर्मास विडी नाहीं तर हत्ती शिग्रेट ओढीत, वावलीच्या झुरक्यासाठीं झाडाच्या सावलींत जाणाऱ्या मजुरावर मधून मधून ढेके, तेवढाच !...

बाकी, नुसतें काम . . . काम . . . काम!

दुपारच्या सुट्टीची घंटा देऊन, मुकादमाने आपले घड्याळ दहा मिनिटे पुढें करून ठेवले !...

कालच मजुरी दिवसाला सहा आणे झाली होती. पण मुकादम जरूर नाहीं म्हणून सागत होता तरी देखील तिसऱ्या दिवशीं सकाळी, सूर्योदयापूर्वी नवे मजूर जमा होत होते.

शेवटीं तो मोटरसायकलवरून आला; त्याच्याकडे पहात तो मुकादमाला म्हणाला, ' आपणाला माणसाची गरज आहे का ? '... मुकादमाने ' नन्ना ' केलें! तेव्हा, तोहि त्या घोळक्याकडे पाठ वळवून तोंड वेडेवाकडे करीत म्हणाला, ' नको आहेत आज मजूर !'

पोट हातात घेऊन फिरणाऱ्या त्या घोळक्यात एकच खळबळ झाली,... गडबड उडाली !

पण इतक्यात तो वर जाता जाता थबकला व म्हणाला, ' पाच आण्याला कोणी तयार असेल, .. तर पाच जणाना आहे माझ्याकडे काम ! "

मजुरात पुन्हा कुजबुज सुरू झाली! ..

त्याचे पैसे त्याच्याकडे पडून राहिले असते; ते एक प्रकारे निर्जीव होते ! पण त्याची पोटे त्याच्या पैशासारखी निर्जीव नव्हती ! आणि त्या ओढी तर अत्यंत असह्य !! ...

तेव्हा थोड्याच वेळात, पाच आण्याला काम करावयास तयार झालेल्या मजुराच्या घोळक्यातूनही पाच जण निवडणे त्याला मुष्कील झाले ! ... निवड झाली; आणि शेवटीं तो जाता जाता म्हणाला, " उद्यापासून आम्हाला मजूर

नको आहेत, बरं का ! . . कोणी येऊं नका ! समजलं का रे मुकादम ? . . आपले सामान इकडे तिकडे पडलेलें असते ! काय ? . . . ”

आणि त्याचे शब्द ऐकून, पाच आण्यांस तयार होऊनही निराश झालेला घोळका . . पुन्हा मागे राहिलेल्या गर्दीत मिसळला !

: १४६ :

त्याच्यातला सोनू, आपला नावाचाच सोनू ! वास्तविक, त्याचा साऱ्या लोखंडाच्या कुदळी–पावड्याशीहि बरेच दिवस संबंध न आल्यामुळे, तो गेले कित्येक दिवस अर्धपोटीच होता. आणि त्याची म्हातारी आई तर खेड्यावर आजारी होती.

एका नव्या घराच्या कंत्राटाचे काम तेथे चालू होणार असे कळताच, आपल्या मालकीचा रोडलेला रेडा पिचक्या काटीने हाकलीत हाकलीत, सोनू एके दिवशी त्याच्याकडे आला होता. आणि शेवटी, बऱ्याच घासाघिशीने तेथील चुन्याच्या घाणीचे काम त्याला मिळाले होते. त्याला व तोंडग्याला मिळून चौदा आणे रोज ठरला.

आणि तो ते पैसे अगदी काटकसरीने खर्ची ! रेड्यापुढे चार गवताच्या काड्या टाकाव्यात ! स्वतः नुसता भात उकडावा. ( मालकाच्या घरच्या मंडळीच्या तावडीतून सुटलेला, सुतार कारखान्यातील सालपा, त्याला त्या कामी उपयोगी पडे ) जुनाट फळकुटे उभारून त्याने त्याच आवारात आपले घरकुल उभारले होते.

आईकडे पाठवावयास पैसे शिल्लक टाकण्यासाठीं त्याची ही सारी धडपड असे !

पण आधीच रोडावलेला रेडा, शेवटी पधरावीस दिवसाच्या आतच, चारी पाय पसरून आडवा झाला !... त्यावेळी, एखादा नातलग मेल्यासारखेच दुःख झाले सोनूला !. . जणू काय, एखादे कुटुंब पोसणाऱ्या बापाचा मृत्यूच म्हणाना !

आणि त्यानंतर, सात आणे रोजाच्या साध्या मजुरात मोठ्या मुष्किलीने सोन्याची भरती झाली !. . .

खाणीकडून आलेल्या खडीची रास उचावत होती. दगडगोट्याच्या दरडी पायाभोवती वाढत होत्या. विटाचे थर वर वर चढत होते ! दगडावर दगड... विटावर विटा...चुना सीमेंट याची मध्यस्थी !... आणि घर उभे होत चाललें होतें !

पेन्सील कानावर अडकवून, लाकूडसामानाला सुतार रंधा मारीत असले, ओळंबा लोंबकळत ठेवून गवंडी हातातील थापी हालवीत व वरखालीं पहात भितीजवळ काम करीत असले, किंवा मोठमोठ्या शिळांवर ‘ खाट् खाट् ’

आवाज करीत त्यांवर हातोडाफरशीचे आघात करणारे पाथरवट पाहिले, कीं मालकांना अतिशय आनंद वाटे !..

त्यांच्या मालकीचे ते घर, विटेविटेच्या उंचीने वर उठत होते !... सीमेंट चुन्याचे थर त्याला दर्शनीय स्वरूप आणण्याचा प्रयत्न करीत होते !

सागकामे मजूर फक्त आपली शरीरशक्ति ओतताना पाहून, तो कॉन्ट्रॅक्टर मालकांना काहीशा थट्टेनेच म्हणे, "पाहिलेत !...हे असले आमचे मजूर ... अंगमेहनतीसाठीच मजूरी घेतात ना ? .... तेव्हा आपले डोके वापरतील तर हराम !... म्हणतात त्यासाठीं निराळा पैसा पडेल !.."

मानेजवळ सदऱ्यात फुटपट्टी अडकवून खाली पहात पहात, एखादा सुतार कच्च्या भितीच्या कडेवरून घाईघाईने चालू लागला, की, मालकांना खाली जमिवर उभे राहूनही घेरी आल्यासारखे होई !.... पण लगेच ते मनाची समजूत करीत, 'अ: ! आपण त्याबद्दल त्याना पैसे देतो की ! ...'

भितीजवळ बांधलेल्या वाश्याच्या परातीवरून एखादा गवडी चढू उतरू लागला, की त्याना वाटे, झोक जाऊन हा पडणार तर नाहीं ? ... पण पुन्हा त्याच्या मनात विचार येई, ' त्यात काय झाले मोठेसे ? ते तर त्याचे कामच आहे. '

पाय भाजत भाजत छपराचे बॅटन मारणारे सुतार किंवा गडी तितक्या उंचीवरून खाली पाहूं लागले, की मालकाची छाती धडधडे; पण मग ते स्वत:चे पुन्हा सांत्वन करीत व म्हणत, ' जगात इतके हळवे वागून कसे चालेल ? पैशामुळेच तर ही सर्व कामे होत आहेत नाही का ? '

आणि अशा तऱ्हेने रुप्याच्या लहानशा वाटोळ्या तुकड्याच्या जोरावर मोठमोठ्या विटा, दगड, लाकडे उभे करू शकणारे आपले वाढते घर दिवसातून एकदा जरी डोळे भरून पाहिले, तरी मालकाना कृतकृत्य वाटे !... त्या कैफात ते इतर सारे विसरून जात !

घराचे रंगकाम आता सपत होते. छपराचे मोठमोठे लाकडसामान वर चढविणे चालले होते. दोन सुतार वर व दोन खाली उभे राहून ... दोरीने ओढणाऱ्याना लहानसान सूचना देत होते.

त्या आठवड्यात घराची मुदत सपत होती म्हणून कॉन्ट्रॅक्टर कामगारावर विशेष दक्षतेने स्वत:च देखरेख करीत होता.

सुतारांची गडबड चालली होती. सोनू आठ इंची भितीवरून बॅटनची बंडले घेऊन तोल सभाळून चालत होता. पुलीवरून वर चढणारे सामान ओढून घेताना त्याला अंगाला हिसके द्यावे लागत !.. त्यावेळी त्याना तोल जाण्याची भीति नव्हती असे नव्हे ! पण तेच त्याचें तेथले काम ! ... आणि

पोटासाठीं ... आशेवर विसंबून ... मिनिटामिनिटाला त्यांच्या तसल्या अनेक फेऱ्या होत होत्या !...

: १४७ :

घराचे मालक आणि तो कॉन्ट्रॅक्टर खाली घराविषयीं बोलत होते. घरमालक म्हणाले. 'चला, घर तर मनपसंत झालें !... पण पैसा फार खर्च झाला हो !'

'अहो ! फार कसला ?' तो त्याना उलट म्हणाला 'आतां हेंच पहा !... मला या कॉन्ट्रॅक्टमध्यें कितीशी कमाई होणार आहे, तुम्हाला वाटतें ?... झालीच तर सारी दीडदोन हजार रुपये !... त्यातसुद्धा मला अतिशय कांटकसर करावी लागली !...'

'अहो मग हे काय थोडे झाले ?' मालक हंसत हंसत म्हणाले, 'तुम्हाला इतकें मिळाले तरी या घरात ! पण आम्हीं तीसपस्तीस हजार रुपये हातचे घालवून बसलों कीं !'

'वा: ! गमावून कसे ?' तोही हंसून म्हणाला 'तुम्हाला मनपसंत घर मिळालें ना मालकीहक्काचें !'

'हो !... खरेंच तें ! म्हण आहे कां माहीत ?... मूर्ख लोक घरें बाधतात. शहाणे आत राहतात !..' ते मोठ्यानें हंसून म्हणाले.

'किंवा त्याची कॉन्ट्रॅक्टें घेतात !–' तोही मोठ्यानें हंसला.

पण मग एकदम आठवल्यासारखे करून तो म्हणाला, 'हो, बरी आठवण झाली. काल सगळे कामगार मला विचारीत होते, कीं, मालकसाहेबाचें एवढें मोठें घर तर बाधून दिलें;..ते आम्हाला आता बक्षिस काय देणार ?'

'मला या लोकाची हीच गंमत वाटते ...' मालक मध्येच उपहासगर्भ हंसून म्हणाले, 'दरदिवशीं कामाबद्दलचा पगार त्याना मिळत होता ना ? मग त्यानंतर दुसऱ्या तिसऱ्या अपेक्षा त्याना कशाला पाहिजेत ? ... हा काळच असा येत आहे पहा ! ... प्रत्येकजण आपले हक्क तेवढे दाखवितो; ... पण कर्तव्य काय तें मात्र पहात नाहीं ! –'

'पण ते म्हणतात ...' तो त्याच्या बाजूनें मालकाकडे रदबदली करीत म्हणाला, 'प्रत्येकाला प्रत्येकाचा दोन दिवसाचा— निदान एक दिवसाचा पगार तरी बक्षीस द्यावा. अंगमेहनतीत त्यानीं काहीं कसूर केली नाहीं, असे त्याचें म्हणणे !'

"हो हो, ... त्याना किंवा तुम्हाला म्हणायला काय ?' मालक काहीशा त्रस्त चेहऱ्याने म्हणाले, 'पण खिशातून पैसा जाणार माझ्या ! ... दसकी लकडी, पण एकका बोजा !! ... आता तुम्हींच पहा ! मजकडे पैसे होते ! मला घर बाधावयाचे होते ! मी पैसे बाहेर काढले !! ... त्याना पैसे पाहिजे होते.

त्यांनीं अंगमेहनत केली व मजुरी मिळवली!... तेव्हां आतां देण्याघेण्याचा निराळा प्रश्न उरतोच कोठें व कसा? दिवसा दोन दिवसाचा पगार देण्याचा हा प्रश्न नव्हे!...पण या लोकाना तो हक्क वाटतो!...आणि तो मात्र चालूं देण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं!...'

: १४८ :

वर, अभ्राच्छादित आकाशावर, काम करीत असलेल्या सुताराच्या व मजुराच्या अस्पष्ट आकृत्या दिसत होत्या.

लांकडें खालून वर चढवणाऱ्या, रणछोड सुताराची धांदल अतिशयच चालली होती. तो मध्येंच फूट काढून माप घेई,.. रोखणीनें किंवा खडूनें त्यावर खुणा करी,.. दोरीला बांधे ...आणि मजुराना ओढण्याचा हुकूम करी! हवेतील उष्णतेनें व एकसारख्या कामाच्या श्रमामुळे, त्या म्हाताऱ्याचा सुरकुतलेला चेहरा घामानें नुसता डबडबला होता!...

बॅटनच्या फळ्याचें एक एक बंडल दोरीवरून वर चढत होतें. वर उभा राहून सोनू तें ओढून घेई... सोडवून तें वर काम करीत असलेल्या सुताराच्या बाजूस एक हिसका घेऊन उडवी! ते तें झेलीत आणि पुढील कामास लागत...

असें कितीतरी वेळ चाललें होतें!..

इतक्यात, .. यावेळीं सोनूनें भिरकावलेलें बंडल, वरच्या सुताराचें लक्ष नसल्यामुळें छपरावरून एकदम गडगडत खाली सुटलें, व जवळचे मजूर ' अरे अरे, रणछोडजी, '... असें ओरडण्यापूर्वीच, खालीं उभ्या असलेल्या सुताराच्या दिशेनें, जोरात खालीं पडूं लागले.

आणि रणछोड सावध होण्यापूर्वीच, त्याच्या डाव्या हातावर व कुशीवर मार बसून तो जमिनीवर उपडा पडला!

मजुरात एकच गोंधळ झाला. ते सैरावैरा पळत आपल्या बेहोष व बेसावध पडलेल्या जातभाईभोंवती गर्दी करून उभे राहिले. मालक व कॉन्ट्रॅक्टर याचा खालचा संवाद एकदम थांबला. दोघेही घाईघाईनें त्या दिशेला धावले. कॉन्ट्रॅक्टर तोंडानें ओरडत होता. " अरे, मुकादम. त्याला सभाळा!... "

ती त्याची भूतदयाहि होती कीं काय नकळे!... पण, सरकारी भरपाई कायद्याची भीति मात्र त्याच्या डोळ्यात डोकावताना दिसत होती खास!

रणछोडला तिघां चौघानी उचलून सावलींत नेलें. तो पूर्ण बेशुद्ध झाला होता... त्याचा डावा हात सबंध चेंचला होता. पायाला व डाव्या कुशीला बराच मार बसला होता. त्याचा जीर्ण अंगरखा फाटला होता. खांद्याजवळून व डाव्या कोपरातून भळभळ रक्त वहात होतें!...

दोन घोट पाणी प्याल्यावर व डोळ्याला पाणी लागल्यावर, तो शुद्धीवर आला.

आणि कण्हत डोळे उघडून सभोंवार पाहूं लागला!... कॉन्ट्रॅक्टर जीव मुठींत धरून त्याच्याजवळच उभा होता! त्यानें पुढें वांकून, कांहींशा धडधडत्या अंतःकरणानेंच रणछोडला प्रश्न केला. 'काय रे रणछोड? कितीसें लागलें?'

'कांहीं नाहीं शेट!' तोहि त्याच्याकडे पहात थोडे कण्हत म्हणाला, 'आता दोन दिवसात साफ बरा होईन!... हे तर कांहींच नाहीं!.. दहा वर्षांपूर्वी, मी पांचव्या मजल्यावरून खाली गडगडलो होतो. त्यातूनहि शीर-सलामत जगलोच ना?... हं!... चाललंय! आपल्या पोटाचा धंदा माण-साला सोडता येतो थोडाच?..."

'बरं... हें पहा, आता शांत विश्रांति घे! अगदीं जागचा हालूं नकोस कीं बोलू नकोस!' कॉन्ट्रॅक्टर स्वतः शांततेचा एक सुस्कारा सोडून, मुकादम व आणखी दोघाना उद्देशून पुढे म्हणाला, 'जा रे, मोटारीतून त्याला प्रथम हॉस्पिटलमध्ये डॉक्टरकडे न्या!... आणि मग घरीं सोडा त्याच्या!... अन् तुम्ही रे, बघत काय बसलाहात सगळे!... चला उठा... बाकीचे आपा-पल्या कामाला लागा!...'

सगळे पुन्हा कावरी बावरी दृष्टि करून लगबगीने कामावर जावयास पांगले!...

मालक सारे पहात एका बाजूस उभे होते.

त्याच्याजवळ जाऊन, जरा खिन्नपणानेंच हंसत, तो त्याना म्हणाला, 'हें पाहिलेत!.. हा आमचा फायदा!... स्वतःचा जीव घालवून हे आम्हालाही धोक्यात आणतात!... आता तो शीरसलामत सुटला म्हणून ठीक!... नाहींतर मला पांच सहाशे रुपयाच्या खड्डयांत आणले असतेन्!..'

मालक या प्रकारानें हतबुद्धच झाले होते. पण नव्या घराला होणारा अप-शकुन टळला, या विचारानें त्यानीं समाधानाचा एक सुस्कारा सोडला!

क्षणभर, त्याना कामगाराच्या धोक्याच्या आयुष्याची दया आली. पण, पुन्हा दुसऱ्या क्षणीच, ते सर्व विसरण्याचा प्रयत्न करून, ते आपल्या नव्या घरात पहाणी करण्यासाठीं शिरले!

: १४९ :

सर्व मित्रमंडळीकडे आमंत्रणपत्रिका गेल्या होत्या. आणि पाहुण्यांनी घर गजबजले होते. आज मालकाच्या शृंगारलेल्या नव्या घरात, वास्तुशांतीची मेजवानी होती!... अग्नीला साजूक तुपाच्या आहुती झाल्या होत्या! होमहवन करून धूर घरभर कोंदाटला होता! मागे घातलेल्या लहानशा मांडवात चुलीवर चढलेल्या पक्वान्नाच्या पातेल्या खालीं उतरल्या होत्या!..

इतराबरोबर ओघानेंच निमंत्रिलेली कामगार मंडळी, आपल्या जेवणाच्या

वेळेची वाट पहात, काहीं झाडाखालीं, काहीं पागोळ्याखालीं, अशीं डुलक्या घेत पसरलीं होतीं! . . पण तेथे बहुतेक सामसूमच होती! नाहीं म्हणावयास, कधीं कधीं दोघाचौघांत, त्याना न मिळालेल्या बक्षिसाविषयीं कुजबूज मात्र चाले!

आकाश ढगानीं व्यापलें होतें. सूर्याचा प्रकाश मद झाला होता. वेगानें वहाणारा वारा, झाडाचीं पानें सळसळवीत होता...इतक्यात, चार सहा दिवस उघडलेल्या नवख्या पावसाच्या सरीवर सरी येऊं लागल्या. अस्ताव्यस्त पड-लेल्या कामगाराची एकच धावपळ उडाली! . .

थोड्याच वेळात पागोळ्या गळूं लागल्या. चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये मंडळी जेवावयास बसली होती. तोच, छपराच्या कौलातून पाणी गळू लागले! अजून सीलिंग पुरे झाले नसल्यामुळे, पाणी थेट अंगावर पडत होते...मडळींत एकच गोंधळ उडाला!...

पाहुणे मडळीची विचारपूस करावयास घरमालक वर येतात, तों एकच गड-बड चालली होती. चार पाच कौलातून लोकाच्या अगावर पाणी गळत होते! ...त्याचा थोडासा हिरमोडच झाला. त्यानी लगबगीने कॉन्ट्रॅक्टरास हाक मारली. कॉन्ट्रॅक्टराने मुकादमास व मुकादमाने खाली असलेल्या काही गवडी व मजूरास वर बोलावलें! कौलात फटी राहिल्या होत्या. कोणी तरी छपरावर चढून ती कौले परतलीं पाहिजे होती!...पण पाऊस तर धो धो पडत होता!... आणि बक्षिस न मिळाल्यामुळे सगळे कामगार आधींच नाराज झालेले!.... त्यांत पुन्हा तसल्या धोक्यात, पाऊस थाबल्याशिवाय वर चढावयास कोण तयार होईल? तेव्हा त्याच्यातील बहुतेकानी हळूंच काढता पाय घेतला!

: १५० :

पण सोनू पुढे झाला!...

त्याने जिवापाड अगमेहनत केली होती, तरी एवढ्या मोठ्या घराच्या खर्चात, काटकसरीने किबहुना अर्धपोटीं राहूनही, त्याच्या गाठी दहापधरा रुपयाहून जास्त शिल्लक राहिली नव्हती! त्याला वाटले अशा धोक्यातूनही आपण मालकाचे काम केले, तर त्याचे काहींतरी चीज होईल!

जगात अशक्य गोष्टीनाही, आशा मूर्त स्वरूप आणते!...

आणि म्हणूनच, सोनू धाडशी उत्साहाने पुढे झाला! झटझट वर चढला. डोक्यावरील दोनचार कौले बाजूस सारून, धो धो पडणाऱ्या पावसातूनही त्याने आपले डोके वर काढले!... सर्व कामगार मडळी तटस्थपणे त्याच्याकडे पहात होती! गळ्यात अडकवलेला आपला मोडका डावा हात सभाळत, रणछोडहि कामगाराच्या त्या गर्दीत शिरला.

पावसाच्या पाण्याने कौलें कांहींशीं निसरडीं झालीं होतीं. सोनूनें हळूंच

एका कौलावर पाय ठेवला व अंग चोरून भिजत भिजत, तो चालूं लागला. . . त्यानें जवळचीं दोन कौलें नीट केली व तोल संभाळत तो मधले तीन चार थर टाकून पुढच्या दोन कौलांकडे गेला.

अगदीं कोपऱ्याजवळील दोन कौलें, कॉन्ट्रॅक्टरनें त्याला खालून ओरडून दाखविलीं.

छत्र्या डोक्यावर घेऊन, पुष्कळ मंडळी स्तब्धतेनें खालूनच वरचा सर्व प्रकार पहात होती. मालक सोंवळें नेसून खालीं उभे होते; ते मधून मधून त्याला ' संभाळ रे ' म्हणून सांगत होते.

सोनू पावसानें ओला चिंब झाला होता. मधून मधून तो कपाळावरील पाण्याच्या धारा झाडी व हातानें कौल सारखें करूं लागे. . . कोपऱ्यावरील कौलें सारखीं केल्यावर, तो जपून पावले टाकीत व स्वतःला सांवरीत घरात उतरण्यासाठीं वर चढूं लागला.

आतां पाणी गळावयाचें थांबलें होतें, तेव्हां सर्व मंडळी पुन्हा घराच्या छपराखालीं शिरलीं !

आत शिरावयाची जागा, सोनूपासून सहासात हाताच्या अंतरावर होती. तो अगदीं जीव मुठींत धरून तेथपर्यंत चढत वर येत होता. पावसाची झोड सारखी चालू होती. सोनूच्या उघड्या अंगावरून धारा वहात होत्या. वारा वहात होता; त्यामुळे कुडकुडणारे अग मधून मधून झाडीत, तो घाबरत घाबरतच पावले टाकीत होता.

कमी होणारी खालची गर्दी पहावयास, क्षणभरच तो मागे वळून थबकला ! उभे राहून त्याने खालची परतणारीं माणसें पाहिलीं !. . .आणि त्याक्षणीं त्याला जणू काय वाटले ' आपणच या घराचे खरे मालक आहो ! ही आसरा शोधणारी खालचीं निर्बल हतवीर्य माणसे . . . आणि या चार मजली श्रीमंती बंगल्याच्या शिरावर, आपण बेडरपणे नाचणारे आपण...'

आणि तसल्या द्विधा मनःस्थितींत त्याने वर चढण्यासाठी पाय पुढे टाकला. पण आपला तोल संभाळण्यापूर्वीच, सोनू त्या उतरत्या कौलावर एकाएकीं आडवा पडला !

' अरे मारा बाप !' असे खालून रणछोड सुतार ओरडण्यापूर्वीच, पावसानें ओल्याचिंब झालेल्या कौलावरून, थंडीने गारठलेला सोनू गडगडत खालीं येऊं लागला !

: १५१ :

त्या कौलारू छपराखालीच घरांतील मोठ्या हॉलमध्यें प्रतिष्ठित पाहुणे मडळींची

पंगत त्यावेळीं ' सीताकांता 'चें स्मरण करून नुकतीच जेवावयास बसली होती. मालक, प्रत्येकापुढें ओणव्यानें दक्षिणा भिजवून ठेवण्यांत गुंतले होते.

आणि अर्धवट भिजलेली कामगार मंडळी, पडवींत अंग चोरून कुडकुडत उभीं होतीं !

इतक्यांत सोनू गडगडत खालीं येऊं लागलेला पाहून, रणछोड मोठ्यांनें ओरडला ' अरे, मारा बाप ! सोनू मरी गया ! . . . ' कामगारांची एकच गर्दी झाली. कॉन्ट्रॅक्टर उघडा बोडका धावत बाहेर आला ! . . .

मध्यें धरावयास कांहीं नसल्यामुळे सोनू कौलाच्या कडेवरून एकदम उडाला; आणि बघताबघतां, त्या कामगांराच्या गर्दीतच बेसावधपणें येऊन धाडकन् पडला. त्याच्या कपाळातून भळभळ गळणारें रक्त, सुन्न मनानें पहाणाऱ्या कामगाराचा, त्याच्याभोंवतीं गराडा पडला होता !

कॉट्रॅक्टर लगबगीने पुढें झाला. त्यानें कामगाराकरवीं घाईघाईनें एक भाड्याची मोटार आणवून सोनूला पटकन् आत टाकलें! आणि मोटार त्याला हॉस्पिटलपर्यंत पोंचविण्यास पळूं लागली !

' गडबड काय आहे?' म्हणून काही मंडळीं पंक्तींतून पहावयास उठत होती; पण त्याना खालीं बसवून पंगत पुढें चालू झाली!...

कामगार मंडळींची नंतरची पंगत बसावयास संध्याकाळ झाली होती. बहुतेक उदासीनच होतें. .मधून मधून काहींचें सोनूच्या हॉस्पिटलमधील मृत्यूविषयीं बोलणे चाललें होतें तेवढेंच...

जेवण झाल्यावर, कपडे चढवता चढवतां त्यांच्यातील कांहींनीं आपल्या त्या नव्या कृतीकडे..त्या चार मजली नव्या घराकडे ... अभिमान भरल्या डोळ्यानीं व गद्गदित अंतःकरणाने पाहिलें !

आपल्या वाढविलेल्या मुलीला सासूच्या पदरीं जड अंत:करणानें बांधणाऱ्या एखाद्या आईच्या, आर्द्र डोळ्यांतील करुणभाव, त्याच्या त्या दृष्टींत अगदीं ओत-प्रोत भरला होता !! . . .

: १५२ :

नव्या घराकडे पहात तेथून परत फिरतांना, त्या कामगारांना क्षणभरच जणूं काय वाटले, " चला, आपण आपले जीव धोक्यांत घालून हे घर तर चांगलें मजबूत उभें केलें ! ... पण ... आपली आठवण थोड्याच दिवसांत हे लोक साफ विसरून जातील ! ... आतांच मुळीं आपल्या अपेक्षेची बक्षिसी आपल्याला मिळणें शक्य झालें नाहीं ! सोनू .. रणछोड ... आणि .. पण .. चला आतां, दुसऱ्या घराची व्यवस्था करा ; असल्या विचारांपेक्षां त्यानेंच पोटाची खळगी लौकर भरेल ! ... "

कॉंट्रॅक्टर मनाशींच म्हणत होता. . . . "चला! एकदाचे जबाबदारींतून तर सुटलों. दीडदोन हजारच फायदा झाला . . . त्यांत पुन्हा सोनूच्या भरपाईसाठीं थोडी झीज सोसावी लागणारच! . . . त्याची थोडीफार व्यवस्था आपण करूच म्हणा! . . . तरी पण . . ."

आपल्या नव्या घराकडे कृतार्थतेनें पहात, मालक आपल्याशींच म्हणत होते, "बांधायचें बांधायचें म्हणता म्हणता . . . मनासारखें एकदाचे घर तर बांधून झाले! कल्पनेपेक्षा थोडा जास्त पैसा खर्च झाला खरा! . . . पण पुष्कळ दिवसापूर्वींचा मनातील बेत तरी सिद्धीस गेला! वर आपण स्वतः राहिलों, तरी खालच्या तीन मजल्यांच्या भाड्याचे पैसे . . . म्हणजे आपल्याला सात आठ टक्के सुटावयास हरकत नाहीं! . . . नाहींतरी कोण देतोय् तीन चार टक्क्यापेक्षां जास्त, हल्लीं? . . . आतां, तो मजूर पडून सुरवातीसच जरा अपशकुनासारखें झालें खरें थोडें . . . ते काहीं दिवस मनाला थोडे लागेलहि . . . पण . . ."

कॉन्ट्रॅक्टर व मुकादम . . . दोघांनीं वाटाघाट केली; व शेवटी, सोनूच्या म्हाताऱ्या आजारी आईकडे, मुकादम चाळीस रुपये घेऊन गेला. मालकांनींही उदार मनानें सोनूच्या आईला त्याबरोबरच आणखी वीस रुपये पाठविले होते!

पण मुकादम तपास करीत करीत त्या खेडेगांवीं पोंहोंचला, तेव्हां त्याला समजलें . . . मुलाच्या येण्याची बरेच दिवस वाट पहात तळमळन तळमळून, . . शेवटीं चार दिवसापूर्वींच, . . तोंडग्यासह पुढे निघून गेलेल्या आपल्या सोनूला भेटावयास म्हातारी गेली होती!

अर्थात् . . . केवळ नाइलाज म्हणून मुकादम पैसे घेऊन परतला! . . .

. . . आणि नव्या घराचे कॉन्ट्रॅक्ट एकदाचें संपलें!! . . .

( २५ )

मुंबई; १५ ऑक्टोबर १९२८

ती. सौ. वहिनास सप्रेम नमस्कार विशेष,

तुमचें पत्र पोहोंचलें. 'कलावती'च्या या महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालेलें अरुणचें 'नव्या घराचे कॉंट्रॅक्ट' वाचावयास तुम्ही मला लिहिलें आहे. पण वहिनी, आम्ही कॉन्ट्रॅक्टर माणसें एखादें कॉंट्रॅक्ट लोकांपुढें दृश्यरूपानें येण्यापूर्वींच त्यावर झडप घालीत असतों, हें तुम्ही विसरला! . . . त्यामुळें, अरुणचें हें 'नव्या घराचें कॉंट्रॅक्ट' देखील मजकडेच प्रथम आलें असेल, हें तुमच्या

ध्यानींहि आलें नाहीं. पण थट्टा बाजूस ठेवायची, तर तुम्ही लिहिण्यापूर्वी व 'कलावतीं' त प्रसिद्ध होण्यापूर्वीच, मी तो अरुणचा लेख वाचला होता.

स्वतःच्या घराच्या बांधकामाच्या वेळीं व माझ्याबरोबर इकडे तिकडे दुसऱ्या काहीं कॉन्ट्रॅक्टरांकडे त्या सुमारास फिरत असताना आलेल्या अनुभवावरच त्यानें तें चित्र उभारले आहे. म्हणजे तुम्ही म्हणता त्याप्रमाणे, बाबासाहेबांना व मला त्यानें चव्हाट्यावर खेचले आहे, हें काहीं अंशाने खरें आहे. त्याच्यासारख्या कलावंताने हा त्याच्या भोंवतालचा साधासुधा मालमसाला गोळा करून ही एक सुंदर इमारत बांधली आहे... (क्षमा करा हं,..काही झालें तरी आम्ही गवंडीच;... खूब प्रयास करून ही उपमा योजीत होतो.) पण त्यात त्याचे फाजील भावनाप्रधान हृदयच दिसून येते. गरीबांविषयीचा जिव्हाळा माणसाच्या मनात जरूर पाहिजे;.. पण माझ्या आपल्या काहींशा गद्य मनाला वाटतें, अरुणनें यात बरेंचसें ओढून ताणून चंद्रबळ आणले आहे!

तुम्हींच पहा;..पैसे होते म्हणून कमींत कमी किमतींत त्या गोष्टींतील मालकानें घर बांधलें! आणि आपल्याला चार पैसे सुटावेत म्हणून त्याच्या त्या कॉन्ट्रॅक्टरनें बरीच काटकसर करून त्याना मदत केली! यात त्या दोघांचा काय दोष सांगा बरे, वहिनी? त्या चित्रांतील घरमालक किंवा तो कॉन्ट्रॅक्टर यापेक्षा जास्त प्रेमळ असते, तरी ते आणखी निराळे ते काय करणार होते?...

खरी गोष्ट अशी आहे, कीं, आम्हालाहि दलिताबद्दल सहानुभूति वाटत नाही असे नाही. पण आम्हालाहि या निसर्गतः विषम जगांत आपआपल्या योग्यतेला साजेलशा पद्धतीने जगावयाचें असतेच ना?... तेव्हा गरीबांविषयीं एखाद्याने असे नुसते उसासे टाकून त्यांची स्थिति सुधारणार आहे थोडीच?... सर्व सामाजिक घटनाच योग्य त्या प्रकारे आमूलाग्र बदलली, तरच्या या साऱ्या गोष्टी!...तोपर्यंत,..प्रत्येक आपआपलें आयुष्य असें दुसऱ्याच्या हिताशीं झगडतच जगण्याचा प्रयत्न करील. म्हणूनच मी याबद्दल वाद करतांना अरुणला जें सांगितलें, तेंच तुम्हाला येथें पुढें लिहितों!..

त्यानें ही अत्यंत सुंदर हृदयस्पर्शी कलाकृति निर्माण केली आहे. पण तें वाचून, आम्ही कॉन्ट्रॅक्टर लोक किंवा मालक विशेष सुधारूं अशी आशा बाळगण्याचें मात्र कारण नाहीं!.. कारण, सध्याचा मानवी जीवनकलहच इतका गुंतागुंतीचा आहे. तो कमी धडपडीचा व्हावा अशी इच्छा असेल, तर ज्याची कुवत आहे अशानी त्यांत बदल व्हावयास, प्रत्यक्ष अशी,... देशदेशांच्या परिस्थितीला जुळणारी योग्य क्रांति घडवून आणावी! असल्या चित्रणांमुळें थोडी सहानुभूति वाढली, तर त्या आगामी समाजक्रांतीलाहि योग्य वेळीं सहानुभूति

मिळेल. वहिनी, मला अरुणच्या कलाकृतीची किमत समजते. त्याच्या भावनाप्रधान मनाची तळमळहि मी आकलन करूं शकतों. पण,.. केवळ असल्या गैरवाजवी व दुबळ्या भावनाप्रधानतेचा, जगाच्या या धकाधकीच्या जमान्यांत टिकाव लागत नाहीं, असेंच मला विचारांतीं वाटतें !. .

:१५४:

या धकाधकीच्या जमान्यावरून मला तुमच्या पत्रांतील दुसऱ्या प्रश्नाची आठवण झाली. 'सुनीतीबरोबर तुमचें लग्न ठरलें आहे, तर तुम्ही आतां लौकर तें उरकून का घेत नाहीं ? एक लहानशी जाऊ नरी हाताखालीं काम करायला होईल मला !' असें तुम्ही पुन्हां लिहिलें आहे, नाहीं कां शेवटीं ?...तुम्हाला धाकटी जाऊ लौकरच मिळेल वागवायला, बरं वहिनी ! पण थोडा धीर धरा.

खरं सागू कां वहिनी ? माझें हें लहानसेंच—अवघ्या सहवीस सत्तावीस वर्षांचें—आयुष्य ! पण त्यांत मला पुढे यावयास जी धडपड करावी लागली आहे, त्यामुळें अजून गृहस्थाश्रमाची जबाबदारी अंगावर घ्यावयास मला धीरच होत नाहीं. मी इंग्लंडहून परत आल्यावरच तर नुकता कोठें भरूच्याच्या मदतीनें स्थिर होत आहें. परदेशीं जाईपर्यंत मी आपला एकमार्गी होतों. दरिद्री आईबापाचा दरिद्री मुलगा मी ! क्लास मिळवायचा, व कोर्स शक्य तो स्कॉलरशिपा मिळवीत लौकर संपवावयाचा ! . . . तोंपर्यंत मजपुढें तेंच एक ध्येय होते. परीक्षेंत बराच वर नंबर मिळाला म्हणून तर टाटाचे लोन तरी मिळालें. ते नुकतेंच कोठे फेडून झालें. त्यांतही भरुच्यानेंच मला मदत केली म्हणून बरें. नाहीं तर आणखी काहीं काळ असाच धडपडींत गेला असता.

तेव्हां, आतां स्थिर व्हायला, किंचितसें बेफिकीर रहायला थोडा काळ जाऊं द्या कीं ! सुनीति नुकतीच या वर्षी तर मॅट्रिक पास होते आहे. तिलाहि एकदोन वर्षें कॉलेजच्या वातावरणांत वांवरतां येईल. माझी पत्नी ग्रॅज्युएटच असावी, असें मला फारसें वाटत नसलें, तरी कॉलेजच्या वातावरणामुळें तिची दृष्टि थोडीतरी विस्तृत होईल यांत शंका नाहीं !

आणि दुसरं सागूं का, वहिनी? या अलीकडल्या अर्धवट शिकलेल्या मुली वाईटच नरं कां एकंदरींत !. . . घरकामाला तर अगदीं निरुपयोगी ! आणि आर्थिक बाबतींत ?... अंहं, ते मुळीं विचारूंच नका ! तुम्ही जुन्या गृहिणी फारशा शिकलेल्या नसता, तरी पण त्या दृष्टीनें एकंदरींत फार वरच्या दर्जाच्या !... कोणती तरी एक जबाबदारी तरी पूर्णपणें शिरावर घेतां !... तेव्हां तुम्हाला तुमची जाऊ मदत करण्याऐवजीं तिची बडदास्त राखण्याच्या नवीन कामगिरीचीच तुमच्या इतर जबादाऱ्यात भर पडायची ! नाही ?... मग आतां माझ्या या विचारसरणीनें घाबरून तरी मी एखादं वर्ष लग्न पुढं ढकललं तर त्याला संमति द्याल कीं नाहीं ?. . .

पण नको बा, वहिनी रागावावयाच्या आणखी कांहीं लिहिलें तर.... आणि मलाहि ' एका नव्या घराचे कॉन्ट्रॅक्ट ' हातीं घ्यावयास जायचं आहे बाहेर! मग पुरे करूं ना पत्र?... तुमचाच—**अरविंदभावोजी.**

ता. क.—अरुणनें मंजुळेविषयीं बाबांना कळविल्यावर, झालेला गोधळ तुम्हाला आतापर्यंत समजलाच असेल. —**अरविंद.**

( २६ )

कल्याण, ता. ९ फेब्रुवारी १९२९

प्रिय कमळामावशी,

किती तरी दिवसानीं मला तुमचें पत्र आलें. सुधा आता ठीक आहे. पण त्यापेक्षा तिच्या आजाराविषयीं जास्त आशाजनक असे काय सागावयाचें? तुम्ही इतक्या वर्षाच्या अनुभवाने आता तें जाणताच! तरी, वास्तविक, तुमच्या पत्राला अगदीं मनमोकळे उत्तर द्यावयाचें माझ्या किती तरी दिवस मनात होते; पण वेळच मिळाला नाहीं. एक तर सुधेची मधली अत्यवस्थ स्थिति व दुसरे आमचे ' कलावती ' मासिक!

नानांचा बहुतेक व्यवहार हल्लीं मीच पहातो; पण तशी मला नानाची बरीचशी मोकळीकच आहे! त्यामुळेच अर्थात्..सुधेच्या शुश्रूषेत जाणारा व आमच्या व्यवहारात मोडणारा वेळ सोडून माझा इतर वेळ, मी अरुणच्या संगतीमुळें माझ्या आवडत्या कलात—फोटोग्राफी, चित्रकला, सिनेमातंत्र वगैरेत घालवतो व कसेबसें माझ्या मनाचें समाधान करतो.

काहीं महिन्यापूर्वी अरुणने तुम्हाला त्याच्या लेखाचीं प्रुफे पाठविलीं;..त्यावेळच्या त्याच्या व माझ्या आशापूर्ण भराऱ्या आज पूर्णपणे नाहीशा झाल्या आहेत. हो, त्याच व्यवहाराच्या निरवानिरवींत अरुण व मी हल्लीं गुंतलों होतों. बाकी तो व्यवहार म्हटला तर व्यवहार! आणि आम्हीं त्यात पडलो होतो, ते कांहीं विशिष्ट ध्येय ठेवूनच. तथापि हातीं असलेली शिल्लक रक्कम संपेपर्यंत आमचा वाङ्मयसंसार व कलासेवेचा कैफ...कसेबसे चालले व शेवटी कटुव्यवहाराला बळी पडून, हां हा म्हणतां गेल्या डिसेंबरात त्या आमच्या साऱ्या ध्येयाचा बोजवारा उडाला. या निरवानिरवींत अरुणनें गेल्या वर्षाच्या मुंबई प्रदर्शनात मिळविलेले, चार बक्षिसांचे पांचशें रुपये व माझेहि पंधरा सोळाशें रुपये उडाले! पण त्याला उपाय काय?...

मावशी! नानांसारख्या कठोर व्यवहारी माणसांचा मुलगा असल्या ध्येयामागें कसा लागला याचे तुम्हाला आश्चर्य वाटलें असेल नाहीं? कदाचित् अरुणच्या संगतीनेहि असेल, पण एवढें खरें, आम्हीं 'कलावती' मोठ्या ध्येयानें निर्माण केली होती! तरी महाराष्ट्राची भूमि अशा कोवळ्या वेलींना मर्यादेबाहेर कणखर टरते. क्षणार्धात त्या खतपाण्याअभावीं सुकून मात्र जातात!

दुसरें काय लिहूं? तुम्हीं स्नेहानें मला पत्र पाठविलेंत. सुधेविषयीं चौकशी केलीत!...खरेच, मला अतिशय समाधान वाटले. नाहीं तर, खरें सांगावयाचें म्हणजे माझें आयुष्य मला पुष्कळसे भकासच वाटतें मावशी! अरुणचा स्नेह, त्याच्या संगतीनें कधीमधीं करावयाच्या असल्या भानगडी, असल्या उद्योगांत स्वतःला रमवून घेण्याचा मी प्रयत्न करतों, एवढेच!

आज हें पत्र तुम्हाला लिहावयास मला किती आनंद वाटत आहे, मावशी; माझ्या काहीशा एकाकी आयुष्यात,... तुमच्यासारख्या मंडळींचा अकारण जिव्हाळाच मला मूठभर मांस देतो!...

कळावें, भाऊंस सप्रेम नमस्कार. मुलांस अनेक आशीर्वाद.

तुमचा—**वसंत ठाकूर.**

(२७)

कल्याण; २९ मार्च १९२९

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद—

तुला आठदहा दिवसापूर्वी कार्ड लिहिलें, पण त्यानंतर अरुणच्या बाबतींत मला पुन्हां एक मोठी चिंता उत्पन्न झाली आहे!...

मागच्या सगळ्याच गोष्टी,.. माझ्याप्रमाणें तूंही विसरणें बरें!... पण तुला आठवत असेल, अरुण अगदीं लहान असतानाच आईविना निराधार झाला. त्या नंतर, आई आणि बाप दोन्ही प्रकारची त्याची जबाबदारी माझ्यावर आली. अर्थात् त्याच्या शिक्षणासाठीं, त्याच्या लहानसान आवडीनिवडीसाठीं, त्याच्या एकंदर सुखासाठीं, मी माझ्या ऐपतीप्रमाणें खर्चेही करीत आलों!..मग अशा वेळीं त्याच्या भवितव्याविषयींच्या माझ्या स्वतःच्या अशा कांहीं आकांक्षा...अपेक्षा माझ्या मनांत असाव्यात यांत नवल काय आहे?

तरी पण त्यापैकीं त्यानें माझी अशी कोणती अपेक्षा पूर्ण करून दाखविली

आहे !...कॉलेजपर्यंतच्या आयुष्यांतच त्यानें मला निराश केलें. पुढें तर त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा त्यानें दुरुपयोगच केला. जात्या हुशार असूनहि, आपल्याच अवांतर आवडी व कल्पना यांना बळी पडून, तो सारखा अयशस्वीच होत गेला. त्याचें चित्रकलेचें वेड, त्याच्या इतर संगीतादि कला...साऱ्यांचा, त्याच्या एकंदर अभ्यासक्रमावर परिणाम झाला !...

आणि चार वर्षांपूर्वी तो एम्. बी. बी. एस्. कडे गेला; पहिली परीक्षा दोन वर्षांनीं पास झाला. पण पुढल्या कोर्समध्यें तो दोनदा नापास झाला. या सर्वांला जबाबदार कोण ? त्याच्या अभ्यासाव्यतिरिक्त इतर अवांतर गोष्टींत रमत असलेले त्याचें मन, हेंच ! नव्हे का ?

हल्लीं तर मी असे एकलें कीं, मी त्याला सागितले होते म्हणून मला चकविण्यासाठींच केवळ, पहिल्या परीक्षेनंतर तो पुन्हां डॉक्टरीकडे गेला. वास्तविक, तेथें त्याने सुरुवातीचे काहीं महिने अभ्यास केला तेवढाच, .. बाकी त्यानंतर तो एका खासगी आर्टस्कूलमध्येंच आपला वेळ जास्त घालवी. याविषयीं मला बातमी समजताच, मी त्याला पत्रानें सर्व सविस्तर विचारलें. त्याच्या उत्तरावरून आता ही वस्तुस्थितिच असल्याचें मला समजतें. पण दुसरेंही त्यानें मला त्यात लिहिलें आहे ; तें म्हणजे, तो गेल्या वर्षी बी. एस्सी. ची पहिली परीक्षा पास झाला व यंदा पुढल्या शेवटच्या परीक्षेलाही बसला आहे ! . . हातीं घेतलेला कोर्स तसाच टाकून या गोष्टी त्याने गुप्तपणें करणें म्हणजे मजविरुद्ध एकप्रकारें अन्याय्य कटच करणे नव्हे काय ? . .

या सर्व गोष्टीवरून तुला समजेलच, की, मी त्याच्या बाबतींत आतां अगदींच भग्नहृदय झालों आहे.

: १५८ :

तसें पाहिले, . . तर अरुण हुशार आहे, सद्गुणी आहे ; त्यानें महाराष्ट्रात चित्रकलेंत बरेच यश संपादून नावहि मिळविलें आहे, असें ऐकतों. त्यानें गेलीं तीन चार वर्षें लागोपाठ काहीं बक्षिसे मिळविल्याचेंहि कोणी मला सागितलें !. . पण या साऱ्या गोष्टी त्याला मागाहून करतां आल्या नसत्या कां ?

सात आठ महिन्यांपूर्वी मी त्याला लग्नाच्या बाबतींत विरोध केला. त्यांत माझी कांहीं चूक होती, असें मला आजही वाटत नाहीं. अरुणचें भावनाप्रधान मन, ज्या क्षणाला जी गोष्ट मनांत येईल तीवर पतंगाप्रमाणें झडप घालीत असतें!. . त्याच्या आतापर्यंतच्या लहानशा आयुष्याचा विचार केला तरी देखील हेंच दिसून येईल. आपल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून, मंजुळा देसाईची माझ्या नकळत व स्वतःच्या जबाबदारीवर निवड करण्याचा त्याला अधिकार कोणी दिला होता ? तो अजून माझ्यावर अवलंबून आहे. व माझ्या घरांत येणारें माणूस, त्याच्या

प्रमाणेंच मलाहि निवड करण्याचा मला अधिकार पोंहोंचतो... आणि त्या दृष्टीनेंच, मी त्याच्या तसल्या निर्णयाला त्याच्या हितासाठींच आडकाठी केली!

त्याच्या भावनाप्रधान वागणुकीनें उद्‌भवलेल्या अनेक प्रसंगांनीं मला जसें पदोपदी दुःख होत गेले, तसें त्याचे भावनाप्रधान अंतःकरण माझ्या थोड्याशा कठोर वागणुकीनें कळत न कळत मीहि दुखवीत आलो. हे त्याच्या आलेल्या पत्रात वाचलें म्हणजे दुःख होतें ; पण, माझीच त्या सर्वात चूक आहे असें मात्र मला मुळींच वाटत नाही. असो.

या सर्व गोष्टीमुळे माझें मन फार अस्वस्थ होते व त्याच्या भवितव्याविषयीं बरीच काळजी वाटते. त्याचे चार पाच दिवसपूर्वी आलेलें पत्र मुद्दामच सोबत तुजकडे पाठवित आहे. वाचून झाल्यावर ते तुजकडे राहिलें तरी चालेल. मुद्दाम परत पाठवावयास नको. अनेक आशीर्वाद. **बाबा ठाकूर.**

( १८ )

मुंबई, ता. २२ मार्च १९२९

प्रिय बाबा,

तुम्हीं मला सांगितलेत व मी डॉक्टर होण्यासाटीं मेडिकल कॉलेजांत गेलो; पहिली परीक्षा दोन वर्षांनी झाली. पण मन रमेना. आपल्याला अप्रत्यक्ष सुचवून पाहिले. पण यश येणार नाहीसे पहाताच मी परत आलो. साहजिकच दुसऱ्या परीक्षेत दोन्ही वेळा यशस्वी उमेदवारात माझें नाव आले नाहीं. होय; या मधल्या-अवधीत, एका खाजगी आर्ट्‌स् क्लासमध्यें मी चित्रकलेचा अभ्यास चालविला होता! अकल्पित बी. एससी. चाहि अभ्यासक्रम संपविला. आपणांस हे सर्व अचानक समजल्यामुळे आपण मजला रागावून लिहिलेले पत्र आजच पोहांचले. आपला राग अकारण आहे, असे मला मुळींच वाटत नाहीं. पण मला माझीहि मनःस्थिति आपणास जरा कळवू द्या.

बाबा, स्पष्ट लिहिण्यावाचून गत्यतर नाही, .. माझ्या महत्त्वाकांक्षा, माझ्या नैसर्गिक आवडी काय आहेत आणि काय नाहींत त्याची आपण कधींच ओळख करून घेतली नाहीत! माझ्या आयुष्याविषयीं आपल्या अशा काहीं ठोकळ कल्पना आपण ठरविल्या, .. आणि त्याप्रमाणे या नाहीं त्या साच्याबरहुकूम मी वागावें, अशी सारखी इच्छा केलीत!... पण मलाहि स्वतःच्या आयुष्याविषयीं काही स्वतःच्या अशा कल्पना असतील, हें कधीं आपल्या मनात आलें का?

कां कोणास ठाऊक !.., मी जें जें स्वतःच्या इच्छेने उत्साहानें करीन, तें तें सारें, आपल्या मते माझ्या मूर्ख भराऱ्याच ठरत आल्या ! तेव्हा, मला वाटतें तरुणाच्या अंतःकरणात शिरून, वडील माणसाना, त्याचे विचार समजावून घेत येत नाहींत, हेंच खरें एकंदरींत ! आणि यामुळेच, आपण आचरला तो मार्ग व आपण जगलो तें आयुष्य, हेच श्रेष्ठ.. चागलें,.. तेच आमच्या मुलानें तंतोतंत अनुकरणीय आहे, असे त्याना वाटते अशा वेळीं, मला एका महात्म्याचें एक वाक्य आठवते–" मानवी मनाच्या नैसर्गिक भरतीला, 'इ येथे .. नव्हे तेथे'.. असे बाध घालण्याचा कोणाला अधिकार आहे ?..."

खरेच, 'मानवी आयुष्य' हा एक लाबच लाब असा प्रवास आहे !.. आणि जन्मजात संस्कारच माणसाच्या मनाचा कल ठरवित असतात ! नव्हे का ? म· त्याला सर्व प्रकारचें व सर्व बाजूचे कृत्रिम व निरुंद बाध तरी कशाला ? त्या· त्याची प्रगति होईल की अधोगति ??..

१६० :

आपण मला रागावूनच विचारले आहे,.. तेव्हा आज माझ्या मनाची सा· मळमळ खळबळ,.. थोडक्यात आपल्यापुढे टाकणे मला भाग झाले आहे !

एकंदरीत, आपल्यापेक्षा किती तरी सुस्थितीत माझे आतापर्यंतचे लहान आयुष्य गेले; तरी पण, आपण नीट विचार करून पाहिलेत,.. तर आपल्याल आढळेल,.. की ज्या गोष्टी मला माझ्या जीविताची खरोखरीच साधने.. साध वाटत,.. ज्या प्रकारची वागणूक, व्यक्ती.. मला प्रिय व समाधानाची केंद्रे वाटत,. तींच हटकून आपल्या मनास पटत नसत! माझ्या ललितकला आपल्याल टाकाऊ वाटत! पण त्याच माझ्या जीविताला आधारभूत वाटत!—माझ चित्रकलाच घ्या!... मी माझ्या आतापर्यंतच्या लहानशा आयुष्यातच व होईना–त्या प्रांतात थोडे थोडे नाव मिळवीत होतो. पण उत्तेजन तर रा‍ह्याच,... उलट त्या सर्वात मला निरुत्साही करण्याचाच आपल्याकडून प्रत्यक्ष प्रत्यक्षपणे प्रयत्न झाला!.. माझ्या मनाला अर्थातच समाधान वाटत नसे!. आणि म्हणूनच,.. मी माझ्या आवडी,.. खाजगी रीतीने.. दुसऱ्याच्या उत्तेजन शिवायच,.. चालवीत व वाढवीत गेलो! त्यातच गुंग होऊन,.. मी कल्पनेच्य एखाद्या अदृश्य प्रदेशात वावरलो... त्या अवर्णनीय दृष्टीने धडपड केली.

पण जरी माझ्या मनाला खरे समाधान कधीच लाभले नाहीं, ... तरीं माझ्या या धडपडीला थोडेसे दृश्य स्वरूप येत गेलें. चित्रकलेत प्राविण्य मिळ लागलें. माझ्या वैयक्तिक हिमतीच्या प्रयत्नात यशस्वी होऊन, तीन चार व· लागोपाठ लहानसहान बक्षिसे मिळत गेलीं, ... अशा वेळीं मला जे मनोम· समाधान वाटे,.. तें शब्दांत सांगणें अगदी अशक्य आहे !..

णा केवळ तवढ्यानच मा सुखा नस. त्या बाबतीत माझे कोणी कांहीं कौतुक ीत नसे. त्यामुळ गायन व वाद्यांतील आवड स्वतःच्या करमणुकीपुरतीच न राहिली. लिहावें व फाडावें याशिवाय लेखनांत प्रगति नव्हती. चित्रें ानुवर्षें अर्धवट धूळ खात पडत!.. याबरोबरच आपल्याला सर्वश्रेष्ठ वाट-ारा माझ्या नैसर्गिक प्रवृत्तींशी क्षणोक्षणीं झगडणारा माझा लांबच लांब अभ्यासक्रम मनाविरुद्ध कसाबसा चालला होता. आणि त्यामुळें तर मन नेहमींच रंजीस राही! अशा वेळींच माझ्या मनाला उत्तेजन देणाऱ्या दुसऱ्या एखाद्या सुहृद् अंतःकरणाची अतिशय जरूरी भासे!..

: १६१ :

पण त्यांतूनहि मी मनाला रंजवीत पुढें रस्ता काढूं लागलों. पहिल्या परीक्षे-नंतर मी डॉक्टरी कोर्सला पुन्हा आलों, तेव्हाच माझ्यात खरी दुटप्पी वृत्ति आली! आणि म्हणून माझ्या नैसर्गिक आवडींना मी लपत छपतच वाव देत होतों;.. पण बाहेरून, मनाविरुद्ध कां होईना; माझ्या चाकोरींतील शिक्षण-क्रमाचा दृश्य डोलारा, मी तसाच उभारून राहिलों होतों!..

त्या सुमारासच, अनपेक्षित अशा काहीं नवीन घटना झाल्या; आयुष्याच्या सुरवातीसच, मिरेच्या बाबतींत अनुभव येऊनहि, माझा मंजुळेशीं अकल्पित संबंध आला! आणि शेवटीं जिवलग स्नेहासाठीं तहानलेलें माझे मन तिच्याही स्नेहानें निगडित होण्यासाठीं उत्सुक झालें.

त्यावेळपर्यंत मला आजच्याप्रमाणे पैशाची खरी ओळखच नव्हती. त्याची किंमतच कळत नव्हती. सुरवातीस मी मनातल्या मनात कुढलो आणि शेवटीं, सरलमनस्कतेने आपणास मी सर्व कळविले; पण आपण मजवर एकदम रागावलांत. माझ्या साऱ्याच भावनांचा .. कल्पनांचा .. विपर्यास केलात!.. मला तर अजूनहि तें सर्व, .. माझ्या आयुष्यातील मनाला अत्यंत जाचणी लावणारे प्रसंगच वाटतात!..

: १६२ :

आपल्या इच्छेप्रमाणे माझ्या मनाविरुद्ध कां होईना, पण मी मेडिकल कोर्स हातीं घेतला; त्यावेळीं, अर्थात्.. माझी महत्त्वाकांक्षा दुहेरी होती. डॉक्टर व्हावें, स्वतंत्र व्हावें, .. पण आपलीं ध्येय मात्र तींच कायम ठेवून त्यांना मूर्तस्वरूप आणावें,...पण असे म्हटलें, .. तरी माझ्या आवडी साफ निराळ्या! मनाला ध्यास तर निराळ्याच गोष्टींचा!.. त्यामुळें त्या लांब कोर्सकडे पाहून माझें मन शेवटीं चरकलें. भांबावून जाऊन लौकरच, मी त्यातून एकदम पाय मागें घेऊं लागलों!..

एकीकडे अभ्यासाच्या रुक्ष वाटणाऱ्या पुस्तकांचा ढीग, मजकडे डोळे वटा-

रून बघत असे ; .. तर दुसरीकडे चित्रफलक, कुंचले, रंगाच्या डब्या, मला प्रेमानें जवळ बोलावीत असत ! .. आवडीचे ग्रंथकार मजविरुद्ध कुजबुज करीत आहेत असें मला वाटे ; .. तर कोपऱ्यात गवसणी घालून टांगलेल्या तंबोऱ्यांतून गंभीर आवाज निघाल्याचा भास होई ! .. श्रेष्ठ कलावंताचें वाङ्मय मनात स्वतःच्या विचाराचें तुंबळ वादळ उठवून देई ; .. तर आपल्या अंगी असलेल्या गुणाचें योग्य चीज होत नाहीं, या जाणीवेनें मन अगदीं रंजीस होई !...

मनावर अशा तऱ्हेचें दडपण घालून मी माझा अभ्यास कसकसा चालवीत होतों, .. पुढें ढकलीतें होतों ! .. पण त्यामुळेंच मी मनांत जास्त खुरटूं लागलों ; .. शरीरानें निरुत्साही, नेबळा बनलों. आणि जसजसा मी हाती घेतलेल्या कोर्सविषयीं विचार करूं लागलों तसतसे मला आपलें हें सारेंच चुकते आहे,... आपल्या आयुष्याच्या ध्येयाचा पायाच सारा डळमळत आहे ! .. असे वाटूं लागलें ! ..

: १६३ :

आणि म्हणूनच मी त्यानंतर जास्त जास्त अंतर्मुख होऊं लागलों. जसजसा विचार करूं लागलों, तसतसें मला वाटूं लागलें, मीं आतापर्यंत चुकतच आलों आहे. आयुष्यात .. उच्च वातावरणात जगूं इच्छिणाऱ्या मनाला संकटाचीच खरी मदत होत असते; आणि म्हणूनच,.. माझ्या तोंपर्यंतच्या साऱ्या धडपडींत आलेलीं अपयशें मला मोठ्या मोठ्यानें काहींतरी बजावूनच जणू सागत आहेत,. . असे मला वाटे !

जो विषय हातीं पडेल तोच आपल्या आवडीचा करून त्यांत प्राविण्य मिळविण्याची आपल्यात धमक पाहिजे हे खरें ! पंडितासारख्या आपल्या वेळच्या व्यक्तींची उदाहरणे समोरच आहेत. पण बाबा, .. त्याबरोबरच लहानशा या मानवी आयुष्यात असले अस्पष्ट प्रयोग...प्रयत्न करीत राहण्यापेक्षां, आपल्या खऱ्या आवडीं हातीं घेऊन त्यात मिळविलेल्या कर्तबगारीवरच, व्यक्तीनें सामाजिक आयुष्यहि कंठावे, हे जास्त बरें नव्हे कां ? .. मला तरी तसें वाटते ! ..

हो, . . . अशा विचारातूनच मानवी कर्तव्याविषयीं मी स्वतःला प्रश्न करूं लागे; आणि त्याला माझें मन उत्तर देई, " उठ, अरुण, .. अजून जागा हो. तुझ्याकडे जें चागले आहे, त्याच्याच विकासासाठीं प्रथम अटोकाट प्रयत्न कर ! हेच तुझें कर्तव्य...हेंच तुझ्या आयुष्यांतील सत्त्वाचे सत्याचे प्रयोग ! ... तेच तुझें आयुष्य...तीच तुझी समाजसेवा ! जगाला हालविणाऱ्या कल्पनाचा संग्रह कर... अवलोकन कर...मनन कर. तुझ्या भोंवतालच्या मानवात तुझ्या कलेच्या रूपानें त्या साऱ्यांचा प्रसार कर ! आणि मग तुझी कला, तूं म्हणशील तेवढेच बोलून थांबणार नाहीं. त्यांतूनही अनेक नवीन कल्पनांना जन्म देईल !"

आणि या मनोमय जाणीवेमुळे,..मग मला वाटे,.. या माझ्या लहानशा आयुष्यांत मला पुष्कळ करावयाचें आहे,.. मिळवावयाचें आहे. आपल्याा आवडीचा खरा तराजू ज्या बाजूस झुकेल तीच गोष्ट आपल्या आयुष्याचें मुख्य केंद्र करून त्यामागेंच आपलें सारें सामर्थ्य खर्चणें हेंच व्यक्तीचें खरें जगणें,.. व त्यामागे यशापयशाची क्षिति न बाळगता मनापासून लागल्याचें समाधान हेच त्याचे फळ!

बाबा, मला वाटते, लोकाना मूर्खपणाच्या वाटणाऱ्या या लहरी (इंपल्स),..अगदींच साधारण नसलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात असतात!.. असल्या लहरी कधीं कधीं व्यक्तीच्या नाशालाहि कारणीभूत होत असतील, पण तरीहि पुष्कळ वेळां त्यातून चागल्याचीच निष्पत्ति होते! चाकोरीचा आयुष्यक्रम सुलभ वाटला, किंवा आपल्या या अंतःस्फूर्त लहरी लोकांना मूर्खपणाच्या वाटल्या, तरी त्या जोपर्यंत क्षुद्रध्येयानें प्रेरित नाहींत, तोंपर्यंत परिस्थितीशीं झगडत त्याचा पाठलाग करणें हाच खरा पुरुषार्थ नव्हे कां ?..

: १६४ :

आणि असल्या विचारांनींच मला दिवसेंदिवस पटूं लागले, कीं, मीं सध्या आक्रमित असलेला मार्ग हा आयुष्याचा अपव्यय आहे. मला चाकाला धरून गरगरणाऱ्या चिखलाच्या गोळ्याचे आयुष्य नको होतें. तेथून निसटून, कोठें तरी कोणत्या तरी चागल्या वाटणाऱ्या दिशेने, अज्ञात ..अगम्य पोकळीत उडणाऱ्या एखाद्या रजःकणाचे जीवितहि मला मिळाल्यास पाहिजे होतें,..तसे त्या चाकोरीला सोडून उडावयाचे होतें! आणि म्हणूनच शेवटीं मीं मनाचा एक ठाम निश्चय केला व माझ्या ध्येयभूत मार्गास लागलो.

चित्रकला व गायन यात माझा बराच वेळ जाऊं लागला. पदव्या हीं साधनें खरींच, पण साध्ये मिळविण्यासाठीं ही साधनें थोडींतरी हातीं लागलीं पाहिजेत. म्हणूनच मला सुलभ वाटणारे विषय घेऊन मी बी. एस्सी. च्या टर्म्स भरूं लागलों!.. अशी माझीं गेलीं अडीच वर्षे गेलीं आहेत. गायनात माझी प्रगति झाली आहे; चित्रकलेंत मीं अनेक बक्षिसें मिळविलीं आहेत. पदवीच्या दृष्टीने जी. डी. आर्ट होऊन आतां मी शेवटच्या बी. एस्सी. च्या परीक्षेलाही महिन्यापूर्वीच बसलों आहे!..

या गोष्टी मी त्याच वेळेला आपणांस कळवल्या पाहिजे होत्या, हें अगदीं खरें आहे. पण मला आपला स्वभावहि ठाऊक आहे. आणि मला स्वास्थ्य पाहिजे होतें. इतके दिवस मीं आपली फसवणूक केली, त्याबद्दल मीं आपली खरोखरच क्षमा मागतों.

माझ्या मनात कधीं पोटाचा प्रश्न येत नाहीं असें नाहीं; पण...पोटोबाला विठोबा म्हणणाऱ्यांपैकीं मात्र मी नाहीं! कारण पोट व डोकें या दरम्यानचें

माझें हृदय मीं कधींच विसरूं शकणार नाहीं ! मला मनापासून वाटतें अन्नासाठीं जगण्यापेक्षा, जगण्यासाठीं अन्न चांगलें. त्यामुळें आयुष्याला उज्व-लता तरी येते ! . . . .

माझ्या ध्येयभूत कलाचा विकास व्हावयास, एखाद्या आश्रमाचे वातावरणच जरूर आहे असें मला आता मनापासून वाटतें. सुंदर निसर्गात व शात वातावरणात असल्या या आश्रमाची माडणी असावी. तेथील श्रेष्ठ व्यक्तीच्या सान्निध्यात व तीभोवतालच्या वातावरणात माझ्या गुणाचा खास विकास होईल !. .

म्हणूनच मी ठरविलें आहे तें असें; काहीं दिवसानीं बी. एस्सी. चा निकाल लागेल. त्यात मी बहुतेक पास होईन; पण यशस्वी झालो न झालो, तरी चित्रकलेच्या व गायनाच्या पुढील अभ्यासासाठीं मी रवीद्रनाथ टागोराच्या शातिनिकेतनाला जाणार आहे !. .

माझ्या आकाक्षा व भावना लक्षांत घेऊन आपण हें पत्र सहानुभूतीनें वाचाल ना? कळावें, लोभवृद्धि व्हावी. आपला नम्र—**अरुण.**

( २९ )

कल्याण, ता. १४ मे १९२९.

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद विशेष—

तुझें पत्र पोहोचलें. गेल्या पाच सहा दिवसात, मी आमच्या एका लहा-नशा घरगुती भानगडींत गुंतलो होतों. त्यामुळे तुला उत्तर लिहावयास वेळ झाला नाहीं. आणि त्या भानगडींत अरुण पडला होता,. . यामुळें तर सर्व काहीसें जास्तच गुंतागुंतीचें झालें होतें.

वास्तविक, अरुणची सारी धडपड चुकीची असे मला वाटत नाहीं. पण त्यामुळें, घरातल्या घरात एकमेकाविपयीं मनें कलुषित होतील अशी धास्ती वाटत होती, एवढेंच !. . . त्यात पुन्हा, अरुणला माझीच फूस आहे, असाही यशवंत-दादा वगैरेंचा मजवर प्रवाद येण्यासारखा होता;. . आणि तसा तो थोडासा आलाहि, शेवटीं !

आमच्या शंकरची तुला माहिती आहेच. आपला सर्वात लहानगा मुलगा म्हणून आईनें त्याचें लहानपणीं लाड केले व जवळ जवळ त्यामुळेंच त्याच्या शिक्षणाची आबाळ झाली. त्याला समजूं लागण्यापूर्वीच, नानाची माझी,. . वगैरे

साऱ्यांची साधारण बरी परिस्थिति घरांत लाभल्यामुळें तर तो स्वतःला खूपसे श्रीमंतहि गणून जगांत चालूं लागला!.. असल्या बडेगिरीच्या काहींशा उद्धट वृत्तीमुळें, ओघानेंच, त्याला पुढें येण्यास मिळूं शकणाऱ्या सर्व संध्या मात्र त्यानें लाथाडल्या. शिक्षणाची अशी इतिश्री झाल्यावरही तेंच! लहान नोकऱ्या करण्यात त्याला कमीपणा वाटे व मोठ्या नोकऱ्या करण्याची किंवा व्यापारांत पडण्याची धमक अगर कर्तबगारी त्याच्या अंगांत नव्हती.

आतां त्याच्याच दादरच्या घराच्या विक्रीचा प्रश्न निघाला होता. अर्थाअर्थी, तसा माझा त्यांत कांहींच संबंध नाहीं. पण मीं उगीचच मध्यें गोवलों गेलों होतों. यशवंतदादा वगैरे मंडळी, अरुणमुळें पर्यायानें मजवरही बरीच रागावली होती. पण शेवटीं निदान त्याच्या मनाप्रमाणें शंकरचें घर त्यांना विकत तरी घेतां आलें; आणि त्यामुळेच, त्याचीं तोंडें थोडीं फार बंद झालीं. नाहीं तर त्यानीं आकाशपाताळहि एक केलें असतें! अशी एकंदर स्थिति होती!

तुला आठवत असेलच, तुझ्या लग्नाच्या वेळींच शंकरचें लग्न झालें; तेव्हां त्याला त्या लग्नाबरोबर एक घबाडच मिळालें होतें. आणि तें म्हणजे थोड्या अधू व एका पायानें लंगड्या मुलीला पत्करल्यामुळें, त्याच्या विधवा सासूची संपत्ति! तें घर साधारण दहा बारा हजारांचें; शिवाय रोख चार हजार! सारें नीट संभाळलें असतें तर काहीं वाईट नव्हतें!.. पण त्याच्या मूर्खपणामुळे, त्या रोख रकमेची व बायकोच्या अंगावरील दागिन्याची आतापर्यंत चटणीच झाली! राहिले होतें, तें तेवढें दादरचें घर! त्यापासून मिळणाऱ्या तीस-पस्तीस रुपये भाड्यावर, व आमच्या एकत्र रहाणीच्या कुटुंबाच्या आसऱ्यानेच, त्याचा संसार गेलीं कित्येक वर्षें कसाबसा चालत आला होता. तथापि, तेवढ्यावरही स्वारी संतुष्ट राहिली नाहीं. आतां तर बायको मेल्यावर, त्याचा तोच पूर्ण करता सवरता! मग काय? स्वतःच्या चैनी व खर्च वगैरेसाटीं, त्यानें आपल्या दादरच्या घरावर, निरनिराळ्या वेळीं, दोघा मारवाड्याकडून, जवळ जवळ अडीच हजार रुपये काढले होते. नानांना किंवा मला कोणालाच यांतलें आतांपर्यंत काहीं ठाउक नव्हतें. अलीकडे त्या मारवाड्यांनीं त्याचेमागें सारखा लकडा लावला आणि शेवटीं आम्हालाहि कळविलें; तेव्हां कोटें तें आमच्या कानावर आलें!.. त्याला त्याच्या पैशाची व्यवस्था काहींच करतां येईना, तेव्हा शेवटीं नाइलाज म्हणून साहजिकच आपल्या घराची विक्री करण्याचे विचार त्याच्या मनांत सारखे येऊं लागले!

आणि येथेंच यशवंतदादा व विठोबाअण्णा या बापलेकांचा त्यांत संबंध आला!

: १६६ :

यशवंतदादा व विठोबाअण्णा दोघेहि असल्या संधीचीच वाट पहात होते,

मला वाटतें;. . कारण, खरी वस्तुस्थिति अशी, कीं, गेलीं सहा वर्षें किंवा अधिकच, दादांनीं त्या घराचा बराचसा भाग शंकरकडून भाड्यानें घेतला आहे. त्यांनीं आपल्या वडिलकीच्या वजनावर त्या एवढ्या मोठ्या जागेचें शंकरला आतांपर्यंत सारे बावीस रुपये भाडें देत आणलें होतें. तें घरच यशस्वी, ही यशोदा वहिनींची कल्पना झाल्यामुळें, शेवटीं तर गेल्या दोन तीन वर्षांपासूनच्या शंकरच्या खालावलेल्या परिस्थितींत, यशोदाकाकी त्याच्याकडे घर स्वतः विकत घेण्याच्याच गोष्टी बोलूं लागली होती !

तें बारा तेरा हजारांचें घर; पण शंकर नडलेला पाहून त्या मंडळींनीं तें दीड हजारापासून मागावयास सुरवात केली. एकदां तर मी त्या बाबतींत शंकरकडे मध्यस्थी करावी अशी त्या बापलेकांनीं इच्छा दर्शवली. पण मला तो उघड उघड एक प्रकारचा अन्यायच वाटला. व केवळ त्यांचें तोंड बंद करण्यासाठीं म्हणूनच मीं त्याना त्यावेळीं सांगितलें, ' शंकरनें वास्तविक घर विकूं नये, पण तो विकणारच असला, तर मींही त्याला सहा हजारांपर्यंत देऊं शकेन.

त्यामुळें त्यांच्या उत्साहात मध्येंच विरजण पडलें; तरी त्यानंतर गेल्या दोन-तीन वर्षांत, . . त्यांनीं मनाचा मोठा धीरच करून जणूं काय, त्या घराची किंमतच शंभर दोनशें रुपयानीं वाढवीत वाढवीत अडीच हजारापर्यंत आणली होती.

: १६७ :

इकडे शंकरच्या ढिल्या व्यवहारामुळें, त्याचें कर्ज, व्याज व त्याबरोबर मारवाड्याचा तगादा सारें वाढूं लागले होतें. त्यामुळें त्याचाही कल हळूं हळूं घर विकण्याकडे होऊं लागला होता. शेवटीं, शंकरला मारवाड्याकडून गेल्या महिन्यांत जोराचा तगादा लागला व नोटीसही आली ! ' तुझें घर आम्हीं विक्रीस काढूं . .' असें त्यानीं त्यास म्हणताच, तो बराच घाबरला. . .गडबडला; व कायदेशीर सल्ला विचारण्यासाठीं भीतभीतच त्यानें मजकडे धांव घेतली.

त्याला स्वतः पैशाची मदत करण्याची माझी मुळींच इच्छा नव्हती; मीं त्याला सरळ सांगितलें, कीं, ' मला यात दुसरे काहीं करता येणार नाहीं. . . तुझा मजवर विश्वास असेल तर घराला जास्तींत जास्त किंमत येण्याची खटपट फार तर मीं करतों! ..'

पण दादा व विठोबाआण्णांनीं तर त्याला मारवाड्याकडून होणाऱ्या अपमानाविषयींच धास्ती उत्पन्न केली. त्यालाही वाटलें, आपण शक्य तितक्या लवकर काय तो विचार करून मारवाड्यांचीं देणीं सव्याज फेडल्याशिवाय आपली धडगत नाहीं; आणि अशाच मनःस्थितींत, तो असतांना एके दिवशीं विठोबाआण्णानें त्याला आपल्या घरीं नेलें. तेथें प्रत्येकानें 'त्रयाणां धूर्तानां' याप्रमाणें याच्या मनावर परिणाम केला . . व शेवटीं आपण स्वतःच तें घर जास्तींत जास्त

•

सव्वातीन हजाराला घेऊन त्याला कर्जमुक्त करण्याची हमी घेतली.

शंकरची कर्जाची रक्कम व्याजासकट पावणेतीन हजार होत होती. तेव्हां त्यालाहि वाटूं लागले कीं, आपल्याला कर्ज फेडून टाकता येईलच, पण आणखी पाचशे रुपयेही वर रोख मिळूं शकतील. प्रथम 'हो ना' करून, शेवटी एके दिवशी शंकरने त्याना हो देखील म्हटलें. या संधीचा अर्थात् पटकन् फायदा घेऊन, त्या बापलेकानीं लागलीच आपला कागद लिहिणारा बोलाविला, घराचीं सनद शंकरकडून घेतली, व साटेंपत्रहि तयार करून ठेवले.

: १६८ :

शंकर त्याना हो म्हणून बसला, हें इकडे मला मुळीच ठाऊक नव्हतें. माझ्या सूचनेवरून माझ्या ओळखीचा एक दलाल मुंबईच्या तीन चार भाटियाना आणून घराला गिऱ्हाईक मिळविण्याची खटपट करीत होता!

पण, .. मला आता मागाहून दुसरेंच समजते आहे. कोणी घराची पहाणी करण्यासाठीं घरात फिरूं लागला की, आमची यशोदा वहिनी पुढे येऊन हळूच म्हणे, "घर विकत घेणार आहां, होय? आमचे काही म्हणणे नाही. घ्या बापडे! पण हें पाहिलेत का?.. त्या खोलीची भित कशी गडगडा हालते आहे. आणि हीं दारे .. त्या खिडक्या .. सर्व पाहून नंतरच विचार करा! .. आम्ही येथे राहातो म्हणजे काय? धोक्यातच! राहतो झालें कसे तरीं! .."

ह्या सगळ्या गोष्टींमुळे, त्या दलालाचीं गिऱ्हाइके काहीं पुन्हा त्याला त्या घराविषयी विचारावयास येत नसत. त्यामुळे चिडून, त्याने विठोबाअण्णाना शेवटीं त्याबद्दल एकदा विचारले. त्यावर दादा व वहिनींनीं, त्याचें चहा-कॉफीनें आदरातिथ्य करून, त्याला हळूंच सागितलें, "सव्वा तीन हजार किमत आम्हीं केलीच आहे. त्याच्यावर घराची किमत होणार नाहीं अशी खटपट कराल तर पहा! तुमचें कमिशन विसरणार नाहीं आम्ही!"

तोच परवा मला हें सारें सविस्तर सागत होता. आमची वहिनी म्हणे, त्याला त्यावेळीं म्हणाली; "असं पहा दलालसाहेब, राहिल्या आहेत कुठ आता घराच्या किमती? आम्हीं तरी काय किमत देणार या घराला, .. म्हणजे येवढेच, कीं .. इतके दिवस राहिलो या घरात, .. साहाजिकच लोभ लागलाय्! घर कसलं आहे ते तुम्हीं पहाताच. नुसत्या फुंकरीनेदेखील उडेल. पण करणार काय? अहो एकाद्या गोठ्यात नेहमीं म्हैस बांधली तर त्यांतून बाहेर काढतांना, ती सुद्धा काठ्या खायला तयार होते! आम्ही तरी काय, .. आमची शिकस्त करून चार दोन पैसे खर्चणार, इथं तिथं डागडुजी करणार आणि त्याला सावरणार आपलं कसं बस!.. परिस्थिति वाईट आली असली, तरी आमच्याच भाऊजींचे घर तें! दुसऱ्या कुणाकडे जावं हें आम्हांला तरी कसं रुचेल सागा बरं?"...

दलालाने ते सारे त्यावळीं शांतपणें ऐकून घेतलें; पण त्यानें तसेंच सरळ पुढें येऊन मला तें सारें सांगितलें. कारण, त्याला त्यापुढेंही धंदा करावयाचा होता!

: १६९ :

त्यांत दुसरी गोष्ट अशी! शंकरच्या सासऱ्याने जेव्हां तें घर घेतले होतें, त्यावेळींच, त्याच्या एका मित्राच्या मनात तें घर भरले होतें. पण त्यावेळीं, आपला मित्रच ते घेत आहे हें पाहून, त्यानें त्यात हात घातला नव्हता. आपला मित्रही मेला, त्याचीं मुलें माणसेही मेलीं! व तें घरच आता विकावयास निघाले आहे असें ऐकतांच, त्या म्हाताऱ्याने माझ्याकडे निरोप पाठविला, कीं, "ते घर बारा हजाराला घेतलें, त्यावेळीं साटेपत्राला मी हजर होतो; आता त्याची किमत थोडी कमी झाली, तरी जागा वगैरे सर्व लक्षात घेता, सात हजारांपर्यंत केव्हाही यावी. तितक्यापेक्षा जास्त कोणी देत असल्यास त्याला द्यावे; नाहीं तर आपली परवानगी असल्यास, रोख रुपये सात हजार देऊन, मीं स्वतः ते घर ठेवावयास तयार आहे, असें या पत्राने समजावें."

हे पत्र मिळताच व दलालाची हकीकत समजताच, मीं लागलींच शंकरला बोलावणे पाठविले. तो तर मुलखाचा भिडस्त व घाबरट! माझ्याकडे आला पण काहींच बोलेना; अतिशय घाबरल्यामुळें चाचरूच लागला. तेव्हा मला वाटले, कीं, आपण या आपापसातील भानगडीत याहून जास्त न पडलेलेंच बरें. शंकर काहींच ठाम न सांगता निघून गेला. तेव्हा मीही तटस्थच राहावयाचे ठरविले.

मला वाटतें, त्याच दिवशीं संध्याकाळीं, शंकर अरुणला मुंबईस रस्त्यात भेटला असावा; आणि अर्थात् अरुण आपल्या उतावळ्या स्वभावाप्रमाणें पटकन् दुसऱ्या दिवशीं त्याच्या मदतीस धांवला. नाना व मी दोघेही, दादांच्या सागण्यावरून दादरला गेलो होतों. तेथें अरुणनें साराच देखावा बदलून टाकला होता. मी जवळ जवळ तटस्थच राहिलो. पण शेवटीं यशवन्तदादानीं ते घर घेतलेंच ठरल्याप्रमाणे!

अरुण धैर्याने साऱ्याबरोबर भाडत होता. पण तो त्यात न पडता तर बरें होतें. त्या दिवशीच्या त्याच्या त्या धैर्याचा मात्र मला, क्षणभर अभिमान वाटल्यावाचून राहिला नाहीं.

असो. मला काटकसर व व्यवहार सारें कळतें. पण!...आपापसातीलहि हा असला क्षुद्र स्वार्थ पाहिला, म्हणजे मात्र माझ्या मनाला फार वाईट वाटतें. कळावें हें आशीर्वाद.

तुझा—

**बाबा ठाकूर**

मुंबई; १६ मे १९२९

प्रिय कमळावहिनी,

सहा सात दिवसांपूर्वीचें तुमचें लहानसें पत्र पोहोंचले. माझ्या हातीं घेतलेल्या एका मोठ्या थिएटरच्या कामामुळें मला पत्र लिहावयासच नव्हे, तर जेवावयासहि फुरसत मिळत नव्हती.

तुमचे ज्या दिवशीं दुसरे पत्र येऊन पडलें, त्याच दिवशीं, मी कामाला सुट्टी देऊन एक दिवस मजेंत घालविण्यासाठीं अरुणकडे मुंबईस रहावयास गेलों होतों.

चहासाठीं आम्ही एका इराण्याच्या हॉटेलात शिरत होतों; इतक्यांत तेथें त्याचा शंकरकाका रस्त्यांत भेटला. त्याच्या घराच्या विक्रीचें प्रकरण आतांपर्यंत कदाचित् तुमच्या कानावर आलें असेलच. आणि शंकरकाका त्यामुळें बराचसा चिंताग्रस्त दिसत होता. आमच्याबरोबरच तो हॉटेलात आला. व तेथें बसल्या बसल्या अगदीं गोंधळल्या नजरेनें यशवंतदादांना आपण घर विकत दिल्याची व जवळ जवळ साटेंपत्रहि तयार झाल्याची हकीकत त्यानें आम्हाला सांगितली.

सव्वातीन हजारांला त्यानें घराबद्दल यशवंतदादांना नाइलाजानें शब्द दिल्याचें ऐकतांच, अरुण आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणे बराच खवळला. आणि ते साहाजिकहि होते. सारी वडील मंडळी दांभिक सभ्यतेला बळी पडून बाजूस झालेली! आणि यशवंतदादा वगैरेंचा तर ते घर विकत घेण्याचा अगदीं निर्धार ठरलेला!...त्यामुळें शंकरकाकाला जणूं कोणींच त्राता उरला नव्हता!... आणि यामुळेंच तो अगदीं भांबावला होता!

मलाहि त्या प्रकाराबद्दल वाईट वाटत नव्हतें असें नाहीं; पण त्यांच्या त्या आपापसांतल्या भानगडींत आपण का पडा, म्हटले?...मला तें योग्य वाटेना. व ते मला शक्यहि नव्हते.

: १७१ :

अरुणनें मात्र क्षणभर गप्प बसून, शेवटीं एकदम मजकडे व शंकरकाकाकडें एकदां पहात म्हटले, "नाही. ... तें मुळींच शक्य नाहीं, शंकरकाका! ज्यांनीं तुमच्या घराची किंमत, बाजारातल्या भाजीप्रमाणें अगदीं हजार दीड हजारांपासून चढवत येथपर्यंत आणली, त्या यशवंतदादा, विठोबाअण्णा वगैरे मंडळींच्या पदरात तर तुमचें घर पडताच कामा नये!..."

अरुणच्या या उद्गारानीं शंकरकाका तर जास्तच गोंधळला. मीहि एकदम चमकून अरुणला प्रश्न केला, "मग तूं काय बाबा करणार आहेस आता त्यांत, सर्व काहीं ठरल्यावर?.. उगीच बडबड कशाला येथे त्याची आपल्याला?"

त्यानंतर अरुण थोडा वेळ विचार करीत स्तब्ध राहिला खरा; पण मग मज-कडे अगदीं करारी दृष्टीनें पहात, तो पुन्हां एकदम म्हणाला, " मी काय करणार होय?.. मी तें घर सहा हजाराला स्वतःच विकत घेणार!... समजलं?..."

या त्याच्या कल्पनेनें आम्हीं दोघेहि प्रथम एकदम दचकलो! अरुणच पुन्हां आम्हा दोघांना उद्देशून म्हणाला, " हे पहा, त्यात माझे हेतू दोन तीन आहेत! एक तर दादा वगैरे मंडळींना तें घर त्यांच्या अपेक्षेप्रमाणे असें स्वस्तांत मिळूं नये. दुसरे असें कीं, जर शंकरकाका घर विकतच आहेत, तर ते सुरवातीलाच योग्य किमत करणाऱ्या त्या उमद्या मनाच्या तिऱ्हाइत वृद्ध माणसाला तरी मिळावें!.. आतां, या दोन्ही गोष्टीहि हुकल्या, .. तर मग मात्र, .. घर स्वतःसाठीं ठेवावें लागेल आम्हाला!.. पण मग त्यांत शंकरकाकाचा त्या दृष्टीनेंहि फायदाच होईल!..'

: १७२ :

त्याच्या या उद्गारांनंतरहि एकंदर परिणामाविषयीं मी तर निराशच होतों!.! पण आश्चर्य हें कीं, सुरवातीस तरी अरुणची ती गोळी अचूक व योग्य दिशेनें गेली'

दुसऱ्या दिवशीं, विठोबाअण्णांचा कागद लिहिणारा मनुष्य, लिहून अर्धे-अधिक तयार झालेलें सार्टेपत्र घेऊन शंकरकाकांकडे आला; तेव्हा अरुणनें सागितल्याप्रमाणे मोठा धीर करून त्यानीं त्याच्याकडे निरोप दिला, कीं, ' विठोबा अण्णांना म्हणावें, माझा विचार कायम झालेला नाहीं, थोडे थांबा!..'

आणि या निरोपानें अर्थात् यशवंतदादांच्या घरात एकच खळबळ उडाली! विठोबाअण्णा एकदम घाईघाईनें शंकरकाकाकडे धांवत आले; व तेथें शेवटीं त्यांना व त्यांच्याकडून यशोदाकाकी वगैरे घरातील मंडळींना समजलें, कीं, ' शंकरकाकाचें घर, .. मध्येंच अरुण सहा हजारांला विकत घेत आहे!..'

एक दिवस त्यांच्या घरात हा एकच गोंधळ उडाला होता. आणि शेवटीं त्या मंडळींनीं ठरविलें, कीं, सगळ्यांना एके ठिकाणीं बोलावून या प्रश्नाचा निकाल लावावयाचा.

तिसऱ्या दिवशीं रात्रीं, अरुणच्या खोलीवर तो व मी गप्पा मारीत बसलों होतों; तोंच अरुणला बोलावणें घेऊन शंकरकाका तेथें आले व म्हणाले ' घरां-विषयीं विचार करावयाचा आहे; तेव्हा तुला लागलींच बोलावलें आहे, अरुण! उद्यां सकाळीं सगळे जमणार आहेत दादाच्या घरीं.'

पण तें ऐकूनहि, त्या रात्री, अरुण खोलीवरून काहीं हलला नाहीं. उलट, त्यानें, शंकरकाकानाच आपल्याकडे ठेवून घेतलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळी मात्र, आम्ही तिघेहि जरा उशीराच दादरला जाव-यास मुंबईहून निघालों. त्यावरून, सारी माणसें अरुणची वाट पहात असावींत हें त्याचें धोरण मी मनांत समजलों होतों. आणि जातांना गाडीत .. अरुण

शंकरकाकांना पढवीत होता,... " हें पहा शंकरकाका, तुमच्याच फायद्यासाठीं सगळ्या समोर मी क्षणभर तुम्हाला मूर्ख ठरविणार आहें!.. "

: १७३ :

आम्ही दादरला दादाकडे पोहोंचल्यावर घडलेली सारी हकीकत तर याहून जास्तच गमतीची आहे! पण ती तितकीच उद्वेगजनकहि आहे, वहिनी!

एका बैठकीवर नाना, .. त्याच्या शेजारीं दादा व बाबा, .. नंतर विठोबा-अण्णा व पाडोबा, असे सगळे बसले होते. वसंत टाईम्स उघडून खिडकींत उभा होता. मधून मधून आतल्या खिडकीच्या गजातून यशोदाकाकी बाहेर पहात होती!..

आम्ही तिघे वर चढत असताना पाहाताच, गड्यानें बैठकीपर्यंत वर्दी पोहोंचविली!..

" डॉक्टर लोकाचा हा वक्तशीरपणा वाटतं?.." अण्णा हंसत हंसत पुढें येऊन, आपल्या स्वभावाप्रमाणे काहीं विनोद करण्याचा प्रयत्न करून अरुणला म्हणाले.

' मी अॅपॉइंटमेंट दिली नव्हती तुम्हाला, अण्णा, तुमच्या अपेक्षेप्रमाणें वक्त-शीर यायला!..." अरुणहि थट्टेच्या स्वराचा अवलंब करून, पण बेफिकी-रीनेच उलट म्हणाला, " वाटेल त्यावेळी तुम्ही मला पकड वॉरंट पाठविलेत तरी ते मला लागलेंच, असें कसे धरून चालता बरे तुम्ही?"

मला त्याच्या त्या उत्तराची गंमत वाटली. पण मी आपलें तटस्थच रहावयाचें ठरवून वसंताजवळ जाऊन उभा राहिलो!..

" अरे अरुण, " दादा गंभीरपणे थोड्या वेळानें अरुणकडे पाहून त्याला म्हणाले, " आम्ही चागली तास दीडतास तुझी वाट पाहिली! नानाना आता अकराच्या आत कल्याणला परत जायचं आहे वाटतं!"

" अस का? अर्रर्र!" अरुण सर्वांकडे आळीपाळीनें पहात म्हणाला " का बरं? पण मुद्दाम माझ्यासाठीं खोळंबून राहाण्यासारखं एवढे आज काम तरी कसलं आहे?"..

नाना सिगारेट ओढीत एका बाजूस लवंडले होते. गोदडीवर हात पाय हालवीत पडलेल्या अण्णांच्या नव्या धाकट्या मुलाला, टिचक्या वाजवून बाबा-साहेब खेळवीत होते. शंकरकाका अग चोरून पाडोबा पलीकडे बसला होता. वसंत अगदी दूरच्या खिडकींत मुग्धपणें उभा राहून सारखा टाइम्स चाळण्याचा चाळा करीत होता.

: १७४ :

ही असली शांतता पाहून मात्र, अरुण सर्वांकडे आळीपाळीनें पहात शेवटीं

म्हणाला, "असं स्वस्थ बसून तुम्हा सर्वांना मला काय विचारावयाचं आहे तें कसं कळणार ?"...

"त्याचं असं अरुण," नानाच शेवटी गंभीर चेहरा करून, हातातील सिगारेट झाडीत म्हणाले, "ह्या सर्वांच्या म्हणण्यावरून पाहिलं, तर शंकरचें हें घर तूं विकत घ्यायला तयार झाला आहेस म्हणे !"

अरुण बेडरपणें हंसून एकदम म्हणाला, "हो, ..खरी आहे गोष्ट ती!"...

त्याच्या या वृत्तीनें सगळेच एकदम दचकले !..

"पण असं पहा अरुण, . . ." त्याला गोंजारल्यासारख्या शब्दांनीं थोड्या वेळानें दादा म्हणाले, "एवढं मोठं नव घर बाधलंच आहे तुझ्या बाबांनीं ! हें आणखी रे कशाला तुम्हाला पाहिजे ?"

"त्याचं असं आहे दादा," अरुणहि मुद्दामच त्या सर्वांना खिजविण्यासाठीं म्हणाला, "आमच्या घरात आम्ही काहीं सख्खे भाऊ नव्हत! कोणी सागावे ,..आम्हीं पुढे मागे गुण्यागोविंदाने राहूंच असं ! आणि तसं काहीं . . घडूं नये तें..वाईट घडलंच समजा, तर आमच्या शरद्‌ला तें नवे घर घेता येईल !... मी आपला या जुन्या घरातच संतुष्ट आहे . . . असेच म्हणाना थोडा वेळ !"

आडपडदा न ठेवता स्पष्ट शब्दात माडलेल्या या अरुणच्या कल्पनेचा, अपेक्षेप्रमाणें सर्वांनाच राग आला व त्यामुळे सगळेच एकदम म्हणाले, "काय हे अरुण !?.."

पण नंतर सगळेच थोडा वेळ गप्प राहिले. तथापि, ती शातता मोडून, यशवंतदादांनीं मग पुन्हा धूर्तपणें सुरवात केली, "पण अरुण, हे सहा हजार रुपये आणणार आहेस तरी कोठून रे तूं ?"

"का बरं ? कोठूनहि आणीन मी!" अरुणनेहि तितक्याच बेफिकीरपणें अधवट उत्तर दिलें, "पण हा शंकरकाकांचा व माझा प्रश्न आहे, मला वाटतं !"...

"बहुतेक त्याला देऊं शकेन एखाद्या व्यवहाराला लहानशी रक्कम, असं मी मागे कधीतरी त्याला म्हणालो होतो खरं !"... बाबा विठोबाअण्णाच्या त्या लहानग्या मुलाला गादीवर ठेवीत, सर्वांकडे पाहून त्यावर एकदम म्हणाले; आणि मग अरुणकडे वळून त्याला हळूंच पुढें म्हणाले, "पण यावेळीं तसली मदत माझ्याकडून मिळेलच तुला असें समजू नकोस अरुण ! पैसा चटकन् एके ठिकाणीं गोळा करणे . . . वाटतें तितकें सोपे नसते, बाळ !"

बाबांच्या त्या शब्दांनीं अरुणच्या चेहऱ्यावर क्षणभरच रागाची छटा आली व गेली. आणि तें साहजिकहि होतें. पण मग पुन्हां तो कसाबसा शात बसला.

थोडा वेळ पुन्हा कोणीच कांहीं बोललें नाहीं.. दादाना तर त्यावेळीं वाटलें असेल, 'चला आता आपल्या सौद्यांतील एक शत्रू तर पुरा गारद झाला !

पण त्यांना काय माहीत, कीं, अरुण तेथें आज सात्विक भांडण उपस्थित करून खंबीरपणें लढावयासच आला आहे तें!...

"मग आतां सार्टेपत्रावर सही व्हायला इरकत नाहीं तर ? . ." दादा शेवटीं वडीलकीच्या दृष्टीनें अरुणकडे पाहून मोका साधीत म्हणाले. आणि त्या शब्दांची सूचना घेऊन विठोबाअण्णा उठले व किल्यांचा घोस घेऊन आपल्या आरशाच्या मोठ्या कपाटाकडे वळले.

" नका अण्णा, सार्टेपत्र आणण्याच्या भानगडींत पडूं नका. " ते कशासाठीं उठले आहेत तें धूर्तपणे ओळखून, अरुण पटकन् त्यांनाच उद्देशून म्हणाला " तुमच्या सव्वातीन हजाराच्या सार्टेपत्राचा इथं काय उपयोग बरं? मी शंकरकाकाला सहा हजार रुपये द्यावयास अजूनहि तयार आहे!.."

: १७५ :

पुन्हा दादा एकदम बिचकले. विठोबाअण्णा अरुणकडे रागाने पाहूं लागले. नानानीं सिगारेटचे दोनतीन झुरके एकदम घेतले. आपल्या मुलानें मध्येंच ही पाटिलकी कशाला चालविली आहे, या त्रस्त दृष्टीनें बाबा अरुणकडे पाहूं लागले! आणि शंकरकाका एका कोपऱ्यांतून दुसऱ्या कोपऱ्यात जाऊन चुळबुळ करीत उभे राहिले.

पण, अरुण सर्वांकडे आळीपाळीनें सात्विक संतापानेंच पहात होता... सर्वांची ती भीतिग्रस्त . . दांभिक . . स्तब्धता पाहून मला काय करावें ते समजेना!

शेवटीं विठोबाअण्णाच पुन्हा थोड्या तीव्र शब्दात बोलूं लागले, " हे पहा अरुण, हा पैशाचा प्रश्न आहे! . . यांत तुला काय कळणार बरं? सहा हजार रुपये नुसते तोंडानें तूं म्हणालास म्हणून होतं आहे का सारं? आता तूंच पहा! शंकरकाकाच्या मागें मारवाड्याचा सारखा तगादा सुरू आहे. तेव्हा त्याच्या पैशाची व्यवस्था शक्य तितक्या लौकर झालीच पाहिजे. म्हणून तर ही आमची सारी घाई!"

त्याच्या या शब्दानीं मात्र अरुण अतिशयच चिडला. त्याचा गौर चेहरा रागाने अगदी लालभडक झाला होता. शेवटी सारे असह्य होऊन तो रागारागानें अस्पष्ट शब्दातच म्हणाला, " शंकरकाकाच्या हिताची आपली दृष्टी मी जाणतो,. अण्णा! आपण, दादा,.. त्याच्यावर फारच मोठे उपकार करीत आहा या घराच्या सौद्यात! . . . मी एक भराऱ्या मारणारा चित्रकार आहे. . असें तुमचें मत असेल! होय ना?... आणि तें बरेंचसें खरेंही आहे. तरी पण निरनिराळ्या रंगांशीं तरी माझा संबंध खात्रीने येतो! तेवढें तरी कबूल कराल कीं नाहीं? तेव्हा, तुमच्यासारख्या माझ्या भोंवतालच्या मंडळींच्या असल्या व्यवहारांतील काळेपणा चटकन् ओळखण्याइतकी तरी माझी बुद्धि देवानें तीव्र केली आहे!"

वहिनी, अरुणच्या या समर्पक उत्तरानें तर सारींच दचकलीं! .. त्याच्या

धाडसाचें मला फार कौतुक वाटलें ! . . भोंवतालीं प्रक्षुब्ध वातावरण झालें होतें खरें; पण, त्याच्या एकंदर सात्विक रागीट चेहऱ्याकडे पाहून कोणालाच एकदम बोलण्याचें धैर्य होईना ! . . अरुण एकटाच होता त्या मंडळींत ! पण प्रत्येकाला प्रत्येकाचें मन . . या नाहीं त्या कारणामुळें सारखें आतल्या आंत खात होते !

" सहा हजार रुपये मी नुसते तोंडानें म्हणतों नाहीं का, . . अण्णा ? " अरुण जागेवरून उठला व अगदीं रागाच्या आवेशानेंच दादांना उद्देशून पुढें बोलूं लागला, " खरंच ते !...तुम्ही सव्वातीन हजारांच घाईघाईनें तयार केलेले साटेंपत्र व काळया शाईनें भरलेला टांकहि हातात तयार करून घेऊन, शंकरकाकाच्या सहीची वाट पहात उभे असाल. पण हा प्रश्न तुमचा व शंकरकाकाचा जितका आहे,..तितकाच माझा व शंकरकाकाचाहि आहे,..असें नाहीं तुम्हाला वाटत ? मी सहा हजार रुपये आज मोजीन त्याला नाहीं तर केव्हाहि मोजीन. तो प्रश्न त्याला किंवा मला विचारण्याचा तुम्हाला काय हो अधिकार ? "

बाळबोध वळणाच्या ठाकूर मंडळींना पटणार नाहीं,...पचणार नाहीं, . . असें कांहींसें अरुणने केलें होतें. बोलतां बोलता, त्यानें लहानतोंडी मोठा घांस घेऊन वडील मंडळींचा अधिकारहि एकदम बाहेर काढला होता ! . . त्यामुळें सर्वच रागानें त्याच्याकडे पहात होतीं.

पण, तितक्यात दादा त्याच्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहात, पुन्हा नवें अवसान आणून म्हणाले, " अरे,.. पण, शंकरनें आम्हाला शब्द दिला आहे, हे विसरतोस तू अरुण ! "

" हो, शंकरकाकानीं तुम्हाला शब्द दिला आहे ! . . " अरुणहि त्याना पुन्हां तितक्याच रागानें म्हणाला, " पण, त्यानीं मलाहि शब्द दिला आहे ! . . त्याची वाट काय ? . . आणि या दुसऱ्या शब्दात त्याचा फायदा होत असेल, तर, . . विशेषतः, आपापसामध्ये तरी त्यानी आपला पहिला शब्द मोडल्यास त्याला काहीं हरकत नसावी तुमची ! त्याच्या हिताला जागणारी मंडळी तुम्हीं ! . . म्हणून म्हणतो मी ! पण कदाचित् . . तुमच्या पदरात स्वस्तात पडणाऱ्या घराच्या मोहानें या गोष्टी तुम्हाला दिसतहि नसतील !.. कोणी सागावें ? तर मग, नाना, बाबा याच्यासारखी मोठमोठीं व्यवहार जाणणारी, तुम्हींच बोलावलेली इतर वडील मंडळीहि येथें बसली, आहेत कीं ! . . त्याना विचाराना खरा सल्ला ! " ...

: १७६ :

असा हा कसोटीचा सर्वसाधारण प्रश्न टाकलेला पाहतांच तर, इतराबरोबर बाबा व नाना दोघेहि एकदम दचकले !

बाबांना हा प्रश्न शक्य तो साफ टाळावयाचा होता. नानाहि स्वतःला धूर्तपणें सावरून घेत होते ! पण आतां, सरळ त्याच्या न्यायी व्यवहारज्ञानाबद्दलचा

सवालच समोर पडला ;. . तेव्हा त्यांचा नाइलाज झाला. दोघेही बसल्याजागींच मुग्धपणें चळवळ करूं लागले.

"अरे अरुण, मला वाटतें, तूं या व्यवहारांत उगीच पडला नसतास तर बरें झाले असते! . तुला तुझें घर काय कमी आहे का?" बाबा शांतपणेच पण अरुणला समजावणीच्या स्वरानें म्हणाले; . पण परिस्थितीवर आपला खरा अभिप्राय व्यक्त करणे मात्र त्यांच्या जिवावरच येत होतें, हें त्यांच्या चेहऱ्यावरून व टाळाटाळीच्या शब्दावरून अगदी स्पष्ट दिसत होते.

"आणि तू एवढा दादा, अण्णा वगैरे मंडळीवर रागावतोस तरी का, अरुण? नानानी एक सिगारेट कोपऱ्यांत फेंकून, डबीतून दुसरी बाहेर काढली व हळूंच बोलावयास सुरवात केली.

"नाना, तुम्हीहि बाबासारखेच या बाबतींत मौन स्वीकारून मला नाहीं तेच प्रश्न विचारता आहा! पण ते असो. ती कल्पना, मी येथे येताना केलीच होती!" ...अरुण काहींसा चिडून, पुन्हा धीराने म्हणाला, "मी या मंडळीवर का रागावतो म्हणून मला विचारता नाही का, नाना, तुम्ही? कोणता चागला मनुष्य चिडणार नाहीं, सागा बर? या घराची दीड हजारापासून . . किमत चढवीत जाणारी हीच मंडळी! येणाऱ्या गिऱ्हाइकाना, 'फुंकर घालताच उडणाऱ्या' या घराची माहिती करून देणारी . . हीच मंडळी! दलालाला सव्वातीन हजारालाच सौदा पटविल्यास भरपूर दलाली देण्याचा मोह घालणारी . . हीच मंडळी! . . हो, सात हजाराची बाहेरून मागणी आलेली आह, हेहि याना ठाऊक आहे . . आणि तरी, आता घाईघाईने त्याच 'फुंकरीने उडणाऱ्या' घरा चे साटेपत्र तयार करवून, त्यावर शंकरकाकाची सही मिळविण्याची खटपट करणारीहि . . हीच मंडळी! . . नाना, . . बाबा, . . हें सर्व आम्हाला ठाऊक आहे, . . तितकेच तुम्हालाहि ठाऊक आहे! आता फरक एवढाच कीं, आम्ही अलीकडची नवी मंडळी, . . आणि तुम्ही जुने! मी हे उघड बोलून दाखविलो व या अन्यायाला उघड विरोध करतों! . . तुम्ही त्यावर मुग्ध राहून उलट मलाच धरसोडीचे प्रश्न विचारता? नाना, प्रश्न विचारीत राहाणें, . . आणि ते सुद्धा दांभिकपणाचे, . . हेच जुन्या पिढीचें वैशिष्ट्य म्हणायचे का?" ...

अरुण त्वेषाने बोलतां बोलतां, श्वास घेण्यासाठी एकदम थाबला. त्याला शब्दच आठवेनात. या त्याच्या उग्र वृत्तीमुळे, नाना व बाबा देखील दबकून सर्वांकडे पाहूं लागले.

: १७७ :

इतक्यात गोंधळून आळीपाळीने सर्वांकडे पहात कोपऱ्यात उभा असलेला शंकरकाका व यशवंतदादा यांच्या प्रश्नोत्तरामुळे पुन्हा शांतता मोडली!

"तुम्हाला माझें घर विकत देतों, व सव्वातीन हजारात सर्व बाकी होईल", असें तूं मला वचन दिलेस कीं नाहीं, शंकर?"

"हो."

"त्यानंतर अरुण प्रवासाहून परत आल्यावर भेटेपर्यंत, तूं मला किंवा विठोबाला नाहीं म्हणाला नाहींस, .. हें खरें ना?"

"हो."

शंकरकाका या सर्व प्रकारानें अगदीं त्रस्त झालेले दिसत होते. शेवटीं, त्याच्याकडील दृष्टि अरुणकडे वळवून यशवंतदादा थोड्या रागानेच पुढे म्हणाले, "तुम्ही मूर्खासारखी बडबड तेवढी कराल! यातच तुम्हा अलीकडच्या पोरांना मोठेपणा वाटतो; .. पण तू असं पहात नाहींस, अरुण, .. शंकरचा मला शब्द गेला आहे! त्याप्रमाणे मी साटेपत्रहि तयार करविले आहे! .. आता त्याला आपला शब्द कसा मोडता येईल?"

"पण दादा, शंकरकाकानीं तुम्हाला सव्वातीन हजाराला शब्द दिला आहे. मला तर त्यानी सहा हजाराला शब्द दिला आहे. तेव्हा आपापसातहि दोघाना अविचारी वचन देणाऱ्या माणसाबरोबर व्यवहारच करूं नका, .. फार तर !... तो त्याचा मूर्खपणा आहे असे आपण समजून दोघेहि स्वस्थ राहूया! आपल्या दोघापैकीं एकाचा जरी शब्द त्यानी पाळला, .. तरी दुसऱ्याचा मोडल्यासारखा होईल, नाहीं का? तर मग सात हजार रुपये देणाऱ्या त्या बाहेरच्या तिसऱ्या माणसाबरोबर तरी त्याना व्यवहार करूं द्या की?—पण मध्येच त्याच्यावर असा हा एक प्रकारचा जुलूम का करता?... आता घाईघाईने साटेपत्र करून घेतल्यामुळें, तुम्हाला कागदाचा व कागद लिहिणाऱ्याचा काही खर्च झाला असेल; .. तर ती काय, पंधरा वीसरुपयाची रक्कम होईल ती शंकरकाका सोसतील! ते नसले, सोशीत तर मी घेतों ती जबाबदारी! .. मग तर झाले की नाहीं? .."

अरुणचे स्पष्ट युक्तिवादाचे ते बोलणे सगळ्यानाच पटत होते. पण दादा व विठोबाअण्णा अजूनहि या गोष्टीस कबूल नव्हते. यशोदाकाकी तर आतापर्यंत देवाजवळून खिडकीकडे व खिडकीकडून देवाकडे दहापाच फेऱ्या करूनहि गेली होती! तिनें बहुतेक तिच्या प्रसिद्ध पद्धतीप्रमाणे एक आण्याचा खडीसाखरेचा देवाला नवससुद्धा केला असावा आणि अरुणच्या आचरटपणावर तिची कितीक वाक्पुष्पें; .. पडलीं असावीत, तोपर्यंत मधूनमधून!—

: १७८ :

शेवटीं नानांना काय वाटले कोणास ठाऊक. ते सिगारेट बाहेर फेकण्यासाठीं उठले.. नाक शिकरून व तोंडातला पानाचा चोथा टाकून धोतराने तोंड पुसत पुसत ते अरुणजवळ आले. व त्याला अगदीं सौम्यपणें तडजोडीच्या शब्दांत

म्हणाले, " अरुण, तूं म्हणतोस तें कदाचित् खरेंहि असेल! पण माणसाचा शब्द म्हणून कांहींतरी आहेच कीं! आपल्या ठाकूर घराण्यांत, . . आपल्या शब्दासाठीं आपण वाटेल तें करावयास तयार असतों! . . हें माहीत आहेना तुला! शंकरनें दादांना घर द्यावयाचें ठरविलें म्हणजे ठरविलें! ! . . आतां किंमतींत कमी जास्त करायचा प्रश्न असला तर तो आपण पाहूं या! काय? तुझं काय म्हणणं, अरुण? "

"हें पहा नाना! . . " त्यांच्या या अजूनहि उघडउघड दिसणाऱ्या दांभिकवृत्तीचा मनस्वी संताप आल्यामुळें, अरुण चिडून म्हणाला, . . " शंकरकाकांवर असले उपकार करण्याच्या भानगडींत तुम्ही कोणीच पडूं नका. आणि आपल्या घराण्यातील आपण म्हणतां त्या शब्दासाठीं आपण काय करूं अन् काय करणार नाहीं या विषयींहि मला फारसें ऐकायचें नाहीं, आज! प्रश्न चालला आहे शंकरकाकांच्या घराच्या विक्रीचा! . . दुसरें असें, . . मीच घराचा मालक, अशाच तऱ्हेनें तुम्ही सारी मंडळी मजकडे आज कां वागतां हा? शंकरकाका तुमच्याजवळच आहेत! त्यांना तें सारे विचारा.. जे योग्य वाटेल तें तुम्ही पसंत करा! . आणि समजा,.. होणारा व्यवहार मला जरी पसंत नसला तरी मी काय करणार आहे? तुमच्या सर्वांच्या म्हणण्याप्रमाणें भराऱ्या मारणारा चित्रकारच बोलून चालून मी! फार फार तर आणखी चार निरुपयोगी शब्द वापरीन! . . एकादे बिनपैशाचें चित्र काढीन! . . एवढेंच! त्याला घाबरणार आहे थोडंच कोणी? दुसरे मला काय विशेष करतां येणार आहे? ? . . मला एवढ्यासाठीं बोलावून आणण्याचें हें नाटक तरी कशाला पाहिजे होतें उगीच? . . आणि वास्तविक, तुम्ही मला बोलावलं म्हणूनच तर मी इथं आलों! आल्यावर विचारलंत म्हणूनच तर मला वाटतं तें सांगितलं! आतां तुम्हाला जें ठरवायचं असेल तें ठरवा व मला आपल जायला मोकळं करा कसं .. "

शंकरकाका अजूनहि तसेच त्या कोपऱ्यात अंग चोरून उभे होते. आता अरुणची सारी भिस्त अर्थात् त्याच्यावरच होती! . .

वसंत मजकडे टाईम्समधून आपली हंसरी पण खिन्न दृष्टि लावून पहात होता. पाडोबाना शेवटीं कटाळा आला म्हणून ते घरात निघून गेले.

इतक्यात बाबा जागेवरून उठले व त्यांनीं अरुणला ग्यॅलरींत बोलाविलें. मी तेथें जवळच उभा होतो. त्यांनीं अरुणच्या खांद्यावर हात ठेवून हळूंच म्हटलें, " अरे अरुण, शंकरचे नुकसान होत आहे हे आम्हालाहि दिसत नाहीं आहे का? पण तूं त्यात उगीच पडतो आहेस. हा त्याचा त्याचा प्रश्न आहे. आपल्याला कशाला त्या नसत्या उठाठेवी ?.. शिवाय असें पहा. आपल्या नव्या घरातच जास्त खर्च होत गेला आहे. आता तूं चटकन् म्हणालास तर सहा हजार रुपये एकदम काढून द्यायला तितकी सुटी रकम तरी आपल्याकडे आहे कोठें ?... "

अरुणनें किंचित् रागीट चेहऱ्यानेंच नुसती मान हलविली; व तो त्यावर कांहींच न बोलतां पुन्हां खुर्चीवर येऊन बसला.

: १७९ :

शेवटीं, थोडा वेळ वाट पाहून नानांनीं शंकरकाकालाच निर्णयाचा प्रश्न केला, "काय शंकर ! तुझं काय ठरतं मग ! कोणाला घर देणार तूं तुझं !..."

"आम्हांला त्यानें शब्दच दिला आहे." विठोबाआण्णा तेवढ्यांतच आपलें घोडें पुढें दामटवून, शंकरकाकांकडे पहात म्हणाले.

पण शंकरकाका कांहींच बोलले नाहींत.

तेव्हां नाना पुन्हा म्हणाले, दादांनीं तुझी रक्कम थोडी वाढवावी असें पाहिजे तर मी सुचवितों ... तुम्हाला पांच हजार रुपये द्यायला हरकत नाहीं मला वाटतें, दादा! तुम्हाला कसं वाटतं, बाबा?"

बाबा कांहींच बोलले नाहींत!...

पण दादा एकदम म्हणाले, "असं कसं म्हणतां नाना! ठरलेल्या शब्दाला कांहीं किंमतच नाही कां?.. ही रक्कम आतां वाढवायची कां म्हणून?...काय अरविंद?"

त्यांनीं मजकडे प्रश्नार्थक दृष्टि वळवली; पण मीहि कांहींच बोललों नाहीं!..

पुढें कोण काय बोलतो तेंच मला आतां पहावयाचें होतें!!...

"नाहीं दादा, नानाचें थोडें ऐकूं आपण!.. अन् शंकरकाकाच्या परिस्थिती कडेहि थोडं पाहिलं पाहिजे!" विठोबाअण्णा आपल्या मुलाला वर उचलून घेत, तडजोडीच्या स्वरानें म्हणाले, "दोघांचंहि नको. आपण चार हजार रुपये करून टाकूं या! साडेसातशें रुपये जास्त खरे;.. पण मी दोन तीन दिवसात करीन व्यवस्था त्यांची! मग काय शंकरकाका?.. ठरलं ना हें सर्व?".

शंकरकाका तर त्याच्या भोंवतालच्या या साऱ्या कावाकावीनें अगदीं गोंधळून गेले होते. नाना, दादा सगळीच मोठीं माणसे सभोंवार असल्यामुळें व शेवटी विठोबाअण्णा निर्णयाचाच प्रश्न विचारूं लागल्यामुळें, आपल्या संकटांनींच त्रस्त झालेल्या त्या गागरलेल्या माणसाने एकदम म्हटलें, "मला त्यात विशेष कांहीं कळत नाहीं. मी दादाना प्रथम 'हो' म्हणालों होतों खरं,.. सव्वातीन हजाराला! तेव्हा मी तुम्हीं सारीं म्हणाल.. त्याप्रमाणे साटेपत्रावर सही करायला तयार आहे. मात्र मला दोन चार दिवसांत मारवाड्याच्या ऋणातून मोकळें होतां येईल असें करा, म्हणजे झालें!.."

: १८० :

शंकरकाकांच्या या शब्दांनीं मी चमकून अरुणकडे पाहिलें. तो तर अगदी सर्दच झाला होता!.. आपली आतांपर्यंतची सारी खटपट व्यर्थ गेली अशा अर्थानें

खालीं मान घालून त्यानें एक दीर्घ निश्वास टाकला;.. व शेवटीं जागचा उठून रंजीस मनाने तो ग्यालरींत येरझारा घालूं लागला.

नाना स्वस्थ बसले होते. बाबांनाही थोडे वाईट वाटल्याचें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें.⋯पण ते कोणी कांहींच बोलले नाहींत.

"ठीक तर शंकर..!" दादा सर्वांकडे पाहून म्हणाले, " आतां विठोबा चार हजार बोलून गेलाच आहे,.. तर ते कायम करूं या! आज संध्याकाळीं तूं मारवाड्याना इथं बोलावलं आहेस. त्याना त्यांची रक्कम देऊन टाकूं. आणि राहिलेली आठवड्यांत तुला पोहोचेल असे करूं. साक्षीला बाबा व नाना, आहेतच इथं! बरं, का विठोबा ?.. काय सही करायला सांगायची ना याला ? "..

नानांनी मानेनेच 'हो' म्हटले. बाकी सगळे गप्पच बसले होते. शेवटीं दादाच्या कागद लिहिणाऱ्याने थोड्याच वेळात फेरफार करून साटेपत्र लिहून आणलें. शंकरकाकानीं त्याच्यावर सही केली. व साक्षीसह्याहि झाल्या.

शंकरकाकाच्या कबूली सहीपर्यंत, अरुणच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडला नव्हता;.. तो आत येऊन आपले सॅण्डल्स बांधीत म्हणाला, ' बरं जातों मी!'

बाबाहि रुमाल बांधून उठले!

इतक्यात विठोबाअण्णा म्हणाले, " थांबाना,.. चहा ठेवला आहे आईनें,.. तो घेऊनच जा सगळी!..."

: १८१ :

चहाची वाट पहात सगळेच शांत बसले होते!..

इतक्यात विठोबाअण्णा पुन्हा अरुणकडे जाऊन सौम्य शब्दात म्हणाले, " अरे, रागावूं नकोस बाबा तूं अरुण असा आमच्यावर!..."

" छे छे... मी तुमच्यावर कशाला रागावणार ?" अरुण बळेच हंसू तोंडावर आणून म्हणाला,.. " शंकरकाकाचा व तुमचा व्यवहार! त्याचे घर... तुम्हीं घेतलेंत! यात माझा रागावण्याचा काय संबंध ?.. "

" आता तरी पसंत पडलेंना तुला सारें ?" यशवंतदादानीं समजाविण्याच्या स्वरांत त्याला पुन्हा प्रश्न केला.

" पुन्हा तुम्ही मला माझे मत विचारून उगीच कटु प्रसंग ओढून आणूं लागलात,.. दादा!" अरुणने सॅडलचे बंद पुन्हा सोडले व ते कोपऱ्यात काढून ठेवून, खुर्चीवर बसत तो एकदम उसळून म्हणाला, " मला पसंत काय पडायच म्हणता ?.. तुम्ही शंकरकाकाचें घर हातोहात चार हजारांत हस्तगत केलेंत हे ?... कीं, उपकार म्हणून साडेसातशें रुपये वाढविण्याइतकी त्यांच्या परिस्थितीची कीव तुम्हाला आली हे!... मला विनाकारण निरर्थक प्रश्न विचारून त्रास तरी देऊं नका ? तुमचेंच मन तुम्हाला खातं आहे, एकंदरींत!... मी तर हें

सारं या क्षणापासून विसरून, सर्वांबरोबर पूर्वीसारखा वागावयास तयार आहे स्वार्थामुळे मनुष्याला साध्यासुध्या गोष्टीहि दिसत नाहींत, अण्णा ! पण असले प्रश्न तुम्हीच विचारलेत म्हणजे मला उत्तरें द्यावीतसं वाटतं ! साडेसातशें रुपये वाढविले यात तुमचें नुकसान काय झालं ?.. नाहीं तरी दलालाला अडीचतीनशें रुपये मध्यस्थी देणार होतांच तुम्ही,.. त्यात चारपाचशे रुपये अलीकडे पलीकडे ! आणि सगळे पैसे आज तुम्ही शंकरकाकाच्या हातीं देणार नाहींतच आहा ! तेव्हा अण्णाच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे राहिलेली रक्कम शंकरकाकाच्या हातीं केव्हा जाईल कोणास ठाऊक! एकूण आज काय ? तुम्ही शंकरकाकाना कर्जमुक्त केलंत आणि मारवाड्याच्या कचाट्यातून सोडविलंत ! खरोखर मोठे पुण्यवान् तुम्ही, आण्णा ?...पण पुण्य करणाऱ्याला स्वर्गाची अपेक्षा व प्राप्ति असते, तसे तुम्हाला शंकरकाकाचं हे बारा चौदा हजाराचें घर मिळालंच की चार हजाराला !... आता मला काय कार पसंत पडले ते आणखी जास्त सविस्तर काय सांगूं ,... सांगा ?"

अरुण थोडा वेळ गप्प बसला व मग पुन्हां पुढें म्हणाला, " खरं सारं आण्णा हे सर्व आपण विसरून जाऊं या ! एवढ्या लहानसहान गोष्टींनी रागावण्या इतका आपला संबंध वरवरचा नाहीं... रक्त पाण्याहून दाट असतें म्हणतात आपण नाहीं म्हटलें तरी सख्खे चुलतभाऊ ! "

: १८२ :

अरुणच्या या उत्तराने आणखी शांतता पसरली !.. सर्वांनीं मुक्यामुक्यानेच पाडे बांनीं बाहेर आणलेले चहाफराळाचें संपविले !.. आणि रिकाम्या कपाचे आवाज तेवढे ऐकूं आले !..

ऑफिसमध्यें दोन तीन दिवस न गेल्यामुळ तिकडे जाण्याची मला घाई होती मी लागलीच साऱ्याचा निरोप घेऊन बाहेर पडलो.

.. खरंच वहिनी, .. अरुण आपल्या या सात्विक डावात, अयशस्वी झाला तो शंकरकाकाच्या दुबळेपणामुळे ! .. पण तो माझा मित्र आहे या जाणीवेने मला केवढा अभिमान वाटला, त्या दिवशीं .. ह्या साऱ्या दांभिक वातावरणात वडील मंडळींशीं असें निधड्या छातीने .. सनदशीरपणे लढणे .. ही त्याची कल्पना जितकी नाविन्यपूर्ण होती, तितकीच त्याच्या मोठेपणाची द्योतक होती ! .

आणि त्यामुळेच माझ्या मित्राचे राहून राहून कौतुक करावेसेच मला वाटतें !.

त्याने लिहिलें आहे का तुम्हाला या बाबतीत, वहिनी ? .. नसेलच बहुतेक !. खरोखरच ती त्याची सारी निरपेक्ष धडपड होती ! ..

असो, दिवसभर दगडाचुन्याचे रुक्ष हिशेब आणि आता तुम्हाला सांगावेसे वाटत असलेल्या या अप्रिय पुराणाची सविस्तर आठवण ! .. आता, प्रथम शांत झोंपेची जरूरी आहे ! .. मग थांबवूं ना आतां पत्र ? ..

तुमचा—**अरविंदभावोजी**

मुंबई; ता....२० जून १९२९

प्रिय मावशी,

हो, तुझ्या पत्रांत तूं लिहिलेंस तसेंच थोडेंसें झालें!.. पण मी त्याविषयीं कांहींच लेहिलें नाहीं याबद्दल तूं थोडी रागावलीस; आतां त्यांत एवढें लिहिण्यासारखें तरी काय आहेग? मला असल्या प्रकारांचा दिवसेंदिवस जास्तच तिटकारा येऊं लागला आहे, मावशी! . . .

तुझा कांहीं दिवस लाभलेला प्रेमळ सहवास, . . दिल्लीचें प्रदर्शन, प्रवास! मुंबईस परत आलों, तेव्हां माझें अंतःकरण किती प्रफुल्ल . . आनंदी झालें होतें. या मध्यंतरींच्या काळांत मनाला तशी मधून मधून अकारण वाटणारी रुखरुख होती खरी; पण तरी एक प्रकारें शांत समाधान वाटे!

पण, तूं उल्लेखिलेल्या शंकरकाकांच्या घराच्या विक्रीचा प्रसंग मी प्रवासाहून परतल्यावर गेल्या आठवड्यांत घडून आला; आणि माझें मनःस्वास्थ्य पुन्हां नाहींसें झालें आहे!

मी, एखादी चांगली गोष्ट म्हणून करावयास जावें, आणि त्याचा सर्व प्रकारें विपर्यास होऊन, शेवटीं, ती माझ्याच आगलट यावी, ...असें बहुतेक ठरल्यामारखेंच आहे कीं काय ग, मावशी? अलीकडे मी हें असेंच पहात आलों आहे. बाबांना गेलीं कांहीं वर्षे माझ्या वर्तनाने दुःखच देत आलों. आणि प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें बहुतेक तोच अनुभव इतर नातलगांविषयींहि! त्यामुळें मला कधीं कधीं मोठा प्रश्न पडतो,...मीच वाईट, कीं, मी ज्यांच्यांत वागत आहे तीं माझ्या भोंवतालचीं माणसेंच एक प्रकारें मला विसंगत अशा एका ठराविक वृत्तीचीं!

आता तूंच पहा!... बाबानीं तुजकडे पाठविलेलें माझें पत्र, मी तेथें आल्यावर तूं मला दाखविलेस. त्यांत मी विशेष असें काय चुकलों होतों, साग बरं? तूं स्वतःचा असा झटकन् ठाम निर्णय दिला नाहींस, त्याच्यावर म्हणा! कदाचित् बाबाबद्दल तुला वाटणारा आदर, त्याच्या मुळाशीं असेल. (आणि तसा तो त्यालाहि आहे—) तरीहि मी एकंदर परिस्थितींत काहीं चुकलों आहे असें मला तरी अजून वाटत नाहीं! आणि तुला अरविंदनें गेल्या पत्रीं सविस्तर कळविलेला प्रसंग घडल्यानतर तर, या एकंदर मनोवृत्तीमुंळच मी अतिशय खिन्न झालों आहे! ...

गेल्या कित्येक वर्षांत, दादांच्या घरांत मी विशेष जिव्हाळ्यानें वागत आलों होतों. विशेषतः, आमच्या यशोदाकाकीचा तरी मजवर आतापर्यंत अतिशय लोभ! आणि त्यामुळें मीही तुझ्याकडे वागतों तसाच कांहींशा मोकळ्या प्रेमळपणानें तिच्या-

बरोबर वागत आलों होतों; तें तुला ठाऊक आहेच ! पेण गल्यां पधरवड्यांत म
त्यांच्या घराला कायमचा पारखा झालों आहे. त्यांच्यांतील प्रत्येकजण मला पाण्यां
पहात आहे, व ज्या यशोदाकाकीबद्दल मला एखाद्या प्रेमळ आईचा जिव्हाव
वाटे, तिलाहि मी आतां दृष्टीसमोर नकोसा झालों आहे. या साऱ्या परिस्थितील
कारण काय म्हणशील, तर गेलीं कित्येक वर्षें ही मंडळी दादरला रहात असलेल्य
शंकरकाकांच्या घराची तूं म्हणतेस ती विक्री ! नाहीं म्हटलें तरी, शेवटीं, सारें त्य
मंडळीच्या मनासारखेंच झालें. मी उलट शंकरकाकासांठींच शक्य तो प्रयत्
करून पाहिला; पण तोंडघशीं पडलों.

मला वाटलें, तें प्रकरण तेथेंच संपलें. म्हणून, त्या दिवशीं घरविक्रीचें सारें प
वगैरे सारें ठरल्यावर नेहमीच्या पद्धतीप्रमाणें, घरांतच काकीच्या हातची कॉप
घ्यावयास म्हणून मी गेलों! ...पण—

घरांतील सारा मंडळींचा नूरच पालटला होता! . .

: १८४ :

मंजुळा दाराजवळच्या खिडकीमागें उभी राहून, हळूंच सारा प्रकार उत्सुक
तेनें पहात होती! मला आंत शिरतांना पहातांच ती लाजून बाजूस झाली; प
तेवढ्यांतच तिला माझ्या त्या दिवशीच्या घराच्या बाबतींतील वागणुकीमु
आनंद झाल्याचें तोंडभर स्मित तिनें केलेंच. आणि जातां जाता ती हळूंच मल
म्हणाली, "अरुण, जाऊं नका ना आंत! सगळीं रागावलीं आहेत तुमच्यावर!...

पण मला त्यांच्या वागणुकीचा राग आला तरी, व्यक्तिशः त्यांच्या कोणाबद्द
माझ्या मनात जरासुद्धा दुष्टावा नव्हता. व म्हणूनच आपण नेहमीसारखे घरा
जाऊन बोलायचे असे ठरवून मी आत गेलों.

पण मी आंत गेलों तेव्हा भीषण...रागीट शांतता पसरली होती. प्रत्येक ज
आपापल्या कामांत जणू व्यग्र होते! विठोबाअण्णाच्या बायकोनें पापले
तळतां तळता एकदा माझ्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखे करून मा
फिरवली. काकीची दुसरी सून पाट्याजवळ बसन कांद्याखोबऱ्याची भाजाण
वाटत होती. भिंतीजवळ पडलेल्या शिप्या पाहून मी म्हटले, "काय वहिनं
कालवाची आमटी वाटतं? . ."

तरीहि स्तब्धता! . .

स्वतः काकी देवापुढें निरंजन ओवाळीत उभी होती. पण तिनें मजक
वळून देखील पाहिलें नाहीं. मी माझ्या नेहमींच्या आवडत्या उंबरठ्याव
जाऊन बसलों. दोन मिनिटें झालीं; ... पांच मिनिटें झालीं. पण कोणी नेहम
सारखें मजबरोबर बोलेना!

काकी देवाला हात जोडून, बराच वेळ डोळे मिटून उभी असलेली पहातांच

मी नेहमी सारखे तिला जरा खेळकर थट्टेनें म्हणालों, "पुरे कीं ग आता, काकी! देव धावून येईल एखाद्यावेळीं लागलीच भेटीला. आणि मग त्याची बडदास्त राखतां राखता स्वयपाक राहील बाजूला तो? आपण आपलीं मुलाबाळाची माणसं!..."

पण तरीहि सामसूम्! कोणी कांहीहि बोलेना!... आजच्या माझ्या स्पष्ट वागणुकीने त्या साऱ्याशी असलेला माझा प्रेमळ संबंध तटकन् तुटल्यासारखा मला दिसला! ... नेहमीचे कॉफीफराळाचें आदरातिथ्य राहोच, पण त्यांच्या-कडून मला साधा प्रेमळ शब्दहि मिळेना! ...

इतक्यात मंजुळेने माझा बाहेर नेलेला कॉफीचा कप व लाडू वगैरे फराळाचे जिन्नस आणून मजपुढें ठेवले.

एवढ्या प्रकारानंतर त्यातलें काहीं खाऊं नयेसेच वाटत होते. पण "मी तरी काय करणार या प्रकाराला? तुम्हाला मी आधीं सागितलेच होतें... आता मी तुमच्यासाठीं आणलेली ही कॉफी तरी घेणार नाहीं का तुम्ही?" अशा तऱ्हेचा भाव मजुळेच्या थोड्याशा खिन्नपणाच्या मुग्ध हसऱ्या चेहऱ्यावर पाहून, मी तिनें पुढे ठेवलेली कॉफी प्यालो, ... अर्धा लाडू मोडून तोडात टाकला; व तसाच उठून बाहेर पडलो.

मी जिन्यापर्यंत जाई तो मजुळा माझ्याकडे सारखी पहात होती. या सर्व गोष्टीमुळे मला खरोखरच दुःख झालें होते. अजूनहि खरे पाहिले तर मनाला समाधानच नाहीं! तसा अर्थाअर्थी संबध नसताना यशोदाकाकीच्या आणि एकंदर सर्वांच्याच रागाला मी कारण झालों.

पण मग त्या साऱ्याची कीवच करावीशी वाटली मला! मी त्याच्याशीं चागला होतो तोपर्यंतच यशोदाकाकी मजबरोबर मोठ्या प्रेमाने वागत होती. न्यायासाठीं, मी फक्त एकदाच त्याच्या विरुद्ध गेलो, त्याबरोबर मी मूर्ख, दुष्ट, नीच ठरलो! त्याचे साधे पाहुणचारहि मला पारखे झाले!..

: १८५ :

खरेच किती हीन अपेक्षावृत्ति ही! मला कल्पनाहि सहन होत नाही!

पण मग वाटले, अशा कोत्या वृत्तीने जगात जगणाऱ्यांचा संबंध, आपली इच्छा नसताना तुटला, तर त्यात वाईट वाटण्याचे तरी वास्तविक कारण काय? तरी या गोष्टींची मनाला टोंचणी लागल्यावाचून रहात नाहीं, मावशी!

शंकरकाकाच्या घराची विक्री व्हायची ती झाली. पण, त्याबरोबरच माझा व दादाच्या घराचा संबंध आता विनाकारण कायमचा दुरावला! मला त्याबद्दल वाईट वाटलें, तरी, त्याला मजजवळ इलाजहि काहीं नाहीं. तूं पत्रानें विचारलीस ती हीच सारी हकीगत.

आणि अशाच वेळीं मनापासून वाटतें,..नकोत हीं सारीं माणसें.. यांच्यापासून जितके दूरदूर राहता येईल तितकें बरें!... हल्लीं असल्या विचारांनींच माझें अगदीं डोकें पिकतें. असो. कळावें लोभ असावा.

अरुण.

( ३२ )

१ ता. २२ जून, १९२९

प्रिय मावशी,

होपममाविषयीं लिहिल्यानंतर मनात असूनहि तुला पत्र लिहावयास झाले नाहीं. रागावली नाहीस ना, मावशी?... पण माझा बहुतेक वेळ वाचनांत व हातीं घेतलेल्या अभ्यासक्रमात कमा निघून जातो ते समजतसुद्धा नाहीं.

इतक्या दिवसानंतर आज तुला पुन्हां पत्र लिहावयास घेतले खरें; पण काय काय लिहावे ते समजत नाहीं. आणि एकदां तर वाटते, तुला समक्ष भेटावेहि पण अजून अनुकूल वेळ आली नाहीं. मी मन आवरून धरतें आहे.

खरच मावशी, अरुण बी. एस्सी. ग कसे झाले? आणि म्हणे दिल्लीला अखिल भारतीय प्रदर्शनात त्याचा बक्षिसे, सुवर्णपदके वगैरेने पुष्कळ गौरव झाला. असले काहीं लाबून ऐकलें म्हणजे वाटते;..पण नकोच त्या विषयाला नव्यानें तोड फोडणे!

मावशी; माझी भावनाप्रधानता, गेल्या कित्येक वर्षात मी बरीच आटोक्यात आणत असले तरी ती कधीं कधीं अशी उचंबळून आल्यावाचून रहात नाहीं! तरी आता मी आशावादी बनत चालले आहे. आणि त्याला कारण, माझी प्रेमळ जिवलग मैत्रीण, जाई पै!... हो, मावशी, इतकी गोड मुलगी आहे ती!... तिची माझी पहिली भेट आमच्या शाळेतच झाली!...

गौर वर्ण, कुरळे व पिंगट केस, काळे भोर डोळे, सरळ व तरतरीत नाक! मला तिनें पहिल्याच दिवशीं आपल्या तरतरीतपणाने स्वतःकडे आकर्षिले. दुपाऱ्च्या सुट्टींत ओळख केली. संध्याकाळीं फिरायला गेलों. दुसऱ्या दिवशीं एका बाकावर बसूं लागलों.

आमची मैत्री कशी भरभर वाढत गेली तें समजलेंसुद्धा नाहीं मला!... माझ्या येथील एकाकी आयुष्यांत तिच्या मैत्रीचाच काय तो मला विरंगुळा ... आसरा होता!...

अशी आनंदांत तीन वर्षें गेलीं आहेत. एकाच वर्षी मॅट्रिकला बसून आम्ही पास झालों. आयुष्याच्या भवितव्याविषयीं ती किती आशावंत; मी मात्र साशंक! मी हें करणार तें करणार असें तिचें सारखें चालतें. माझ्यापुढें तर नेहमीं प्रश्नचिन्हें उभीं राहून मला भेवडावींत! आणि यामुळेंच आमचें आकर्षण वाढलें, मला वाटतें!... जणूं काय माझ्या संगतींत तिच्या भराऱ्यांना ब्रेक लागतो; तिच्या संगतींत माझ्या थोड्याशा निराश वृत्तींना आशावंतपणाचें टॉनिक मिळतें!

पण आतां?... ती दुसरीकडे ... मी दुसरीकडे!...

तो निरपेक्ष स्नेहाचा काळ असा एकाएकीं व इतक्या लौकर खंडित होईल अशी आम्हांला दोघांनाहि कल्पना नव्हती. पण चमत्कारिक गोष्टी अचानकपणें घडून येतात खऱ्याच!

एक दिवशीं, आमचे गाव सोडून तिला माझ्यापासून लांब नेणाऱ्या गाडीवर पोहोचवावयास मी गेलें होते. मला सारखे वाटत होतें असले प्रसंगच जगांत घडतात तरी कां?

कोणाची कोण जाई! आम्ही एक ठिकाणीं येतों काय? सहवास वाढून दाट स्नेह होतो काय? आणि एके दिवशीं अचानक तिच्या वडिलांची बदली झाल्यामुळे, ती मला सोडून लांब जाण्यास उद्युक्त होते काय? जगाच्या घडामोडी घडवून आणणाऱ्या अदृश्य हाताला, नेहमीं प्रत्येकाने असंतुष्ट, असुखी रहावें अशा घटना करण्याचीच लहर लागत असते काय? त्यातच त्याला मौज वाटते का ग मावशी?

पण हे दुःखी विचार माझ्या डोळ्यावाटे मुग्धपणे जाईला कळविण्याचा प्रयत्न करीत असतानाच, ती गाडी, आम्हा दोघात भप्भप् करून धुराचे लोळ सोडीत, माझ्या त्या जिवलग मैत्रिणीला घेऊन लांब लांब निघूनहि गेली होती. आणि तेव्हापासून मला पुन्हा एकटें एकटें वाटत आहे. असो लोभ ठेव.

तुझी — **मिरा.**

(३१)

कल्याण ता. १० जुलै १९२९

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद, विशेष—

नुकताच अरुणनें माझ्या मनाला नवीन एक धक्का दिला. तुजकडे मागें मी त्याचे पत्र पाठविले तें वाचलें असशीलच. मी त्याला नको म्हणून सांगितलें असतांहि शेवटीं तो माझ्या इच्छेविरुद्ध गेल्या आठवड्यात शांतिनिकेतनला निघून गेला.

डॉक्टरीचा कोर्स बाजूस सोडून त्यानें मला न कळत संपविलेल्या त्याच्या बी. एससी. च्या कोर्सचा परीक्षेत तो चांगला पासहि झाल्याचें तुला समजलेंच असेल. त्यानंतर त्यानें लिहिलेल्या गेल्या दुसऱ्या लहानशा पत्रांत आपण आतां पुढील शिक्षणासाठीं रवींद्रनाथांच्या कॉलेजांत जात आहों असें कळविलें होतें. ...आतां वास्तविक सर्वच विपरीत झालेलें!... आर्थिकदृष्टया त्याच्या उज्वल भवितव्याच्या माझ्या कल्पना साफ विरघळलेल्या ! तेव्हां त्यानें कांहींच नाहीं तर माझ्या मदतीनें कोठें तरी कायम नोकरीस सुरवात करून आपलें आयुष्य सुरळीत चालू करावें ही माझी कल्पना मी त्यास कळविली! आणि कदाचित् त्यामुळेंच मला वाटतें तो एकाएकीं जास्तच बिथरून, मी त्याची समजूत करण्यापूर्वी, लागलीच शांतिनिकेतनला निघूनहि गेला. मला वाटलें होतें, यावेळीं पैशाची अडचण त्याला भासली, तर तो माझें ऐकेल. परंतु त्याला नुकत्याच भरलेल्या चित्रकला प्रदर्शनातून रोख बक्षीस मिळाल्यामुळे, त्यानें आपला विचार, मला न जुमानतांच कायम केला.

त्याचें आजच शांतिनिकेतनहून पत्र आलें आहे.

त्याची असली तडफ पाहिली म्हणजे, एकदा त्याचें कौतुक करावेंसें वाटतें. त्याच्याबद्दल अभिमान वाटतो! पण, लागलीच विचार येतात अशा तऱ्हेचें अस्थिर आयुष्य यापुढेंहि तो आणखी किती दिवस चालविणार आहे!...आणि कमळे, एकंदरींत त्याच्या भवितव्याविषयीं तर मला खरोखरच आता वारंवार अतिशय काळजी वाटल्यावाचून रहात नाहीं.

माझ्या अशा म्हातारपणी, अरुणशीं प्रत्येक बाबतींत माझा मतभेद व्हावा व त्यामुळे मला नेहमी फक्त त्रास सोसण्याची पाळी यावी असे माझ्या अदृष्टातच लिहिलेले दिसतें. आता तो नाहींतरी तेथें गेला आहेच तेव्हा त्याला तेथील खर्चासाठी मदत न करणें म्हणजे त्याच्या मनांत असलेल्या बेतात अडथळा आणल्यासारखेच होय... शिवाय मी त्याला पैसे न पाठविणें म्हणजे लौकिक दृष्ट्याहि जरा कमीपणाचे ठरतें!

मी पुढील महिन्यापासून त्यास पैसे पाठविण्याचें ठरविलं आहे. असो, कळावें हे आशीर्वाद.

—बाबा ठाकूर

( ३२ )

दादर, ता. १५ जुलै १९२९

प्रिय मावशी,

अरुण बी. एससी. पास झाले. आणि ते बाबांची इच्छा नसताही, शांतिनि-

केतनाला गायन व चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठीं, एकाएकीं निघून गेले, हें तुम्हाला समजलें असेलच.

खरंच मावशी, त्याच्या मनाची असलीं आत्मविश्वासपूर्ण व ध्येयप्रेरित आंदोलनें पाहिलीं, कीं, मला अगदीं त्याच्याविषयीच्या प्रेमाचें भरतें येतें! चित्रकला व गायन हे त्याचे अगदीं आवडते विषयच! त्यांनीं आजपर्यंत त्यात किती वरच्या दर्जाचें यश संपादन केले आहे? पण त्यात त्यांना कोणाचेंच उत्तेजन नाही. किंबहुना त्या बाबतींत त्याना विरोधच जास्त! बाबांचा असला विरोध त्यांना असह्य होतो. ते अतिशय रंजीस होतात. व म्हणूनच त्याचें भावनाशील व महत्त्वाकाक्षी हृदय भाबावून त्याच्याविरुद्ध बंड करते!

गेल्या आठवड्यात जाण्यापूर्वी ते मला भेटले. पण मजकडेहि ते उघडपणें काहीच बोलले नाहीत. अगदीं विमनस्कपणें माझ्या प्रश्नाना ते काहीं तरी उत्तरें देत होते एवढेच! मला त्यांच्या वृत्तींतील तो एक प्रकारचा रंजीसपणा मात्र फारच जाचक झाला!... खरंच, मावशी, अरुण मजबरोबर पूर्वीइतकेच प्रेमळपणे वागण्याचा प्रयत्न करतात, जिव्हाळयाने बोलल्याप्रमाणे दाखवितात. पण त्यात त्याचा तो पूर्वीचा मोकळेपणा.. ओलावा आहे, असें मला वाटत नाहीं. मजविषयीं त्यांना अलीकडे काय वाटत असेल ते असो. मनात काहीं तरी विचार करून आपल्याशींच कुढत असतात एवढे खरें!..

कसला एवढा विचार बरें? मला काहींच समजत नाहीं मावशी!.. त्यांच्या सुखासाठीं मी वाटेल ते करीन! पण काय करू?... मला काहीं सुचत नाही. मला त्याना कशा तऱ्हेने सुखी करता येईल?... तुम्हाला काही विचार सुचतो का, मावशी?... एकदम किती लाब गेले निघून, नाहीं ते!.. मला त्यामुळे तर त्याची सारखी सारखी आठवण होते!... व मग मी जास्तच गोंधळून जाते.

मंजुळा देसाई.

(३३)

शातिनिकेतन, बोलपूर; ता. ८ ऑगस्ट १९२९.

प्रिय मावशी,

तुला किंवा बाबाना न कळवितांच शेवटीं मी इकडे निघून आलों. शंकर काकांच्या घराच्या भानगडीनंतर या बाबतींत मी त्यांना शेवटीं पत्र लिहिलें होतें.

पण बाबांनीं मला त्याचें उत्तर अगदीं प्रतिकूल पाठविलें, त्यांच्यामतें मी आतां कोठें तरी नोकरी करावी. कदाचित्, त्याच्या वशिल्यानें चांगली सुरवातहि झाली असती.

पण माणसाचें आयुष्य कशासाठीं असतें ग, मावशी ? तें कोडें मला अजूनहि पूर्णपणें सुटत नाहीं. बाबा नेहमीं जिचा उल्लेख करतात, ती ही आयुष्यातील 'स्थिरता' 'स्थिरता' म्हणजे काय ? आपल्या मनाचे .. आयुष्याचे .. साऱ्याचें एकचएक सांचलेलें .. ओंगळ डबकें करायचें .. हे ? काहीहि असो, .. मी एकाएकी त्याच्या मनाविरुद्ध निघून आल्यामुळें ते मजवर पुष्कळ रागावले मात्र असतील खास ! .. पण माझा नाइलाज आहे !

मजकडे पैसे फारसे नव्हते. परंतु माझीं बक्षिसें मिळविलेलीं व इतरहि कांहीं चित्रें, येथील कॉलेजांतील चित्रकलेचे मुख्य आचार्य श्री. मसानी याच्या अवलोकनांत दिल्लीला आलीं होतीं; त्यामुळें मी अर्ज करताच त्यानीं अतिशय आपुलकीने मला स्वदस्तुरचें पत्र पाठविले व लागलीच सर्व तऱ्हेच्या सवलती देण्याचे कबूल करून बोलाविले. मीहि नुकत्याच बक्षिस मिळालेल्या व त्या चित्रविक्रीच्या रकमेच्या जोरावर, दुसऱ्याच दिवशीं इकडे निघून आलों आहे.

एक महिना, मी येथें नवीन नवीन अनुभव घेत घालविल्यावर, आजच ती. बाबांची रु. ७५ ची मनीआर्डर एकाएकी आली. पण त्यांत लिहिले होतें, 'तुझा मूर्खपणा वाढत चालला आहे. मला नेहमी त्रास देणें हेच तुला योग्य वाटतें. आज पैसे नाइलाज म्हणून पाठवीत आहे. ते घेऊन दरमहा तुला किती रक्कम लागेल तें पत्रानें कळीव.'

मी ते प्रथम परतच करणार होतों; पण नंतर थोडा विचार करून मनीऑर्डर स्वीकारली !

असले प्रसंग कधीं कधीं वेड लावण्याची पाळी आणतात, मावशी ! पैशाअभावीं आपली जगात कितीशी किमत आहे ?..आपल्या महत्त्वाकाक्षा किती फोल, .. कवडीमोल आहेत ? .. आपली कर्तबगारी किती महत्त्वहीन आहे ? याची अशावेळीं खात्री वाटूं लागते. .. व क्षणभरच वाटते, .. आपणच चुकतो, हे भोंवतालचे सारे लोकच बरोबर ! ...

पण मग, ... जाऊं द्या ! .. आज मला यापेक्षां जास्त लिहितांच येत नाहीं.

तुझाच—**अरुण.**

(३४)

कल्याण, ता. १० फेब्रुआरी १९३०

ती. सौ. कमळावहिनीस, सप्रेम नमस्कार विशेष—

अरुण शांतिनिकेतनला निघून गेल्यानतर त्याला मी चारपांच सविस्तर पत्रें पाठविलीं. पण त्याचीं उत्तरें हल्लीं अगदीं मामुली स्वरूपाचीं असतात. त्याची तेथें चित्रकला चालू आहे; शिवाय गायनांत त्याची बरीच प्रगति झाली आहे. तशी एकंदरींत त्याची प्रकृतिहि ठीक आहे .. याशिवाय मला त्याच्या पत्रातून त्याच्याविषयीं काहींच समजले नाहीं.

त्याचा पूर्वींचा मजबरोबरील मोकळेपणाहि आता बराच कमी झाला आहे. त्याचीं पत्रें म्हणजे अगदीं प्रश्नोत्तर स्वरूपाची मामुली असतात.

मला वाटलें होतें, .. तुम्हाला तरी तो सविस्तर लिहित असेल; व म्हणूनच त्याच्याविषयी विचारण्यासाठी पत्र लिहिणार, तो तुमचेच पत्र आले.

मजुळाकडे जास्त माहिती मिळेल म्हणून सुनीतीला तिला विचारावयास लावले व मीही समक्ष विचारले. तिला तर शातिनिकेतनला गेल्यापासून, अरुणनें अजून पत्रच पाठविलेले नाही.

तेव्हा तो एकदरीत कोणत्या मनःस्थितीत आहे मला काहींच समजत नाहीं!.. तो भावनाप्रधान पोरगा कर्तबगार आहे, श्रेष्ठ ध्येयानीं प्रेरित आहे!.. पण म्हणूनच सदा तो जास्त गोंधळलेल्या मनःस्थितीत असतो!!..

सध्या असला काहीं तरी गोंधळ त्याच्या मनात उडालेला असेल!—

मला त्याच्याविषयी स्नेही म्हणून जितका उत्कट अभिमान वाटतो, तितकीच त्याच्या या फाजील भावनाप्रधानतेची कींव येते .. त्यामुळे दुःख होतें!.. पण आपला तरी काय इलाज त्यावर?

अरुणविषयीं, त्याच्या मनःस्थितींविषयीं, आपणा सर्व माणसाशीं असलेल्या त्याच्या सबधाविषयीं, आज मला यापेक्षा जास्त काहीच ठाऊक नाहीं. त्याच्या अतःकरणाला कसला तरी नवखा वणवा लागला आहे, एवढे खास!.. पण तुमच्या जिव्हाळ्याच्या पत्राला लिहिलेल्या या उत्तरात मी यापेक्षा जास्त ते काय लिहू?

तुमचा—**अरविंदभावोजी.**

# प्रवासांतील सोबती

## — पत्रें —

# जुडगा २ रा.

(३५)

मुंबई, ३० मार्च १९२७.

कु. मंजुळाताई देसाई यास—

आज वास्तविक, अगदीं अनपेक्षितपणेच तुम्हाला पत्र लिहीत आहे मी हे!... एकाएकींच तुमची आठवण झाली. आणि खरेंच, प्रथम पत्र लिहावे की नाहीं याविषयी देखील माझी मति दोलायमान झाली होती! पण मग गेल्या काहीं महिन्यातील सारे प्रसग मला आठवले ;... विशेषतः, त्या दिवशीं अचानक माझ्या हातीं लागलेली तुमची ती ओबडधोबड कलाकृति!...त्यामुळेच हे पत्र आज लिहावयास घेऊन ठरविले, कीं, यापुढे मजुळाताईशी आपला स्नेह वाढवावयाचा, .. मन खुलें करून मोकळे बोलावयाचे, .. मोकळे लिहावयाचे!...

मजुळाताई, आयुष्यात आपल्या धडपडींना स्नेहाने उत्तेजन देणारी एकादी व्यक्ति असावी,... आपल्या विकासाकडे, प्रगतीकडे, सहानुभूतीची प्रेमळ दृष्टि टाकणारे एकादे माणूस असावे,.. असे प्रत्येकाला सारखे वाटत असते. नाहीं का?.. आणि हे खरे असेल तर-राग मानू नका.. उघड बोलतो.. मला आजपर्यंत आलेल्या तुमच्या तुटपुंज्या सहवासावरून खास वाटते,.. कीं तुमच्या मनाला तसल्याच प्रकारची सारखी काही तरी रुखरुख लागलेली आहे! तुमच्या भोवताल्च्या हल्लीच्या वातावरणात तुमच्या मनाची ही तहान भागत नाही, या विचाराने तुम्ही सारख्या कुढत असता!.. सागा बर, 'का? कशाला? कोणासाठी?' असले मनाला प्रश्न विचारीत कुढ्या मनाने व प्रवाहप्रतित अतःकरणाने जगात वावरणारी तुमच्या त्या गोष्टीतील ती मुलगी म्हणजे कोण हो? तुम्हीच ना त्या?..

तरी पण.. मजुळाताई, यातूनही माणसाला धीराने वाट काढणे जरूर असतें!.. चमत्कारिक परिस्थितीबरोबर वहात गेलेले आतापर्यंतचे तुमचें

आयुष्य, मला ठाऊक आहे. आमच्या नानाच्या लाघवी भाषणाला तुमचे वडील मोहून गेल्यामुळेच तुमची आज अशी असहाय स्थिति झाली आहे; पण मनांत स्वार्थ ठेवून अपेक्षावृत्तीने दुसऱ्यावर असले दिखाऊ उपकार करणारीं माणसेच जगात पुष्कळ! आणि स्पष्टच बोलतों—आमच्या नानासारख्यांचा तर तो धंदाच म्हणावयाचा!..

: १९२ :

आणि म्हणूनच गेलीं दोनअडीच वर्षे, मी तुमच्या आयुष्याचें जरा सूक्ष्म निरीक्षण करीत आहे. वास्तविक आता तुम्ही नुकत्याच कॉलेजांत जाऊं लागला आहात, .. जगात नव्याने चौफेर नजर फिरवू लागला आहा!... पण तुमच्या प्रत्येक हालचालींत किती उदासीनता दिसते?

का बरं असं??..

तें कांहीं असो; पण एखाद्या गुणी व्यक्तीच्या आयुष्याचा भोंवतालच्या वातावरणामुळे असा चुथडा होताना पाहिला, म्हणजे माझे मन मात्र विरघळल्या-वाचून रहात नाही! आणि मला वाटते...स्वतःचे अंतःकरण अशाच तऱ्हेने पोळलेले असले, ही भोंवतालच्या व्यक्तींच्या बेफिकीरीची असह्य झळ स्वतःलाही लागलेली असली, ... म्हणजे तर दुसऱ्याच्या मनःस्थितीचें चटकन् आकलन करणे जड जात नाहीं!... खरच, माझ्याहि मनाचीं आंदोलने सध्या तशींच आहेत! आणि म्हणूनच, गेले जवळ जवळ सहा महिने, मी तुम्हाला हें पत्र लिहिण्यास धडपडत आहे! मला सारखे वाटत होते—मंजुळा ताईचे सध्याचे आयुष्य म्हणजे एक साचलेले डबके आहे, त्यांत प्रवाहीपणा कसा तो मुळींच नाही!...

आणि माझे स्वतःचें आयुष्यहि असे तुमच्यासारखेच सहानुभूतिविहीन धड-पडीत लोपत चालले आहे!.. तरी पण मी माझ्या कुवतीप्रमाणे चिकाटी धरून मला योग्य वाटणाऱ्या गोष्टी करीतच आहे ना?.. दुसरे कोणी मला उत्तेजन देत नाहीं, म्हणून तर माझे मीच तें दिले पाहिजे, अशी मी मनाची समजूत करून घेतो. कधीं कधीं मात्र असे प्रसंग येतात, .. कीं त्यावेळी एकाद्या सहानुभूतीच्या शब्दासाठीं देखील, माझी दृष्टि मी दीनपणे आशेन भिरीभिरी भोंवतीं फिरवीत असतों!.. आणि शेवटीं निराश मनाची समजूत करतों, कीं, आयुष्यात असले प्रसंग नेहमी यावया-चेच, .. आणि तसे ते आले, तरच तें जास्त उज्वल होण्याचा संभव अधिक!.. प्रसंगाप्रमाणे आपले विचार, .. आपलीं ध्येयें,.. बदलणारी व्यक्ति कुचकामाचीच नाहीं कां एकंदरींत?..

: १९३ :

हेच पहाना;? ... मध्यें मी तेथें दादांकडे राहत होतों. त्यावेळींहि तुमच्या

कांहींशा मूक सहवासात माझ्या मनात हे सर्व विचार असेच येत व जात; पण माझा जन्मजात संकोची स्वभाव .. त्यामुळें हें सर्व मी तसेंच मनातल्या मनात दडपून टाकी! .. तरी त्यावेळींहि तुमच्याशी जास्त स्नेह करून तुम्हाला धीर द्यावा असें मला कधीं कधीं सारखे वाटे!

—पण, मग मी तर स्वतःहि तसाच एक दुबळा जीव! त्यामुळे मला धीरच होत नसे! खरंच, मंजुळाताई!.. जगात दंभच आहे चोहोकडे सारा! निरपेक्ष स्नेहसुद्धा भीतियुक्त विचारानीं मर्यादित होतो;.. आणि माणसाचें मन त्यामुळे जास्तच किंकर्तव्यमूढ .. कमकुवत होते!

तरी शेवटीं, आज पूर्ण विचार करूनच हें पत्र लिहावयास हातीं घेतलें. मला वाटले, .. माझ्या आयुष्यात मला कधीहि विशेष लाभली नाही, ती निरपेक्ष स्नेहशील सहानुभूति मजुळाताईसाठीं मी पुढे करीन. त्याना जरूरी असली, तर दोघाच्याही सहानुभूतिशून्य आयुष्यात दोघानाही एक नवा स्नेह निर्माण होईल!..

मंजुळाताई, तुमच्या भवितव्याकडे कोणीच आपुलकीच्या जिव्हाळ्याने पहात नाहीं असे वाटून घेऊन, उगीच रंजीस.. दुःखी होऊ नका!—माझा दुबळा स्नेह तरी आपल्या सुखदुःखाशीं खास समरस होईल!...

ही माझी व्यर्थ बडबड तर नाहीं ना वाटणार तुम्हाला? आणखी जास्त काय लिहूं? तुमच्या पत्रोत्तराची स्नेहपूर्ण वाट पाहीन— अरुण ठाकूर

(३६)

दादर, ता. २० ऑक्टोबर १९२७

प्रिय अरुण,

मागें कोठेतरी वाचण्यांत आले असेल!.. कदाचित् माझ्या डोक्यातीलच ती कल्पना असेल!.. मुबईच्या अगदीं जवळजवळच्या दोन गजबजलेल्या चाळींत दोन अतिशय जिवलग जीव वर्षानुवर्षे रहात आलेले असावेत;..त्याना एकमेकाच्या मुखावलोकनाचा या धडपड्या जगात एकदाही सुयोग येऊ नये!..आणि मग एकाएकी त्याची गाठ पडावी,..दृष्टादृष्ट व्हावी,..शब्दाची देवघेव व्हावी व घटका अर्धघटकेंत ते एकमेकाना पुन्हा प्यार व्हावेत!

जगांत येतांना आपल्याशीं कसलेहि नातें घेऊन न येता देखील तुमच्या बाबतींत मला तसेंच वाटतें!..

अरुण, तुमचें पत्र सहा महिन्यापूर्वी माझ्या हातीं आले! एकदा, दोनदां, दहादा,.. अगणित वेळा.. मी ते आजपर्यंत वाचले! गेल्या सहा महिन्यातील माझा

नणूं तो धीर देणारा नित्यपाठ होता ! . . आणि तरी माझे इतक्या दिवसांचें मौन ! . . रागावला असाल ना अगदीं माझ्यावर तुम्ही ?

पण त्या पत्राचें उत्तर पाठवण्यास, मी आजच प्रथम बसलेलें नाहीं, अरुण !. . शक्य असतें,.. तर या दृश्य पत्रापूर्वीचीं किती तरी, . .वाऱ्यावर वाहात, तुमच्या-पाशीं येऊन तुमच्या कानाशीं कुजबुजावयासहि लागलीं असतीं! पण मनांत येणारे बोल आतापर्यंत बाहेरच फुटत नव्हते. हृदय नुसतें आनंदानें कोंदाटलें होतें ! माझा दुबळा जीव, या अननुभूत आनंदानें गगरून गेला होता ! त्याची ती अदृश्य . . अगम्य धडपड,. . त्याचे शब्दांत वर्णन करणें मला अशक्यच आहे !

वास्तविक मनाला पटल्यावर कसलाही मुहूर्त शोधण्याची जरूरी नसते. तुमच्या अपेक्षेप्रमाणे पत्राचें उत्तर मी लागलीच लिहावयाचें !. . पण माझ्या हृदयाला लागलेला हा नवखा वणवा, . . . प्रथम त्याच्या मोहक उबेनें मी अतिशय आनंदून गेलें !. . पण नंतर त्यात गेले सहा महिने अगदीं होरपळत होतें ! . . .

का ? कशासाठीं ? . . .

कसं सागूं अरुण ? त्या धडपडींत तुम्हांला हृदयांत जपून जपून ठेवतां ठेवतां, आतांपर्यंत मला ज्या कांहीं यातना झाल्या असतील, त्या एकट्या माझ्या मलाच ठाऊक ! एकेकदा वाटे, माझं हृदय तुमच्याविषयीं वाटणाऱ्या उत्कट प्रेमानं फुटून जाईल !. . मला अगदीं चैन पडत नसे !.. अशा वेळीं केव्हां एकदां तुमच्याकडे बोलून, लिहून तें मोकळें करीन असें वाटे !. . पण—

१९५ :

खरंच, आजपर्यंतचं माझं आयुष्य किती अगदीं चमत्कारिक रीतीनें वाहवत गेलं ?. . पुढेंही तें तसंच वाहत जाईल का हो अरुण ?. . कोणास ठाऊक !!. .

त्या दिवशीं तुमच्या त्या साध्यासुध्या प्रेमळ स्नेहपूर्ण पत्रानें माझ्या हृदयांत तुम्हीं कितो थैमान घातलेंत याची तुम्हांला कल्पनाहि नसेल, अरुण ! मी मनाला सारखं विचारीत होतें . . मी आहे कोठें ?. . होत आहे काय ?. . आणि आतां पुढें ? . .

पण स्वतःच शोधलें पाहिजे, हें सारें मनात केवळ नाहीं कां ?—आयुष्य कांहीं विचारजडपणे वागून, वाऱ्यावर वाहून जाण्यासाठीं नाहीं !. . .

हो, माझ्या ध्येयहीन आयुष्यात तुमचें पत्र म्हणजे बुडत्याची काडीच होतें !. . तुम्ही मला मूर्ख म्हणा,. . पण म्हणूनच मी त्यावर एकदम झांप टाकली !.. अश्रु-भरल्या नेत्रानीं त्या पत्राला हृदयाशीं कवटाळलें,.. आणि अनेक वेळां आपल्याशींच म्हणालें, ‘अरुण, आतां मला दूर लोटूं नका, . . विसरूं नका ! . . मला आपली म्हणून जवळ घ्या. माझ्या आयुष्यात मला तुमची फार फार जरूरी आहे ! ’. .

पण मग तुमच्या अंगचें विविध गुणाचे भांडार पाहून मला खिन्न वाटे.

माझ्यासारख्या एखाद्या साध्यासुध्या व्यक्तीनें तुमच्याशीं हें बरोबरीचें नातें लावायचें तरी कां ?.. आणि कस ?.. माझ्या स्वार्थानें मी तुमच्या आयुष्याचा चुथडा तर नाहींना करणार ?.. पण, पुन्हां पुन्हां मनाला समजावून, शेवटीं मी तसले विचार कठोरपणें बाजूस सारी! तरी असला हृदयांतील मात्र कल्लोळ कधींच थाबत नसे!..

: १९६ :

संध्याकाळीं गार वारा सुटलेला असे; असल्याच दुबळ्या मन:स्थितींत मी कॉलेजांतून परत येई;.. घरात कोणी नसलें,.. की, दाराला कड्या घालून माझें मन रंजविण्यासाठीं मी माझा जुनाट गरीबाऊ दिलरुबा गवसणीतून बाहेर काढी !.. आणि त्याच्या पडद्यावरून हात फिरवतां फिरवता, मला तुमची उत्कटतेनें आठवण होई.. त्यावेळीं मला वाटे, माझे अरुण प्रेमळ दृष्टीने मजकडे पाहत, जणुं माझ्या अगदीं निकट बसले आहेत ! तसल्याच मन:स्थितींत मी एखाद्या गाण्याची लकेर माझ्या दिलरुब्याशीं मिळवत, मोकळ्या मनानें हवेंत सोडी ! —

पण मग भोंवतालच्या कटु वस्तुस्थितीची .. मला लागलीच जाणीव होई. मी एक केवळ अजाण भाबडी अर्धशिक्षित अनाथ मुलगी !.. क्षणभर मनांतील राग मी त्या निर्जीव दिलरुब्यावर काढी. पण लागलीच दुसऱ्याच क्षणीं अगदीं हळुवारपणेंच तो पुन्हा जवळ ओढी !..

हो अरुण, सहानुभूतीचें, कळकळीचे, प्रेमाचे माणूस आपल्याजवळ असल्या शिवाय,.. निर्जन वनात कोमेजून जाणाऱ्या सुवासिक फुलाप्रमाणेच माणसाचें आयुष्य असतं !.. नाहीं का ?..

घराच्या त्या चार भितींत, माझे तासचे तास तसल्या व्यग्र मनानें अगदीं एकांतांत जात !.. तुम्हाला खरेंही वाटणार नाहीं—त्या पूर्वीहि जवळ जवळ गेलीं तीन वर्षें,.. तुमच्या प्रेमळ मूर्तीची भक्तिभावाने मनोमय पूजा करीत, मी मुग्धपणें आतल्या आंत कशी कुढत आलें आहे, ते !.. पण मग त्या प्रत्येक वेळीं मी मनाला समजावीत असें, "वेड्या मना ! तुझी आणि त्यांची कधींच बरोबरी होणार नाहीं ?.. ही तुझी केवळ पतंगाची धडपड आहे !.."

: १९७ :

माझ्या मनाची तसली ती अबोल धडपड तुम्हांला सांगत बसून तुमच्या मनाला त्रास देत नाहीं ! पण तरी आठवतात ते दोन तीन प्रसंग सागतेच !..

तुम्ही सायन्स कॉलेजात जावयासाठीं प्रथमच दादरला दादाकडे रहावयास आलांत;.. त्या वेळीं माझें हृदय नुसतें आनंदाने फुलून आले होतें !... माझी शाळा सुटल्यावर तुम्ही परतण्यापूर्वीं घर गाठण्याची, माझ्या देहाची त्यावेळीं तारांबळ कशी होई, ती माझी मलाच ठाऊक !.. एकाद्या दिवशीं तुम्ही

अपेक्षित वेळीं आलां नाहीं, म्हणजे मन किती खिन्न होई! मी ही अशी काळीसावळी!.. त्यातल्या त्यात मीं तुम्हाला दिसेन त्यावेळीं तरी बरी दिसावें;.. म्हणून माझ्या मनाची कोण घालमेल चाले?.. हो अरुण, त्यावेळीं मी म्हणावं,.. ‘ सुख हे मिळवायचं असतं. सुखाचं आयतं ताट पुढ्यात वाढून येत नाहीं!..’

या गोष्टी मुग्धपणे करण्यात माझ्या मनाला किती समाधान वाटे, म्हणून सागूं?...तरी एकेका वेळी माझा मलाच राग येई. मी थोडी फार शिकलेली आहे; मला माझे विचार आहेत,.. लहानसान का होईनात ध्येयें आहेत!..पण, मी कसली जादू घालून आहे त्यापेक्षा जास्त सुंदर होऊं?..' अशा वेळीं वाटे हृदय असं आतल्याआत जळत ठेवण्यापेक्षा कोठे, तरी कशी तरी त्याची आहुति द्यावी!.. जगातील एक अडगळ तरी नाहीशी होईल!

जणुं, शरीरसौंदर्यावाचून स्त्रीचे जीवन निर्जीवच!...

मला ठाऊक होते व आहे!.. पुरुषाच्या सहवासाशिवाय निदान माझ्यासारखीचं जीवन व्यर्थ!..तरी असं मनातल्या मनात कुढत मी माझे आयुष्य कंठीत होते!.. त्यावेळी चिकित्सक मन आशेकडे धाव घेई;..मूर्ख मन आतुरपणें भवितव्याची वाट पाही!..

तुमचें नुसतें दर्शन मिळवण्यास इतके सायास पडत, तर प्रत्यक्ष तुम्हाला आपलेसे करावयास काय प्रयत्न करावे लागतील, याची मला कल्पनाच करवत नसे;.. किंबहुना तें अशक्य असेच मला वाटे!..

: १९८ :

आणि अशा मन:स्थितींतच तुमचे तें पत्र आले!...

तेव्हा त्यावेळीं मी किती आनंदित झाले असेन...गागरलें असेन.. याची तुम्हीच कल्पना करा!...

अरुण, माझ्या आयुष्यात तुम्हीं वेळोवेळीं केवढा सुखदायक गोधळ उडवला आहात, सागू.. मला इथ शब्दांनी सारे कळवणं.. अगदीं कठीण आहे!

अगदी खरं खरं वाटतं ते लिहू का?.. अरुण, तुमच्या कायमच्या सहवासासाठीं मी अगदीं सुरवातीपासूनच जीव टाकीत आहे!.. भाऊ, मित्र, आयुष्यांतील जीवाचा स्नेही..( मला शब्दच सापडत नाहींत... आत काय कालवाकालव चालली आहे ती तुम्हाला कळवायला!..) असं काहींसं माझं तुमच्याशीं नातं आहे,.. असं मला अगदीं प्रथमपासून वाटतं!...

हो अरुण, मला माझं मन मोकळं करणं, जगात आता एकट्या तुमच्याकडेच शक्य आहे!.. आणि मला वाटतें फक्त एकट्या तुम्हांलाच माझ्या हृदयांत खोल अवगाहन करतां येईल!..

मी अगदीं साधीसुधी आहे. तुम्हाला मुळींच योग्य नाहीं!.. हें मला कळत कां नाहीं, अरुण? पण मी तरी काय करूं? मला या क्षणीं जें खरंखरं वाटतें आहे, तेच सारं मी लिहितें आहे! आता माझ्या असल्याच भाबड्या विचाराचा पाचोळा गोळा करा,.. व त्यातूनच काय तो जीवनरस शोषण करा!.. सारें कांहीं तुमच्याच हातीं आहे!..

मोकळेपणें बोलण्याची पाळी येईल तेव्हां.. झांकण फोडून बाहेर पडणाऱ्या वाफेप्रमाणें,.. माझ्या हृदयातील सारी खळबळ तुमच्यापाशीच ओतली जाईल! पण तरीहि, वरून ओबडधोबड,.. गुणविरहित दिसत असली तरी.. अरुण स्वीकार करून आपलीच म्हणतील,.. अशी हृदयापासून उत्कट आशा करणारी–सर्वस्वी अरुणाचीच—

मंजुळा देसाई.

(३७)

मुंबई, ता. ३० आक्टोबर १९२७

प्रिय मंजुळा,

तुझ्याकडून आठ दिवसापूर्वी आलेल्या पत्रांतील, मजविषयींचा तुझा उत्कट जिव्हाळा पाहून, आता एकदम औपचारिकपणा सोडूनच लिहितो—

त्या पत्राने मी किती गोंधळलो?.. तुझं तसं पत्र येईल अशी माझी कल्पनाहि नव्हती!.. तुझ्या हृदयाची त्यातील खळबळ पाहून मी भांबावलो, पण रागावलों नाहीं;.. आणि मंजुळे, तेव्हापासून गेल्या आवडाभर रात्रंदिवस त्याविषयीं माझे विचारच चालले होते!..

मात्र, मला थोडेसे आश्चर्यच वाटले व प्रश्न पडला, तो तुझ्यासारख्या प्रेमळ मुलीला प्रथमपासूनच मजविषयीं वाटणाऱ्या इतक्या जिव्हाळ्याच्या प्रेमास, मी खरोखरच पात्र आहे का, हा!..

तुझे पत्र मी कितीदा तरी वाचले–तुझ्या स्पष्टपणाचें मला प्रत्येक वेळीं कौतुकच वाटले; पण मंजुळे, तू स्वतःला इतकी गौणस्थान तरी का देतेस ग?.. तुझ्याकडे सौंदर्य कमी आहे या एका गोष्टीबद्दल तुला इतकं रंजीस होण्याचं काय कारण? त्यापेक्षा महत्वाचे अनेक गुण तुजकडे आहेत, याची तुला कल्पनाही नसेल!.. पण त्याच्या विकासातच तुझं महत्व सामावलेलं आहे.

आणि खरं सांगू का?–माझी तुजविषयींची पहिली भावना,.. उत्कट स्नेहाची.. अतिशय आपुलकीची असली,.. तरी, तुला मजविषयीं वाटतं तसलं आकर्षण आतांपर्यंत अल्पमात्रहि मला नव्हतं!..

मंजुळे, तुला खरोखरच मजविषयीं इतकी आपुलकी वाटते, ती कां ग? . . . माझ्या चिरसहवासानें तूं सुखी होशील, तुझ्या आयुष्याचा मार्ग कायमचा सुकर होईल अशी तुला खात्री वाटते कां? तसे असेल तर . . .

: २०० :

पण मंजुळा, तूंच पहा! . . माझीं ध्येयें अगदींच चमत्कारिक आहेत! . . . जणूं भराऱ्यांनीं भरलेलं किंचित् चंचल . . अनिश्चित असंच आयुष्य माझं! . . . माझा आयुष्याचा मार्ग अतिशय खाचखळग्याचाच असणार! . .

घड्याळात इतकीं चाकें एकास एक लावलेलीं असतात! त्यातील कित्येकांची आपल्याला माहितीही नसते; पण त्यांतील एकादें जरी काढलें . . . तें पडलें, तरी घड्याळाची टिकूटिक् थांबते! . . समाजरूपी घड्याळातही आपली इतकीच उपयुक्तता व योग्यता असावी, . . तशी ती वाढवण्यासाठींच आपल्या साऱ्या आयुष्याची धडपड असावी! . असली माझी मोठी महत्वाकाक्षा आहे!

तेव्हां सांग, . . आयुष्यभर मी अशाच लष्करच्या भाकऱ्या भाजीत राहिलों, . . तर त्या आगीची झळ तुला सोसावी लागणार नाहीं कां? त्याला तुझी तयारी आहे? . .

: २०१ :

पण तुझी असली तरी माझी पाहिजेना!

मंजुळा, . . नुसता उत्कट स्नेह, व दोन आयुष्यें निगडित करणें, . . यांत हाच मोठा फरक आहे! हो, . . त्यामुळेंच मी जास्त भांबावून गेलों आहे.

म्हणूनच अजून जरा थाब. मला आणखी दोन चार दिवस या बाबतींत विचार करूं दे. नंतर मी शक्य तर समक्ष येऊनच तुला सागेन.

मंजुळे, मी किंचित् गोंधळून गेलों असलों, तरी तुझ्या मजविषयींच्या उत्कट प्रेमानें माझें हृदय अगदीं भरून आलें आहे. तुझा स्नेही—**अरुण.**

(३८)

दादर; ता. १२ नोव्हेंबर १९२७.

प्रियकर अरुण,

हो, तुमच्याविषयींच्या प्रेमळ भावना कोणत्या शब्दांत व्यक्त करूं तेंच मला समजत नाहीं, अरुण! म्हणून कांही तरी लिहितें झालं! कारण, तुम्ही येऊन मला भेटून गेलांत, . . आणि माझ्या जीवननौकेचं सुकाणूं मला मिळालं असंच माझं मन तेव्हांपासून मला सांगत आहे.

अरुण, माझ्या हृदयांत आज काय काय चाललं आहे, तें सारं सारं तुम्हांला

कळवावसं वाटत!.. पण भाषाच तोकडी वाटते मेली,.. शब्दच सांपडत नाहींत!..

तुमच्या गेल्या पत्रानंतर, मी तुमची रोज सारखी वाट पाहत असे. रात्रंदिवस,.. तुमची मूर्ति माझ्या दृष्टीसमोरून कांहीं केल्या जातच नसे. कॉलेजांत तशीच विमनस्कपणें उगीच जाऊन येई.. जेवण गोड लागत नसे. सारखा एकच विचार भंडावून सोडी–'माझे अरुण माझेच आहेत, असें मला ते सांगतील ना?..'

शेवटी तुम्ही चार दिवसांनीं आलात ते आपले वर जाऊन पेटी वाजवीत बसलात; पण माझ्या हृदयाची पेटी–तिचा भाता–कांहीं केल्या वर खालीं होताना थांबेचना!.. खरंच, कुठेसं वाचलेलं मला एकदम आठवलं–love is an instinct that sharpens the senses to unusual keenness! हो, मी त्यावेळीं भानावरच नव्हतें, मुळीं!

: २०३ :

तो दोन तीन दिवसांचा मुग्ध सहवास!.. माझ्या जीवाची,.. उत्कंठित मनांत येणाऱ्या 'हो ना' प्रश्नाना उत्तरें देतांनाची तारंबळ!.. आणि शेवटीं त्या गोड गोड संध्याळपर्यंतची माझ्या मनाची ती धडपड!—तो मधला वेळ मला किती जाचक झाला होता, अरुण?.. पण, शेवटीं तुम्ही मला हळूंच बाहेर फिरावयास यायला सांगितलेत. एकांत शोधीत शोधीत आपण अबोलपणेंच लांब लांब चाललों होतों.. पण त्या शांततेंतच किती शब्द गटंगळ्या खात होते, नाहीं? माझ्या हृदयाची धडपड मला तर शेवटीं अगदीं असह्य झाली!.. व बोलावयास सुरवात करावीम्हणून म्हटलें, 'आज यायला फावलं वाटतं शेवटीं?'

त्यानंतर तुम्ही तोंडभर हसलांत; आणि किती प्रेमळपणें मजकडे आपलं हृदय मोकळं केलंत!.. माझ्या भाबड्या प्रेमाचा तुम्ही स्वीकार केलात त्यावेळचे तुमचे शब्द,.. ते मला अमृताहूनही गोड वाटले!..

अरुण, तुम्हाला कल्पनाहि करवणार नाहीं,—मला त्या क्षणापासून किती उत्साह वाटत आहे!..

त्या दिवशीं रात्रीं तुम्ही बाहेर गॅलरींत होता आणि मी अगदीं खुल्या आवाजानं गात होतें!.. कारण काय माहीत आहे ना?.. माझ्या देवासाठींच मी गात होते!.. जेवतांना आत्याहि म्हणाली, 'कां ग मंजू, आज विशेषसं?'

पण खरंच अरुण, मजसारख्या सामान्य मुलीलाच कां हों आपली म्हटलेंत तुम्हीं?.. मला अजूनहि मधून मधून वाटतें,.. मी तुम्हाला योग्य नाहीं!—पण आता शब्द कशाला वापरू उगीच... तुमच्या सुखासाठीं मी जिवाचे काय वाटेल तें रान करावयास तयार होईन. माझें सर्वस्व तुम्हांलाच देण्याहून मला दुसरं काय शक्य आहे, सांगा ना?..

तुमच्या आयुष्यात तुम्ही म्हणतां तशी अनिश्चितता असली, .. तरी तुमच्या परिस्थितीशीं समरस होणे, मला अगदीं शक्यच नाहीं कां ? .. मला ठाऊक आहे, तुमच्यासारख्या ध्येयशील श्रेष्ठ कलावंताच्या आयुष्यांत, नेहमीं धडपडच जास्त असणार ! पण तुम्हीं कलेच्या सेवेंत तन्मय झालात, तर मी तुमच्या सेवेत,.. दोघां-च्याही चरितार्थाचा प्रश्न मजवर !.. . वेडी वाटते कल्पना ना ही ?.. पण मग राहूं द्या ते. .. त्या साऱ्या पुढच्या गोष्टी !

पण खरंच अरुण, माझा पूर्वीचा निराशावाद मला अलीकडे अगदीं वाटेनासा झाला आहे ! जिकडे तिकडे उत्साह ! .. जगातील या जीवनाच्या धडपडीतच, आतां मला एक प्रकारची नवी मौज वाटूं लागली आहे ! — भवितव्याच्या उदरांतून यश हिरावून घ्यावयास हपापलेली अशी, मी एक हावरी प्राणी होत चालले आहे दिवसेदिवस !— तुमचीच, **मंजुळा.**

( ३९ )

मुंबई, ता. १९ जुलै १९२८

प्रियतम मंजुळा,

यशोदाआत्याला मध्ये भेटायास आलो, त्यावेळच्या भेटींत तुला समक्ष सांगि-तल्याप्रमाणें, बाबाना शेवटीं मीं सविस्तर हकीगतीचे पत्र पाठवले. त्यावेळीं माझे हृदय किती धडधडत होते. आजपर्यंत मी बाबाशीं ज्या मोकळेपणानें वागत होतों त्या मोकळेपणानेच मी त्यास हे सर्व कळविले.

तू मला पत्र पाठवून आपले मनोगत कळविलेंस. मीही थोडा विचार करून तुझ्या आजन्म सहवासाचा लागलीच स्वीकार केला त्या गोष्टी किती अनपेक्षित व भरभर घडून आल्या ! आपल्याला आपल्या मनाची कल्पना झाल्यानंतरचे गेले जवळ जवळ पाच सहा महिने किती समाधानात गेले ! प्रत्येक गोष्टींत एक-प्रकारचा उत्साह वाटत होता !

पण, शेवटीं, मी ते बाबाना सांगितल्यावर, सर्वच गोष्टींचा त्यानीं विपर्यास केला !

मला लिहिलेल्या पत्राची तुला कल्पना यावी, म्हणून सोबत ती दोन्ही तिन्हीं तुजकडे पाठवून देत आहे. त्यावरून तुला दिसून येईलच, कीं, त्यात त्यानी त्याच्या साधारण नियमाप्रमाणे माझ्या एकाही भावनेला, विचाराला, माझ्या मनाला मान दिलेला नाहीं. किंबहुना मी काहींतरी अक्षम्य अपराधच करीत आहे, असें माझ्या मनावर उत्कटतेने ठसविण्यासारखीच त्याची सारी भाषा आहे ! —या सर्वांच्या मुळाशीं त्याचे मजबद्दलचे अतिशय प्रेमच कदाचित् असूं शकेल; परन्तु

त्या ओघात ते माझें व्यक्तित्व साफ विसरले!.. आणि याबद्दलच मात्र मला फार वाईट वाटलें. त्याहीपेक्षां जास्त दुःख झालें, तें त्यानीं माझ्या ध्यानीमनीं नसलेली वैषयिकतेची विचारसरणी माझ्या माथीं आरोपित केलेली पाहून! माझ्या निष्पापपणाच्या असल्या एकंदर विपर्यासाने गेला आठवडाभर माझ्या मनाला स्वस्थताहि नव्हती, .. कीं अन्नही गोड लागत नव्हतें.

: २०५ :

व्यक्तीविषयीं वाटणाऱ्या प्रेमामुळें म्हणून का होईना, तिच्या मातापितरांनीं किंवा इतर कोणीही आपलींच मतें तिच्या माथीं मारणे किंवा त्याप्रमाणे वागण्यास तीस भाग पाडणें, हा केवळ जुलूमच नव्हे का?.. तरीही मन शांत ठेवून, बाबांना मी चिडून उलट उत्तर पाठविले नाहीं;.. याचे कारण या जुन्या पिढीतील व्यक्तीशीं मतभेद झाला तरी त्याच्याविषयींच्या आदरांत, तरुण विचारी मन फरक पाडीत नाहीं. आम्हाला वाटतें— The only human relations that have value are those that are rooted where there is no domination, no slavery, no tie except affection, no economic or conventional necessity to preserve the external show, when the inner life is dead!

पण आम्ही अकिंचन!.. आमच्या विचारानां किंमत कोठें आहे?

विचारी मनाला मात्र सारें काहीं पटतें! आमच्या भोवतालची आजची समाजरचनाच अशी आहे, कीं, तींत व्यक्तीच्या पराक्रमाचा अंकूरच खुडला जावा! 'असें बोलू नको, आणि तसे चालू नको,'..'हा मार्ग धरूं नको आणि तो सोडूं नको,..' अशा खालींच, व्यक्तीचा पराक्रम या घरच्या सासुरवासापुढे लुप्त होतो!..आणि अशा वेळी पुढे प्रश्न उभा राहतो—बंधने किंवा नियम हे मानवी आयुष्यातील आनंद नाहींसा करण्यासाठीं आहेत, कीं, समाजातील व्यक्तींचें सुख वाढवण्यासाठीं त्याची योजना आहे? उत्साह हा सात्विक गुण कोणत्याही पराक्रमाचा प्रवर्तक!.. पण त्याचाच असा उच्छेद केल्यावर, आम्ही तरुण मंडळी किंकर्तव्यमूढ दुबळीं झालो, . . तर त्यात आमचा दोष काय? 'नियमन मनुजासाठीं, मानव नसे नियमनासाठीं' हें खरें नव्हे कां?

आमच्या इच्छा, आकांक्षा याना समजत नाहींत! समजून घेण्याचीही इच्छा नाहीं!.. आम्ही करतो ते सर्व मार्ग चुकीचे असे ते म्हणतील; पण 'असे' करा असें काही खात्रीपूर्वक कधींच सागणार नाहींत. आणि मग केवळ त्रागा करून, ही मंडळी, आपल्याला एखादे आवडत नाही एवढेच पाहून, परोपरीनें म्हणणार, कीं, 'तुम्ही उद्दाम झाला!..' जणूं काय आम्हाला आमची अशीं काहीं ध्येयेच नाहींत! त्याना विरोध करणे, त्यांजबरोबर झगडा करणे... भाडत राहणें, हाच आमचा एकमेव पराक्रम!..

: २०६ :

अगदीं, नव्या उत्साहानें, उत्कंठेनें, नुकतेंच भवितव्याकडे पाहात असता, एकाएकीं असले धक्के एकामागून एक बसल्यामुळें, तूं किती भाबावून गेली असशील याची मला कल्पना आहे. पण मंजुळे, डगमगून जाऊं नकोस! परिस्थितीला धीराने तोंड देण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच माणुसकी नव्हे का? तुझ्यासारखी भाबडी, हळवी मुलगी तर, असल्या एकाएकी झालेल्या गहजबामुळें गोधळून गेली असेल!... पण प्रेमळ मुली, तुझ्या सदसद्विवेकबुद्धीलाच तूं सर्वांत जास्त मान दिलास, तर तुला आपोआप धीर येईल. परस्पर प्रेमबद्ध हृदयें लौकिक विधीनेंच एक व्हावीं लागतात असें नव्हे!

खरंच मंजुळे,...हा भोवतालचा गलबला सोडून कोठे तरी लाब लाब जावें, तुझ्याबरोबर तासचे तास खुल्या दिलाने बोलत बसावें, आपआपलीं सात्विक हृदयें एकमेकाकडे उघडीं करावींत, असें मला किती वाटते म्हणून सागूं!

पण—सभोवार पडलेला हा जडवादी जगाचा गराडा!..त्यावर काय उपाय?
' काहीहि करा, ही जनता मारिल नागी, हासून आपागी ?'

: २०७ :

तुझ्या माझ्या सबंधाकडे व्यवहारी दृष्टीनें काटेकोरपणे पहाणाऱ्या आमच्यातील साऱ्याना मी तुजवर इतके प्रेम का करावे हे समजत नाही, म्हणे! आणि खरंच...वास्तविक मलाहि माझ्या हृदयाला आज याचा जाब देता येत नाही.. त्याना तूं फारशी सुदर नाहीस याचे वैषम्य वाटत असेल, तुझी असहाय गरीबी दिसत असेल; पण मी तरी माझ्या मनाच्या तुजविषयीच्या आवेगाना कसा बाध घालणार ?..

तरीही ही व्यवहारी दृष्टीची झळ, मधून मधून मला लागल्यावाचून राहात नाहीं! ' तू आणि मी ' या स्वर्गीय वातावरणात आतापर्यंत बावरत होतों;.. तोपर्यंत टीक; पण आता, रुपयेआणेपै मोजणाऱ्या या व्यवहारी जगातच आपण राहात आहो, याची जाणीव होऊन तुझा दीन चेहरा जास्तच समोर उभा राहतो.

बाबाची मला आलेली दोन्ही तिन्ही पत्रें पुन्हा पुन्हा वाचून मात्र मीं काहीसा भाबावल्यावाचून राहात नाही. आपणा दोघानाही एकमेकाच्या हृदयमीलनाने आनंद वाटतो व वाटेल हे खरे; पण बाबासारख्या विचारी म्हणवणाऱ्या माणसानाही विवाह म्हटला कीं फक्त शारीरिक मीलन, प्रथम दिसू लागावे हे केवढें आश्चर्य!...

साच्यांतून काढल्याप्रमाणें, प्रत्येक व्यक्ति,..सारख्या विचाराची,..सारख्या आचाराची झाली पाहिजे, ही याची कल्पना! आखून ठेवल्याप्रमाणे प्रत्येकाच्या आयुष्यातील घडामोडी, त्याची उत्क्राति,.. ठराविक धर्तीवरच व्हावयास पाहिजे, हा त्याचा

अट्टाहास! स्वत:च्या हृदयाच्या हांकेला जागून जगांत पावलें टाकणारा, तो यांच्या दृष्टीनें बंडखोर व उर्मट !.. तर्कदृष्ट्या चोख विचारसरणी केली, तर तत्त्व व व्यवहार यातील दाखविला जाणारा फरक! पदोपदीं वयोमानाची तर्कावर पडणारी गैरवाजवी छाप! आणि त्याविरुद्ध काहीं झाल्यास उपमर्द केल्याची यांच्या मनांत डोकावणारी नाहक कल्पना!.. तेव्हा अर्थातच यापुढें शेवटीं आमच्या कर्तबगारीविषयींचा पूर्ण अविश्वास!..

बाबाच्या मनाला यामुळेंच दु:ख होत असेल, राग आला असेल!.. पण खरेंच, मी जे जें करीन, तें तें त्याच्या दु:खासच कारण का होते?... व मग, माझा सरलमनस्क प्रेमळपणा सर्वांच्या दु:खासच कारण होत आहे, या विचारामुळें मी जास्तच रंजीस होतो.. भावावून जातो!...

: २०८ :

गेला आठवडाभर मी असाच वेड्यासारखा विचार करीत इकडे तिकडे फिरत होतों! . लांब लांब निर्जन भागात जाऊन भिरीभिरीं नजर फिरवीत मीं मंद पावलें टाकी;.. एखादा टोळ उडी मारूं लागला, पक्ष्याची रांग आकाशात उडताना दिसली, मुग्याची ओळ कोपऱ्याकोपऱ्यातून वळसे घेताना पाहिली, कीं माझ्या मनात विचार येई .. हें सारे काय गौडबंगाल आहे?.. हे जीव जगतात तरी कशाला? आणि याची ही धडपड कशासाठी, कोठपर्यंत चालणार?..

पण, मग माझ्या गेल्या चिमुकल्या आयुष्यात, मी असेच डोकावून-पाहूं लागलों, .. की त्या बाजूसहि एकामागून एक मनाला रंजीस करणाऱ्या अनपेक्षितपणे घडलेल्या गोष्टी मला आठवत! .. आणि मग मला पुन्हा तोच प्रश्न भंडावून सोडी! खरंच, आपल्या मानवी आयुष्यातील देखील, ही सारी धडपड कशासाठी?.. आणि मग तसल्याच सुन्न मनस्थितींत मी एकाकीपणें भकास विचार करीत इकडे तिकडे तासचे तास भटके!..

: २०९ :

पण उलट, कधी कधी वाहत्या पाण्यात पाय टाकून बसलों, सुंदर फुलाचा सुगंध आला, किंवा ताटवा पाहिला, चांदण्यात बसून चंद्राकडे पाहिले, किंवा उगवत्या सूर्याकडे दृष्टि टाकली,.. की तसल्या सुन्न मन: स्थित तही माझे मन एकदम प्रफुल्ल होई!.. आत कोठें तरी एकदम उचंबळून येई,.. व हृदयसागराला एकदम आनंदाची भरती भरे!..

अशावेळी वाटे—प्रत्येक माणसाच्या आयुष्यात हा अमला विविध प्रकारचा सात्विक आनंद कायम राहण्यासाठीच मनुष्याची प्रत्येक धडपड असावयास पाहिजे नाहीं का?..

आणि मग मनाला असल्या विचारांनी समाधान वाटलें कीं, तुझी एकदम

आठवण होई !.. तुझें मजविषयींचें उत्कट प्रेम आठवलें कीं हृदय पुन्हां तसल्या:
आनंदाने भरून येई !

काल दिवसभर असाच इकडे तिकडे भटकत होतों, आणि शेवटीं आज
पत्र लिहावयास घेतले आहे.

मंजुळे, भोवतालच्या प्रतिकूल वातावरणाने भाबावून जाऊं नकोस! मजव
विश्वास ठेवून, केव्हांतरी अनुकूल काल येईल अशी आशा आपल्या हृदयात
बाळग! . . आणि तोंपर्यंत मी अगदीं तुझाच आहे असें समजून आपलें हृद
मजकडे मोकळे करीत जा. व माझी आठवण नेहमीं कायम ठेवून जगाती
तुझा मार्ग उत्साहाने पुढे काढूं लाग.

आता जास्त काय लिहूं; तुजविषयीं पूर्वीइतकीच आपुलकी व प्रेम आहे

तुझाच–अरुण.

( ४०

दादर, ता. २३ जुलै १९२८

प्रियकर अरुण,

तुमचं परवांचं पत्र मला कितीदां तरी वाचूनहि समाधानच वाटेना; प
अरुण, कधीं कधीं मला अगदीं चैन पडत नाहीं. हल्लीं तुमच्या मनाला रा
दिवस किती त्रास सोसावा लागत असेल !.. आणि त्या साऱ्याला मीच कार
ना? हो, ती. बाबाच्या व तुमच्या प्रेमळ संबंधात बिघाड येण्यास मीच कार
झालें ! . .

आणि माझ्या अरुणाची, आयुष्यातील सहचारिणी या दृष्टीने मी मजकडे पा
लागले, तरीहि मला पुन्हा वाटते—मी एकंदरींत त्यांना मुळीच योग्य नाहीं
माझ्या धडपडणाऱ्या हृदया, तुझ्यापासून त्याना खरोखरीच काहीं सु
होईल का?

. . अरुण, सुंदर स्त्रिया शेकडा किती तरी सापडतील. आणि तुमचें रू
गुण, कुल पाहिले, कीं तुम्हांला मजपेक्षा लावण्यवती गुणवान् स्त्री सहज लाभ
असती, असेंच मला वाटते ! . . पण मग तुम्ही माझ्या भाबड्या प्रेमाच
स्वीकार तरी कां केलात हो? खरंच, असल्या विचारानीं, कधीं कधी, तुम
समक्ष भेट घेणं म्हणेज सुद्धां मला ओशाळं वाटतं; . . पण मी तरी का
करूं ? . . हें हृदय धडधडत आहे. तेथ माझा इलाजच चालत नाहीं !—

पण अशाच विचारात, तुमच्या पत्रांतील प्रत्येक वाक्यांत थबथबणारा प्रेमळ-पणा—थोरपणा दिसला, कीं अगदीं स्वार्थी बुद्धीनें चटकन् माझ्या मनाची मी समजूत करून घेतें... ' ते कांहीं असो... अरुण माझे आहेत... मी अरुणांची आहे !...'

कारण, अंधाराचा खोल विचार करायला लागलं, कीं, मनुष्याला चादण्यांतही अमावास्याच दिसायची !.. हो अरुण, आणि असा विचार करून माझा दुबळे-पणा मी लागलीच टाकतें; व स्वतःचें आहे त्यापेक्षा किती तरी चागलें चित्र डोळ्यांपुढे उभें करीत, माझ्या मनाचें कसेंबसें समाधान करून घेतें !..

पण तरीहि दुसरे विचार माझ्या मनांतून काहीं केल्या कायमचे म्हणून जातच नाहींत ! प्रेम स्वार्थी असतं काहो, अरुण ?—होय ... दुसऱ्याचें मला ठाऊक नाहीं; पण ... माझं तरी स्वार्थी आहे असंच आता मला वाटतं ! ... तरी अरुण, मी पुन्हा पुन्हा सांगतें, आपली; .... मी दुबळी, क्षुद्र असलें तरी मी माझें सर्वस्व तुम्हाला अर्पण करून, वाटेल त्या स्थितींत तुमच्या आश्रयाला उभी राहावयास धडपडेन !..

: २११ :

तुमच्या बाबाचें गेल्या पंधरवड्यात मला अनपेक्षित पत्र आलें. तेव्हा मला किती दुःख झाले. गांगरून गेले होते अगदीं. यशोदा आत्याचा स्वभाव तुम्हाला ठाऊकच आहे. तिला सारे समजल्यावर, त्या दिवशीं रात्रीं ती मला पुष्कळ बोलली; तसें पाहिले तर तिला माझ्या भवितव्याविषयीं विशेषशी काय काळजी वाटते तें सर्वांना ठाऊक आहे ! ती तर स्वतःच्या मोठेपणाच्या दृष्टीनेच या प्रसं-गाकडे पाहात आहे. कारण, परवा परवांपर्यंत ती मला आपला दोघांचा संबंध वाढावा म्हणून कधीं कधीं उत्तेजनच देई; पण आतां मात्र या गोष्टीकडे पाह-ण्याचा तिचा दृष्टिकोण एकदम बदलला. त्यानंतर दोन तीन दिवस मला अगदीं चैन पडत नसे. एकात मिळाला, की आई व बाबाची आठवण होई. अशा वेळीं, असहाय मनाने तुमची आठवण काढीत मुग्ध अश्रु ढाळण्यावाचून माझ्या हाती काय होते ?..

पण नंतर तुमचे पत्र आल्यावर मात्र, मला पुन्हा किती धीर आला म्हणून सांगूं, अरुण ? तुम्ही मला मागे दिलेला फोटो हृदयाशी घट्ट धरला व त्या रात्रीं माझ्या एकाकी खोलीत अंथरुणावर पडलें; ... किती तरी वेळ, तुमच्या गेल्या अडीच तीन वर्षांच्या सहवासातील अनेक लहानमोठे प्रसंग आठवून, आनंददुःखाच्या मिश्र अश्रूंनीं उशी अगदीं भिजविली !.. अशा वेळीं माझ्या हृदयांतील भावना—सागर उचंबळून येतो, कोणत्या शब्दांत मी सांगूं तुम्हांला ? अरुण, तुम्ही किती हो चागले आहांत ! तुमच्या-

वांचून मी खरोखरच अनाथ आहे. मी भाबडी आहे, वेडी आहे! पण मी आहे तशीच मला वागवून घेऊन माझ्या आयुष्याचें सुकाणूं योग्य दिशेला फिरवणें केवळ तुमच्याच हातात आहे, अरुण!.. या प्रसंगी मला जास्त कांहीच लिहिता येत नाही!—साऱ्या जिव्हाळयाच्या नात्यांची माझी तहान भागवणाऱ्या माझ्या अरुणाना या तोकड्या अपुऱ्या शब्दातून माझ्या हृदयात खोल दडलेला योग्य तो भाव शोधून काढणे शक्य होईल ना? तुमचीच—**मंजुळा.**

( ४१ )

दादर; ता. २४ एप्रिल १९२९

प्रियकर अरुण,

हल्लीं नेहमीं नेहमीं समक्ष भेटी होण्याचे अनेक योग आले, म्हणून अगदीं पत्रच लिहावयाचे सोडून देऊ नका काहीं!.. आणि गेले दोन तीन महिने तर येण्याचेंहि टाळलेत. किती उत्सुकतेनें मी त्या दिवशीं टाइम्सचा अंक उघडून पाहिला. दोन तीन दिवस आधीपासूनच मला तुमच्या परीक्षेच्या निकालाचा वेध लागला होता; पण तुमचे नाव यशस्वी उमेदवारात न सापडल्यामुळें मात्र माझी एकदम निराशा झाली.

आर्ट सोसायटीचे प्रदर्शन काल दुपारी पाहून आल्यापासून मात्र, उलट माझा खिन्नपणा कोठल्या कोठें लोपून गेला आहे!..

टाईम्समध्ये आलेल्या त्या प्रदर्शनातील चित्राच्या सविस्तर वर्णनांत, बक्षिसें मिळालेल्या चित्रात तुमच्या दोन चित्राचा व तुमचा गौरव वाचून मी कॉलेजातून तशीच टाऊन हॉलमध्ये गेले. बाकीचीं सुदर सुदर चित्रें पहावयाचे सोडून, तुमच्या चित्रापुढे बराच वेळ थबकून त्याचें निरीक्षण करताना पाहून, मजबरोबर आलेली माझी कॉलेजातील मैत्रीण मजवर किती रागावली? ..

पण, तिला काय माहीत बापडीला, की, मी माझ्या अरुणाच्या कलाकृतीचा अगदी अणूपरिमाणू हृदयात साठविण्याचा प्रयत्न करीत होतें, हें!..

खरंच अरुण, तुम्ही हे कौशल्य कोठून हो मिळवले?.. तुम्ही माझे म्हणूनच नव्हे; पण, मला तीं दोन्हीं चित्रें सर्वात जास्त आवडलीं. त्याच्याकडे सारखे पाहूनहि माझे काहीं केल्या समाधान होईना!...

: २१३ :

दोहोंपैकीं तुमचें 'वावली' हे चित्र मला त्यातल्या त्यात फारच आवडलें.

सूर्य थोडासा कलला आहे ! .. अर्धी पाऊण जमीन नागरून संपली आहे ; व तसेंच नागराला जुंपलेले दोन काहींसे रोडावलेले काळेकाबरे बैल श्रमपरिहाराचे सुस्कारे सोडीत बाजूस उभे आहेत!... दिवसभर काम करून थकल्याभागल्याचा भाव त्यांच्या उभ्या रहाण्याच्या दीन ढबींतच अगदीं पुरेपूर दिसून येतो!..

या पार्श्वभूमीवर, चित्राचा पुढील भाग जास्तच खुलून दिसतो. त्या कोंपऱ्यातील लहानग्या झुडुपाखालीं तो शेतकरी उकिडवा बसला आहे. त्याचे उघडें पण काटकोळे काळें शरीर,...दोन पायांत सुटून, जमीनीवर लोळणारा काळा मचकट झालेला त्याच्या लंगोट्याचा शेवट, डोक्याला गुंडाळलेला पाढरा फडका, काहींशा सुरकुतलेल्या व त्रस्त चेहऱ्यावर वाढलेली तुरळक रुपेरी झालेली त्याची दाढी,... डाव्या हाताने नुकतीच शिलगावून ओटांत धरलेली धूर सुटत असलेली वावली, व दुसऱ्या हातात अर्धी अधिक जळून विझण्याच्या पंथाला लागलेली आगकाडी, पायाजवळच पडलेला तंबाखूचा अर्धवट उपडा बटवा, व आपट्याच्या पानाचा जुडगा,... झाडाखालचे बहुतेक पाण्याने अर्धे भरलेलें मडके,... व झाडापलीकडे मातीत बसून हंसतमुखानें खेळणारें, तीन चार वर्षाचे नागडे, उघडे मूल!... त्या शेतकऱ्याच्या श्रमित चेहऱ्यावर वावलीच्या झुरक्याने मिळालेला क्षणिक आनंद पूर्णपणे प्रतीत होत आहे!. वावलीतून वाऱ्यावर सैरावरा सुटणारा धुराचा लोटहि, कलावंताच्या मनातील त्या शेतकऱ्याच्या आयुष्याच्या रहस्याविषयी, पहाणाऱ्याशी हळुवारपणें हितगुज करीत असल्यासारखा वाटतो.

जो जो, त्या चित्राकडे जास्त निरखून पहावे, तो तो त्यातील प्रत्येक वस्तू-मधून जास्त जास्तच अर्थ निघू लागतो !... मनाचे समाधानच होत नाही. ‘ वावली ’ हे नाव तरी त्या चित्राला किती यथार्थ ? जणूं काय त्याचे जीवनच तसे आहे !....

त्याच्या जीवनाच्या इतक्या यथार्थ ज्ञानाचे केवढे मोठे भाडार तुमच्याकडे आहे ! .. हो, मला वाटते, याचे कारण, तुमचे लहानपणचे खेडवळ जीवन व रसग्रहण करणारे सहानुभूतिपूर्ण प्रेमळ हृदय ! तुम्हाला आपल्या कला कौशल्या-मुळे त्याच्या हृदयाच्या, आनददुःखाच्या सूक्ष्म सूक्ष्म छटाही किती हळुवारपणें व सहजतेने रगविता आल्या आहेत ?.. ते चित्र—सारखे निरखून पाहत हृदयात साठवून मला तुमच्याविषयी किती किती अभिमान वाटला म्हणून सागू, अरुण ? —त्या चित्राला दुसरें बक्षिस मिळावे यात काहीच आश्चर्य नाही !

: २१४ :

आणि ‘ हृदयाचा खेळ ’ हे तुमचे दुसरे चित्र ! तेहि असेच अगदी काळ-जाला हात घालते !

पारधी, हरिणी व तिचें विद्ध पाडस ! अगदी साधाच परिचित प्रसंग ! नाहीं

का ?—पण जगात नेहमी काही तरी नवेच प्रसंग हुडकत बसावे लागतात असें नाही;.. त्यातील सौंदर्य कुंचल्यानी प्रतीत करण्यातच कलावंताचे खरे कौशल्य!... त्यांत स्पष्ट होणाऱ्या भावनावरच त्याची खरी योग्यता समजावयाची! असेंच नाहीं का? ते चित्र माझ्या अगदीं या क्षणीहि डोळ्यांसमोर उभें राहत आहे.

तो अरण्याचा देखावा! एक हरिणी—तिचें पाडस...लाब झाडाआड असलेला व्याध...आपल्या गोजिरवाण्या पाडसाबरोबर स्वैर चरणारी हरणी, व्याधाची चाहूल लागताच, स्वतःचा जीव बचावण्यासाठीं सैरावैरा धावूं लागली असावी.

मायलेक जीव मुठीत धरून चौखुर चालले तरी तो व्याध आपल्या हातची शिकार सोडणार थोडीच! एक बाण...दुसरा बाण...त्याने वेगाने त्याचा पाठलाग सुरू केला असावा आणि...

हाय! शेवटी एक बाण त्या दमलेल्या पाडसाच्या कापसासारख्या देहात शिरला!... एक रक्ताची चिळकाडी... दुःखपूर्ण किकाळी... झाले! तेथेंच सर्व आटोपले असेल!.. ती कोमल तनु जमिनीवर निश्चेष्ट पडली! .. वेगानें पुढें गेलेली माता, पाडसाची करुण किकाळी ऐकून दचकून जागच्याजागी थबकली!.. पण मग क्षणाचाही विचार न करता ती तशीच व्याधाच्या दिशेला वळली. व तोंडाने दीन किकाळ्या फोडत पाडसाच्या जवळ जवळ धावत आली!.. मृत,.. अगदी लुल्या होऊन पडलेल्या आपल्या चिमुकल्याजवळचे रक्ताचें थारोळे ... व छातीत घुसलेला बाण पाहून, त्या दुःखी हरिणीचे डोळे पाण्यानें डबडबले!..

पण हें काय?... स्वतःच्या जीवाची तिला पर्वा नव्हती का?... व्याध आता बाण नाही का सोडणार तिजवर ??..

स्वतः व आपलें निश्चेष्ट पाडस याशिवाय सभोवारचे सारे जग,.. ती विसरली होती! ती पाडसाच्या अगदी जवळ गेली व जखम झालेल्या ठिकाणी, अंगात घुसलेल्या कठोर बाणाजवळ ती त्याला चाटूं लागली!— तिचे डोळे त्यामुळेच भरले होते... व त्या बाष्पबिंदूमुळेच, आपण व्याधाजवळ अगदीं धोक्यांत आहों ही तिची जाणीव साफ पुसट झाली होती!..

व्याध जागच्याजागी तटस्थ उभा होता!.. एक नवा बाण त्याच्या धनुष्यावर चढला!.. त्या दुःखी, बेसावध हरिणीवर त्याने तो रोखलाहि!!

खरच— पण बाण सोडण्याची त्याला छाती होईल का?..

: २१५ :

याच क्षणाला प्राधान्य देऊन काढलेलें तुमचें या देखाव्याचें चित्र!.. खरेंच पण किती सुंदर भाव प्रकट झाले आहेत त्यात हे सारे!. चित्र कसें अगदीं

डोळयासमोर पुन्हांपुन्हां उभें रहातें अजूनहि !

तुमची ‘ वावली ’ व तुमच्या ‘ हृदयाचे खेळ ’ पाहून माझ्या मात्र हृदयाचे खेळ काय झाले, . . ते असल्या तोकड्या शब्दावाचून सागणे मला कठीण आहे ?

अरुण, अरुण, पण हा एवढा मोठा कलेचा साठा तुम्ही कोठून हो आणलात ? —खरंच तुमचं या प्रसंगी कोणत्या शब्दात तरी अभिनदन . . कौतुक, करू . . तेच मला समजत नाही ! . . असले हृदयाचे खेळ खेळणारं माझ्या अरुणाच हृदय, आपल्या हृदयापाशीं घट्ट कवटाळावं, त्याला आपला दुबळा जड कान लावून, त्यांत चाललेल्या असल्या घडामोडींची किंचितशी तरी कल्पना करण्याचा प्रयत्न करावा, . . असें मला किती किती वाटतें आहे याक्षणीं म्हणून सागू ? . .

अरुण, अशा वेळी वाटतं, खरोखरच तुमची योग्यता तुमच्या भोंवतालच्या निकटवर्ती माणसाना समजतच नाही. आणि हे जाणवलं म्हणजे जीवाला अतिशय दुःख होतं ! . .

तरी पण, मग अभिमानानें मन उलट प्रफुल्ल होऊन वाटतं, तेच अरुण अगदी माझे आहेत ! . . तेही मला आपली म्हणतात !—किती मी भाग्याची ? . .

अरुण, तुम्हाला समक्ष भेटायची मला अगदी अनावर इच्छा आहे. सगळें लक्ष उडून मनाचे डोळे सारखी तुमच्याकडे धांव घेतात. केव्हां भेट देता ? बघा, मी तुमच्या दर्शनासाठीं अगदीं आतुर झालें आहे.

आणि पत्र संपण्यापूर्वी एक सागूं का ? तुमचे हें अद्वितीय यश पाहिल्यावर, दोन दिवसापूर्वी मनाला जाचणारे तुमचे डॉक्टरीच्या दुसऱ्या परीक्षेतील पुन्हा आलेलें अपयश मी आता साफ विसरलें ! . . अरुण, मला आता प्राजलपणें वाटूं लागले आहे, . . तो तुमचा प्रातच नव्हे ! . . तुम्ही तें सारे मन मारून चाकोरीत पडल्याप्रमाणे दुसऱ्यासाठी करीत आहां. जगात दुसरेंच कार्य . . अगदीं भिन्न कर्तबगारी करावयास तुम्ही अवतरला आहा ! . . आणि त्यातच तुम्ही देदीप्यमान ताऱ्याप्रमाणें चमकणार !

तुमच्या या अद्वितीय यशानें स्वतःच्या यशाइतकीच उत्कटतेने आनदित झालेली, केवळ तुमचीच,—**मजुळा.**

**ता. क.**—अरविंद नाईक काल संध्याकाळीं सहज इकडे दादाकडे आले होते. त्यावेळीं बोलतां बोलता ते मला म्हणाले कीं, आपलीं चार पाच चित्रें दिल्लीस भरणाऱ्या ‘ अखिल भारतीय कलाप्रदर्शना ’ त ठेवण्यासाठीं, अरुण पुढील महिन्यांत तिकडे समक्षच जाणार आहेत. खरंच जाणार आहात का अरुण तुम्ही ? . . . अनायासें त्या बाजूचा प्रदेशही तुम्हाला पाहावयास मिळेल नाहीं ! . .

हो, आणि तुमच्यासारख्या कलावंताचे हृदय तें पुन्हा! मला तुमच्याबरोबर यायला किती आनंद झाला असता? पण लौकिक दृष्टि आहेना पायबंद घालायला!.. मनांतला असला उत्साह आतल्याआंत दडपावाच लागतो!—

पण निदान गेल्यानतर तेथून पत्रे तरी पाठवाल ना मला! पाठवा हं जरूर!

—मंजुळा.

( ४२ )

मुंबई; ता. २८ एप्रिल १९२९.

प्रियतम मजुळा,

यावेळी श्रेष्ठ यश आणि दीन अपयश असें हातात हात घालून मला सामोरें आलें. मी त्यामुळेंच जास्त भागावलो; कारण जे माझें यश तें माझ्या मंडळींना महत्वाचे वाटत नाही, किंबहुना त्यांना त्याची दाहहि नसते. आणि माझ्या अपयशामुळे मात्र ती बिथरतात. या त्यांच्या प्रेमळ पण कठोर बेफिकीरीनें मी जास्तच निरुत्साही होतों.

असल्या सहारा वाळवंटात तुझे पत्र मला एकाद्या लहानशा दलदलीच्या प्रदेशाप्रमाणे वाटले. मंजुळे, अतिशय आस्थेनें तूं आपण होऊनच प्रदर्शनाला गेलीस, व माझ्या चित्रानीं आनंदून आपल्या पत्रात तूं जिव्हाळ्यानें त्यांचें रसग्रहण व कौतुक केलेस. किती उल्हसित झालें माझें मन या तुझ्या प्रेमपूर्ण आस्थेनें!.. आजपर्यंत अरविंद नाईक किंवा वसंत याच्याशिवाय दुसरी कोणी मला उत्तेजन देणारी स्नेहीमंडळी नव्हती. तुला माझीं दोन्ही चित्रें फार आवडलीं हें वाचून तर मला फार आनंद झाला! असलें एखादें सहानुभूति दाखवणारें स्थान असलें, म्हणजे माणसाचें मन किती उत्साही होतें!.. माझ्या मंजुळेला माझी चित्रें खरोखरच इतकी आवडत असतील, तर पुढे मी माझी सारीं चित्रें अशीच सुंदर होण्याचा अटोकाट प्रयत्न करीन!

हो मंजुळे, त्या दोन्ही कलाकृति,.. माझ्या मलाही फार आवडतात. त्यांच्या श्रेष्ठतेबद्दल मला स्वतःलाही फार आत्मविश्वास वाटतो .. आतां तूं मला विचारतेस हा एवढा मोठा कलेचा सांठा मी कोठून आणला?.. कोणास ठाऊक? माझें मलाही ते समजत नाहीं!

: २१७ :

पण आपल्याला जें मनापासून प्रतीत होतें, ज्यामुळें आपलें स्वतःचें हृदयही तुडुंब भरून येतें, त्याचेंच आपल्या कलाकृतींत चित्रण करावयास, खऱ्या कला-

वताला जो आनंद वाटतो, त्याचें शब्दांत वर्णनही करावयास येणार नाहीं!..

आणिं नाहीं तरी, माणसाची कला आहे तरी कशाला?..

मानवी कला व साहित्य आता म्हणे समाजजीवनाकडे वळूं लागलीं, आहेत. 'गिरणगाव' व 'गिरगाव' असले भेद पाडून कलावंत आपापसात भाडत आहेत!.. कपू करीत आहेत! स्वानुभव, स्वप्रचीती व आत्मीय जिव्हाळा, या गोष्टीचे महत्त्व जवळ जवळ विसरून जाऊन, ते अगदी भिन्न भिन्न विलग विभाग कल्पू लागले आहेत. काही साम्यवादाचें चलनी नाणें हातात धरून, 'गिरणगाव' या कल्पनेला डोक्यावर नाचवितात!.. तर मानवी मनाच्या नैसर्गिक भावना, वासना, याना तहान–भुकेच्या उपमा देऊन, त्याचे नग्न चित्रणच करणे.. हीच कला, अशा प्रकारच्या कल्पना अंगात भिनवून, दुसऱ्या काहिनीं आपलें डोकें बिघडवून घेतले आहे!.. आपल्याच भोंवतालीं आज स्पष्ट दिसणारी ही परिस्थिति!..

पण मानवी प्रगति, आनंद याचा भोक्ता असा खरा कलावान् या मूर्ख झगड्याकडे पाहून मनातल्या मनात हंसतो. श्रेष्ठ साहित्याची, कलाकृतीची,.. असली मर्यादित व्याख्या करीत, तो आपल्या आयुष्याचीं अमूल्य पळें उगीच दवडीत बसत नाही. त्याला कोणत्याही प्रकारची असली यात्रिक फोटोग्राफी मुळींच नको असते. आपल्या कलेंत,.. आपल्या श्रेष्ठ व्यक्तित्वाच्या छटा,.. आपल्या जळजळत्या हृदयातून निघणाऱ्या ठिणग्या,.. मिश्रित व्हाव्यात, म्हणूनच त्याच्या आयुष्याची सारी धडपड असते!.. त्याचे मन, मुख्यतः त्याच्या भोवतालचे जग व त्यातील घडमोडी यांच्या संस्कारानी त्याच्या हृदयात उत्स्फूर्त झालेल्या भावना, विचार,.. यामध्येंच रममाण झालेलें असते. उच्च–नीच,.. सुख–दुःख, असल्या स्वतःला तो भलत्याच मर्यादा घालीत नाही. या त्याच्या कलेत त्याचा सारा धर्मच जणूं सामावलेला असतो.

आणि म्हणूनच तो आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणाक्षणाला जगांतील खेळ पाहतो, त्यांनील सौंदर्य, आश्चर्यकारक घटना, आनंददायक स्थळें, त्यांतील नानाविध रंगीबेरगी छटा, छायाप्रकाश, ... याचे अकलन करतो व मग ब्राऊनिनच्या फ्रालिप्पोलिप्पीप्रमाणेंच स्वतःला म्हणतो—

' But why not do as well as say, paint these,
Just as they are ! careless what comes of it ? ..
Good's works–paint any one and count it crime,
To let a truth slip !..'

आणि याला कारण एवढेंच, कीं साधारण मनुष्य जगांत कांहींसा बेफिकीरीनें वांवरत असतो. ज्या गोष्टी नेहमींच्या दृष्टीनें आपल्याला पहाता येत नाहींत,.. ज्यांचें आकलन करतां येत नाहीं,.. त्याच, कलावंताच्या हृदयांतील ठिण-

ग्यांनीं प्रकाशित होऊन, आपल्यासमोर चित्रित स्वरूपांत उभ्या राहिल्या, कीं, आपलें मन तिकडे जोरानें खेंचलें जातें. क्षणभर कां होईना. आपण त्याच्या कलेशी एकरूप होतों. आश्चर्यानें थबकून, हृदयावर आपला थरथरता हात धरतो. विस्मयानें, विमूढ अंतःकरणानें तिकडे सहानुभूतीनें पहातों! व नंतर कांही क्षणच कां होईना, आपल्या अंतःकरणांत भयंकर व जोरदार कोलाहल उठतो! झालें!.. तेथेंच त्या कलावंताच्या श्रेष्ठ कलाकृतीचें काम संपतें!... मागाहून जगाच्या अगदी अंतापर्यंत ती दुर्लक्षिली गेली... तरी त्याचें त्याला कांहीं वाटणारहि नाहीं!

म्हणूनच मी म्हणतो, की, खऱ्या कलावंताला कसलीं बंधनें नसतात. त्याला आपला असा काही कंपू, पंथ आहे असें वाटत नाहीं. त्याच्या उदार संस्कारक्षम हृदयाला, दुसऱ्यांच्या इतक्याच स्वतःच्या कलाकृतींविषयीहि नैसर्गिकपणें अत्यंत आत्मविश्वास, आदर वाटत असतो!

: २१८ :

मंजुळे, आजपर्यंत माझ्या हातून जी तुटपुंजी कला निर्माण झाली, ती असल्याच ध्येयानें प्रेरित झाली आहे. व म्हणूनच मी माझ्या प्रत्येक कृतीकडे उत्साहानें, आत्मविश्वासानें पहातों. केवळ लोकांच्या उत्तेजनावर, त्यांच्या गौरवावर अगर उपहासावर दृष्टि ठेवावयाचे मी केव्हाच सोडून दिलें आहे!.. माझी कला कदाचित्, सर्वांपेक्षा माझी मलाच जास्त आनंदित करीत असेल! आणि मला वाटते, रसिक मनाला माझी कला म्हणूनच जास्त सुखी करूं शकते!..

पण, मंजुळे, इतके सर्व ठाऊक असूनही, अनेकवेळा मी निरुत्साही होतों. मी म्हणतों तितका जात्या धीर प्रकृतीचा मी नाही. मला माझ्या माणसाच्या उत्तेजनाची अजूनहि अपेक्षा आहे खास!

आता माझ्या हृदयाच्या या इच्छाआकाक्षा निराळ्या! मी माझ्या माणसांकरिता करीत असलेल्या धडपडी निराळ्याच स्वरूपाच्या! त्यामुळे तर मी जास्तच भांबावून जातो.

माझ्या हृदयांतील कारखाना रात्रंदिवस धडधडत असतो. फलक, कुंचले आणि रंग, माझ्या स्वप्नातही मजपुढें उभे राहतात. आणि मग मानवी शरीरातील जड हृदयाच्या विविध विभागांचा अभ्यास माझ्या मनात बिंबतच नाहीं. बाबाच्या आग्रहानें, काहींशा आशावंत मनानेंच मी हा कोर्स माझ्या आयुष्याचें ध्येय म्हणून घेतला खरा; पण डिसेक्शन रूममध्यें मृत शरीराची, ज्ञानासाठी करावयाची कांपाकांप, माझ्या धडधडत्या हृदयाला शल्याप्रमाणें बोंचते. मला त्यावेळीं वाटतें, या निर्जीव हृदयाच्या चिरफाडींत मला जें ज्ञान मिळेल,

त्यापेक्षा चोवीस तास धडधडत असलेल्या, एकट्या माझ्या स्वतःच्या हृदयांतच मी खोल अवगाहन केलें, व मला जें मनापासून वाटतें, प्रतीत होते, ते माझ्या कलाकृतींत चित्रित केलें, तर मला जास्त आनंद होईल! . . . पण . . .

: २१९ :

लौकिक दृष्टीसाठीं मनुष्याला काही गोष्टी मनाविरुद्ध करीत रहाव्याच लागतात. व्यक्तीला सरळपणें, मोकळेपणें समाजात जगता आलें नाही, कीं तो दंभाचें कातडें पांघरल्यावांचून राहत नाहीं. फसवेगिरी मनुष्य जन्मतःच घेऊन येत नाहीं. परिस्थितीच त्याला तसें बनवते! आणि माझा हा मेडिकल कोर्स असल्याच प्रकारचा एक दांभिक डोलारा आहे.

एवढें मात्र खरें, मी चित्रकला, गायन वगैरे माझ्या नैसर्गिक आवर्डातील यशासाठीं, त्यांत करावयाच्या प्रगतीसाठींच, अलीकडे जास्त लक्ष देत आहे. कारण, मी आतां समजून चुकलों आहें, कीं, आपली माणसे झाली तरी, आपले मन कायमचे मारून, त्याच्या प्रवादाच्या भुताला भीक घालणे केव्हाहि योग्य, हितावह नाहीं. स्वतःव्यतिरिक्त, लोकाना खूष ठेवण्याच्या खटपटींतून काहीच निष्पन्न होत नाहीं. शेवटीं ते तर संतुष्ट होत नाहींतच; पण स्वतः आपण मात्र दुःखी होतों! त्यामुळेंच, तूं तुझ्या पत्रात लिहिलें आहेस त्याप्रमाणेंच, मला माझ्या कोर्समधील परवाच्या आणखी एका अपयशाचें मनात काहींच वाटलें नाहीं. अगदीं मनांतलें खोल खोल आहे तें सागावयाचे,. . .म्हणजे बाबाच्या समाधानासाठीं त्यांच्याशीं माझा चाललेला तो एक आस्यापाख्याचा, लपंडावाचा खेळ आहे! अगदीं नाइलाजानेंच मला तें सारें करावे लागत आहे.

: २२० :

ती. बाबाचा मजविषयींचा एकंदरींत अविश्वास तर दिवसेंदिवस जास्तच वाढत चालला आहे. परवा त्याना माझ्या अपयशाबद्दलचे वृत्त ऐकून माझा रागच आला असेल! त्यांत, मी शातिनिकेतनला जाणार, ही कल्पना त्याच्यापुढें ठेवल्यामुळें ते आणखीच चिडले असतील. पण त्यांना कधीं सुखी करणे मला शक्य दिसत नाहीं. मग अशा वेळीं मौन स्वीकारणेच बरें, नाहीं का?

हो, तूं ताजाकलम लिहून विचारलेस ते खरे आहे. मी पुढील पंधरवड्यात दिल्लीस जाण्याचा बेत नक्की केला आहे. त्यामुळेंहि आणखी कदाचित् बाबा बिथरतील.

त्यांतील खरी वस्तुस्थिति अशी;.. मी दिल्लीस प्रदर्शनात किंबहुना कोठल्याहि प्रदर्शनांत, चित्रें पाठविण्यास विशेषसा उत्सुक नाहीं. पण त्रिनिदाद मास्तर माझे एक हितचिंतक आहेत. त्याना माझ्या आजपर्यंतच्या सर्व कलाकृति फार आवडतात. किंबहुना आतापर्यंत मी जें थोडें फार नाव मिळविलें आहे तें

त्यांच्याच उत्तेजनानें व मदतीनें. त्यामुळें त्यांनीं मुंबई प्रदर्शनांतील यंदाची दोन्ही चित्रें व आणखी त्यानीं निवडलेली माझीं दुसरीं दोन चित्रे, मिळून एकंदर चार चित्रे, दिल्लीस प्रदर्शनात ठेवण्याचा मला आग्रह केला. एवढेच नव्हे तर म्हाताऱ्यानें मला आपणहून पन्नास रुपये खर्चास देऊं केले. तेव्हा मात्र त्यांचा इतका उत्साह व उत्तेजन पाहून मीच ओशाळलों. नाहीं तरी मला गेल्या मुंबईच्या प्रदर्शनात दोन्ही चित्रातून मिळून सव्वाशे रुपये मिळालेच आहेत. तेव्हां मी जाण्याचा बेत लागलीच नक्की केला.

अर्थात्, तेथे गेल्यावर, जमल्यास मी काश्मीरपर्यंत जाऊन येण्याचा विचार करीत आहें. पाहू काय काय जमते तें. जाण्यापूर्वी तेथें प्रदर्शनात ठेवण्यासाठीं एक नवें चित्र पुरें करावयाचें आहे. त्यामुळें बहुतेक तुला समक्ष भेटणे शक्यच होणार नाहीं, पण तुला प्रवासांतून दोन तीन पत्रे मात्र अवश्य लिहीन.

तुझाच **अरुण**

( ४३ )

( N. W. F. ) Peshawar.,
ता. २० मे १९२९.

प्रियतम मंजुळा,

वरचा लिहिलेला सरहद्दीचा पत्ता वाचून तूं आश्चर्यचकित होशील नाही? पण येथपर्यंत आम्ही कसे पोहोंचलों, हे सांगण्यासाठींच तुला हे पत्र मुद्दाम लिहावयास घेतले आहे.

तुला, गेल्या पत्रात कळवल्याप्रमाणें, शेवटीं मी माझें चौथें चित्र पुरे करून दिल्लीला निघून गेलों. येण्यापूर्वी मी समक्ष बाबाकडे गेलों होतों. त्यांना माझा बेत कळवला. पण ते आपल्याच कामात गुंतले होते. जा, नको, काहींच न म्हणाल्यामुळें, मी त्याच्या त्या मौनातून पडत्या फळाची आज्ञा घेतली.

दिल्लीचें प्रदर्शन फार मोठ्या प्रमाणावर भरलें होतें. जवळ जवळ सर्व हिंदुस्थानांतून अनेक कलावंतानीं आपापलीं सुंदर चित्रे तेथें पाठविलीं होतीं. कांहीं कांहीं ठिकाणीं, वशिल्याचीं तट्टें दिसून आलीं, तरी त्यांतील इतर अनेक इतकीं उत्कृष्ट होतीं, कीं, माझें हृदय त्या त्या कलावंतांविषयींच्या आदरानें अगदीं भरून आलें. त्यावेळीं मला किती वाटलें; माझी मंजुळा मजबरोबर हें सर्व पाहावयास तेथें असती तर! पण...

या पणविषयीं येथें विचार न केलेलाच बरा; कारण पत्रांत अजून लिहिण्यासारखें बरेंच आहे. तेव्हा सांगायचें म्हणजे माझे गेले तेरा चौदा दिवस असेच कलानंदात गेले. दिल्लीस आलेल्या ठिकठिकाणच्या नवीन नवीन चित्रकाराची ओळख करून घ्यावी, त्यांच्या निवासस्थानीं जाऊन त्याच्या इतर चित्राचा अभ्यास करावा, अशा तऱ्हेनें माझा वेळ कसा गेला तें माझें मलाच समजलें नाहीं; त्यामुळे तुला आजपर्यंत पत्र लिहावयास मला मुळीं फुरसतच झाली नाहीं. रागावूं नकोस ह !–

प्रदर्शन संपल्यावर या गडबडींतून गेले दोनतीन दिवसच काय ते आम्ही मोकळे झालों आहों. हो, तुला सांगावयाचे राहिलेच, म्हणजे माझ्या चार चित्रापैकीं मुंबईच्या प्रदर्शनातील 'वावली' व निघण्यापूर्वीच संपवलेले 'धुक्यातून' या दोन चित्राची दिल्लीस अतिशय प्रशंसा झाली. 'वावली'ला तिसरें बक्षिस मिळाले व 'धुक्यातून'ला निरनिराळ्या संस्थातर्फे तीन सुवर्णपदके मिळाली आहेत. कदाचित् तूं आतांपर्यंत वर्तमानपत्रात ते वाचलेहि असशील म्हणा. तेव्हा दिल्लीस गेल्याचं एकंदरींत चीज झालं म्हणावयाच ! आमच्या मास्तरसाहेबांना किती आनंद झाला असेल. त्याना मी परवाच सविस्तरपणें आदरपूर्वक पत्र पाठवलें आहे.

दिल्लींत भेटलेल्या चित्रकारांपैकीं दोघाशीं माझी विशेष मैत्री झाली आहे. एक कलकत्त्याचा गांगोली व दुसरा रामेश्वराजवळील एका खेड्यांतील श्रीनिवास स्वामी. आम्हीं तिघानीं कांहीं दिवस एकत्र आनंदानें घालविण्यासाठीं, जवळपासचीं प्रेक्षणीय स्थळे पाहात प्रवास करावयाचे शेवटीं ठरविले. आणि त्याप्रमाणें प्रथम आग्रा, दिल्ली, तेथून पेशावर व आज हिंदुस्थानची सरहद्द गाठली आहे!..

आता, या क्षणीं, वाटसरूंना पासपोर्ट विचारणारी पाटी आमच्यासमोर आहे. त्या पाढऱ्या दगडांजवळील तारेच्या कुंपणापाशीं, खाद्यावर बंदुका घेऊन एकमेकाकडे पाहात पाहारा करणारे हे सोल्जर बघून आमची किती निराशा होत आहे म्हणून सागू ?.. या मर्यादेमुळें आतां अफिगाणिस्थान राहिलें दूर!... परत शीरसलामत कसे जातों याचीच जणु भीति वाटते !. .पण गागोली बसला आहे येथील एका लॅडस्केपचे स्केच करीत ! आणि हा मद्रासी स्वामी म्हणाला, थोडा वेळ मी मोटारींत लवंडतो.

या रुक्ष प्रदेशांत, मला तर कुंचला हातीं घ्यावासाच वाटत नाहीं!.. तेव्हां म्हटलें, आता, गागोलीचे संपेपर्यंत काय करावें ? तुला कबूल केल्याप्रमाणें पत्र लिहिण्यास आतांपर्यंत फुरसतच झाली नव्हती. तेव्हां हिंदुस्थानच्या अगदीं उत्तर टोंकावरून बसलों आहे तुला हें पत्र लिहायला !–

गेल्या चार पांच दिवसांतील वृत्तात सांगावयाचा म्हणजे आग्र्यापासूनच सुरवात करावयास पाहिजे. तेथील तो जगप्रसिद्ध ताजमहाल पाहून अंगावर खरोखरच रोमांच उभे राहिले. ते चार बाजूंचे उंच मनोरे, मधली, सूक्ष्म नक्षीकामाने सुशोभित केलेली ताजमहालची इमारत, समोरचा कमळपर्णांनीं सुशोभित दिसणारा काळसर पाण्याचा हौद व त्याला जोडून लांबवर पसरलेला पाण्याचा पाट.. ती दोन्ही बाजूस नीट निगा राखलेली सुरूंच्या झाडाची बाग!.. त्या दुर्दैवी पण प्रेमी बादशहाचें तें प्रेमाचें प्रतीक, आमच्यासमोर आजही उभें होतें!

पहाता पहातां, मला गद्गदून आलें. अनेकविध विचारभावनाचा सागर फैलावून सोडणारा तो देखावा किती करुणरम्य होता?..त्या प्रसंगीं मला तुझी एकदम आठवण झाल्यावाचून राहिली नाहीं... विचार करण्यापूर्वीच माझी दृष्टि तुझ्या शोधासाठीं चौफेर सैरावैरा धावूं लागली. जणूं काय चुकून तूं त्या वातावरणात अवतीर्णच होणार होतीस. प्रेमाचें तें प्रतीक शतकानुशतकें रम्य इतिहास घोलत होतें. आणि मी! माझी मंजुळा??.. कोणास ठाऊक काय होणार आहे तें?...

एक क्षणच गेला असेल नसेल, तों दुसरींच एक अगदीं विरुद्ध कल्पना डोक्यात आली!.. काय ही पैशाची उधळपट्टी!.. ही कलाकृति निर्माण करणारीं माणसे!.. झालीं ... गेलीं ... आतां सारीं मातीला मिळालीं! त्याचे आतां कोण नांव घेतों? शहाजहान तेवढा आठवतो. हे इतके लाखों रुपये येथें पडून राहिले ... आणि तिकडे लाखो अन्नान्न करीत रस्त्यात तळमळत पडले आहेत!

पण मी दुर्बल मनुष्य तरी काय करणार? मोठ्या शिकस्तीने मनावर ताबा मेळवून इतराबरोबर आग्र्याच्या किल्ल्याकडे वळलों.

ज्या ठिकाणीं पूर्वी अत्तरांचा, गुलाब पाण्याचा, चंदनाचा घमघमाट सुटत असे, तेथेंच हल्लीं फैलावलेला कोंदट असा दुर्गंध माझ्या मनाला फारच दुःखी करीत होता. मनुष्य... तो श्रेष्ठ बनवीत असलेलीं स्थानें!... त्याला वाटत असतें तितके सर्व शाश्वत नसतें तर! राजकुलांतील मंडळीची ये-जा होणाऱ्या या जागीं हल्लीं दिसत असलेलीं कोळ्यांचीं मोठालीं जाळीं व घुबडावटवाघळांची वस्ती पाहून अंगावर एकाएकीं कांटा उभा राहिला. या साऱ्या घडामोडी करणारा काल... नमस्कार असो त्याला... माझ्या या क्षणीं मला शाश्वत वाटणाऱ्या भावभावना... मी स्वतः... कोठल्या कोठें नाश करून टाकील सर्वांचा! मग कुठला मी? मंजुळा?... कुठल्या माझ्या भावना?... कुठलीं माझीं माणसें?

परवां दिवसभर दिल्लींत फिरत होतों!.. तेथील तो जुनाट अवशेष ..

पांडवांपासूनच्या गोष्टी सागणारे इंद्रप्रस्थ .. शहाजहानची नाझीमन–इ-झिल–इलाहीची गादी . . सुंदर स्त्रियांचीं प्रेक्षणीय स्नानगृहें !. . सारीं आम्हाला इतिहासकालात नेऊन सोडीत होतीं !. . पण त्या हुमायुनापासून तो त्याच्या हजामापर्यंत सर्वांच्या कबरी पाहिल्या,. . उंच उंच भराऱ्या मारावयास निघालेला पण दिवसेंदिवस पायरीपायरीने खालीं कोसळतच येणाऱ्या कुतुबमिनाराकडे दृष्टि वळली, कीं, मन जास्तच डळमळे ! . . अशोकाचे जयस्तंभ पाहून बुद्धाचीहि आठवण झाली ! पण, ती सारीं मोठीं माणसें तरी कायम कोठें टिकलीं ? .. आणि ती गलीं म्हणून कोणाचे कोठें अडून राहिलें आहे थोडेंच ? ? . . जग तसेच आपल्या हालचाली पुढे चालवीत आहे. कविवर्य तांबे म्हणतात तें खरेंच ! . . ' जन पळभर म्हणतिल हाय हाय ! '

: २२३ :

दिल्लीहून काल आम्ही पेशावरला आलों. पेशावरहून आता दोन चार तासापूर्वीच खैबर पासांतून आम्ही इकडचा मार्ग काटीत होतों !

रस्ता गरगर फिरत होता. मध्यावरच्या त्या अडचणीच्या चढणीवरून येतांना, दोन्ही बाजूचे उंच पण रुक्ष डोंगर आमच्याकडे टवकारून पहात होते. त्यात मधून मधून दिमणारीं खबदाडे व लपण्याच्या गुहवजा जागा, आमच्या कानात इतिहासाचीं पानेंच जणुं कुजबुजत होत्या !. . ते लढाईचे प्रसंग . . त्या रक्ताचे पूर वाहविणाऱ्या झटापटी ! ... आमच्यावर हल्ला करावयास, हत्यारबंद क्रूर आफ्रिडी धावूनच येत आहेत कीं काय, असाच क्षणभर मनाला संशय येई !

इतक्यातच, एखादा खराखुरा आफ्रिडी खांद्यावर बंदूक घेतलेला दिसला कीं वाटावे, आता येथे इतिहासाची पुनरावृत्ति होणार ! . .

निरनिराळ्या शत्रुमित्रानीं तुडवून पायवाट केलेला तो भयंकर रस्ता काटत असताना तासापूर्वी मनात कसले विचार थैमान घालीत होते !.. पण त्या साऱ्याचे वर्णन मी कसे करूं ? माझ्या मनाला वाटत होते, जणूं इतिहासातच आम्ही वावरत आहो.

: २२४ :

पण आतां सभोंवतालच्या या रुक्ष प्रदेशाचा व या इतिहासाचा आह्मांला अगदी कंटाळा आला आहे. दोन तीन दिवस सारखे तेंच चालले आहे. तेव्हां आह्मी आता तिघानीहि ठरविले, कीं काश्मीरसारख्या निसर्गरम्य प्रदेशाच्या इतक्या जवळ आल्यावर, आपापल्या घराकडे एकदम परत फिरण्यापेक्षां, आतां, पेशावरहून रावळपिंडी व रावळपिंडीहून थोडा मोटरप्रवास, थोडा जलप्रवास करीत काश्मीर गांठावयाचें. त्यामुळें आमचा आनंददायक एकत्र सहवास आणखी पांचसहा दिवस वाढूं शकेल.

पण, पुरें झालें आतां!.. पांच तासांनीं पेशावरला आह्माला गाडी आहे आणि हा गागूलीही आला; त्याचं स्केच संपलं वाटतं! मीहि कांहीं स्केचेस व फोटो काढले आहेत, मी आल्यावर तुला ते पहावयास मिळतीलच.—पण आता हात आखडतां घेतों. ही पहा मोटार धडधडूं लागली. स्वामी जागा होऊन मला हाक मारीत आहे!..

आतां पुढलें पत्र काश्मीरहून,.. बरं कां ?— तुझाच अरुण.

(४४)

गुलमर्ग; (काश्मीर) ता. २७ मे, १९२९

प्रियतम मंजुळा,

सरहद्दीवरून लिहिलेले पत्र आता तुला पोहोंचलें असेल. काय आनंदात दिवस गेले एकएक या काश्मीर प्रांतात! अनेक सुंदर देखावे माझ्या कुंचल्यानें धरून ठेवण्याचा मी प्रयत्न करीत आहे. पण सर्व फोल ठरत आहेत.

निसर्ग आणि मनुष्य यात हाच फरक!..

पण नाहीं म्हटलें तरी शब्दात या प्रांताचें सौंदर्य गोवण्याचा फोल का होईना प्रयत्न करून पाहातोंच! जो आनंद सध्या मी येथे भोगीत आहे व ज्याने माझे हृदय कोंदाटत आहे, त्याची प्रत्यक्ष नाहीं पण थोडी तरी कल्पना तुला होईल, त्याने. प्रेमळ हृदयाची ओढ अशी मोठी चमत्कारिकच असते बघ.. एकाला आपल्या निरनिराळ्या, विशेषतः आनंदमय, अनुभवात दुसऱ्याने वाटेकरी व्हावें असे मनापासून वाटत असते!.. नाहीं का ?

आम्ही या प्रातात शिरलो एवढेच काय तें!.. सृष्टीमातेचे आमच्यावरील प्रेम क्षणाक्षणाला वाढत चाललें होते. ती अगदीं उत्साहानें नवनवीन नाविन्याने भरलेले खेळ आमच्याबरोबर खेळूं लागली. आम्ही काटीत होतो त्या सरळ रस्त्याच्या दोन्हीं बाजूनीं हिरवीं शेतें व लाबवरचे पण हळुहळू जवळ येणारे हिममय डोंगर... रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या पापलर झाडाच्या उभ्या रागा ... त्या लाब लाब जाऊन सरतेशेवटीं एकमेकाना कडकडून भेटलेल्या पाहताना, मन अगदीं उल्हसित होई. बारामुल्लापर्यंत असे आम्ही केव्हा येऊन पोचलों त्याचे मला भानही राहिले नाहीं. तेथून आम्ही तिकडे प्रचारात असलेल्या डोंगा नावाच्या बोटीत बसलो. सोपूर व वुलर तलावावरून श्रीनगरकडे जाताना दोन्ही बाजूनीं तीं पोपटी शेतें मनाला पुन्हा पुन्हा ताजेतवाने करीत होती. मध्येच एकादी दरी दिसे आणि तिच्या अंकावर खेळणारे झुळझुळते अच्छोदकाचे झरे ..

श्रीनगरमध्यें प्रथम तिथल्या एका धर्मशाळेंत आम्ही बस्तान ठोकलें. त्या दिवशीं तेथील फळें खाण्यात व फुले पाहण्यांतच सारा वेळ गेला.

पण दुसऱ्या दिवसाचें तें निरनिराळ्या बागातील उत्साहवर्धक परिभ्रमण!

डालतळ्यातून जातांना कोण मौज वाटली! सर्व बाजूंनीं पाणीच पाणी! लांबवर पसरलेलीं कमळाचीं पानें! वाऱ्याच्या मंद झुलुकांच्या कंपाप्रमाणें, मधून मधून आपली मान खालीं वर वाकविणारें उंच वाढलेलें पाणगवत! लांब उभे राहून आमच्या भावना अजमावणारे गगनचुंबी डोंगर व गर्द झाडे!

चोंहोबाजूस आनंदाचा नुसता पूर चालला होता,.. जणुं काय!

: २२६ :

जहागिराच्या वेळचा तो शालीमार बाग! पाण्याचे फवारे हवेंत उडविणारे कारंजे! लहान लहान धबधबे!.. जातां जाता शेवटीं चष्मशाही आली. अहाहा! तें रम्य स्थान पाहून कोणाला आनंदाच्या उकळ्या फुटणार नाहींत? निसर्ग व मानवी करामत त्या ठिकाणीं हातात हात घालूनच जणूं खेळत आहेत!

एका छपराखाली बाधकाम केलें आहे. मध्यभागी काळ्यादगडाचे तोंड दिसतें. त्यातून तो स्वच्छोदकाचा खेळकर चष्माशाही झरा, सारखा ' सळ्सळ् ' असा मंजुळ आवाज करीत जन्म घेतो. आणि त्या शात वातावरणांतील तो मंजुळ खळखळाट मनाला एक प्रकारची अवर्णनीय तृप्तता आणतो.

तो खळखळणारा झरा,.. लाबपर्यंत गेलेला, वृक्षाच्छादित, वक्र व चढउतार करणारा रस्ता,.. त्या पलीकडील लाब अंतरावर दिसणारें ' डाल ' तळें!... समोर पसरलेला सर्व देखावा पाहिला आणि वाटले,.. त्या झऱ्याचें अमृततुल्य पाणी पिऊन, त्या बागेच्या आवारातच निसर्गदेवतेच्या कृपाप्रसादात आपलें सारे आयुष्य घालवावे!..

खरेंच, मंजुळे, ' व्यवहारी ' जगाच्या कुचक्या वातावरणात श्रीमंत धनी होऊन राहण्यापेक्षा, निसर्गाच्या तसल्या आनदी वातावरणात त्याचे दास बनून गरीबींतच कालक्रमणा करावी!..

असें काहीं पाहिले, की, भावनाशील माणसाचा हृदयसागर अगदीं उचंबळून येतो!... अशा वेळीं आम्ही चित्रकार खूप धडपड करून आपल्या चित्रफलकावर निसर्गाची वृथा नक्कल करण्याचा प्रयत्न करतो खरी!.. पण निसर्गाला सहज शक्य असलेले तें नैसर्गिक सौदर्य आमच्या सारख्याच्या दुबळ्या छटांतून किती उदात्त व किती उठावदार?... बा निसर्गा, धन्य तुझी!...

: २२७ :

नंतर व्हेरिनाग, अच्छाबल करीत करीत आम्ही हें गुलमर्ग गाठलें!...

बर्फ, बर्फ! चोंहोबाजूस बर्फ!. आम्ही ते दोन तीन दिवस, त्यात कसें गड-

बडां लोळलों व तें कसें हांवऱ्यासारखे बोकाणलें तें आमचें आम्हांला ठाऊक !

त्या मुक्कामातील परवाच एक ताजा प्रसंग तुला सांगितल्यावांचून मला येथें राहवत नाहीं.

त्या दिवशीं, आम्हीं आमच्या वाटाड्यामागून, सारखें पुढें पुढें वर चढत जात होतो!.. समोर दिसणारें बर्फाचें शिखर गाठणें हीच आमची त्यावेळची महत्त्वाकांक्षा होती!.. आतांपर्यंत चढून आलेला रस्ता काहीतरी भक्ष्य घशाखालीं उतरवून ते पचवीत स्वस्थ पडलेल्या आरासारखा दिसत होता.

आमच्यापासून जग कितीतरी खाली .. जणूं किती तरी योजनें लांब . . आपल्या लहान सहान सुखदु:खात गढून जिणें कंठीत होतें !..

आम्हीं आत आत . . अगदीं जंगलांत शिरलों. अनेक शतकें लहान लहानशा जागा व्यापणाऱ्या जुनाट झाडांजवळच,.. आज आहेत उद्यां नाहींत अशा तऱ्हेचीं चित्रविचित्र रंगाची फुले धारण करणारी लहान मोठी रोपटीं आमच्यासमोर पसरलीं होती. मधूनच आम्ही तुडवीत असलेल्या भुसभुशीत हिमाच्या लहानशा ढिगाशिवाय त्या एकाकी वातवरणात दुसरें काय दिसणार ?

आमच्या चालण्याचा, लांबच्या ओहळांच्या खळखळण्याचा, व मधूनच एखाद्या स्वेच्छाचारी विहंगाच्या कूजिताचा, याशिवाय तेथे कसला शब्दही ऐकूं येत नव्हता. नाही म्हणावयास आमचा मधून मधून संवाद चाले तेवढाच; बाकी सर्व अगदी सामसूम!...

शेवटीं, आम्ही आमच्या इच्छित स्थळाजवळ तर येऊन पोंचलो. ती टेकडी, तिच्या पायथ्याजवळचीं हिरवीं झाडें, त्याच्याजवळूनच जाणारा लहानसाच पण स्वच्छ पाण्याचा खळखळणारा प्रवाह . . . . सर्व पहातां पहाता, माझ्या मनांत किती तरी कल्पना येऊन गेल्या. टेकडीच्या पायथ्याजवळून दिसणारी ती झाडी,.. नंतर अनेक वर्षे. . . शतकानुशतकें तेथेंच पडून राहिलेल्या काळ्या दगडाच्या शिळा आणि वर शिरोविभूषणासारखा शोभणारा तो हिमाचा थर! . .

मनात क्षणभरच कल्पना आली—अरबी भाषेतील सुरस गोष्टींत वर्णिलेला जादूचा डोंगर तर नव्हे ना हा ?

टेकडीवरील हिममुकुटाच्या आशेनें आमच्याप्रमाणेंच इतकी वाट चालून आलेले हे मोठमोठे लोकच, वर चढून जातां जातां, या प्रवाहरूपी 'कोणीतरी' चा शब्द ऐकून, द्विधा मनस्थितींत शेवटीं मागे वळून पाहिल्यामुळेंच जणूं, काय तेथें लहानमोठ्या शिळा होऊन पडले आहेत !...

आणि मग त्यांच्यामागून आता आम्ही आलों!.. आम्ही तरी वरपर्यंत पोंचून त्या हिममुगुटाचा ताबा घेऊन,..त्या मंत्रयुक्त पाण्याचा उपयोग करून,... त्या

शिळांचा मनुष्यत्वांत उद्धार करूं.. कीं, त्या सुंदर प्रवाहाच्या खळखळीनें मार्गे पाहण्याचा मोह न आंवरून स्वतःच इतर शिळात नवीन आकारांची भर पाडूं! ...

कल्पनाच होत्या नुसत्या त्या ! पण वरची सुंदर हिममय शिखराची उभी वाट चालूं लागावे,... तर तो स्वच्छोदकाचा झरा मोहिनी घालून मागेच खेचीत होता. धन्य त्या निसर्गाची !

आम्ही शेवटीं प्रयासानें वर तर येऊन पोंचलो. सभोवार सर्व बर्फच बर्फ !..पाय-थ्याचा प्रवाह अजून फेस उडवीत होता !.. ज्या गवतावर आम्ही मघा लोळत होतों, तें आता अंथरलेल्या हिरव्या गालिच्याप्रमाणे दिसत होते.. दुसऱ्या बाजूस हिमाने आच्छादित शिखरे आम्ही उभ्या असलेल्या शिखराला मोठ्या प्रेमाने आलिंगन द्यावयास पुढे येत होतीं,...आणि चौथ्या बाजूची ती तुटलेली, खोल दरी,...खाली लाबवर बिंदूप्रमाणे दिसणारीं तीं लहान लहान घरें व त्यातील मानवी संस्कृति ! मैदानावर इतस्ततः बागडणारे..पण पुसट रेघाप्रमाणे दिसणारे लहान लहान प्रवाह ! . . . .

मी पुन्हा सभोंवार पाहिलें. ढग अगदीं हाताशीं आले होते. जणूं काय त्याच्या मनांत विचार आला असावा— ' बरे बाबानो, चाललों आह्मी. आता कसचे पुन्हा तुह्माला भेटतों ?'.. आणि म्हणूनच जणुं काय ते आम्हालाच मिठी मारीत होत. ' अज्ञात ठिकाणाहून आले आणि अज्ञात ठिकाणी चालले ' माझ्या मनांत विचार आला!

अहाहा! आनंद!! आनंद!! जिकडे तिकडे आनंद दाटल्याप्रमाणें वाटत होते मला! एकाएकी लहानपणी वाचलेल्या सदेच्या कवितेची आठवण झाली— ' पहातो त्या सर्वांचा मी अबाधित राजा आहे! '

I am the monarch of all I survey;
My right there is none to dispute !

: २२८ :

मंजुळे, त्या वातावरणातून मनाविरुद्ध एकदाचा खालीं आलों! . . . पण पुन्हां जगांत असतील असे वाटणाऱ्या सुखदुःखाची झळ, माझ्या मनाला जास्त जास्त भासूं लागली.

तेवढा वेळ विसरलों होतों ते माझे चिमुकलें जग, त्याचा जुना, नवा नवा इतिहास, तूं, . . . माझें भवितव्य . . सारीं पूर्वीप्रमाणेच माझ्या मनात पिंगा घालूं लागलीं!... हिमाच्छादित डोंगरानीं, नागमोडीं वेळणे घेत जाणाऱ्या अच्छो-दकाच्या झऱ्यानीं, अनेकविध वृक्षराजींनी गजबजलेला तो नयनमनोहर काश्मीर प्रांत खरोखर स्वर्भूमीच आहे! ....

एथूनच आम्हीं उद्या आपापल्या प्रांतात परत फिरण्याचा विचार केला

आहे; पण तो सोडून जाण्यास आमचे मनच तयार होत नाहीं! वाटतें... मला तरी अगदीं मनापासून वाटते... एथें पुन्हा पुन्हा यावे! तेथील आशानिराशा उत्पन्न करणाऱ्या त्या व्यवहारी वातावरणापासून अगदीं दूर दूर अशा... येथल्या चिरंतन सुख देणाऱ्या बर्फात लोळत,.... या सभोंवारच्या मनोहर वनराजीकडे पहात, ... आपले उरलेलें आयुष्य येथे अगदीं शातपणे कंठावें!...

पण तरीही, तुझी व मावशीची आठवण होताच, शक्य तितक्या लौकर परत फिरण्याचा मी विचार करू लागतों — तुझा— **अरुण.**

( ४५ )

मुंबई, ता. ११ जून १९२९.

प्रिय मंजुळा,

प्रवासांतून लिहिलेल्या माझ्या पूर्वीच्या दोन पत्रामुळे तुला आनंद झाला हें येथे आल्यावर मला मिळालेले एक पत्र वाचून समाधान वाटलें!—

आणि खरंच किती आनदात गेला तो वेळ! बरोबर नेलेली चारीं चित्रें मी येण्यापूर्वी तेथेच विकलीं;.. त्याचे मुद्दाम काढविलेले फोटो तेवढे बरोबर आणिले आहेत! योग्य माणसाच्या दिवाणखान्यात आपली चित्रें लटकलीं जाण्याचा योगहि क्वचितच येत असतो. माझीं चित्रें तेथील एका रसिक प्रोफेसरने खरेदी केलीं आहेत! खरें पाहता, तीं विकावयाचें माझ्या अगदीं जिवावर आले होतें; पण आज मला जितकी रक्कम हातीं असेल तेवढी पाहिजे होती.

बरी आठवण झाली;... तुझ्या पत्राबरोबरच बाबाचेही एक पत्र आले आहे. त्यात त्यानीं मला मी जाण्यापूर्वी तुला दाखविलेल्या त्याना लिहिलेल्या पत्राचे उत्तर दिले आहे. त्यात बाबांनीं मला या दुटप्पी वर्तनाबद्दल बराच दोष दिला असून मला शातिनिकेतनला जाण्याऐवजीं त्याच्या वशिल्याने मिळत असलेली एक नोकरी स्वीकारण्यास सागितले आहे. पण मी माझा बेत आता बदलणें शक्य नाहीं. गेल्या काहीं वर्षातील घटना अनुभवल्यावर काश्मीरहून आल्यापासून मला असल्या या वातावरणातून काहीं काळ तरी अगदीं दूर दूर जावे असे उत्कटतेनें वाटत आहे. पाहूं आता, या बाबतींत पुढे काय काय होतें तें!

: २३० :

परवाच मी व अरविंद चाललो असताना आमचे शंकरकाका मला रस्त्यात भेटले होते. तुम्हीं हल्लीं राहाता त्या, त्याच्या दादरच्या घराविषयीं तुला

मुद्दाम सविस्तर सांगण्याचें कांहींच कारण नाही म्हणा; पण दादाचा एकंदर कावा;... व नाना, बाबा, याची घरसोडीची तटस्थ वृत्ति पाहून मला खरोखरच सर्वांची चीड आली. शंकरकाका अगदी दुबळे आहेत. त्याना केवळ मदत करण्याच्या हेतूनेच मी एक थोडासा धाडसी व गंमतीचा डाव खेळून पहावयाचें ठरविलें आहे एक दोन दिवसांत—

त्यांना मी कालच सांगितले कीं तुमचे घर मी विकत घेतों!

का?.. तुलाही आश्चर्य वाटलें असेल, नाहीं?... मी एवढे पैसे कोठून आणणार म्हणतेस?—पण तुला दिसेलच सारी गमत आता; अशा गोष्टीना पैसा लागतोच असें नाही, मंजुळे! जगात निरपेक्षतेला कितीशी किमत आहे तें तर पाहू. आणि निर्हेतुक प्रेमाचे खरें स्वरूपही दिसून येईल काय आहे ते!

हो, मला तू भेटावयास येणार आहेस, नाहीं का? जरूर ये. हल्लीं तुमच्या कॉलेजला सुट्टीच असेल म्हणा. पुढील दोन चार दिवसात दुपारी मी वाट पाहातों. येथे आल्यावर माझी अलीकडे काढलेलीं चित्रें, प्रवासात काढलेले फोटो, वगैरे सर्व तुला पहावयास मिळलेच. कळावे, तुझा—**अरुण.**

( ४६ )

दादर, ता. १६ जून १९२९.

प्रियकर अरुण,

तुमच्याकडे गेल्या आठवड्यात समक्ष आले, त्यावेळीं तुमच्या निरनिराळ्या श्रेष्ठ कलाकृति पाहून, तुमच्या मोकळ्या व प्रेमळ बोलण्यातून प्रतीत होणारी ध्येयप्रवणता, ... अनुभवास येऊन मला तुमच्याविषयी किती अभिमान वाटत होता! मनाला किती आनंद झाला!...

पण त्यानंतर परवा आमच्या घरीं घडलेला तो प्रसग! त्याने मात्र माझे मन अगदीं रजीस झालें. अरुण तुम्हाला सागावयाचे म्हणजे तेव्हापासून आत्या मला अगदीं भंडावून सोडीत आहे. तिला शंकरकाकाच्या घराच्या विक्रीच्या बाबतींतील तुमच्या 'लुडबुडी'चा मनस्वी संताप आला आहे. त्यामुळे तिनें तुम्हाला व मी तुमची वाग्दत्त वधू म्हणून मला, बऱ्याच शिव्या दिल्या.

आत्या जितकी चांगली तितकीच वाईट, हा काहीं मला नवीन अनुभव नाहीं. घराचा सौदा, शेवटीं त्यांच्याच मनासारखा झाल्यानंतरहि, आमच्या घरांत घडलेला तुमचा एकदर अपमान, मला खरोखरच क्षणोक्षणीं जास्त दुःखी

व रजीस करीत होता. पण तशाही स्थितींतील तुम्हीं दाखविलेली खेळाडू वृत्ति व मनाचा प्रेमळ मोकळेपणा!... माझ्या हृदयाला तुमच्याविषयीच्या अभिमानाचें जास्त जास्तच भरते येत होते.

अरुण, घरातील सारी मंडळी स्वार्थाने किंवा दांभिक मोठेपणाला बळी पडून, शंकरकाकाच्या बरीचशी विरुद्ध असताना, अगर काहींही कारण किंवा स्वतःच्या फायद्यातोट्याची अपेक्षा नसताना,.. इतक्या धीराने तुम्ही सर्वांबरोबर एकटेच लढला!... त्याची त्याना कोणालाच किंमत नसली, तरी मला मात्र तुमचे कौतुक कोणत्या शब्दात करावें तच समजत नाहीं!

आता, एवढे मात्र खरे कीं, यापुढे तुम्हाला आमचे घर पारखे झाले. तुमच्या लहरीप्रमाणे का होईना, पधरवड्यातून एकदा तरी मला तुमचे आतापर्यंत दर्शन होत असे!.... तेही आता थांबले!... हो ना ?

खरंच, या विचाराने मात्र मला चैन पडत नाहीं. आम्हां स्त्रियांचे हृदय असं आतल्या आत धुमसत राहण्यासाठींच असत का हो, अरुण?...

: २३२ :

यंदा मला परीक्षेत अपयश आल्याचें तुम्हाला परवा समजले. त्यावर 'का?' म्हणून तुम्ही मला प्रत्यक्षभेटीत प्रश्न केला.

खरच, का? कोणास ठाऊक! पण बाबाच्या त्या मला व तुम्हाला आलेल्या एकंदर पत्रापासून मला एक प्रकारची अजाणतेपणींसुद्धा दहशतच बसली आहे. मनाला मुळी चैनच पडत नाही! तुम्हीं मला इतका धीर देता....तरी माझे भवितव्य काय, याविषयी मला अजूनही काहीच कल्पना करता येत नाही. कोणत्याही प्रकारे पूर्ण खात्री म्हणून वाटत नाहीं!. .

अरुण, रागवू नका हं, असल्या माझ्या उद्गारानीं! पण मी तरी काय करूं? हृदयाचा कोंडमारा झाला म्हणजेच असले विचार बाहेर पडतात!

आज मला जगात कोणाचा आसरा आहे? असे कोण मजकडे खऱ्या सहानु-भूतीनें पाहात आहे?—एक तुम्ही, नाहीं म्हणावयास दुसरे वसंतराव. नानामुळेच माझी अशी असहाय्य स्थिति झाली, याची मला वाटते त्याना सारखी जाणीव आहे! ते शल्य त्याच्या हृदयाला बोंचत आहे!

पण तुम्हा दोघांना सोडले तर माझ्या मनाला वाटते, मी जणू लोकाच्या धर्मावरच जगत आहे,.... वाढत आहे,.... हालचाल करीत आहे! ....

माझ्या भोवतालचे वातावरणच तसे आहे. मी प्रेमळपणें माझ्या आतेचें हें घर माझे समजते!.... पण आमच्या या घरातील सारीं माणसें—दादा, आत्या, गाडोबा, विठोबा अण्णा,–मजकडे किंबहुना साऱ्याकडेच पावलोपावलीं अपेक्षेनें

पाहत असतात. खुलेपणा, मोकळेपणा, निर्हेतुकता हे शब्द त्याच्या कोशांत नाहींतच. आपापसांत पाहताना सुद्धा त्याची हीच दृष्टि !

ज्याला आपण possession म्हणतो ती कल्पना या साऱ्याना झोपेतसुद्धां असते. त्याचे बोलण्याचे नेहमी विषयसुद्धा केवळ तेच !....

: २३३ :

माझ्या देखत देखतच आमच्या आत्याच्या या दोन्ही मुलाचे पहिले ससार थाबले;. . व दुसरे सुरू झाले!... पण आज तरी घरातील वातावरणात विशेष काय बदल झाला आहे ? त्याच्या या नवीन बायका ! . . . पण त्याच्याविष-यीचें तरी त्याचें प्रेम,. . त्यांच्या कल्पना, ... काय आहेत ? घरात आले की, एक मूलबाळ नाही, या टोचणीने कुरकुरत असतो ! घरात असतानाचा वेळ रंजीस मनाने कंठतो. त्याचा बाकीचा वेळ आयुष्याच्या टरलेल्या नोकरीच्या धडपडींत रुळल्याप्रमाणे जातो. पण पहिली घरीं पाठविलेली बायको काय, किंवा आताची नवी बायको काय,...याच्या मनाचं त्याला कधीं आकलन झालं आहे का ?

'विठोबा आण्णाचे सकाळपासून रात्रीपर्यंतचे सारे आयुष्य, कोठून तरी पैसा मिळविण्याच्या धडपडींत जात असते; आणि उरल्या, घरीं जाणाऱ्या वेळात तरी काय ? पहिली बायको त्याना मुले ठेवून गेली आहे, ती आता गेली,.. आणि दुसरीलाही मुले होत आहेत; पण तिच्या मनाच्या इच्छा, आकाक्षा याची त्याना कल्पना आहे का ?. . नाही. आपण एका सुदर बायकोचे पति आहो, ती आपल्या सुखासाठीं आहे, एवढीच फक्त तिजकडे पाहण्याची त्याची दृष्टि !..

आमच्या आत्याचें तरी काय ? दादाचा स्वभाव कसाही असला तरी आज-पर्यंत आपल्या मर्यादित कुवतीप्रमाणे, आपल्या मुलाबाळाच्या लहानग्या कुटुंबासाठीं ते धडपडत आलेच आहेत ना ?. . पण आपल्या पतीकडे पाहण्याची आत्याची दृष्टि तरी काय आहे ? आपले दोन्ही मुलगे आता आपापल्या परीने कर्तबगार झाले ! . . मिळवते या दृष्टीने, त्याची घरातील किमत दादापेक्षा जास्त झाली म्हणून आतां त्या म्हाताऱ्याकडे पाहण्याची तिची किंवा त्याची एक प्रकारची अहंवृत्तीची दृष्टि पाहिली, त्याचा पदोपदीं लहानसान गोष्टीवरून आत्या व इतर सर्वांकडून होत असलेला अपमान दृष्टोत्पत्तीस आला, . की दादाबद्दल मला कींव वाटते !.. या साऱ्या माणसाबद्दल राग येतो. . .

म्हातारी आजी तर मरायचीच वाट पहात आहे. तिची कोणालाच जरूरी वाटत नाहीं; पण तिचे दादावरील प्रेमच तसे आहे. तुम्हाला ठाऊकच आहे, तुमच्या बाबानीं तिला कितीदा आपल्याकडे बोलावली असेल; . . पण ती जातच नाहीं. आणि एके काळीं साऱ्या कुटुंबासाठी काबाडकष्ट मोलमजुरी करणारी ही साध्वी, आज कशी तरी शेवटचे दिवस करवंटीत खडे घालून कंठीत आहे. तिची ही

दुर्दैवी व हतबल परीस्थिति पाहिली कीं, कोणाही सहृदय माणसाच्या डोळ्याला पदोपदीं पाणी येईल!

पण हीं माझ्या भोंवतालची उपकारीं माणसें—त्याचें जास्त वर्णन करण्यापेक्षां, मी तो साधाच बदलते कसा!

असल्या प्रकारच्या अनुभवाचा पदोपदीं माझ्या मनावर परिणाम होतो! .. मजकडेहि हीं सारीं माणसे अशाच काहींशा श्रेष्ठतेनें पाहत असतात! .. त्यामुळें ती नागी हृदयात सारखी सलते ... नानाकडून मला माझ्या वडिलाच्या मृत्यूनंतर आतेने आपल्याकडे आणले. त्यावेळीं तिने दाखविलेला वरवरचा दांभिक जिव्हाळा, .. माझ्या बालमनाला त्यावेळीं समजला नाहीं. दुर्दैवात मिळालेला नवा आसरा, म्हणून मी तिजकडे आपुलकीनें .. प्रेमानें धाव घेतली! .. पण, इतक्या वर्षानंतर मला माझ्या असहायतेची, आता आज, पुन्हां खरी खरी जाणीव होत आहे!

: २३४ :

असल्या पाल्हाळाचा तुम्हाला कटाळा तर नाही ना येणार? पण, अरुण, असल्या गोष्टी मी तुमच्याशिवाय तस कोणाला सागू? मला हृदय मोकळं करावयास दोनच ठिकाणे आहेत! तुम्हीं किंवा .. कधीं कधी मुद्दाम आपुलकीनें विचारतात म्हणून .. वसतराव!

पण, लग्नापासून अंथरुणाला खिळलेल्या आपल्या बायकोच्या आजारामुळेंच ते बिचारे सदा दुःखी! वास्तविक, त्याच्या लग्नापासून त्याच्या तरुण हृदयाला दुसऱ्या मोठ्या आकांक्षा कधींच वाटल्या नसतील असे नाहीं. तथापि, उदारमनानें ते आजपर्यंत आपल्या पत्नीची आस्थेने सेवाच करीत आले आहेत. एकदाहि त्यानी तिला एकाद्या शब्दानें दुखावले नाहीं. वडिलाच्या व्यवहारावरील देखरेख, व्यवसाय, वाचनातून निर्माण केलेली काल्पनिक सृष्टि, आणि चित्रकलेची अफू, .. यातच मन गुगवून ते स्वतःला रंजवीत असतात. स्वतःचे आयुष्य जगायला त्याना वेळ किंवा वाव आहेच कोठे?

पण, स्वतःच्या बायकोविषयींच्या कर्तव्याला मात्र ते किती तत्परतेनें जागतात! गांवड्यावर व्यवहारासाठी म्हणून राहिले, तरी ते तिला पत्रें लिहितील; वाचावयास पुस्तके पाठवतील; आणि काम सपले कीं तिच्या प्रकृतीची चौकशी करावयास प्रथम तिजकडे धाव घेतील. तिची प्रकृति सुधारण्यासाठीं त्यांनीं आजपर्यंत अनेक औषधें केलीं. स्वतःची विशेष श्रद्धा नसताना इतरही सर्व प्रयत्न केले. मनाची विषण्णता, धीराने सहन केली. खरोखर, त्याच्या असल्या या प्रेमळ कर्तव्यबुद्धीच कौतुकच करावंस वाटतं!

पण, या गोष्टी तुम्हाला वेड्यासारख्या काय लिहित राहिले आहें मी ? तुम्ही तर त्याचे भाऊ; त्यापेक्षा जिव्हाळयाचे स्नेहीच जास्त ! तुम्हाला काय हे माहित नसणार ?..

तुम्ही असल्या दुःखद गोष्टी जगात सभोंवतालीं पाहिल्या, म्हणजे आपल्या माणसाना त्याहि सागिल्यावाचून राहवत नाहीं,.. एवढच !

हें सारें आज मी भराभर लिहीत आहें—त्याला कारण परवा घडलेला शकरकाकाच्या घराच्या विक्रीचा प्रसंग! त्यामुळे मला जेवढं दुःख झाल, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त तुम्हांला झालं असेल. मजप्रमाणेच तुमच्याही मनात अनेक नव्याजुन्या सुखदुःखाच्या गोष्टीचा कल्लोळ उडाला असेल;.. तेव्हा आणखी जास्त पाल्हाळ लावून, असा तुमच्या मनाला मी त्रास देण बर नव्हे. पण, अपेक्षास्वार्थ यानीं भरलेल्या या भोंवतालच्या वातावरणात,.. अरुण किवा वसंतराव क्वचित्च पाहावयास मिळतात!.. आणि म्हणूनच माझ्याविषयीं काय अगर वसंतरावाविषयीं काय, तुम्हाला असं मोकळेपणे आज लिहिलं मी!..

काल अरविद भेटले होते. ते म्हणत होते, अरुणने शातिनिकेतनला जाण्याचा बेत अगदी कायम केला आहे!.. खरंच, जाणार तर तुम्ही आम्हा सर्वांना सोडून अगदीं दूर दूर! मला तुमचा वियोग असह्य होईल हे खरं; पण तुम्हाला जर त्यात आपल्या आकाक्षाची पूर्ति आढळत असेल,.. तेच तुमच्या प्रगतीचें पाऊल वाटत असेल, तर तुम्ही जरूर जा अरुण,! मी तुमची वाट पहात,.. तुम्ही सागाल तेवढा अवधि.. आशापूर्ण हृदयाने थाबेन!..

अरुण, जास्त काय लिहूं आता ?..मी माझ्या तोकड्या बुद्धीप्रमाणे लिहिलेल्या एका कवितेतील ओळच येथें तुमच्यासाठी पुन्हा लिहिते!.. 'आकाक्षा पुरुषापुढे वसतसे,.. प्रेमा सदा स्त्रीहृदीं ! . .'

पण अरुण, जाण्यापूर्वी एकदा भेट तरी होईल ना हो आपली ? आमच्याकडे तुम्ही येणार नाहीं हें ठरलंच ... पण मग कुठं आणि केव्हा भेटणार ?

तुमच्या पत्राची व भेटीची आतुरतेने वाट पाहणारी, तुमचीच— **मंजुळा.**

( ४७ )

कल्याण ; ता. १९ जानेवारी १९३०

प्रियकर अरुण,

तुम्ही गेल्याला आतां आठ महिन्यावर दिवस होऊन गेले. तुमच्याकडून

अजूनहि पत्र का नाहीं बरं ? ... मला पत्र पाठवावंसं किती वाटत होतं म्हणून सांगूं ? ... पण तुम्ही म्हटल्याप्रमाणें आजपर्यंत नुसती वाट पहातच राहिलें, तुमच्या पत्राची!

का बरं पत्र नाहीं ? 'माझे पत्र आल्याशिवाय पत्र पाठवूं नको' असं काहींसं तुम्ही मला शेवटीं जाताना अर्धवट म्हणाला होता. त्यावेळीं पूर्वीसारखं मन-मोकळं बोललाही नाहीं!. . तुमच्याकडे मी आले.. तुमच्या सामानाची बांधाबाध करताना व बॅग भरताना मला दुःखही होत होतें. आनंदहि वाटत होता. दुःख तुमच्या वियोगाचें!.. आनंद,.. तुम्ही तुमचं चिरवांछित मनःसमाधान व ध्येय गाठण्यासाठीं जात आहा या विचाराचा !..

आणि तुमच अलीकडचं प्रवासात गागोलीन काढलेलं स्केच सामानात सांपडलं, तें मी मजकरिता ठेवण्याची तुमच्याकडे परवानगी मागितली. तुम्ही हंसून 'ठेव' म्हणालात. पण तुमच्या त्या हास्यामागचीही खिन्नता माझ्या दृष्टींतून काहीं लपत नव्हती! .. खरंच,.. का बरं अरुण ?–असे काय तुमच्या हृदयाला जाळीत आहे अलीकडे ? प्रवासाहून परतल्यापासून आणि विशेषतः आमच्याकडे घडलेल्या घराच्या प्रकरणापासून, शांतिनिकेतनला जाण्यापूर्वीच तुमची पूर्वीची वृत्ति मावळत चालली होती!. .

असं काय ? तुम्ही मला आपली म्हटली आहे ना, अरुण ? मग मला नाहीं का सांगणार आपल्या मनातलं सारं सारं ? काय असेल तें अगदी मन मोकळें करून सांगा. काहीं चोरून ठेवूं नका. तुमच्याकडून सुखद...दुःखद .. काहींहि ऐकायची माझी तयारी आहे.

खरंच, अरुण, तुम्ही तेथे काय काय करीत आहा?.. तेथे नवीन नवीन कसले अनुभव आले तुम्हाला ? सारं सारं काहीं पूर्वीच्या मोकळेपणानें कळावाल ना मला !—

गेल्या काहीं महिन्यातील माझ्या मनाची स्थिति तुम्हाला कशी सांगूं ?.. मला समजत नाहीं. तुमच्या पत्राची वाट पहात मी रोज रात्रीं तुमची आठवण करावी,.. माझ्या अरुणाना सांगावेसे वाटणारे चार दोन विचार,.. मधून मधून माझ्या रोजनिशींत लिहावे!.. असं चाललं होतं.—

तींच पानें फाडून आता येथे सोबत जोडते, झाले !—

: २३७ :

दादर; ता. २१ जून १९२९.

काल अरुण गेले. आज माझ्या एका मैत्रिणीला भेटायला मी पारल्याला गेले होतें. माझ्या मनात सारखे अरुणाच्या प्रवासाविषयींचेच विचार येत होते.

अरुणाचे विचार आले कीं माझ्या मनाला किती समाधान होते ?.. पण तितकीच मनाची धडपडहि सुरू होते !..

दुसऱ्याच स्टेशनावर, एक तरुण जोडपें माझ्या समोरच्याच बाकावर येऊन बसलें. त्याच्याकडे पाहिल्यावर मला वाटलें, माझे अरुण आणि मी .. असें एकमेकाना, हक्काने आपले म्हणून केव्हा जाणार . . . केव्हां जगात वावरणार ?..

पण इतक्यात, माझे लक्ष त्या बाईच्या हातातील चिमुकल्या गुटगुटीत छबुकल्याकडे गेले. तो खेळकर छबडा, . . आपली बाळसेदार मूठ आपल्या लाळ गळणाऱ्या .. हंसऱ्या .. दतविहीन बोळक्यात घालून, आईच्या माडीवर बसल्या बसल्या डुलत होता. त्याचे पिंगट केस, आगगाडींत शिरणाऱ्या वाऱ्यानें डोक्यावर भुरभुर उडत होते.

थोडा वेळ असाच गेला. मी अगदी प्रेमळपणे त्याच्या हालचालीकडे पहात होते.

इतक्यात काय झालें कोणास ठाऊक ! . . . त्या बाळाच लक्ष एकाएकी माझ्याकडे गेल. आणि त्याने हंसत हंसत एकदम माझ्याकडे झांप टाकली. मीहि त्याच्या आईबापाकडे हसून पहात त्याला जवळ घेतलें. तो माझ्या माडीवर उभा राहून, .. माझ्या तोंडाजवळ आपले तोंड आणून, . . हंसत हंसत मजकडे सारखा पाहूं लागला. जणु काय,.. त्याची माझी पूर्वीची–निदान गेल्या जन्मीची ओळखच होती ! मला राहवेना–मी त्याचा हळूंच एक मुका घेतला. त्यावेळीं माझ्या अगावर किती अननुभूत शहारे आले ? . .

त्यानंतर तो किती वेळ मजकडेच खेळत होता. त्याच्या आईनें त्याला बोलावून पाहिले ;.. वडिलानीं बोलाविले !.. पण कोणाकडेच जाण्यास तो तयार होईना.

शेवटीं, दादर स्टेशन येऊं लागले, तसे आम्ही एकमेकाची ओळख करून घेतली व नंतर मी त्याना हंसत म्हणाले, ‘ पहा हं, . . लहान मुलं मोठ्या माणसात भांडणं लावून देतात म्हणतात ना, कधीं कधीं ? पण, अशी तिऱ्हाइताची ओळखही करून देतात नाहीं ?’

दादर आले. आमची दोघाचीही इच्छा नसताना त्या बाळाला मी त्याच्या आईच्या हाती त्याला दिलें व खालीं उतरले. पण तरी तो लहानगा, . . खिडकींतून माझ्या वाटेकडे सारखा पहात, स्वतःच्या भाषेंत काहीं तरी हंसत हसत सागत, . . माझा निरोप घेत होता.

मी पुलाकडे गेलें तरी त्याचे आईबाप त्याचें कौतुक करीत ;.. मजकडे बोट दाखवून, काहीं तरी बोलत होते. तिकीट देता देता माझ्या मनांत सहज विचार आला, ‘ हा चिमुकला जगांत जगून वाढेल ना ? . . पण वाढला तरी मला या असल्या चिमकुल्या स्थितींत तो पुन्हा दिसणं कधींच शक्य

नाहीं ! आणि अरुण, खरं खरं सांगू कां मनांतलं ? . . त्यानंतर चालतां चालतां, माझ्या हृदयांत कोण गोंधळ उडाला ! माझ्या मनश्चक्षूंपुढें आपलं भावी काल्पनिक छबकडें उभं राहिल्यावांचून राहिलं नाहीं.

आणि अरुण, खरंच कां हो भवितव्य आपल्या मनासारखं होईल ! . . कीं चार्ल्स, लॅबच्या छबकड्यासारखीं नुसतीं 'Dream children,' च, हीं ? . .

: २३८ :

ता. २५ जून १९२९.

अरुण असे आहेत अगदीं! . . . शांतिनिकेतनला गेल्याला आज आठवडा होत आला; पण त्याच्याकडून पत्रहि नाहीं. नाही तरी म्हणतातच ना! . . पुरुषांना आपले जिकडे जातील तिकडे पुढे डोळे! . . बायकाच मेल्या, मी . . माझं . . करीत तळमळतात! .

अशा वेळीं मन कसं अगदी गोंधळून जातं! अरुण भेटत, त्यावेळी पुष्कळ पुष्कळ बोलावसं वाटे; पण शब्दच उमटत नसत. आणि आतां अनेक विचारांनी नुसती गर्दी गर्दी करून सोडली आहे. मनाला विरंगुळा कसा तो वाटतच नाहीं. खिन्नपणे कॉलेजात त्याच वर्गात पुन्हा दिवसभर बसून यावें; आणि सुन्न अंत:करणानं कसलं तरी पुस्तक पुढे धरून, अरुण काय करीत असत, काय करीत असतील, . . याविषयीं तासचे तास विचार करीत खोलींतील पलंगावर पडावें . . .

असे माझे एकामागून एक शून्य दिवस चाललेत नुसते !

आणि असल्या विचाराबरोबरच, आमचं भावी एकत्र आयुष्य कसं जाणार आहे याचं चित्र डोळ्यापुढे उभं रहातं ! . . .

खरंच, काय होणार आहे बरं भवितव्य !. . . मी तर ही अशी मनाने दुबळी! नाहीं, तशी नैसर्गिक दुबळी नाहीं, पण, एकंदर परिस्थितीने झालें आहे !.. शरीरानेंही आधींच कशी तरी ;.. त्यात नाही म्हणूनहि दिवसेंदिवस जास्त दुबळी होत चालले आहे. दिवसेंदिवस माझा मध्ये मध्ये मला वाटणारा उत्साहहि लोपत आहे. चेहऱ्यावर थोडा फार दिसणारा तजेलाहि नाहींसा होत आहे.

माझी असली सारी खिन्नता पाहून वर्गातील मुलीहि मधून मधून मला म्हणतात— 'का मंजुळे, किती ही बेफिकीरीने वागतेस ?...जोगीण बनायचं आहे वाटत ?'

: २३९ :

ता. ३ ऑगस्ट १९२९

मनाला शांतिच नाहीं एवढी गोष्ट मात्र खरी ! दीड दोन वर्षांपूर्वी प्रत्यक्ष मीच माझं स्वत:चं भावी आयुष्यातील चित्र किती उज्वल काढीत होते ?...पण

तें आतां प्रयासानेंहि मनापुढें रंगवितां येत नाहीं मला ! स्वत:विषयींचा अभिमान .. आत्मविश्वासहि पळत चालला दूर दूर !...

आयुष्यातील हीं लहानसहान अपयशें ...मन कसं दुबळं करितात !... हात पाय गुंडाळून असंच धुमसत बसायचं कां ? खरंच कोणत्याही बाजूनें शांति नाहीं ! ... मनाला सारखी हुरहूर .. टोंचणी ! ...

अशी मी, अरुणांना तरी कितीशी सुखी करणार आहे ? त्याच्या आयुष्यात कितीशी उज्वलता आणणार आहे ? आणि हें माझे दिवसेंदिवस कमी होत असलेलं रूप ! खरंच, त्याना मी अगदीं सर्वच दृष्टींनीं अयोग्य ठरणार शेवटीं ? अशा वेळीं वाटतं, आपलं हृदय असंच जळत राहिलं तरी हरकत नाहीं ! पण आपला प्रेमाचा असला स्वार्थ का ? ... मन घट्ट करून त्याना स्पष्ट सागून टाकावं हे सार ! ...

आणि असे विचार भंडावूं लागले कीं, तुमची आठवण होते, अरुण !.. आणि वेड मन पुन्हा तुमच्याविषयीच्या प्रेमानं भरून येतं अगदीं. वाटतं...तुम्ही जर जवळ असता तर... पण.. हें तुमच्या माझ्यामधलं एवढ मोठं स्थलातर ! ...

हे अस काय बरं अरुण ? तुमच्या पत्राची किती दिवस मी वाट पहायची ?.. काय केलं म्हणजे पत्र येईल तुमच्याकडून ?

बाकी आमचा देव प्रसन्न व्हायला नवस करावे लागत नाहींत म्हणा ! ... साधा पत्राचा अभिषेक केला कीं झालं ! ... मग उद्या पत्र लिहूं का ? ...

: २४० :

ता. ६ ऑगस्ट १९२९.

नको ग बाई ... त्याच्या मनाप्रमाणेंच होऊं द्या. त्याचच आधी पत्र आलेल बरं !.. तोपर्यंत अरुण, तुमची मनोमय पूजा बांधीत बसते हं ! ... पण माझा असा अंत पाहूं नका गडे—

रात्रीं अथरुणावर पडल्यावर, मला किती दु:ख होतं ... माझा असा गुन्हा काय ?.. तर मी आतापर्यंत तुमच्यावर उत्कट व एकनिष्ठ प्रेम करीत आले आहे ?.. आत्या वगैरे सारीं अलीकडे त्याबद्दल हवीतशी पिळून काढीत आहेत मला... आणि तुम्हीं, जे माझ्या जीवाचें जीवितसर्वस्व ... तो तरी मनाला एक आसरा होता. तुमच्या मौनानें तोहि आतां काढून घ्या...

या असल्या कोंडमाऱ्यानें शरीराचे मात्र हाल होत आहेत !.. आणि ... तुमच्यापासून शब्दश: होणाऱ्या या विरहकालांत एखाद्या चोरट्याप्रमाणें मी दिवस कंठीत चालल आहे, अरुण !..

: २४१ :

ता. ८ सप्टेंबर १९२९.

" अरुणांचं आजहि पत्र नाहीं...अजून किती दिवस वाट पाहायची बाई ?

खरंच, अरुण, तुम्ही हे काय माडलय तरी काय ? तुम्ही तेथें आहांत तरी कशा मनःस्थितींत ! काय असेल नसेल ते मोकळेपणें कळवा तरी मला!..नाहीं तरी.. तुमच्या मौनाचा अर्थ तरी काय समजायचा माणसानें ?

माझा कंटाळा आला का तुम्हाला ? अं ?.. खरं खरं सागा ना अरुण !

: २४२ :

ता. १९ ऑक्टोबर १९२९.

नवीन नाहीं तर नाहीं—अरुणाच्या जुन्या प्रेमळ पत्राचीं तरी पारायणे करावीं म्हटलं!.. खरंच, मन कसं प्रसन्न होतं ! मग वाटतं, गेल्या पानावर रोजनिशींत मी काय वेड्यासारखा प्रश्न केला अरुणना ? हृदयाची भाषा दूरवरहि हृदयाला समजते. मग पत्राचीच आवश्यकता कशाला ?—नसेल त्याना आपल्या उद्योगात वेळ मिळाला आतापर्यंत !—

आणि अशा विचारानंतर मी काय केलं सागू, अरुण ?.. तुम्ही जाताना दिलेले गागुलीनें काढलेले तुमचे स्केच, तुमची प्रतिमा हळूंच ...कारण आत्या एखाद्यावेळी देवळातून पटकन् यायची —बाहेर काढली. तुमचा प्रेमळ दृष्टीला दृष्टि भिडवली ..क्षणभरच, पण किती उत्साह वाटला ? मग त्याच उत्साहानें तुम्हाला आवडतें ना, ते मी केलेलें पटदीप रागातल गाणं खुल्या आवाजाने म्हणू लागले. गाणं संपल्यावर, जणुं काय तुम्हाला तेथपर्यंत तें ऐकूं गेले असेल व त्यामुळे तुम्हाला आनंद झाला असेल, असलेच समाधान माझ्या मनाचा उत्साह जास्त जास्त वाढवीत होते ..

: २४३ :

ता. ११ नोव्हेंबर १९२९.

आज आत्या घरात कांहीं कारणावरून बरीच चिडली होती. विठोबाअण्णाच्या बायकोला ती विनाकारण घालून पाडून बोलली. मला तिची ती स्थिति पाहून अतिशय वाईट वाटलें. आत्याचा बराच राग आला. सकाळीं अण्णा काही तरी रागानें तिला खूप बोललेच होते; आणि दुपारीं या सासूबाई ...

मी कॉलेजांतून आलें तेव्हां ती स्फुदन स्फुदून रडत होती. मी तिच्याजवळ गेलें व तिची समजूत घालूं लागलें. प्रेमळ मैत्रिणीप्रमाणें तिच्या पाठीवरून हात फिरवीत कांहीं विनोदानें बोललें. तीं तसल्याच खिन्नमनानें, पण खुदकन् हंसली. मला खरोखरच आत्याचा एकंदरींत राग आला होता. त्या भरात मी तिला चार शब्द बोलतांच, तिनें मजवर भडिमार करावयास सुरवात केली.

आणि बोलतांना तिनें आजपर्यंतचें मनात साचलेलें सारें बाहेर काढलें. आजपर्यंत मला आपल्याकडे वाढविल्याचे सारे उपकार, तिने मला तिच्या खोचक बोलण्यातून दाखवून दिले आणि त्याबरोबरच माझे चवचाल शिक्षण, अरुणशीं आलेला संबंध, याविषयीं नाहीं नाहीं ते बोलावयास तिने सुरवात केली.

मी कपाळावर हातोडा बसल्याप्रमाणें, जागच्याजागीं सुन्न होऊन उभी राहिले. प्रथम मला दुःखामुळें बोलताहि येईना कीं रडूंहि कोसळेना.... कशीबशी माझ्या खोलींत मी गेले. दार लावून अरुणचा फोटो हृदयाशी कवटाळला. रडरड रडलें.... व शेवटीं अरुणाच्या जुन्या पत्राना अश्रूंचा अभिषेक केला.

अरुण, आता माझा नका ना असा अंत पाहूं! लहानशा पत्राने तरी माझ्या मनाला विरंगुळा आणा!.. काय करूं म्हणजे माझ्या मनाची ही धडपड तुम्हाला समजेल बरं?..

: २४४ :

ता. २५ नोव्हेंबर १९२९.

अरुण गेले आणि चार दिवसानींच दादांनीं नाना व बाबाना समाईक इस्टेटीच्या वाटणीविषयी पत्रे पाठविलीं होतीं. आणि त्यानंतर आठ दिवसातच कोर्टात दादानीं फिर्याद गुदरली!.. झाले, हा वणवा दिवसेंदिवस पेटत चालला आहे आणि एकंदर त्याच्या साऱ्या ठाकूर कुटुंबाचेच वातावरण बदलले आहे. आणि माझ्या दुर्दैवामुळे मलाहि त्याची थोडी फार झळ लागत आहे.

विशेषतः, आमच्या घरात विचारावयासच नको. प्रत्येक क्षणाला, जेवता, बसता, निजता, तोच विषय झाला आहे. आणि नाना व बाबांना, दादा देत असलेल्या नाहीं नाहीं त्या शिव्या तर अगदीं ऐकवत नाहींत.

माझ्या मनाचा खरा कोंडमारा यावेळींच जास्त होतो.

: २४५ :

कल्याण ता. १४ डिसेंबर १९२९.

पण अरुण, तुम्हाला आश्चर्य वाटेल, मी नानाच्या घरीं ही रोजनिशी उघडून गेले दोन तीन दिवस लिहीत आहे.

हो, हल्लीं मी येथेच रहाते. दादांकडून आल्याला दहा बारा दिवस झाले. तो प्रसंग रोजनिशींत लिहायला मला वेळच झाला नाहीं आतापर्यंत. आज लिहितें हं तुमच्यासाठीं!

आत्या मला रागावली होती त्याच्या दुसऱ्या दिवशींची गोष्ट. आपापसातील फिर्याद सुरू होऊन साडेचार पाच महिने झाले होते. व त्याच दिवशीं दादांची जबानी झाली होती. त्यावेळीं म्हणतात, कोर्टात त्यांच्या खोटेपणाबद्दल जज्जाकडूनहि थट्टा झाली होती. त्यामुळें दादा रागारागानेंच घरीं आले होते.

नाना त्यांच्या जबानीपासून आजारीच आहेत. त्याची प्रकृति धीर खचून जास्तच खालावत होती. घरांत सून कायमची आजारी व दुसरे बाईमाणूस कोणी नाहीं. दुसरें म्हणजे, त्यांनाहि आतांपर्यंतच्या आपल्या एकंदर भल्याबुऱ्या व्यवहाराविषयीं, दिवसेंदिवस जास्त मनस्ताप होऊं लागला होता, मला वाटतें.

विशेषत: माझ्या वडिलांच्या इस्टेटीचा अपहार, त्याच्या सौजन्याचा फायदा घेऊन केल्याचं शल्य, त्यांना दिवसेंदिवस जास्त बोचूं लागलें होतें. त्याना वाटत असावें, इतकें करूनहि काय... पैसा गोळा होतांच एकत्र कुटुंबाच हक्क शाबीत करावयास भाऊबंद तयार! आपल्या पापाला कोणी भागीदार नाही. द्रव्या भोंवतीं सारे गोळा झाले! वाल्या कोळ्याप्रमाणें त्यांच्या मनाची स्थिति झाली असावी.

शेवटीं, एके दिवशीं त्यांनीं वसंतरावांना बोलावून मजविषयीं सविस्तर हकीकत सांगितली व मला भेटण्यास बोलावण्याची इच्छा दर्शविली. तोच माझा जाण्याचा प्रसंग!..

: २४६ :

वसंतराव त्याच दिवशीं, मला भेटावयास दादांकडे आले होते. दादा नुकतेच कोर्टांतून रागारागानेंच परतले होते. वसंतरावांना दारांत पाहतांच, "कां, तुझा बाप कुठं आहे? अथरुणांतून उठण्याची कांहीं आशा आहे का आता?" असा पहिलाच रागाचा व टोंचणारा प्रश्न केला.

वसंतराव सहसा चिडणारे नाहींत; तरी एकदम प्रथमच आलेल्या दादांच्या दुष्ट प्रश्नाने ते शांतपणे पण जशास तसें या पद्धतीनें म्हणाले, "आता काय दादा, तुम्ही सारेच भाऊ म्हातारी माणसें; आणि त्यांत तुम्ही पुन्हा वेदान्त जाणणारे. तुम्ही ती तयारी प्रथम करावयास नको का?"

या उत्तराने मात्र दादा एकदम चिडले व उठून पुढे जात त्याच्यावर ओरडले, 'चूप, सर्पांचेच पोर कीं नाहीं तूं? जास्त बोलूं नकोस. आताच्या आतां पायरी उतर!..'

त्यानंतरहि दादा व आत्या दोघे त्यांना सारखे बोलतच होतीं. व शेवटीं तर माझा कैवार घेतल्यासारखें करून दादा त्यांना रागावूं लागले. त्यावेळीं, मात्र मला वसंतरावांच्या मन:स्थितीबद्दल कींव आली. आदल्याच दिवशीं आत्या मला बोललेलें सर्व पटकन् आठवलें. व मी एकदम पुढे होऊन दादांना म्हणाले, "दादा, थांबा. वसंतरावांना असें बोलूं नका. मलाच नानाला भेटायला जायचं आहे. म्हणून मी त्यांना बोलावलं होतं!.."

"अस्सं! चालती हो तर कारटे,.. जा आणि पुन्हां येऊं नकोस!.." आत्या एकदम मजवर कडाडली. आत्या कधीं कधीं इतकी प्रेमळपणें मजबरोबर वागत

आली होती; पण असले जळजळीत शब्द मी तिच्या तोंडून प्रथम त्याच दिवशीं ऐकलें. त्यामुळे मला अत्यंत दुःख झाले!... मी रडत रडत झटकन आंत गेलें. माझी बॅग भरली व बाहेर थांबून असलेल्या वसंतरावाजवळ जाऊन उभी राहिलें. वसंतराव, नाना, बाबा, मी... सर्वांवर दादाचा वर्षाव तसाच सुरूच होता.

मला जातांना आत्याचा निरोप घ्यावयाचा होता. पण तिचे रागाने मजकडे रोंखलेले डोळे पाहून मला रडूंच कोसळलें. माझ्या अश्रु भरलेल्या नेत्राना जातां जाता, वहिनीचा—विठोबा अण्णाच्या बायकोचा–खिन्न चेहरा मात्र दिसल्यावांचून राहिला नाहीं.

तेव्हा अरुण, अशा तऱ्हेनें मी अनपेक्षितपणे दादाच्या घरातून कायमची बाहेर पडलें आहे!.. कल्याणला येताना गाडींत मधून मधून मला रडूं येत होतें; पण—

वसंतरावही खिन्न दृष्टीनें मजकडे पहात होते.

: २४७ :

ता. १५ डिसेंबर १९२९.

त्या दिवशीं घरीं आल्यावर नानाना प्रथम बऱ्याच दिवसांनीं भेटलें. त्यांच्या सारखा मनुष्य अश्रु ढाळील ही मला कल्पनाहि नव्हती. त्यामुळें, त्यांचें दुःख पाहून मलाहि रडूंच आलें.

"मंजुळे, तुझ्या बापाला व तुला मी फार त्रास दिला. माझ्या हातून चूक झाली. विसर त्या साऱ्या गोष्टी आतां!" ते अर्धवटच बोलले व त्यानीं आपली मान बाजूस फिरविली. नंतर थोड्या वेळानें ते शांत झाले व मीहि माझ्या मनावर ताबा मिळविला.

तेव्हापासून आतां मी येथेच आहे. नाना अतिशय खचले आहेत. खटल्याचा निकाल काय लागतो याची त्यांना कालपर्यंत रुखरुख होती. वसंतराव त्यांची समजूत घालीत; पण तरीहि,.. 'देवा, माझ्या दुष्ट कृत्यांच हे प्रायश्चित्त...' असे काहीं तरी बडबडत रात्रंदिवस ते अश्रु ढाळीत. त्याची रात्रीच्या शात वेळची स्वतःशीं होणारी ती पुटपुट, त्यांच्याच खोलींत झोंपत असल्यामुळें मला सारखी ऐकूं येई. त्यांचेंच मन त्याना स्वतःच्या आयुष्यातील अनेक प्रसंगामुळें आंतल्याआत जाळीत होतें. खरोखर, ही मागाहून होणाऱ्या दुःखाची खाई किती तापदायक असेल नाहीं?...

नाना, वसंतराव दोघेहि सांगत आहेत तरी, हल्लीं मी घरातील दोघा रोग्यांच्या शुश्रूषेसाठीं कॉलेजांत जातच नाहीं. कशाला जायचें? नाहीं तरी टर्म भरल्याच आहेत... नाना आता, पुन्हां हिंडूं फिरूं लागले आहेत; कारण बाबांच्या

सौजन्यामुळें व आजीच्या सांगण्यामुळें खटला आपापसांतच नऊदहा हजारावर थाबला. तेवढी रक्कमसुद्धा, आपली म्हातारी आई व बाबा याच्या शब्दासाठींच दादाना द्यावयास आपण तयार झालों असें नाना वारंवार म्हणतात.

घरातील दुसरा रोगी म्हणजे सुधावहिनी! तिलाहि मी आल्यापासून दुःखांत सुख वाटूं लागलं आहे. तिची शुश्रूषा करण्यास मलाहि आनंद वाटतो. वसंतरावाची मजबरोबरची प्रेमळ मोकळी वागणूक मला वारंवार त्यातल्या त्यांत सुखदायक वाटते!..

.. आतां पुढली रोजनिशीचीं पाने कोरीं आहेत. त्यावर चागली बातमी लिहिण्याचा योग आणून मला समाधान मिळूं द्याना, अरुण!..

:२४८:

ता. क.—( १९ जानेवारी १९३० )

आत्याकडच्यापेक्षा हे वातावरण किती वेगळें!.. तेवढेच दुःखात सुख!.. पण अरुण, तुमची आठवण झाली म्हणजे मन पुन्हा चलबिचल होते.

असें काय हो अरुण? तुम्ही एकदम मजबरोबर मौन धरले? ती मी काय करूं म्हणजे तुम्हीं मजबरोबर पुन्हा मोकळेपणे वागाल? बोलूं लागाल?... असे विचार मनात आले कीं, माझे मलाच समजत नाहीं, तुमच्या आयुष्यात मला कोठले स्थान आहे व माझे भवितव्य काय आहे, मोकळेपणें कळवाल का अरुण?

तुमचीच पण गोंधळलेली —**मंजुळा.**

( ४८ )

शांतिनिकेतन; बोलपूर. ता. २४ जानुवारी १९३०.

तुझे परवाचे पत्र व रोजनिशीतील पाने पोहोचली. दोन तीन वेळा मीं तीं मन लावून वाचिली.

मंजुळा, दिल्लीच्या प्रदर्शनाहून परतल्यानंतर माझ्या मनःस्थितींत असा एकाएकीं चमत्कारिक फरक का पडला तें माझें मलाच नीट समजत नाहीं. त्या नंतरचा शंकरकाकाच्या घराच्या विक्रीचा प्रसंग! त्यावेळीं घडून आलेल्या घटनेमुळ तर उदासीनतेने माझ्या मनाचा अगदीं खोल ठाव घेतला; व मी नक्कीच ठरविले, की, त्या साऱ्या माणासांपासून दूर व्हावयाचें!.. येथें येण्याची माझ्या मनाची धडपड व बाबांचा विरोध,.. माझ्या कोर्ससंबंधीं माझ्या मनानें गुप्तपणे त्याच्याशीं केलेला झगडा,.. घर बांधणीच्या वेळचें बाबांशीं झालेले माझे अनेक बाबतींतील

मतभेद,.. अरविंदच्या कॉंट्रॅक्टच्या बाबतींतील बाबांची मनोभूमिका,.. तुझ्या माझ्या संबंधाच्या बाबतींत बाबाचा मजवर झालेला गहजब !.. साऱ्या साऱ्या प्रसंगाची आठवण होऊन, इकडे येण्यापूर्वी मीं अगदी गोंधळलो होतों. विमनस्क झालों होतों!.. त्या माझ्या मनःस्थितींत, माझ्यावरील स्वतःच्या निःसीम प्रेमामुळे, मुद्दाम त्रास सोसून तूं मला दोनतीनदा भेटावयास आलीस ;.. पण त्यावेळीं मी तुझ्याशीं मोकळेपणे फारसा कधींच बोललो वागलों नाही !.. मजकडे आल्यानंतर थोड्याच वेळात आपला सहवास संपे; पण तेवढ्यांतच माझ्या काहींशा विक्षिप्त कृति, मनाचा खिन्नपणा...सारे तुझ्या दृष्टीस पडल्यावाचून राहिलें नसेल. त्या सर्वांचा नीट मेळ घालणे कदाचित् तुला कठिणहि गेलें असेल !

अशा सर्व मनःस्थितीमुळेच, 'मी पत्र पाठविल्याशिवाय तूं पत्र पाठवूं नकोस..' असे काहीं तरी अर्धवट विचारानें तुला सागून, शेवटीं मी इकडे निघून आलों होतों.

मी इकडे आल्यावर मागे घरीं ज्या गोष्टी घडून आल्या, कुटुंबात कलहाचा जो काहीं वणवा पेटला, त्याविषयीं, तुझ्या आजच्या पत्रापूर्वी अरविंदचीं व बाबाचीं मधून मधून पत्रे येत असल्यामुळे, मला बरेचसे समजले होते... त्यामुळे तर मी जास्तच भाबावून गेलो. माझे विचार दिवसेंदिवस आणखी मूलगामी होऊं लागले. पण विचार करकरूनहि मला माझ्या भवितव्याविषयीं कोणताच एकादा निश्चित निर्णय करता येत नव्हता !.. आजचे मरण उद्यावर ढकलणे, हाच माझा आतापर्यंतच्या तुझ्याशीं झालेल्या मौनाचा अर्थ होता !..

: २५० :

तुझी उदारमनस्कता स्पष्ट दर्शविणारं आजचं प्रेमळ पत्र मी थरथरत्या हातानें उघडलं!.. अगदीं धडधडत्या अतःकरणानं ते वाचलं;.. आणि, तुला मी कळत नकळत आजपर्यंत व यापुढेहि सुखापेक्षा दुःखच देत आलों आहे व देणार,.. याची माझ्या मनाला त्यावेळीं अतिशय तीव्र जाचणी झाली!.. हो, त्यामुळेच सर्व बाजूस टाकून, प्रथम तुला हे पत्र लिहावयास बसतो आहे.

मंजुळे, माझ्या मनाची आजची स्थिति मोठी चमत्कारिक आहे. माझ्या भावना-प्रधानतेमुळें मी अनेक मानसिक अडचणींत व सकटात वारंवार सापडलो व सध्याहि सापडत आहे !... त्या सर्वाचं तुजकडे आजच स्पष्टीकरण कसं करू ? आजच्या या पत्रात तरी, तुझ्या मनाला एकदम धक्का देण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. तो मला धीरच होत नाहीं.

मंजुळे, पण एवढं बरीक खरें कीं, तूं ज्या उत्कटतेनें मजविषयीं आपल्या अंतःकरणात भक्ति बाळगीत आहेस, त्याला मी अगदीं शताशानेंही योग्य नाहीं ! आणि म्हणून तर माझ्या मनाला जास्तच दुःख होतं !..

पण मानवी स्वभावाला औषध काय ? मला माझे विचार व आचरण हीं निरनिराळीं ठेवण्याच्या प्रयत्नात कधींही यश येत नाहीं ! या बाबतींत मी जों जों जास्त विचार करूं लागतो, तो तों माझ्या मनात जास्तच संदेह उत्पन्न होतो... वादळात सापडलेल्या नौकेप्रमाणें माझं मन एकसारखें दोलायमान होऊं लागतं;.. आणि कोठलाच पैल तीर गाठल्याचे समाधान असं मला कधींच लाभत नाहीं !..

मोकळें होण्याची धडपड करणाऱ्या माझ्या हृदयाला व त्यातील दारुण कल्लोळाला आजपर्यंत मधला काहीं काळ मी जाणूनबुजून अनेकदा बांध घालीत आलो आहे. पण तुझं आजच आता समोर असलेलं,.. उत्कट स्नेहशीलतेनें ओथबलेलं पत्र पुन्हा पुन्हा वाचून मला वाटलं,.. आता हा माझ्या दुबळेपणाचा कळस झाला ! मंजुळे, तुझ्या आयुष्यात दुःखाचे सारे काटे पसरण्यासच मीं कारण झालों !

शेवटीं, मनात विचार आला, आपलं हळवं हृदय घट्ट करावं, मनाचीं आंदोलनें स्थिर करावींत;.. आणि या क्षणींच... तुला अगदीं सर्व सर्व मोकळेपणें सांगून, तुझ्या आयुष्याची नासाडी करण्याचा आपला अक्षम्य अपराध एकदम कबूल करावा !.. आणि तेंच लिहावयास घेण्यापूर्वी हे पत्र पाठवीत आहे. आठ दिवस वाट पहाशील का ?..

तुझा जिवलग स्नेही—पण छे, काहीच लिहीत नाहीं —**अरुण.**

( ४९ )

शांतिनिकेतन, ता. ४ फेब्रुआरी १९३०.

प्रिय मंजुळा,

मला क्षमा कर. काय लिहू तेच समजत नाही. तुला लिहीन म्हणतों तें पत्र केव्हा लिहून होईल तें होवो. मंजुळे, मी तुझा अक्षम्य अपराधी आहें. पण मला गोंधळल्यामुळें शब्दच सापडत नाहींत. —**अरुण.**

( ५० )

प्रियकर अरुण, ता. १२ मार्च १९३०.

आठ दिवस धडधडत्या अंतःकरणानें वाट पाहून बोटभर चिठी आली. आणखी पंधरवडा रोज डाकेच्या वेळीं मन धडपडे !.. पण अजून पत्र नाहीं !

अरुण, तुम्ही चालवलं आहे काय ? माझे असे हाल का हो मांडतां ? .. जें

काहीं तुम्हाला सागावयाचं असेल तें स्पष्ट लिहा. निदान मी तुमच्या निकट स्नेहाला देखील पात्र नाहीं असें का ठरविता ? .

शक्य तितक्या लौकर काय तें पत्र पाठवा. मी येईल तो मजकूर वाचावयास मनाची तयारी करून वाट पहात आहें. पूर्वीइतकीच तुमची—**मंजुळा.**

( ५१ )

शातिनिकेतन, बोलपूर; ता. २२ मार्च १९३०.

प्रिय मंजुळा,

गेलं पत्र तुझ्या हातीं पडल्यानंतर तुझी मनःस्थिति काय झाली असेल, याची मला कल्पनाहि करवत नाहीं ! . . सविस्तर पत्रासाठी तुझ्याकडून मी आठ दिवसाची मुदत मागून घेतली होती; परन्तु तत्पूर्वीच, ज्यानी गेल्या पाचसहा महिन्यात माझं अर्ध अधिक मन व्यापलं होतं, त्या राजकीय घटनाना अगदीं अभिनव व महत्त्वाचं वळण मिळाल्याची बातमी, कालच माझ्या कानावर आली !

वैयक्तिक सुखदुःखे माणसाला कधीं सोडून जाणार नाहींत, हे खर असल, तरी आजची ही महत्त्वाची घटका केवळ त्यातच रममाण होऊन राहण्यापेक्षा, त्याहून उच्चतर—किंबहुना सर्वात उच्चतम—अशा देशाच्या कर्तव्यास तन-मन-धनेकरून जागण्याचीच आहे, अस मला वाटतं! म्हणूनच आणखी व्यर्थ कालापव्यय करण्यापेक्षा, माझ्या व तुझ्या भवितव्यविषयींचा माझा निश्चय तुजपुढे आजच स्पष्ट करणं मला जरूर वाटतं! . .

मंजुळे सर्व सुखीं व्हावींत ही माझी मनापासूनची इच्छा ! . . . आणि तीमुळेंच माझ्या हातून काहीं काही गोष्टी एकदम भावनाच्या भरात होतात. एखाद्या व्यक्तीचे दुःख कमी व्हाव या कल्पनेच्या भरात,... मी दुसऱ्या काहींना दुःखी करण्यास कारण होतों!. . आणि अंतीं पर्यायाने त्या व्यक्तीलाहि दुःख होण्याचा प्रसंग येतो.

आणि तुझ्या बाबतींतहि असच झालं!. . . का ? . . मजविषयींच्या तुझ्या उत्कट प्रेमाने मला मोहिनी घातली, त्यामुळें तूं अप्सरा नसलीस तरी मला सुंदर वाटलीस. तुझ्या लहानमोठ्या गुणाचा थोडासा सुगध जरी दरवळून माझ्याकडे आला, तरी माझ्या हृदयांत त्याची किमत शतपटीने वाढली! . . त्या घटकेला,.. तूं मला किंबहुना माझी देवताच वाटत होतीस! . .

मनात चाललेलीं असलीं वादळे दुसऱ्याला सागणें व समजणें कठीण असतें.

निकटच्या सहवासातील जिवलग माणसाना, कदाचित् सांगतां येईल; पण त्याचा उदारपणे शांत विचार करणाऱ्या व्यक्ती विरळाच ! तरी पण, स्वसमाधानासाठीं स्वतःचें मन कोणाकडे तरी पूर्णपणे उघडं करावं, असं अपल्याला कधीं कधीं उत्कटतेने वाटत असते.. आणि मजुळे, म्हणूनच माझी या घटकेची मनःस्थिति, अगदीं मोकळेपणें तुला कळविणार आहे.

: २५४ :

दोन अडीच वर्षांपूर्वी,.. आपल्या पत्रव्यवहारानंतर,.. पतिपत्नी या नात्यानें आपलीं आयुष्ये एकत्रित करण्याचा आपण निश्चय केला होता!.. पण त्यानंतरच मी दिवसेदिवस जास्त अतर्मुख होत गेलो. माझ्या भोवतालच्या वातावरणात जुळून आलेल्या घटनामुळें मला अकल्पितणे अनेकविध धक्के दिले. आणि त्याची प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय, माझ्या आयुष्याचीं ध्येयें जास्तजास्त विस्तारत गेलीं. आणि जो जो, मी जास्त विचार करीत गेलो, तो तो मला मनातल्या मनात वाटूं लागले!.. माझ आयुष्य एकाकी स्वतंत्र असण हेच जास्त चागलं! त्याला कसलेहि,.. प्रेमाचे देखील पायबंद नकोत!..

म्हणून, मंजुळे, मन अगदी घट्ट करून,.. आज या पत्राच्या सुरवातीसच तुजकडे आपली आयुष्ये पुन्हा भिन्न ठरविण्याची, मला याचना करावी लागत आहे!..

: २५५ :

आज मी जे तुला लिहीत आहे, ते एखाद्या अत्यंत जिव्हाळयाच्या मित्राला जसे लिहीन, तसेच असणार! क्षणभर तुझा माझा दुसरा कसलाहि संबध आला नव्हता,... असे धरून केवळ एक जीवाभावाची मैत्रीण या दृष्टीनेंच माझं हें पत्र वाच;..व तुला जें मनापासून व प्राजलपणे वाटेल तेच मला सुचव !

माझ्या आयुष्याच्या गेल्या काहीं वर्षांतील घटना पहा; .. माझ्या आकाक्षा निराळ्या, माझ्या भोवतालच वातावरण निराळ!.. अशा तऱ्हेने उत्तेजनविरहित व सहानुभूतिशून्यपणेच माझे आयुष्य चाललं होतं, त्यावेळीं माझी वैयक्तिक कर्तबगारी व यशे फोल ठरली; माझ्या हृदयाच्या नैसर्गिक आकाक्षा, मला जाणून बुजून व मन मारून बहुतांशी दडवाव्या लागल्या!.. पण इतकंहि करून मी माझ्या माणसापैकी कोणाला सुखी करू शकलों ?.. मला मजविषयीं वाटतों तितकाही विश्वास किंवा अभिमान, माझ्या माणसापैकीं कोणाला वाटला?.. असला सदसद्विवेकबुद्धीचा खून करून,.. मी माझी स्वतःची खिन्नता मात्र वाढवीत होतो,.. एवढच काय ते! पण जगाकडे विशाल दृष्टीने पाहिल्यास मी माझीं म्हणविणारीं माझ्या भोवतालचीं हीं माणसे,.. अत्यत क्षुद्र भासणाऱ्या आपल्याच यशापयशात, लाभातोट्यातच, फक्त रममाण होताना दिसत होतीं!

आणि तें पाहून तर माझ्या मनाची खिन्नता त्या बाजूनेही जास्त दाटली देखील!

: २५६ :

पण उलट, माझ्या चिमुकल्या आयुष्याकडे, मी जसजसं जास्त मूलगामी दृष्टीने पाहूं लागलो, तसतसं मला जास्तच स्पष्टपणे समजून येऊं लागल, की, आत्मज्ञानाची अतोनात उत्कंठा हेच मानवी आयुष्याच्या हालचालीचें मुकाणू! सात्त्विक प्रेमाची कधीं कधीं सरशी होई, त्यावेळी एकप्रकारे मर्यादित परन्तु प्रेमपूर्ण वातावरणाच्या बधनाने, आपली आत्मिक प्रगति जास्त सुलभतेने व त्वरित होईल, असं मला मधूनच वाटे खरं; पण तरीही, . . दिवसेदिवस माझी एकाकी आयुष्याची आकाक्षाच तीव्र होत गेली!. . मात्र जगापासून लाब. . लाब . ., गिरिकदरात जाऊन रहाव असं मात्र मला कधीच वाटल नाही! आपल्या भोंवतालच्या साऱ्या व्यक्तींचे सुख वाढविण्यासाठी मानवी जगातच आपल आयुष्य व्यतीत कराव,. . आपल्याभोवतालीं कोणीही दुःखी असू नये : . . हीच माझ्या हृदयाची उत्कट इच्छा! विचार करून प्राजलपणे वाटावे, की, जगात आपल्याला तसं स्वतःच अस निराळ सुख काहींच नाही! भोवतालच्या साऱ्याना सुखी करणे, यांतच माझ्या सुखाच्या व्याख्येचा समावेश होतो!

आणि म्हणूनच, मला दिवसेदिवस वाटू लागल आहे, लोकसेवेच्या मार्गात असलेल्या मनुष्यामागे जितक्या कमी उपाधि असतील, . . त्याच्या बऱ्या वाईट भोगाशी जितक्या कमी व्यक्तीचा सरळ संबंध येत असेल, तितकी त्याची कार्यक्षमता जास्त वाढेल!.. त्याला आपल्या पुष्कळशा वैयक्तिक इच्छाआकाक्षा मर्यादित करून,.. किंबहुना त्या मनातल्या मनात दाबून टाकून, जगात वागणेच अत्यंत जरूर असत! आयुष्यातील सारे भोग,. . वैयक्तिक आनंद त्याच्या ध्येयमार्गात अडथळा आणतील! म्हणूनच मन आवरून त्याने त्याना पाठमोरे झाले पाहिजे!. .

असल्याच विचारामुळे मला अधिकाधिक वाटते, कीं, माझ्या मनाची नैसर्गिक रचना स्वयंपूर्ण स्वरूपाची आहे. माझ्या आयुष्याचा ध्येयमार्ग धीराने आक्रमण करावयास मला कोणाच्या सोबतीची अगदी अतिशय आवश्यकता आहेच असें नाही! . .

: २५७ :

माझ्या मनाची भूमिका प्रथमपासूनच अशी असूनहि, माझा तुजबरोबरचा संबंध वाढत गेला! आजपर्यंत माझ्या मनाला ते एक कोडेच होतें! स्त्रीहृदय व स्त्रीसगति याची नैसर्गिक आकांक्षा, माझ्या मनाला वाटत होती यात आश्चर्य काय? ती यापुढेही अशीच कायम राहील. हो, तुजबरोबरच्या काहीं काळ वाढत गेलेल्या माझ्या संबंधाचे मूळ विचारातीं मला या भावनेतच सापडे!... स्त्रीपुरुष

प्रेमपंकज आहे, असें मला तरी बाबाप्रमाणें वाटत नाहीं, ' मानला तर देव, नाही तर दगड ' अशातलीच काहींशी त्याची स्थिति आहे. पण पुरुषाहून स्त्री-हृदयाच्या साऱ्या हालचाली निरनिराळ्या असतात, मला वाटतं ! . . तिच्या आयुष्याचा, ध्येयाचा, . . प्रेम हा एक बराच मोठा भाग होतो. म्हणूनच स्त्रीच्या आयुष्यात लग्न ही बाब विशेष महत्वाची म्हणणे योग्य ! पण, उलट, पुरुषाला जगात प्रत्यक्ष तोंड द्यावयाचे असते. त्याच्या आयुष्याच्या नौकेला अनेक आकांक्षांचे शीड असते. तूं मागे एकदा म्हटलं आहेस तसंच, . . ' आकांक्षा पुरुषापुढे वसतसे, प्रेमा सदा स्त्रीहृदी ! '.

तुझा माझा संबंध किती चमत्कारिकपणे घडून आला ? त्या वेळच्या माझ्या सहानुभूतिशून्य वातावरणात धडपडणाऱ्या हृदयाला, तुझ्या एकप्रकारच्या प्रवाहपतित आयुष्याची चटकन कल्पना करता आली ! अगदीं मोकळेपणें सांगतो. . . तुजविषयीची असली एक प्रकारची अनुकंपा आणि स्वतःला–मिळूं शकणारे सहानुभूति व उत्तेजन याचे नवे स्थान याची वेडी स्वार्थी आशा, यातच माझ्या तुला दिलेल्या त्यावेळच्या होकाराचा समावेश होतो. त्यावेळीं मला वाटे, मंजुळा व मी एकमेकानी एकमेकाना आपले म्हटलं कीं झालें ; त्यातच आपण एकमेकासाठी प्रेमाचं सुखाचं नंदनवन निर्माण करूं ! . . .

; २५८ .

पण आपल्या जगाबाहेरील व्यवहारी जगाची त्यावेळीं आपल्याला जरासुद्धां कल्पना आली नव्हती. म्हणून बाबाचा गहजब झाल्यानंतर कांही महिन्यानीं तर मी जास्तच गोंधळून गेलो ! . . . त्यावेळी मनात फिरून विचार येत,.. व्यक्तिशः, निर्धन मी ! . . माझं स्वतःच आयुष्य जगाच्या या धकाधकीच्या जमान्यात केव्हां व कसं स्थिर होणार ?..आणि माझी ध्येयें तर तो स्थिरतेचा काल जास्तच दूरवर नेणार ! मग, तोपर्यंत माझा व मंजुळेचा संबंध ?.. पण, तरी तुला धीर देण्या-साठीं व माझ्याहि मनाच्या भ्रामक शांतीसाठी मी तुला इकडे येईपर्यंत, तसल्याच द्विधा मनःस्थितीत आशेची प्रेमळ पत्रे लिहीत गेलो ! मंजुळे, तरी माझे मन मात्र अनेकवेळा मला आतल्या आत अतिशय जाळीत असे विशेषतः, तुझं मजबद्दलचं दिसून येणार उत्कट प्रेम ! हो, तेच माझा हा दंभ कायम ठेवण्यास जास्त कारण झाले. अशा वेळीं मला काय करावं तेच समजत नसे. मात्र, मी शेवटीं सर्व प्रकारे तुझ्या दुःखास व निराशेस कारण होणार, असें मला त्यावेळेपासून दिवसें दिवस जास्त स्पष्टपणे व उत्कटतेने दिसू लागले होते.

दिल्ली प्रदर्शन व प्रवास संपवून परत आल्यानंतर, इकडे निघून येण्यापूर्वी मी असल्याच मानसिक कल्लोळानीं झपाटलो गेलों होतों; पण तरी त्या स्थितींतहि मी तुजबरोबर पूर्वीच्याच पद्धतीने वागलों. दिवसेंदिवस अंतर्मुख होऊन

विचार करीत गेल्यामुळें कुटुंबात घडून येणाऱ्या नवनवीन घटनातील क्षुद्रता जाणवली आणि जन्मजात नाती व त्याचा आसरा,.. जगाचे निर्हेतुक व्यवहार, ..पैशाची किमत.. याची यथार्थ कल्पना मला एथील एकाकी जीवनात जास्तच स्पष्ट झाली !

हो, मंजुळे, . . आणि याची प्रतिक्रिया म्हणूनच की काय, दिवसेदिवस माझी ध्येये जास्त जास्त विस्तृत स्वरूपाची होत गेली.

शेवटीं, मी मनाला निकराचा प्रश्न विचारू लागलो. माझ्या या माणसाच्या सुखदुःखाच्या बागुलबाव्याने,.. त्याच्या वैयक्तिक स्वार्थी इच्छाआकांक्षाच्या कल्पनानीं, आपल थोटकं आयुष्य व आपलीं ध्येये मर्यादित करायची का ?.. आपली वाढ मुळातच छाटावयाची का ? या व्यापक दृष्टीने जगाकडे, . . माझ्या देशाकडे, जो जो मी खोल विचार करून पाहू लागलो, तो तो मला पटले कीं, मला समाजासाठीं, माझ्या मायदेशासाठी, पुष्कळ करण्यासारखं आहे. आपल्या किंवा कोणाच्याही क्षुद्र वैयक्तिक सुखदुःखाच्या कल्पनेने गागरून जाण्यात अर्थ नाहीं!..आपलं आयुष्य, आज आहे तसंच स्वतंत्र व अनिर्बंध ठेवावे !..देशाकारणीं उच्च ध्येयासाठी आपला देह झिजवावा! हेच आपल आजच कर्तव्य ! . .

: २५९ :

आणि याच सुमारास,.. स्वदेश–स्वातंत्र्याचा झगडा आणीबाणीपर्यंत येऊन-ठेपला आहे !.व्हाइसरॉयच्या गाडीखाली बॉंब फुटला व त्याच्या बगल्यावर आमच्या मायदेशाच्या स्वातंत्र्याच्या आशेचाही भ्रमाचा भोपळा फुटला !..त्यानतरची लाहोरची कॉंग्रेस! ती तर देशप्रेमाने रसरसणाऱ्या हजारो ध्येयानी व कल्पनानी खळबळलेली धग धगती कढईच होती. जवाहिरलाल नेहरूचं अध्यक्षीय भाषण किती ओजस्वी ? त्याचं म्हणण,.. 'यशावर आपण अधिकार गाजवूं शकत नसलो तरी महान् गोष्टी महान् सकटातूनच प्राप्त करून घ्याव्या लागतील!..' त्याच वेळचा तो संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव;.. व गेल्या २६ जानेवारीचा स्वातंत्र्यदिनोत्सव ! या सर्व घटना, कोणत्याही देश-प्रेमी तरुणाला दोन हात करण्यासाठी आव्हानेंच देत होतीं. . . महात्माजीनी केलेल्या जनतेच्या हिताच्या साध्यासुध्या मागण्या ! . पण त्याच्या सर्व प्रकारच्या प्रेमळ प्रयत्ना-नंतरहि त्या फेटाळल्या गेल्या ! व म्हणूनच ते म्हणतात, " मतस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य याविषयींचे आमचे हक्क हिरावून घेऊन, आमच्या अन्नान्नदशेकडे न पाहतां बेसुमार उधळपट्टी करीत चालणारी ही स्वार्थी ब्रिटिश राजसत्ता म्हणजे एक शाप आहे !.. व ती अनत्याचाराच्या जोरावरच उलथून पाडणे हे प्रत्येक आर्यपुत्राचे कर्तव्य आहे ! .."

अशा तऱ्हेनें त्यांनी गुडघे टेकून भाकरीची याचना करूनहि, भाकरीऐवजी त्याच्या पदरी धोंडा पडल्यामुळे,..त्यानीं जगाच्या इतिहासातील नवे पान उघडलें!..

देशभक्तीची लाट मानवी अंतःकरणांत आजपर्यंत कधीही चढली नसेल, इतकी उंच ती या क्षणीं उचंबळली आहे !.. 'आपण काहीं देवदूत नाही! अतिशय दुबळे व मोहाला ताबडतोब वश होणारे आहो; परन्तु तरीहि, निकराचा प्रयत्न करूं!'.. असे सागत सागत, स्वतः देशातील प्रत्येक व्यक्तीच्या हृदयातील ज्योत अनेक हाल अपेष्टा सोसत,.. व आपल्या पणतीच्या ज्योतीवर पेटवीत,..गांधीजींनीं ही त्याची दांडीची अभिनव... पवित्र यात्रा सुरू केली ! .. ती आज या घटकेलाहि चालू आहे.

ब्रिटिश सरकार सामर्थ्यवान् असलें तरी जगाबद्दल दहशत बाळगून आहे ! त्यानाहि त्याची जगातील अब्रू आहे! म्हणूनच गाधीजी म्हणतात, की, 'या राष्ट्रकार्यासाठी त्याच्या सुपुत्राचे जितके जास्त अर्पण होईल,..जितकें जास्त शुद्धिकरण होईल,..तितक्या जास्त वेगाने या ओजस्वी लढ्याचा तेजस्वी शेवट होईल!..

या गडबडींत सुरवातीसच वल्लभभाई गेले,.. सेनगुप्त गेले,.. आणि अशी अनेक लोकाना अटक झाल्यानंतरहि आम्ही आमची वैयक्तिक सुखदु:खे टाकून देशाच्या या महान् कार्यास आपापल्या क्षुद्र कुवतीने सहानुभूतिपर हातभार लावण्यास आता पुढे होणार नाहीं, तर मग केव्हा ?..

मंजुळे, म्हणूनच सर्व विचाराती आता मी हे ठरवले आहे ! कीं सारे वैयक्तिकपाश येथेच तोडावयाचे,..वैयक्तिक आकाक्षानाहि येथेच फाटा द्यावयाचा, व येथून आपल्या अगदी पूर्णपणे नव्या आयुष्यास सुरवात करावयाची!

: २६० :

आतां साग, अशा स्थितींत, तूं मजवर अनिश्चित काळपर्यंत विसंबून राहणें, आपल्याभोवतीं असलेल्या समाजव्यवस्थेत योग्य होईल का ? माझें भावी आयुष्य आता आज आहे त्याहूनहि कितीतरी पटींनीं अनिश्चित होत आहे ! .. किंबहुना माझ्या जीविताची तारहि केव्हा तुटेल, हे देखील सागता येत नाहीं!

म्हणूनच म्हणतो, मला क्षमा कर, मंजुळे ! .. मला माहीत आहे, माझ्या दुबळेपणाला बळीं पडल्यामुळे, तुझ्या आयुष्याला चमत्कारिक वळण लागलें !.. तुझ्या आयुष्याचीं गेलीं दोन वर्षे, तुला वाटणारी नवी आशा एकाएकीं समूळ नाहींशी होण्याचा तुजवर प्रसंग आला!..पण मी आतापर्यंत अगदीं मोकळेपणे लिहिलेले वाचल्यावर तुला एवढे तरी समजून येईल की, मी भावनाप्रधान आहें. कदाचित्, एकप्रकारें दुबळाहि आहे; पण नीच मनोवृत्तीचा खास नाहीं ! ..

तेव्हा तुलाच विचारतों, शातपणे विचार करूनहि मला उत्कटतेने आपल्याकडे आकर्षित असलेली श्रेष्ठ कर्तव्ये बजावण्यास मी पुढे होऊं, कीं, तूं मी यांसारख्या क्षुद्र व्यक्तींच्या वैयक्तिक सुखदु:खात व आशा निराशेत गुरफटून, आयुष्यातील यापुढलीं पावलें टाकूं ?

मला माहित आहे, मला-योग्य तोच मार्ग दाखवशील ! . . तूं माझा येथील चित्रकला व गायन याचा कल्पिलेला कोर्स संपवला; रवींद्रनाथांनीं व येथील इतर अध्यापकांनीं माझ्या चित्रकलेचे फार कौतुक केलें ! 'उपाधि' ही शांतिनिकेतनची पदवीहि मिळाली. आतां एप्रिलच्या सुरवातीस सुनीति अरविंदाचे लग्न होणार असल्याबद्दलची, बाबा व अरविंद या दोघांचीं मला पत्रें आलीं आहेत. त्याकरिता मला येथून लौकर निघावें लागेल. पण तत्पूर्वी सहासात दिवसात तुझ्या पत्रोत्तराची मी येथेंच वाट पाहतों.

मंजुळे, तुझ्या आशाभंगाबद्दल मी तुझा अक्षम्य अपराधी आहे, हे मी जाणतो. पण, तरीहि तूं मजकडे दयार्द्र दृष्टीनें पाहशील व मला माझीं कर्तव्यें करताना, एखाद्या जिवलग मैत्रिणीप्रमाणें, शुभ चिंतशील.

तुझ्या प्रेमळ स्नेहाचा अजूनहि भुकेलेला, —**अरुण**

( ५२ )

कल्याण; ता. १३ एप्रिल १९३०.

अरुण,

माझ्या एखाद्याहि शब्दाला तुम्हीं मोहून जाऊं नये, म्हणून जपूनच शब्द वापरते; पण तरी तुमच्या आलेल्या मोकळ्या पत्राला अगदीं मोकळेपणेच उत्तर पाठविते. या पत्रानंतर आणखी पत्रें लिहून मी तुम्हाला मजकडे आकर्षिले जाण्याचा अवसर देऊं नये, हेच योग्य, असे मला वाटते. म्हणून याच पत्रात जे काहीं वाटतें, ते सारे सारें लिहून घेते.

परीक्षेतून मी अगदीं मोकळी झालें. माझी गेल्या वर्षातील मनःस्थिति, तसेंच नानाच्या शेवटच्या आजारांतील शुश्रूषा या गोष्टी लक्षात घेतल्यावर माझा निकाल काय ठरलेलाच आहे. त्यानंतर आलेले तुमचें पहिले पत्र धडधडत्या अंतःकरणाने वाचले, व त्यात विखुरलेल्या विचाराची भवति न भवति करीत काहीं काळ तळमळल्यावर तुमचें दुसरे पत्र माझ्या हातीं येऊन थडकलें.

अरुण, मी गेले दोन तीन दिवस त्यावर पूर्ण विचार केला, तुमच्या श्रेष्ठ ध्येयाच्या व मनाच्या समाधानाच्या आड येऊन तुम्हाला पायबंद घालणारा माझा पाश मी काढून घेण्याचेंच विचारातीं ठरविले आहे. हें पत्राच्या सुरवातीसच मी तुम्हाला सांगून टाकतें.

आतां तरी झालें का तुमच्या मनाचें समाधान ?

: २६१ :

अरुण, माझ्याकडे कोणत्याहि प्रकारच्या सहानुभूतीनें तुम्ही पाहूं नका. तुमच्या आयुष्यात मी म्हणजे एखाद्या काल्पनिक स्त्री–व्यक्तीप्रमाणे आले गेले, असेच समजून चाला; म्हणजे मग तुमच्या मनाला वाटणारी रुखरुख, मधूनच होणारी आपल्या कर्तव्याकर्तव्याची तुमच्या हृदयातील खळबळ एकदम थांबेल. आणि तुमच्या आयुष्याचा स्वतंत्र गाडा, तुमच्या ध्येयमार्गावरून सुरळीत पुढें चालूं होईल !..

माझ्या सहानुभूतिशून्य आयुष्यांत तुमच्या प्रेमाचा ओलावा माझ्या मनाला शांति आणीत होता हे खरें; पण तरीहि मी प्रथमपासूनच थोड्या फार प्रमाणात जाणून होते की, तुम्ही मला वरवर वाटे,.. त्यापेक्षाहि भयंकर भावनाप्रधान आहा!.. तुमच्याकडे पाहिलं कीं, मला शेले कवीची आठवण होई. कोठलं तें आठवत नाही;..तुम्ही मला भेट म्हणून दिलेल्या Eternal City या पुस्तकावर, मी मागे केव्हातरी एक वाक्य लिहिलं होतं—" Love lies hid in the heart of pity Poets don't make the best lovers or the best husbands. They are too engrossed in themselves"

काल विमनस्क स्थितींत तें पुस्तक पुन्हा चाळताना तेच वाक्य माझ्या डोळ्यासमोर आलें. आणि मला एकदम तें कितीतरी पटलं!

पण अरुण, त्याबद्दल मी तुम्हाला कसला दोष मात्र मुळींच देत नाहीं. मज-कडे आपले विचार सांगताना, तुम्ही दाखविलेला आपल्या मनाचा मोकळेपणा व मजवरील विश्वास, याना मी पात्र आहे!.. तेवढा तरी मला मजबद्दल आज आत्मविश्वास वाटत आहे !.. सहवासोत्तर विवाहाच्या बाबतींत, थोड्या फार विकास पावलेल्या व्यक्तींमध्ये असले मोकळे वातावरण असले तरच एकमेकाच्या खऱ्या सुखाची त्यांस कल्पना आहे असे समजावयाचे !..

: २६३ :

तुमचे चार दिवसापूर्वीचे सविस्तर पत्र वाचून, माझ्या मनात विचाराची भयंकर खळबळ उडाली नाही, किंवा मला दु:ख झालं नाही, असं मी उगाच खोटं कशाला लिहूं ?... पण अरुण, मी जसजसा जास्त विचार केला, तसतशी बावरून मात्र गेले नाहीं!.. आयुष्यात याहूनहि मोटीं संकटे मजवर येऊं शक-तील, कदाचित् येतील हे मी जाणून आहे. तुमची ओळख होण्यापूर्वीच आयुष्य,.. व तुमची ओळख, सहवास, प्रेम अनुभवल्यानंतरचं आजपर्यंतच माझं आयुष्य, यात किती फरक होता ?

ते तसंच कायम राहिलं असतं तर, मला आनंद झाला असता खास !...

तथापि तें आता शक्य नाही; पण म्हणून, कालाच्या ओघातील तुमच्या सह-

वासात जेवढे मी सुखी क्षण माझे म्हणूं शकलें,.. मी जो थोडा फार आनंद चोरला,.. तो तरी काय थोडा आहे?.. तुमच्या सहवासापासूनच मला आनदा-प्रमाणे सकटाचीहि जास्त जास्त तोंडओळख झाली!.. तुमच्या सहवासामुळेंच कदाचित्–त्यांना तोड देण्याइतकी माझी मनोभूमिका तयार झाली आहे!..

मी निराशावादी होते, त्यावेळी मला वाचनात काय किंवा व्यवहारात काय, निराशा दिसली की त्यातच एक प्रकारचा आनंद वाटे!.. पण सकटाशी ओळख झाल्यामुळे, आज मी बरीच आशावादी झाले आहे. आयुष्याला स्वतःचीं अशीं काहीं ध्येयें असतात,.. व असावींत,.. असे मलाहि मनापासून वाटूं लागले आहे... दुःखाचे वातावरण भोवतीं दिसत असेल, नाही असे नाही; पण तरीहि 'घनतमीं शुक्र बघ राज्य करी'.. असे मला खात्रीपूर्वक वाटल्यावाचून रहात नाहीं!..

म्हणूनच मागे मला आवडणाऱ्या नुसत्या फुलपाखरी कवींपेक्षा ताब्यासारखे श्रेष्ठ कवि, किंवा ब्राऊनिंग, वर्डस्वर्थ फार आवडू लागले आहेत.

: २६४ :

श्रेष्ठ व विस्तृत ध्येयें आणि वैय्यक्तिक सुखदुःखे,.. आशानिराशा–याचा तुम्ही तुमच्या पत्रात उल्लेख केला आहे. त्याच्या श्रेष्ठकनिष्ठतेविषयी माझ्या मनात आजपर्यंत अनेक वेळा तुंबळ उडालेलें आहे. पण कितीहि विचार केला, तरी मी म्हणजे साध्या मध्यमस्थितीतील कुटुंबाच्या कक्षेतच फिरणारी,.. किंबहुना, केवळ त्याच्या आसऱ्यालाच राहाणारी एक दुबळी स्त्री आहे!.. तेव्हा या बाबतींतील माझे अजूनहि अस्थिर असलेले विचार तुम्हाला आज येथे सागण्यात तरी काय अर्थ?.. त्यावर या माझ्या परिस्थितीचीच दाट छाया पडलेली तुम्हाला आढळेल!..

पण एवढे मात्र खरे,. कीं तुम्ही ज्या श्रेष्ठ ध्येयआकाक्षा यानीं प्रेरित होऊन आज स्वतःच्या वैय्यक्तिक सुखाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्याचे ठरविले आहे,.. त्या-बद्दल मला आदर आहे!.. आणि तसें तुम्ही करीत असताना, मला कितीहि दुःख होत असले व होणार असले, तरी मी तुम्हाला माझ्या हृदयातील तुमच्या विषयीचा सर्व प्रेमा एकवटून,.. शुभच चिंतीन.

अरुण, खरोखरच सागते, तुमच्याविषयीं माझ्या मनात पूर्वीइतकाच स्नेह व पवित्र जिव्हाळा आहे. माझ्या भवितव्याला काय असेल ते वळण लावण्यास व जे लागेल त्यात स्वतःला सामावून नेण्यास, मी पूर्ण नसले तरी बरीचशी समर्थ आहे!.. तेव्हा, मजविषयीं कसलाहि विचार न करता, तुम्ही अगदी शात मनाने तुमच्या आयुष्याला जो कोणता श्रेष्ठ सुखाचा मार्ग वाटत असेल, त्याचाच अवलंब करा, तुमच्या ध्येयाची शाश्वती बाळगा,.. आणि कायम टिकणारे समाधान माना.

स्वतःच्या क्षणभंगुर सुखाकडे पहाण्यापेक्षा, कोणाच्याहि कायम सुखाकडे माझे डोळे लागलेले असतात!..

: २६५ :

माझ्या या पत्रानें तुमचें भावनाप्रधान अंतःकरण कदाचित् पुन्हा एकदा मज-विषयींच्या भावनांनीं उचंबळून येईल;.. व त्याच भावनेच्या भरांत तुम्ही मला पुन्हा काहींतरी पत्र लिहाल! पण, म्हणून येथे बजावून सांगते, कीं, हें पत्र वाच-तांच माझ्या भवितव्याचा व (जिव्हाळ्याची मैत्रीण या दृष्टीनेसुद्धा) माझा, ..विचारच सध्या सोडून द्या!.. जगात वावरणारी खरीखुरी व्यक्ति नव्हे, तर व्यव-हारी जगाच्या चरकातून बाहेर पडणारी,.. वरवर दिसायला क्षणोक्षणीं दुःखी होणारी,.. पण जिच्या अंतःकरणात स्वयंस्फूर्त आनंदाचा झराच सतत वाहत आहे,.. अशी मी एकाद्या कादंबरींतील काल्पनिक स्त्री आहे,.. असेच सध्या समजा!.. आणि तुम्ही ठरविलेल्या मार्गाला लागा.

रागाने नव्हे, पण तुमच्याच हिताच्या दृष्टीने, मी आता या पत्राला तुमच्याकडून उत्तराचीहि अपेक्षा करीत नाही;.. कीं, तुम्ही येथे आल्यावर तुम्हाला भेटण्याचीही मला इच्छा नाहीं!.. तुम्ही सुखी झालेले पाहण्यात मिळणारा सात्त्विक आनंद हेच माझ्या आयुष्याचे ध्येय!.. तथापि, तुमच्याविषयींचा उत्कट स्नेहभाव माझ्या हृदयात अजूनहि कायम आहे!.. यापुढेंहि तो तसाच राहील आणि..अरुण, ..आपला ध्येयमार्ग आक्रमून कधीं यथाकालीं यशस्वी झाल्यावर मी असेन तेथे तुम्ही याल,.. त्यावेळीं, मी तुमचें, पूर्वीइतक्याच पवित्र जिव्हाळ्याने माझे निकटचे स्नेही म्हणून स्वागत करीन.

तुम्हाला निर्मळ यशच चिंतणारी—**मंजुळा देसाई.**

(५३)

शांतिनिकेतन, ता. ८ एप्रिल १९३०

मंजुळाताई,

तुला सर्वस्वी दुःख देण्यासच मी कारण झालों. पण तुझें पत्र आज मिळालं त्यात तुझा उदार प्रेमळपणा, अजूनहि ओतप्रोत भरलेला दिसून येतो! त्यामुळे मी जास्तच गुदमरून गेलो आहे.

माझी दुबळी भावनाप्रधानता जाणून तूं मजकडे प्रेमळ भगिनीच्या दृष्टीने पाहिलंस..मंजुळाताई, मला शब्दच सापडत नाहींत. खरेच, तूं एक देवता आहेस!..

मला तुला भेटावंसं किती वाटतं?.. पण माझ्या मनाचा दुबळेपणा मी पूर्ण जाणतों. त्यामुळें आणखी कांहीं दिवसानीं मी तिकडे आलों, तरी तुला भेटण्याचें टाळणार आहे!.. पण तरीहि तुझ्या प्रेमळ स्नेहाची मला अजूनहि अत्यंत जरूरी आहे. ..पुन्हा भेट होईपर्यंत तुजविषयीं प्रेमादर बाळगणारा,

तुझा दुबळा, पण प्रेमळस्नेही, **अरुण.**

(५४)

शातिनिकेतन ता. ९ एप्रिल १९३०.

प्रिय मावशी,

क्षमा कर ह. मी इकडे आल्यानतर सुरवातीस तुला एकदोन पत्रें पाठविलीं तेवढींच. त्यानंतर मी बाबाच्या पत्रास उत्तरे पाठविण्याशिवाय विशेष असं कोणालाच लिहिल नाही. येथे आल्यावर मी माझ्या हातीं घेतेलल्या कामात गढलो होतो; पण त्यापेक्षा माझ्या आयुष्याच्या ध्येयाला काहीं निश्चितता आल्यास, तेंच मला पाहिजे होतें. कारण क्षुद्र मनोवृत्तीनेच जगाकडे पाहणाऱ्या गोतावळयामुळें, आजपर्यंत माझ्या मनावर अनकेविध धक्के बसत गेले आहेत. माझ्या नैसर्गिक आकाक्षा अनेकदा दडपूनहि, .. त्या साऱ्याना सुखी करण्यात मला कोणत्या प्रकारे यश आले.

बाबा म्हणतात तसा मी कदाचित् भावनानी वाहून जाणारा असेन..पण माझ्या मनाच्या साऱ्या प्रेमळ हालचाली, भोवतालच्या,.. याच.. केवळ अपेक्षा करणाऱ्या वातावरणात, सर्व दृष्टीने मूर्खपणाच्या व अयशस्वी ठरल्या! व म्हणूनच तोपर्यंत ज्या पैशाची किमत, महत्त्व.. मला विशेष वाटत नव्हते,.. तें आता समजूं लागले. मानवी जगातील साऱ्या व्यवहाराचा, आर्थिक पाया,. व माझी सदा जागृत असणारीं उच्च ध्येयें, .. यातील दिसून येणारी ही मनस्वी तफावत व अव्याहत चालू असलेला घनघोर झगडा पाहून, माझी व्यवहारी जगांतील हतबलता आता मला स्पष्ट झाली आहे!.. आणि मग मला वाटलं,.. केवळ प्रेमळपणामुळे कल्पना नाहीं त्या जबाबदाऱ्या, आपण शिरावर घेण्याचा मूर्खपणा केला!.. आणि मी आठवडेच्या आठवडे गागरल्यासारखा विमनस्कपणे तेच तेच विचार मनात घोळवीत आलों आहे.

आणि या नव्या आर्थिक दृष्टीनें, मिरा किवा मंजुळेबरोबरच्या माझ्या संबधाकडे पाहूं लागताच, मी पूर्ण चुकत आलों व चुकत आहें, अशीच माझी पूर्ण खात्री झाली.

मंजुळा एकप्रकारें जगांत निःसहाय आहे, .. ती मजवर मनापासून प्रेम करते; तिचें उत्कट प्रेम मी वरच्यावर झेलल्यास, ती सुखी होईल !.. आपल्यालाहि थोडीफार तिजपासून स्वतःच्या सुखाची अपेक्षा आहे, .. असल्या विचाराच्या त्यावेळच्या उत्कटतेमुळेच, भावनेच्या भरांत, बाबाच्या विरोधास तोंड देऊन, मी त्यावेळीं तिला पाठीशीं घातले !

पण आतां वाटूं लागतं, .. या व्यवहारी जगांत,... हे सारं मी कशाच्या जोरावर केल ?...

: २६८ :

जगात नुसत्या प्रेमावर जगणं शक्य आहे कां ?... माझी सारी द्रव्यशून्य कर्तबगारी–इतराच्या दृष्टीला ती कर्तबगारी वाटत असलीच तर,–जगाशीं तोंड देण्यास काय उपयोगी ? आणि माझीं श्रेष्ठ ध्येयें जर मला सोडणे अशक्य वाटत असेल, तर माझें आयुष्य असेंच दरिद्री व अस्थिर रहाणार ! .... अशा स्थितींत आपल्याबरोबर दुसऱ्या एका व्यक्तीच्या भवितव्याची जबाबदारी घ्यावयाचा आपल्याला काय अधिकार ?... अशा तऱ्हेने स्वतः सबळ नाहीं असें दिसत असताहि, मी मंजुळेला प्रेमाचें आश्वासन द्यावयाचे म्हणजे, आंधळ्याने पांगळ्याला द्यावयाच्या हाताप्रमाणेच नव्हे का तें सारे ? .. असा काय सुखाचा मजकडे गड्डा आहे, तर त्या जोरावर मी तिला सुखी करूं शकेन ? .. केवळ माझ्या तिजविषयींच्या प्रेमावर ? ..

ही व्यर्थ भावनाप्रधानता व अनुकपा अती काय उपयोगी ? आपल्या व्यक्तित्वाला मात्र पायबद ! ..

मी तिला लग्नाचें आश्वासन दिले;... ती भाबडी, प्रेमळ पोर त्यावर प्रेमानें व विश्वासाने विसंबून आतांपर्यंत आशेने राहिली ! .. पण माझ्या आज पूर्णपणें ठरलेल्या ध्येयाकडे पाहिले,... तर मला माझ्या हिमतीवर या जगांत अभिमानानें स्वतंत्रपणें जगावयास आणखी किती काल घालवावा लागेल कोणास ठाऊक ? आणि तोपर्यंत मंजुळेचे काय ? .. आपल्या समाजांत असला वाङ्निश्चय किती काल लाबू शकेल ?....

मी किती तरी दिवस असा सारखा विचार करीत आलों. मला मजुळेविषयीं वाटणारे प्रेमही मुख्यतः मजकरिता असण्यापेक्षां, मजुळेला सुखी करण्याच्या, तिला सहाय्यक होण्याच्या भावनेचे, म्हणजे एकप्रकारें अनुकंपाजन्यच ! ... म्हणूनच शेवटीं व्यवहारी जगातील, मजुळेविषयींच्या माझ्या असल्या सर्वच बाजूने दुबळ्या ठरणाऱ्या प्रेमाची मला खरी कल्पना आली !....

मुख्यतः, मजुळा सुखी होण्यासाठींच मी बाबाना केलेला विरोध, गेलीं दोन वर्षें तिला मी लिहीत आलों तीं पत्रे, याची आठवण होताच,... मला वाटूं लागलें,.

.... ज्या वृत्तीसाठीं मी मनांतल्या मनांत लोकांना हंसत आहे, त्याच काहींशा दांभिक व उपकारी वृत्तीने मी या बाबतींत स्वत: वागत आलो आहे, तिनेच बराचसा पछाडला गेलो आहे! . . माझ्या मनाची ही फसवणूक मी यापुढेंहि अशींच चालू ठेवली, तर मंजुळेच्या सुखासाठींची माझी असली दुबळी धडपड, अतीं तिच्या भयंकर दारुण दु:खासच कारण होईल! . .

: २६९ :

आणि हें समजून येतांच, गेल्या आठवड्यांत, गांधींच्या स्वातंत्र्य युद्धात आपण मनापासून पडावयाचें असें नक्की ठरल्यावर मी तिला माझ्या या सर्व मन:स्थितीचें पत्र पाठविलें होतें. तिचे काल उत्तर आलें आहे. त्या पत्रातील तिच्या हृदयाच्या आविष्कारामुळे तर मला खरोखरच पुन्हा उचंबळून आलें! खरेंच, मावशी, मंजुळा ही एक देवता आहे. तिच्या तसल्या निरपेक्ष व उत्कट प्रेमाला मी मुळींच योग्य नाहीं व नव्हतो हेंच खरें!

पुढील आठवड्यांत मी मुंबईला येईन. तेथें बाबाना समक्ष भेटून मी सविनय कायदेभगाचा सैनिक म्हणून युद्धात पडणार आहे.

तोपर्यंतच्या मधल्या काळात .... मंजुळेचीं मला आलेली सारीं प्रेमळ पत्रे मजपाशीं असणे, म्हणजे सध्या माझ्यासमोर असलेल्या ध्येयापासून मला कदाचित् विचलित करूं शकणारा साक्षात् जागृत मोह तो !... म्हणन मन अगदीं घट्ट करून, मी तीं सारी पत्रें सोबत तुजकडे पाठवून देत आहे.

तुझा—**अरुण.**

**ता. क.**—तेथें आलों तरी मी बराच गडबडींत असणार. सुनीतीचे लग्न आहे. त्यावेळीच आपण समक्ष बोलूं, असे बाबाचे पत्र आहे. मी त्याना माझा स्वातंत्र्ययुद्धांत पडण्याचा निश्चय कळविला होता.

तूं लग्नाला येणार आहेस का? आलीस तर तेथेच आपली भेट! नाही तर—केव्हा कोणास ठाऊक? **—अरुण**

( ५५ )

कल्याण; ता. २६ फेब्रुवारी १९३१.

प्रिय मावशी,

सुनीतीच्या लग्नानंतर तुम्हीं इकडे आला होता, त्यावेळीं आपली भेट झाली. त्यानंतर आजपर्यंत भेट किंवा पत्रव्यवहारहि नाहीं.

दरम्यान माझ्या आयुष्यांत काय घडामोडी झाल्या तें तुम्हाला ऐकून ठाऊक झालें असेलच !.. आज मी जें नवीन आयुष्य सुरू केलें आहे, ज्या नवीन जबाबदाऱ्या शिरावर घेतल्या आहेत, त्यांत मनोमय सुद्धां स्खलन किंवा मोह होणें योग्य नाहीं !... आणि एवढ्याचसाठीं, जीं फाडून टाकणें, माझ्या शरीरांतील रक्ताचें थेंब सांडवणें असें मला वाटतें, तींच अरुणाचीं माझ्या संग्रहीं असलेलीं पत्रे आज सोबत तुमच्याकडे पाठवून देत आहे !

अरुण तुरुंगात जाण्यापूर्वी त्यानी माझीं पत्रें तुमच्याकडे पाठवून दिलीं असल्याचें, तुम्ही भेटला त्यावेळी तुमच्या बोलण्यात आल्याचे मला स्मरतें. त्या पत्राशेजारीच या मी पाठवीत असलेल्या पत्राचे स्थान आहे! तेव्हा तीं तुमच्याकडेच पाठवून देण्यावाचून मला दुसरा कोणता मार्ग आहे ? . .

मावशी, या बाबतींत अरुणाना तुम्ही जरासुद्धा दोष देऊं नका. त्याच्या हृदयाला जरूर असलेली कठोरता, स्थैर्य, चिकाटी नाही,... म्हणूनच अत्यत प्रेमळ असूनहि ते दुबळे आहेत. . . पण, तरीहि त्यांच्या अंत:करणाच्या शुद्धतेबद्दल मला केव्हाहि शंका येणार नाहीं !

ही पत्रे तुमच्या हातीं सुखरूप पडलीं, असे तुमचे पत्र आलें कीं, मला अत्यंत समाधान होईल !... येथेच माझ्या गतायुष्यातील एक उज्वल सुखस्वप्न थाबलें, अशा दृष्टीने माझें अरुणासाठीं धडधडत आलेले हृदय, एक समाधानाचा नवीन कल्पिलेल्या माझ्या पुढील आयुष्याकडे आशावंतपणें पाहू लागेल. सुस्कारा सोडील. व जास्त काय लिहूं ?

तुमचीच—**मंजुळा.**

---

*

# प्रवासांतील सोबती

## — पत्रें —

# जुडगा ३ रा.

( ५६ )

कल्याण, ता. २० एप्रिल १९३०.

प्रिय मावशी,

मी शांतिनिकेतनहून तुला पत्र लिहिल्यानंतर पाच सहा दिवसातच इकडे आलों.

इकडे घरांत सुनीतीच्या लग्नाची घाई सुरू झाली होती; .. पण त्याचवेळीं, देशांत मोठा वणवा पेटला आहे, याची या लोकांना जरा देखील कल्पना नव्हती! वास्तविक, येताक्षणींच बाबाचा निरोप घेऊन निघून जाण्यास मी उत्सुक झालों होतों. पण त्या साऱ्या गडबडींतच बाबांना तो प्रश्न विचारणें, मला पुन्हा अप्रशस्त वाटूं लागलें!.... शेवटी सर्वांच्या समाधानासाठीं, इतरांइतक्याच जरी नाहीं तरी कुटुंबातील एक व्यक्ति या दृष्टीने ठरणाऱ्या योग्य त्या उत्साहानें, सध्या आपण त्यांत सामील व्हावें, असें मी ठरविलें.

मी आलों त्या दिवशींच तुला समक्ष आमंत्रण देण्यासाठीं गेलेला अरविंद सोनगांवाहून परतला होता. त्यानें मला सांगितलें, 'भाऊ विषमज्वराच्या आजरांतून उठले असून, बरेच अशक्त झाले आहेत. त्यामुळें कमळावहिनी स्वत: लग्नप्रसंगीं हजर राहणें शक्य नाहीं. भाऊंनीं सारीं मुलें तेवढीं पाठविलीं आहेत.!'

एक वेळ भाऊंना पहावयास व तुलाहि बऱ्याच दिवसांनीं भेटावयास मला सोनगांवास यावें असें फार वाटलें; पण त्यानंतर लग्नाच्या गडबडींत मुळींच वेळ झाला नाहीं; आणि तें आतापर्यंतहि तसेंच राहिलें!

तर मग मावशी, आतां आपली केव्हां भेट होईल ग? कोणास ठाऊक!.... आज जरा वेळ आहे, तर सध्यांपुरत्या शेवटच्या गप्पा तरी मारून घेतों.

: २७२ :

येथली ही लग्नाची एकंदर घालमेल!.. खरोखरच सर्व दृष्टीनें ती माझ्या मनाला रंजीस करणारी होती. घरीं जमलेली आमची मंडळी म्हणजे कोण असणार? तीन साडेतीन महिन्यांपूर्वी गांवढ्यावर गेले असताना, नाना एकाएकीं आजारी होऊन आले !... आणि त्यानंतर पाचसहा दिवसातच त्यांचा मृत्यु झाला म्हणतात. त्याच्या डोक्याला एक लहानशी जखम झाली होती म्हणे; आणि ती आमच्या राघू गड्यानें त्याचा खून करण्याचा प्रयत्न केल्यामुळेंच झाली, .... असें सर्वांचें म्हणणे ! उलट वसंताच्या सागण्याप्रमाणें नाना मात्र शेवटपर्यंत म्हणत होते, 'राघू निरपराधी आहे !' आता यातील खरं काय ते देव जाणे; पण एवढं मात्र खरं, कीं, ते गावढ्यावरून परतल्यानंतर पाचसहा दिवसाच्या आत मरण पावले,... व राघू त्यानंतर, महिन्याभरांत त्याचे मागील अपराध सरकारनें लक्षांत घेतल्यामुळें, सहा वर्षांच्या सक्तमजुरीसाठीं तुरुगांत गेला !

नानाच्या मृत्यूमुळें रंजीस झालेला वसंतहि, एकंदरींत निरुत्साहीपणेंच लग्नांत भाग घेताना दिसत होता;.. मंजुळा तर आलीच नव्हती. त्यामुळे मला एकप्रकारे दुःखात सुख वाटले. वसंत त्याविषयी मला मधूनच विचारीत असे; पण, सारें स्पष्टीकरण करणें माझ्या आटोक्याबाहेरचें होते.

आता राहिली यशवंतदादाकडील मंडळी! भाऊबंदकीच्या खटल्याचा समेट जवळजवळ त्याच्याच बाजूने झालेला असल्यामुळे, मागील सर्व गोष्टी विसरून, कुटुंबातील असल्या मंगल प्रसंगी त्यानीं हजर रहावयास पाहिजे होते; पण योग्य प्रकारें आमंत्रण जाऊनहि, त्यांच्यापैकीं कोणी,.. लग्नातील कोणत्याहि प्रसंगाला आलें नाहींत. खरोखर किती आकुंचित मने याचीं !.... आणि याचाच मी माझ्या माणसात समावेश करीत होतो आजपर्यंत !

तेव्हा लग्नासाठीं जमलेली घरातील माणसें हीं एवढीच!... बाबांच्या ओळखीचीं बाहेर गावचीं आणखी इतर मोठमोठीं माणसें मात्र बरींच हजर होती.

अरविंद घरचा एकटाच ! तूं किंवा भाऊहि, आयत्यावेळी, तुमच्याकडील गैरसोयीमुळे येऊं शकला नाहीं. तेव्हा त्याची चुलत मावशी ... का कोण, व तिचा नवरा दोघे आली होती. त्यानीच देवक ठेवले.

: २७३ :

लग्नाचा एकंदर गोंधळ तीन दिवस चालला होता.

त्यात विशेषतः एकच एक दृश्य दिसून येत होतें !... ते म्हणजे, ... बाह्यडौलासाठी होणारी पैशाची अव्यवहारी उधळपट्टी,... काकू व तिच्या माहेरून आलेलीं तिची चुलती वगैरे मडळी यांचा दांभिक मोठेपणा, क्षुद्रदृष्टि, व स्वतः कोणत्याहि तऱ्हेची झीज न सोसता तोरा मिरवणें,... त्यामुळे, समारंभातील प्रत्येक लहान-

मोठ्या कामाचा गोंधळ झालेला!... आणि गरीब बिचाऱ्या नोकर माणसांची आबाळ!

मला असल्या क्षुद्र गोष्टींत लक्ष घालण्याचा वास्तविक मनापासून तिटकारा आहे. पण माझी आजचीं ध्येयें, भोंवतालच्या जागतिक घडामोडी व श्रेष्ठ प्रश्न,... यांबरोबरच, मी सध्यातरी माझ्या म्हणवीत असलेल्या या माणसांची क्षुद्र बाबींत रममाण होणारी कूपमंडूक मनोवृत्ति, मला उघड उघड दिसत होती. त्या दोहोंत आढळणारं भयंकर अंतर, त्यामुळेंच माझ्या मनाला जास्त रंजीस व दुःखी करीत होतें. आणि त्यामुळेंच मी सगळ्या समारभांत अगदीं जागरूकतेनें वागत होतों. हो,...खरंच मावशी, हा लग्नप्रसंग म्हणजे, माझ्या साऱ्या माणसाच्या मनोवृत्तीचं खरं व यथार्थ विश्वरूप दर्शन दाखविणारा जणुं भगवान् श्रीकृष्णच ठरला!

मी तर आता, . . मला या घटकेला वाटणारं, भोवतालच्या विस्तृत जगातील माझं श्रेष्ठ कर्तव्य बजावीत शेवटपर्यंत झगडण्याचा निर्धार करूनच, साऱ्या माणसांनीं निर्माण केलेल्या असल्या क्षुद्र वातावरणांतून, बाहेर पडत आहे! पण तत्पूर्वी, या साऱ्या क्षुद्र गोष्टींचा तुजकडे एकदा पाढा वाचल्यावाचून मला राहावत नाहीं, मावशी!....

: २७४ :

लग्नाला एकदम आल्यामुळें, माझ्याजवळ विशेष नवीन कपडे नव्हतेच. बाबानीं आमंत्रणाची कामगिरी मजवरच सोंपवली होती. माझा त्यातल्यात्यात नवीन कोट मी काढला. पण धोतर परीटघडीचें नव्हते; .... घरात मागितलं, .... पण अगदी आमंत्रणास निघण्याची वेळ झाली, तरी मला धोतर कांहीं मिळेना! मला किती दुःख झाले म्हणून सांगूं? माझ्या देखतच आदल्या दिवशीं तीन नव्या धोतरजोड्या घरात येऊन पडल्या होत्या. पण...

इतक्यात बाबा आंत आले... "काय रे अरुण, अजून तुझी तयारी नाहीं दिसत झालेली!. मग वेळ होईल हो आमंत्रणाला! कपडे घाल लौकर." ते घाईघाईने म्हणाले व अक्षतेसाठीं देवळाकडे जाण्याची तयारी करूं लागले. त्याच्या मनाची त्यावेळची ती गडबडघाई पाहून मी जास्तच गोंधळलों. व काय बोलावे तेंच मला समजेना. तरी मी हळूंच म्हटले "माझ्याकडे चागलं धोतर नाहीं बाबा!... आणि घरांत--"

बाबा जागच्या जागींच थबकले. त्याचा चेहरा क्षणभर किंचित् पडल्यासारखा झाला; पण लागलीच त्यानीं कांहीं एक न बोलता, आपल्या कपड्याचें कपाट उघडून, स्वतःचा शर्ट व धोतराचें एक पान माझ्या हवालीं करून म्हटलें, "आता अरुण, घाई कर लौकर! पुष्कळ घरें फिरायची आहेत तुला!"

त्यांचा आवाज त्यावेळी किंचित गद्गदित झाला होता. बाबांचा शर्ट व नवें धोतर वापरून आमत्रणाला जाण्यापूर्वी घरात एकदा फिरून येतांना, . . माझ्या मनाला त्यांतल्या त्यात किती समाधान वाटत होतं म्हणन सांगूं, मावशी?

: २७५ :

त्यानतर दुसऱ्या दिवशींचीच गोष्ट. जेवणावळीसाठी आलेली सारी पुरुष मंडळी जेवून, माडवात गप्पा ठोकत ऐसपैस लोळत पडली होती. साऱ्याची व्यवस्था झाल्यानंतर, आम्हीहि आपलीं जेवणें उरकून घेतली होतीं. बायकांचीं जेवणेंहि संपलीं होती. सकाळी लग्नापूर्वीच, नंतर पानसुपारीचं, जेवणावळीच्या वेळचं, वगैरे कामे करण्यात दुपारचे चार कसे वाजले ते समजलेंसुद्धा नाहीं. घरात तसं दुसरं कोण जबाबदारीने काम करणार? त्यामुळें आपुलकीनें साऱ्या गोष्टींत मला लक्ष घालणं भागच होतं;.. पण तसल्या घालमेलीची संवय नसल्या-मुळें, मी बराच कटाळलो व दमलोंहि होतो. आता गड्याचीं पाने माडणे व त्यांना जेवावयास वाढणें या गोष्टी तेवढ्या राहिल्या होत्या. पण आमचा मुरारी स्वयंपाकी तेवढ्यांत म्हणाला, " तुम्ही जा आता, दादा! . . मी बघीन सारी व्यवस्था. "

म्हणूनच वसंत व अरविंद याजबरोबर गप्पा मारीत मी माडवांत थोडासा लवंडलों होतों. इतक्यांत शरद्नें मला निरोप आणला, ' तुला मागच्या मंडपात काकू बोलावते आहे!..'

मी उठून झटकन् तिकडे गेलों. गड्यांचीं जेवणे संपत आलीं होतीं. ते दृश्य किती हृदयस्पर्शी होतं? .. त्या दमल्या भागल्या जीवांना,.. उशीरा कां होईना, आनंदानें गप्पागोष्टी करीत जेवताना पाहून मला खरोखरच एकप्रकारें मुग्ध समाधान वाटलं!.. मी त्याच्यातून हास्यमुखानें फिरूं लागताच,.. ते मजबरोबर काही ना काही तरी बोलूं लागले...आमचा काळ्या गडी अगदी आनंदांत होता. मला पाहताच तो नेहमीसारखा तोंडभर हंसून थट्टेनें म्हणाला, ' काय दादा, या ना या ना! आमच्याबरोबर बिजून जेवा की थोडं!..' मीहि तितक्याच गंमतीने म्हणालों, ' हो तर! हा काय, तेवढ्यासाठीच तर आलों, वेड्या! ..' तुमचा सदू गडी आपल्या मुलाला लाडू फोडून देत होता. मी त्याला म्हणालों ' तुला फार काम पडलें नाही सदू आज! अरे, याला नीट वाढलं ना रे, मुरारी?..' ' हो, हो, . म्हणजे ते काय तुम्ही सागायला पाहिजे वाटतं!'.. असलंच कांहीतरी बडबडत मुरारीहि लागलीच लाडवाची परात घेऊन मजपाशी येऊन उभा राहिला!..

असली आमची गंमत चालली होती,.. त्यांत मी मला काकूनें कशाला बोलावलं आहे ते विसरलोंच!..

तेवढ्यांत,.. ‘ दादाऽ ’.•अशी आमच्या नेहमीच्या झाडूवाल्याची बाहेरून मोठ्यानें मारलेली परिचित हाक ऐकूं आली. मी तसाच माडवाबाहेर गेलो!.. पहातों, तों आपली टोपली समोर ठेवून, झाडूवाला कोपऱ्यांत बसला होता.

‘ काय रे, मिळालं ना तुझं पान तुला ? ’ मी त्याला हंसून म्हणालों.

इतक्यांत काकू बाहेर आली. तिच्या मघाच्या बोलावण्याची मला एकदम आठवण होऊन मी तिला विचारलें, “ काय काकू, मला कशाला बोलावलं होतंत मघांशीं तुम्हीं ? विसरलोच ते गडबडीत ! ”

झाडूवाल्याकडे थोड्याशा रागाने पहात ती मला म्हणाली, “ अरे तेंच,.. हा बघ मेला कसा मघापासून त्राम देतो आहे ?. . त्याचं पान दिल, केशरीभात दिला,.. लाडू झाले,. . तरी आपला चार करंज्यासाठी मघापासून कुरकुर करीत आहे !. . आता जा, म्हणून सागितलं तर म्हणतो दादाना बोलवा;. त्यानी सागितलं म्हणजे जाईन.”

मला त्या लहानशा झगड्याची गंमत वाटली!.. तरी काकूला वाईट वाटूं नये म्हणून, न्यायाधिशाचा आव आणून, मी थोड्या गंमतीनेच त्याला विचारलें, “काय आहे रे उगीच तुझी तक्रार ? मिळालं ना तुला सारं ? मग जा आता !”..

तो तसाच मजकडे थोड्या दीनवाणे पहात म्हणाला, “ वा ! वा दादाऽ !.. मी कुठं म्हणतों, मला नाही मिळालं म्हणून ?.. पणऽ दादा, माझ्या पोराना चारपाच करंज्या मिळाल्या तर,...आता तुम्ही सागतांच तर जातों. .”

मला अगदीं कससंच वाटलं ! किती क्षुद्र मागणी होती त्याची ? ... आणि त्यासाठीच हीं रणे !. . . शेवटीं, मी समेट करण्याच्या हेतूने म्हणालो, “ तूं तरी असा आहेस अगदी !. . . करंज्या मिळाल्या तर जाशील म्हणतोस ? . . . बरं तर ! . . अरे मुरारी, . . याला एक चारपाच करंज्या नी लाडू दे बघूं ! आणि मिळाले कीं एकदम जा बरं का आता अंबादास ! . . इथ मधेच बसलास, म्हणजे बायकाना जातायेताना त्रास होतो ! . . ”

माझ्या असल्या निकालाने अंबादास खूष झाला, तरी काकूचा मात्र मजवर राग होणार हें मी जाणून होतो!.. म्हणून तिजकडे न पाहाताच, मी परत फिरलो.. तोंच जातां जाता तिची पुटपुट मला ऐकूं आली, “ अस्सं, अगदी साऱ्या माण-सांना सवकून हा डोक्यावर चढवतो हो ! ”

: २७६ :

मागल्या बाजूस आता कांहीं काम नव्हतं;. तेव्हा, माडीवरील व्यवस्था पहाण्यासाठी सहज एक चक्कर मारावी म्हणून वर चढलो. दिवाणखान्यात बाबा एकटेच इझीचेअरवर बसले होते. मी तेथे जाताच ते म्हणाले, “कायरे अरुण,.. सकाळीं बराच गोंधळ झाला म्हणतात, लग्नानंतर! वेळेवर पानसुपारीहि मिळाली

नाहीं,.. नारळ उगीच जास्त गेले;.. आणि घरात म्हणताहेत दहा तोळे वेलची सारी खलास झाली!.. पोरें येतां जातां फन्ना उडवीत होतीं!.. हो ना ?.. ”

बाबांचे ते शब्द ऐकून, मला प्रथम त्यांचा एकदम रागच आला; पण तरी मन शांत ठेवून मी कांहींच बोललों नाही. त्यांच्यावर राग करावा की त्यांची कींव करावी हेच मला त्यावेळीं समजत नव्हत!..

मला सकाळची गडबड आठवली. इकडे लग्नाच्या मुहूर्तांची व त्यानंतरच्या पानसुपारीची घाई! आणि आमच्या काकूचा सारा व्यवहार कड्याकुलुपांत!.. पानें आणि कातरलेली सुपारी मागता मागताच माझा जीव अर्धाअधिक हैराण झाला होता! नारळ वाटताना एखाददुसरा नारळ जमलेल्या पोरांनीं जास्ती कमी घेतला असेल;.. नाहीं असें नाहीं!.. परन्तु चांदीच्या दोन वाट्या भरून, राहिलेल्या वेलचीचा मोठा शिसा मीच काकूच्या हवाली केला होता... ती सारी वेलची मिळूनसुद्धा दहा तोळे नव्हती!

आता, वास्तविक, असल्या क्षुल्लक गोष्टींकडे एवढ्यामोठ्या लग्न प्रसगाच्या गडबडीत व खर्चात बाबांचे लक्षहि जावयास नको होतें. पण—

आणि हीं येता जाता फन्ना उडविणारीं मुलं कोण वाटतं तुला, मावशी?—आमच्या घरची तर कोण नाहीत. थोडा विचार करताच, माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. तीं दुसरी तिसरी कोणी नसून आमच्याकडे पाहुणीं आलेलीं तुझीच लहानगी मुल! त्याच्यावरच काकूचा हा क्षुद्र आरोप होता. त्याना बापड्याना तर खेळण्याबागडण्यात असल्या गोष्टीना वेळहि मिळत नव्हता!

पण असल्या गोष्टी बाबाना सागण्यात तरी हांशील काय?..घरात कार्य असता, मध्येच उगीच धुसपुस मात्र सुरूं व्हावयाची! म्हणून मी अगदी गप्पच राहिलो!.. तरी बाबा पुन्हा हळूहळू कुरकुरतच होते, “तुमच सारं असं वरवरचं धादरट काम! आता या गोष्टी कोणी पहायच्या बरं, अरुण?.. मी? माझा इतका खर्च होत असूनहि फुकट!.. मी आहे म्हातारपणामुळे नेभळा! . इथ तिथ पुरणार तरी कोणकोणत्या गोष्टीना?.. आता तूच पहा! दहा तोळे वेलची लागली तरी कशाला एवढी,..’

त्याचवेळी वसंत आत येत होता. त्याने मघाशी घरात व आता पुन्हा बाहेर त्याच वेलचीबद्दलची कुरकुर एकली होती. तेव्हा तो हळूंच बाबाजवळ उभा राहिला व म्हणाला, “काय बरं हे बाबा?.. इतक्या मोठ्या खर्चात व गोंधळात कसल्या घेऊन बसलात या क्षुल्लक गोष्टी!.. दहा तोळे वेलचीची किमत किती आहे ते हिशेब करून तरी पाहिलत का? असा तीन चार हजार रुपये खर्च केल्यावर,.. रुपया दोन रुपयाच्या बाबीसाठी असं काहीं बोललेल कोणी बाहेर एकल,.. तर लोक हसतील आपल्याला!. ”

बाबाना काय वाटलं कोणास ठाऊक !.. ते बोलता बोलतां एकदम गप्पच झाले !

: २७७ :

मला त्यावेळी खरोखरचं त्यांची अगदीं कीव आली. त्याच्या मनःस्तापाबद्दल कळवळून आलं. पण आपण तरी काय करणार ?..

त्यावरून मला लग्नापूर्वीच दोन दिवस आधीं घडलेल्या एका प्रसंगाची आठवण झाली !..

तू लग्नाला आली नाहीस तरी आपली सारी मुले पाठविलीस; त्यामुळे बाबाना फारच आनंद वाटला. तीं आल्यानतर दुसऱ्याच दिवशी.. बाबाच्या एका मित्राने नवलाईचे एक शेकडा पायरी आंबे मुद्दाम पाठवून दिले होते. ती करडी दिवाणखान्यातच येऊन पडली होती. यंदा विशेष आंबे नसताना, आणि हंगामाच्या अगदीं सुरवातीसच,..घरात पोरंबाळं आली असताना, इतकी फळ एकदम घरात आलेलीं पहाताच,.. बाबाच जात्याच प्रेमळ अंतःकरण भरून आल, त्यावेळी !..

अगदीं उत्साहानें त्यानी तुझ्या साऱ्या मुलाना बोलावून त्याच्या पाठीवर थोपटीत म्हटले, "अरे, जा ती करंडी पहा तिथ .. घ्या, . . घ्या, . . त्यातले हवे तेवढे आंबे घ्या !.. जा मजा करा . . "

पण काय ?.. मुलाचा एकच गोंधळ त्या करडीभोवतीं, जो तो हाताला लागेल तो आंबा घेऊन धावूं लागला ; पण हे मोकळं वातावरण फार वेळ राहिल नाहीं. काकूची चुलती आतून ते पहातच होतीं. तिनें आपल्या पुतणीला व तिनें काळ्याला सागून, ती करंडी आपल्या कुलूप घातलेल्या कोठीच्या खोलींत नेऊन टाकली.

मी तो प्रकार, तेथे काही काम करतां करता पहात होतों. थोडा वेळ इकडे तिकडे बागडून मुले परत आंब्यासाठीं येतात,.. तो काय ?.. ती करंडी पूर्वीच्या कोंपऱ्यात नव्हती !.. बिचारीं हिरमुसलीं होऊन आपापसात कुजबुजत होतीं !

आणि आज मी दहाबारा दिवसानीं पाहिल !.. लग्नाच्या गडबडीत कोणाचच लक्ष नसल्यामुळे, त्या करडीतील अर्धेअधिक आंबे कुजले होते;. . बाकीचे उतरून गेले होते ! . . आणि करंडी केराच्या कोपऱ्याजवळ पडली होती.

: २७८ :

लग्नाच्या दिवशीचे हे वरील प्रसंग झाल्यानतर, थोड्या वेळाने भाड्यांची वगैरे व्यवस्था करावयाचे आमचा मुरारी स्वैपाकी गप्पाच्या नादात विसरला; आणि काळ्या, मदू वगैरे साऱ्या गडी माणसात मागे वावल्या फुकत, हसत खिदळत गप्पा मारित बसला होता. माडवांत खरकट्या भाड्याचा पसारा तसाच पडला होता.

काकू खालीं सहज म्हणून गेली.. पहाते तों खरकट्या भांड्यांचा सगळा गोंधळ! ती एकदम चिडली व मुरारीला उद्देशून मोठ्याने ओरडली, "कायरे मुरारी, लाजा नाहीं रे वाटत तुम्हाला ?...आज दोन दिवस चमचमीत आयतं जेवायला मात्र पुढें !.. आणि आता हीं कामं टाकून गप्पा ठोकताहा !...जेवणावर हात माराल आणि भांड्यावर रे कोण मारील ?.. ती घांसायला कोण टाकणार ?..."

या शब्दातील जळजळीत हलाहल समजण्याइतकी त्या गड्यांच्या मेलेल्या मनामध्ये कुवत नव्हती... त्यामुळे काळ्या व त्याच्याबरोबर सदू वगैरे उठून लागलीच कामाला धावले !.. पण इतकीं वर्षे घरात आपुलकीने खपलेला मुरारी मात्र एकदम उलटला, "काकू, तुमच्या लग्नातला जेवणाच्या आशेवरच मी दोनतीत दिवस धडपडलों असं वाटतं का तुम्हांला ?.. तुम्ही नव्हता तेव्हां या घरांत मी आलो आहे ! तुमच्यापेक्षा बाबाकडे पाहूनच तुमच्या हाताखालीं मूग गिळून वागतों आहे मी, समजलं !.. मला काय करायचं आहे ?.. पण प्रसंग आला म्हणूनच हें बोललो !...मी काम करायला तयार आहें !... पण जरा आपल्याला शोभण्यासारखें बोला !... मी तुमच्या पैशाची व जेवणाची किंमत,.. कवडी समजतो कवडी !.. समजला ?.. तुमच्या नोकरीचीहि नाहीं किमत मला !"

आणि अशाच थोड्याशा रागारागानें तो भांडीं गोळा करूं लागला. इतक्यांत मी पुढें गेलो व सहज म्हणून विचारलें, "काय ओरडाओरड आहे रे मुरारी ?"

तो लागलीच आपल्या पडलेल्या म्हाताऱ्या चेहऱ्याने माझ्याकडे हंसून पहात मला म्हणाला "काहीं नाहीं दादा !... आमचंच आपलं !".... .

: २७९ :

लोकांकडून मागून आणलेलं सामान परत करायचं, माडव सोडायचे, असल्या कामांत, दुसऱ्या दिवशीं सकाळीं, काळ्या, सदू वगैरे गढले होते. मुरारीला त्या दिवशीं स्वयंपाकाकडे लक्ष देण्यास सवड झाली नव्हती. जवळ जवळ सारे काम संपविण्यास,.. त्याचीही ये–जा थांबण्यास दुपार झाली. तो व गडी वर गेले पण मुरारीच्या रागामुळें कोणाच्याहि जेवणाची सोय काकूनें करून ठेवली नव्हती. ते पाहून,.. थोड्या रागारागातच,.. उरलं सुरलेलं काम संपविण्यास मुरारी खालीं उतरला.

थोड्या वेळाने बाबा खालीं आले. सारीं कामें संपलेलीं पाहून, मुरारी वगैरे साऱ्याना उद्देशून कौतुकाने बाबा म्हणाले, "अरे वा, तुम्हीं तर साऱ्यांनीं अगदीं जोर मारलात. फार त्रास घेतलात बरं कां तुम्ही साऱ्यांनीं, या लगीन घाईत !.."

मुरारी, काळ्या, सदू सारे कांहीं न बोलता वासे, छत वगैरे मांडवाचं सामान, नेण्यासाठीं लावून ठेवीत होते. बाबा पाठीमागें हात घेऊन इकडे तिकडे फिरतां फिरतां सहज म्हणून पुन्हां म्हणाले, " अरे, संपत आलं आतां सारं! . . थोडा विसावा घ्या!.. आणि जेवलात ना तुम्ही सारे? . . "

आता मात्र मुरारीला राहवेना. डोळ्यात आलेलं पाणी सद्याच्या बाहीनें हळूंच पुसून, जड शब्दांत तो म्हातारा म्हणाला, ' नाहीऽ बाबा . .'

बाबा एकदम आश्चर्यचकित झाले; ' अरे, हे पाहुणे गडीहि उपाशी अजून?'

मध्ये ते क्षणभर थबकून उभे राहून मग एकदम म्हणाले, "जा बरं मुरारी... टाक ते हातातलं सारं. तुमच्या साऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था कर प्रथम जाऊन!. . "

बाबाच्या या आपुलकीच्या शब्दामुळें, मुरारी एक तासापूर्वींची आपल्याबद्दलची बेफिकीरीची सारी घटना एकदम विसरला. व ' हो ' म्हणून पटकन वर गेला.

थोड्या वेळानें त्याचें जेवण झाल्यावर बाबांनीं त्या साऱ्याना बोलावलें. व ते मंदमंद शब्दांत म्हणाले, " अरे बसा खालीं; झालीं जेवणं ? हं.. आता काय सदू ?.. केव्हा जाणार तूं ? . . भाऊ आजारी आहेत!.. तुला गेलंच पाहिजे; फार त्रास घेतलास हो . . . या गोधळात तुमच्याकडे पहायलाहि मला वेळ झाला नाहीं. आता मुरारी, काळ्या,. . हीं आमचींच माणसं! .. त्याच्या जीवावर तर मी निश्चित होतों "

असें काहींसे अस्पष्ट पण प्रेमळपणे बोलून, बाबानीं आपले पैशाचे पाकीट उघडले;. . व सदूच्या हातावर दहा रुपये, काळ्याच्या हातावर दहा रुपये व मुरारीच्या हातावर पंधरा रुपये ठेवले!

ते तिघेहि ' कशाला ? तुम्हाला आमचं काम आवडलं हेच पुष्कळ!' असें आपापल्या परीनें म्हणत होते. पण बाबानीं आग्रहानें त्यांना शेवटीं ते घ्यावयास लावलेच!..

इतक्यात काकू चहाचा कप घेऊन बाहेर आली. शेवटचे शब्द व पैशाची देवघेव पाहून तिला राहवेना. ती एकदम म्हणाली, " मुरारीला अन् काळ्याला कशाला पाहिजे बक्षिसी द्यायला? ते आपलेच नोकर!..."

त्या शब्दानीं त्या दोघानांहि दुःख झालं असेल पण . . त्यापेक्षां बाबांनाच जास्त झालं असावं!.. कारण ते काकूकडे वळून थोड्या चिडलेल्याच आवाजानें म्हणाले, " चूप रहा... तुम्हांला नाहीं यातलं काहीं कळायचं! मला माझे व्यवहार कळतात चांगले!.. "

खरोखर, तो प्रसंग माझ्या डोळ्यांदेखत, घडताना पाहून, मला बाबाविषयीं त्यावेळीं किती सादर अभिमान वाटला वेलचीसारख्या क्षुल्लक बाबीबद्दल मला रागावणारे हेच कां बाबा ! . .

तेव्हा मावशी, . . असा हा आमच्या घरातील लग्नसोहळा संपला. क्षुल्लक प्रसंगातूनच प्रत्येक व्यक्तीचे स्वभावविशेष माझ्या दृष्टीस पडत होते:. . व मन जास्त जास्तच रंजीस होत होते !.. म्हणूनच तुला हे इतकं सविस्तर लिहिलं. कळावें

तुझा— **अरुण.**

( ५७ )

मुंबई: ता. १ मे. १९३०.

प्रिय मावशी,

तुला गेल पत्र पाठविल्यानंतर, अरविंद सुनीतीला घेऊन मुंबईस आपल्या बिऱ्हाडीं गेल्यावर मात्र, बाबाबरोबर बोलण्याच्या संधीची मी उत्कंठित अंतःकरणानें वाट पाहू लागलो. शेवटीं संध्याकाळीं बाबांनी मला दिवाणखान्यात बोलावलें; व अगदीं शांतपणे आपण होऊनच मला पाहिजे असलेल्या विषयास सुरवात केली.

त्यांचं माझं बोलणं झालं; त्यानीं त्यावेळीं माझ्या चळवळीस मिळण्याच्या विचाराबद्दल आपल्याला काय वाटतं त्याविषयीं मला थोडक्यात सांगितलें. ते म्हणाले, "अरुण, तुझं पत्र पोहोंचल्यावर तुला मी 'आपण या बाबतीत समक्षच बोलू,' असं लिहिलं होतं. आतापर्यंत लग्नाच्या गडबडींत वेळ मिळाला नाहीं ! . . तुझ्या या निश्चयाच्या बाबतींत माझं तुला सरळ सांगणं, आहे कीं, तू या फंदात पडण्याचा मूर्खपणा मुळींच करूं नयेस !..देशभक्तीची व्यापक कल्पना मलाहि समजते; पण तू त्याला आज मुळींच योग्य नाहींस ! तू मजवर अवलंबून आहेस व मी एक सेवानिवृत्त सरकारी कलेक्टर आहे. तुजप्रमाणेच मला शरदचेहि हित अजून पहावयाचं आहे ! तेव्हा कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीने सरकारविरोधी चळवळीत तू सामील होणं मला मुळींच पसंत नाहीं ! तूं एक भावनाप्रधान-मुलगा आहेस. तुझ्या आयुष्याचीं गेलीं काहीं वर्षें, . . तू त्याच्या प्रवाहात कसा वाहवत गेला आहेस, तें तुझं तूच पहा. माझ्या दुःखास कारण झालेलीं तुझीं अनेक अपयशे लक्षात आण: . . व यापासून परावृत्त हो ! . . हेच माझं तुझ्या पत्राला समक्ष उत्तर !..याउपरहि, . तुला तुझ्याच मनाने वागण्याची इच्छा

असेल,.. तर माझ्या आसऱ्याची अपेक्षा तूं करूं नकोस. आयुष्यांत भोगाव्या लागणाऱ्या दुःखास तुला तयार झालं पाहिजे!.. मन मानेल तसं तूं वागावंस व तरीहि माझी तुला मदत असावी अशी तुझी अपेक्षा का असावी? . . या साऱ्या गोष्टींचा विचार कर आणि मगच पुढें पाऊल टाक!..तेव्हा या बाबतींत तूं मागत असलेला आशीर्वाद मला तुला देतां येत नाहीं. कारण तुझ्या तसल्या करण्यानें मला तूं एक नवा धक्काच देणार आहेस!"

बाबानीं आपलें हें मनोगत सांगितल्यावर त्याचा मी निरोप घेतला. व परवाच माझ्या एका मित्राकडे चार दिवस रहावयास आलों आहे. तेथूनच हे पत्र लिहीत आहे.

आज माझ्या हृदयांत,.. माझीं माणसें,.. व माझी ध्येयें,.. यात मोठा घनघोर झगडा चालला आहे!.. पण मला काय तें आज उद्याच ठरविल पाहिजे, हे निश्चित! तुला मी चार पांच दिवसांत काय ते पत्र पाठवीनच. कळावे.

तुझा—अरुण.

(५८)

मुंबई, ता. ६ मे १९३०.

प्रिय मावशी,

आज तुला कळवावयाचं, म्हणजे सत्याग्रहात सामील व्हावयाचं मी आता नक्की ठरविलं आहे!..

हिंदी ही माझी पहिली भावना असली तरी मी महाराष्ट्रीयहि आहे!.. म्हणूनच ठरविल आहे,.. कीं, सहा दिवसानीं, बारा मेला शिरोड्यास होणाऱ्या सत्याग्रहात सामील होऊनच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययज्ञात उडी घ्यावयाची! याविषयीं बाबाना मी निराळें कळविले आहेच. आणि तेथे जाण्यापूर्वी, तुला गेल्यावेळी कबूल केल्याप्रमाणें, हें शेवटच हार्दिक पत्र लिहावयास आज बसलो आहे . . . यानंतर पुन्हा असा केव्हां प्रसंग येईल कोणास ठाऊक! . . समक्ष भेटीचा प्रसंग तर आता त्याहूनहि अधिक अनिश्चित! . .

. २८२

बाबाकडून निघाल्यावर मी विचार करीत असाच गेले तीन चार दिवस वेड्यासारखा भटकत होतों. माझ्या मनांत एकच झगडा सारखा चालला होता. बाबाना व आपल्या इतर माणसांना सोडून, या संग्रामात ठरल्याप्रमाणे उडी

घ्यावयाची,.. कीं, त्याच्या सुखदुःखासाठीं आपल्या वाटणाऱ्या या उच्च ध्येयांना—देशाबद्दलच्या कर्तव्याला.. मूठमाती द्यावयाची!..

मला विशेषतः,.. बाबांच्या शेवटच्या भेटीच्या वेळचे शब्द आठवत होते. त्यांच्या मजविषयींच्या साऱ्या अपेक्षा फोल ठरल्या!.. माझ्यामुळें गेल्या कांहीं वर्षांत त्यांना, एकमागून एक अनेक धक्केच बसले!

पण माझ्या आकांक्षांना तरी कधीं वाव मिळाला?.. माझ्या ध्येयमार्गात त्यांच्याकडून सहानुभूतीचा एखादा शब्द किंवा उत्तेजन तरी कधीं मिळालं होतं का?.. माझ्या नैसर्गिक महत्वाकांक्षा किंवा कल,.. यांचं सहानुभूतिपर आकलन करणं त्यांना कधींच शक्य झालं नाहीं!.. माझ्या वैयक्तिक भवितव्याविषयींच्या माझ्या कल्पना निराळ्या!.. मजविषयीं असलेली त्यांचीं अपेक्षा साफ निराळी!..

आणि आज,.. मी माझ्या आयुष्याला माझ्या मताप्रमाणे महत्त्वाचं वळण लावण्यास उद्युक्त होत आहे;.. त्यावेळींहि हे मला माझीं जुनीं अपयशें तेवढींच पुढें करून नाउमेद करीत आहेत!.. मीं असें पाऊल टाकण्याविरुद्ध असलेली याहून निराळीं अशीं जी त्यांचीं कारणें,..ती केवळ त्यांच्या वैयक्तिक सुखदुःखा-वर,.. लाभतोट्यावर.. किंवा एकंदर अपेक्षेवरच अधिष्ठित!..

म्हणजे मुळाशीं सारी अपेक्षाच तर!..

त्यांच्याबद्दलचा,.. किंवा माझ्या या इतर नातलगाचा,.. आजपर्यंतचा माझा अनुभव!.. त्यातून तर एकच सूर निघत आहे. त्यांना साऱ्या गोष्टींना,.. प्रेमाला सुद्धा,.. त्यांना एकाच प्रकारचा पाया दिसत आहे. तो म्हणजे आर्थिक!.. मी त्यांजवर अवलंबून आहे, त्यांच्या मदतीवर सध्या तरी स्वतः परावलंबी जीवन जगत आहे!.. तेव्हा मला माझीं अशीं कोणतीहि ध्येये नसावीत,.. मतें नसावींत,.. मला माझ्या अशा भावनाहि नसाव्यात! हो,.. ही त्यांची मुख्य अपेक्षा!.. आणि त्याहून निराळं कांहीं असेलच,.. तर तें मी प्रत्येक लहानमोठ्या प्रसंगीं दडपीतच जावं;.. त्यांचं हें कायम श्रेष्ठत्व, मी माझें मन मारून प्रत्येकवेळीं निमूटपणें कबूल करावं!..

मावशी, हीच त्यांची मुख्यतः विचारसरणी!..

अर्थातच मला त्यांच्या प्रेमाचा आसरा पाहिजे असेल,.. त्यांच्या संतुष्ट मनाचा आशीर्वाद पाहिजे असेल,.. तर मला माझं स्वतःचं असं आयुष्य जगणं शक्यच नाहीं,.. जणुं काय!.. त्यांना आमच्या सुखाकडे पहातानाहि, स्वतःची अशी काही तरी अपेक्षा आहेच!.. आणि तेवढ्यासाठीं ते येथवरच थांबत नाहींत;.. त्यांना वाटलंच तर, स्वतःला योग्य वाटणाऱ्या हेतूंच्या सफलतेसाठीं,.. ते रुपेरी किल्लीची मदत घेणार!.. व त्याची नेहमीं जाणीव दिल्यावांचूनहि रहाणार नाहींत!..

जों जों मी असा जास्त विचार करूं लागलों, तों तों मला स्पष्ट होऊं लागलें,.. कीं या सर्वांच्या प्रत्येक कृतीच्या मुळाशीं ही अपेक्षा आहे...हो, येथून तेथून सारी अपेक्षाच! ... तिनें पूर्णपणें पछाडलेलीं हीं सारीं उपकारी माणसंच !..

: २८३ :

मात्रशी, आज माझीं म्हणून म्हणतां येणाऱ्या जगातील साऱ्या व्यक्तींमध्यें,.. अशा माणसाचा भरणाच मला जास्त दिसून येत आहे! त्या वातावरणातच,.. माझ्या आयुष्याचीं गेलीं कांहीं वर्षे गेलीं;.. आणि तसल्या प्रवासांतच तर, मला या माझ्या साऱ्या सोबत्याच्या अत्यंत हीन व क्षुद्र वृत्तीचं स्वरूप पदोपदीं दिसून आलं !..

गेलीं दोन वर्षे तर माझं मन त्यामुळें जास्तच पोळत आलें आहे!.. आणि मला आश्चर्य वाटतें,..कीं तरीहि माझं वेडं मन,.. याच साऱ्याना आपलीं आपलीं म्हणत, आजपर्यंत आपल्या श्रेष्ठतर, उन्नतिकारक,.. व विशाल ध्येयाना त्यांच्यासाठीं मर्यादित करीत आलं !..

हीं माझीं सारीं माणसें,..क्षुद्र गोष्टींतच आपलीं मनें रात्रंदिवस रमवीत आहेत;.. आणि त्याचवेळीं; तिकडे जतींद्रदास, विजय, यांच्यासारखीं श्रेष्ठ माणसें,.. आपल्या सर्वस्वाची किंबहुना स्वत:ची,..त्यागपूर्वक आहुति देत आहेत!.. त्याची, या कोणाला किंचित् देखील कल्पना नाहीं;.. आणि तरीहि याच्याच साऱ्याच्या सुखदु:खासाठीं, मी माझ्या कर्तव्यापासून, कांहीं काल कां होईना,.. विचलित होऊं पहात होतों.. होत आहे!..

कां ?...

छे,..माझ्या आयुष्यांच्या उच्चतर ध्येयाना, कर्तृत्वाला,..हीं सारीं मुळींच बाध घालूं शकत नाहींत !...

माझ्या ध्येयासाठीं,.. बाबावगैरेंना सोडून जाण्याची मी माझ्या मनाची अशी तयारी केली!.. तरी पण त्यांच्या दुसऱ्या कसल्या नाहीं,..तरी प्रेमाच्या आसऱ्याची मात्र आवश्यकता माझ्या हळव्या हृदयाला वाटावयाची थांबत नाही!..अर्थात्,.. आज त्या साऱ्याना सोडणं,.. म्हणजे त्यांच्यापासून कायमचे दुरावण्याचीच तयारी करणं!..

: २८४ :

त्या दिवशीं असल्याच द्विधा मन:स्थितींत मी रस्त्यांतून कोठें तरी पाय नेतील तिकडे चाललों होतो... इतक्यांत, मागून 'ठाकूरशेट' म्हणून अचानक ऐकूं आलेल्या हांकेनें दचकून मी तिकडे पाहिलें...तों पांच वर्षापूर्वीचा आमच्या वसतिगृहांतील क्लबचा बाल्या..रामा! पांच वर्षांत तो मला कधीं भेटला नव्हता,.. त्याचा विचारहि कधीं माझ्या डोक्यांत विशेष आला नव्हता...पण मी थांबतांच तो अगदीं मनापासून हंसत मजपाशीं येऊन थबकला.

आणि त्याच्या नेहमींच्याच पायाकडे पाहून लाजत लाजत बोलण्याच्या पद्धतीनें त्यानें मला प्रश्न केले, " काय शेट! हल्लीं न्हाताव कुटं? काय काम करतांव तुम्ही? . . कुठं नोकरी हाय? . ." मी त्याच्या समाधानासाठीं, त्याला तितक्याच आस्थेने, काहीं तरी उत्तरें दिलीं; . . पण माझं तिकडे लक्षच नव्हतं.

थोडा वेळ एकमेकाजवळ मुग्धपणें उभे रहाण्यांतच त्यानतरचा आमचा काहीं वेळ निघून गेला. आणि मग आम्ही दोघे पुन्हां पूर्वीप्रमाणेंच गर्दीत मिसळले! . . पण मग चालता चालतां मात्र, . . मला त्यावेळच्या क्लबांत घालविलेल्या मागील दिवसाची आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. त्यावेळीं मला इतर विद्यार्थी ओरडत " ठाकूरची लेकाची,.. राम्या विशेष बडदास्त ठेवतो . . बरं का ! . ."

खरं होतं ते ! . . पण त्याला मी काय करणार? मी त्याला विशेष कांहीं देत होतों असें नाही! नाहीं म्हणावयास माझ्या खोलींत विशेष काहीं खाण्याचे जिन्नस आले कीं आठवणीनें त्याला द्यावे, त्याच्याशीं प्रेमानें मोकळेपणें बोलावं हसावं !.. एवढंच ! . .

आणि त्यानंतर आज पांच वर्षांनीं, . . रस्त्यांतील गर्दीतून मी चालत असतां तो एकदम अचानक भेटतो काय, . . आणि मला मुद्दाम हांक मारून थांबवून मजबरोबर तसल्याच निरपेक्ष वृत्तीने चार प्रेमळ शब्दाची देवाण घेवाण करतो काय? . . मला खरोखरच तसल्या मनःस्थितींतहि या घटनेनं फार विरंगुळा वाटला ! . .

: २८५ :

आणि आमच्या त्या क्लबमध्येच मी असतानाच दुसरा एक प्रसंग मला एकदम आठवला. मी जनरल सेक्रेटरी होतों ! आमच्या क्लबाचा तुळशीदास भय्या आम्हाला दूध घाली. त्याच्याबरोबर मोडक्या तोडक्या हिंदींत दुधाचे हिशेब करता करतां आम्ही किती हंसत असूं ! . . त्याला मजविषयीं काय वाटे कोणास ठाऊक ?...एके दिवशीं त्यानें आपलं मला रोज सकाळी अर्धा शेर दूध जादा घालण्यास सुरवात केली, मी नको म्हटलं; . . पण तो ऐकेना. महिन्याशेवटीं मी त्याला पैसे देऊं लागलों. पण तेव्हांही तो कांहीं ऐकेना! त्यावेळीं तो हिंदीमध्यें म्हणे, " तुम्हाला काय करायचं ? तो माझा प्रश्न आहे ! . . मी आपण होऊन तुम्हाला दूध घालतों. माझ्या घरच्या म्हशी आहेत. स्वतः कुर्ल्याहून खाद्यावरून वाहून आणतों. तुम्हीं माझ्या घरचं दूध प्यावंसं मला वाटतं. मी नाहीं घेणार तुमच्याकडून पैसे ! . ."

आणि माझें न ऐकता, मीं तेथें असेपर्यंत त्यानें तो क्रम कायम सुरूं ठेवला

होता. मला ओशाळल्यासारखें वाटे. पण त्याच्या प्रेमळपणापुढे माझा नाइलाजच होता.

खरोखर, त्याचा तो निरपेक्ष प्रेमळपणा आठवल्यांबरोबर तेव्हां व आताहि मला गुरमरल्यासारखं वाटतं ! पण त्यात नवल काय ?.. रामा, तुलसीदास यांच्या मजविषयींच्या असल्या या निरपेक्ष प्रेमाची आठवण झाली;.. मला त्यादिवशीं चालता चालता वाटलें, खरंच;.. प्रेमाचं वातावरण माणसावरच अवलंबून असतं! उच्चध्येयमार्ग आचरतांना नाइलाजानें आपल्या माणसाचा जुना प्रेमळ आसरा नाहींसा होईलहि, कदाचित् !.. पण आपल्याला जगाच्या पाठीवर कोठें तरी–दुसरीकडे–तसलेंच मनाला समाधान देणारें प्रेमाचें नवें वातावरण निर्माण करतां येणार नाहीं असें नाहीं. हो, उच्च ध्येयानें प्रेरित झालेल्या, आपल्या हृदयाच्या हांकेला जागून धीराने आपणच मार्ग काढला पाहिजे. आपल्या आयुष्याचें आपणच शिल्पकार आहों ! . . .

मला या उपकारीं माणसांचाच आसरा पाहिजे, .. असें नाहीं ! . .

: २८६ :

ठरलं आतां माझं, मावशी ! ही क्षुद्र बधनें झुगारून द्यावयाचीं आणि आजपर्यंत मला माझीं अशीं वाटत होतीं . . तीं हीं सारीं उपकारी माणसें सोडून . . लांब लाब . . अगदीं दूर .. जेथें माझ्या अगदीं स्वतंत्र मनाच्या साऱ्या आकांक्षा सारीं श्रेष्ठ ध्येयें सफल होतील तेथेंच जावयाचें !. . ‘ धीराला दे प्रसंग हिमत ! ’

सत्याग्रही आपल्याजवळच दिव्य प्रकाशाची मशाल बाळगीत असतो. त्या अंतरीच्या नंदादीपाच्या प्रकाशांत त्याला पुढील पावलांची वाट दिसते.

देशांत ही रक्तपातरहित क्राति सुरू झाली आहे. गाधीजी म्हणतात, ‘ याच वेळीं ही काळजी घेतली पाहिजे कीं, यावेळीं एकदा सविनय कायदेभग सुरू झाला कीं, तो कोणत्याहि कारणासाठीं थांबला जाऊं नये. जोंपर्यंत एखादा तरी सत्याग्रही जिवंत उरला आहे, तोंपर्यंत तो बंद पडूं नये. मी माझ्या मनाची तर तसली तयारी करूनच, साऱ्या पाशांतून आता बाहेर पडत आहें. माझ्या मनाला आज किती समाधान होत आहे म्हणून सांगू, मावशी ? . . पण काय ग– मला तुझा तरी यावेळीं आशीर्वाद आहे ना ?

तुझाच—**अरुण.**

(५८)

[ २८ फेब्रुवारी १९३१ च्या ‘**नंदादीप**’ मधील उतारा ]

( मि. ब्रेल्सफोर्ड यांचें नांव सर्वश्रुत आहे. हिंदुस्थानाच्या चालू स्वातंत्र्ययुद्धाच्या काळांत, त्यांच्याबरोबरच आपल्या देशांत सगळीकडे फिरलेले त्याचे

मित्र, मि. हेन्री स्मिथ, यांनीं, मि. ब्रेल्सफोर्ड यांचा, 'नंदादीप'च्या गेल्या अंकांत आलेला मूळ इंग्रजी लेख, 'मँचेस्टर गार्डियन' पत्रांत प्रसिद्ध झाल्यावर, सुमारें महिन्यानें प्रसिद्ध झालेल्या "Asia" मासिकाच्या अंकांत एक छोटासा पण सुंदर लेख लिहिला आहे. गेल्या अंकातील भाषातरित लेखाला तो पूरक आहे; म्हणून आमच्या वाचकांसाठीं आम्ही मुद्दाम त्याचें आज भाषांतर करून खालीं देत आहों.)

: २८८ :

लंडन ३० जानेवारी १९३१.

मी व ब्रेल्सफोर्ड हिंदुस्थानात बहुतेक बरोबरच फिरत होतों; तेव्हां त्याच्या लेखानंतर वास्तविक माझ्या या लिखाणाची कांहींच आवश्यकता नाहीं. . . पण ज्या ऐतिहासिक घटना मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्या, त्यांची हे दोन शब्द लिहून नोद केल्यावांचून मला राहवेना.

चार दिवसापूर्वीच आपण वर्तमानपत्रात वाचलें; . . महात्मा गांधी व त्याचे काँग्रेस कमिटीचे सहवीस अनुयायी, समेटाच्या हेतूनें बिनशर्त मुक्त केले आहेत, ही समेटाची कल्पना, माझ्या मते, लंडनच्या 'डेली हॅरोल्ड'चे प्रतिनिधी असलेले- माझे स्नेही, मि. जॉर्ज स्लोकोंब, यानीं अत्यंत परिश्रमपूर्वक विचार करून गेल्या! (१९३०) जूनच्या सुमारास सुचविली होती! . . . पण हिंदुस्थान सरकार त्या वेळीं सत्तामदाने धुदच झाले होते. त्याना तेव्हा तें पटलें नाहीं. त्यांना वाटलें आपण या राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या आकाक्षा चुटकीसरशी व सहज चिरडून टाकूं!..

पण हिंदुस्थानच्या देशप्रेमाचे व अनत्याचारी त्यागाचें ओजस्वी व उत्कट स्वरूप दाखविणाऱ्या त्यानंतरच्या साऱ्या गोष्टी घडून यायच्या होत्या! . . तोपर्यंत मुंबईच्या प्रभात फेऱ्या, वानरसेना, यानीं आपलीं नावें इतिहासांत नोंदविलीं नव्हतीं. हिंदुस्थानातील हमरस्त्याचा अद्याप नोटिस बोर्डासारखा उपयोग केला गेला नव्हता. बेकायदा ठरलेल्या काँग्रेस कमिटीच्या न सांपडणाऱ्या बुलेटिनच्या प्रतींचा लक्षापर्यंत खप वाढयाचा होता! . . तेव्हा तें काहीं वाईट झालें नाही. निशस्त्र, . . पण आत्मिक बल असलेल्या मानवी समाजाच्या सामर्थ्याची कल्पना तरी जगाला आली! . .

आणि आज हिंदुस्थान सरकारचे डोळे थोडे उघडल्यासारखे वरवर दिसत असले, तरी या समेटाच्या बोलण्यांत विशेष कांहीं निष्पन्न होईल, असें मला तरी वाटत नाहीं! . .

खरोखरच, गांधींच्या दाडीच्या यात्रेबरोबरच सुरू केलेली, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची ती अनत्याचारी चळवळ, अत्यंत अभिनव होती! . . त्या चळवळीचें, . . त्या युद्धाचें, तत्त्वज्ञानच अगदी स्वतंत्र व नवें होतें! . . वास्तविक, . . कांहींशी फसवे-

गिरी, स्वार्थी बेफिकीरी,.. अगर निष्ठुर दंडुकेशाही,.. हीं तिला दडपून टाकण्याचीं साधनें नव्हतीं!.. कारण, प्रत्येक व्यक्तीच्या त्यागाची तयारीच तशी अपूर्व होती!.. वल्लभभाई पटेल यांच्या शब्दांतच सांगावयाचें, तर,.. त्यावेळीं प्रत्येकाचें घर कॉंग्रेसचें ऑफीस व प्रत्येकाचें हृदय हें कॉंग्रेसचें सघटनात्मक केंद्र झालें होतें!

शांतताप्रिय गुजराथ प्रांत मी पाहिला!.. क्रूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या पठाणांच्या पेशावर प्रांताचें मी अवलोकन केलें!.. दोन वृत्तींचा समन्वय करणाऱ्या महाराष्ट्रांत मी फिरलों!.. व भावनाप्रधान बंगाललाहि भेट दिली!.. चोंहोंबाजूस,.. साऱ्याच हिंदुस्थान देशभर,.. मला या श्रेष्ठ लढ्याच्या तत्त्वाची पाळेमुळें, प्रत्येकाच्या हृदयांत.. अगदीं खोल.. खोल रुजल्याचेंच आढळून आलें!..

अभिमानानें व माणुसकी कायम ठेवून, जगावयाच्या आपल्या योग्य व कमींत कमी मागण्या सौजन्य व सामोपचारानें मागूनहि मिळत नाहींत,.. म्हणून कॉंग्रेसतर्फे महात्मा गांधींनीं हिंदुस्थान सरकारला प्रथम उघड उघड बजाविलें!.. व मग एका हातांत सूत कातण्याची टकळी,.. एका हातात दंडा,.. कमरेला 'दरिद्री नारायणा' चा पंचा,.. व हृदयांत अखंड तेवत असलेली न्याय्य स्वातंत्र्याची जागती ज्योत,.. यासह दांडीची यात्रा सुरू केली!.. व तेथूनच त्यांनीं म्हटलेल्या 'इंग्रजी सत्तेच्या शापा' चा जोरानें प्रतिकार करणारें हिंदुस्थान देशाचें तपोबल प्रतिदिन वाढूं लागलें!..

: २८९ :

वर वर आंव आणला होता, तरी हिंदुस्थान सरकार खरोखरच या आरंभानेहि मनात कचरलें होतें. या महान् यात्रेच्या प्रसंगाचें चित्रपटहि दाखविण्याची, प्रथमपासून देशांत चोहोंबाजूस बंदी झाली;.. या एका गोष्टीवरूनच, हें उघड होईल!... आणि सुरवातीपासूनच्या, या व याहूनहि अमानुष अशा, चिरडीस येऊन झालेल्या सरकारी विरोधामुळेंच, हा वणवा देशात चोंहोंबाजूंस जास्त त्वरेनें पेटला, असें माझें प्रांजल मत आहे!..

सहा एप्रिल या कत्तलदिनापासूनच,.. त्या देशातील चोंहोबाजूंच्या सत्याग्रहींनीं, आपल्या आत्यंतिक अनत्याचाराच्या जोरावर, परकीय गुलामगिरीची राजरोस कत्तल सुरू केली!.. मला वाटतें,.. हा माझा शब्दप्रयोग चुकला; भाषालंकारासाठीं सुद्धां अत्याचाराच्या कल्पनेचा उपयोग करणें,.. त्या शांततावादी सत्याग्रहींच्या ध्येयाविरुद्ध होईल—!.. आणि त्यानंतरच्या त्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धांतील अगणित घटना,.. ज्यांना युद्धाच्या भाषेंत 'चकमकी' 'लढाया' म्हणतां येतील.. त्या,.. माझ्या दृष्टीसमोर हा लेख लिहावयास बसलों असतांना, आज गर्दी गर्दी करून उभ्या आहेत!..

मीठसत्याग्रहाचे ' धारासन', 'शिरोडा', 'वडाळा', घ्या!.. जंगलसत्याग्रहाचे ' चिरनेर ', ' संगमनेर ', ' अकोला ' ' बिळाशी ' अगर 'मध्यप्रांत' घ्या!.. कर-बंदीच्या चळवळीचे ' गुजराथ ', ' कर्नाटक ', ' बहार ' घ्या!.. विदेशी बहिष्काराचे 'बंगाल' 'बहार' 'ओरिसा' घ्या!.. प्रत्येक ठिकाणचा,.. त्या देशाचा त्या वेळचा त्यागी सत्याग्रह अपूर्वच होता!!.. अत्यत हालअपेष्टा सोसून, प्रत्येक सत्याग्रही अंगांत त्राण असेपर्यंत, अत्याचाराबरोबर शांततेची झुंज खेळत होता. ( त्याला सोलापूर किंवा पेशावर येथील कांहीं किळसवाणे प्रकार अपवाद म्हणन दाखवितां येतील, तेवढेच काय ते !— )

पण, याविरुद्ध, दडपशाहीच अस्त्र म्हणून उभारलेली हिंदुस्थान सरकारची दंडुकेशाही!.. किती चिरड आणणारी व लज्जास्पद !! ... सहज आठवणाऱ्या अगदीं घडलेल्या काहीं गोष्टी येथें सागतों;... म्हणजे परकीय वाचकाला त्याची चुणूक स्पष्ट दिसेल!.. असेंब्लींत प्रश्नोत्तरानें गाजलेलें पेशावर गोळीबार प्रकरण पहा. कोणा एका सरदार गंगासिंगाचें अर्भकासह रस्त्यांतून चाललेलें निरापराधी कुटुंब,.. सोल्जराच्या गोळीबाराला बळी पडलें. बंगाल्यात मिदनापूरला, लाठीमारामुळें असहाय्य होऊन विव्हळत पडलेल्या सत्याग्रही स्वयंसेवकांना मदत करणे, हाहि गुन्हा ठरला. धारासान्याला, मिठागरापासून दूर काढलेल्या अगदीं शाततावादी सत्याग्रहींवर, युरोपियन घोडेस्वार भरधांव धांवून गेले; व त्यानीं त्याजवर लाठ्या चालविल्या. खादीची ' गाधी टोपी ' व खादीचा पोषाख घालून रस्त्यानें चालणाऱ्या माणसावर, दक्षिण हिंदुस्थानात, कोकोनाडा येथें लाठी चालविण्यात आली, तर गुजराथेंत गाधी टोपी घातलेल्या दोन माणसांना डोक्यावरची टोपी काढून घेईपर्यंत पाण्यात गटकळ्या खाव्या लागल्या. बारीसाल व तामलक येथें त्याहून अमानुष अत्याचार झाला. तेथे तर पोलीसांनीं सत्याग्रहींच्या व त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या लोकाच्या मालमत्तेस आग लावून दिली. असल्या त्या धुमश्चक्रींत, लहान लहान पोरेंही ज्याना ' पिवळी पगडी ' म्हणून चिडवीत, ते नेहमींचे पोलीस तर होतेच ; पण जादा पोलीस तर अगदी आयर्लंडमधल्या ' ब्लॅक ॲन्ड टॅन्स ' प्रमाणें, अनिर्बंध संचार करीत होते!..

यातील बहुतेक प्रसंग मी स्वत: डोळ्यांनीं पाहिले आहेत. काहीं कांहीं वेळ बंगाल्यात क्षुल्लक कारणासाठीं गोळीबार होत असलेला पाहून, माझ्या डोळ्याला पाणी आल्यावाचून राहिले नाहीं!.. पण ही, स्वत:चें बूड हिंदुस्थानांत स्थिर ठेवण्यासाठींच, सरकारची चिडून चाललेली धडपड होती. तेव्हां असलीं आणखी अनेक उदाहरणे देतां आलीं, तरी तीं देण्यांत विशेष अर्थ आहे, असे मला वाटत नाहीं. आणि पुन: आज आपणास हिंदुस्थानच्या कर्तृत्वाकडेच, मुख्यत: पहा-

वयाचें आहे. त्या दृष्टीनें, . . माझ्या मनावर जे चार प्रसंग खोल कोरल्याप्रमाणें अजूनहि ताजेतवाने राहिले आहेत, तेच येथें देतों ! . .

त्यांपैकीं पहिला प्रसंग, मी व माझे स्नेही मि. ब्रेल्सफोर्ड दोघेहि बरोबरच असल्यामुळें, त्यांच्याहि लेखांत आला आहे. तेव्हां माझ्या या लेखाच्या वाचकांसाठीं मी त्याचाच येथें उपयोग करणे चुकीचें होणार नाहीं !

करबंदीसाठीं झगडतांना ब्रिटिश हद्द सोडून, बडोदा संस्थानच्या हद्दीजवळ रहावयास गेलेल्या गुजराथी शेतकऱ्यांच्या स्थलांतराचा तो देखावा ! ..

त्याविषयीं मि. ब्रेल्सफोर्ड म्हणतात—

: २९१ :

"इतिहासातील अत्यंत विलक्षण असें तें स्थलातर होते. हिंदुस्थानांत जीं कडक ज्ञातिबंधनें आहेत, त्यामुळेच ही एक विलक्षण तऱ्हेची जूट होऊं शकली. एकजमावानें आपलें सारें सामान शेतकऱ्यांनीं बैलगाडींत भरले. कांहीं लोकांनीं तर आपल्या भाताचीं पिकें, कांपणीच्या हंगामाचीहि वाट न पहातां, कापून घेतलीं ! . .

आणि त्याची ही नवी छावणी म्हणजे तरी काय ? . . चटयाच्या भिती . . . आणि झावळ्या–ताडपत्र्याचीं छप्परें ! . . झालें ! . . हींच त्याचीं तात्पुरतीं घरें !. . पावसाळा संपला होता. आपल्या गुराढोरांचा गोतावळा त्याच्या भोंवतालीं नेहमींसारख्या पसरला होता. आणि त्या लहानशा जागेंतील त्याचें विचवाच्या पाठीवरील छोटे बिऱ्हाड ! . . तांदळानीं भरलेले मोठमोठे रांजण . . . चकाकणारीं तांब्याचीं भांडीं . . . जवळपास पडलेला एखादा थोडासा गंजलेला नांगर,.. आणि त्या भितींवजा चटयांना लटकाविलेलें देवाचें किंवा माहात्मा गांधींचें एखादें चित्र ! . . .

एका जमावात असाच फिरत असता मी विचारलें ' घरें दारें सोडण्याचें तुम्हांला कारण काय ? . . ' तेथील स्त्रिया चटकन् म्हणाल्या ' महात्माजी तुरुंगांत आहेत म्हणून ! . . ' शेतकरी म्हणाले, ' पोट महाग झालें आहे. शेतींत कष्ट करून उत्पन्न होत नाहीं. कर अगदीं जुलमी आहेत ! . . ' आणि एक दोघे म्हणाले, ' स्वराज्य मिळविण्यासाठीं आम्ही जात आहों ! . . '

आणि हीं सारीं सोडून आलेलीं त्यांचीं हक्काचीं पण आता ओस पडलेलीं खेडीं ? . . मी व माझे मित्र मि. हेन्री स्मिथ, कुतूहल जागृत होऊन, त्यातूनच दोन दिवस सारखे हिंडत होतों ! . . खरोखर, ते दिवस आम्हाला अगदीं चिरस्मरणीय वाटतात.

रस्तोरस्तीं, घरें तोंडाला कुलुप घालून उभीं होतीं. एखाद्या उघड्या खिडकींतून आंत डोकावून पहावें, . . आंत एकहि वस्तु दिसत नसे ! . . रस्ते म्हणजे

तर जणु सूर्यप्रकाशाचीं शात तळींच आहेत असें वाटे. सर्वत्र अगदीं शांत.. कोठें कसली चाहूलहि नव्हती!.. नाहीं म्हणावयास एक माकड एका घराच्या छपरावरून उडी मारून गेलें तेवढाच काय तो आम्हांला एकदां आवाज ऐकू आला!.."

: २९२ :

दुसरा, ३१ जुलै १९३० चा, मुंबइंताल टिळकपुण्यतिथीचा प्रसंगहि, तेथील लोकांच्या देशप्रेमाच्या दृष्टीने मनावर जास्त बिंबणारा होता!...

संध्याकाळीं हजारो लोकाची प्रचंड मिरवणूक निघाली होती. बोरीबंदर स्टेशनाजवळून ती चालली असताना, मध्येंच तिजवर १४४ कलमाप्रमाणे नोटिस बजावण्यात आली!.. तेव्हा लोक आपले रस्त्यावरच बसले!.. वरून पाऊस सारखा धो धो ओतत होता;. पण रात्र झाली तरी कोणीहि जागेवरून रेसभर हलेना! सारे कपडे भिजून प्रत्येक ओलाचिंब झाला होता;.. तरी तसेच कुडकुडत राहून कोणींही जागा सोडली नाहीं!

मध्यरात्र उलटून गेली;.. सकाळ झाली;.. तरी बंदी काहीं उठेना! पण त्या त्यागी सत्याग्रहीमध्येहि दाडगी चिकाटी होती. ते तसेच बसून होते रस्त्यांत! शेवटीं काहीं मोठ्या पुढाऱ्यांची धरपकड झाली!.. तुरुंग भरायला जागा तरी कुठे होती?.. तेव्हा इतरावर निष्ठुर लाठीमार सुरूं झाला!.. पण सत्याग्रहींचा तो हक्काचा प्रसाद ग्रहण केल्याशिवाय, त्या दिवशी कोणीहि घरीं अगर हॉस्पिटलमध्यें गेला नाही!..

खरोखर, पाशवी शक्तीशीं मुग्धपणें चाललेला हा झगडा पाहून, त्या स्वातंत्र्यवीराविषयीच्या आदरामुळें, माझे व मि. ब्रेल्सफोर्ड यांचे डोळे नकळतच पाण्याने भरून आले. त्यावेळीं आम्हाला एका हिंदी संस्थानिकाचे शब्द आठवल्यावाचून राहिले नाहीत. ते म्हणाले होते, 'या लाठी कायद्यापेक्षा लष्करी कायदा पुष्कळ बरा! या लाठीपुढे टिकलेले स्वयंसेवक, लष्करी कायद्यासमोर सहज टिकाव धरतील!.."

त्याच्या त्या त्यागाची महतीच तशी मोठी आहे!..

: २९३ :

असले प्रत्यक्ष पाहिलेले प्रसग सागण्याचा माझा मोह, आळा घातला नाहीं तर असाच वाढत जाईल. एवढे मात्र खरें, कीं, आजपर्यंत पंचाहत्तर हजारावर अत्यंत निरुपद्रवी स्त्रीपुरुषाना कैद झाली. अमानुष व निष्ठुर असे असंख्य लाठीहल्ले झाले. पोलीसाच्या अटकेत असताना, चौकशी व शिक्षा होण्यापूर्वी सुद्धां, किती तरी हिंदी लोकांचा अतिशय छळ झाला. अदूरदर्शी व विनाकारण चिडून झालेल्या गोळीबाराला तर शेंकडों लोक बळी पडले,.. शेंकडों जायबंदी

होऊन लुळे पांगळे झाले. मालमत्तेची लूटमार झाली. घरें, दारें आणि खेडीं-गावे, उध्वस्त व बेचिराख झालीं! भाषणबंदी व मिरवणूकबंदी झाल्या!.. वर्तमानपत्रें जप्त झालीं. हिंदी कॉंग्रेस व तिच्या शाखा बेकायदेशीर ठरवून त्यांची मालमत्ता व घरेदारें ताब्यात घेतली! ..

पण तरीहि, . . हिंदुस्थान देशातील स्त्रीपुरुष व मुलें, यानीं असल्या प्रसंगीं जें धैर्य व चिकाटी दाखविली, ती एखाद्या अत्याचारी हिंसात्मक घनघोर युद्धालाहि खास लाजवील!..

माझ्या या भारतभ्रमणात, अगदीं सुरवातीसच घडलेला एक काहीसा वैयक्तिक स्वरूपाचा प्रसंग, आता येथे शेवटीं सागून, . . वाढत चाललेला माझा हा लेख मी पुरा करतों. हिंदी सन्माननीय तरुणाच्या इच्छाआकांक्षा समजून याव्यात,.. म्हणून हा प्रसंग थोडा विस्तारानेंच मी आपल्यासमोर उभा करणार आहे.

: २९४ :

महाराष्ट्रात, शिरोडे या कोकणातील गावी, १२ मे १९३० रोजी मिठाचा मोठा सत्याग्रह व्हावयाचा होता. मि. ब्रेल्सफोर्ड याना धारासन्यास हजर रहावयाचें असल्यामुळे मी एकटाच तिकडे निघालों. मी मुद्दामच हिंदुस्थानात थर्डक्लासने प्रवास करीत असे. पुण्यास माझ्याच डब्यात खादीचा शुभ्र पोषाख केलेला एक उमदा तरुण, आपली वळकटी व बॅग घेऊन आत शिरला. डब्यात बरीच गर्दी होती. व आम्ही दोघे दाराशींच उभे होतो. स्टेशनामागून स्टेशनें गेलीं; आणि अर्थात्‌च, जवळ जवळ उभे राहिल्यामुळे आमचीं, प्रश्नोत्तरे सुरू झाली

पहिला विषय साहजिकच त्या देशात नवीन सुरू झालेल्या चळवळीचा होता; त्यावरून शिरोड्याचा आगामी सत्याग्रह, त्याच्या व माझ्या जाण्याचीं ठिकाणे, याविषयीं बोलणें निघाले. आम्ही दोघेहि शिरोड्यासच जात आहों असे कळताच, त्या विचित्र घटनेची गमत वाटून आम्ही दोघेहि हंसलो. पण तरी त्याने मला माझ्या वेषाकडे पाहून लागलीच प्रश्न केला; "गंमत पहावयास चालला असाल ना हो तुम्ही?"

मी त्याच्या प्रश्नांतील खोच पटकन् ओळखली; पण त्याला मुद्दामच उलट हंसत हंसत विचारले, "हो!... जवळ जवळ तसेंच म्हणा ना!.. पण तुम्ही का हो जाता आहां?"

त्याचे पाणीदार डोळे, माझ्या त्या प्रश्नाने एकदम चमकले!.. अतिशय आत्मविश्वासाने व अभिमानाने तो पटकन् म्हणाला, "अर्थात्‌च देशाच्या हाकेला 'ओ' द्यायला!. स्वातंत्र्याचा अनत्याचारी लढा लढायला!.. India wants every youth to do his duty to-day!"

त्याच्या प्रत्येक शब्दांत दिसून येणाऱ्या उत्कट भावनेची मला जाणीव होऊन त्याचें खरोखरच अतिशय कौतुक वाटलें !

आणखी कांहीं स्टेशने गेलीं. आमचे विविध विषयावर संभाषण चाललें होतें. आणि त्यावरून मला समजलें, कीं तो ग्रॅज्युएट असून उत्तम चित्रकारहि आहे. शांतिनिकेतनचा कोर्स संपवून या लढ्यांत उत्साहानें पडण्यासाठीं, नुकताच बंगालमधून धावून आला;.. आणि आपल्या माणसाचा विरोध बाजूस सारून तो आजच शिरोड्यास जात आहे ! . .

मलाहि चित्रकलेचा नाद असल्यामुळें, आमच्या बोलण्याला पुढलें वळण अर्थात्‌च त्या विषयाचे मिळाले. आणि साहजिकच बेळगाव गाठेपर्यंत आमच्या त्या नव्या स्नेहाला एक प्रकारचें जास्त जवळचे स्वरूप आलें ! आणि नाहीं तरी, हिंदुस्थानातील प्रवासात ओळख वाढावयास वेळ लागत नाहीं मुळींच ! मात्र स्वतः मोकळेपणे वागण्याचे धोरण ठेवले, म्हणजे झालें. तेथें प्रत्येकजण तुम्हाला कांहीं ना कांहीं सांगावयास तयारच असतो !

बेळगावला उतरल्यावर, आम्ही एकमेकांना हस्तांदोलन करून निरोप घेतला. त्यानेच थोड्याशा विनोदानें म्हटले, "पण साहेब, जाण्यापूर्वी आपलें नाव सांगायला विसरलात तुम्ही !" मी त्याला माझे नाव सांगितलें, व त्याचें विचारले. त्यानें आपली वळकटी व बॅग मोटरस्टॅंडकडे नेण्यासाठीं उचलीत सांगितलें, " अरुण ठाकूर ! . . "

: २९५ :

'अरुण ठाकूर' !.. ते नांव मी पूर्वी कोठे तरी हिंदुस्थानातील प्रवासांतच ऐकले होतें. तो मोटारीत बसून निघून जाईपर्यंत, मला मनाशीं कांहीच निश्चित ठरविता येईना.

पण थोड्या वेळानें मला एकदम स्मरण झालें .. दिल्लीच्या माझ्या एका हिंदू प्रोफेसर मित्राकडे, त्याच्या संग्रहातील चित्रे पहाता पहातां, मला त्यात जीं सर्वांत उत्कृष्ट अशीं चार वाटलीं होतीं, तीं 'अरुण ठाकूर' नांवाच्या तरुण महाराष्ट्रीय चित्रकारानें नुकतींच काढलीं होती. हिंदी चित्रकलेच्या त्या उत्कृष्ट नमुन्यातील गुणदोषाविषयीं, मी माझ्या त्या प्रोफेसर मित्राबरोबर, त्या दिवशीं रात्रीं किती तरी वेळ बोलत बसलों होतों. आणि तोच हा मला त्यावेळी अत्यंत श्रेष्ठ वाटलेला हिंदी कलावंत, आज आपल्या साऱ्या वैयक्तिक आकांक्षा व ध्येयें राष्ट्राच्या त्याहून व्यापक ठरणाऱ्या आकांक्षा व ध्येयात विलीन करून, उद्यांच्या स्वातंत्र्यसमरात स्वतःच्या सर्वस्वाची आहुति द्यावयास तयार झाला आहे–देणार आहे !..

त्या साऱ्याच अकल्पित योगायोगाचे मला अत्यंत आश्चर्य वाटलें. आणि मला त्या उमद्या तरुणाचे देशप्रेम पाहून अगदीं भरून आलें !

: २९६ :

दुसऱ्या दिवशीं सुरूं झालेल्या त्या मर्दुमकीच्या युद्धाच्या ऐतिहासिक प्रसगीं, मी जातीने हजर होतों... मी तो प्रसंग आयुष्यात कधींहि विसरणें शक्य नाहीं !

महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यांतून, स्वार्थत्यागी स्वयंसेवकाच्या टोळ्यावर टोळ्या येऊन तेथें थडकल्या होत्या. तेथील उत्साहच एकदरीत अतिशय दाडगा होता. लढाईचे मार्ग निराळे असले, तरी हे देशप्रेमाला आलेले भरतें, . . इतर राष्ट्रांच्या इतिहासात दिसून येतें त्याहून अणुमात्रहि कमी नव्हते ! . . प्रत्येक स्वयंसेवकाची आत्माहुतीदेखील द्यावयाची पूर्ण तयारी दिसत होती.

अखिल हिंदुस्थानात,.. मिठागरावर हल्ले चढविण्यास महाराष्ट्राने आजपासूनच प्रथम सुरवात केली होती!.. कर न देता लुटलेले हजारों मण मीठ,.. आजूबाजूच्या गावात राजरोस व मोठ्या अभिमानाने स्वयसेवक वाटत होते.

आणि दुसऱ्या दिवशीं, पोलिसानीं मारहाण केली, अनेक स्वयसेवकाच्या तुकड्या पकडल्या, कांहींना लागलीच तुरुंगात डाबले, तर कांहींना लॉरींत भरून कोठे तरी लाब . . अज्ञात निर्जन भागांत, त्याजकडे कांहींहि पैसे न ठेवता सोडून दिले.

पण तरीहि लढा चिकाटीनें पुढे चाललाच होता. नवीन नवीन तुकड्या पुढे होत होत्या. जाच, तुरुंगवास, दंडुकेशाही याना त्यातील कोणीच हार जाईना ! . .

आणि चुकलेले स्वयंसेवकहि, . . हालअपेष्टा भोगीत वाट काढीत काढीत, चौथ्या दिवशीं सकाळीं पुन्हा समरभूमीवर येऊन दाखल झाले. त्यातच, माझा नवा जवानमर्द चित्रकार स्नेही अरुण ठाकूर, हंसतमुखाने चालत असलेला मला दिसला ! . .

: २९७ :

त्या दिवशींच खरें घनघोर युद्ध झाले !. .. कलेक्टरसाहेबानीं स्थानिक पोस्ट व तार ऑफिस आपल्या ताब्यात घेतले होतें. लाठीबंद दोनशे पोलीस व हत्यारी शिपाई मिठागराना वेढा घालून उभे होते. ' परिणाम वाईट होईल, ' असा सरकारीरीत्या सर्वांना इषारा देण्यात आला होता ! . . वातावरण अतिशय प्रक्षुब्ध झालें होतें. हजारों लोक, आता काय होणार या कल्पनेने !... धडधडत्या अंतःकरणानें भोंवतीं उभे राहून, . पुढे सरणाऱ्या सत्याग्रही वीराकडे पहात होते.

दुपारीं बरोबर अडीच वाजता,. या स्वयंसेवकाच्या तुकड्या, ' मरू किंवा लुटूं ' या निश्चयानें मिठागरावर चाल करून गेल्या. अधिकाऱ्यांच्या शेवटच्या धोक्याच्या इषाऱ्यानेंही त्याच्यातील कोणी, जरासुद्धा मागें फिरला नाहीं. प्रत्येकजण मिठावर तुटून पडत होता ! . . शेवटीं, पोलिसांनीं निष्ठुरपणें,. . लाठीमारास सुरवात केली. एक एक अनत्याचारी सैनिक, जिव्हारी मार बसून जखमी

होऊन, खालीं पडत होता. चालत्या, धांवत्या सैनिकांची संख्या भराभर कमी होत होती. शेवटीं चार सहा सैनिक सोडून बहुतेक जमिनदोस्त झाले!...

इतिहासप्रसिद्ध कडवे मराठे, त्यादिवशीं हूं कीं चूं,... न करतां, अगर कोणताहि प्रतिकार न करता रक्तानें न्हाऊं घालणारा लाठीमार सहन करीत होते!

आणि मी स्वतः तें उघड्या डोळ्यांनीं पहात होतों!..

जखमी रक्तबंबाळ सैनिक, शुश्रुषेसाठीं उचलून नेले जात असता, या शेवटच्या तुकडीनें नवा हल्ला करण्याचें ठरविलें!

आदल्या एक दोन फेरीत बराच मार बसला होता, तरी अरुण ठाकूर, या शेवटच्या छोट्या तुकडीला, त्यांच्या 'इन्किलाब झिंदाबाद!' या गर्जनेला आपला आवाज मिळवीत, पुढे होऊन मिळालेला पाहून, मला त्याचे कौतुक वाटलें! आणि मी तसें पहातां पहाता, त्या पांचसहा सैनिकावर जोराचा लाठीमार सुरू झाला. अरुण ठाकूरहि आपल्या अंगावर, सहन होईपर्यंत, शातपणें लाठीमार झेलल्यावर, शेवटीं माझ्या दृष्टीसमोरच रक्तबंबाळ होऊन जमीनीवर निश्चेष्ट पडला!.. त्याच्या हातात, धीरानें पुढें जाऊन, तुडुंब भरून घेतलेल्या मिठाची पिशवी होती! त्या घटकेचें हिंदुस्थानच्या आत्मिक बलाचे तेच प्रतिक होतें!..

: २९८ :

मी एक स्वतंत्र देशांतील,.. स्वतंत्रवृत्तीचा माणूस आहे!.. आणि या नैसर्गिक माणुसकीच्या टेंकडीवर उभे राहून, अरुण ठाकूरसारख्या एका देशाच्या श्रेष्ठ व कलावंत सुपुत्रावर, माझ्या डोळ्यादेखत होणारा हा अत्याचार,.. मी पहाता पहातां, माझे डोळे भरून आले. मी एक इंग्रजच, हें सारे पहात त्याच्यात उभा आहें याची मला लाज वाटली!.. क्षणभरच मला वाटलें, त्यापेक्षा या क्रांतीच्या वेळीं आपल्या मायदेशाखातर अशी ही आत्मत्याग करण्याची संधि मिळण्यासाठीं,.. मी हिंदुस्थानात जन्मलों असतों तर किती बरें झाले असतें?... त्या लाजेमुळेंच, मला अरुण ठाकूर जखमी झालेला दिसत होता, तरी त्याला भेटण्याची मनांतील उत्कट इच्छा, आंतल्या आंत दडपावी लागली!.. मी बाजूस झालों!...

आज या घटकेस, हा अरुण ठाकूर, स्वदेशाच्या आपल्यासारख्याच इतर अनेक सुपुत्राबरोबर!.. दीडदोन वर्षांची सक्त मजुरी भोगीत, तुरुंगात पडला असेल!...

'मौज पहावयास चालला असाल तुम्ही?' हा प्रश्न त्यानें ज्याला विचारला,.. तोच एक इंग्रज,.. त्याच्या त्या स्वार्थरहित आत्मत्यागामुळें,... अजूनहि इतक्या अंतरावर, त्याच्यासाठीं सहानुभूतीनें तळमळत आहे, याची त्याला कल्पनाहि नसेल!

पण माझ्या प्रिय वाचकांनो, असले अरुण ठाकूर आज त्या श्रेष्ठ हिंदुस्थान देशांत पुष्कळ आहेत! —हेन्री स्मिथ.

मादुंगा; ता. २ मार्च १९३१.

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद, विशेष—

सुनीतीचें लग्न झाल्यानंतर, अरुण जो येथून निघून गेला, तो तसाच सत्याग्रहांत शिरला, हें तुला ठाऊक आहेच. त्यानतर,.. त्याची माझी आजपर्यंत भेट नाहीं. पण तरीहि शिरोड्याच्या सत्याग्रहांत त्यानें आपलें कर्तृत्व व मर्दुमकी किती तरी उत्कटतेनें दाखविली. तो वृत्तात निरनिराळ्या वर्तमापत्रात वाचताना माझें हृदय त्याच्याविषयींच्या अभिमानानें व प्रेमाने किती तरी भरून आलें !

त्यानंतर तो दीड वर्षाच्या सक्तमजुरीसाठीं तुरुंगात गेला. पोराला 'क' वर्गच मिळाला. मला एकदां रदबदली करून पहावेसे वाटलें. पण तो स्वतः सर्व दु:खास व त्यागास तयार असतांना, आपल्या मनाची तरी ही व्यर्थ धडपड का ?. . शिवाय, सरकार त्याच्या सत्तेवर आलेल्या या महान् शक्तिमान् हत्तीलाटेने पिसाटल्यासारखे झालेले ! अशा वेळीं माझ्यासारख्या त्यांच्याच सेवानिवृत्त अंमलदारानें आपल्या ' अराजक ' मुलाविषयीं सहानुभूति व कळकळ दाखविणे, म्हणजे स्वतःच्या पायावर जाणून बुजून धोंडा टकाण्यासारखेंच आहे ! सर्व कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीनेंच,.. मी तो मोह शेवटीं बाजूस सारला.

अरुण आज नऊ महिने तुरुंगात आहे,.. आणि महिन्यातून एकदां पत्र पाठविण्यास त्यास परवानगी असते. पण त्याचें आजपर्यंत एकहि पत्र नाहीं!.. म्हणून मी त्याला भेटावयास, गेल्या महिन्यात अरविंदला माझ्या वतीने येरवड्यास पाठविला. पण तो त्याजबरोबरहि फारसा मोकळेपणें बोलला नाही. म्हणाला, 'मला भेटावयास येऊन कोणी मोह पाडूं नका. बाबाना म्हणावे, तुम्हीही कधीं इथं येण्याची तसदी न घेतलेली बरी ! . .'

त्याच्या आजच्या या एकंदर त्यागाची मला थोडी फार कल्पना येते; पण तरीहि मन कष्टी झाल्यावाचून रहात नाहीं!.. हल्लीं, मी गेला आठवडाभर आजारीच होतों. डॉक्टर म्हणतो ब्लडप्रेशर ;.. काय काय होईल तें खरं !.. पूर्वीची शक्ति मात्र आता मुळींच वाटत नाही. पण मग वाटतं, आता काय आमचं तारुण्य आहे थोडंच?... दिवसेंदिवस हें असंच चालणार —

आज विशेष आशा वाटते, म्हणजे, गेल्या आठवड्यात गाधी व कॉग्रेस वर्किंग कमिटी सुटली आहे व समेटाचा रंग दिसत आहे. ते खरेच ठरल्यास राजकीय कैद्यांची मुक्तता होईलसें वाटतें. पाहूं आता काय होईल तें ! . .

आता, गेले दोन दिवस पुन्हा थोडं बरं वाटत आहे. विशेष काळजी करण्यासारखं नाहीं म्हणा. कळावें हे आशीर्वाद. —बाबा ठाकूर.

( ६० )

माटुंगा; ता. २५ मार्च १९३१

चि. सौ. कमळीस अनेक आशीर्वाद, विशेष—

गांधी व आयर्विन याचे बरेच दिवस बोलणे चालून, शेवटीं अनेक आंदोलने घेत घेत त्याच्या समेटाचा करारहि झाला!.. हें तू वाचलें असशीलच. मार्च अखेरपर्यंत बहुतेक राजकैदी सुटले. एप्रिलच्या पहिल्या चार पाच तारखेपर्यंत अरुण घरीं येईल, अशी आशा करीत आम्ही त्याची वाट पहात होतों. पहिला आठवडा संपला, तरी तो आला नाहीं; म्हणून अरविंदने अरुणविषयीं येरवड्याच्या जेलरकडे चौकशी केली... तेथें तो केव्हाच सुटला,.. त्याला सरकारी नियमांप्रमाणे त्याच्या इच्छेस अनुसरून मुंबईचें तिकीट काढून दिलें,.. वगैरे सर्व समजले. म्हणन मुंबईस त्याच्या बहुतेक मित्रांकडे त्याचा तपास केला. पण त्याचा काहीं उपयोग झाला नाहीं. अजूनहि त्याचा काहींच पत्ता नाहीं.

मी त्याला शेवटच्या भेटींत जें काहीं म्हणालों होतों, तें सर्व आठवून मला आता अतिशय वाईट वाटते. एकंदरींत गेलीं काहीं वर्षें मी बहुतेक त्याच्या दुःखासच अप्रत्यक्षपणें का होईना कारण झालों आहे. म्हातारपणीं मी त्याला काहीं तरी बोलून जातों हे खरें! पण त्याने ते इतके मनावर घ्यावयास नको. त्याच्या भावनाप्रधान मनावर मला तरी काहींच इलाज सापडत नाहीं. तो मानी आहे; आता कोठें तरी दुःखातच रहात असेल. तुरुंगातून सुटल्यावर, वास्तविक तो परत मजकडे आला असता, तर फार बरें झालें असते. पण त्याच्या भवितव्याविषयीं मात्र मला आता जास्तच काळजी वाटते!

आतां म्हातारपणीं माझी प्रकृति काय?.. चार दिवस बरी,.. चार दिवस कुरकुरी असच चालणार. ईश्वर ठेवील त्या स्थितींत मला राहिल पाहिजे. बाकी इकडील सर्व मंडळी ठीक आहेत. तुजकडील खुशाली कळवावी. —**बाबा ठाकूर.**

( ६१ )

ता. ४ एप्रिल १९३१.

प्रिय मावशी,

कितीतरी दिवस तुला माझ्याकडून पत्र गेले नाहीं ग?.. आज तरी एकदम लिहावयास घेतले हें पत्र, म्हणजे मी 'एशिया' मासिकात हेन्री स्मिथ याचा लेख वाचला. त्यांत न्या प्रसिद्ध इंग्रजानेंहि अरुणाच्या शौर्याचा विस्ताराने उल्लेख केलेला आढळला मला!.. त्यावरून, मला आमच्या बालपणातील साऱ्या प्रसं-

गांची व तुझीही आठवण झाली!.. आणि मावशी, मी आजपर्यंत अत्यंत प्रयासानें माझ्या हृदयाला घालीत आलेले सारे बांध, कांहीं क्षण तरी,.. अगदीं कोसळल्यासारखे झाले! खरोखर ग, अरुण अगदीं लहानपणीं उदार मनाचे गंभीर वृत्तीचे महत्त्वाकांक्षी होते, तसेच अजूनहि आहेत ते,.. नाहीं? स्वदेशासाठीं असले त्याग दुःख सहन करूं शकले, यात काहींच नवल नाहीं!

पण आता समेट तर झाला ना? मग अरुण सुटलेहि असतील तुरुंगातून!.. घरीं आले का?.. पण वेड्यासारखे प्रश्न काय विचारतें आहे मी?.. या प्रश्नाचीं उत्तरें, तू कोणत्या पत्त्यावर देणार आहेस? पण मावशी, आज तरी मी तुला माझा पत्ता कळवणार नाहीं!

: ३०२ :

पण या प्रसंगाहून निराळी अशी... जरा दुर्दैवी हकीकत, आज तुला सागावीसं मला वाटतं आहे. माझी मैत्रीण,... जाई पै! पत्रद्वारे तरी ती तुझ्या ओळखीची आहे तिचच आज मला पत्र आलं आहे. तिच्याविषयींचा दुःखी विचार माझ्या मनाला सारखा व्यापून राहिला आहे.

मधलं थोडं सागायचं, म्हणजे ती माझी मैत्रीण वर्षापूर्वी एकाएकीं घरांतून नाहींशी झाली होती. मागल्या वेळीं लिहिलेल्या प्रसंगानंतर, तिची माझी प्रत्यक्ष भेट नाहीं. मला प्रथम तिच्यावांचून चुकल्याचुकल्यासारखं वाटलं. पण, तरी आयुष्य चाललंच होतं. आणि मन व्यग्र ठेवायला,.. हातातील अभ्यासक्रमहि पुढं चालूं होता.

त्यापुढें जाई एका कॉलेजांत, मी दुसऱ्या एका!.. आमचा मधून मधून पत्रव्यवहार होई; पण सहा महिन्याच्या आंत, तिचीं पत्रें काहींशीं कुढ्या वृत्तीचीं येऊं लागलीं. असें आणखी एक वर्ष गेलें. कारण मला काहीं समजेना. शेवटीं, दोन महिने तर तिचे पत्रहि येईना; आणि मीं पाठविलेले पत्र कल्पनाहि नसताना, तिच्या वडिलाकडून माझ्याकडे परत आलें. त्या सोबतच्या तिच्या वडिलानीं लिहिलेल्या पत्रात होतें —

'तुमचा तिचा स्नेह आम्हाला ठाऊक आहे. पण जाई तुमच्या स्नेहास मुळींच पात्र नाहीं. तुमच्या स्नेहासच नव्हे, तर आमच्या तोंडासहि काळोखी फासून, . दोन महिने झाले, जाई घरांतून नाहींशी झाली आहे. तिनें उधळलेले गुण तुम्हाला ठाऊक नसले, तर त्याची कल्पना येण्यासाठींच हे पत्र तुमच्याकडे परत पाठवित आहें. जाई या जन्मीं तरी मजसारख्या मुलामाणसाच्या प्रतिष्ठित घरीं तुम्हाला मिळणार नाहीं!—'

: ३०३ :

मला, खरोखरच, त्या दिवशीं वाईट वाटलें. त्या प्रेमळ मनाच्या पोरीवर असा

आईबापांकडूनहि गहजब तरी कां झाला असेल ? ती आतां कुठें; काय करीत असेल ? मावशी, मी इकडे तशीच निघून आल्यानंतर, मागें घडलेल्या प्रसंगाचें कल्पनाचित्र अगदीं पटकन् माझ्या डोळ्यापुढें उभें राहिलें!.. मी त्या दिवशीं पुष्कळ रडलें. आणि त्यानंतरहि, जाईची आठवण आल्यावर, दुःखानें .. प्रेमानें .. अनेक मिश्र भावनानीं रडूं येई. पण अगदीं आजपर्यंत, तिजविषयीं मला काहींच समजलें नव्हतें.

हे ज्यूनिअर बी ए.चे इअर आहे. सहज मनाच्या करमणुकीसाठीं एक इंग्रजी कादंबरी वाचीत बसले होते. तोंच पोस्टमननें जाईच्या ओळखीच्या अक्षराचें एक जाडसे पाकीट मजकडे आणून दिलें.

मी उत्कंठेने ते भरभर वाचलें; आणि माझ्या डोळ्यातून अश्रू वाहूं लागले.

: ३०४ :

मावशी, जाई खरोखरच धीराची !.. तिजवर इतके चमत्कारिक प्रसंग आले माझ्यापेक्षा! पण किती धीराची ती ?.. साऱ्या विटंबनेला तिनें धैर्यानें अगदीं तोंड दिले!.. पण काळ काय निष्ठुर, . विघ्नसंतोषी आहे ?.. आणि आता तिचें भवितव्य ?.. हंसतमुख, आनंदी,.. आशापूर्ण मनानें जगात वावरणारी जाई आतां कायमचीच नाहींशी झाली, मला वाटतें !

माझ्याबद्दल जास्त लिहायचें आहे तरी काय ? ... आज जाई व अरुण यांच्यामुळेंच तर तुला पत्र लिहिण्याची मला आठवण झाली!.. जाईच मला आलेल पत्र इतकं हृदयस्पर्शी आहे, कीं, आणखी काही तरी स्वतःच लिहित बसण्यापेक्षां, . ते तसच सोबत तुझ्याकडे पाठवून देतें.

काय वाटेल ग मावशी तुला, तें सर्व पत्र वाचून झाल्यावर ?.. मला तर वाटतं, तुझ्यासारखीचं प्रेमळ मातृहृदय, जाईकडे खास सहानुभूतीनेच पाहील!.. आणि मला खात्री आहे, ती तुझ्याजवळ असती, तर तिच्या पाठीवर तूं प्रेमाचाच हात फिरवला असतास!..

मागें होप काइंड झाली,.. आता ही जाई पै!.. नाही तर आपली म्हणशील, ही मिरा वेडी तर नाही?.. अपल्याविषयीं काहींच जास्त लिहीत नाही!. आणि असे दुसऱ्याचेच जीवनवृत्तात सांगते,.. पत्र लिहील त्या त्या वेळीं!.. पण मावशी, आतां मात्र पुन्हा तुला पत्र लिहिण्याचा प्रसंग येईल, तेव्हा, मी माझ्या पत्त्यासह तुला मजविषयींच सारं सारं सांगेन हं खात्रीनें !.. तोंपर्यंत, तुझीच–**मिरा**

१ ता. २८ मार्च १९३१

प्रिय मिरा,

तुला आठवतें कां? एकदां आपण शिरोड्याला चार दिवसासाठीं गेलों होतों. तेथें एकदा समुद्राच्या वाळूंत बसून, खळखळ आवाज करीत उड्या मारणाऱ्या लाटांकडे पहात होतों;.. आणि हातानें वाऱ्यावर उडणाऱ्या वाळूंत आकृती काढीत आपण काहींतरी बोलत होतों!.. हो, तोच प्रसंग आतां यावेळीं मला, आठवत आहे!..

त्यावेळीं तूं म्हणालीस, "पाहिलंस, जाई! माणसाच्या महत्त्वाकांक्षा आणि आशा या आपल्या असल्या आकृतींसारख्या!" .. मी हंसून म्हणाले, "तुझं रडूबाईचं सदा आपलं तत्त्वज्ञान! त्या फेसाळणाऱ्या लाटा पहा तुला हंसत आहेत! त्यांच्याकडून तरी काहीं आनंदी वृत्ति शीक! त्याचं आयुष्य तें कसलं? एका क्षणाचं! पण त्यातही, त्या आनंद उत्साहांनीं खद्खद् हंसतात!.."

सूर्य बुडूं लागताना तूं म्हणालीस, "जगाच्या दुःखी कष्टी आयुष्यातील एक दिवस सपला!.." मी तुझा हात हिसडून त्यावेळी म्हणालें होते, "आताच तो दुसऱ्या देशात उगवला!.. आणि उद्यां सकाळीं आपल्या जगातही पुन्हा अरुणोदय होईल!.."

मिरे, तुझी जाई तितकी आशावंत आता राहिली नाहीं खरी; पण अजूनहि मला जगात तुझ्यासारखं सारच दुःख दिसत नाहीं. मीं तुझ्याकडून निघून आल्यानंतर, तस पाहिलं तर, जगातील सुखापेक्षां दुःखच माझ्या वाट्याला आलं; पण अजूनहि मला वाटतं,.. तें मागें म्हटल्याप्रमाणें,.. माझ्याहि आयुष्यात पुन्ह एकदा खऱ्या आशेचा अरुणोदय होईलच होईल!..

: ३०६ :

बाबाबरोबर मी पुण्यास आल्यावर, फर्ग्युसनमध्यें माझें नांव दाखल केलें. सगळेंच अगदीं नवे जग! जणुं आनंदानें फुललेलं!.. सारा दिवस कसा भरारा निघून जाई!.. मला समजतहि नसे. मैत्रिणींप्रमाणेंच मला नवीन नवीन मित्रहि लाभत होते. त्या लहानग्या जगांतल्या लहानसान घडामोडींत, मी उत्साहानें पडत होतें;.. इलेक्शन,.. डिबेटिंग, . स्पोर्ट्स्,.. गॅदरिंग,.. प्रत्येकात जाई पैंचे नांव ऐकूं येत होतें. मलाहि उत्साहाचा एकप्रकारे कैफ आला होता. लोकें नाकें मुरडीत;.. पण मी कांहीं आजीबाई नव्हतें!.. पुरुषाचा सहवास मला हवाहवासा वाटे; आणि त्या माझ्या भावनांना संधि मिळाल्यामुळे, मी माझ्या मोकळ्या स्वभावाप्रमाणें त्यांना खुला वांवहि दिला!..

शेवटीं, एकामागून एक दोन तीन प्रसंग घडले!.. शांताराम तेलंग ज्यूनिअर-

मधला. खेळाडू उत्तम; पण मी त्याला बॅडमिंटनमधें हरवलें. डिबेटिंगमध्यें सहवासोत्तर विवाहावर तो बोलल्यामुळें, केवळ त्याला विरोध करून चीत करण्यासाठीं आयत्यावेळीं उठून बोललें. पण त्यांत त्याची सरशी झाली. गॅदरिंगमध्यें तो घनःश्यामचा पार्ट करणार होता. हें ऐकून मीहि मुद्दाम घनश्यामचेंच काम करावयाचें ठरविलें. मुद्दाम आमच्या कांहीं मुलीं गोळा केल्या; व शेवटीं गॅदरिंगमध्यें निराळा असा तोच प्रवेश चार दिवसांत बसवून, त्याच्यापेक्षां जास्त उत्तम वठवून दाखविला !

पण शेवटीं, असल्या प्रसंगातील आमच्या या चुरशीनेंच, आम्ही एकमेकांकडे आकर्षिले गेलों. एकमेकाचे विजयपराजय दाखवून, आम्ही दोघांची थट्टा केली.. एक दोन महिन्यात, यावरूनच परिचय वाढत गेला आणि मला त्याच्याविषयीं आपलेपणा वाटूं लागला होता.

त्यानंतर, एके दिवशीं त्याच्या इच्छेवरून, आम्ही कालव्यावर लांब फिरावयास गेलों. त्यावेळीं, बोलता बोलतां, त्याने अचानक माझ्या मनातल्या भावनाच बोलून दाखविल्या,.. व मजकडे प्रेमयाचना केली. मला त्याला काय उत्तर द्यावें हेंच समजेना. त्याने माझा हात आपल्या हातीं घेताच मी जास्तच गोंधळलें. त्या क्षणाला मला वाटलें,.. पण काय वाटलं कोणास ठाऊक !.. शेवटी मी हो म्हणालें एवढं खरं !

आमचे फिरणें, आमचा सहवास दिवसेंदिवस वाढत गेला. तो स्वजातीय, श्रीमंताचा, त्यातून एका एम्. एल्. सी. चा मुलगा ! त्यामुळें आमच्या गरीबाच्या घरीं त्याच जाणें येणें, त्याचा माझ्याबरोबरचा मोकळा सहवास, या गोष्टींना बाबाचीहि मूकसंमति मिळत होती. . मला त्याच्याविषयीं खरोखरच प्रेम, आपलेपणा, जिव्हाळा, आकर्षण .. काय म्हणशील तें सर्व,.. वाटत होतें त्यावेळीं !

: ३०७ :

असेच काहीं दिवस गेले. या सर्वच गोष्टींत नाविन्य होतें. त्यामुळे माझें आधींच आशावंत असलेलं हृदय, नवनवीन आकांक्षा, उत्साह यांनीं भरून येत असे. आणि अशा मनःस्थितींत आम्ही,.. निदान मी तरी,.. कोठें कशी वाहवत होतें, तें माझें मलाच समजत नव्हतें!.. भावनाचा, विकारांचा,.. कशाचाहि म्हण,.. शेवटीं अतिरेक झाला. आणि एके दिवशीं एक अगदीं चमत्कारिक जबाबदारी मजवर येऊन पडली !

आणखी कांहीं दिवस गेले. मी अजूनहि त्याच्याशीं तितक्याच प्रेमळपणें व आशापूर्ण मनानें वागत होतें. शेवटीं त्याच्या वडिलाना हें सर्व कळविण्यास मीं त्याला सांगितलें. प्रथम तो थोडी टाळाटाळ करी; पण त्यानंतर अनपेक्षितपणें मजबरोबरचा त्याचा स्नेहसंबंधहि कमी होऊं लागला. त्याचें येणेजाणें थांबलें !..

आणि माझा त्यामुळें तर, मनांतल्या मनांत अगदीं कोंडमारा होऊं लागला !

शेवटीं, माझ्या आईच्या सारं कांहीं लक्षांत आलं !. व मग माझे बाबा एकदां माझ्या लग्नाच्या बाबतींत शातारामाच्या वडिलांस भेटावयास गेले !..पण त्यांनीं त्यांच्यावरच आपला सारा राग काढला; व शातारामाला बोलवावयास सांगितलें. तो आला, पण आपल्या वडिलाची एकंदर गरम प्रकृति पहातांच, त्या आज्ञाधारक नायकाने स्वस्थ राहून आपल्या कानावर हात ठेवले. आमच्या बाबांसारख्या गरीब माणसानें त्या थोर गृहस्थाच्या मुलावर नाहीं तो आरोप घातल्याबद्दल, त्याना थोड्याच वेळात,..त्या भव्य बगल्याच्या पायऱ्या घाईघाईनें उतराव्या लागल्या !..

: ३०८ :

(माझ्याच आयुष्याचे हे प्रसंग! असे काहींशा गमतींत, थट्टेनेंच लिहीत आहे; म्हणून तुला थोडें आश्चर्यहि वाटेल. पण मिरे,.. त्या माझ्या साऱ्याच गतायुष्याची थट्टा झाल्यावर . . आता तिकडे मी तितक्याच बेफिकीर वृत्तीनें पाहायचं ठरविलं, तर त्यांत काय ग चुकलं ! जगात मुळुमुळू रडून कस चालणार बाई ? माझं तरी निदान चालणार नाहीं !.. मला त्याच जगांत अजून जगायचं आहे.. चागलं आशापूर्ण मनानं जगायचं आहे !)

: ३०९ :

बाबा घरीं आल्यावर मजवर प्रथम पुष्कळ चिडले. मला मारावयासहि धावले. पण आई मध्यें पडली. माझीं लहान लहान भावंडें,..कारण न समजल्यामुळें,.. टकमका पहात कोपऱ्यात गप्प बसलीं होतीं !..

काहीं वेळ गेला. सगळ्या मुलांची निजानीज झाल्यावर, बाबा मजकडे हळूच आले. मनात पेटलेल्या भडाग्नीनें, मी बिछान्यात तळमळतच पडलें होतें. मला उठवून बसवून, माझ्या पाठीवर हळू हळू हात फिरवीत, बाबा मला म्हणाले, " जाई, पोरी काय केलस हें ? तुझ्या आणि आमच्या सर्वांच्याच तोंडाला काळोखी फासलीस तूं ! . ."

मी अगदीं शांतच होतें. मग बाबा हळूच मला म्हणाले, " किती महिने झाले या गोष्टीला ? "

मी कापऱ्या आवाजानें म्हटले " सहा " . .

ते थोड्या वेळानें कांहींसा विचार करून एक सुस्कारा सोडीत म्हणाले, " तुला आपले सोहनी डॉक्टर माहीत आहेत ! माझे मित्र ! . . "

. . आणि नंतरहि ते थोडा वेळ घुटमळले व शेवटीं अडखळत म्हणाले, " त्यांचा या बाबतींत आपल्याला सल्ला घेतला पाहिजे. "

क्षणभर मला त्यांच्या बोलण्याचा अर्थच समजला नाहीं. पण नंतर मी

एकदम दचकून उठलें; व बाबाकडे कांहींशा रागानें,.. कांहींशा भीतीनें...थरथर कांपत पाहूं लागलें.

माझ्या त्या मिश्र भावनात, त्यावेळीं एक नवीनच जाणीव उत्पन्न झाली. कशी मला कळत नाहीं, पण मी माझ्या पोटाजवळ घट्ट हात आवळून मोठ्यानें ओरडून बाबाना म्हणालें " नाही. त्याला मात्र मी मुळींच तयार नाहीं."

"पोरी, का असा आमचा छळ करतेस?" बाबा कांहींशा त्राग्यानेंच पण केविलवाणे मला म्हणाले, "आमचे ऐक! त्यातच तुझे व सर्वांचे हित आहे."

: ३१० :

खरेंच, मिरे, माझ्या पोटात त्यावेळीं काहीं तरी असहाय्यपणें हंसत असल्याचा मला भास झाला. माझी छाती एकाएकीं धडधड वाजूं लागली. मला तसल्या प्रकारच्या भावना तोंपर्यंत कधींच ठाऊक नव्हत्या. मी शक्य तितकी शात होण्याचा प्रयत्न करून म्हणाले "बाबा, होय... मी चुकलें खरी! पण तुम्ही माझ्या हितासाठीं असं काहीं करूं नका! तुम्ही माझं हित पाहतां. पण मजवर एका असहाय्य अज्ञात अज्ञान, जीवाचं हित पहाण्याची जबाबदारी, आता माझ्या चुकीने पडली आहे!.."

बाबा माझ्या उत्तरानें एकदम चिडले. "कारटे, आमचा सूड उगवायलाच तूं उठलेली दिसतेस! याचा परिणाम तुला एकटीलाच नाही, मला माझ्या मुलाबाळानाहि भोगावा लागेल! अजून माझें एक!

"नाहीं" मी तितक्याच निश्चयानें म्हणालें.

बाबा रागाने थरथरत माझ्या अंगावर धावले.

"जा तर,.. चल चालती हो! आताच्या आता आमच्या इथून काळं कर!" रागानें त्याचा आवाज चढलेला पाहून आई बाहेर धावत आली.

"हळूं हळूं! कोणी ऐकेल तर काय होईल?" तिनें शेवटीं त्याना बाजूला ओढून शात केलें.

"मी गरीब आहे. माझ्या मागे माझीं इतर लहानगीं मुल आहेत. आणि मला याच माझ्या भोंवतालच्या समाजात रहावयाचे आहे!" बाबानीं आपल्या खिशांतून पाच सहा दहाच्या नोटा माझ्या अंगावर टाकून, हळूंच पण रागानें, म्हटले, "हे घे, आणि आता नाहीं तर सकाळीं,.. केव्हा वाटेल तेव्हा,.. माझ्या घरातून काळं कर!"

त्याच्या त्या उद्गारानी मात्र, मला अगदीं तिरमिरीच आली!

"मघा तुम्ही त्या श्रीमंताच्या घराच्या पायऱ्या उतरताना, त्यानें तुम्हाला तुमच्या 'कठीण' परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठीं म्हणून, शेंदोनशें रुपये देऊं केलें. या त्याच्या हलकट, उपकारी वृत्तीबद्दल आईकडे क्षणापूर्वीच त्याला शिव्या

देत होता!" त्या नोटा पाहून माझ्याहि रागाची तिडिक मस्तकाला गेली; व तोंडाला येईल तें मी बडबडूं लागलें, " आता तुम्ही मजपुढें नोटा टाकतां, त्या मात्र तसल्याच भावनेनें नव्हे का? . . बाबा हे तुमचे उपकार कशाला !.. तुम्ही घाबरू नका! तुमचे पैसे मला नकोत! मीहि आताच तुम्हांला सोडून जातें! . ."

खुंटीवरील माझीं दोन पातळे घेऊन मी निघूं लागताच, आई एकदम मध्यें पडली. तिनें मला घट्ट मिठी मारली; व ती रडत म्हणाली, " पोरी, निदान अशा रात्री;... तरी भरल्या घरातून जाऊं नकोस !..."

: ३११ :

बाबा बाहेर गेल्यावर, मी आणि आई एकमेकाना मिठी मारून किती तरी वेळ रडत होतों !.. शेवटीं ती तेथेच जमिनीवर लवडली.

पण माझे विचार चालू होते. माझे त्यापूर्वीचे आनंदी, उत्साही . .आयुष्य ! आणि त्या क्षणीचं,. . चमत्कारिक परिस्थितीने .. मूर्खपणानें .. शिरावर आलेल्या जबाबदारीत धडपडणारे आयुष्य! . त्यावेळी,. तुझ्याबरोबर घालविलेल्या आनंदी क्षणाची,. . तू सागितलेल्या तुझ्या आयुष्यातील आनदी क्षणाची .. सारीं चित्रे डोळ्यापुढे आली ! . . मिरे, मला अज्ञात असला तरी,. . तुझा प्रियकर थोर होता !. . आणि मी . . मी मात्र सर्वच दृष्टीने क्षुद्र,.. तुच्छ ठरले ! .. पण मग मला वाटल,.. माझ्या उदरातील मुलाला मी आता जन्म देणं,.. हेंच माझं कर्तव्य आहे. माझ्या चुकीच,.. पापाचं प्रायश्चित्त, त्याला का म्हणून ? त्याच्या प्राणावर मी का उठावं ?---

बाबावरील माझा रागहि हळूहळू कमी होत गेला. त्या गरीब संसारी माणसाने तरी, त्या परिस्थितीत काय करायच! मला वाटलं, मी त्या घरातून जितक्या लौकर बाहेर पडेन तितकं चागलं !... मी सभोवार पाहिले. सगळी सामसूम होती. माझ्या पुस्तकाच्या लहानग्या बॅगेत, मी हळूच माझी दोन नेसतीं लुगडीं कोंबली. माझी मनीबॅग घेतली, व झटकन् मागल्या दाराने बाहेर पडलें.

चोहोंबाजूस,. माझ्या भवितव्याप्रमाणेच जणुं काय,. काळोख पसरला होता. मी झपझप पावले टाकीत स्टेशनचा रस्ता काटीत होतें. स्टेशनवर पोहोंचेपर्यंत, कुठे जायचें, काय ते माझे काहीच ठरलं नव्हत. मुबईकडे जाणारी गाडी स्टेशनात उभी असलेली पाहून, मी मुंबईचे तिकीट काढले. घाईघाईनें गाडीकडे धावलें. व बायकाच्या डब्यात कसाबसा शिरकाव करून घेतला !..

: ३१२ :

गाडी सुरूं झाल्यावर,.. तिच्या वेगाप्रमाणेच माझ्या भवितव्याविषयींचे,... विचारहि माझ्यापुढून जोराने धावूं लागले. पण मला आंतून कोणीतरी मजुळ व

बोबड्या आवाजानें म्हणत होतें,.. " आई ग, मला अंतर देऊं नकोस हं !.. मी अगदीं असहाय आहे ! "

मला गहिवरून आले!.. अंगावर रोमांच उभे राहिले. माझ्या पोटावर माझे हात घट्ट धरून, मी माझ्या डोळ्यांतील अश्रु तसेच ओसरूं देत, कांपऱ्या आवाजांत स्वतःशींच पुटपुटलें, "बाळ, उगी उगी! मी तुझीच आहे बरं! आपण या सर्वांना, .. अगदी सर्वांना तोंड देऊ ! "

: ३१३ :

गाडी जोरानें पुढें चालली होती. आता चांगलं उजाडलं होतं!..पण गाडींतल्या मराठ्याच्या बायका अजून डुलक्या घेत होत्या. मला कुठं जावं,.. काय, अजून कांहींच सुचत नव्हतं. इतक्यात जोराजोरानें धावणारी गाडी, माझ्या विचारांच्या गाडीप्रमाणेंच,. हळूहळू चालूं लागली. व शेवटी एका केबिनजवळ धापा टाकीत उभी राहिली. हो, मला वाटले जणू काय, मजप्रमाणेंच कोठें पळावें तें न समजून ती क्षणभर उभी राहून, आसऱ्याला जागा शोधीत आहे.

मी लांबवर दृष्टि टाकली. दोनतीन झोपड्याचीं छपरें दिसत होतीं... एखादें कुत्रें अजून आपली मर्दुमकी गाजविण्याचा प्रयत्न करीत होते... बाकी सगळीकडे शांत!

मला वाटलं, हेंच माझं वास्तव्याच ठिकाण मी करावं; म्हणूनच जणुं, गाडी येथें बराच वेळ उभी राहिली. मी क्षणाचाहि वेळ न लावता दरवाजा उघडला;.. व खाली रुळाजवळ उतरले!... तोंच... गाडी पुन्हा चालूहि झाली.

मला तेथे आणून सोडणाऱ्या गाडीला, लांबपर्यंत गेलेली पाहिल्यावर, मी त्या झोपड्याच्या दिशेने चालूं लागले. गर्द झाडींतून पायवाट मला त्या झोंपड्याकडे नेत होती...जणुं काय, माझ्या अंधकारमय भवितव्याकडून आशेच्या किरणांकडे!

: ३१४ :

शेवटीं तेथें येऊन पोहोंचताच, पहिल्या झोपडीजवळील कुत्रा गुरगुरूं लागला. मी मनात म्हणाले, " तूंच काय वेड्या.. कितीतरी मानवी गुरगुरणींहि मला यापुढे ऐकायची आहेत! तुला त्याची प्रचीतीच पहायची आहे कां ? पहा तर आता, तुझ्या मालकाला जरी माझी माहिती समजली,..तरी तो देखील मजवर गुरगुरेल!.. "

पण हे माझे विचार चालले आहेत,..इतक्यात एक म्हातारी मराठमोळा बाई झोंपडींतून बाहेर आली. कुत्र्याला बाजूस हाकलतांना,..मजसारख्या सुस्वरूप पांढरपेशा बाईला तशा सकाळच्या वेळीं तेथें पाहून, ती एकदम दचकली. हंसत हंसत तिच्याजवळ जाऊन मी तिला म्हणालें, " बाई, थोडें पाणी देतां कां तोंड धुवायला ?.. "

: ३१५ :

आणि आमची गट्टी अर्ध्या तासांत वाढत गेली. त्या चारपांच झोंपड्यांच
खेड्यात मला पाहून, तिला प्रथम आश्चर्य वाटलें. पण नंतर तिनें मला जास्त कां
एक न विचारता, आपल्या घरची हकीकत सांगायला सुरवात केली.

त्या झोंपडींत, ती व तिचा म्हातारा नवरा, दोघेंच रहात होतीं. त्यां
कर्तासवरता मुलगा, सून व तिचीं दोन मुलें चार पाच वर्षांपूर्वीच एकाए
सांथीने मेली होती. व साधारण खाऊन पिऊन बरी परिस्थिति असूनहि, आत
ते दुःखाचे दिवस पहायला, म्हातारा व म्हातारीच जिवंत राहिली होती. म
तिचा प्रेमळपणा पाहून, एकदम वाटल, आपण सध्या इथंच रहावं. आ
मी लागलीच तिला सागितलें, " आजी, मी इथेंच तुमच्या घरी दोन तीन दि
पाहुणचार खायला राहणार आहें ! "

" रहा ना बाई ; पण मला ठाऊक आहे, आमची तुम्ही थट्टा करता ते !
ती हंसत म्हणाली, " पण हें काय ? घरधनी आता परततील. तुम्हाला दूध
दिलं नाहीं, म्हणून समजलं, तर ते मला मारायलाच उठतील ! "

असें म्हणून, तिनें मला लहानशा लोट्यातून थोडें गरम केलेलें दूध आण
दिलें. मी ते तिच्याबरोबर बोलत पीत आहे तोंच, एक केस पाढरे फटफट
झालेला म्हातारा, झोपडीच्या दारातूनच हाक मारूं लागला, " रखमे, कोण
पाव्हणं ? . . "

नंतर आमच्या गप्पा चालता चालता, म्हातारीनें नुकतीच भाजलेली भाकर
लसणीचें तिखट, आपल्या नवऱ्यापुढे मातीच्या भाड्यातून ठेवली; व ' म
भाकरी कशी चालणार ?' अशा असहाय्य चेहऱ्यानें तिनें मजकडे पाहिले. पण
मुद्दामच तिला म्हटले, " वा, आजी, मला नाही वाटतं भाकर देणार ? "

मी थट्टा तर करीत नाही ? असा तिला संशय आला. पण पुन्हा माझ्या चे
ऱ्यावरील खरेपणा पाहून, मला वाटतं, तिला धीर आला. तिने घाईघाईने दुस
थाळी भरून मजकडे केली.

त्यांच्या झोंपडीभोवतालची बरीचशी जमीन त्याचीच होती. त्यात ती दोघें
वेळ पडल्यास मजूर राबत. शिवाय म्हाताऱ्याची गाडी होती. तीहि तो मधू
मधून कामाला लावी. आणि त्यांतच दोघांचा म्हातारा संसार आनदात चालत
होता.

तेव्हां त्यांत मी तिसरी जाऊन पडले !..

: ३१६ :

दोन दिवसातच मी म्हातारीला खरीखरी हकीकत सांगितली. ' मी तुझ्याकडे
रहाणार आहे. तूं मला आसरा दे ' . . अशी तिला कळकळीनें विनन्ति केल

तिला प्रथम वाईट वाटलें. भीति वाटली. पण नंतर, अगदीं मातेच्या प्रेमळपणानें माझ्या पाठीवर हात फिरवीत, तिनें पूर्वीचे ' अहो जाहो ' व ' ताई-साहेब ' टाकून, एकदम म्हटलें, " पोरी, घाबरूं नकोस. मी आणि माझे घर-धनी आहेत, तोंपर्यंत तुला कसली काळजी करायला नको. मला लोकांचं सारं ठाऊक आहे. तूं आता जाते म्हणालीस तरी मी तुला जाऊं देणार नाहीं समजलीस ? ... "

आणि मी ' आजी ' व ' आजोबा ' कडे राहूं लागले. सवय नव्हती तरी, त्याचे जाडेभरडे, साधेंसुधे जेवण मला त्याच्या प्रेमळ सगतीत रुचकर वाटूं लागले !

: ३१७ :

दोन अडीच महिने निघून गेले. म्हातारीबरोबर कामे करायचीं. आतां तिने मला बंदी केली होती. ती व आजोबा कामे करीत व मी जवळ बसून त्याच्याशी कसल्या तरी गप्पा मारी. माझा बाळ आता पोटात गडबड करूं लागला होता. मला किती तरी वेळां गहिवरून येई. मला वाटे, बाळ कसा असेल, . . केव्हा मला दिसेल, . . त्याचे प्रेमभराने आपण केव्हा मटामट मुके घेऊं ?

आणि असल्या पुढील कल्पनाचित्रावर, व तसल्याच स्वप्नावर, मी पुढील दिवसहि कसेबसे काढले! . .

: ३१८ :

एके दिवशीं मला कळा असह्य झाल्या. म्हातारी जाणती अनुभवी होती. तिनें माझी त्याच्या खेडवळ पद्धतीप्रमाणे सर्व शुश्रूषासोय ठेवली! . . .आणि शेवटीं,. . मी जेव्हा पुन्हा भानावर आले, तेव्हा माझ्यासमोर, जुन्याच पण स्वच्छ कपड्यांत गुरफटेलली,. . एक चिमुकली मूर्ति, . . आपले तांबडे कोवळे हातपाय हालवत, पडली होती!. .

मला त्यावेळीं कोण आनंद झाला, मिरे ? अगावर किती वेळ अननुभूत रोमाच उभे राहिले होते ? मी त्या असहाय्य, निष्पाप, जीवाला,. . स्नेहाने, उत्कट प्रेम-भावनानीं. . माझ्या हृदयाजवळ घट्ट धरले !..

त्यावेळीं मला काहींच सुचेना. माझ्या बाळाचे काय करूं आणि काय नको असं झाल. आणि केवढं आश्चर्य, मिरे ? आई, मूल, पान्हा.. याची कल्पनाहि मला नव्हती; पण मी माझ्या न कळत, बाळाला स्तनपान करावयास दिले !

: ३१९ :

माझा बाळ दिवसादिवसानी मोठा होत होता. म्हातारीची अकारण धडपड तर विचारायलाच नको. बाराव्या दिवशी, त्याचं नांव मी 'नंदा' ठेविल. माझ्या

लहानग्या आयुष्यांत, मजवर आलेले सारे प्रसंग विसरावयास लावून मला आनंद देणारा, . . नंदकंदच होता तो ! . . म्हातारी त्याच्यात व माझ्यातील साम्य पाहून मनापासून हंसे; त्याच्या कुरळ्या केसावरून, गोल गालावरून हळुवार हात फिरवी; व झोपेंत तोंडाचं बोळकें लुचलुच हलविताना त्याला पाहून, त्याचें मनापासून कौतुक करी !. .

माझा बाळ होताच तसा सुंदर ! . . मी त्याच्याकडे तासाचे तास टक लावून बसावं !.. आता त्याचं भवितव्य काय, त्याचं पोषण कसं कुठ करायच,.. असले पुढले विचार, त्या पहिल्या कांहीं दिवसात माझ्या मनातहि कधी येत नसत !. .

मी त्यावेळी अगदीं आनंदांतच होतें ! मी आणि माझा नंदा !..पण महिना झाला न झाला असेल, तोंच,.. काय झालं कोणास ठाऊक ? एके दिवशी बाळ 'देवा' बरोबर हसता हसतां रडूं लागला;. . त्याला सडकून ताप भरला ! . . त्याचा गळा कफानें घरघरूं लागला !

पण त्या गरीब झोंपडींत, त्याला जास्त पांघरुणें कोठून आणणार ?. . त्याला जरूर तीं औषधं कोठून मिळविणार ?. . बिचारा चिमुकला जीव, . . अगदीं तळमळत होता !. . आणि त्याच्याबरोबरच मी!

म्हातारी बापडी मधून मधून येई, व अगदी दीनपणें, . . आमच्या दोघांच्याहि तोंडाकडे आळीपाळीने पाही. म्हाताऱ्यानें कसल्याशा मुळ्या उगाळून देण्याचा सपाटा चालविला होता. त्यामुळे बाळाचा कफ थोडा सुटला. पण . .

शेवटीं तो आचके देऊं लागला ! मला अगदीं कोणीतरी माझा लचका तोडून नेत असल्यासारखें वाटूं लागले. म्हातारी देवाला नमस्कार करून, . . पाच पाच मिनिटें बसे.

पण तो देवाघरून आलेला दुर्दैवी प्राणी,.. देवाकडेच,.. आपला दोष नसल्याचं ... कदाचित् आई दुष्ट, मूर्ख असं ... सांगावयास निघून गेला शेवटी ! . .

मला दोन दिवस जेवणहि जाईना. पण मग वाटूं लागलं, . . झालं तें एकाअर्थी बरंच झालं ! ...

: ३२० :

आठ दहा दिवस झाले आहेत या गोष्टीला !.. माझं मन अजूनहि पूर्णपणे स्थिर होत नाही. पण त्या गरीब जोडप्याच्या घरीं, त्यांच्या सौजन्याचा फायदा घेऊन, मी अशीच आणखी किती दिवस रहाणार ? . . विचार भडावून सोडीत आहेत मनाला !.. मला आता प्रत्येक क्षणाला जास्तच वाटू लागल आहे, कीं, आपण आतां येथून आपल्या भवितव्यास तोंड द्यायला, बाहेरच्या अफाट जगांत शिरलंच पाहिजे !...

कालचीच गोष्ट !..शेवटीं मला रहावेना, म्हणून मी म्हातारीला माझा जाण्याचा

विचार सांगितला. ती मुळी ऐकेचना,.. म्हणूं लागली, ' पोरी, तूं आतां जाणार आहेस कुठं ?... माझ्या म्हातारीकडेच आणखी कांहीं दिवस राहीनास कां !' ..

पण, शेवटीं मोठ्या प्रयासानें मी तिची समजूत घातली. मी तिला माझ्या बोटांतील आंगठी देऊं लागलें. पण ती घेईना. ' ही माझी आठवण म्हणून तरी ठेव ' असें मी तिला सांगितल्यावर मग मात्र, तिनें नाइलाजानें तिचा स्वीकार केला.

: ३२१ :

माझ्या नंदाला दगडामातीत झोंपलेला असा इथंच मागें ठेवून जावं लागणार या विचारानें मला दु:ख होत आहे !.. पण त्या प्रेमळ म्हाताऱ्या जोडप्याचा अखंड सहवास,..मला नाही तरी त्याला मिळणार,.. हें काय त्याचं कमी भाग्य ?

नाही तर...या जगांत तरी त्याचं जास्त चागलं काय होणार होतं ?

मिरे, मी आतां पुन्हां एकदां एकटी झालें आहें !..इथून मी लौकरच जाणार हें निश्चित !...कोठे ?..कशाला ? कोणास ठाऊक !...मला यापुढें माझं काय होणार आहे तें समजत नाही; पण तरीहि,..मी पूर्वींइतकी नसलें, तरी बरीच आशावादी आहे अजूनहि !..

आठ दिवस तरी आणखी म्हातारीच्या सहवासात काढावे म्हणून मी अजून येथेंच आहे. आणि त्यानंतर लौकरच कोठें तरी—

तत्पूर्वीचं,.. हें तुला लिहिलेलं पत्र—

तुला पत्ता दिला नाही. कोणी सांगावं ?.. तूं धावत इथ आलीस तर ?.. आणि तें तर मला मुळींच नको आहे !..

पण हें सारं तुला कळवून, मला आतां किती हलकं वाटत आहे म्हणून सांगूं मिरे ?..आतां आयुष्यातील पुढल्या घटनांची,.. उत्कंठेनें व आशावंत मनानें वाट पहावयास, पुन्हां आपली मोकळी मी !

—सध्या तरी एकट्या तुझीच—जाई पै.

# उपसंहार

आजपर्यंत आलेल्यांपैकीं, संग्रहीं असलेल्या साऱ्या पत्रांचें वाचन, कमळामावशीनें येथें संपविलें,. . व किंचित् भानावर येऊन, तिनें एकप्रकारच्या खिन्न समाधानाचा सुस्कारा सोडला ! . . तिन्ही जुडग्यातील तीं सारीं पत्रे, आपल्या हातात धरून ; . . उगीचच प्रथमपासून शेवटापर्यंत,. . तिने भर्कन् पुन्हा एकदां चाळलीं !.

रात्रभर आपण असे वेड्यासारखे वाचत काय बसलों होतों,.. या विचारानें मावशी स्वतःशींच उदासपणें हसली. पण तिच्या इतर दृष्टीने प्रवाहपतित झालेल्या आयुष्यात, तिच्या सग्रहीं असलेल्या तिच्या माणसाच्या सुखदुःखानें भरलेलीं ती पत्रे ! . . तींच काय तीं तिला विश्रांतीची स्थाने, .. विरंगुळा वाटत !.. आणि ती पुन्हापुन्हा वाचण्यात तिच्या मनाला जें समाधान वाटें,.. ते कांहीं अवर्णनीयच ! .. आजहि,.. त्याच आनंदाने ती उल्हसित झाली होती ! ...

:३२३:

याच विचारामुळें, आपलीं बहीण सीतामाई, श्रीनिवास, मिरा, अरुण, बाबासाहेब, मंजुळा, यशवंतदादा, जानकीकाकू, यशोदाकाकी, अरविंद, नाना, वसंत, जाई,.. साऱ्या साऱ्या व्यक्ति,.. त्या शात वातावरणांत तिजसमोर एकदम उभ्या राहिल्या !..

यातील बहुतेक, एकमेकाच्या व स्वतःच्या जीवनप्रवासांतील सोबती होत;.. आणि म्हणूनच, ही पत्रे,.. आपल्यालाहि जिवलग सोबत्यासारखी वाटतात,.. असेंच कमळामावशीला वाटलें !.. या विचारमालिकेमुळें, तिचे पुढील विचार त्याच दिशेनें झुकले; व त्या दृष्टीनें त्या साऱ्या माणसांपैकीं कांहींच्या सहवासांत आलेल्या .. स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवातून,.. तिचें मन पुन्हा एकदा भरभर प्रवास करूं लागलें !..

मंजुळेच्या त्यागाच्या जाणीवेने,. तिला आपल्या आयुष्याच्या सुरवातीच्या, कांही तसल्याच प्रकारच्या घटनाची, आठवण झाल्यावाचून राहिली नाही !.. पण मोठ्या प्रयासाने, तिनें आपले हृदय त्या बाजूस जास्त वाहू दिलें नाही ! . . .

इतक्यांत,.. ठण् ! ठण् ! ठण् ! ठण् ! ठण् !.. पांचाचे ठोके तिच्या कानावर आदळले ; तशी ती दचकून भानावर आली व पटकन् जाग्यावरून उठली !..

: ३२४ :

कोंबडे आरवत होते!..लांबून,. दूरच्या काबाडी बैलगाड्यांचा, .कोठून तरी,..कोठें तरीच जातानाचा खड्खड् आवाज ऐकूं येत होता !..मुलें तशींच झोपेंत इकडेतिकडे लोळली होर्ती!.. कुंदेजवळ जाऊन,..तिने एक हात तिच्या कपाळावर हळुवारपणें ठेवला,. . व दुसऱ्या हाताने तिला हळूहळू हालवीत,. . अगदीं सौम्यपणें तिच्या कानाजवळ ती पुटपुटली,.. 'कुंदा, बाळ उठणार होतीस ना ?.. पाच वाजून गेले हो !'. .

कुंदा उठून बसताच, तिनें तिला आपल्याजवळ धरून उभें केलें. ती नीट जागी होऊन चालू लागताच, कोपऱ्यातील पुस्तकांची बॅग मावशीने कंदीलाजवळ आणून ठेवली... कुंदा डोळ्याला पाणी लावून, आपल्या बिछान्याजवळच हातानें चापत काही तरी शोधीत होती.

कमळामावशी तिजकडे वळताच, तिची ती गडबड तिला दिसली. 'काय ग, काय हरवल ?' असे म्हणत ती कदील घेऊन तिजकडे गेली. 'माझा पेन्सिलीचा तुकडा !..पोलक्यातून कुठेतरी पडला रात्री !..' कुंदा म्हणाली.. कमळामावशीनें पांघरुणे वर खाली करून, तिला तो शोधून दिला. तशी कुंदा कंदील घेऊन अभ्यासाला जाऊन बसली !. .

: ३२५ :

लगबगीनें परत, येऊन कमळामावशीने पत्राचें पुडकें उचलले. आपल्या ट्रंकेंत तें पूर्वीच्या ठिकाणी नीट ठेवून, गळ्यातील चावीनें पुन्हा कुलूप लावलें.

कोंबडा पुन्हां आरवला;..तशी मावशी स्वयंपाकघराकडे वळली. तिनें कोपऱ्यातील शेगडी चाळवली. त्यातील गोवऱ्यांचे निखारे काढून चुलींत टाकले. थोडेंसें 'फूंफूं' फुंकल्यावर, तिने बसल्या बसल्या आळस दिला, .झाकलेली दुधाची पातेली उचलून शेगडीवर ठेवली,.. व किटली भरून चुलीवर चढवली.

तिने चुलीवरील खिडकी उघडून टाकली. मंदमंद झुळका वहात होत्या. इतस्ततः वाढलेले वृक्ष,.. जणूं आनंदाने आपले शेडे हालवीत होते. हळूहळू फिक्या होणाऱ्या चंद्रप्रकाशात,.. ते जास्तच काळेभोर व गर्द दिसूं लागल्यामुळें, त्याना हिणवण्यासाठीच कीं काय,.. शुक्रदेव लुकलुक करीत वर चढत होता !... आतापर्यंत,.. कोपऱ्यात डुलक्या घेत बसलेल्या कोंबड्यांच्या अंगांत, पहाटेच्या वाऱ्याबरोबरच नवचैतन्य आल्यासारखे झाले !..रात्रभर चालणारं त्या खेडेगावांतील कुत्र्यांचे कर्कश ओरडणे, मंदावत चाललेले पाहूनच जणूं, त्याच्या मनांत उसळणाऱ्या अंतःस्फूर्तीच्या झोताबरोबर,.. त्याच्यातील एकानें पुन्हा ललकारी दिली ... काक्... कॉ... कॉक्... कॉ !

आणि त्याचे ललकारणारे साथीदार वाढू लागतांच,.. रात्रीं लौकर झोपीं गेलेलें

तें खेडेगांव, एकादा हळूंच या कुशीवरून त्या कुशीवर वळलें !.. आतांपर्यंत, गुरांच्या गोठ्यांतून एखाद्या म्हशीचें मोठ्यानें सुस्कारणें, रवंथ करतांना मधूनच एकाबर एक घासणाऱ्या दाताचा ' कुर्र ... ' आवाज, किंवा उठतां बसतांना जमीनीवर आपटणाऱ्या खुरांचा 'खट् खट्' ध्वनि,.. हेच तेथील शांतता मोडणारे शब्द होते!. पण धार काढण्याचा वेळ जवळ येत चाललेला पाहून, म्हैशीगाई आपल्या दावणीस बांधलेल्या रेडका–वासरास चाटूं लागल्या होत्या !..तींहि आपल्या अस्पष्ट हंबरण्यानें, . . आपल्या गोवाऱ्यास जाग आणण्याचा प्रयत्न करीत होतीं.

लहान बालकें प्यावयासाठीं रडूं लागलीं होती. एखाददुसरा म्हातारा माणूस, बसला होऊन्, भूपाळ्या गुणगुणूं लागला होता. वारल्याकोळ्याच्या बायका चुलीत जाळ पेटवीत, दातवण लावू लागल्या होत्या. पिठाचे मळके डबे, थाळी तव्यासह चुलीजवळ उतरे होते... त्याचे घरधनी आळस देत, डोळे चोळीत, वावलीचा धूर सोडीत,. . अगर रस्त्यांत आढळणाऱ्या झाडाच्या ओरबडलेल्या काटक्या दातानी सोलत, परसापलीकडे चालले होते.

इतक्यात,..अगदी लाबून, . . स्टेशनावरून सुटलेल्या पहिल्या गाडीची अस्पष्ट शिटी ऐकताच,.. कमळामावशी भरभर पुन्हा ओटीवर आली !.

कुंदा कंदीलाजवळ वाकून,..घरच्या अभ्यासातील काहीं राहिलेलें लिहीत होती!.. आपल्या झोंपलेल्या इतर मुलाना, कमळामावशी हळूंच मंजुळ शब्दात म्हणाली, ' उठाना रे आता ? ' आणि असें म्हणून ती पुन्हा स्वयंपाकघरांत आली.

: ३२६ :

चुलींत आता जाळ चागलाच पेटला होता !.. रात्रभर वाचलेल्या पत्रानीं कमळामावशीच्या हृदयातहि,.. बऱ्यावाईट परस्परविरोधी विचार–भावनांमुळे असाच जाळ पेटला होता !.. तिच्या मनःश्चक्षूंपुढून पत्रे वाचतां वाचता, रात्रभर, अनेक व्यक्ती येऊन गेल्या होत्या. तरी पण . . अरुण, मजुळा, बाबासाहेब, मिरा, जाई . . यांच्या मूर्ती मात्र, कमळामावशी हातानें काम करीत असतानाहि,. . तिच्या दृष्टीपुढून हालेनात ! . .

मंजुळेच्या आयुष्यास मिळालेलें आकल्पित नवें वळण व तिचा श्रेष्ठ त्याग,.. मावशीच्या हृदयात खळबळ उडवीत होता!.. त्यावरूनच तिला एकाएकीं निघून गेलेल्या बाबासाहेबाच्या धाकट्या भावाची—श्रीनिवासची—एकदम आठवण झाली;.. आणि ती आपल्याशीच पुटपुटली, ' कोठे बरे गेले असतील भाई ?..

मिरा,..जाई ..या चटका लावीत असलेल्या,.. तिच्या परिचयाच्या प्रेमळ तरुण मुलींचीं भवितव्यें,.. त्या धुक्यांतून मावशीची दृष्टि पुढे पहाण्याचा कसून प्रयत्न करीत होती !.. पण तिला काहींच बोध होईना.

बाबासाहेब तर तिला पितृतुल्यच होते!.. त्यांच्याविषयीं तिला जिव्हाळा वाटे;. . आदरानें तिचें हृदय भरून येई ! . . पण त्या बापलेकांना आपापल्या मतासाठीं, . . आयुष्याविषयींच्या प्राजल समजुतीसाठीं, . . एकमेकांशीं झगडावेंच लागले; . . नाहीं का? तरीहि, अरुणप्रमाणेंच,.. बाबासाहेबाकडे एक प्रकारच्या कठोर विस्तृत दृष्टीनें पाहून, त्यांना कमी लेखावयाचें, हें मात्र कमळामावशीच्या जिवावर आलें ! .. तिला, बराच वेळ विचार केला, तरी त्याविषयीं कांहींच निश्चित करतां येईना !. .

आणि तिचा अरुण? . .तो तुरुंगांतून सुटला म्हणतात ! . .पण गेलीं जवळ-जवळ तीन वर्षे,.. त्याची तिला भेट नव्हती !.. तुरुंगातून सुटला,..तर मग आता तिला भेटावयास कां आला नाहीं ! . . तो काय करीत असेल ?. . कोठें गेला असेल ?.. तिला कांहींच न सुचून, तिचे डोळे त्याच्या आयुष्याच्या पुढील अस्पष्ट भागाकडे लागले !..

पण मग त्या बापलेकाशिवाय, . . अरविंद, वसंत वगैरे एक दोन व्यक्ति सोडल्यास, . . तिच्या त्या गोतावळ्यातील इतर व्यक्तींच्या क्षुद्र बुद्धीचे व अपेक्षा वृत्तीचे, आपल्या गतायुष्यात स्वतःलाहि पदोपदीं आलेले अनुभव आठवून,...कमळामावशीलाहि अरुणप्रमाणेंच त्यावेळीं वाटलें,—

" खरेंच ! हीं इतर सारीं क्षुद्र, उपकारी माणसें !! .."

## — प्रथम खंड संपूर्ण —

### - अल्प विश्रांति -